- Under article 44, the state provides a uniform Civil Code to all the citizens throughout the territory of India.
- Article 46 - The state to promote with special care, the educational and economic interests of weaker section of people and to protect them from social injustice and all forms of exploitation.
- Article 47 - The state to raise the level of nutrition and standard of living of its people and the improvement of public health and so on.
- Article 5 1 (A) (C) - Fundamental duties to renounce practices, derogatory to the dignity of women.
- Article 243D (3), 243T (3) & 243R (4) provides for allocation of seats in the Panchayati Raj System.

Ambedkar not only ascertain constitutional guarantees to women but also introduced and got passed four Acts which strengthened the position of women in the society.

These were incorporated in the Hindu Code Bill. These are:

i) The Hindu Marriage Act, 1955.
ii) The Hindu Succession Act, 1956.
iii) The Hindu Minority and Guardianship Act, 1 956.
iv) The Adoption and Maintenance Act, 1956.

**Women under other Laws**

There are number of protective laws in India to prevent exploitation of women. To quote few, Sati Prevention Act,1987,Dowry Prohibition Act,1961,the Family courts Act,1984, Protection of Human Right Act,1993,The Maternity Benefit Act1961,Immoral traffic(Prevention) Act1956,The Child Marriage Restraint Act,1929,The Pre- Natal Diagnostic Technique(Regulation and Prevention of Misuse)Act,1994, Domestic Violence Act,2005, The equal remunerationAct,1976 and National commission for women Act,1990 etc.

**Conclusion and Suggestions**

Dr Babasaheb Ambedkar was a path-maker of all the women irrespective of religion, caste, creed, gender and brought a new trend for uprising the women through his thoughts and beliefs. But still discrimination against women in Indian society is ongoing. The cases of domestic violence, female foeticide, rapes, gang- rapes, sexual harassment in offices and enterprises etc. are increasing and there is hardly any day pass when such incidence of victimisation is not reported in print or electronic media. Following are few suggestions so that gender equality must not merely remain on paper.

1) Improvement of employment opportunities and earning power should be given utmost priority.
2) Women ,(mothers) should not discriminate between female and male children in nurturing and giving education
3) Various amendments and laws are fruitless if there is no change in the attitude of the people.

The vision of Ambedkar is yet to become reality and unless minds are united it will be only a distant dream. So it is a duty of every Indian to fulfil the dreams of Ambedkar for a better life world of women. It may also be mentioned here that the term, ''Social Justice" will not be exercised properly if the people of India should not be able to change their attitudes especially towards women. Equality of women is necessary for the development of the nation.

**References**


1) A. P Datar, 'Datar on Constitution Of India', Agra: Wadhwa & Co. Law Publishers.
2) Arya, Sudha, 'Women Gender Equality and the State', Deep and Deep Publication.
3) D. D Basu, 'Introduction to Constitution Of India', New Delhi: Wadhwa & Co. Law Publishers.
4) Dr.J.N. Pandey, 'Constitutional Law of India', Allahabad: Central Law Agency.
5) P.M Bakshi, 'The Constitution Of India', Delhi: Universal Law Publishing.
6) Limaye, Champa, ' Women: Power and Progress', B.R.Publishing Corporation.
7) Godbole Mahendra Tukaram ( 2015) ...The Study of Nature of Dr.Babasaheb Ambedkar's Constitution and its contribution for Justice, Freedom, Empowerment of Women's and Depressed Strata. International Journal of Medical Science and Clinical Inventions. Volume 2 Issue 6
8) Satyajit Das (20 15).. .Ambedkar and Women rights: An Analysis. International Jour- nal of Interdisciplinary and Multidisciplinary Studies. (IRJIMS) Vol I, Issue I.
9) Sanjeev Kumar (2015) ... Women Empowerment in India and Dr.B R Ambedkar. International Journal in Commerce, IT and Social Sciences. (IJCISS). Vol 2, issue 05
10) Gunjal V.R (2012) ... Dr. Babasaheb Ambedkar and Women Empowerment, Social Work, Vol. XI ( 1 ).

# Dr. Ambedkar's Realistic Foreign Folicy

- **Dr. Kulkarni Sharad Madhukar**
G. E.T.'s Arts, Comm. & Science College
Nagaon, Tal. Dhule

**Introduction**

Ambedkar never undermined the importance of nation. He strongly advocated for a power which a country needs to aspire. It is the only route through which it can make its presence felt in the world politics. Unfortunately that did not happen during the Congress regime. He was scornful of Nehruvian foreign policy, especially on China and the erstwhile Soviet Union. He wanted Tibet must remain an independent country. Ambedkar's views on foreign affairs are still relevant today. It is seen that Ambedkar has influenced the ideology of Prime Minister Narendra Modi. He knew the Chinese threat to India. The present study is focused on the Dr. B. R. Ambedkar's views on Indian foreign policy and its relevance in present international politics, social and political scenario. He had deep knowledge of Foreign policy of various countries of the world. Dr. Ambedkar's views on various economic, social and political aspects have been analyzed; his approaches to Indian foreign policy have remained a rain shadow area. He was the first important Indian official who had openly attacked Nehru for being too friendly to China and not friendly enough to the United States of America .So study of Dr .Ambedkar's foreign policy is very important.

**Objectives**

1) To study views of Dr .Ambedkar on India's foreign policy.
2) To study Dr.Ambedkar's thoughts about Kashmir issue.

**Hypotheses**

1) His views on Kashmir were significantly different from the Government's approaches.
2) Dr. Babasaheb Ambedkar's foreign policies would provide an alternative option for our foreign policy.

**Methodology -** With the help of secondary concrete tools and reference books used for try to reach towards the conclusion.

**Analysis -** Dr. Babasaheb Ambedkar was strongly advocated for a power which a country needs to aspire. It is the only route through which it can make its presence felt in the world politics. Unfortunately that did not happen during the Congress regime. He was scornful of Nehruvian foreign policy, especially on China and Soviet Union. He wanted Tibet must remain an independent country. While delivering speech in Kathmandu in 1955, he cautioned the aggressive approach of China to Himalayan states.

While addressing the students of Lucknow University in 1951, Babasaheb Ambedkar had said, "India has failed to develop a strong foreign policy. Tibet has been garrisoned by China; it will have long-term threat to India." This statement of Babasaheb is still relevant. The recent visit of the Dalai Lama to Twang has stirred a fresh controversy. China threatened India for permitting the Dalai Lama to visit Twang. The Indian Government has made it clear that it was a spiritual visit and nothing to do with politics. But the anger and frustration of China are well entrenched in the Chinese strategic calculus. While explaining the vision of Dr.Ambedkar, it becomes interesting to connect his thought of a strong nation and realistic foreign policy. Satish Kumar has praised Ambedkar's policy in his article.1

Current Government of Prime Minister Narendra Modi is moving in the directions of Babashaeb's thoughts. Narendra Modi was the first Prime Minister who visited Bhutan and Nepal after becoming the Prime Minister. That was a breakaway from established trend of Indian Prime Minister's entourage. Modi as a Prime Minister made the Himalayan states more important. This was a major turning point in Indian foreign policy. Since then China is very aggressive. The Modi Government is also working on the long-term strategy, which was missing earlier. That is why at the fag-end of his Prime ministership, Manmohan Singh uttered that India did not have strategic culture. With Modi's doctrine, China is feeling uneasy. China plays dual role. On one side, it is keen to hijack the Buddhist structure through its soft power diplomacy, on the other hand, it is waiting the Dalai Lama to pass away and let the Tibetan Liberation Movement be rudderless and leaderless. The situation in Tibet is very bad. People are not free. Ambedkar knew this. This is mentioned by Satish Kumar. Satish Kumar has praised Ambedkar's policy in his article.2

Now a days India has been seeking a permanent seat on the United Nations Security Council as a member of the G-4. India was offered a permanent seat on the council 55 years ago, in 1955. But that offer, made by

the United States and the Soviet Union, was declined by India's first Prime Minister, Jawaharlal Nehru. Nehru said the seat should be given to China . Now a days India has been seeking a permanent seat on the UNSC. India makes a number of claims to justify its demand. India has the world's second largest population and is the world's largest liberal democracy. India is the third largest contributor of troops to United Nations peacekeeping missions with 7,860 personnel deployed with ten UN Peacekeeping Missions as of 2014 .Although the U.S. and other permanent Council members were not very supportive of expanding the Security Council, in his visit to India USA President Obama has offered his support for India to become a permanent member of the Council. However the reactions from other Council members are not very clear, particularly from China. However Dr. Ambedkar demanded permanent seat on United Nations Security Council in 1951.Speaking at a gathering of students of Lucknow University on November 8, 1951, Dr. Ambedkar said: "The government's foreign policy failed to make India stronger. Why should not India get a permanent seat in the UN Security Council? Why has the prime minister not tried for it? India must choose between parliamentary democracy and the Communist way of dictatorship and come to a final conclusion." Thus his views are very relevant for us.

Dr. Ambedkar told the Constituent Assembly on 19 October 1947 that the "grant of special status to Kashmir on the score of religion would enable it to assume independence afterwards". Notwithstanding the grave evils such as the rise of communalism, separatism and persecution of the non-Muslim minorities that followed on the incorporation and strict enforcement of Article 370, successive Congress Governments at the Centre continued to treat Jammu & Kashmir differently. So much so that Prime Minister Indira Gandhi not only brought down the Congress government in Jammu & Kashmir in February 1975 and installed as Chief Minister the deflated Sheikh whom Jawaharlal Nehru had got arrested on August 9, 1953 on the charge of "sedition", but also permitted the Sheikh to review the Central laws extended to the State after August 9, 1953 and seek withdrawal of laws which he considered harmful for the State and the so-called distinct identity of Kashmir.

About Lhasa with reference to China he said,… "…on this side allowing the Chinese to take possession of Lhasa, the Prime Minister has practically helped the Chinese to bring their border down to the Indian border". He worried about Lhasa. He criticized policy about Lhasa.

According to Ambedkar's India's foreign policy was based upon peace, co-existence between communism and free democracy and nonalignment .Dr. Ambedkar thought that it resulted in making India's friendless country. His suggestion of partition of Kashmir on commercial basis was fatal to India. He criticized pro-Nasser attitude of Jawaharlal Nehru (about nationalization on of Suez Canal) as disastrous. His pro-American, Anti-soviet, pro-SEATO and anti non alignment policy ran counter to India's accepted foreign policy. Though he was unmistakably anti-Soviet ,he was by no means pro-American and a sounded note of warning against expanding American influence.

**Conclusion**

Dr. B.R. Ambedkar was the first important Indian official who had openly attacked Pandit Javaharlal Nehru for being too friendly to China and not friendly enough to the U.S.A. Study of Dr. Babasaheb Ambedkar's foreign policies would provide an alternative policy option for our national security and foreign policy. His views on Jammu-Kashmir, Lhasa, East Bengal, Pakistan and China were significantly different from the Government's approaches on the subject. His solutions to the question of Pakistan were based on either reaching an agreement or resorting to arbitration. His views are very relevant for us.

**Refrences**


1) Satish Kumar - Ambedkar's Tibet concerns and Chinese threat- Daily The pioneer , Saturday, 15 April 2017
2) Dr.M.R.Ingle - Relevance Of Dr. Ambedkar's Economic Philosophy In Thecurrent Scenario-International Research Journal, September 2010 ISSN- 0975-3486 RNI: RAJBIL 2009/30097 VOL I * ISSUE 12
3) Har Mohindar Sing, K.C.Kaushik, S.R.Shara-B.R.Ambedkar on the removal of Untouchability. - Sarup and Sons , New Delhi.
4) Harish Parvathaneni- Ambedkar's views on foreign policy By Harish Parvathaneni--www.newindian express.com
5) K.S.Bharthi-The Political Thoughts of Dr. Ambedkar- Encyclopedia of eminent Thinkers page-87.
6) Jawaharlal Nehru "declined a United States offer" to India to "take the permanent seat on the United Nations Security Council" around 1953 and suggested that it be given to China, according to the United Nations Under-Secretary General, Sashi Tharoor. In his latest book, "Nehru — The Invention of India," Mr. Tharoor writes.
7) Hari Om --Congress compromising Indian sovereignty in Jammu & Kashmir –www vijayvaani.com
8) UN says peacekeepers overstretched-Americas Al Jazeera English. Retrieved 21 October 2011.
9) Dr. Kulkarni Sharad Madhukar, - Dr. Babasaheb Ambedkar's views on India's Foreign Policy - Bharatiy Rajyaghataneche Shilpakar Dr.Babasaheb Ambedkar –Editor Prof. Thorat and Prof. Desale.
10) Deepak Mahadeo Rao Wankhede – Dr. Ambedkar's Thought on political Geography.- page-205

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मानवतावाद

**– प्रा. डॉ. आर. जी. खैरनार**
राज्यशास्त्र विभाग
कला व विज्ञान महाविद्यालय, सोनगीर

**प्रस्तावना**

प्रत्येक विचारवंत किंवा व्यक्तिची विचाराधारा ही त्याच्या वरील असलेल्या कौटूंबिक, सामाजिक, शैक्षणिक इत्यदी संस्कारातून तयार होत असते. त्याच्या विचारांचा एका विशिष्ट दृष्टीकोनाचे का आहेत, हे शोधण्यासाठी त्याची पूर्वपिठिका शोधावी लागते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रत्येक मानवाच्या हक्कासाठी विचार मांडणारे विचारवंत नाहीत तर ते प्रत्यक्षात मानवाच्या हक्कांना मानवाला कसे मिळून देता येतील. यासाठी सतत प्रयत्नशील असलेले मानवनिष्ठ व्यक्तिमत्त्व होत. त्यांनी एका विशिष्ट समाज किंवा वर्गाला मानवी दृष्टीने बघितले नाही. तर त्यांनी प्रत्येकाला मग तो माझा आहे किंवा नाही हे न बघता तो मानव आहे, म्हणून त्याचा हक्कांसाठी प्रयत्न केले आढळते. त्या अर्थाने डॉ. आंबेडकर मानवतावादी आहेत का? या शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तूत शोध निबंधात करण्याचा प्रयत्न केलेला आहे. डॉ. आंबेडकरांचे स्वातंत्र्यपूर्व काळातील किंव स्वातंत्र्योत्तर काळातील कार्यांवरून ते मानवतावादी असल्याचे दिसतात. ते एक अर्थशास्त्रीय, समाजशास्त्री, घटनाकार, वकील, प्रबोधनकार असले तर त्यांनी अधिकाधिक कार्य मानवाच्या कल्याणासाठी केले असल्याने ते मानवतावादी आहेत, असे लक्षात येते. त्या अनुषंगाने प्रस्तूत शोध निबंधाची मांडणी करण्यात आली आहे.

**उद्देश**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकारांच्या मानवतावादी विचारांचे अध्ययन करणे.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकारांच्या कार्यांमधून मानवतावादाचा शोध घेणे.

स्वातंत्र्यपूर्व भारतात एकीकडे राजकीय क्षेत्रात ब्रिटिशांचे शासन तर दुसरी कडे सामाजिक क्षेत्रात परंपरा, रूढींचे शासन होते. परिणामी भारतीय समाज चातुर्वर्ण व्यवस्था, जातीभेद, कनिष्ठ-वरिष्ठ, छुताछात, अस्पृश्यता इत्यादीमुळे दुभंगलेला होता. समाजातील बहुसंख्य वर्ग अज्ञान, अन्याय आणि दास्यत्वाच्या जीवनात खितपत पडलेला होता. अशा वेळी स्वातंत्र्य चळवळीला ही बाधा होऊ नये व समाजातील बहुसंख्य वर्गाला ही मानव म्हणून जगता यावा यासाठी फक्त विचार मांडणारे नव्हे तर त्यासाठी प्रत्यक्ष प्रयत्न व कृती करण्याचे कार्य डॉ. आंबेडकर यांनी मानवाला मानव म्हणून जगता यावा यासाठी सतत प्रयत्न केलेले दिसून येतात. त्यांनी केलेल्या कार्यातून व दिलेल्या विचारांतून त्यांच्यातील मानवतावाद दिसून येतो. त्याचे विश्लेषण पुढील प्रमाणे करता येईल.

**स्वातंत्र्यपूर्व काळात केलेले सत्याग्रह व कार्य**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर उच्च शिक्षण घेत असतांनाच एक मानव म्हणून त्याला परदेशात मिळालेला सन्मान व भारतात मिळालेली वागणूक यावरून त्यांच्या कार्याची व विचारांची दिशा निश्चित होत गेलेली दिसते. म्हणूनच त्यांनी उच्च शिक्षण घेत असतांनाच बहुजन समाजाच्या हक्कांच्या लढाईची सुरूवात केली. भारतात स्थायिक झाल्यानंतर त्यांनी अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली. यामागील कारण म्हणजे त्यांना अशा मानवी समाजाला पुढे आणावयाचे होते, ज्या समाजातील व्यक्तीला वर्षोनुवर्षे मानव म्हणून स्वीकारले गेले नव्हते. हे करत असतांना त्यांनी रक्तरंजीत संघर्षाची सुरूवात केली नाही, तर कायद्यान्वये व सामोपचाराने आपल्याच बंधवांशी तात्त्विक लढा देऊन हक्क व सन्मान मिळून द्यावयाचे होते. आणि त्यासाठीच ते सतत प्रयत्नशील असल्याचे दिसून येतात.

भारतातील बहुजन समाजातील प्रत्येक मानवाला त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठीच त्यांनी १९२७ मध्ये महाडच्या चवदार तळ्यासाठी, १९३० मध्ये नाशिकच्या काळाराम मंदिरातील प्रवेशासाठी सत्याग्रह केले. मनुस्मृती हे ग्रंथ मानवी हक्कांचा उल्लंघन करणारा आहे, व मानवतावादाच्या विरोधी असलेला ग्रंथ असल्याने त्यांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी त्याचे दहन केले. हे सर्व प्रस्थापितांना विरोध करण्यासाठी त्यांनी केले नाही तर त्यांनी बहुजन समाजातील व्यक्तींना ते मानव आहेत, याची जाणीव करून देण्यासाठी अनेक उपक्रम राबविले. त्यासाठी बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना करून शिक्षण प्रसाराचे व शिक्षण देण्याचे कार्य सुरू केले. मूकनायक, बहिष्कृत भारत या साप्ताहिकेतून दलित, पददलितांच्या, स्त्रियांच्या, शेतक-यांच्या व समाजातील मागासलेल्यांच्या दुःखांना वाचा फोडली.

**मूलभूत हक्क**

डॉ. आंबेडकरांना मानवी प्रतिष्ठा व मानवी कल्याण यावर अपार श्रध्दा होती. प्रत्येक व्यक्तीचा विकास व समाजात प्रत्येक मानव समान आहे. त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असलेली हक्क त्याला मिळालेच पाहिजे, या विचारांवर ते ठामच नव्हते, तर त्यासाठी ते सतत प्रयत्नशील असल्याचे दिसून येतात. याचाच एक भाग म्हणून त्यांनी अनेक घटनांचा अभ्यास करून भारतीय नागरिकांसाठीच नव्हे तर व्यक्तींसाठी ही मूलभूत हक्कांची तरतूद भारतीय राज्यघटनेत केली. मूलभूत हक्कांची तरतूद करीत असतांना मानवतावादी दृष्टीकोण समोर ठेवूनच ही मूलभूत हक्क विशिष्ट जात, धर्म, भाषा लिंग, प्रदेश इत्यादी मानवी भेद न ठेवता एक मानव म्हणून त्याच्या सर्वांगीण विकाससाठी पूरेसे हक्के भारतीय राज्यघटनेत समाविष्ट केल्याचे दिसून येतात. ही हक्क शासन किंवा संस्थेने संकुचित करू नये यासाठी न्यायालयीन संरक्षणाची विशेष तरतूद राज्यघटनेत केल्याची दिसून येते. भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क हे डॉ. आंबेडकरांची मानवतावादी विचार किती प्रग्लभ आहेत, हे दर्शवितात.

**धर्म**

डॉ. आंबेडकर धर्माचा आधार मानवाला मानताता. त्यांच्या मते मानव धर्मासाठी नाही, तर धर्म मानवासाठी आहे. धर्माचा केंद्रबिंदू मानवता आहे. त्यामुळे धर्म हा मानवाच्या विकासासाठी असावा, त्यात मानवी कल्याणाची मूल्य असावी, नव्हे तर मानव मानवात भेद निर्माण करणारी तत्त्व असावी. त्यांच्या मते समात, बंधुभाव, स्वातंत्र्य, उदारता, सहअस्तित्व, करूणा, सहकार्य ही सद्‌गुण खऱ्या धर्माची प्रस्थापना करतात, आणि तोच खरा धर्म आहे. त्यासाठी त्यांनी हिंदू धर्म सुधारणेचे भरपूर प्रयत्न केले. त्यांच्या मते धर्म हा कधी ही वाईट असू शकत नाही. मात्र धर्माचे रक्षणकर्ते स्वतःच्या स्वार्थासाठी धर्माचा उपयोग करून समाजात भेदभाव निर्माण करतात. म्हणूनच त्यांनी तथाकथित धर्माच्या रक्षणकर्त्यांविरूध्द चळवळ उभारली, व धर्म सुधारणेचा प्रयत्न केला, व शेवटी मानवी कल्याणासाठी, व्यक्तीची प्रतिष्ठा, गरिमा पुनः प्राप्त करून देण्यासाठीच त्यांनी बौध्द धर्माचा स्विकार केला.

**लोकशाही**

मानवी कल्याण व सर्वांगीण विकास फक्त लोकशाहीतच होऊ शकतो, असा प्रबळ विचार डॉ. आंबेडकरांचा होता. भारतीय परिस्थिती लोकशाही किती यशस्वी होईल, याबाबत डॉ. आंबेडकरांच्या मनात शंका होती, कारण लोकशाहीसाठीच हवी असलेली परिस्थिती भारतात नव्हती, जातीय राजकारण, विभिन्न सांस्कृतिक, भाषिक, प्रदेशिक, जातीय गट, समाजात असेलीली निरक्षरता, अज्ञानता, जातीभेद व एकाच जातीत परत जातीय स्तर अशा विभिन्न सामाजिक समस्यां असलेल्या भारतात लोकशाही कितपत टिकेल हा प्रश्न होताच. मात्र तरीही हुकुमशाहीपेक्षा झुंडशाही असलेली संसदीय लोकशाही पर्यायाने त्यांनी भारतासाठी निवडली. कारण भारतातील प्रयत्न मानवाला स्वातंत्र्य, समता मिळवून द्यावयाची होती. लोकशाहीचा आधार व्यक्ति विकास असल्याने, मानवी हक्क अधिकाधिक व तळगाळातील लोकांपर्यंत पोहचविण्याचे लोकशाही हेच मार्ग असल्याने त्यांनी भारतात संसदीय लोकशाहीचा पुरस्कार केला. या लोकशाहीच्या माध्यमातून प्रत्येक भारतीयाला आर्थिक, सामाजिक, राजकीय न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न आंबेडकरांनी केलेला दिसून येतो.

**समारोप**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सुरूवातीपासूनच मानवी हक्कांचे व मानवी विकासाचे पक्षधर असल्याचे दिसून येतात. त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात समाजातील शोषितवर्ग, पिडित मानवजातीच्या उध्दारासाठी प्रयत्नशील असल्याचे दिसून येतात. त्यांनी मानव जातीसाठी कार्य करतांना विशिष्ट जातीला महत्त्व दिलेले दिसून येत नाही, तर त्यांनी दलित, पददलित, आदिवासी, स्त्री, भटके विमुक्त, शोषित शेतकरी, भूमिहीन अशा सर्व वर्गातील मानवासाठी कार्य केलेले दिसून येते. त्यांचे लोकशाही, धार्मिक, आर्थिक, समाजिक, राजकीय तसेच राष्ट्रीय विचारांचा केंद्रबिंदू मानव आणि मानवी कल्याण हेच असल्याचे दिसून येते.

**संदर्भ**

१) भोळे भास्कर लक्ष्मण, आधुनिक भारतीय राजकीय विचार, पिंपळापूर ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, दुसरी आवृत्ती २००३
२) पाटील वा. भा., प्राचीन व आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन, जळगांव, २००९
३) कुबेर वा. न., डॉ. आंबेडकर: विचारमंथन, केसरी प्रकाशन, पुणे, १९७२
४) देवरे पी.डी., विसपुते एस. एम., आधुनिक भारतीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन, जळगांव, २००४
५) आगलावे प्रदिप, समाजशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, २००९

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारताच्या विकासासाठी आर्थिक तत्वज्ञान

– प्रा. अनिल साहेबराव पाटील
अर्थशास्त्र विभाग, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
सोनगीर, ता. जि. धुळे

**प्रस्तावना**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सामाजिक क्रांतिप्रवाहाचे कृतिशील विचारवंत व नेते होते. २० व्या शतकातील महान विचारवंत, प्रकांड कायदेपंडित, थोर समाजसेवक, दूरदर्शी राजकारणी म्हणून ते ओळखले जातात. डॉ. आंबेडकरांचे जीवन–कार्य अलौकिक व अनन्यसाधारण असून, आधुनिक भारताच्या जडणघडणीत त्यांचे योगदान खूप मोठे आहे. भारतातील दीन–दलित व अस्पृश्यांच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक तसेच राजकीय जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी सामाजिक संबंधाची पुनर्रचना मानवी मूल्यांच्या अनुषंगाने करण्यात, कोटयावधी दलित जनतेच्या मनात स्वाभिमान जागृत करण्यात व शतकानुशतके उपेक्षित असणाऱ्या समाजात वैचारिक क्रांती घडवून आणण्याचे श्रेय त्यांच्याकडेच जाते. उत्तम प्रशासक, थोर बुध्दिवादी व सिध्द हस्तलेखक, ग्रंथकार, कुशल संघटक, दलितांचे महान नेते, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार तसेच सामाजिक विज्ञानाच्या प्रमुख ज्ञानशाखांतील तत्वचिंतक अशा विविध क्षेत्रातील त्यांचे स्थान वैशिष्टयपूर्ण असून त्यांनी केलेले समाजकारण, राजकारण, अर्थकारण, राज्यघटना, शिक्षण या विषयावरील मूलगामी चिंतन, विश्लेषण व कार्य भारतीयांना प्रेरक, पूरक व मार्गदर्शक असे आहे.

खेड्यातील दलित शेतकरी व शेत मजूर आणि शहरातील कामगार यांच्याशी त्यांचा घनिष्ठ संबंध आला. महारांच्या परंपरागत वतनामुळे त्याची होणारी कुचंबणा, खोतातील कुळांचे शोषण, कामगारांविषयक कायद्यातील त्रुटी यांच्याकडे लोकांचे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी वृत्तपत्रांमधून लिखाण केले. व परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी कायदे मंडळात काही विधेयकही मांडली.

भारतातील सर्व प्रकारचा कच्चा माल उदा. कापूस हा कमी किमतीत खरेदी करुन इंग्लंडमध्ये नेवून त्याचा पक्का माल तयार करुन म्हणजेच वस्त्राच्या स्वरुपात दुप्पट विकायचा आणि प्रचंड नफा कमवायचा हा त्यांचा धंदा होता. यामुळे भारतीय समाज चहूबाजुंनी आर्थिक दृष्टिने पिळला गेला. त्याचे अर्थशास्त्र हालाकीचे बिघडले. यास ब्रिटिश सरकारच जबाबदार आहे असे सडेतोड टिकाही त्यांनी आपल्या प्रबंधात निर्भयपणे केली.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार**

भारत हा एक कृषीप्रधान देश आहे. कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा प्रामुख्याने शेती क्षेत्राच्या विकासावर अवलंबून असतो असे अनेक अर्थशास्त्रज्ञांनी सांगितले आहे. बाबासाहेबांनी सुध्दा शेती क्षेत्राविषयक आपले विचार मांडले आहे.

भारतातील लहान धारण क्षेत्रे आणि त्यावरील उपाय हा आंबेडकरांचा लेख म्हणजे भारताच्या शेती प्रश्नावरील अत्यंत मुलभूत अशा प्रकारचे भाष्य होय. हे लेख प्रथम १९१८ साली प्रसिध्द झाला. नंतरचा काळात भारतात शेती क्षेत्रात अत्यंत महत्वपूर्ण व गुणात्मक असे बदल झाले आहेत. १९५० च्या दशकात विविध राज्यांनी संमत केलेले व अडखळत का होईना कार्यान्वित केलेले जमीन सुधारणा विषयक कायदे हा पहिला महत्वाचा बदल होय.

लहान धारणक्षेत्र ही भारतीय शेतीला भेडसावणारी ही एक गंभीर समस्या आहेच. परंतु ही लहान धारणक्षेत्र विखुरलेली असल्याने समस्या अधिक बिकट होते. उदाहरणार्थ मुंबई इलाख्यात सरासरी धारण क्षेत्र २५.९ एकर तर पुण्याशेजारच्या पिंपाला सौदागर येथे अवघे एक–दोन एकर एवढेच धारण क्षेत्र होते. यापेक्षा एक महत्वाची गोष्ट म्हणजे हि धारणक्षेत्रे लहान–लहान तुकडयात विभागली गेली होती. उदाहरणार्थ रत्नागीरी जिल्हयातील अवघ्या २० गुंठयाचे धारणक्षेत्र तीन तुकडयात विभागले तर ठाणे जिल्हयातील एक एकर नऊ गुठयांचे धारणक्षेत्र १४ तुकडयांचे मिळून झालेले होते. अशी असंख्य उदाहरणे देता येतील. मुळातच लहान धारणक्षेत्रे व त्यातही त्यांचे विखंडन यामुळे साधन संपत्तीचा कार्यक्षमतेपणे उपयोग करण्यात अडचण निर्माण होवून उत्पादन खर्च वाढतो व उत्पादकता कमी होते यामुळे स्वाभावीकपणे धारणक्षेत्राचा आकार वाढविणे व तुकडेजोड करणे हेच आपल्याला प्राथमिक उपाय वाटू लागले.

नेमक्या या पार्श्वभूमीवर आपल्याला आंबेडकरांचे धारणक्षेत्राच्या आकाराविषयीचे विचार तपासून पाहणे अगत्याचे आहे. या संदर्भात त्यांनी खालील प्रश्न उपस्थित केले.

१) धारणक्षेत्राच्या विखंडनामुळे साधन संपत्तीचा उपयोग कार्यक्षमतेपणे करण्यात अडचण निर्माण होत असतांनाही असे विखंडन मुळातच का होते?

२) मोठी धारणक्षेत्र कार्यदक्ष व लहान धारणक्षेत्र अकार्यदक्ष ही खरोखरच वस्तुस्थिती आहे काय? दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे किफायतशीर धारणक्षेत्र कसे ठरवायचे?

३) भारतातील लहान व विखुरलेल्या धारणक्षेत्रामुळे निर्माण झालेल्या समस्येवर अंतिम उपाय कोणता?

पहिली गोष्ट म्हणजे वारसाहक्क हे जमिनीच्या विभाजनाचे प्रमुख कारण आहे. या मताशी डॉ. आंबेडकर असहमत होते. त्यांच्यामते जमिनीवर पडत असलेल्या लोकसंख्येचा प्रचंड भार हेच त्याचे मुख्य कारण होय. शेती हे उपजिविकेचे एकमात्र साधन असल्यामुळे अजिबात नसण्यापेक्षा लहानसा का होईना पण जमिनीचा तुकडा आपल्या स्वाधिन असावा अशी लोकांची धारणा होती. अशा रितीने आंबेडकरांनी प्रश्नाच्या मुळालाच हात घातला त्यांचे प्रतिपादन असे जमिनीच्या लहान–लहान तुकडयांपासून काही ना काही फायदा होणे हेच लहान धारणक्षेत्राच्या

समस्येचे उगमस्थान आहे. हा फायदा तरी का होतो? उपजिवीकेसाठी फार मोठी लोकसंख्या मुख्यत्वे शेतीवर अवलंबून आहे. म्हणून त्यामुळे वारसाहक्क हे जमिनीच्या विभाजनाचे मुख्य कारण नसून शेतीवरील लोकसंख्येच्या अमर्याद भार हे त्याचे मुळ कारण होय.

**बाबासाहेब आंबेडकराचे अर्थव्यवस्थाविषयक विचार**

**नाणेपुरवठयाचे अर्थशास्त्र**

बाबासाहेब आंबेडकरांनी जीवनाच्या विविध क्षेत्रासंबंधी मुलगामी विचार केला होता. त्यांची दृष्टी जाती व्यवस्था, स्त्रीयांची गुलामगिरी या विषयांप्रमाणेच अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रातील मुलभूत मुद्यांना हात घालणारी होती. उदा. नाणे पुरवठयाचे अर्थशास्त्र (मॉनिटरी इन्कॉनॉमिक्स) या विषयीचे बाबासाहेबांचे विचार यातील पैशांच्या पुरवठयांचे नियमन करणे (रेग्युलॅरिटी पार्ट ऑफ फ्लो ऑफ मनी) म्हणजे देशातील पैशांची निर्मिती कशी नियंत्रित करता येईल यावर नाणे पुरवठयाच्या अर्थव्यवस्थेमधील स्थैर्य अवलंबून असते. ते नियमन योग्य पध्दतीने होत असेल तर अर्थव्यवस्थेत चढउतार होण्याच्या अथवा तुट वाढण्याचा धोका कमी होतो. आज अंदाजपत्रकामध्ये जी तुट दिसते ती वित्तीय तुट आहे. या संबंधी बाबासाहेबांचे विचार आजही चिंतनीय आहेत. व्यापार समतोलात पैशांचा पुरवठा व्यवस्थीत असेल. नियंत्रित असेल तर आर्थिक व्यवहारांमधील चढउतार मोठया प्रमाणावर होत नाहीत. 'प्रॉब्लेम ऑफ रुपी' या प्रबंधात बाबासाहेबांनी नियमन व्यवस्थेसंबंधी सिध्दांत मांडला होता तो आजही उपयुक्त आहे.

**उद्योगधंद्यासंबधी बाबासाहेब आंबेडकरांचे विचार**

उद्योगधंद्यांची स्वरुपावर आधारीत विभागणी बाबासाहेबांनी केली १) मुलभूत उद्योग २) आवश्यक उद्योग ३) पुरक उद्योग.

मुलभूत उद्योग केंद्र सरकारच्या अखत्यारीत असावेत आवश्यक उद्योगांची वाटणी केंद्र सरकारे, राज्य सरकारे आणि काही ठिकाणी दोन्हीच्या सहभागाने कार्यरत अशा पध्दतीने असावीत. पुरक उद्योग खाजगी क्षेत्रात देण्यात यावेत. मुलभूत उद्योग व आवश्यक उद्योगाच्या क्षेत्रात व्यवस्थापनासाठी लागणारी चौकट आणि रचना कशी असावी या संदर्भात बाबासाहेबांनी भोपाळच्या अधिवेशनात मांडणी केली होती. १९३५ मध्ये झालेल्या त्या अधिवेशनात त्यांनी बँका आणि इतर पतपुरवठा संस्थाच्या राष्ट्रीयकरण करण्यात यावे अशी मागणी केली होती.

**विम्याचे राष्ट्रीयकरण**

विम्याचे राष्ट्रीयकरण करण्यामागील दोन उद्देश डॉ. बाबासाहेबांनी मांडले.

१) विम्याचे राष्ट्रीयकरणामुळे लोकांचा पैसा खाजगी कंपनी पेक्षा सरकारकडे अधिक सुरक्षित राहतो. त्यामुळे लोकांना अधिक सुरक्षितता प्राप्त होते. त्यांना शेवटी पैस परत मिळण्याची हमी असते.

२) विम्याद्वारे आर्थिक नियोजनासाठी साधन सामुग्री प्राप्त होते. अन्यथा हिच साधन सामुग्री प्राप्त करण्यासाठी सरकारला बाजारात अधिक व्याजाच्या दराने ती उपलब्ध झाली असती.

**जमिनीचे राष्ट्रीयकरण**

जमिनीचे एकत्रीकरण व कुळकायद्याचा भूमीहिन मजूर, शुद्र, आणि अस्पृश्यांसाठी मुळीच उपयोग नाही. तसेच ज्या अर्थव्यवस्थेत मोठया प्रमाणावर भूमीहिन वर्ग असतो तेथे केवळ शेती नियोजन करुन समाजाचे प्रश्न सुटणार नाहीत हे प्रश्न सामुहिक शेतीमुळेच सुटू शकतील असे मत डॉ. बाबासाहेबांनी मांडले. त्यानी सामुहिक शेतीचे व्यवस्थापन खालील पध्दतीने करावे असे देखील स्पष्ट केले.

१) राज्याचे जमिनीचे विभाजन प्रमाणित आकाराच्या शेती मध्ये करुन हि शेती ग्रामीण लोकांना कुळ म्हणून कसण्यासाठी द्यावी. काही कुटूंब मिळून कुळाचा एक गट करावा त्यांनी शेती खालील अटींवर करावी.

अ) सदर शेती सामुहिक शेती म्हणून असावी.

ब) सरकारचे नियम व आदेश या नुसार जमिन करावी.

क) शेतसारा इ. देणी दिल्यानंतर, उरलेले उत्पादन, ठरवून दिल्याप्रमाणे कुळांनी आपआपसात विभागून घ्यावे

२) खंडाने जमिन देत असतांना राज्याने जात-धर्म इत्यादीचा विचार करु नये. तसेच जमिनीचे वाटप असे करावे की, जेणे करुन कोणीही व्यक्ती जमिनदार अथवा कुळ अथवा भूमिहीन मजुर राहणार नाही.

३) राज्याने उत्पादन वाढीसाठी बि-बियाणे, खते, अवजारे, जनावरे इ साठी अर्थपुरवठा करावा.

४) राज्याला खालील हक्क द्यावेत.

अ) राज्याने उत्पादनावर खालील प्रमाणे आकार घ्यावेत.

१. शेतसारा

२. जमिनदाराला लाभांश देण्यासाठी लागणारी रक्कम

३. भांडवल पुरवठा केल्याबद्दलचा खर्च

ब) एखाद्या व्यक्तीने कुळाचे नियम तोडल्यास अथवा साधन सामुग्रीचा वापर करतांना बुध्दी पुरस्कर दुर्लक्ष केल्यास अथवा सामुहिक शेतीहिताच्या विरुध्द काम केल्यास त्यास दंड आकारावा. अशा प्रकारे सामुहिक शेतीचे व्यवस्थापन करावे. असा विचार डॉ. बाबासाहेबांनी मांडला म्हणजेच त्यांनी साम्यवादाचा विचार मांडला.

**अंदाजपत्रक आणि करपध्दती वरील विचार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अंदाजपत्रक आणि वैयक्तिक करावरील आपले विचार विस्तृतपणे मांडले आहेत. हे त्यांचे विचार त्याच्या भाषणांमधून आणि त्यांनी स्वत: स्थापन केलेल्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या जाहिरनाम्यामधून व्यक्त झालेले आढळतात.

आंबेडकर विकसनशील कर पध्दतीचे समर्थक होते. त्यामुळे जे कर राज्याला अधोगतीकडे नेतात त्यांना त्यांचा विरोध होता. त्यांच्या मते कर पध्दतीची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे असली पाहिजेत.

१) कर पध्दती अशा प्रकारे विकसनशील असली पाहिजे की ज्यात श्रीमंताकडून अधिक तर गरिबांकडून कमी कर घेण्यात यावे. एवढेच नाही तर काही मर्यादेच्या खाली गरिबांना कर पध्दतीतून पूर्ण सूटका मिळावी.

२) केवळ उत्पन्न हे कर लावण्याचा निकष असता कामा नये. तर कर भरण्याच्या योग्यतेचा त्यात विचार होणे आवश्यक आहे.

३) कर भरण्याच्या पध्दतीमुळे लोकांच्या जीवनावर परिणाम होता कामा नये.

४) जमिन महसूलासारख्या बाबी नेहमी लवचीक असल्या पाहिजेत. जेणे करुन शेतकऱ्यांना वस्तु पुरवतांना त्यांची स्थिती एकूण परिस्थितीचा विचार केला जावा.

डॉ. आंबेडकरांना वाटत होते की, समाजातील गरीब वर्ग जो दोन वेळच्या जेवणालाही मुश्किल आहे त्यांच्याकडून कर घेतला जावू नये. त्यापेक्षा ज्यांचा वापर अधिक आहे त्यांच्याकडून कर वसुली करणयात यावी. अशा प्रकारे कर वसुली करण्यात आली तर ते आपले जिवनमान खाली आणू शकणार नाहीत. आंबेडकरांच्या मताप्रमाणे केवळ श्रीमंत आणि समृध्द लोकांनाच कर भरण्यास लावावे. पुढे त्यांनी असा विश्वास व्यक्त केला आहे की, अशा प्रकारे या वर्गावर कर लावताना अशी काळजी घेतली जावी की बचतीचा दर व भांडवली रचनेवर याचा विपरीत परिणाम होणार नाही. याबाबतीत त्यांनी त्यांच्या समकालीन पाश्चिमात्य अर्थशास्त्रज्ञानच्या कल्पनेशी आपली भागेदारी स्पष्ट केली आहे. ज्यांच्या मते भारताच्या अविकसीत राहण्याचे प्रमुख कारण म्हणजे बचतीचा अल्पदर आणि भांडवली रचना या दृष्टिने ते पुरवठयाच्या बाजुचे होते असे म्हणता येईल.

**समारोप**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांची एकूण गोळा बेरीज असे दर्शविते की, ते निश्चितपणे त्यांच्या काळातील एक आर्थिक विचारवंत होते. त्यांच्याजवळ विश्लेषणाची फार मोठी शक्ती होती. असाधारण, अंतरदृष्टी, तात्वीक आणि व्यावहारीक अर्थशास्त्राविषयीचे खोल आकलन हे त्यांचे विशेष गुण होते. त्यांचे थोरपंण आणि अलौकिकत्व त्यांच्या व्यवहारीक दृष्टिकोनात आहे. जमिनीच्या राष्ट्रीयकरणाव्यतिरिक्त त्यांच्या कल्पना खूप यथार्थ आणि व्यवहार्य ठरल्या आहेत. त्यापैकी पुष्कळ कल्पना आजही समर्पक आहेत. ते केवळ म्हणायला अर्थशास्त्रज्ञ नव्हते. त्याची भारतीय अर्थशास्त्राच्या विकासाच्या इतिहासातील योगदान खूप मोठे आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे केवळ प्रसिध्द राजकारणी, कायदेतज्ञ, सुधारक नव्हते की ज्यांनी आपले सारे जीवन समाजातील खालच्या वर्गाच्या विकासाकरिता समर्पित केले. त्याबरोबर ते एक स्पष्ट दृष्टिकोन आणि सापेक्षी अर्थशास्त्रीय विचारवंत होते. प्राध्यापक सेलिग्मन या त्याच्या अर्थशास्त्राच्या आवडत्या प्राध्यापकांचे आंबेडकरांविषयी फारच मोठे गैरवोग्दार आहेत. ते असे इतका सखोल चिंतनात्मक आणि सडेतोड टिकात्मक विवेचन केलेला ग्रंथ कोठेच आढळत नाही.

**संदर्भ**


१) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन आणि संघर्ष - प्र. दा. गायकवाड

२) आंबेडकर - नलिनी पंडीत

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अर्थशास्त्रीय दृष्टिकोन आणि चळवळीची दिशा - डॉ. आंबेडकर वाड्.मयीन अभ्यास मंडळ

४) आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत - प्राचार्य, डॉ. पी.डी. देवरे, प्रा. डॉ. एस.एम. विसपुते, प्रा. डॉ. डी.एस. निकुंभ, प्रा. डॉ. सुनंदा ठाकरे (पाटील)

# दलित स्त्री काव्यलेखनाची प्रेरणा – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

– प्रा. रवींद्र पीरन नगराळे
मराठी विभाग, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
सोनगीर, ता. जि. धुळे

**फ्प्रस्तावना**

इंग्रजी सत्तेने शिक्षणाच्या सोयी निर्माण केल्याचा फायदा ब्राह्मणेतर व दलित वंचित वर्गालाही झाला. अल्प प्रमाणात का होईना शिक्षण सुरु झाले. १९ व्या शतकात महात्मा फुले आणि २० व्या शतकात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्यामुळे दलित समाज जागा झाला. शिक्षणामुळे त्यांच्या जाणिवा तीव्र झाल्या. 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' हया डॉ. बाबासाहेबांच्या घोषणेने दलितांना आत्मसन्मान व आत्मविश्वासाचे कवच दिले. यातूनच १९६० नंतर दलित साहित्य उदयाला आले. १९७० नंतर काही प्रमाणात दलित लेखिका लिहू लागल्या. १९९० नंतर शिक्षणाचा सर्वत्र फैलाव झाला. दलितांना शिक्षण व इतर सोयीसुविधांचा लाभ झाल्याने दलितांमधील स्त्रीशिक्षण वाढले. या काळात अधिक प्रमाणात दलित स्त्रिया लिहित्या झाल्या.

प्रस्तुत शोधनिबंधात दलित स्त्री काव्य लेखनाची प्रेरणा जाणण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**दलित लेखिका**

१९६० नंतर दलित साहित्य प्रचलित झाले तरी दलित लेखिकांचे लेखन उशिरा म्हणजे एक दीड दशकानंतरच खऱ्या अर्थाने सुरु झालेले आढळते. अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वातंत्र्य, समतेच्या लढयात व परिवर्तनवादी लढयात स्त्रियांचा समावेश होता. भगवान बुध्दाने २५०० वर्षापूर्वी स्त्री-पुरुष समानतेचा विचार मांडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुध्दाच्या समतावादी विचारांचीच कास धरल्याचे 'स्त्रीपुरुष समानता' हे त्यांच्या चळवळीचे मुख्य वैशिष्टयेच होते. या पार्श्वभूमीवर गौतमबुध्दांने स्त्रियांना भिख्खू संघात स्थान दिले आणि समता प्रस्थापित केली. अर्थात स्त्रीपुरुष समानतेचा संस्कार मधल्याकाळात लुप्त झाला. या मध्ययुगीन कालखंडात तर हे भेदाभेद फारच वाढले, तरी संतकालखंडात संत सोयराबाई, निर्मला, भागू महारीण, कान्होपात्रा, जनाबाई या दलित संत कवयित्रींनी स्त्रीजन्म आणि दलितत्वाबद्दल काव्यातून आवेग व्यक्त केला होता. पुढे १९ व्या शतकात महात्मा फुले, आगरकर, महर्षी कर्वे, महर्षी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या प्रबोधनाचा मार्ग जोपासणाऱ्या समाजसेवकांनी स्त्रीमुक्ती कल्पना उचलून धरली. अर्थात बहुजन, वंचित दलित स्त्रियांचा उध्दार केला तो फुले-शाहू-आंबेडकरांच्या उदारमतवादी विचारसरणीने. या पार्श्वभूमीवर दलित स्त्रियांचे चळवळ, लढयासाठीचे योगदान महत्वाचे होते.

१९६० नंतरच्या दलित साहित्यात दलित लेखकांचे लेखन अधिक प्रमाणात आले. परंतू तुरळक प्रमाणात स्त्री लेखिका आढळतात. वैचारिक आणि ललित अशा स्वरुपात हे लेखन आहे. १९७० च्या नंतर अनेक लेखिका लिहू लागल्या. त्यात सुगंधाबाई शेंडे, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, कुमुद पावडे, नलिनी लढके, डॉ.आशा थोरात, अरुणा लोखंडे, उर्मिला पवार, मीनाक्षी मून, शांताबाई कांबळे, बेबी कांबळे, प्रज्ञा लोखंडे या लेखिकांचे लेखन दलित साहित्यात कथा, कविता, कादंबऱ्या, आत्मचरित्राच्या स्वरुपात उपलब्ध आहे. याशिवाय सुशिला मूलजाधव, सुशिला संपकाळ, नलिनी भोसेकर, माधवी खरात, संध्या रंगारी, कविता जमदाडे, उषा अंभोरे, मीना गजभिये अशा नव्याने वेगळे लेखन करणाऱ्या लेखिका आहेत.

**दलित कवितेचे स्वरुप**

'भावनांचा उत्स्फूर्त आविष्कार' म्हणजे कविता होय. या अविष्कारातूनच दलित कवितेचा जन्म झाला. प्रथम दलित शाहिरी, पुढे नवशिक्षणाच्या जाणिवेतून सळसळणारा दलित तरुण, कवितेच्या माध्यमातून संघर्ष पेटवत राहिला. संत कवींनी दलितत्वाची अधोरेखित केली पण त्याविरुध्द ते काही करु शकले नाहीत. धर्म-जातीचे थोतांड संतांच्या उपदेशाला बधले नाही. त्यामुळे वर्णभेद कायम राहिला. पुढे १९ व्या शतकात महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने समाजमन संघटित व प्रेरित झाले. सामाजिक जाणिवेने शाहीर, कवी, लेखक, कलावंत कला जोपासत राहिले.

दलित कवितेची सुरुवात संतवाङ्.मय शाहिरी, पुढे आधुनिक शिक्षण, पाश्चात्य विचारांची धारा यातूनच तिने स्थान निर्माण केले. फुले-आंबेडकरी विचाराने समाज मनात, हया कवितेने वेगळे रुप घेतले. वेदनेने पिळवटलेल्या समाजाला फुले, आंबेडकरी विचारांचे आशयधन लाभल्याने कवितेचे शब्द प्रभावी आणि तितकेच परिणामकारकरित्या प्रगट झाले. त्यातूनच १९६० साली सुशिक्षितांची नवी पिढी निर्माण झाली. डॉ. बाबासाहेबांच्या सत्याग्रह चळवळींनी पोसलेल्या दलित समाजाला, शब्दमाध्यम गवसले. त्यातूनच कविता प्रभावीपणे पुढे आली.

प्रामुख्याने दलित साहित्यात 'कविता' हा वाङ्.मय प्रकार अधिक प्रभावी ठरला. दलित स्त्रीला आपल्या अभिव्यक्तीसाठी भावनांचा उत्स्फूर्त आविष्कार असणारा हा वाङ्.मयप्रकार जवळचा वाटला. अल्पाक्षरी रचना, गेयता, तालबध्दता उस्फूर्त भावना इत्यादी काव्याची वैशिष्टये, दलित स्त्रीला जवळची वाटणे स्वाभाविकच होते. स्त्रीचा जन्म म्हणजे भोग मानणाऱ्या, भारतीय संस्कृतीत दलित स्त्रीचा भोग दुहेरी आहे. एक स्त्री म्हणून. दुसरा दलित म्हणून, आजही दलितत्वाच्या व स्त्रीत्वाच्या प्रचंड अन्याय विळख्यात दलित स्त्री अडकली आहे, हे खेडयापाडयात विशेषत्वाने जाणवते.

**मध्ययुगीन काळ**

या काळात दलित लेखिकांचे लेखन आधुनिक काळातील विचारात घेतले जात असले तरी, त्यात महदंबा, नागाईसा, मुक्ताबाई, संत

चोखामेळाची पत्नी सोयराबाई, बहिण निर्मला, कान्होपात्रा, जनाबाई, भागू महारीण इत्यादी दलित समाजातील संत कवयित्रींनी आपला आत्माविष्कार मध्ययुगीन काळातच प्रगट केला होता. त्यातूनच त्यांचे काव्य दाहकतेने बहरत होते.

**आधुनिक काळ**

सन १९७० व १९८० नंतर दलित स्त्रियांचे लेखन प्रमाण वाढलेले दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत अशिक्षित स्त्रियांची साथ होती. त्या काळात संघर्ष, लढा या स्त्रियांनी आपल्या पुढच्या पिढयांत सतत ऐकवला. यातूनच नव्या पिढीतील स्त्रियांनी, धर्मांतराची घटना, सत्याग्रह, अन्याय, देवळातील संघर्ष इत्यादी घटना कवितेतून मांडलेल्या आढळतात. तसेच सभोवतालच्या वेदनेला, दु:खाला, अन्यायाला, कवितेतून व्यक्त करताना त्यांचे आत्मभान, आत्मविश्वास प्रगट होताना दिसतो. दलित कवयित्रींची विचार केला तर, सभोवतालच्या वेदनेला. दु:खाला, अन्यायाला, अत्याचाराला, आत्मभानाला, स्वाभिमानाला कवितेतून त्यांनी प्रगट केले.

**काही महत्त्वपूर्ण कवयित्री**

**१. ज्योती लांजेवार**

'दिशा', 'अजून वादळ उठलेच नाही', 'शब्द निळे आकाश' हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिध्द आहेत. त्यांनी समाजातील विविध बदलांची नोंद घेतलेली दिसते. तसेच मानवता व समानतेच्या मूल्यासाठी दलित समाजाचा असणारा लढा इथे शब्दबध्द केलेला आहे. ज्योती लांजेवार यांनी आपल्या कवितांमधून सामाजिक विषमतेविरुध्द बंड पुकारलेले जाणवते. जातीयतेचे, स्त्रीत्वाचे, वर्णवर्गलिंग भेदाचे भयावह जीवन कवितेतून उलगडलेले जाणवते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हया महामानवाबद्दल प्रेम आहेच. तसेच आदर आणि अन्यायाला नकार देण्याची प्रेरणाही आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्माने अनेकांचा उध्दार झाला. हा आत्मशोध जाणून तिचे मन म्हणते की,

*बाबासाहेब,*
*आमच्या एकुलत्या एक आभाळाचा*
*तू चंद्र आहेस...*
*ज्यांच्या आयुष्यालाच ग्रहण लागले*
*अशांचा तू सूर्य आहेस*
किंवा
*बाबासाहेब,*
*कोणीच हिसकावू शकणार नाही*
*आमच्या भविष्याच्या ओठावरची गाणी*
*अंधार जाळीत उगवणाऱ्या*
*प्रलयंकार व सूर्याची मी निशाणा –*

प्रस्तुत कवितेत उत्कट, भावपूर्ण मनाने इथे कवयित्री डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील भाव प्रकट करते.

'जननी जन्मभूमी' या आपल्या दुसऱ्या कवितेत ज्योती लांजेवार यांनी आईबद्दलची तीव्र भावना व्यक्त केली आहे. आईचे कष्ट दारिद्र्य, तिने उपसलेले प्रचंड कष्ट, यातना याबद्दलची जाणीव इथे प्रकट केली आहे. 'जयभीम' शब्दातून तिला मिळणारी उर्जा, तिचे डॉ. बाबासाहेबांच्या विचारांमुळे झालेले परिवर्तन प्रगट केलेले आहे.

*आई तू कधीच दिसली नाहीस,*
*नव्या कोऱ्या इरकली लुगडयात*
*पुतळयाची माळ गळयात, गोठ पाटल्या हातात*
*रबराच्या वहाणाही पाहिल्या नाही तुझ्या पायात...*
*तलावात बांध घालताना,*
*रोजगार हमी योजनेत राबताना...*

आईचा एकुलता एक मुलगा नामांतरात मारला गेला, तर शोक न करता, 'भीमासाठी गेलास, धन्य झालास' – असे ती म्हणते. ज्योती लांजेवारने रेखाटलेली आई दलित स्त्रीचे चित्र डोळयासमोर उभे करते. आईबद्दल निस्सीम प्रेम प्रकट करणारी ही कवयित्री डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाने व तेजस्वी कार्याने नतमस्तक होऊन म्हणते,

*हे महासागरा,*
*मला उद्याची चिंता वाटते*
*म्हणूनच मी प्रबुध्द होऊन बोलते,*
*आता येणाऱ्या भविष्यकाळातील लोकांना काय द्यावे?*

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समाजाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनंतर काय? असाही भय उत्पन्न करणारा प्रश्न तिच्या मनात तरळून जातो.

**२. हिरा बनसोड**

हिरा बनसोड आपल्या कवितेतून सामाजिक अन्यायाबद्दल विचार मांडताना आढळतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा दीप, भगवान गौतम बुध्दाच्या ज्ञानाचा प्रकाश तिला सर्वोत्तम वाटतो, जगण्याचा आधार वाटतो. त्याचमुळे ती प्रकाशमान होण्याची आस बाळगते.

*धुवून टाका चेहऱ्यावरचा भयग्रस्त अंधार,*
*प्रकाशाचे दिवे आणलेत मी तुमच्यासाठी*
*...तुमच्यासाठी मी सूर्योदय आणला*
*प्रकाशमान हा... प्रकाशमान हा...!*

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महान कर्तृत्वामुळेच आज दीनदुबळयांना जगण्याचा आधार सापडला. हया कार्याबद्दल तिच्या मनातील आदर स्पष्ट करतानाच समाजकर्त्यांच्या मार्गात वर्षानुवर्षांच्या तथाकथित श्रेष्ठींनी दिलेला त्रास, यातना तिला आठवते आणि ती म्हणते,

*हे महापुरुषा,*
*ज्यांनी तुझ्या मार्गात काटे पेरले,*
*आज तुला ते फुले वाहतात,*
*नि तुझा जयजयकार करतात*
*तेव्हा मात्र कमाल झाली...*

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे नवा जन्म झाला, नवं जगणं वाटयाला आलं. इतके दिवस दगडाचा देव पूजिला पण त्याने उन्हातच राबवलं. पुन्हा कृतज्ञतेने ती म्हणते,

*सुरु झाला आमचा नवा जन्म*
*सापडली आम्हाला आमची देवळं*
*सापडला आमचा हरवलेला देव*

*आम्हीच आहोत तिथे देव आणि समान दर्जे माणसांचे*

एक प्रकारे समानता आणि न्यायभावना डॉ. बाबासाहेबांमुळे मिळाली हयाचा आनंद इथे व्यक्त केलेला आहे.

**३. सुरेखा भगत**

या कवयित्रीचा 'साक्ष' हा काव्यसंग्रह प्रसिध्द आहे. हा काव्यसंग्रह बुध्दांच्या आणि बाबासाहेबांच्या विचारांना अवलंब करणारा आहे. यांच्या प्रेरणेतून सभोवतीच्या दु:खाने कवयित्रीचे मन विव्हळ झाले आहे. ते आपल्या काव्यातून वर्णितात की,

*मै चौकट में बंद रहना नही चाहती ।*
*पुतली बनकर जिंदा रहना नही चाहती ।।*
*मै न कोई देवी न काल्पनिक छबी हूँ ।*
*स्वाभिमानसे कहती हूँ, मै बुध्दीवादी ।*
*मै नारी हूँ आंबेडकरवादी, मै नारी हूँ आंबेडकरवादी ।।*

समस्त नारीला स्वाभिमानाने जीवन जगायला भाग पाडले, ते डॉ. बाबासाहेबांनी हीच खरी स्त्रीमुक्तीची चळवळ तमाम स्त्री वर्गाला प्रेरणादायी ठरते.

तसेच सरला ठमके यांच्या 'चित्कार' या काव्यसंग्रहात बुध्द-फुले-आंबेडकर या महामानवांची प्रेरणा दिसते. प्रतिभा राजानंद यांच्या 'मला हवी असणारी पहाट' या काव्यसंग्रहात स्त्रीवादाला प्रेरणादायी विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला आहे. प्रज्ञा लोखंडे यांचा 'अंत:स्थ' या काळ संग्रहात स्त्री मुक्तीच्या विचारांना एक नवा आशय प्रकट झालेला आहे. आणि सुगंधा शेंडे यांच्या 'अग्निशिखा', 'आम्रपाली भावपल्लवी', 'विरत धुकं' या काव्यसंग्रहातही दलित स्त्रीच्या घरात दारिद्र्य असले तरी शिक्षण सोडायचे नाही असा डॉ. बाबासाहेबांनी दिलेला निर्धार व्यक्त झालेला आहे.

**समारोप**

मराठी दलित साहित्यात अनेक दलित कवयित्रींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून प्रेरणा घेऊन त्यांच्या संघर्षात स्वाभिमानी विचारसरणीच्या काव्यप्रेरणा प्रकर्षाने जाणवतात. अशा अनेक कवयित्रींनी बुध्द-फुले-आंबेडकरी विचारांशी बांधिलकी ठेवून कविता लेखन करुन दलित साहित्यात स्वाभिमानाने अनेक कवितांचा अंतर्भाव निर्माण करुन आपली नवी ओळख निर्माण केली आहे. तद्वतच त्यांनी व त्यांच्या पूर्वजांनी जे भोगले, जे पाहिले तेच काव्यलेखनातून प्रकट झाले आहे.

**संदर्भ**


१) डॉ. माधवी खरात - 'मराठी साहित्य' दलित लेखिकांचे योगदान
२) डॉ. ज्योती लांजेवार - 'दिशा', 'शब्द निळे आकाश' (काव्यसंग्रह)
३) हिरा बनसोडे - 'फिर्याद' (काव्यसंग्रह)
४) डॉ. ज्योती लांजेवार - दलित साहित्य समीक्षा
५) छत्रे लता दिलीप - बौध्द धर्मातील स्त्री विचार

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री जागृतीविषयक विचार

– प्रा. सुभाष श्रावण धनगर
इतिहास विभाग, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
सोनगीर, ता. जि. धुळे

**प्रस्तावना**

स्त्रीमुक्तीची तात्वीक पार्श्वभूमी या देशात भगवान गौतम बुध्द, संत कबीर, म. फुले, शाहू महाराज यांच्या विचारातून व कार्य कर्तृत्वातून निर्माण झाली. त्यांच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनाचा विचारांचा प्रभाव डॉ. बाबासाहेबांवरही झाला. जागतिक पातळीवरील महिलांविषयक प्रश्नांचा बाबासाहेबांनी सुक्ष्म अभ्यास केला. व स्त्री विषयक जाणीवा आत्मसात करुन आयुष्यभर डॉ. बाबासाहेबांनी स्त्री सुधारणेचा स्त्री मुक्तीचा पाठपुरावा केला. त्यांनी भारतीय राज्यघटना लिहीण्याआधीच स्त्री स्वातंत्र्य, स्त्री–पुरुष समानता या गोष्टींचा विचार केला होता.

एक व्यक्ती म्हणून, माणूस म्हणून जीवनाच्या सर्व क्षेत्रात स्त्रीला समानसंधी, समान स्वातंत्र्य, समान हक्क, समान न्याय मिळाला पाहिजे असा बाबासाहेबांचा आग्रह होता. स्त्रीला सामाजिक, कौटूंबिक, शैक्षणिक व्यावसायिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रात सन्मानाने व स्वाभिमानाने जगता आले पाहिजे. अशी त्यांची भूमिका होती. म्हणून स्त्री विषयक दृष्टिकोन समजावून घेण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून स्त्री विकासाच्या वाटा खुल्या केल्या आहेत. म्हणून त्यांचे स्त्री विषयीचे चिंतन अधिक महत्वाचे आहे.

**उद्देश**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रियांबद्दल असलेले विचार स्त्री–पुरुष समानता, स्त्रियांना समाजात असलेले स्थान व पुरुषांपेक्षा स्त्रियांची कार्यकुशलता व स्त्रियांना प्रतिष्ठा व हक्क प्राप्त करुन देण्यासाठी व स्त्रियांना शिक्षण मिळवून देण्याविषयीची माहीती जाणून घेण्यासाठी प्रस्तूत शोधनिबंधाचे सादरीकरण केले आहे.

**सामाजिक, कौटुंबिक प्रबोधन**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असे म्हटले आहे की, स्त्रीयांनी देखील सामाजिक चळवळीत भाग घेतला पाहिजे. या दृष्टिचा विचार केल्यास त्यांनी अनेक ठिकाणी महिलांसाठी परिषदा व सभा भरवून स्त्री शक्तीला जागृत करण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्रियांच्या प्रगतीचा विचार करायचा असेल तर समाजातील सर्व जातीधर्मातील स्त्रियांचा विचार केला असता त्या सर्व शोषित आहेत. स्त्री म्हणून तिला पुरुष प्रधान व्यवस्थेने फार शोषण केले आहे. म्हणून डॉ. बाबासाहेबांनी महाळच्या चवदार तळयाच्या सत्याग्रह प्रसंगी आयोजित केलेल्या दलित परिषदेत त्यांनी स्त्रियांना कळकळीचे आवाहन केले होते की, स्त्रियांनी कलंकीत स्थितीत जीवन जगायचे नाही. प्रत्येक स्त्रीने वरीष्ठ वर्गाच्या स्त्रियांप्रमाणे लुगडी नेसावे व सोन्याचे दागिने घालावेत असा आमुलाग्र बदल घडवून आणण्यासाठी स्त्रियांनी स्वाभिमानाने जगावे असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार दिसून येतो.

स्त्रियांच्या सुधारणेविषयी आपले विचार मांडतांना नागपूर येथे झालेल्या स्त्रीयांच्या परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, स्त्रियांची संघटना असावी स्त्रियांना आपल्या कर्तृत्वाची जाणिव व्हावी. समाज सुधारणेसाठी कार्य करु शकतील याची त्यांना कल्पना होती. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे प्रत्येक मुलीने लग्नानंतर नवज्याशी निष्ठेने राहीले पाहीजे. त्यांच्याशी मित्रत्वाने आणि बरोबरीच्या नात्याने वागावे त्याची दासी कदापी होऊ नये. लग्नानंतर समान अधिकार दयावा. ती गृहिणी असली पाहिजे. ती नवज्याची गुलाम असता कामा नये. हे विचार डॉ. बाबासाहेबांचे स्त्री–पुरुष समानतेसाठी अत्यंत महत्वाचे आहेत.

एक भारताची नागरीक म्हणून स्त्रीलाही सर्व हक्क असावेत स्त्रीला खऱ्या अर्थाने एक नागरीक, एक स्वतंत्र्य व्यक्ती, म्हणून जगता यावे. यासाठी ठोस विचार व भक्कम भूमिका घेऊन डॉ. बाबासाहेबांनी हिंदू कोड बिलाचा मसुदा मांडलेला होता. त्यात स्त्री ही कोणत्याही जाती धर्माची असो हे लक्षात घेऊन पुढील अधिकार प्रधान केले आहेत.

१. स्त्रीला घटस्फोटाचा अधिकार दिला.
२. नवज्याने घटस्फोट दिलयास पोटगी मिळावी.
३. व्यक्तीचा एक विवाह कायदेशीर असल्यास दुसरा विवाह योग्य कारण नसल्यास अवैध ठरवून स्त्रीला स्थैर्य दिले.
४. स्वत:च्या मिळकतीवर स्त्रियांना अधिकार दिला.
५. वडिलांच्या मिळकतीत मुलांच्या बराबरीने मुलींना समान हिस्सा दिला.
६. आंतरजातीय विवाहाला मान्यता दिली.?
७. स्त्रीला स्वत:च्या वारस निश्चित करण्याचा अधिकार दिला.

देशातील पुरुष प्रधान संस्कृतीने स्त्रियांचे नाकारलेले हक्क हिंदू कोड बिलाने स्त्रियांना प्राप्त करुन दिलेत. घटस्फोटाचा अधिकार, वारसा हक्क, दत्तक कायदा, स्वतंत्र्य व्यक्ती म्हणून जगण्यासाठी आवश्यक असलेली समान संधी इ. अनेक गोष्टींना कायद्याचे रुप देण्याचा प्रयत्न हिंदू कोड बिलाच्या रुपाने बाबासाहेबांनी केलेला दिसून येतो.

**स्त्री शिक्षण आणि स्त्री स्वातंत्र्य**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे. शिक्षण मिळाल्याने कुटूंबाचा खरा विकास होतो. त्यामुळे जीवनमान सुधारते. तसेच चांगले संस्कार व कुटूंबाला नैतिक वळण लावण्यासाठी स्त्रियांना शिक्षण देणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेबांनी हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून त्यांनी समस्त स्त्रियांचे कल्याण साधण्याचा प्रयत्न केला. स्त्रियांची प्रगती म्हणजे समाजाची प्रगती असे मोजमाप करणाऱ्या डॉ. बाबासाहेबांचा स्त्रियांच्या संघटन शक्तीवर विश्वास होता. स्त्रियांना विश्वासात घेऊन सामाजिक सुधारण करता येऊ शकते. कारण स्त्रियांमध्ये मोठे सामर्थ्य असते.

सामाजिक दोष दुर करण्यात त्याचे मोठे योगदान असते. पुरुषांबरोबरच्या सहकार्यातून स्त्री शक्तीचा उपयोग राष्ट्रास होऊ शकतो. म्हणून स्त्रियांच्या विकासावर व प्रगतीवर डॉ. बाबासाहेबांनी भर दिला आहे.

शिक्षणातून स्त्रियांचा विकास होईल असा विचार रुजविण्याचा प्रयत्न डॉ. बाबा साहेबांनी केला त्यात मुलींचा विवाह लवकर करता कामा नये, कारण विवाह/लग्न ही जबाबदारी असते. ती पेलवण्याची कुवत त्यांच्यात येत नाही तो प्रयत्न मुलींच्या लग्नाची घाई करु नका. तसेच यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विधिमंडळात काम करीत असतांना स्त्री कामगारांच्या हिताच्या दृष्टिने मांडलेल्या विधेयकास पाठींबा दिला तसेच स्त्रियांना समान वेतन, विविध भत्ते, भर पगारी रजा मिळावी असा ही त्यांनी प्रयत्न केला आहे. यातच समस्त स्त्री वर्गाला शिक्षणाबरोबरच मुक्तपणे जगण्याचे स्वातंत्र्य बहाल केले.

अशा प्रकारे प्रत्येक क्षेत्रात स्त्रीने यशस्वीतेचे शिखर गाठले आहे. स्त्री आपल्यावर होणाज्या अत्याचार, अन्याय, स्वाभिमान, दु:ख आणि अस्तित्व यासाठी लढतांना दिसते. समाजामध्ये स्त्री-पुरुष समानता खऱ्या अर्थाने रुजवायची असेल तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची नितांत गरज आहे. आणि या विचाराचा अंगीकार समाजाने करणे काळाची गरज आहे.

**निष्कर्ष**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांमध्ये जागृती घडवून आणली तसेच प्रत्येक क्षेत्रात आपले योगदान असावे असे त्यांना वाटत होते.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेले हिंदू कोड बिल स्त्रियांच्या स्वातंत्र्याची सनद आहे.

३) स्त्रियांना शिक्षण मिळावे यासाठी शिक्षणाने आमुलाग्र बदल घडून येतो याचे महत्व त्यांनी पटवून दिले.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीमुक्तीसाठी व उन्नतीसाठी मोठया प्रमाणात प्रयत्न केलेले दिसतात.

५) स्त्रियांचा सन्मान अशा विविध पैलूंच्या आधारे बाबासाहेबांचा स्त्री विषयी दृष्टिकोन समजून घेता येतो.

६) सामाजिक व कौटूंबिक प्रबोधनाव्दारे स्त्रीची मानसिक, भावनिक आणि बौध्दिक गुलामगिरीतून मुक्तता केली जावी.

**संदर्भ**

१. डॉ. भगावान ठाकूर, आंबेडकरी साहित्य स्थिती आणि स्थित्यंतरे, आकांक्षा प्रकाशन, नागपूर

२. डॉ. एम. आर. इंगळे, वर्तमान परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची आवश्यकता, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव

३. डॉ. वा.भा.पाटील, आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव

४. डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडक लेख, प्रतिमा प्रकाशन, पुणे

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय लोकशाही

– प्रा. डॉ. माधव केरबा वाघमारे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, कै. न्हानाभाऊ मन्साराम तुकाराम पाटील कला महाविद्यालय
मारवड, ता. अमळनेर, जि. जळगांव

**प्रस्तावना**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताला दिलेली एक अभूतपुर्व देणगी म्हणजे भारतीय लोकशाही होय. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही विचार हे व्यावहारिक आहेत कारण त्यांनी सभोवतालच्या सामाजिक आर्थिक वास्तव्यासंदर्भात लोकशाहीची चर्चा करून आपला लोकशाही विचार स्विकारला आहे. डॉ.आंबेडकरांची लोकशाहीवर प्रचंड निष्ठा होती. भारतात परिवर्तन घडवून आणण्यासाठी लोकशाहीची आवश्यकता आहे म्हणून त्यांनी लोकशाहीचा स्वीकार व समर्थन केले. लोकशाहीद्वारे मतदान, राष्ट्रीय पक्ष, विरोधी पक्ष चर्चेद्वारे विषमता दूर होईल असे त्यांना वाटत होते त्याच बरोबर स्वातंत्र्य, समता व बंधुता, न्याय याद्वारे भारतीय लोकशाही मजबूत बनवण्याचे कार्य त्यांनी केले. म्हणून भारतात लोकशाही रूजविण्याचे श्रेय डॉ.आंबेडकरांना जाते. प्रस्तुत शोध निबंधाच्या माध्यमातून डॉ.आंबेडकरांना लोकशाही विचाराचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**डॉ. आंबेडकरांचा लोकशाही विचार**

२६ जानेवारी १९५० पासून भारतात लोकशाही युगाला प्रारंभ झाला. डॉ.आंबेडकरांनी भारतातील जनतेच्या हितासाठी संसदेत लोकशाही पध्दतीचा राज्यघटनेद्वारा स्वीकार केला. लोकशाहीचा अर्थ स्पष्ट करतांना डॉ.आंबेडकर म्हणतात की, रक्तविहीन मार्गाने समाजाचा आर्थिक व सामाजिक विकास घडवून आणणारी राज्यप्रणाली म्हणजे लोकशाही. ही लोकशाही भारताला नवी नाही. कारण ते म्हणतात, एक काळ असा होता की, भारत हा लोकसत्ताक राज्यांनी बहरला होता. बुध्द काळात लोकशाही होती म्हणून ते बुध्दाला लोकशाहीचा प्रणेता मानतात. मानवी जीवनाच्या विकासासाठी स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय महत्वाचे आहे म्हणून त्यांनी भारतीय लोकशाही मजबूत बनविण्याचे कार्य केले.

**संसदीय लोकशाहीचे समर्थन**

डॉ.आंबेडकरांनी भारत स्वतंत्र झाल्यावर लोकशाही व्यवस्थेचा स्विकार करून एक व्यक्ती एक मत आणि एक किंमत या समता मूलक तत्वावर राज्य घटना लिहून सर्वांना सारखा न्याय मिळवून दिला. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर भारताचे एक हिंदू राष्ट्र बनवावे अशा प्रकारची विचारसरणी तेव्हा होती व आजही आहे. पण डॉ.आंबेडकरांनी या विचारांना महत्व दिले नाही. आणि संसदिय लोकशाहीचे समर्थन केले.

**लोकशाही यशस्वी करण्याचे मार्ग/उपाय**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील सामाजिक आर्थिक विषमता लक्षात घेऊन ते म्हणतात, भारतातील समाज हा विषमतेच्या तत्वावर आधारीत आहे. समाजात काहींना उच्च स्थान तर काहींना निच्च स्थान आहे. सामाजिक प्रतिष्ठा दर्जा, वागणूक, अस्पृश्यता, महिलांचे दुय्यम स्थान ही भारतीय समाजव्यवस्थेला लागलेली कीड आहे म्हणून यावर एकच जालीम उपाय म्हणजे लोकशाहीचा पर्याय म्हणून स्वीकारतात.

२६ जानेवारी १९५० नंतर देशात लोकशाही असेल पण केवळ राजकीय व्यवस्थेत समता असेल परंतु सामाजिक व आर्थिक क्षेत्रात समता आल्याशिवाय लोकशाही मजबूत होणार नाही म्हणून ते सामाजिक लोकशाहींचा स्वीकार करतात व भारतीय लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी अटी/मार्ग सुचवितात.

**सामाजिक लोकशाहीची गरज**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, समाजात भयानक विषमता असता कामा नये कारण जगातील वेगवेगळ्या देशातील लोकशाहीचा इतिहास अभ्यासला तर विषयमता ही लोकशाहीस मारक आहे व भारतातील ही विषमता नष्ट होणे गरजेचे आहे. केवळ राजकीय लोकशाहीवर संतुष्ट राहून चालणार नाही तर सामाजिक लोकशाहीत तिचे रुंपातर होणे गरजेचे आहे. कारण राजकीय लोकशाहीचा पाया सामाजिक लोकशाहीत आहे. याशिवाय राजकीय लोकशाही टिकणार नाही. सामाजिक लोकशाही, समता, स्वातंत्र्य, बंधुता या तत्वावर आधारीत आहे. व तोच खरा जीवनमार्ग आहे. लोकशाहीच्या नावाखाली अल्पसंख्यांकाची पिळवणूक होता कामा नये, त्यांना सुरक्षितता असली पाहिजे असे त्यांचे मत होते. म्हणून सामाजिक लोकशाही स्थापन करणे त्यांना गरजेचे वाटत होते.

**कायद्यातील समानता व संविधानीक नीतीमत्तेचे पालन**

भारतात लोकशाही यशस्वी रुजविण्यासाठी राजकारण करतांना राज्यकारभार चालवताना पक्षपात होणार नाही, कुणावरही अन्याय होणार नाही. सर्वांसाठी सारखाच कायदा व न्याय असेल व वशिलेबाजी नसावी तरच लोकशाही टिकेल. अन्यायाच्या भावनेतून क्रंातीची बिजे रोवली जातील व हे लोकशाहीस मारक ठरतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, आपली राज्यघटना ही केवळ कायदेशीर तत्वाचा सांगाडा आहे. या सांगाड्याला आवश्यक असलेले रक्तमांस हे घटनात्मक नितीमत्तेच्या पालनातच दिसून येते. यालाच इंग्लंडमध्ये घटनात्मक संकेत म्हणतात, व ते लोक या संकेतांचे पालन स्वखुशीने करतात म्हणून ते नितीमत्तेला प्राधान्य देतात.

**विरोधी पक्षाला महत्व व पारदर्शक निवडणूका**

विरोधी पक्षाचे अस्तित्व ते मान्य करतात. सत्ताधारी व विरोधी पक्ष हे एकाच वेळी एक दुसऱ्याचे पर्याय असावेत. विरोधी पक्षाचे अस्तित्व हे सत्ताधारी पक्षाला वठणीवर आणण्याएवढे असावेत त्या शिवाय लोकशाहीचा विस्तार होणार नाही. आणि लोकशाहीच्या

यशस्वीतेसाठी निवडणूक प्रक्रिया सुध्दा पारदर्शक व दोषमुक्त असावी. असे त्याचे मत होते.

**सारांश**

स्वातंत्र्य मिळून आज ७० वर्षात या अटी पूर्ण होताना दिसत नाही. लोकशाहीच्या नावावर पक्ष, जात, गट, धर्म, गुंडशाही चालू आहे. व आज लोकशाही पुढे अनेक आव्हाने उभे आहेत. सध्या तर केंद्रतील मंत्री आम्ही ही राज्यघटना बदलू असे वक्तव्य करून लोकशाहीला आव्हान देण्यात येते. यासाठी सर्वांनी पुढाकार घेऊन डॉ.आंबेडकरांना अभिप्रेत असलेली लोकशाही टिकवणे काळाची गरज आहे.

**संदर्भ**


१) खरात शंकरराव – डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे, २००८
२) लुलेकर प्रल्हाद – अनंत पैलुचा सामाजिक योध्दा, सायन पब्लिकेशन्स प्रा.लि.पुणे, द्वि.आवृत्ती २०१२
३) जाधव नरेंद्र – आमचा बाप आणि आम्ही, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १६१ वी आवृत्ती
४) चव्हाण उमेश – प्रकाशपर्व, यशोदीप पब्लिकेशन्स, पुणे, २०१६
५) विरेंद्र सिंह यादव – बीसवी सदींके महानायक, ओमेगा पब्लिकेशन्स दिल्ली, २०११
६) पानतावणे गंगाधर (संपा.) डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभिवादन ग्रंथ, उमवि जळगांव, प्र.आवृत्ती २०१६

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर : कृषी, ग्रामीण, औद्यागीक व चलन विषयक विचारांचे चिंतन

– प्रा. व्ही. एच. पाटील
अर्थशास्त्र विभाग
सरदार व. प. कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर

**प्रास्ताविक**

सत्याचे, समर्पण भावाचे, दूरदृष्टीचे, बुध्दीमत्तेचे, नवविचारांचे, राष्ट्रभक्तीचे, राष्ट्रहिताचे, सर्वसामान्यांच्या कल्याणाचे दर्शन घडविणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्ञानयात्री, विश्वव्यापी आहेत. महात्मागांधी म्हणायचे 'खेडयाकडे चला' यातून देशाचा सर्वकष विकास साध्य होईल तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे की, 'ग्रामीण विकासातून शहराकडे चला' अर्थात दोन्हींचे विचार हे विकासाकडे वाटचाल करणारेच होते. आर्थिक समानतेशिवाय राजकीय व सामाजिक समानता प्रस्तापीत होवू शकत नाही. त्यांचे हे विचार कल्याणकारी राज्यसंकल्पनेशी रयतेची बांधीलकी दर्शविणारे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अर्थशास्त्रात बरेच लिखाण केले असून त्यात तीन प्रमुख पुस्तके आहेत. ते म्हणजे – 1) Administration and Finance of the East India Company 2) The Evaluation of Provincial Finance in British India 3) The Problem of the Rupee : Its origin and its solution

या पैकी पहिली दोन पुस्तके सार्वजनिक वित्त व्यवस्थेवर असून पहिल्या पुस्तकात ईस्ट इंडिया कंपनीच्या १७९२ ते १८५८ या काळातील वित्तीय भाष्य करणारे आहे. दुसरे ब्रिटीशांच्या आमदनीतील भारतात वित्तीय व्यवहारामधील केंद्र व राज्यसंबंधावर १८३३ ते १९२१ या काळाचे भाष्य करणारे आहे तर तिसरे पुस्तक 'चलन विषय' अर्थशास्त्रावरील एक उत्कृष्ट मार्गदर्शन करणारे आहे. यात १८०० ते १८९३ पर्यतच्या कालखंडात घ्भारतीय चलनाची उत्क्रांतीङ कशी झाली ते स्पष्ट करणारे आहे. परदेशी विद्यापीठामधून भारतात परत आल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अर्थशास्त्रावर एकही पुस्तक लिहीले नाही. तरी एक सर्वंकष प्रश्नांची जाण असणारा अर्थव्यत्ता वारंवार डोकावत राहतो.

**उद्दीष्टे**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करणे.
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कृषी विषयक विचारांचे अध्यन करणे.
३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ग्रामीण अर्थ रचनेचा अभ्यास करणे.
४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उद्योग विषयक विचारांचा अभ्यास करणे.
५) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चलन विषयक विचारांचा अभ्यास करणे.

इत्यादी उद्देशाने या विषयाचे अध्ययन करण्याचे निर्धारित केले आहे. त्याला अनुसरुन त्यांनी मांडलेले विविध घटकांवरील अध्ययन खालील प्रमाणे करता येईल.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषी विषयक विचार**

भारतीय कृषी क्षेत्रातील प्रश्नावर गांभीर्याने विचार मांडतांना त्यांनी जे विश्लेषन केले ते खालील मुद्यांवरुन स्पष्ट होते.

**१) समुह शेती –** भारतीय कृषी क्षेत्रात तिव्रतेने जाणवणारी समस्या म्हणजे सलग शेतीचे होत जाणारे तुकडीकरण होय. यामुळे कृषीधारण क्षेत्राचे लहान–लहान स्वरुपात तुकडे होत आहे. वारसा हक्काने मालमत्तेचे होत जाणारे विभाजन हे नैसर्गीक असणारे ते समर्थनीय आहे असे ते म्हणायचे त्याच वेळी त्यांनी यावर उपाय म्हणून समुह शेती करण्याचे सूचित केले. ज्याची आवश्यता आजच्या सरकारानांही मार्गदर्शक ठरणारी आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार शेतकरी आर्थिक व सामाजिक गुलामगिरीने पिळून निघू नये म्हणून शेतकऱ्यांच्या सहमतीने सरकारने असे विखुरलेले धारणक्षेत्र एकत्रित करुन समुहशेती तंत्र वापरावे.

**२) अल्पकृषी उत्पादकता –** Small Holding in India And Their Remedies या शोध निबंधात त्यांनी कृषी क्षेत्राचे उपविभाजन व अपखंडन या कारणामुळे भारतीय शेतीची उत्पादकता कमी असली तरी ती लहानधारण क्षेत्रामध्ये असते हे त्यांना मान्य नव्हते त्यांच्या मते अधिक उत्पादकतेसाठी भांडवल व श्रममात्रा पर्याप्त असणे महत्वाचे आहे. सहकारी शेतीची उपयुक्तता प्रकट करतांना शेतकऱ्यांच्या संपत्ती भुमिच्या स्वामित्वाचा अधिकार अबादित राखण्याचा विचार त्यांनी मांडला.

**३) जुलमी खोती पध्दतीस विरोध –** सरकारी जमीनीवरील आपली स्वत:ची मालकी सांगून मक्तेदारी निर्माण करणे म्हणजे खातीशाही होय रत्नागिरी जिल्हा व परिसरातील शेतकरी वर्ग तसेच शेतमजूर खोतांच्या जाचजुलमांचे शिकार होत होते. शेतक–यांकडून जबरदस्तीने पैसे वसुल करत या जुलमी पध्दतीतून शेतकऱ्यांच्या मुक्ततेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घ्महाडङ येथे आवाज उठविला शेतकऱ्यांच्या मुलांना शिकवून मुख्यप्रवाहात आणले. १७ सप्टेबर १९६७ रोजी बॉम्बे विधी मंडळात खोती रद्द विषयक विधेयक सादर केले.

**४) नदी जोड प्रकल्प योजना –** शेती क्षेत्राचे निसर्गाधिन अवलंबन कमी करण्याच्या दृष्टीने तसेच पाणी व्यवस्थापन सुखर करुन अधिक शेती ओलीता खाली आणणे व महापुरांची स्थिती रोखण्याच्या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ही योजना त्यावेळी सुचित केली होती. १९४४ मध्ये बंगाल सरकारने नेमलेल्या दामोदर नदी पूर चौकशी कमेटीबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मजूर प्रतिनिधी म्हणून केलेले भाषण आज लाभदायक ठरत आहे. त्यांनी दामोदर नदी जोड प्रकल्पाला मान्यता मिळविण्यासाठी शिफारस केली या बरोबर महानदी खोरे योजना, सोना नदी खोरे योजना इत्यादी योजनाही तयार करुन कार्यान्वित केल्या.

अशा अनेक कृषी पुरक उपायांनी त्यांनी कृषी परिवर्तनाची क्रांतीस सुरुवात केली असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

**ग्रामीण विचारांचे अर्थशास्त्र**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ग्रामीण समाजव्यवस्थेची पुरेपुर जाण होती. ग्रामीण भागात विखुरलेला समाज एकसंघ करायचा तर कृषी क्षेत्रात परिवर्तन झालेच पाहीजे. देशातील शेतकरी व राज्यकर्त्यांच्या उदारनिर्वाहाचे साधन म्हणजे शेती अशीच मानसिकता आजही आहे. या मानसिकतेलाच त्यांचा आक्षेप होता. कृषी केवळ उपजिविकेचे साधन नसून राष्ट्रीय उत्पन्नाचा स्त्रोतही आहे. ग्रामीण आर्थिक विकासाचा केंद्र बिंदू आहे म्हणून कृषीकडे उद्योग म्हणून पाहीले पाहीजे असे म्हणणे होते. त्यांनी सावकारी व्यवस्थेवर चांगलेच वाभाडे काढून ती व्यवस्था हद्दपार व्हावी शेतकऱ्यांना बियाणे, खते, पाणी व पीक जोपासणा खर्च दिला जावा असे म्हटले आज शेतकरी आत्महत्तेला पर्याय म्हणून कर्ज मुक्ती पेक्षा बियाणे व खतांची गरज खरोखर विनामुल्य स्वरुपात दयावी असे म्हणावेसे वाटते. ग्रामीण विकासात्मक विचार मांडतांना त्यांनी असे म्हटले की, दुष्काळात पाण्याचे नियोजन व्हावे जिरायती व बागायती शेती वाढीचे प्रयत्न व्हावे नदी जोड सारख्या मांडलेल्या प्रकल्पाने त्यांची दूरदर्शीपणाची लांबी व खोली लक्षात येते. त्यांनी सर्वात महत्वाची कल्पना मांडली ती म्हणजे घ्शेतीचे राष्ट्रीयकरणङ ही होय.

**औद्यागिक क्षेत्राची पायाभरणी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे १९२६ मध्ये बॉम्बे लेजिस्लेटिव्ह असेम्बिलीचे सदस्य असतांना ग्रामीण भागातील गरीबांच्या समस्यांचे आकलन त्यांनी उभारलेल्या जनआंदोलनात प्रतिबिंबीत होते. खोती पध्दतीतून मुक्तता झाल्यावर त्यांनीमहार वतन या नावाखाली सुरु असलेल्या गुलामगिरी विरुध्द आवाज उठवून मोठा वर्ग शोषण मुक्त केला. त्याप्रमाणे त्यांनी १९३६ मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. व्हाईसराय एक्झिीक्युटिव्ह कौन्सिलचे कामगार सदस्य या नात्याने १९४२ ते १९४६ या काळात कामगार धोरणात सुधारणा घडवून आणल्या त्यात सेवा योजना कार्यालयाची स्थापना महत्वपूर्ण घटना होती. त्यांनी पायाभूत प्रमुख उद्योग सरकारी मालकीचेच असावेत असे म्हटले औद्योगिक विकासाचा प्रत्येक्ष परिणाम शेतीवर होण्यासाठी तंत्रज्ञानावर आधारित आणि ग्रामीण परिसरात वाढणारे उद्योग आवश्यक असण्याचे मत मांडले. कामगार विषयक भूमिका मांडतांना त्यांनी स्वेच्छेने फॅक्टरी अॅक्ट मध्ये अनेक दुरुस्त्या केल्यात. महिलांना मातृत्व भत्ता १९४५ धोकादायक खाणकामगार बंदी, १९४५ आरोग्य विमा, १९४५ कामगार गृहनिर्माण, १९४४ ओव्हरटाईम व १९४३ महागाई भत्ता आणि कामगार कल्याण योजना असे अनेक उपाय सुचविले.

**चलन विषयक दृष्टीकोन**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मौदीक अर्थशास्त्रातील प्रसिध्द ग्रंथ जो १९२३ मध्ये प्रकाशित झाला १८०० ते १९९३ पर्यतच्या भारतीय चलन पध्दतीवर सखोल विचार मांडले. चलन व्यवस्था ही पूर्णत: शुध्द, सुवर्ण, प्रतिभूती आणि विदेशी चलन यांच्या आधारावर निर्गमित करु नये कारण सरकारला आपली स्थिर चलन मुद्रेने अनेक अडचर्णीना सामोरे जावे लागेल यावर उपाय म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असे म्हटले की चलनातील मुद्रेला मर्यादा घालून तिला परावर्तीत करण्यासाठी मुद्रा निर्गमित करण्याच्या सरकारी अधिकाराला कायदयाच्या मर्यादेत बांधून रुपयाच्या निर्गमनाची जबाबदारी घ्यावी असे विचार आजही संपूर्ण जगातील अर्थव्यवस्थेला लागू होतील असे आहेत.

**सारांश**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आर्थिक लोकशहीचे खंदे पुरस्कर्ते असतांनाच देशातील सामान्य व्यक्तिच्या आर्थिक हितरक्षणाबरोबर शेतकरी, आर्थिक शोषित उद्योग विकासाचे हित जोपणारे सर्वकष आर्थिक प्रश्नांची जाण असणारे व त्याचे उपाययोजनांद्वारे परिमार्गन करणारे थोर अर्थतज्ञ, कामगार कल्याण, विदेशी व्यापार, वित्तीय व चलनविषयक दूरभाषी परिणमांचे गहण अध्ययन करणारे पाणी व्यवस्थापन व्यवस्थापन विज अशा सर्व समस्यांचे ठोस उपायांनी निराकरण करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार खरोखरच आजही महत्वपूर्ण मार्गदर्शक ठरावेत असेच आहेत.

**संदर्भ**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार – डॉ. जाधव नरेंद्र
२) अर्थशास्त्र प्रणालीचा इतिहास – डॉ. खांदेवाले नेसरकर विद्या बुक्स औरंगाबाद
३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक अर्थतज्ञ आणि आर्थिक विचारवंत – शैलसिंग
४) बोल महामानवाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ५०० मर्मभेदी भाषणे (खंड २) – डॉ. जाधव नरेंद्र
५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर – कीर धनंजय

# डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे आर्थिक विचार

– प्रा. देविदास भटू भामरे
स्वर्गीय अण्णासाहेब आर डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय
म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे

**प्रस्तावना**

भारतीय आर्थिक विचारांच्या पध्दतशीर मांडणीला खऱ्या अर्थाने १९व्या शतकापासुन आरंभ झाला. भारतातील आर्थिक विचारांच्या विकासाला सखोल अभ्यास करताना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचांराचा लिखाणाचा विचार करावा लागतो. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना आपण घटनातज्ज्ञ व एक अर्थशास्त्रज्ञ म्हणुन त्यांची ओळख दुर्मिळ आहे. अमेरिकेत कोलंबिया विद्यापिठात आणि इंग्लडमध्ये लंडनमध्ये स्कुल ऑफ इकॅानॉमिक्समध्ये त्यांनी उच्च शिक्षण आणि डॅाक्टरट पदवी प्राप्त केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गरीबीचा शाप अनुभवलेला असल्याने समाजातील आर्थिक विषमता कमी व्हावी आणि शांततामय व सनदशीर मार्गाने गरीब-श्रीमंत ही दरी नष्ट व्हावी असे त्यांचे मत होते. समाजातील मुलभुत आथिक विषमता कमी होणार नाही त्यासाठी शासनाचा हस्तक्षेप अनिवार्य व समर्थनीय आहे. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. नैसर्गिक विषमता पाहता ती मानवी विषमतेने तिव्र होता कामा नये त्यासाठी जाणिवपुर्वक तरतुदी करणे अग्रक्रमाचे ठरते.

अर्थात डॉ. आंबेडकरांचा भांडवशाहीइतका साम्यवादी तत्वांनाही विरोध होता.भांडवलशाहीत व्यक्तिस्वातंत्र्याचा आग्रह असला तरी सामाजिक विषमतेमुळे प्रत्यक्षात आर्थिक व राजकीय विषमता निर्माण होण्याची भीती भांडवलशाही व्यवस्थेत दिसुन येते. देशाचा विकास होण्यासाठी औद्योगिकरण आणि आधुनिकरणासाठी राज्यांनेच पुढाकार घ्यावयास पाहिजे. केवळ कायदे करुन मजुरांचा प्रश्न सुटणार नाही. राज्याने सर्वच श्रेत्रात राष्टीयकरण करणे आवश्यक नाही. समाज परिर्वतनाच्या प्रकियेत राज्य हा एक महत्वाचा सहयोगी घटक आहे. मात्र तो एकमेव घटक नाही. मिश्र अर्थव्यवस्थेने डॉ. आंबेडकरांसह राज्यसमाजवादी तत्वे,मुख्येत्वे मार्गदर्शक तत्वामधुन काही प्रमाणात फलश्रुती झालेली दिसुन येते. मुलभुत आणि महत्वाच्या उद्योगांवर राज्याचे नियंत्रण, विमा व्यवसायाचे राष्ट्रीयकरण, शेती संवर्धन सुधारणाबाबत राज्याचे नियंत्रण, खाजगी जमिनदारी नष्ट इ. राज्यसमाजवादाने व्यक्तीची राहील. त्याच बरोबर सामाजिक व्यवस्थेची दिशा प्राप्त होइल असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विश्वास होता.

**१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार –** सन १०१८ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'लहान धारणक्षेत्र आणि त्यावरील उपाय' या लेखात भारतातील शेतीविषयक प्रश्नांची आणि त्यावरील उपायांची चर्चा केली. शेतीत काय पिकवावे? शेतीसाठी लागणाऱ्या साधनांचे उत्पादन कसे करावे? शेती धारण क्षेत्राचे प्रमाण किती असावे? शेतीच्या गटाचे क्षेत्र कीती असावे? या शेतीच्या चार प्रमुख प्रश्नांची मांडणी केली. देशातील शेतीची उत्पादकता इतर देशा पेक्षा कमी आहे. कारण शेतीचे तुकडीकरण व विभाजन, वाढती लोकसंख्या हे आहे. यासाठी जमिनीच्या विक्रीवर बंदी आणणे, शेतीचे तुकडीकरण थांबवणे, शेतीच्या तारणावर बंदी, जमिनीच्या धारणक्षेत्र वाढविण्यावर भर इत्यादी उपाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुचविले आहेत. त्यांच्या मते किफायतीशीर धारण क्षेत्र म्हणजे उत्पादन घटकांमध्ये भुमी, श्रम, भांडवल, व संयोजक योग्य प्रमाणात असणे होय. शेतीचा आर्थिक उपक्रम म्हणुन वापर करताना धारणक्षेत्र लहान की मोठे हा युक्तिवाद करणे चुकीचे आहे, असे त्यांनी स्पष्ट कले. कार्यक्षम मशागत करण्यासाठी आवश्यक असलेली शेतीची साधन सामुग्री यांचा मेळ घातल्यास किफायतशीर धारण क्षेत्र मिळु शकते. देशात लहान क्षेत्र ही समस्या नसुन भांडवल व इतर साधनसामुग्रीचा तुटवडा ही खरी शेतीची समस्या आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विचार मांडले.

**२. शेती व्यवसायातील छुपी बेकारी –** भारतीय शेती व्यवस्थेच्या संदर्भात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी निरर्थक रोजगार किंवा आवश्यक रोजगार संकल्पना मांडली. शेतीच्या क्षेत्रा पेक्षा शेतीवर काम करणारी लोकसंख्या जास्त आहे. त्यामुळे शेती उत्पादन कमी होते. यालाच शेती क्षेत्रावरील छुपी बेकारी म्हणतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी निष्क्रीय भांडवल व निष्क्रीय श्रम यातील फरक सांगितला. ज्या भांडवलामुळे उत्पन्न मिळत नाही. त्याला निष्क्रीय भांडवल म्हणतात. निष्क्रीय क्षेत्रासाठी श्रमिक जिवंत राहण्यासाठी उपभोग खर्च करावा लागतो. असे निष्क्रीय श्रम राष्ट्रीय उत्पादनात भर घालत नाहीत. भारतातील शेती क्षेत्रावरील निष्क्रीय श्रमाची समस्या, औद्योगिकरणास महत्व देवुन श्रमाची समस्या सोडवता येइल असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मत मांडले होते.

**३. चलन विषयक विचार –** डॉ. बाबासाहेब आंबेडकर लंडनमध्ये असताना रुपयाची समस्या या ग्रंथामध्ये त्यांनी भारताच्या रुपयाचा उत्क्रांतीचा आढावा घेतला होता. त्यावेळी अर्थशास्त्रज्ञांमध्ये भारताच्या रुपयाच्या जडण-घडण संदर्भात सुवर्ण परिमाणात किंवा सुवर्ण विनिमय परिमाणात या संदर्भात मतभेद होते. भारतासाठी कोणते परिमाण योग्य याबाबत वाद होते. देशाच्या भविष्यकालीन अर्थव्यवस्थेला सूवर्ण विनिमय परिमाण योग्य आहे. असा काही अर्थशास्त्रज्ञांनी पुरस्कार केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या पुरस्काराला विरोध केला होता. त्यांच्यामते सुवर्ण विनिमय परिमाणात स्थैर्य राहत नाही. त्यात लवचिकता आहे. पण चलननिर्मितीवर मर्यादा राहत नाही. जास्त चलननिमिती मुळे देशामध्ये भाववाढ निर्माण होण्याची शक्यता असते. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे मत आजही नाकारता येत नाही. १८७५ पासुन पौडांच्या तुलनेने रुपयाचे मुल्य घसरलेले होते. त्यामुळे लाखोरुपये ब्रिटनला जादा दयावे लागले. हा रुपया वसुल करण्यासाठी ब्रिट्रीश

सरकारने जनतेवर अनेक करांची आकारणी केली. चलन रुपांतरीत करता आले पाहिजे व चलन किती असावे यावर मर्यादा घातली पाहिजे. असे दोन मार्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सचविले आहेत.

**४. अर्थशास्त्राचे स्वरुप –** अर्थशास्त्रात आर्थिक व्यवहारांच्या अभ्यासाबरोबर समाजकल्याणाचाही विचार अर्थशास्त्रात असणे आवश्यकआहे. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मत स्पष्ट केले होते. देशातील आर्थिक विषमता कमी करण्यासाठी संपत्तीचे योग्य वाटप झाले पाहिजे. गरीबी आणि श्रीमंती, दारिद्र्य, आर्थिक असमानता निर्माण होते. शेती उद्योग लोक कल्याणाचे मार्ग, कामगार व त्यांचे वेतन, कामगार कल्याण योजना, बेकारी निवारण आणि सावकारी नियंत्रण इत्यादी. आर्थिक धोरणाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विचार मांडले आहेत

**५. नियोजित अर्थव्यवस्था –** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्रातील लोक आणि उत्पादन प्रक्रिया यातील संबध राष्ट्रीय उत्पन्नाचे उत्पादन घटकाना वाटप, उत्पादन संबंध व आथिक विकास, सामाजिक कल्याण या संदर्भात नियोजित अर्थव्यस्थेची संकल्पना स्पष्ट केली आहे. राष्ट्राची संपत्तीत वाढ करुन संगह केला पाहिजे. संपत्तीचे केंद्रीकरण होण्याऐवजी गरीब लोकाना त्याचा लाभ झाला पाहिजे. राष्ट्राच्या संपत्तीचे केंद्रीकरण झाल्याने सर्वसामान्यांच्या कल्याणात घट होते. भारतीय समाजव्यवस्थेमध्ये जन्माने जात ठरते, जातीने व्यवसाय ठरतो त्यामुळे आर्थिक विषमता निर्माण होते. समाजात श्रीमंत–गरीब अशी दरी निर्माण झाल्यास सामाजिक कल्याण साधता येत नाही. राष्ट्रीय संपत्तीचे समान वाटप करण्याच्या निकषावर आधारीत नियोजित अर्थव्यवस्थेच्या संदर्भात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी विचार मांडले.

**६. आर्थिक विषमता –** भारतातील आरक्षणा संदर्भात त्यांनी शास्त्रशुध्द अभ्यास केला होता. आरक्षण देताना आर्थिक निकष व गुणवता हे निकष ठरविल्यास न्याय व सामाजिक समता यांचा –हास होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना न्याय व सामाजिक समता प्रस्थापित व्हावी असे वाटत होते. देशात आर्थिक विषमता कमी करण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रात उद्योगधंदे उभारावेत व भूमिहीनांना जमिनी द्याव्यात, जमिनीचे राष्ट्रीकरण करावे त्यामुळे समाजातील कोणी भुमिहीन राहणार नाही असे विचार मांडले.

**७. उद्योगधंदे –** देशातील उद्योगधंद्याना सामाजिक विमा संरक्षणामुळे उद्योगधद्याचा विकासाला पोषक वाढ होईल. आर्युविमा व मोटार वाहन उद्योगांचे राष्ट्रीकरण व्हावे अशी त्यांची इच्छा होती. औद्योगिकरणामुळे देशात आर्थिक विषमता, संपत्तीचे केंद्रीकरण, मक्तेदारी वाढु नये असे त्यांचे मत होते. यावरुन सार्वजनिक क्षेत्राला विरोध नव्हता.

**८. कामगाराविषयी विचार –** औद्योगिक क्षेत्रात कामगार वेतन, कामाचे तास, सुटट्या, सामाजिक सरक्षितता या मागण्यासाठी वळोवेळी संघर्ष करत होते. त्यांनी कामगारांच्या संपाचे समर्थन केले व नेतृत्वही केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्याकाळात कामगारांचे प्रभावी नेतृत्व होते असे म्हणता येईल.

**सारांश**

भारतात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक क्षेत्रात आणि राजकिय क्षेत्रात भरीव कामगिरी बरोबर अर्थशास्त्रीय विचारांत भर घातली यावरुन ते खऱ्या अर्थाने अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांनी तत्कालीन परिस्थितीत मांडलेले अर्थशास्त्रीय विचार काळाच्या सीमा ओलांडणारे होते.भारतीय अर्थव्यवस्थेतील सामाजिक, शैक्षणिक,राजकीय,आर्थिक परिस्थिती यांचा सुक्ष्म अभ्यास डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेला होता.त्यामुळेच अर्थशास्त्रीय विचारांची मांडणी करताना या सर्व घटकांचा प्रभाव त्यामध्ये आढळतो.

**संदर्भ**


१) डॉ. बी.डी.कुलकणी, आर्थिक विचार व विचारवंत, प्रथम आवृत्ती,ऑगस्ट २००८, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
२) डॉ. वा.भा.पाटील, आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत भाग–२, प्रथम आवृत्ती, २००९,प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.
३) प्रा.डॉ.व.गो.नांदेडकर,राजकिय विचार आणि विचारवंत,प्रथम आवृती, जानेवारी २०११, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
४) अर्थसंवाद
५) लोकराज्य
६) इंटरनेट

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाही

**– प्रो. डॉ. दत्तात्रय मुकूंद टेकाडे**
भुसावल कला, विज्ञान आणि पी. ओ. नाहटा, उ.म.वि., जळगांव
**– सुनिल मच्छिंद्र राजपूत**
पीएच. डी. संशोधक विद्यार्थी, वाणिज्य महाविद्यालय, भुसावल

**प्रस्तावना**

डॉ. बाबासाहेब भीमराव आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ मध्ये इंदौर जिल्हयातील महु या गावी झाला. त्यांच्या वडिलाचे नाव रामजी आंबेडकर होते व ब्रिटीश सैन्यात होते. समाजसुधारणेची व दलित उन्नतीची प्रेरणा त्यांना वडिलाकडून मिळाली. त्यानंतर त्यांचे आदर्श ज्योतीबा फुले, शाहुमहाराज, कबीर राहीले. आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, अस्पृश्य जातीचे नेते. दलित जाती व वर्गाची मुक्ती कशी करता येईल या प्रश्नांचा त्यांच्या राजकीय तत्वज्ञानावर प्रभाव पडलेला आहे. या दृष्टीने त्यांनी त्यांच्या तत्वज्ञानामध्ये लोकशाही व राज्यसमाजवाद यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न केला आहे. जातीयता, गरिबी व निरक्षरता नष्ट झाल्याशिवाय लोकशाही अस्तित्वात येऊ शकत नाही. समान हितसंबंध नसतील, सामाजिक गटांना सहभागाची समान क्षेत्रे नसतील तेथे कोणत्याही गट अन्य गटांचे प्रतिनिधीत्व करु शकत नाही. समाजव्यवस्थेच्या पायावर लोकशाही उभी असते. सामाजिक लोकशाही जोपर्यंत अस्तित्वात येत नाही तो पर्यंत लोकशाही शासनाच्या औपचारीक व वरवरच्या जातीकडे बहुमत व सत्ता जाते व त्यामुळे अल्पसंख्यांक जाती वर सक्ती केली जाते. म्हणून फक्त राजकीय लोकशाही पुरेशी नसते. त्याचबरोबरीने आथिक व सामाजिक समता प्रस्थापित झाली तरच संसदीय लोकशाही उपकारक ठरेल असे त्यांचे म्हणणे होते.

लोकशाही व्यवस्था जास्त अर्थपर्ण करायची असेल व समता स्थापन करायची असेल तर लोकशाहीचा राज्यसमाजवादाशी मेळ घातला पाहीजे. उद्योगीकरणाचा त्याग करण्याऐवजी त्यांतुन निर्माण होणारे दोष टाळले पाहिजेत. समाजरचना बदलली पाहीजे. आर्थिक नियोजनाची सर्व सुत्रे शासन संस्थेने आपल्या ताब्यात घ्यायला हवीत. त्याच प्रमाणे जमिनीचे राष्ट्रीयकरण केले पाहीजे आणि महत्वाचे उद्योगधंदे स्वत:च्या नियंत्रणाखाली आणले पाहिजेत. पण याचा अर्थ मालमत्तेचा हक्क पुर्णपणे नष्ट करणे नव्हे किंवा मालमत्तेचे पुर्णपणे राष्ट्रीयीकरण करणे नव्हे. राज्यसमाजवादातून उद्योगीकरणही होईल व विषमताही नष्ट होईल. त्याचप्रमाणे हेही लक्षात ठेवले पाहीजे की समाजवाद भारतासारख्या देशात सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी महत्वाचा आहे. फक्त आर्थिक संबंधात परिर्वतन झाले म्हणजे प्रश्न मिटत नाही. किंबहुना भारतात हेच घटक महत्वाचे आहेत.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही संबंधी विचार**

डॉ. आंबेडकर लोकशाहीवर विश्वास ठेवणाऱ्यांपैकी एक होते. त्यांच्यावर पाश्चिमात्य उदारमतवादी विचारांचा प्रभाव होता. त्यांचे सर्व शिक्षण इंग्लंड, अमेरिका या व्यक्तीस्वांतत्र असणाऱ्या देशामध्ये झाले म्हणून त्यांना व्यक्तीला मिळणारे स्वांतत्र्य त्यांनी स्वत: अनुभवले समता मानणाऱ्या व्यक्तीला लोकशाही मान्यच असते. ज्या व्यक्तीला लोकशाही मान्य त्याला धर्मनिरपेक्षताही मान्य असावी. आपल्या संविधानातील लोकशाही समाजवादी, धर्मनिरपेक्ष, राष्टवादी, प्रजासत्ताक या सकंल्पना एकमेकांशी सलंग्न असतात. येथे धर्माधिष्टीत हिंदू राष्ट्र निमार्ण झाले तर यात वर्णभेद, जाती भेद, अस्पृश्यता यांना अधिकृत मान्यताच लाभेल. स्त्री-पुरष विषमता योग्य ठरेल. शुद्रांचे कर्तव्य फक्त सेवा करणेच ठरेल आणि कोणताही हक्क न मागणे हे तत्व मान्य होईल. म्हणूनच बाबासाहेबांना धर्मधिष्टीत कल्पनाही मान्य नाही. त्यांना वाटत होते की, पाश्चात्य पध्दतीच्या लोकशाहीतच प्रौढ मताधिकार असतो आणि त्यातच अस्पृश्यांचे हित जोपासले जाण्याची अधिक शक्यता असते.

भारतामध्ये जी सामाजिक विषमता होती ती इतर विषमतेच्या तुलनेत प्रभावी होती. त्यामुळे त्यांना प्रत्येकाला मताधिकार देणे हे आवश्यक वाटत होते. आंबेडकरांच्या लोकशाही विचारात मानवी हक्कांना व त्यांच्या संरक्षणानाही महत्व प्राप्त झाले. त्यांच्यामते राजकीय लोकशाहीची उभारणी चार गृहीतकांवर झालेली आहे. व्यक्ती हेच स्वयंमेव साध्य आहे. व्यक्तीला काही अदेह हक्क असतात. ते हक्क घटनेने त्याला द्यावे. कोणत्याही विशेष अधिकाराच्या प्राप्त्यर्थ व्यक्तीला आपल्या हक्काचा त्याग करावा लागू नये. इतरांवर शासन करण्याची सत्ता राज्यसंस्था कोणाही व्यक्तीला देणार नाही. आंबेडकरांच्या चिंतनातून विकसित झालेला लोकशाहीकडे पाहण्याचा दलित बहुजन परिप्रेक्ष्यही महत्वाचा आहे. या पंरपरेने भारतीय समाजव्यवस्थेतील दोन शासनशोषणाच्या संरचना स्पष्ट केल्या व त्या म्हणजे ब्राह्मण्यावाद आणि भांडवलशाही या दोन होत. शतकानुशतके मूकनायक म्हणून जिणे वाटयाला आलेल्या दलित बहूजनांना लोकशाहीचे मोल इतर कोणाही पेक्षा अधिक जाणवले होते. पण भारतातील जातिव्यवस्था अंत झाल्याशिवाय भारतात खरी लोकशाही कांती होणार नाही असे त्यांचे म्हणणे होते. आपल्या ॲनायहिलेशन ऑफ कास्ट या भाषणात आंबेडकरांनी जातिव्यवस्था निर्मूलनासाठी ज्या सर्वकष संघर्षाची हाक दिली ती लक्षात घेता जातिअंताशिवाय लोकशाही कांती अपुरी राहणार हे सत्य त्यांना सर्वाधिक तीव्रतेने कळले होते हे स्पष्ट होते. या परिप्रेक्ष्यातूनच आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या संकल्पनांचा पश्चिमी उदारमतवादी अर्थापेक्षा कितीतरी आशयघन अर्थ व्यक्त केला आणि प्रज्ञा, करुणा आणि मैत्रीचा पुरस्कार केली. नुसती राजकीय लोकशाही पुरेशी नसुन त्याला सामाजिक व आथिक लोकशाहीचे अधिष्ठान गरजेचे आहे. हे आंबेडकरांनी स्पष्ट केले. व आपल्या सामाजिक लोकशाहीचा सिध्दांत स्पष्ट केला. भारतातील शोषणप्रकिया ही वगीय आणि जातीय असे दोन आयाम असलेली

आहे. म्हणूनच जातिव्यवस्थेला आधारभूत असलेल्या ब्राह्मण्यवादावर आंबेडकरांनी एका बाजूला हल्ला चढविला तर वर्गीय शोषणाचा आधार असलेल्या भांडवलशाहीला नकार देत राज्यसमाजवादाचा सिंध्दात सांगितला. बुध्दांचा दु:ख मुक्तीचा प्रयत्न आणि मार्क्सचा शोषणमुक्तीचा प्रयत्न एकाच जातकुळीचा आहे हे स्पष्ट करुन बुध्द आणि मार्क्सच्या दर्शनाची परस्परपुरकता आंबेडकरांनी स्पष्ट केली. धम्माचा विचार सांगून भारतीय धर्मनिरपेक्षतेला त्यांनी नवा आयाम दिला. आंबेडकरांचे हे सारे चिंतन भारतीय लोकशाहीला अधिकाधिक आशयघन बनविणारे आहे.

हिंदू समाजातील विषमतेविरुध्द व पारंपारिक सामाजिक अन्यायाविरुध्द सातत्याने झगडणारे, दलितांच्या जीवनाला नवा अर्थ प्राप्त करुन देणारे , त्यांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी नेठाने कार्य करणारे झुंझार नेते व सामाजिक कांतीचे पुरस्कते म्हणून डॉ. आंबेडकरांचे मोठेपण निश्चित वादातीत आहे. राजकीय लोकशाहीचे रुपांतर सामाजिक लोकशाहीत झाले पाहिजे. समता, स्वातंत्र्य व बंधुत्व या तत्वांवर आधारलेला जीवनमार्ग म्हणजे लोकशाही म्हणून केवळ ‘एक माणुस एक मतच नव्हे तर, एक माणुस एक मुल्य’ हे तत्व खऱ्या अर्थाने समाजात आणले पाहीजे असा त्यांचा आग्रह होता. दलित जाती जमातीत स्वाभिमानाची ज्योत प्रज्वलित करण्यासाठी त्यांना आपले सामाजिक तत्वज्ञान विशद केले. जात हा समाजाला जडलेला एक भयावह रोग आहे, शाप आहे. त्याचे निर्मुलन होणे सुदृढ समाजव्यवस्थेकरिता अत्यावश्यक आहे याची जाणीव समाजाच्या मनात जागृत व्हावी याकरिता ते कायम झटले.

अर्थात बौध्द धर्म हा लोकशाहीच्या राजकारणाशी सुसंगत असलेला धर्म असण्याची स्वत: डॉ बाबासाहेब आंबेडकरांची खात्री होती आणि त्यासाठीच तो हिंदुनीही स्वीकारायला हवा असे त्यांचे मत होते. इतकेच नव्हे तर भांडवलवादी व साम्यवादी या परस्परविरोधी समाजवाद्यांना बौध्दधम्म पर्याय देऊ शकतो असेही त्यांना वाटत होते. परंतु हे म्हणणे नीट व विस्ताराने मांडण्यास त्यांना अवसर मिळाला नाही आणि नंतरच्या रिपब्लिकन नेत्यांनीही व्यापक राजकारण करण्यास टाळाटाळ केली. प्रतिज्ञेप्रमाणे भारत बौध्दमय होईल तेव्हा होवो, परंतु तूर्त तरी आपणास संख्याबळाच्या दृष्टीने मर्यादेतच राजकारण करावे लागणार याची बाबासाहेबांना कल्पना होती. परंतु त्याचबरोबर लोकशाहीच्या राजकारणात प्रसंगी थोडी मतेसुध्दा निर्णायक ठरु शकतात याची त्यांना खात्री होती. त्यामुळे आपला पक्ष फुटू नये याची त्यांना सदैव काळजी असे. आपल्या पक्षाला ते पासंगाची उपमा देत. वस्तुत: पासंग हा वजनाने फार कमी असतो. परंतु वजन करताना सारखे भरु लागले तर समतोल प्रस्थापित करताना तो अपरिहार्य ठरतो. निर्णायक ठरतो. भारतीय राजकारणात निदान एवढी तरी भूमिका बजावायची आपल्या पक्षाची तयारी हवी असे त्यांना वाटे आणि ते राजकीय लोकशाही व्यवहाराला धरुनच होते.

भारतीय लोकशाही क्रांतीचे चक्र कोण फिरवणार याबददल डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, आपल्या लोकांची नीतीमत्ता सोज्ज्वळ असावी. अस्पृश्यांचे भवितव्य अतिशय उज्वल आहे, याविषयी खात्री बाळगा. कॉंग्रेस म्हणते की परकीय सत्तेला हाकलून आम्ही क्रांती केली. त्याबददल त्यांना धन्यवाद, परंतु ही अर्धवट क्रांती होय. खरी लोकशाही निमार्ण करायची असल्यास आज हजारो वर्षे डोक्यावर नाचत असलेला वर्ग खाली व समाजाचा खालचा वर्ग वर गेल्याशिवाय खरी क्रांती होणार नाही. क्रांतीचे चक्र अधीच फिरले, आसासह चाक पुर्ण फिरवल्याशिवाय खरी क्रांतीच होऊ शकत नाही. हे चक्र आम्हीच फिरवू.

**संसदीय लोकशाही**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अमेरिका आणि इंग्लडमध्ये राहिल्यामुळे त्यांना व्यक्ती स्वातंत्र्य काय असते याची पुर्ण कल्पना तेथील वास्तव्यामुळे आली होती. त्यातच इंग्लडमध्ये जी संसदीय लोकशाही होती ती त्यांना योग्य वाटली. घटना समितीत उददीष्टांचा ठराव पं. नेहरुनी मांडला आणि मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने डॉ. आंबेडकरांची संविधात्मक चौकट या उददीष्टांना निर्माण करुन दिली. सांसदीय लोकशाही लोकमत हा सरकार बनवण्याचा आधार असतो. सरकार बनविणे वा पाडणे हे लोकमतावर आधारित असते. नियमित वेळात निवडणूका या निर्भय आणि स्वच्छ वातावरणात घेतल्या जातात. मतदार स्वेच्छेने मतदान करतो. सर्वांना संधी मिळाल्यामुळे जबाबदारीची जाणीव निमार्ण होते. सत्तांतर हे शांततेच्या मार्गाने होते. राज्यकते बदलत जातात. संसदेत प्रत्येक प्रश्न चर्चेने सोडवितात. संसदीय लोकशाही मध्ये अनेक पक्ष निर्माण होतात. आणि लोकमत घडवितात. राजकीय पक्षांना महत्व येते विरोधी पक्ष सरकारच्या चुका लोकांसमोर मांडतो. संसदीय लोकशाही यशस्वीतेसाठी डॉ. आंबेडकरांनी काही नियम व अटी सांगितल्या आहेत. जातीभेद नष्ट होऊन सामाजिक लोकशाही संकल्पना रुढ व्हावी, समानता, स्वातंत्र्य व न्यायाची प्रस्तापना होवून ती वाढावी. समाजात एकात्मता व देशप्रेम असावे. लोकशाही पध्दतीत विरोधी पक्ष असतात पण त्यांनी विरोध करतांना विधायक मार्ग अवलंबावा, राज्य करतांना अल्पसंख्य व राष्टीय हित जोपासावे, संसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी व्यक्तीस्वातंत्र्य, मुलभूत हक्क, यांचे रक्षण करणे आवश्यक होय. यासाठी न्याय व्यवस्था स्वतंत्र आणि पत्रकारिता निर्भिड असावी.

**समालोचन**

डॉ. बाबासाहेब हे स्वाभिमानी, बुध्दीमान, स्वतंत्र वृत्तीचे, प्रमाणिक, दिर्घपरिश्रमी असे बहुआयामी विचारवंत होते. आंबेडकरांची खरी तळमळ ही दुर्बल, दीन दलित यांना विकसित करण्याची होती. अठाराविश्व दारिद्र्यात अडकलेल्या समाजाचा विकास करणे हे त्यांचे मुळ उददीष्टये होते. सामाजिक क्षेत्रातील विसंगती त्यांना दूर करावयाची होती आणि सामाजिक सलोखा निमार्ण करावयाचा होता. थोडक्यात आंबेडकर हे विचाराने श्रेष्टच होते. मग तो विचार राष्ट्रवादाचा असोत, लोकशाहीचा असो, लोकशाही समाजवादाचा असो किंवा शासनाच्या कार्याचा असो. सर्वच क्षेत्रात मानवाच्या विकासाच्या दृष्टीने भारतात आधुनिक काळात विकासाच्या वाटेवर पोहोचविणारे होते. मानवतावाद हा माणसाचा मूळ धर्म होय हे सांगुन त्यांनी सामाजिक विषमतेशी लढा दिला. मानवाचा विकास हा मानवानेच करावा हे समाजाला पटवून देण्याचे महत्वाचे कार्य त्यांनी केले. हिंदु समाजात विषमता आहे. आणि ती नष्ट होण्यासाठी त्यांनी आयुष्य भर संघर्ष केला. आर्थिक आणि राजकीय समाजवादाचा विचार करुन ते थांबले नाहीत तर त्यांनी

राबविणे हेच पसंत केले. सामाजिक क्षेत्रात न्याय, समता आणि शोषणमुक्ती आणण्यासाठी त्यांच्या राजकीय लोकशाहीचे कार्य असल्याचे त्यांच्या विचारातून स्पष्ट होते.

**संदर्भ**

१) भारतीय राजकीय विचारवंत, डॉ दिनकर एस. कळंबे, प्रकाशन- कैलाश पब्लिकेशन्स औरंगपुरा, औरंगाबाद, २००६

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे - खंड ५ (संपा.) मा. फ. गांजरे

३) भारतीय लोकशाही : अंतरंग, संशोधन पत्रीका, अर्थव प्रकाशन, जळगांव

४) राज्यशास्त्र कोश, संपादक राजेंद व्होरा / सुहास पळशीकर, दास्ताने प्रकाशन, पुणे

५) रिपब्लिकनांची हाराकिरी, संपादन अभय कांता आणी इतर, प्रकाशक- परिवर्तनाचा वाटसरु व्दारा युनिक अ‍ॅकडमी, पुणे

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय सुरक्षा

– प्रा. एस. आर. पाटील
संरक्षण व सामरिक शास्त्र विभाग
गंगामाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नगाव, ता. जि. धुळे

**प्रास्ताविक**

ऐतिहासिकदृष्ट्या पाहता भारताला एकही शास्त्रोक्त सरहद्द नाही आणि वेगवेगळ्या व्यक्तींनी भारताची सरहद्द वेगवेगळी असल्याचे नमूद केले आहे. सरहद्दीच्या प्रश्नातून दोन प्रकारची धोरणे निर्माण झाली. एक म्हणजे प्रगत धोरण व दुसरे म्हणजे सिंधूपर्यंतचे धोरण. सर जॉर्ज मॅकमून यांच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास प्रगत धोरणाचा जास्तीत जास्त व कमीत कमी उद्देश आहे. त्याच्या व्यापक उद्देशात भारताचा एक भाग म्हणून अफगाणिस्तानपर्यंतच्या कारभारावर सक्रिय नियंत्रण ठेवणे होय व त्याच्या मर्यादित उद्देशात वायव्य सरहद्द आणि वन्य जमातीच्या टेकड्या या मधील प्रदेशाचा समावेश होतो. ब्रिटिशांनी नियंत्रित केलेल्या या रेषेला डुरण्ड रेषा असे म्हटले जाते. प्रगत धोरणाचा व्यापक उद्देश म्हणजे भारताची सरहद्द सुरक्षित ठेवणे हा होता. डॉ. आंबेडकरांच्या मतानुसार एखाद्या राष्ट्राचे संरक्षण हे त्याच्या शास्त्रीय सरहद्दीवर अवलंबून नसून ते त्या राष्ट्रातील साधनसंपत्तीवर अवलंबून असते. तथापि या साधनसंपत्तीपेक्षा उपलब्ध असलेल्या लढावू शक्तीवर अधिक प्रमाणात अवलंबून असते. डॉ. आंबेडकरांनी भारतीय सुरक्षतेचा विचार करताना प्रामुख्याने पाकिस्तान या राष्ट्राचा भारताच्या सुरक्षेला धोका पोहचू शकतो याबद्दल चिंता व्यक्त केली होती.

**विषयाचे महत्त्व**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय सुरक्षेबद्दच्या विचारांची माहिती समाजापुढे आणून डॉ. बाबासाहेबांना भारतीय सुरक्षेच्या बाबतीत असलेली भिती व चिंता ते सातत्याने आपल्या भाषणांमधून व लिखाणतून व्यक्त करीत होते, याचा अभ्यास करणे होय.

**उद्देश**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय संरक्षणाबद्दलचे विचार स्पष्ट करणे.
२. डॉ. बाबासाहेबांचे भारतीय लष्कराविषयी असलेल्या विचारांचे विश्लेषण करणे.

**गृहितके**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मतानुसार भारतीय सुरक्षा धोक्यात आहे.
२. त्यांच्यामते भारतीय लष्करामध्ये काही उणिवा आहेत.

**विश्लेषण**

भारतीय लष्कराची उभारणी ही केवळ बाह्य शक्तीच्या आक्रमणाच्या धोक्यापासून रक्षण करण्याच्या उद्देशाने झालेली नाही. हे एक अपवादात्मक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. देशांतर्गत शांतता आणि सुव्यवस्था टिकविण्यासाठी किंवा प्रस्थापित करण्यासाठी लष्कराचा उपयोग करणे भाग पडते. अन्य कोणत्याही राष्ट्रात या उद्देशपूर्तीसाठी लष्कराचा वापर केला जात नाही आणि या उद्देशासाठी लष्करची उभारणी निश्चितपणे केली जात नाही. मात्र भारतातील गोष्ट पूर्णपणे वेगळी आहे. देशांतर्गत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी वर्षातून अनेकदा लष्कराला पाचारण केले जाते.

भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या बाबतीत भविष्याचा विचार करताना सध्याच्या लष्करी संघटनांऐवजी ज्याप्रमाणे कॅनडामध्ये कॅनीडियन फौजा आहेत, आर्यलँडमध्ये आयरीश फौजा आहेत त्याच धरतीवर भारतात केवळ भारतीय फौजा आवश्यक आहेत. भारतीय लष्कराचे सायमन आयोगाच्या म्हणण्यानुसार भारताच्या लष्करात वायव्येकडील लोकांचे जास्त प्राबल्य आहे.

डॉ. आंबेडकरांच्या मते जरी राजकीयदृष्ट्या भारत एकसंघ राहिला आणि दोन राष्ट्राच्या मनोवृत्तीस पाकिस्तानने खतपाणी घालणे चालू ठेवले तर भारताच्या संरक्षणाच्या बाबतीत हिंदूंची अवस्था ‘इकडे आड तिकडे विहिर’ अशी होईल. मुस्लीम सैन्य असूनही लिग हरकत घेईल म्हणून ते त्याचा मुक्तपणे वापर करु शकणार नाहीत. सैन्याची निष्ठा संशयास्पद असल्याने त्याचा वापर करुनही त्यावर पूर्णपणे विसंबून चालणार नाही. अशीही करुणाजनक व अनिश्चित स्वरुपाची व्यवस्था आहे. जर लष्करात पंजाब आणि वायव्य सरहद्द प्रांतातील मुस्लिमांचे प्राबल्य सातत्याने वाढत राहिले तर हिंदूंना त्याची किंमत मोजावी लागेल. हिंदू मुस्लिम आक्रमकांविरुद्ध त्याचा वापर करण्यास ते मुक्त असले तरी ते वापर करु शकणार नाहीत. असे प्राबल्य असणाऱ्या फौजांवर विसंबून राहणे त्यांच्या दृष्टीने घातक ठरेल. जर मुस्लिम लीगचा दृष्टिकोन वरचढ ठरला आणि भारत मुस्लिम राष्ट्रांविरुद्ध आपल्या सैन्याचा मुक्तपणे वापर करु शकला नाही. जरी लष्करातील मुस्लिमांचे वर्चस्व कमी झाले तरी या लष्करी मर्यादांमुळे भारताला ज्याप्रमाणे ब्रिटिशांच्या सार्वभौमत्वाखाली भारतीय राज्ये आहेत त्याप्रमाणे शेजारील सिमेवरील मुस्लिम राष्ट्रांबरोबर दुय्यम सहकार्यावर विसंबून राहावे लागेल.

डॉ. आंबेडकर राष्ट्रवादाला एक प्रभावी आणि वास्तविक शक्ती मानतात की ज्यामुळे साम्राज्यही तुटू शकतात. मानवी जीवनातही ती एक शक्ती म्हणून कार्य करते. ती मानवी मनाशी संलग्न अशी व्यक्तिगत प्रेरणा आहे. जात, वर्ग इत्यादींच्या पलिकडे जावून जे सामाजिक बंधुत्व बनते ते म्हणजेच राष्ट्रवाद होय. त्यांच्या पाकिस्तान संबंधीच्या पुस्तकात त्यांनी इ. स. १९४० मध्येच आपले विचार मांडले होते. त्यात त्यांनी दोन तत्त्वांचा उल्लेख केला. पहिले तत्त्व भारताचे स्वातंत्र्य आणि दुसरे तत्त्व मुस्लिमांच्या भावना याचा उल्लेख केला होता. त्यांनी हिंदुस्थानची विभाजन व्हावे यास पाठिंबा दिला कारण केवळ त्यामुळेच हिंदू स्वतंत्र आणि मुक्त होतील. मात्र नंतर घटना समितीत त्यांनी

अखंड भारताच्या कल्पनेला पाठिंबा दिलेला दिसून येतो.

पंडित नेहरुंच्या अलिप्ततेच्या धोरणाला त्यांचा विरोध होता. कारण यामुळे भारताचे कोणीच मित्र राहणार नाहीत, असे त्यांचे मत होते. नेहरुंनी काश्मीरच्या प्रश्नाचा गोंधळ करुन ठेवला, असे ते म्हणत. अफगाणिस्तान व पाकिस्तानला अमेरिकेने दिलेल्या मदतीतून भारताला धोका निर्माण होईल, असे आंबेडकरांचे मत होते. तसेच ल्हासापर्यंत भारताने चीनला येऊन दिल्यानेच त्यांनी तिबेट बळकावला असे त्यांचे स्पष्ट मत होते. गोव्याची मागणी पोर्तुगालने केल्यावर चर्चिलने पोर्तुगालची बाजू घेतली व बळाचा वापर न करण्याचा भारताला सल्ला दिला. याबद्दलही त्यांनी खेद व्यक्त केलेला होता.

**निष्कर्ष**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवनकार्ये अलौकिक व अनन्य साधारण असे होते. भारतातील जातीय व्यवस्था व अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर केलेले प्रयत्न वाखाणण्याजोगे आहेत. देशातील लोकांमध्ये देशप्रमाची भावना वाढीस लागली पाहिजे, समाजातील भिन्न भिन्न घटकांमध्ये एकात्मकतेची भावना निर्माण झाली पाहिजे आणि स्वत:चा संकुचित विचार न करता व्यक्तिने देशाचा व्यापकपणे विचार केला पाहिजे, असे त्यांचे मत होते. डॉ. आंबेडकरांनी भारतीय सुरक्षेच्या संदर्भात अंतर्गत व बर्हिगत सुरक्षेचा विचार करताना आपले मत मांडले होते की, भारताला अफगाणिस्तान व पाकिस्तान या राष्ट्रांपासून धोका निर्माण होऊ शकतो म्हणूनच त्यांनी भारतीय संरक्षणावरील खर्च वाढवून दिला पाहिजे व लष्कराची ताकद वाढविली पाहिजे यावर भर दिलेला दिसून येतो.

**संदर्भ**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखीत पाकिस्तान अर्थात भारताची फाळणी, राजेश प्रकाशन, पुणे.
२. देवगांवकर श. गो., राजकिय विचारवंत, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
३. नांदेडकर व. गो., राजकिय विचार आणि विचारवंत, डायमंड बुक डेपो., पुणे.
४. देवरे पी. डी., निकुंभ डी. एस., भारतीय राजकिय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

# डॉ. बी. आर. आंबेडकर यांचे सामाजिक विचार

**– प्रा. डॉ. संजय जिभाऊ पाटील**
इतिहास, क्रांतिवीर नवलभाऊ कला महाविद्यालय
नवलनगर, ता. जि. धुळे

**प्रास्ताविक**

भारतीय समाजाचे परिवर्तन घडवून आणण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले कार्य अतुलनीय असे आहे. प्रस्तुत शोधनिषेधातुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक तत्वज्ञ, सामाजिक नितिमत्तेचे भान सांगणारा नेता व एक व्यक्ती व एकमुल्याची शिकवण देणारा सामाजशास्त्री, मनूवादी विचारांच्या गुलामीतून समाजमुक्तीसाठी अहोरात्र झटणारा समाजसुधारक इ. मुद्दयांवर अल्पसा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक विलक्षण तत्वज्ञ**

एकोणिसाव्या व विसाव्या शतकात भारताला परिवर्तनाची दृष्टी देणारे प्रबोधनाचे नवे तत्वज्ञान देणारे जे थोडे प्रज्ञा भास्कर झाले त्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अग्रक्रमाने उल्लेख करावा लागतो.या युगप्रर्वतक विचारवंताला भारतीय समाज क्रांतीचे जीवन दर्शन झाले होते.आपल्या प्रभोधनाचा वारसा पाठीशी घेऊ न हा विचारवंत भारतीय जीवनावर अहोरात्र क्रांतीकारी विचारांच्या घणाघाती मारा करत होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर या विलक्षण तत्वज्ञानापुढे भारतीय जीवनाने भयंकर पेच टाकला होता.त्याला या जिवनाने स्वस्थ बसुन नुसतेच तत्वज्ञान निर्माण करण्याचे कार्य करू दिले नाही तर त्याला मरणक्रुर प्रसंगातुन नेणारे जनतेचे लढेही लढवावे लागले होते.आंबेडकरांमधला विचारवंत आंदोलनाच्या आगीत निखाऱ्याप्रमाणे फुलला आणि त्यांच्यामधला आंदोलनकार विचारांच्या महायुध्दात विजयी परारक्रमासारखा झळाळून निघाला, यामुळेच त्यांच्या विचाराला 'वादाचे' महिमान प्राप्त झाले अभिनय, स्वतंत्र आणि क्रांती कारी जीवणप्रणालीची मौलिकता या विचाराला प्राप्त झाली होती.१

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजीक नितीमत्तेचे मानदंड**

मानव प्राण्याला निसर्गाने दिलेली सुदंर शक्ती म्हणजे विवेक शक्ती होय.विवेक शक्ती ते माणुसपणाचे लक्षण मानले जाते परंतू खरे पाहता देशामधुन लोकांची विवेक शक्ती नष्ट होतांना दिसते. त्यामुळे समाज एखादया काळोखाखाली गिळंकृत झाल्यासारखा वाटत होता.तेव्हा या काळोखाला भेदणारे शास्त्र म्हणजेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार माणले जातात.डॉ.राम मनोहर लोहीया यांनी १ आक्टोबर १९५६ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना पाठविलेल्या पत्रात लिहले आहे की, 'बाबासाहेब, या देशातील बुध्दीवंत उध्वस्त झाले आहे. त्यामुळे यादेशाच्या दुर्दशेला परावार ऊरलेला नाही.तेव्हा आपण निर्भयपणे निसंकोचपणे बोला.' डॉ.लोहीया यांनी ओळखले असावे की, बाबासाहेब ही एक अशी शक्ती आहे की, ती मानवी मुंल्यासाठी लढा देईल.आज समाजाच्या सर्व बाजुनी होणारे नैतिक अघ:पतन थांबविण्याची शक्ती या नेत्याच्या विचारात आहे. 'मी फक्त पैश्यांसाठी माझ्या प्रामाणिक मताचा त्याग करू इच्छित नाही.' असे रोखठोकपणे सांगणारे बाबासाहेब म्हणजे सामाजिक नितीमत्तेचे माणदंडच आहेत. असे डॉ.लोहीया यांनी ओळखले होते.२

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक परिवर्तनाचे स्फुर्तीस्थान**

आधुनिक भारताला ज्या प्रकारच्या तत्वज्ञानाची गरज होती तो तत्वज्ञ आंबेडकरांच्या रूपाने या देशाला मिळाला आधुनिक भारताला या तत्त्वज्ञाला पर्याय नाही.भारतीय समाज संस्थेच्या दुर्धर आजरांना आंबेडकरांइतके समर्पक उत्तर जगाजवळ नाही. 'परंतू यासम हा' या कोटीतील हा तत्वज्ञानी आहे.एखादा विचावंत समाजकारणाच्या आणि राजकारणाच्या वादळात आपले विचावंतपणच बेमौत हरवून बसला असता पण आंबेडकरांनी या देशाच्या क्रांतीचे त्यांच्या प्रज्ञेने पाहिलेले तत्वज्ञान भारतीय जीवनाच्या रणभुमीवरील युध्दात अंदोलनाच्या रूपाने उभे केले.आंबेडकरांचे तत्वज्ञान समाजक्रांतीच्या एकमेवद्वितीय प्रतिज्ञेने प्रत्यक्ष अंदोलनात क्रंातीवीर झालेले आहेत.जीवनाच्या सर्व गोठलेल्या अंगावर नवा प्रज्ञाप्रकाश टाकुन त्यांना क्रांतीप्रवृत्त करणारे तत्वज्ञान या देशाला आंबेडके रच देवू शकले. भारतीय समाजाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आंबेडकर समजून घेण्याशिवाय पर्याय दिसुन येत नाही.भारतातील खऱ्या आमुलाग्र परिवर्तनाच्या सर्वकष लढयाचे अनन्य स्फुर्तीनिधान केवळ आंबेडकरच होवु शकतात.३

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर – एक महान समाज पंडीत**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चिंतनाचे मध्यवर्ती केंद्र समाज होता. राजकीय, आर्थिक, शैक्षणिक असा सर्व विचार ते 'समाज' संस्थेच्या संर्दभातच करतांना दिसुन येतात.सर्व समाजात अत्यंत जरठ असा हा हिंदू समाज आज अनेक वर्षाच्या परकियांच्या माज्यामुळे हादरूण गेला आहे. तथापी, आपल्याला कोणता रोग झाला आहे. व आपण पदोपदी का पडतो याचा उलगडा आजुनही त्याला पुर्णपणे झाल्याचा दिसत नाही.४ यारून डॉ.बाबासाहेब आंबेडकरचे समाज चिंतनाचा प्रत्येय येतो.या संदर्भात ते पुढे असेही लिहतात की, हिंदू समाज फ्रांन्सच्या बुरबॅा राजघराने प्रामाणे काही शिकत नाही व काही विसरत नाही.वेळ पडेल त्याप्रमाणे वाटेल तशी तडजोड करणे आणि आलेली वेळ कशी बशी मारून नेणे हा हिंदू समाजाच्या जन्मत्वभावच आहे.या लवचिकपणामुळे 'महापुरे झाडे जाती । तेथे लव्हाळे वाचती' या न्यायाने तो आतापर्यंत टिकून राहीलेला आहे.५

यावरून देशातील खऱ्या आमुलाग्र परिवर्तनाच्या सर्वकष लढयाचे अनन्य स्फुर्तीनिधान केवळ आंबेडकर होवू शकतात.या देशाच्या प्रकृती जाणकाराने चिंताग्रस्त व्हावे दतका बिघाड झाला आहे.त्याचे जगणे हे जगणे म्हणण्याच्या योग्यतेचे उरले नव्हते. तेंव्हा त्याला क्रांतीवीरांचे औषधपाणी दिल्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता यासाठी लोकहितवादी,

फुले, आगरकर इ. प्रभोधनकारांनी या देशाला अधुनिकतेचे नवे रसायण जबरदस्तीने पाजले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे या परंपरेमधलेच समाज पडिंत समजले जातात.प्रबोधनकाराला लोकांच्या गतानूगती भवनांना कुरवाळुन चालत नाही.इष्ट असेल ते बोलणार आणि योग्य असेल ते करणार हा बाणा त्याचा असावा लागतो. 'सत्तेसाठी माझी शब्द विंवचना' किंवा 'तुका म्हणे सत्य सांगे येवोत रागे येतील ते' ही त्याची प्रतिमा असावी लागते.असा मनुष्यच नव्या समाजाचा शिल्पकार ठरतो.नव्या जीवनाचा जनक ठरतो.आंबेडकर या त्यांच्या प्रज्ञकर्तृत्वामुळे नव्या भारताचे रचनाकार ठरलेले दिसुन येतात.

मानवी जीवनाच्या संदर्भात ते लिहतात की, इतर राष्ट्रे मेली पण आमच्या वर्णाश्रम धर्मामुळे आम्ही जगलो अशी फुशारकी मारणाऱ्या लोकांनी आपण जगलो ते कसे जगलो याचा कधी विचार केला आहे का?... एक मानवाचे जिणे आहे दुसरे किडयाचे जिणे आहे.. नरकातल्या किडयाप्रमाणे ज्यांनी हजारो वर्षे घालविली, त्याला मानवाच्या जिण्याची काय चाड आहे.६ हिंदू समाजात ज्या मूर्खपणाच्या व घाणरडया समजुती दृढमूल झाल्या आहेत, ज्याच्यामुळे हिंदू समाज विस्कळीत झाला आहे व दुर्बल बनलेल्या आहे त्या समजुती व त्यांना अनुसरून असलेल्या चालीरीती यांच्याकडे लक्ष दयावचे नाही.आणि भलत्याच गोष्टीला नसते महत्व देवून आकाश पाताळ एक करायचे हा काळाचा व उत्साहाचा शुध्द दुरूपयोग होय.७

अशा प्रकारे हिंदू समाजाचे स्वरूप डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भेदकपणे मांडतांना दिसुन येतात वर्णव्यवस्था परंपरावादी वृत्ती आत्मपरिक्षणाचा व भवितव्याकडे पाहण्याचा अभाव यामुळे हिदूं समाजाने आत्मघात करून घेतला आहे. असा त्यांचा जो निष्कर्ष आहे. तो लक्षणीय मानला जातो.

**सामाजीक नितीमत्तेचे भान**

भारत देशात नेत्यानी कमी नाही परंतू दुदैव असे की, सामाजिक नितीमत्ता जाणणारी नेतेमंडळी दुर्लभ आहे.सत्तेसाठी, सन्मानासाठी, प्रतिष्ठेसाठी समान्यता: माणूस लाचार होतो.याचा पदोपदी प्रत्यय येत असतो.आपले हात दुसऱ्यापुढे लाचार होवुन पसरवण्यासाठी नसुन नवनिर्मितीसाठी आहेत.सहकार्यासाठी आहेत दु:खितांच्या पाठीवरून हात फिरविण्यासाठी आहेत.हे लक्षात घेणे आवश्यक आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हात उंचावून या देशात मानवमुक्तीचा लढा उभा केला .ऑक्टोबर १९५१ मध्ये जालंधर येथे केलेल्या भाषणात डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, मी व्यक्तीगत स्वार्थ साधण्यासाठी कोणत्याही पक्षात प्रवेश करणार नाही.स्वार्थासाठी माणुस सारखे पक्ष बदलतो आहे. कारण तो देशापेक्षा पक्षाचे स्थान मोठे मानतो.मी मात्र माझा देश मोठा मानतो माझ्यासाठी माझ्या देशापेक्षा मोठे काहीही होऊ शकत नाही.सरदार वल्लभभाई पटेल यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे देशप्रेम ओळखले होते.म्हणुन सर सी.सी.रामास्वामी अय्यर यांना मे १९४८ रोजी लिहलेल्या पत्रात पटेल लिहतात की, "I fully realize that he is cab be of use to this country."८

**एक व्यक्ती एक मुल्याचा पुरस्कार**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी २५ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना समितीच्या समारोप प्रसंगी केलेल्या भाषणात म्हटले होते की, स्वातंत्र्य समता आणि बंधुता ही त्रिसुत्री लोकशहीचा आत्मा आहे.सामाजिक आणि आर्थिक उद्देश साध्य करण्यासाठी फक्त सनदशीर मार्गानेच गेले पाहीजे कायदेभंग, सत्याग्रह, बहिष्कार हे बंद केले पाहिजेत परंतू आज सामाजातील असंतुष्ट छोटासा गट सुध्दा संघटना उभ्या करून असनदशीर मार्गाचे समर्थन करतात आणि आपल्याला हवे ते मिळवून घेतात.या संघटना या देशात लोकशाही नांदावी म्हणुन जी पथ्ये घटना समितीत सांगितली होती त्याची आज पायमल्ली होत आहे.कारण या देशातील नेतृत्वाला फक्त सत्ता मिळविणे आणि तिचा मनसोक्त उपभोग घेण्यातच धन्यता वाटते. सामाजिक नितिमत्तेची चाड उरली नाही.वास्तविक पाहता स्वातंत्र्य समता आणि बंधुतेच्या निर्मितीसाठी सामाजिक नितिमत्तेची नितांत गरज आहे.' एक व्यक्ती एक मत' हे सुत्र न स्विकारता ' एक व्यक्ती एक मुल्य' हे विचारसुत्र डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्विकारलेले दिसुन येते सामाजिक नितिमत्ता स्विकारून व्यक्तीचा सर्वांगिण विकास आणि कल्याण साधण्याचा जीवनमार्ग म्हणजे संसदीय लोकशाही असे विचार त्यांना अभिप्रेत होते.९

**मनुवादी विचारांच्या गुलामगिरीतुन मुक्ती देणारा नेता**

भारतीय स्वातंत्र्याचा लढा सुरू असतांना एकदा गांधीजीनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना प्रश्न विचारला की,तुम्ही या देशाच्या चाललेल्या स्वातंत्र्य लढयात सहभागी का होत नाहीत? तेंव्हा त्यांनी उत्तर दिले की, इंग्रजांच्या गुलामगिरीतुन मुक्तता मिळविण्याआधी या देशातील संपूर्ण मानवजात मनुवादी विचारांच्या गुलामगिरीतुन मुक्त होणे मला अधिक महत्वाचे वाटते जोपर्यंत मनुवादी विचारांचा नायनाट होत नाही तोपर्यंत येथिल समाज व्यवस्था आणि विषमता पोसणाऱ्या धर्मकल्पनां विरूध्द त्यांनी बंड पुकारले होते.व्यक्ती व्यक्तीमधील अनैसर्गिक व मानसाने इतर माणंसावर लादलेल्या गुलामीच्या बंधनांचा त्यांनी नेहमीच तिरस्कार केल्याचे दिसते.१०

**इ.स.१९४७ च्या फाळणीचा प्रश्न**

इ.स.१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले परंतू फाळणी मुळे अनेक प्रश्न निर्माण झाले त्यात निर्वासिंताचा प्रश्न हा महत्वाचा होता पाकिस्तान सरकार पाकिस्तान कडुन दलित जाती जमातींनी भारतात जाण्यास प्रतिबंध करत होती तेव्हा या प्रश्नांचा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी खोलवर विचार करून १८ डिसेबर १९४७ रोजी त्यांनी पंडित नेहरू यांना एक पत्र लिहले त्यांनी अस्पृश्यांना दिल्या जाणाऱ्या अन्याय वर्तणुकीविषयी लिहले होते.अस्पृश्यांना पुरेसे अन्नधान्य दिले जात नाही.त्यांना जमिनी दिल्या जात नाही. पुर्व पंजाब मधील शिख व जाट दडपशहीचे तंत्र वापरीत आहेत यासारख्या अनेक तक्रारी या पत्रात केल्या होत्या पाकिस्तान सरकार वर्गीकृत जातीजमातींनी भारतात येवू देत नाही.याचे महत्वाचे कारण म्हणजे वर्गीकृत जमातीमधील लोक चतुर्थश्रेणीत कार्यरथर आहेत.ही माणसे भारतात गेली तर साफसफाई ,मैला वाहुन नेण्याचे काम कोण करेल ? याशिवाय शेतमजुरांमध्ये वर्गीकृत जातीजमातींची संख्या अधिक होती ती माणसे गेली तर पाकिस्तान जमिनदारांना शेतमजूर कोठून उपलब्ध होईल? यासारख्या अनेक प्रश्नांचे सखोल विवेचन करून पंतप्रधानांनी यात जातीने लक्ष घालुन त्यांची सोडवणूक करावी अशी अपेक्षा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची होती.परतू त्यांचा भ्रमनिरास झाला होता.११भारतात

समाजवादाचा प्रश्न अर्थिकतेपेक्षा मुलत: सामराजिक आहे.त्यामुळे व्यक्तीची प्रतिष्ठा व व्यक्तीची सामाजिक जबाबदारी यात समतोल साधण्यासाठी आणि चातुवर्ण्य व जातीरचणा निकालात काढण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यसमाजवादाचा पुरस्कार केला होता.शेती, विमा व उदयागधंदे यांचे राष्ट्रीयकरण आणि बंधुता व बुध्दी प्रामाण्य यातुन त्यांचे चिंतन प्रकट होते.

**सारांश**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कार्यअमुल्य असे आहे. प्रत्येक कार्याला त्यांनी बुध्दीमतेची जोड दिली होती त्यांच्या प्रत्येक क्षेत्रातील योगदानामुळे मागाससमाज घटकांचा विकास होण्यास मदत झाली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे सामाजीक क्रांतीचे प्रणेते होते.विसाव्या शतकातील महान विचारवंत, प्रकांड कायदे पंडीत थोर समाज सुधारक, दुरदर्शी राजकारणी आणि भारतीय घटनेचे शिल्पकार होते.त्याच बरोबर ते कृतीशिल समाजसुधारक म्हणुनही त्यांची ख्याती होती.त्यांचे समाज चिंतन अतिशय सुक्ष्म अशा प्रकारचे होते.सामाजिक क्षेत्रात सामाजिक नितिमत्तेला प्राधान्य दिले जावे अशी त्यांची विचारधारा होती.

**संदर्भ**

१) भिमराव रामजी आंबेडकर ‘बहिष्कृत भारतातील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्फुट लेख (संपा.रत्नाकर गणवीर) नागपूर, १९८१
२) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे १ ऑक्टोबर १९५६ .(राम मनोहर लोंहीय)
३) भिमराव रामजी आंबेडकर, उपरोक्त
४) बहिष्कृत भारत दि. २१.१२.१९२८.
५) बहिष्कृत भारत दि. १२.०४.१९२९.
६) बहिष्कृत भारत दि. ०३.०६.१९२७.
७) बहिष्कृत भारत दि. १२.०८.१९२७.
८) सरदार वल्लभभाई पटेल यांनी सी.सी.रामस्वामी अय्यर यांना लिहलेले पत्र मे १९४८
९) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे दि.२५.११.१९४९
१०) मंदा मोरे-थोरात, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार,‘शोध आणि बोध’, प्रशांत पब्लिकेशन्स,जळगांव, २०१७ पृ.४०-४१
११) तत्रैव, पृ ४०

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अर्थशास्त्रीय दृष्टीकोण

– प्रा. डॉ. सोनवणे बी. एम.
एस.पी.एच. महाविद्यालय
नामपूर, ता.बागलाण, जि.नाशिक

**गोषवारा**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे प्रसिध्द अर्थतज्ज्ञ होते. त्यांच्या अभ्यासाचा मुख्य विषय 'अर्थशास्त्र' होता. भारताला अर्थशास्त्रीय विचारांची थोर परंपरा लाभली आहे. भारतीय अर्थतज्ज्ञांनी आपल्या आर्थिक विचारांचा ठसा जागतिक अर्थकारणावर पडला असल्याचे आढळून येते. भारतातील अर्थतज्ज्ञांसंबंधी बोलायचे झाल्यास चंद्रगुप्त मौर्याच्या राजदरबारात चान्यक्य विष्णु गुप्त उर्फ कौटिल्य यांचे आर्थिक विचार आजही उपयुक्त ठरतात. तसेच दादाभाई नौरोजी, धनंजयराव गाडगीळ, गोपाळ कृष्ण गोखले, चंद्रशेखर टिळक व व्हि.के.आर.व्ही राव हे जागतिक किर्तीचे अर्थतज्ज्ञ होते. यांच्या तोडिचा विश्वमान्य अर्थतन्ज्ञ म्हणुन डॉ.आंबेडकरांच्या नावाचा उल्लेख करावा लागतो. कारण त्याच्या अभ्यासाचा विषय अर्थशास्त्र होता व उपयुक्त आर्थिक सल्ला देण्याचे महत्त्वाचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर करायचे म्हणुन त्यांना भारतीय अर्थक्रांतीचे जनक असे देखील म्हटले जाते.

अर्थशास्त्रात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांना एक विशिष्ट असे स्थान आहे. आर्थिक समानता ही त्यांच्या अर्थशास्त्रीय विचारांची मध्यवर्ती कल्पना होती. कारण ब्रिटिश हिन्दुस्थानात येण्याआधी येथील आर्थिक समृध्दता ब्रिटिशांच्या धोरणामुळे आर्थिक विषमतेत परावर्तीत झाली. या संबंधी सखोल अध्ययन करुन रुपयाची समस्या हा संशोधन ग्रंथ त्यांनी निर्माण केला. येवढेच नाही तर भारतीय स्त्रीयांच्या आर्थिक स्ववलंबनाची कास घटणारा हा तत्कालीन महान समाजसुधारक देखील होता. शेती व शेतकरी सावकारांच्या विळख्यात अडकत चालली आहे याची शासनाला जाणीव करुन देणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे पहिले कृषीतज्ज्ञ होते. असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. याच बरोबर भारताचे परराष्ट्रीय धोरण कसे असायला हवे याविषयी त्यांचे विचार फार उपयुक्त होते. देशाच्या आर्थिक विकासाची जाण व तळमळ असणाज्या या महान अर्थतज्ज्ञास विश्वप्रसिध्दी लाभलेली होती.

**किवर्ड** – अर्थतज्ज्ञ, समानता, स्वावलंबन, अर्थक्रांती, समृध्दता

**प्रस्तावना**

भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी एक परिपक्व अर्थतज्ज्ञ म्हणुन डॉ.बाबासाहेबांचे नाव अग्रक्रमाणे घेतले जात होते. वेगवेगळ्या अभ्यासकांच्या दृष्टीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे केवळ अर्थतज्ज्ञच होते असे नाही. तर, ते एक महान समाजसुधारक होते, कायदेतज्ज्ञ होते, राजकारणी होते. याच बरोबर दीन–दलितांचे उध्दारक म्हणुनही त्यांचे नाव प्राधान्यक्रमाने घेतले जाते. काही अभ्यासक त्यांच्या अतुलनीय कार्याबद्दल त्यांना आधुनिक भारताचे प्रणेते असे देखील म्हणतात २०१२ मध्ये करण्यात आलेल्या एका जागतिक सर्वेक्षणात भारताच्या स्वातंत्र्यानंतर सर्वात महान भारतीय म्हणुन डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे नाव घेण्यात आले. येवढेच नाही तर, कोलंबिया विद्यापीठाणे जगामधील शिर्ष १०० विद्वानांच्या नावाची यादी तयार केली त्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा प्रथम स्थानी ठेवले होते. असे महान विद्वान अर्थतज्ज्ञ भारताला लाभले हा भारतीयांच्या दृष्टीने गौरवाचा भाग आहे.

डॉ.आंबेडकरांचे अर्थशास्त्रीय विचार अभ्यासले असता असे स्पष्टपणे जाणवते की, त्यांचे आर्थिक विचार समग्र स्वरुपाचे होते. देशातील सर्व प्रकारच्या आर्थिक समस्यांची त्यांना सखोल माहिती होती, त्यांचा अभ्यास होता. म्हणुन देशातील समस्यांचे निराकरण करण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्या लागतील याची देखील त्यांना माहिती असायची. विविध विषयांची जाण असल्यामुळेच त्यांना संविधान निर्माण करण्याचे महत्त्वपुर्ण काम देण्यात आले. आज जगातील सर्वात मोठी संसदिय लोकशाही भारतात कार्यान्वीत आहे. याचे श्रेय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना देणे उचित ठरेल. प्रस्तुत संशोधन लेखात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा वेध घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**संशोधन लेखाची उद्दिष्टे**

या संशोधन लेखाची निर्मिती पुढील उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवुन करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार अभ्यासणे.
२) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार अभ्यासणे.
३) डॉ.बाबासाहेबांनी संविधानात केलेल्या आर्थिक तरतुदींची माहिती घेणे.

**संशोधन प्रणाली**

प्रस्तुत लेखाच्या निर्मितीसाठी दुय्यम आधार सामुग्रीचा वापर करुन उपयुक्त माहिती संकलित करण्यात आलेली आहे. यात प्रामुख्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांवर प्रकाशित पुस्तके, लेख इ. अशा दुय्यम साधनांद्वारे माहिती संकलित करुन या संशोधन लेखाची निर्मिती करण्यात आलेली आहे. प्राप्त माहितीच्या विश्लेषणासाठी निबंधात्मक विश्लेषण तंत्राचा अवलंब केलेला आहे.

**विश्लेषण**

प्रसिध्द अर्थतज्ज्ञ डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वातंत्र्य मिळाल्यानंतर केंद्रात मंत्रीपदी असतांना स्त्रीयांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी प्रयत्न करणारे पहिले केंद्रीयमंत्री होते. देशातील निम्मे लोकसंख्या स्त्रीयांची असुनही स्त्रीया ह्या परावलंबी स्वरुपाचे जीवन जगतात हे सामाजिक दृष्टीकाणातून उचित नाही. त्यांच्या मते स्त्रीयांना देखील पुरुषांच्या बरोबरीने समान हक्क असावेत. स्त्रीयांना सन्मानाची वागणूक असावी

यासाठी त्यांनी संसदेत घहिंदु कोडबिलङ या नावाने विधेयक आणण्याचा प्रयत्न केला. त्यांचे विधेयक त्यांनी केलेल्या श्रमाचेच प्रतिक होते. या विधेयकाच्या माध्यमाने त्यांना स्त्रियांना कायदेशीर हक्क प्राप्त करुन द्यायचे होते. ०५ फेब्रुवारी १९५२ रोजी त्यांनी तयार केलेल्या विधेयकात स्त्रीयांना वडीलांच्या संपत्तीत समान हक्क, मृताचा वारसदार ठरविण्याचा अधिकार, घटस्फोट व पोटगी मागण्याचा अधिकार, विवाह, दत्तक विधान, अज्ञानत्व आणि पालकत्व हे सात विषय त्यांनी हिंदु कोडबीलात मांडले होते. या माध्यमातुन त्यांना समाजातील जात, धर्म किंवा लिंगभेद करुन सामाजिक विषमता कमी करता येणार नाही. असे त्यांना वाटत होते. न्यायाच्या तराजुत सर्वांना एकाच मापात तोलले जाईल असे त्यांनी जाहिर केले, मात्र त्यांना हे विधेयक संसदेत मांडण्यास प्रखर विरोध झाला. त्यामुळे त्यांना हे विधेयक संसदेत मांडता आले नाही.

सन १९९० च्या दशकात 'हिंदु कोडबील' प्रमाणे कायदे पारित केले जावु लागले. परंतु स्त्रियांना स्वातंत्र्यानंतर तब्बल ५० वर्षांनी हा न्याय मिळाला. जर हे संबंधीत विधेयक सन १९५२ मध्येच संम्मत झाले असते तर भारतीय महिलांचा आर्थिक व सामाजिक स्थर उंचावलेला राहिला असता, देशाची प्रगतीही वेगाणे झाली असती आणि देश आज लोकसंख्या वाढीणे त्रस्त आहे. कदाचीत लोकसंख्या वाढ नियंत्रणात राहिली असती. सामाजिक विकास हा स्त्रीया व पुरुष यांच्या माध्यमाने होतो व हा विकास समान राहिला तर खज्याअर्थाने सामाजिक विकास होतो जर या प्रक्रियेत स्त्रीया मागासलेल्या राहिल्या तर सामाजिक विकास हा दुभंगलेल्या स्वरुपाचा राहतो. स्वातंत्र्यानंतर ५० वर्षापर्यंत सामाजिक दुभंगलेपण स्पष्ट पाहिले, अनुभवले आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतातील महिला स्वावलंबनाचे आद्य प्रर्वतक होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक व सामाजिक विचार हे परस्परांना पुरक स्वरुपाचे होते. या बरोबरच त्यांना भारतीय अर्थव्यवस्थेतील शेती क्षेत्राचीही माहिती होती. भारतीय शेतकरी हा सावकारी कर्जाच्या विळख्यात अडकत चालला आहे. अशा अभ्यासपूर्ण निष्कर्ष त्यांनी काढला. शासनाने शेतकज्यांना सावकारी पाशामधून मुक्त केले पाहिजे. अन्यथा शेतकरी कर्जबाजारीच राहिल असा महत्त्वपुर्ण सल्ला शासनाला डॉ.आंबेडकरांनी दिला होता.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर जागतिक किर्तीचे अर्थतज्ज्ञ असल्याने त्यांनी आर्थिक सामाजिक विकासासाठी मानवी अधिकारांना केंद्रस्थानी मानले होते. म्हणून संविधानाची निर्मिती करतानाच त्यांनी समता, स्वातंत्र्य आणि बंधुभाव या तत्वाचा व्यापक दृष्टीकोणाने स्विकार केला. त्यांना लोकशाही प्रणाली अधिक विश्वसनीय व सक्षम करायची होती. त्यांनी केंद्र शासनाला आर्थिक दृष्ट्या अधिक प्रबळ केले आणि राज्यांना केंद्रावर विसंबुन ठेवण्याची तरतुद केली. राज्यांना केंद्राकडून हक्काने निधी मिळावा. यासाठी संविधानात वित्त आयोगाची तरतुद देखील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केली. दर पाच वर्षासाठी वित्त आयोगाच्या अध्यक्षाची नेमणुक करण्याचा कायदेशीर हक्क राष्ट्रपतींकडे सोपवीला. असा महत्त्वपूर्ण निर्णय केवळ भारतीय अर्थव्यवस्थेची सखोल जाणीव असणारी व्यक्तीच घेऊ शकते. हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यावरुन स्पष्ट होते.

**संदर्भ**


१) प्रा.गायकवाड आर.के. - डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय अर्थव्यवस्था

२) Dr.Narendra Jadhav- Dr. Ambedkars Economic Thought & Philosophy

३) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे-खंड-१ (संपादक डॉ.प्रकाश खरात)

४) www.ambedkaronline.com

५) https:satyagrah.croll.in

# इतिहासकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**- प्रा. आर. के. सुर्यवंशी**
इतिहास विभाग, एस.पी.एच. कला, वाणिज्य महाविद्यालय
नामपूर, ता.बागलाण, जि.नाशिक

**सारांश**

इतिहासाचा सखोल आढावा घेतला असता इतिहास घडवीणारी व्यक्ती ही शक्तीशाली, बुध्दीवादी, दुरदृष्टी असलेला, विशिष्ट हेतूने झपाटलेला, धैयवादी, ज्ञाणी, विद्वान, क्रांतीकारी, अन्याय-अन्याचारी व गुणवंत या पैकी वैशिष्ट्ये असलेली असते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे कुशाग्र बुध्दीमत्ता लाभलेले समाजसुधारक, विचारवंत, अर्थतन्ज्ञ, राजकारणी व लेखक होते. भारताला स्वातंत्र्य मिळण्याआधी उपेक्षित समाजात जन्माला आलेला हा विद्वान भारताच्या इतिहासात अजरामर झालेला आहे. जगामध्ये संसदिय लोकशाही असलेला भारत हा सर्वात मोठा देश आहे. अशा मोठ्या देशाचे संविधान डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केले आहे. भारताचे संविधान जगामध्ये एक आदर्शप्रत संविधान आहे. संविधानाद्वारा येथे लोकशाहीचे मुळ समाजमनामध्ये खोलवर रुजलेली आहेत ते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांमुळे, संविधाना बरोबर देशातील अस्पृश्य समाजाला न्याय मिळवून देण्याचे महान कार्य देखील बाबासाहेबांच्या अथिक प्रयत्नामुळेच शक्य झाले आहे. आज अनेक अभ्यासक डॉ.बाबासाहेबांच्या विविध दृष्टीकोण असलेल्या विचारांचा अभ्यास करीत आहेत. शासन स्थरावर देखील डॉ.बाबासाहेबांच्या विचारानुसार धोरणात्मक बदल स्विकारले जात आहेत. ह्यामुळेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे इतिहासकार होते असे म्हणावे लागते.

**किवर्ड** - सबलीकरण, संविधान, समाजसुधारक, आर्थिक स्वावलंबन, विचारवंत.

**प्रस्तावना**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना आधुनिक भारताचे जनक असे म्हटले जाते. कारण देशाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, महिला, शेतकरी, दलित, कामगार अशा विविध क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण स्वरुपाचे आहे. जगातील विद्वावांच्या इतिहासाचा सखोल अभ्यास केल्यावर लक्षात येते की, ते जगात चौथ्या क्रमांकाचे विद्वान होते. त्यांचे वरती उल्लेख केलेल्या विविध क्षेत्रात अत्यंत प्रभावशाली विचार आहेत. त्यांच्या विचारानुसार देशातील व्यवस्थेत बदल अथवा सुधारणा करण्याच्या प्रयत्न आता करण्यात येऊ लागला आहे ही भारतीय समाजाच्या दृष्टीने अत्यंत अभिमाणाची बाब आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारताच्या स्वातंत्र्यानंतर देशातील राजकीय क्षेत्रात सहभाग घेतला. कारण राजकीय क्षेत्रात भाग घेतल्याशिवाय देशाच्या सामाजिक, आर्थिक किंवा अन्य क्षेत्रातील कार्याला फारसे यश मिळू शकणार नाही. याची त्यांना सखोल जाणिव होती. राजकीय क्षेत्रात त्यांचे कार्य अल्पकालीन स्वरुपाचे ठरले पण ते देशाच्या इतिहासात उल्लेखनिय स्वरुपाचे ठरले. अशा ऐतिहासिक कार्याचा वेध घेण्याचा प्रयत्न या संशोधन लेखाद्वारे करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधन लेखाचा उद्देश**

प्रस्तुत संशोधन लेखासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आले आहेत.

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधान निर्मितीची माहिती जाणुन घेणे.

२) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा समानता विचारांची माहिती जाणुन घेणे.

३) अस्पृश्यता निवारण्यात केलेल्या कार्याची माहिती जाणुन घेणे.

**संशोधन प्रणाली**

प्रस्तुत संशोधन लेखाच्या निर्मितीसाठी दुय्यम आधार सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची ग्रंथ संपदा व वेगवेगळ्या अभ्यासकांनी प्रकाशित केलेल्या लेखांचा परामर्श घेण्यात आला आहे. अधिकृत संकेतस्थळावर प्रदर्शित/प्रकाशित माहिती देखील या संशोधन लेखासाठी विचारात घेण्यात आलेली आहे.

**विश्लेषण**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय राज्यघेटनेचे शिल्पकार असे म्हटले जाते. क्षेत्रफळाचा निकष लावला असता भारताचा जगात सातवा क्रमांक लागतो आणि लोकसंख्येच्या दृष्टीने जगात दुसरा क्रमांक लागतो. यावरुन भारताची भौगोलिक व प्राकृतीक स्वरुपाची जाणिव होते. अशा विशालकाय देशात लोकशाही व्यवस्था संविधानाद्वारे रुजविण्याचे अत्यंत अवघड व महान कार्य करण्याचे साहस डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी यशस्वीरित्या करुन दाखवले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाचे प्रशासन कसे चालवावे ? हा इतर सर्व प्रश्नांमध्ये सर्वाधिक महत्वाचा प्रश्न होता. संविधान निर्माण करण्यासाठी जगातील इतर देशांच्या संविधानाची सखोल माहिती असणे आवश्यक होती. डॉ.आंबेडकरांनी संविधान निर्माण करण्याची जबाबदारी स्विकारल्यावर जगातील विविध देशांच्या संविधानाचा कलम निहाय यशस्वी अभ्यास केला आणि भारताची परिस्थिती आणि प्रचलित सामाजिक व्यवस्था विचारात घेऊन उपयुक्त असे संविधान निर्माण करण्याचे कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले. देशाला स्वातंत्र्य मिळून ७० वर्ष झाले या ७० वर्षात देशाचा राज्यकारभार व प्रशासकीय कारभार हा संविधानाद्वारे झाला यामुळेच भारताचे संविधान जगात आदर्शप्रत संविधान आहे.

डॉ.आंबेडकरांनी देशात संविधानाच्या माध्यमाने समानता निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य देखील यशस्वीरित्या केलेले आहे. भारतात विविध धर्माचे लोक राहतात. जसे, हिन्दु, मुस्लीम, शिख इसायी, ख्रिश्चन आदी, आणि शेकडो जातीय येथील समाजात विभागलेला आहे. अशा विविधतेत एकता निर्माण करण्याचे श्रेय भारताच्या

सविंधानाला द्यावे लागेल. देशामध्ये एकूण लोकसंख्येत निम्मे लोकसंख्या ही स्त्रीयांची आहे. स्त्रीयांना पूर्वी सामाजिक बंधनामध्ये जीवन व्यथीत करावे लागल होते. असंख्य बंधन स्त्रीयांवर लादले होते. यामुळे स्त्रियांना परावलंबी स्वरुपाचे जीवन जगावे लागत होते. यामुळेच स्त्रिया विकासाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित राहिल्या होत्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीयांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचे महत्त्वाचे कार्य करण्याचा प्रयत्न केला. भारताचे कायदामंत्री असतांना त्यांनी हिंदु कोड बील आणण्याचा प्रयत्न केला मात्र तत्कालीन सवर्णांच्या नेत्यांनी/मंत्र्यांनी त्याला कडाडुन विरोध केला. डॉ.आंबेडकरांचा या घटनेचा निषेध करण्यासाठी कायदा मंत्री पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर ६० वर्षांनी डॉ.बाबासाहेबांच्या विचारांची अंमलबजावणी होताना दिसून येत आहे.

डॉ.बाबासाहेबांच्या संविधान निर्मिती, स्त्री-सबलीकरण या दोन महत्त्वाच्या कार्यापेक्षा अधिक महत्त्वाचे कार्य म्हणजे अस्पृश्यता निवारण होय. चातुवर्ण व्यवस्थेत समाजाची विभागणी चार वर्णात करण्यात आलेली होती. यात चौथा वर्ण शुद्रांचा होता. शुद्रांना निकृष्ठ व किळसवाणी कामे करावी लागत होते. यामुळे शुद्र किंवा अस्पृश्य यांना बहुजन समाजाणे वाळीत टाकलेले होता. या समाजावर सवर्णांकडून मोठ्या प्रमाणात अन्याय, अत्याचार होत होता व हा समुदाय विमुटपणे सर्वकाही सहन करीत होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य समाजाला हक्क आणि कर्तव्याची जाणिव करुन दिली. त्यांनी कार्यकर्त्यांची एक फळी निर्माण केली व संपुर्ण अस्पृश्य समुदायाला जागृत केले. आज या समुदायाला सन्मानाचे जीवन जगायला मिळते आहे हे केवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकरांमुळे हे यावरुन स्पष्ट होते.

**संदर्भ**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे
२) www.marathimati.net
३) Pritchett.Rajah, Rao Bahadur M.C. (University of Columbia)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारताच्या विकासासाठी आर्थिक तत्वज्ञान

– प्रा. अनिल साहेबराव पाटील
अर्थशास्त्र विभाग, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
सोनगीर, ता. जि. धुळे

**प्रस्तावना**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सामाजिक क्रांतिप्रवाहाचे कृतिशील विचारवंत व नेते होते. २० व्या शतकातील महान विचारवंत, प्रकांड कायदेपंडित, थोर समाजसेवक, दूरदर्शी राजकारणी म्हणून ते ओळखले जातात. डॉ. आंबेडकरांचे जीवन-कार्य अलौकिक व अनन्यसाधारण असून, आधुनिक भारताच्या जडणघडणीत त्यांचे योगदान खूप मोठे आहे. भारतातील दीन-दलित व अस्पृश्यांच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक तसेच राजकीय जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी सामाजिक संबंधाची पुनर्रचना मानवी मूल्यांच्या अनुषंगाने करण्यात, कोटयावधी दलित जनतेच्या मनात स्वाभिमान जागृत करण्यात व शतकानुशतके उपेक्षित असणाऱ्या समाजात वैचारिक क्रांती घडवून आणण्याचे श्रेय त्यांच्याकडेच जाते. उत्तम प्रशासक, थोर बुध्दिवादी व सिध्द हस्तलेखक, ग्रंथकार, कुशल संघटक, दलितांचे महान नेते, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार तसेच सामाजिक विज्ञानाच्या प्रमुख ज्ञानशाखांतील तत्वचिंतक अशा विविध क्षेत्रातील त्यांचे स्थान वैशिष्टयपूर्ण असून त्यांनी केलेले समाजकारण, राजकारण, अर्थकारण, राज्यघटना, शिक्षण या विषयावरील मूलगामी चिंतन, विश्लेषण व कार्य भारतीयांना प्रेरक, पूरक व मार्गदर्शक असे आहे.

खेडयातील दलित शेतकरी व शेत मजूर आणि शहरातील कामगार यांच्याशी त्यांचा घनिष्ठ संबंध आला. महारांच्या परंपरागत वतनामुळे त्याची होणारी कुचंबना, खोतातील कुळांचे शोषण, कामगारांविषयक कायद्यातील त्रुटी यांच्याकडे लोकांचे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी वृत्तपत्रांमधून लिखाण केले. व परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी कायदे मंडळात काही विधेयकही मांडली.

भारतातील सर्व प्रकारचा कच्चा माल उदा. कापूस हा कमी किमतीत खरेदी करुन इंग्लंडमध्ये नेवून त्याचा पक्का माल तयार करुन म्हणजेच वस्त्राच्या स्वरुपात दुप्पट विकायचा आणि प्रचंड नफा कमवायचा हा त्यांचा धंदा होता. यामुळे भारतीय समाज चहुबाजुंनी आर्थिक दृष्टिने पिळला गेला. त्याचे अर्थशास्त्र हालाकीचे बिघडले. यास ब्रिटिश सरकारच जबाबदार आहे असे सेडतोड टिकाही त्यांनी आपल्या प्रबंधात निर्भयपणे केली.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार**

भारत हा एक कृषी प्रदान देश आहे. कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा प्रामुख्याने शेती क्षेत्राच्या विकासावर अवलंबून असतो असे अनेक अर्थशास्त्रज्ञांनी सांगितले आहे. बाबासाहेबांनी सुध्दा शेती क्षेत्राविषयक आपले विचार मांडले आहे.

भारतातील लहान धारण क्षेत्रे आणि त्यावरील उपाय हा आंबेडकरांचा लेख म्हणजे भारताच्या शेती प्रश्नावरील अत्यंत मुलभूत अशा प्रकारचे भाष्य होय. हे लेख प्रथम १९१८ साली प्रसिध्द झाला. नंतरचा काळात भारतात शेती क्षेत्रात अत्यंत महत्वपूर्ण व गुणात्मक असे बदल झाले आहेत. १९५० च्या दशकात विविध राज्यांनी संमत केलेले व अडखळतका होईना कार्यान्वित केलेले जमीन सुधारणा विषयक कायदे हा पहिला महत्वाचा बदल होय.

लहान धारणक्षेत्र ही भारतीय शेतीला भेडसावणारी ही एक गंभीर समस्या आहेच. परंतु ही लहान धारणक्षेत्र विखुरलेली असल्याने समस्या अधिक बिकट होते. उदाहरणार्थ मुंबई इलाख्यात सरासरी धारण क्षेत्र २५.९ एकर तर पुण्या शेजारच्या पिंपाला सौदागर येथे अवघे एक-दोन एकर एवढेच धारण क्षेत्र होते. यापेक्षा एक महत्वाची गोष्ट म्हणजे हि धारणक्षेत्रे लहान-लहान तुकडयात विभागली गेली होती. उदाहरणार्थ रत्नागीरी जिल्हयातील अवघ्या २० गुठयांचे धारणक्षेत्र तीन तुकडयात विभागले तर ठाणे जिल्हयातील एक एकर नऊ गुठयांचे धारणक्षेत्र १४ तुकडयांचे मिळून झालेले होते. अशी असंख्य उदाहरणे देता येतील. मुळातच लहान धारणक्षेत्रे व त्यातही त्यांचे विखंडन यामुळे साधन संपत्तीचा कार्यक्षमतेपणे उपयोग करण्यात अडचण निर्माण होवून उत्पादन खर्च वाढतो व उत्पादकता कमी होते यामुळे स्वाभावीकपणे धारणक्षेत्राचा आकार वाढविणे व तुकडेजोड करणे हेच आपल्याला प्राथमिक उपाय वाटू लागले.

नेमक्या या पार्श्वभूमीवर आपल्याला आंबेडकरांचे धारणक्षेत्राच्या आकाराविषयीचे विचार तपासून पाहणे अगत्याचे आहे. या संदर्भात त्यांनी खालील प्रश्न उपस्थित केले.

१) धारणक्षेत्राच्या विखंडनामुळे साधन संपत्तीचा उपयोग कार्यक्षमतेपणे करण्यात अडचण निर्माण होत असतांनाही असे विखंडन मुळातच का होते?

२) मोठी धारणक्षेत्र कार्यदक्ष व लहान धारणक्षेत्र अकार्यदक्ष ही खरोखरच वस्तुस्थिती आहे काय? दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे किफायतशीर धारणक्षेत्र कसे ठरवायचे?

३) भारतातील लहान व विखुरलेल्या धारणक्षेत्रामुळे निर्माण झालेल्या समस्येवर अंतिम उपाय कोणता?

पहिली गोष्ट म्हणजे वारसांहक्क हे जमिनीच्या विभाजनाचे प्रमुख कारण आहे. या मताशी डॉ. आंबेडकर असहमत होते. त्यांच्यामते जमिनीवर पडत असलेल्या लोकसंख्येचा प्रचंड भार हेच त्याचे मुख्य कारण होय. शेती हे उपजिविकेचे एकमात्र साधन असल्यामुळे अजिबात नसण्यापेक्षा लहानसा का होईना पण जमिनीचा तुकडा आपल्या स्वाधिन असावा अशी लोकांची धारणा होती. अशा रितीने आंबेडकरांनी प्रश्नाच्या मुळालाच हात घातला त्यांचे प्रतिपादन असे जमिनीच्या लहान-लहान तुकडयांपासून काही ना काही फायदा होणे हेच लहान धारणक्षेत्राच्या

समस्येचे उगमस्थान आहे. हा फायदा तरी का होतो? उपजिवीकेसाठी फार मोठी लोकसंख्या मुख्यत्वे शेतीवर अवलंबून आहे. म्हणून त्यामुळे वारसाहक्क हे जमिनीच्या विभाजनाचे मुख्य कारण नसून शेतीवरील लोकसंख्येच्या अमर्याद भार हे त्याचे मुळ कारण होय.

**बाबासाहेब आंबेडकराचे अर्थव्यवस्थाविषयक विचार**

**नाणेपुरवठयाचे अर्थशास्त्र**

बाबासाहेब आंबेडकरांनी जीवनाच्या विविध क्षेत्रासंबंधी मुलगामी विचार केला होता. त्यांची दृष्टी जाती व्यवस्था, स्त्रीयांची गुलामगिरी या विषयांप्रमाणेच अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रातील मुलभूत मुद्यांना हात घालणारी होती. उदा. नाणे पुरवठयाचे अर्थशास्त्र (मॉनिटरी इन्कॉनॉमिक्स) या विषयीचे बाबासाहेबांचे विचार यातील पैशांच्या पुरवठयांचे नियमन करणे (रेग्युलॅरिटी पार्ट ऑफ फ्लो ऑफ मनी) म्हणजे देशातील पैशांची निर्मिती कशी नियंत्रित करता येईल यावर नाणे पुरवठयाच्या अर्थव्यवस्थेमधील स्थैर्य अवलंबून असते. ते नियमन योग्य पध्दतीने होत असेल तर अर्थव्यवस्थेत चढउतार होण्याच्या अथवा तुट वाढण्याचा धोका कमी होतो. आज अंदाजपत्रकामध्ये जी तुट दिसते ती वित्तीय तुट आहे. या संबंधी बाबासाहेबांचे विचार आजही चिंतनीय आहेत. व्यापार समतोलात पैशांचा पुरवठा व्यवस्थीत असेल. नियंत्रित असेल तर आर्थिक व्यवहारांमधील चढउतार मोठया प्रमाणावर होत नाहीत. प्रॉब्लेम ऑफ रुपी या प्रबंधात बाबासाहेबांनी नियमन व्यवस्थेसंबंधी सिध्दांत मांडला होता तो आजही उपयुक्त आहे.

**उद्योगधंद्यासंबंधी बाबासाहेब आंबेडकरांचे विचार**

उद्योगधंद्यांची स्वरुपावर आधारीत विभागणी बाबासाहेबांनी केली १) मुलभूत उद्योग २) आवश्यक उद्योग ३) पुरक उद्योग.

मुलभूत उद्योग केंद्र सरकारच्या अखत्यारीत असावेत आवश्यक उद्योगांची वाटणी केंद्र सरकारे, राज्य सरकारे आणि काही ठिकाणी दोन्हीच्या सहभागाने कार्यरत अशा पध्दतीने असावीत. पुरक उद्योग खाजगी क्षेत्रात देण्यात यावेत. मुलभूत उद्योग व आवश्यक उद्योगाच्या क्षेत्रात व्यवस्थापनासाठी लागणारी चौकट आणि रचना कशी असावी या संदर्भात बाबासाहेबांनी भोपाळच्या अधिवेशनात मांडणी केली होती. १९३५ मध्ये झालेल्या त्या अधिवेशनात त्यांनी बँका आणि इतर पतपुरवठा संस्थाच्या राष्ट्रीयकरण करण्यात यावे अशी मागणी केली होती.

**विम्याचे राष्ट्रीयकरण**

विम्याचे राष्ट्रीयकरण करण्यामागील दोन उद्देश डॉ. बाबासाहेबांनी मांडले.

१) विम्याचे राष्ट्रीयकरणामुळे लोकांचा पैसा खाजगी कंपनी पेक्षा सरकारकडे अधिक सुरक्षित राहतो. त्यामुळे लोकांना अधिक सुरक्षितता प्राप्त होते. त्यांना शेवटी पैस परत मिळण्याची हमी असते.

२) विम्याद्वारे आर्थिक नियोजनासाठी साधन सामुग्री प्राप्त होते. अन्यथा हिच साधन सामुग्री प्राप्त करण्यासाठी सरकारला बाजारात अधिक व्याजाच्या दराने ती उपलब्ध झाली असती.

**जमिनीचे राष्ट्रीयकरण**

जमिनीचे एकत्रीकरण व कुळकायद्याचा भूमीहिन मजूर, शुद्र, आणि अस्पृश्यांसाठी मुळीच उपयोग नाही. तसेच ज्या अर्थव्यवस्थेत मोठया प्रमाणावर भूमीहिन वर्ग असतो तेथे केवळ शेती नियोजन करुन समाजाचे प्रश्न सुटणार नाहीत हे प्रश्न सामुहिक शेतीमुळेच सुटू शकतील असे मत डॉ. बाबासाहेबांनी मांडले. त्यानी सामुहिक शेतीचे व्यवस्थापन खालील पध्दतीने करावे असे देखील स्पष्ट केले.

१) राज्याचे जमिनीचे विभाजन प्रमाणित आकाराच्या शेती मध्ये करुन हि शेती ग्रामीण लोकांना कुळ म्हणून कसण्यासाठी द्यावी. काही कुटूंब मिळून कुळाचा एक गट करावा त्यांनी शेती खालील अटींवर करावी.

- अ) सदर शेती सामुहिक शेती म्हणून असावी.
- ब) सरकारचे नियम व आदेश या नुसार जमिन करावी.
- क) शेतसारा इ. देणी दिल्यानंतर, उरलेले उत्पादन, ठरवून दिल्याप्रमाणे कुळांनी आपआपसात विभागून घ्यावे

२) खंडाने जमिन देत असतांना राज्याने जात-धर्म इत्यादीचा विचार करु नये. तसेच जमिनीचे वाटप असे करावे की, जेणे करुन कोणीही व्यक्ती जमिनदार अथवा कुळ अथवा भूमिहीन मजुर राहणार नाही.

३) राज्याने उत्पादन वाढीसाठी बि-बियाणे, खते, अवजारे, जनावरे इ साठी अर्थपुरवठा करावा.

४) राज्याला खालील हक्क द्यावेत.

- अ) राज्याने उत्पादनावर खालील प्रमाणे आकार घ्यावेत.
  - १. शेतसारा
  - २. जमिनदाराला लाभांश देण्यासाठी लागणारी रक्कम
  - ३. भांडवल पुरवठा केल्या बद्दलचा खर्च
- ब) एखाद्या व्यक्तीने कुळाचे नियम तोडल्यास अथवा साधन सामुग्रीचा वापर करतांना बुध्दी पुरस्कर दुर्लक्ष केल्यास अथवा सामुहिक शेती हिताच्या विरुध्द काम केल्यास त्यास दंड आकारावा. अशा प्रकारे सामुहिक शेतीचे व्यवस्थापन करावे. असा विचार डॉ. बाबासाहेबांनी मांडला म्हणजेच त्यांनी साम्यवादाचा विचार मांडला.

**अंदाजपत्रक आणि करपध्दती वरील विचार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अंदाजपत्रक आणि वैयक्तिक करावरील आपले विचार विस्तृतपणे मांडले आहेत. हे त्यांचे विचार त्याच्या भाषणांमधून आणि त्यांनी स्वत: स्थापन केलेल्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या जाहिरनाम्यामधून व्यक्त झालेले आढळतात.

आंबेडकर विकसनशील कर पध्दतीचे समर्थक होते. त्यामुळे जे कर राज्याला अधोगतीकडे नेतात त्यांना त्यांचा विरोध होता. त्यांच्या मते कर पध्दतीची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे असली पाहिजेत.

- १) कर पध्दती अशा प्रकारे विकसनशील असली पाहिजे की ज्यात श्रीमंताकडून अधिक तर गरिबांकडून कमी कर घेण्यात यावे. एवढेच नाही तर काही मर्यादेच्या खाली गरिबांना कर पध्दतीतून पूर्ण सूटका मिळावी.
- २) केवळ उत्पन्न हे कर लावण्याचा निकष असता कामा नये. तर कर भरण्याच्या योग्यतेचा त्यात विचार होणे आवश्यक आहे.
- ३) कर भरण्याच्या पध्दतीमुळे लोकांच्या जीवनावर परिणाम

होता कामा नये.

४) जमिन महसूलासारख्या बाबी नेहमी लवचीक असल्या पाहिजेत. जेणे करुन शेतकऱ्यांना वस्तु पुरवतांना त्यांची स्थिती एकूण परिस्थितीचा विचार केला जावा.

डॉ. आंबेडकरांना वाटत होते की, समाजातील गरीब वर्ग जो दोन वेळच्या जेवणालाही मुश्किल आहे त्यांच्याकडून कर घेतला जावू नये. त्यापेक्षा ज्यांचा वापर अधिक आहे त्यांच्याकडून कर वसुली करणयात यावी. अशा प्रकारे कर वसुली करण्यात आली तर ते आपले जिवनमान खाली आणू शकणार नाहीत. आंबेडकरांच्या मताप्रमाणे केवळ श्रीमंत आणि समृध्द लोकांनाच कर भरण्यास लावावे. पुढे त्यांनी असा विश्वास व्यक्त केला आहे की, अशा प्रकारे या वर्गावर कर लावताना अशी काळजी घेतली जावी की बचतीचा दर व भांडवली रचनेवर याचा विपरीत परिणाम होणार नाही. याबाबतीत त्यांनी त्यांच्या समकालीन पाश्चिमात्य अर्थशास्त्रज्ञानच्या कल्पनेशी आपली भागेदारी स्पष्ट केली आहे. ज्यांच्या मते भारताच्या अविकसीत राहण्याचे प्रमुख कारण म्हणजे बचतीचा अल्पदर आणि भांडवली रचना या दृष्टिने ते पुरवठयाच्या बाजुचे होते असे म्हणता येईल.

**समारोप**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांची एकूण गोळा बेरीज असे दर्शविते की, ते निश्चितपणे त्यांच्या काळातील एक आर्थिक विचारवंत होते. त्यांच्याजवळ विश्लेषणाची फार मोठी शक्ती होती. असाधारण, अंतरदृष्टी, तात्वीक आणि व्यावहारीक अर्थशास्त्राविषयीचे खोल आकलन हे त्यांचे विशेष गुण होते. त्यांचे थोरपंण आणि अलौकिकत्व त्यांच्या व्यवहारीक दृष्टिकोनात आहे. जमिनीच्या राष्ट्रीयकरणाव्यतिरिक्त त्यांच्या कल्पना खूप यथार्थ आणि व्यवहार्य ठरल्या आहेत. त्यापैकी पुष्कळ कल्पना आजही समर्पक आहेत. ते केवळ म्हणायला अर्थशास्त्रज्ञ नव्हते. त्याची भारतीय अर्थशास्त्राच्या विकासाच्या इतिहासातील योगदान खूप मोठे आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे केवळ प्रसिध्द राजकारणी, कायदेतज्ञ, सुधारक नव्हते की ज्यांनी आपले सारे जीवन समाजातील खालच्या वर्गाच्या विकासाकरिता समर्पित केले. त्याबरोबर ते एक स्पष्ट दृष्टिकोन आणि सापेक्षी अर्थशास्त्रीय विचारवंत होते.

प्राध्यापक सेलिग्मन या त्याच्या अर्थशास्त्राच्या आवडत्या प्राध्यापकांचे आंबेडकरांविषयी फारच मोठे गैरवोग्दार आहेत. ते असे इतका सखोल चिंतनात्मक आणि सडेतोड टिकात्मक विवेचन केलेला ग्रंथ कोठेच आढळत नाही.

**संदर्भ**


१) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन आणि संघर्ष - प्र. दा. गायकवाड

२) आंबेडकर - नलिनी पंडीत

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अर्थशास्त्रीय दृष्टिकोन आणि चळवळीची दिशा - डॉ. आंबेडकर वाड्.मयीन अभ्यास मंडळ

४) आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत - प्राचार्य, डॉ. पी.डी. देवरे, प्रा. डॉ. एस.एम. विसपुते, प्रा. डॉ. डी.एस. निकुंभ, प्रा. डॉ. सुनंदा ठाकरे (पाटील)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता

– प्रा. सुनिल भालेराव पाटील
वसंतराव नाईक कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
शहादा, जि. नंदुरबार

**प्रस्तावना**

वृत्तपत्र हे देशाच्या जनजागृतीचे एक महत्वाचे साधन मानले जाते. कोणत्याही समाजाला, पक्षाला किंवा देशाला जेव्हा आपल्या सर्वांगीण उन्नतीचा लढा द्यावयाचा असतो त्यावेळी त्यांच्या हाती एखादे वर्तमान पत्र नसेल तर ते कार्य त्यांना सुलभ रीतीने कधीही करता येणार नाही. पारतंत्र्यांच्या काळात स्वातंत्र्याची जागृती तेजविण्याचे कार्य वृत्तपत्रांनी केले.त्या त्या काळातील पत्रकारिताही समाजाला विचार देणारी, नवचैतन्य फुलवणारी होती.लोकजागृतीसाठी तत्कालीन काळात व्याख्याने, चर्चा सभा, परिषदा, मेळावे इत्यादी साधने उपलब्ध होती.पण लोक संपर्क माध्यमांची आवश्यकता होती.बाळशास्त्री जांभेकरांनी 'दर्पण' या मराठी वृत्तपत्रांचा प्रारंभ केला होता.या सारखी अनेक दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके सुरू होत होती.व काही कारणाने बंदही पडत होती. ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश, केसरी, इंदुप्रकाश, नेटिव्ह ओपिनियन या सारख्या वृत्तपत्रांतून लोकमत घडवण्याचा, जागृत करण्याचा प्रयत्न करीत होती.लोकशाही राजवटीत वृत्तपत्रांना चौथी शक्ती मानली जाते. अस्पृश्यांच्या व्यथा-वेदनांना, प्रश्नांना, त्यांच्यावर होणा-या अन्यायांना वाचा फोडण्यासाठी वृत्तपत्रांशिवाय दुसरे साधन उपलब्ध नव्हते. महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक चळवळीला दीनबंधू, दीनमित्र यासारखी मोजकी पत्रकांची साथ लाभली होती.पण ती अल्पजीवी ठरली.सत्यशोधक जलसे प्रबोधनाचे कार्य करीत असत.डॉ.आंबेडकरांना महात्मा फुलेंच्या चळवळीचे स्वरूप माहित होते.वृत्तपत्र सुरू करण्याची कल्पना त्यांच्या मनात घोळत होती.ही बातमी राजर्षी शाहू महाराजांना समजली. त्यांनी वृत्तपत्र सुरू करण्यासाठी अडीच हजार रूपयांचा चेक दिला.यातून डॉ. आंबेडकरांनी 'मूकनायक' या नियतकालिकाचा पहिला अंक ३१ जानेवारी १९२० रोजी प्रसिध्द केला.१ सिडनेहॅम सारख्या सरकारी कॉलेजात प्रोफेसर म्हणून काम करतांना डॉ. आंबेडकरांना संपादकत्व स्विकारणे शक्य नव्हते. तेव्हा वऱ्हाडचे पांडुरंग नंदराम भटकर हे संपादक होते.तर सातारा जिल्हयातील ज्ञानदेव ध्रुवनाक घोलप हे व्यवस्थापक म्हणून काम पाहत होते.५ जुलै १९२० रोजी डॉ.बाबासाहेब विलायतेत बॅरिस्टरीचा अभ्यास करण्यासाठी गेल्याने मूकनायकांची वाताहत झाली. मूकनायकातील पहिल्या १४अंकातील अग्रलेख डॉ आंबेडकरांनी लिहिले होते.

**१) मूकनायक** – मूकनायकाच्या प्रारंभीच्या अवतरणात

*काय करू आता धरूनिया भीड*
*नि:शंक हे तोंड वाजविले*
*नव्हे जगी कोणी मुकियांचा जाणे*
*सार्थक लाजून नव्हे हित२*

ही तुकारामांची निवडलेली अभंगोक्ती सार्थ होती.पिढयांनपिढया अस्पृश्यतेचा कलंक लेवून जगणारा हा समाज मूक होता.या पत्राने समाजाला जागृत करण्यासाठी 'नायकत्व' स्विकारले. अस्पृश्य वंचित, बहिष्कृत समाजाला सामाजिक, राजकिय, आर्थिक लढयाला प्रेरणा देण्याचा संकल्प मूकनायकातून झालेला दिसतो. मूकनायक हा आजवर मूक असला तरी नवसमाजाचा निर्मित नायक आहे ही जाणीव त्यामागे होती. तसेच 'मूकं करोनी वाचालम' मुक्याला बोलके करण्याचा प्रयत्न त्यांचा असावा.मुक्यांना बोलके करायचे तर त्यांच्या जीवनाबद्दल त्यांना सज्ञान करणे आवश्यक होते.मूकनायक यातील डॉ. आंबेडकरांचे अग्रलेख म्हणजे शैलीच्या सौंदर्याने सजलेले वैचारिक गद्य आहे. मूकनायक हे डॉ. आंबेडकरांनी टाकलेले वृत्तपत्र सृष्टीतील पहिले पाऊल होते. लोकमान्य टिळकांप्रमाणे 'पुनश्च हरि: ओऽम' म्हणून डॉ. आंबेडकरांनी बहिष्कृत भारतचा ३ एप्रिल १९२७ रोजी पहिला अग्रलेख लिहिला. मूकनायकाच्या मनोगतात सामाजिक, आर्थिक विषमता देशात नांदते आहे.हे सांगून त्यांनी समाजाच्या विघटनाला जबाबदार असणाऱ्या जातिप्रथेचे स्वरूप विशद केले आहे.जात आपल्या समाज व्यवस्थेचा अविभाज्य घटक बनला आहे. आहारविहार, पोषाख, विवाहादी चालीरिती इत्यादी अनेक बाबतीत जातीने व्यक्तीवर लादलेल्या बंधनामुळे लोकांच्या मनोवृत्ती वर्षांनुवर्ष संस्कारित झाल्यामुळे प्रत्येक क्षेत्रात माणसाला जात घेऊनच जगावे लागले.

**२) बहिष्कृत भारत** – शिक्षणानंतर संघर्षाचे पाऊल न पडले तर ते शिक्षणही वावटुकी ठरते. असे डॉ. आंबेडकरांचे विचार १९२७ मध्ये चवदार तळ्याच्या सत्याग्रहा निमित्ताने त्यांच्या जीवनातील एक नवे पर्व सुरू झाले. या निमित्ताने त्यांनी माणुसकीलाच आव्हान दिले.यासाठी त्यांना नियतकालिकाची पुन्हा गरज भासू लागली.म्हणून त्यांनी 'बहिष्कृत भारत' हे पाक्षिक सुरू केले.बहिष्कृत भारत व मूकनायक या दोघांची लिखाण शैली वेगळी होती.मुक्याला बोलके करून आपण नवनिर्माणाचे नायक आहोत ही जाणीव करून देणारे लिखाण यात होते.तर बहिष्कृत भारत मधील लिखाण हे रणांगणांतील योध्दयांचे आहे.रणांगणात उतरणाऱ्या योध्दाने शत्रू समोर तुताऱ्या फुंकाव्या तशा तुताऱ्या बहिष्कृत भारत मधून फुंकल्या आहेत.बोलक्या झालेल्या समाजाला वादातही जिंकता यावे.यासाठी जी वैचारिक बेगमी बहिष्कृत भारत करून देतो.

**३) समता** – डॉ. आंबेडकरांनी आपल्या चळवळीला व्यापक रूप देण्यासाठी 'समता समाज संघ' स्थापन केला. आपल्या नव्या चळवळीसाठी त्यांना मुखपत्राची गरज भासू लागली.त्यातून १९२८ मध्ये 'समता' नावाचे नियतकालिक सुरू केले.डॉ. आंबेडकरांना स्वातंत्र्य व समता या एकाच नाण्याच्या दोन बाजू वाटत होत्या. समतेच्या संगराचाच एक भाग म्हणजे चवदार तळयावरील महाडचा सत्याग्रह हा होता. जन्मजात अल्पसंख्य केवळ आपल्या एकटयांच्या बळावर लोकशाहीत यशस्वी

होऊ शकत नाहीत. ही जाणीव त्यांच्या मुळाशी असावी.३

**४) जनता –** सन १९३० हे वर्ष आधुनिक भारताच्या इतिहासातील एका नव्या पर्वाच्या प्रारंभाचे वर्ष म्हणून नोंदवावे लागेल. महात्मा गांधी यांनी सविनय कायदेभंग चळवळीच्या माध्यमाने देशात मिठाच्या सत्याग्रहामुळे अभूतपूर्व अशी लोकजागृती केली. आणि इंग्रज सरकारलाही त्याची जाणीव झाली.याच काळात गांधी- आयर्विन करार झाला होता. गोलमेज परिषदाचा घोळ चालत होता, गांधी- आंबेडकर यांच्यातील प्रसिध्द येरवडा करार (पुणे करार) झाला. जन्मजात अल्पसंख्यंक केवळ स्वबळाने प्रश्नाची तड लावू शकत नाहीत.त्यांना नैतिक बळ हवे असते अशाना बळ देण्याचे कार्य डॉ. आंबेडकरांनी जनता नावाचे पाक्षिक सुरू करून दिले.४ जनता पाक्षिकाचे संपादक श्री देवराव नाईक होते. नंतर भास्कर रघुनाथ कद्रेकर काही काळ संपादक होते.तर जुलै १९३९ ते जानेवारी १९४२ पर्यत गंगाधर नीलकंठ सहस्त्रबुध्दे संपादक होते.१९३० ते १९५० पर्यतचा काळ आणि त्यातील ऐतिहासिक महत्वाच्या घटनांचा साक्षीदार म्हणून 'जनता' पत्रांच्या संचिकाकडे पाहिले जाते. जनता पत्रामुळे डॉ. आंबेडकरांच्या चळवळीच्या सामर्थ्याची जाणीव होते. अस्पृश्य वर्गाला मिळालेला हक्क, धर्मांतराची घोषणा, शेतमजूर, कामगारांसाठी केलेले कार्य, घटनेची निर्मिती इत्यादी घटनांचा वृत्तांत आणि डॉ. आंबेडकरांच्या विचारांची संपदा जनतेला अंकातून वाचायला मिळते.५ जनता पत्राचा आरंभ झाला आणि गोलमेज परिषदेत अस्पृश्यांची हक्कांची सनद मिळविण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी केल्या अभूतपूर्व लढा व हकीकत जनतेपर्यंत पोहचवण्याचे हे पत्र हाच आधार होता.आपल्या समाजाचे मत घडविण्यासाठी परिषदा, सभा, मळावे, बैठका इत्यादी उपाय योजले त्या सर्वांची नोंद जनता पत्रात आहे.जनतेने लोकमत घडवले ते धर्मांतराच्या प्रश्नावर धर्मांतरासंबंधीचे ठराव जनता पत्राच्या प्रत्येक अंकात होते.

**५) प्रबुध्द भारत –** डॉ. आंबेडकरांनी १९३५ यावर्षी धर्मात्तरांची घोषणा येवला येथे केली होती. त्यांनी विविध धर्माचे परिशीलन सुरू केले.धर्मांतराची मुख्य कारणे पाच होती.काम, लोभ, चीड, सूड आणि विवेक होय. या पैकी पहिल्या चार कारणांचे उगमस्थान विकार हे आहे.त्यामुळे त्या धर्मात्तरांची गणना विवेक धर्मात्तरात होऊ शकत नाही. डॉ.आंबेडकरांनी सर्व धर्मांचे सखोल परिशीलन केल्यानंतर बौध्द धर्माच्या स्वीकाराकडे ते वळले. हे ओळखून डॉ. आंबेडकर यांनी १९५५ मध्ये 'प्रबुध्द भारत' हे साप्ताहिक सुरू करतात. यात डॉ. आंबेडकरांची पत्रकारिता व्यक्त करण्यास फारसा अवकाश मिळाला नाही.असे एकंदरीत पाच टप्पे डॉ. आंबेडकर यांच्या वृत्तपत्रीय के ारकिर्दीचे पडतात.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता**

त्यांनी केलेली पत्रकारिता आणि आजची पत्रकारिता यात बदल झाला आहे. त्यावेळी डॉ.आंबेडकरांनी पत्रकारिता केली ती समाजातील वाईट बाबींवर प्रकाश टाकण्यासाठी केली होती. त्यांचे लेखन मनाला चेतवणारे, जातीभेद नष्ट करण्यासाठी उद्युक्त करणारे विचार मांडलेत. आजच्या पत्रकारितेतून समाजाच्या जडणघडणीसाठी बाबासाहेबांचे विचार महत्वाचे ठरतात. आर्थिक स्वातंत्र्यावर त्यांचा भर होता. संपत्तीची वाटणी समान असावी.स्वातंत्र्यपूर्व काळात वर्तमान पत्रांतून स्वातंत्र्या बाबतचे विचार मांडले जात होते.मात्र त्यावेळेची विचारांची मांडणी, सखोलता, त्या शब्दाची किंमत, वाचनीयता, मनन करण्याची क्षमता इत्यादी गोष्टी आज पेक्षा आधिक प्रगल्भ होत्या. त्या काळी वृत्तपत्रातून आर्थिक भष्ट्राचार नव्हे तर वैचारिकतेवर विचारपूर्वक हल्ला होत असे.६

अस्पृश्य वर्गाला विचार प्रवृत्त करणे, त्यांच्या अस्तित्वाची जाणीव करून देणे आणि संघर्षान्मुख करणे ही मानवी जीवित्वाला नवा आयाम देण्याची भूमिका वृत्तपत्रातून डॉ.आंबेडकरांनी स्वीकारली होती. नैतिकता हा वृत्तपत्राचा कणा आहे असे मत त्यांचे होते.हिंदू समाज व धर्म यातील विषमतेवर त्यांनी आपले परखडपणे विचार मांडले. अस्पृश्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देऊन त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला,अत्याचाराला प्रखरपणे वाचा फोडण्याची गरज म्हणून वृत्तपत्रांतून जनजागरण करणे हेच सवार्थाने हितवाह मानले आहे.७

**सारांश**

परतंत्र्यांच्या काळात पुरेसा आर्थिक स्त्रोत नसतांनाही डॉ. आंबेडकरांनी वरील वृत्तपत्र चालवलीत.यावृत्तपत्रांच्या माध्यमाने आपल्या समाजातील ज्वलंत प्रश्न समाजा समोर मांडून सरकारचेही लक्ष त्याकडे वेधून घेतले.प्रतिकूल परिस्थितीत झगडत झगडत ज्या पत्रांनी प्रवास केला त्यांचा जनमानसांवर प्रभाव जाणवतो. पत्रकातून मांडण्यासाठी त्यांच्या जवळ ठाम तात्विक भूमिका होती.त्यांच्या जनता पाक्षिकातील लिखाणामुळे 'इतिहासाची नविन पाने लिहणारा तरूण' म्हणून डॉ. आंबेडकरांचे वर्णन युरोपियन लोक करतांना दिसतात. वृत्तपत्रातून राजकीय हक्कासाठी चाललेल्या लढयाचे चित्र उमटलेले दिसते तसेच व्यक्तीगत अनुभवाचे चित्रणही आढळते.वृत्तपत्रातून मानसिक स्वातंत्र्य हेच खरे स्वातंत्र्य हे विचार सूत्र मांडलेले दिसते.१९व्या शतकातील टिळक, आगरकर, लोकहितवादी, फुले यांच्या लेखनाने मराठी चिंतन विश्वाला नवा आशय दिला. तर २० व्या शतकात हाच आशय डॉ.आंबेडकरांनी प्राप्त करून दिला. त्यांच्या विचारात देशप्रेमाची धार होती.देशाची बदलेली स्थिती, खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण या प्रकारामुळे जनमानसात अनेक बदल झालेत. डॉ.आंबेडकरांनी स्वत:ची स्वतंत्र शैली निर्माण केली. मराठी वृत्तपत्रसृष्टीला लोकजागृती चळवळीचे स्वरूप देऊन सामाजिक न्यायमूल्यांची जाणीव हीच त्यांच्या वृत्तपत्रसृष्टींची आधारशिला आहे.

**संदर्भ**


१) फडके भालचंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मूकनायक उदय आणि अस्त, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, ऑक्टों १९८५, पृ- ६६.
२) उपरोक्त, पृ- ६७.
३) लिंबाळे शरणकुमार, प्रज्ञासूर्य, दिलीपराज प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे, २००७, पृ-३४३.
४) उपरोक्त, पृ- ३४३.
५) फडके भालचंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मूकनायक उदय आणि अस्त, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, ऑक्टों १९८५, पृ-१७२.
६) क्रांतीसूर्य, भांडारकर पब्लिकेशन्स, धुळे.(२०१६) पृ- ८६.
७) पानतावणे गंगाधर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता, लोकराज्य, धम्मचक्र प्रवर्तन सुवर्ण महोत्सव विशेषांक, ऑक्टोंबर २००६.पृ -४५ ते ४८.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनातील लोकशाही, सामाजिक, राजकीय इ. विचारांचा आढावा घेऊन आधुनिक भारताच्या जडणघडणीत त्यांचे योगदान

– प्रा. जयश्री प्रकाश देवरे
कला विभाग, राज्यशास्त्र विभाग
एस.एस.व्ही.पी.एस. कॉलेज, देवपूर, धुळे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सामाजिक क्रांतीप्रवाहाचे कृतिशील विचारवंत व नेते होते. २० व्या शतकातील महान विचारवंत प्रकांड कायदेपंडीत, थोर समाजसेवक, दुरदर्शी व राजकारणी म्हणून ओळखले जातात. डॉ. आंबेडकरांचे जीवनकार्य अलौकीक व अनन्य साधारण असून, आधुनिक भारताच्या जडणघडणीत त्यांचे योगदान खुप मोठे आहे. भारतातील दीन-दलित व अस्पृश्यांच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक तसेच राजकीय जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी सामाजिक संबंधांची पुनर्रचना मानवी मूल्यांच्या अनुषंगाने करण्यात कोटयावधी दलित जनतेच्या मनात स्वाभिमान जागृत करण्यात व शतकानुशतके उपेक्षित असणाऱ्या समाजात वैचारिक क्रांती घडवून आणावयाचे श्रेय त्यांच्याकडेच जाते. डॉ.आंबेडकरांना आपण आधुनिक भारताच्या इतिहासातील एक युगप्रवर्तक नेते म्हणून ओळखतो. हजारो वर्षापासून चालत आलेल्या भारतीय समाज व्यवस्थेविरुध्द बंडाचा झेंडा उभारण्याचे सामर्थ्य त्यांच्या ठिकाणी होते.

डॉ.आंबेडकर यांनी त्यांच्या हजारो अनुयायांसह बौध्द धर्माचा स्विकार केला. बौध्द समाजाची समाज व्यवस्थेत नीट घडण बसविण्यापुर्वी ६ डिसेंबर १९५६ मध्ये त्यांचे परिनिर्वाण झाले. केवळ दलितांचेच नेते ते राहिले नाहीत तर नव्या भारताच्या घटनेचे शिल्पकार, प्रकांड पंडीत, अर्थतज्ञ आणि प्रखर राष्ट्रवादी म्हणून त्यांची ओळख झालेली दिसून येते.

**उद्दिष्टे –** १) राष्ट्रवाद ही समाजाला एकत्रित करणारी भावनिक शक्ती आहे. २) सामाजिक विषमतेचे चटके शिक्षण काळापासून बसल्याने डॉ.आंबेडकर लोकशाहीचा पुरस्कार करतांना आणि संसदीय लोकशाहीचा आग्रह धरतांना आदर्श आणि वास्तव याची सांगड घालतांना दिसून येतात.

**जीवन परिचय**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुर्ण नांव भिमराव रामजी आंबेडकर असून त्यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मेहू येथे झाला. त्यांचे वडील लष्करात सुभेदार म्हणून नोकरीस होते. १९०७ मध्ये मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी पुढील शिक्षणासाठी मुंबई एलफिन्स्टन कॉलेजात प्रवेश घेतला. महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांना बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्याकडून शिष्यवृत्ती देण्यात आली. १९१२ मध्ये बी.ए.ची पदवी संपादन केल्यानंतर बडोद्याच्या महाराजांनी त्यांना आर्थिक मदत करुन अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी सहकार्य केले. अमेरिकेत असतांना त्यांनी अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र इ.विषयांचे सखोल अध्ययन केले. १९२१ मध्ये भारतात परत आल्यावर डॉ.आंबेडकरांनी वकीली सुरु केली. १९२४ मध्ये त्यांनी अस्पृश्यांमध्ये जनजागृती घडवून आणण्यासाठी बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना केली व नंतर बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र सुरु केले.

१९२७ मध्ये मुंबई प्रांताच्या कायदेमंडळाचे सदस्य म्हणून त्यांची नियुक्ती झाली. त्यांनी १९२६ मध्ये हिल्टनयंग तसेच १९२८ मध्ये सायमन कमिशनपुढे साक्ष देऊन अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. १९३० मध्ये अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून इंग्लंडमध्ये गोलमेज परिषदेस ते उपस्थित राहिले. राजकीय सुधारणांसाठी एका आघाडीवर लढत असतांना सामाजिक सुधारणांसाठीदेखील लढा देत होते. त्यासाठीच त्यांनी मनुस्मृती दहन, महाडच्या चवदार तळयांचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह यासारखी आंदोलने करुन जनजागरण केले. १९४२ मध्ये त्यांची व्हॉईसरॉयव्या कार्यकारी बंगालमधून घटनासमितीवर निवडून आले. घटना समितीतील मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी केलेल्या कामामुळे ते भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात.

स्वातंत्र्यानंतर पंडीत नेहरुंनी त्यांना आपल्या मंत्रीमंडळात सहभागी करुन घेऊन त्यांच्यावर कायदा खात्याची जबाबदारी सोपविली. त्यावेळी त्यांनी परिश्रमपुर्वक तयार केलेल्या हिंदू कोड बीलाला काँग्रेसमधील प्रतिगामी गटाने विरोध केल्यामुळे ते बील संमत न झाल्यामुळे आपल्या मंत्रीपदाचे त्यागपत्र दिले. हिंदुधर्मात असणारी जातीयता, त्यामुळे अस्पृश्यांना जी विषमतेची वागणूक मिळते तीला विरोध म्हणून त्यांनी १२ ऑक्टोबर १९५६ रोजी बौध्द धर्माचा स्विकार केला. भारतातील एक मोठे समाजसुधारक तसेच मानवी हक्काचे उद्‌गाते महामानव डॉ.आंबेडकरांचे ६ डिसेंबर १९५६ रोजी निधन झाले.

**लोकशाही (सामाजिक व राजकीय लोकशाही)**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर लोकशाहीचे कट्टर पुरस्कर्ते होते. इंग्लंड, अमेरिका यासारख्या देशांमध्ये असतांना त्यांच्यावर पाश्चात्यांच्या उदार मतवादी विचारसरणीचा प्रभाव होता. त्यांच्या मते लोकशाही हा शासनाचा असा प्रकार आहे की, ज्यांच्या सहाय्याने रक्तपाताशिवाय लोकांच्या सामाजिक, आर्थिक तसेच राजकीय जीवनात क्रांतीकारी बदल घडवून आणता येतात या व्यवस्थेत खऱ्या अर्थाने सामाजिक परिवर्तन घडवून आणता येते व लोकांना स्वातंत्र्याच्या उपभोग घेणे शक्य होते. लोकशाहीचा आधार समता आहे. एक व्यक्ती एक मत ही तत्वे आपण आणली असली तरी तिचे सामाजिक लोकशाहीत रुपांतर न केल्यास तिला अर्थ राहणार नाही. आर्थिक समता राज्याच्या प्रभावात्मक हस्तक्षेपाशिवाय अशक्य आहे. राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षमता या एकमेकांना पुरक असल्या पाहिजेत. भारतीय लोकशाहीपुढे हे विविध विषमतेचे मोठे आव्हान आहे. समाजरचना सामाजिक मुक्त अभिसरणास अनुकूल बनली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला समान मताबरोबर समान मूल्य मिळाले पाहिजे. असा डॉ.आंबेडकरांचा आग्रह होता. भारतीय समाजातील जातीयता आणि तिची कठोर विभागणी हा भारतीय बहुसंख्य

हिंदु समाजाला मिळालेला शाप होता. डॉ.आंबेडकरांनी भारतातील सामाजिक विषमतेच्या पार्श्वभूमीवर सामाजिक लोकशाहीला महत्व दिलेले आहे. त्यांच्या मते एक व्यक्ती एक मत हे तत्व सामाजिक लोकशाहीत पुरेसे नसून एक व्यक्ती एक मूल्य हे तत्व आमलात आणले पाहिजे. जोपर्यंत सामाजिक लोकशाही अर्थहीन आहे तोपर्यंत डॉ.आंबेडकरांच्या मते राजकीय क्षेत्रात व्यक्तींवर जेवढा अन्याय होतो त्यापेक्षा अधिक अन्याय सामाजिक क्षेत्रात होतो. राजकीय क्षेत्रात अन्यायाची तीव्रता जेवढी असते त्यापेक्षा अधिक पटीची तीव्रता ही सामाजिक क्षेत्रात असते.

डॉ.आंबेडकरांच्या लोकशाही विचारात मानवी हक्कांना व त्यांच्या संरक्षणानाही महत्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. त्यांना लोकशाही निर्माण होण्यासाठी सामाजिक लोकशाही असणे आवश्यक वाटते. त्यांच्या मते लोकशाही शासन प्रकार लोकशाही समाज रचना गृहीत धरीत असतो. सामाजिक लोकशाही अस्तित्वात असल्याशिवाय लोकशाहीचा औपचारीक सांगाडयाला मुळीच किंमत नसते उलट तो सांगाडा अप्रस्तुतच वाटतो केवळ एका व्यक्तीला एक मत देऊन सामाजिक लोकशाही निर्माण होत नाही. सामाजिक लोकशाहीत दोन गोष्टींचा अंतर्भाव होतो. पहिली सहबांधवांबद्दल सन्मान आणि समभाव आणि दुसरी ताठर अशा सामाजिक बंधनांपासून मुक्त अशी सामाजिक रचना ! एक व्यक्ती एक मत यापेक्षा एक व्यक्ती एक मूल्य तत्व अधिक योग्य वाटते. डॉ.आंबेडकरांच्या मते या परिस्थितीत आधी परिवर्तन घडून आले पाहिजे. सर्वांच्या किमान प्राथमिक गरजा भागल्या पाहिजे. सर्वांना समाज गरजा, समान दर्जा जीवनात प्राप्त झाला पाहिजे तरच या देशात यशस्वी लोकशाही उभी राहू शकेल. लोकशाही या शासन प्रकारातही आंबेडकरांना संसदीय लोकशाही अधिक पसंत आहे.

व्यापक समाजवाद ही माणसांना समपातळीवर आणणारी प्रक्रिया आहे. यामध्ये चातुवर्ण आणि जातीव्यवस्थेला स्थान नाही. येथे श्रमविभागणी मान्य केली असली तरी श्रमिकांची विभागणी हा समाजवाद मान्य करीत नाही. समाजवादाच्या यशस्वीतेसाठी डॉ.आंबेडकरांचा व्यापक समाजवाद सामाजिक व धार्मिक क्षेत्रात अंहिसात्मक आणि नैतिक मार्गांचा अवलंब करतो. या समाजवादाला वर्गसंघर्ष मान्य नाही. डॉ.आंबेडकरांना अपेक्षित असलेला समाजवाद संविधानिक आणि सनदशीर मार्गांवर विश्वास ठेवतो. शांततेच्या मार्गाने समन्वय साधण्यावर तो भर देतो. क्रांतीद्वारे भांडवलशाही संपुष्टात आणणे सर्वाधिकारशाही अमलात आणण्यापेक्षा शांततेच्या मार्गाने भांडवलशाही संपुष्टात आणून समानतेच्या तत्वांवर सर्वांची समान अधिकारशाही प्रस्थापित करणे आंबेडकरांना अभिप्रेत आहे. त्यांचा समाजवाद समाजातील प्रत्येक व्यक्तीचा सर्वांगीण विकास साध्य करण्यावर भर देतो.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे श्रेष्ठत्व**

डॉ.आंबेडकरांनी एका सामाजिक क्रांतीला चालना दिली. त्यांचे उत्तुंग व्यक्तीमत्व आणि उदंड व्यासंग यांना देशातील सामाजिक क्रांतीच्या इतिहासात तोड नाही. त्यांनी राज्यसत्तेला अंतिम ध्येय न मानता समाजविकासाचे साधन मानले आहे. दलितांचा कैवारी, भारतीय राज्यघटनेचा शिल्पकार, अहिंसात्मक मार्गांचा उपासक, सुधारणावादी लोकशाही शासनाचा कट्टर पुरस्कर्ता, जातीयता आणि अस्पृश्यतेचा विरोधक, अंधश्रध्देचा निर्मुलक, राष्ट्रीयतेचा पुजारी, थोर विचारवंत आदी विश्लेषणांनी त्यांचा यथार्थ गौरव करण्यात येतो.

भारतीय घटनेचा शिल्पकार म्हणून गौरविल्या जाणाऱ्या या थोर विचारवंताच्या महान राष्ट्रसेवेप्रती कृतज्ञता त्यांच्या जन्मशताब्दी महोत्सवाच्या प्रारंभाचा योग साधून १४ एप्रिल १९९० रोजी त्यांना मरणोत्तर भारतरत्न हा सन्मान प्रदान करण्यात आला. भारतीय संविधान निर्मिती करतांना स्वत:च्या वैयक्तिक भावनांची अभिव्यक्ती त्यांनी संविधानात कोठेही उमटू दिली नाही. ही बाब त्यांची व त्यांच्या राजकीय विचारांची थोरवी स्पष्ट करते.

**समारोप**

डॉ.आंबेडकरांचे जीवनकार्य अलौकिक व अनन्य साधारण असे आहे. भारतातील जातीव्यवस्था व अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर केलेले प्रयत्न वाखाणण्याजोगे आहे. भारतात आढळून येणारी सामाजिक तसेच आर्थिक विषमता नष्ट करुन समता, न्याय व राष्ट्रीय एकात्मता प्रस्थापित करण्यासाठी राजकीय लोकशाहीबरोबर सामाजिक तसेच आर्थिक लोकशाही प्रस्थापित करण्याचे उद्दीष्ट त्यांनी निश्चित केले होते. दीन–दलितांविषयी त्यांना असणाऱ्या आपलेपणातून सामाजिक संबंधांची पुनर्रचना मानवी मूल्यांच्या संदर्भात केली जावी म्हणून त्यांनी सर्व स्तरातून प्रयत्न केले. भारताची औद्योगिक प्रगती व्हावी म्हणून गरीब कामगार, शेतकरी कष्टकरी यांना विकासाची समान संधी मिळावी, शेतीचे आधुनिकीकरण घडवून आणावे यासाठी त्यांनी राज्यसमाजवादाचा पुरस्कार करुन सामाजिक व आर्थिक विषमतेला पायबंद घालण्याचा प्रयत्न केला. घटना समितीचे सदस्य व मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी भारतीय घटनेत दलित तसेच अस्पृश्य व अनुसूचित जाती जमातीच्या हितरक्षणासाठी स्वतंत्रपणे केलेल्या तरतुदी अस्पृश्यांच्या सामाजिक पुनरुत्थनास लाभप्रद आशा आहे. याशिवाय विविध जाती, धर्म, पंथ, प्रदेश, भाषा अशी विविधता असणाऱ्या भारतासाठी त्यांनी दिलेले योगदान वैशिष्ट्यपुर्ण आहे. डॉ.आंबेडकरांनी केलेल्या उदारमतवादी विचारांचा पुरस्कार हे त्यांच्या विचारांचे वैशिष्ट्य असून, समतेच्या विचारांनी प्रभावित होऊन त्यांनी स्विकारलेला बौध्द धर्म ही भारतातील सर्वात मोठी तसेच अहिंसक तत्वाने घडून आलेली सामाजिक क्रांती असून या पार्श्वभूमीवर हिंदु–धर्म व हिंदु समाजरचनेतील दोषांचे त्यांनी केलेले विवेचन हे सामाजिक परिवर्तनाचे मुख्य स्त्रोत बनले आहे.

भारतीय संविधानाचे शिल्पकार, स्वातंत्र्याचे कैवारी, लोकशाहीचे पुरस्कर्ते व सामाजिक चळवळीचे प्रमुख प्रणेते म्हणून डॉ. आंबेडकरांना भारतीय समाज विशेष करुन अस्पृश्य समाज कायमच स्मरणात ठेवणार आहे.

**संदर्भ**

१) प्राचार्य डॉ.पी.डी.देवरे – भारतीय राजकीय विचार – प्रशांत पब्लिकेशन
२) डॉ.बी.एस.निकुंभ भारतीय राजकीय विचार – प्रशांत पब्लिकेशन
३) स.मा.गर्गे – सुगम राज्यशास्त्र – अनिरुध्द पब्लिशींग हाऊस.
४) श.गो.देवगांवकर – राजकीय विचारवंत – श्री साईनाथ प्रकाशन.
५) प्रा.डॉ.व.गो.नांदेडकर – राजकीय विचार आणि विचारवंत – डायमंड पब्लिकेशन.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची समाजक्रांती विषयी भूमिका

**– प्रा. अरुण अवचितराव पाटील**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख
अ.यु.क.कें, संचलित, कला महिला महाविद्यालय, अनमोल नगर, देवपूर, धुळे

**प्रस्तावना**

आधुनिक काळातील एक थोर विचारवंत झुंजार नेते, प्रभावी समाजसेवक आणि प्रकांड पंडित व घटनातज्ञ म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. सामाजिक जीवनात ते बाबासाहेब आंबेडकर या नावानेच परिचित आहेत. शाळेत शिक्षण घेत असतांना त्यांना अस्पृश्य जातीचे म्हणून खूपच त्रास सहन करावा लागला. अपमान व अवहेलना यांना सामोरे जावे लागले. या सर्व घटनांचा त्यांच्यावर परिणाम झाला. सयाजीराव गायकवाड यांच्या मदतीने अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात भारतातील जातींची वाढ व उत्पत्ती या विषयावर संशोधन करुन प्रबंध सादर केला. भारतात येऊन बडोदा येथे लष्करी सचिव म्हणून कार्य करतांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. हयामुळेच डॉ. आंबेडकरांनी वेगळया मार्गाचा अवलंब करण्याचे ठरविले. त्यासाठी मुकनायक व बहिस्कृत भारत सारखे वृत्तपत्रे सुरु करुन समाज क्रांतीचे रणसिंग फुंकले.

**कायद्याचे अभ्यासक डॉ. आंबेडकर**

इग्लंडमध्ये कायद्याची पदवी प्राप्त करुन भारतात बॅरिस्टर म्हणून कार्याला सुरुवात केली खरी परंतू इथेही अस्पृश्यता त्यांचा पाठपुरावा करीतच होती. राष्ट्रीय काँग्रेसने अस्पृश्यांच्या विकासासाठी तसेच अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी जे कार्य सुरु केले होते त्यात बाबासाहेबांनी काँग्रेसच्या कार्याला मदत करावी. असे आवाहन केलेले दिसते. असे असले तरी स्वत:च पुढाकार घेऊन बाबासाहेबांनी अस्पृश्यतेविरुध्द रचनात्मक पध्दतीने चळवळी उभारल्या. यातूनच त्यांना नवी ओळख मिळाली. समाजक्रांतीकारक बाबासाहेब अविश्रांतपणे कार्य करीत होते. समाज जागृतीवर अधिक भर देत होते.

इ.स. १९२७ मध्ये त्यांची मुंबई प्रांताच्या कायदेमंडळाचे सदस्य म्हणून नियुक्ती झाल्यानंतर सायमन कमिशनसमोर साक्ष देऊन अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केलेली दिसते. तर १९३० मध्ये इंग्लंडमध्ये झालेला गोलमेज परिषदेला उपस्थित राहिले. राजकीय सुधारणासाठी एका आघाडीवर लढत असतांना सामाजिक सुधारणासाठी सुध्दा संघर्ष सुरुच होता. मनुस्मृतीचे दहन, महाडच्या चवदार तळयाचा सत्याग्रह, नाशिक येथील काळाराम मंदीर प्रवेश सत्याग्रह असे अनेक आंदोलन करुन जनजागरण केले.

**बाबासाहेबांची लोकशाही विषयक भूमिका**

डॉ. बाबासाहेब लोकशाहीचे पूरस्कर्ते होते. सर्व शासन प्रकारात लोकशाही हा शासनाचा उत्तम प्रकार असल्याचे मत बाबासाहेबांचे होते. त्यांना संसदीय लोकशाही बद्दल आदर होता. परतू भारतातील सामाजिक, राजकिय, आर्थिक परिस्थितीचा विचार करता भारतात संसदीय लोकशाहीच्या अशा आड येणाऱ्या अनेक घटक असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. कारण याची जाणीव त्यांना होती. त्यामुळे समाजाचे आधूनिकीकरण आणि लोकशाहीकरण या प्रक्रिया विलक्षण संथ असतील. असे त्यांनी भाकित केले होते. आणि त्यामुळे जनतेला स्वातंत्र्य, संपत्ती आणि सुख लगेच मिळणार नाही. त्यासाठी स्वातंत्र्याबरोबर आर्थिक आणि सामाजिक क्षमता निर्माण करणे योग्य व लाभदायक ठरणार असल्याची खात्री बाबासाहेबांना वाटत होती.

समानता व लोकशाही शासन प्रणाली यांना अडसर ठरणाऱ्या सर्व बाबींचा आपण विरोध करायला हवा. अशी भूमिका आंबेडकरांनी मांडलेली होती. व्यक्तिपूजा व व्यक्तिनिष्ठा हया लोकशाहीस मारक असतात. या संदर्भात ते आपल्या अनुयायांना म्हणाले. व्यक्तिपूजा आणि व्यक्तिनिष्ठा या दोन्ही बाबी समूळ नष्ट केल्या पाहीजे. नाहीतर त्या तुमच्या सर्वनाशास कारणीभूत ठरतील. तुमची सुरक्षा आणि मुक्ति याविषयी आपण एखाद्या व्यक्तीवर पूर्णत: विसंबून राहता कामा नये. त्यातून परावलंबन वाढेल आणि कर्तव्यात कसूर केल्यासारखे होईल हे सर्व टाळले पाहिजे.

**व्यक्तीने गुणांचा विकास साधावा**

लोकशाहीमुळे व्यक्तीच्या अंगी असलेल्या गुणांचा विकास होत असतो. लोकशाही शासन प्रणालीत व्यक्तीला संधी मिळत असते. त्यामुळे अधिक व्यापक प्रमाणात दृष्टिकोन बदलत असतो. व्यक्तीचा समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आदर्श होऊन जबाबदारीची जाणीव वाढीस लागते. लोकशाहीत होणारे परिवर्तन हे शांततापूर्ण मार्गाने होत असतो हा लोकशाहीचा मोठा आधार असून फायदा ही आहे. कारण निरनिराळया समस्या बद्दल लोक चर्चा करीत असतात. तसेच आपली मते परखड व तेवढयाच स्पष्टपणे मांडतात. संसदेमध्येही हया चर्चा होत असतात. लोकांच्या सर्व समस्यांचे निराकरण करण्याचे ते प्रमुख व सर्वात मोठे चर्चा केंद्र आहे. लोकशाही शासन प्रणालीमध्ये चर्चेच्या माध्यमातून निर्णय प्रक्रिया ही संयुक्तिक जबाबदारी ठरते. डॉ. बाबासाहेब हे संसदीय लोकशाहीच्या यशासाठी काही महत्वपूर्ण घटकांची चर्चा करतात त्यात १) सामाजिक लोकशाही २) देशप्रेम ३) निरोगी विरोध ४) राष्ट्रीय हिताला महत्व ५) घटनात्मक मार्ग ६) अल्पसंख्याक संरक्षण ७) लोकांचे चारित्र्य ८) व्यक्ती स्वातंत्र्य याच प्रमाणे निरक्षता दूर करणे, अंधश्रध्दा टाळणे, संघर्षाची तयारी असणे, जातीयवादाला खतपाणी न घालणे, आर्थिक समतेसाठी प्रयत्न, ऐक्य भावना निर्माण करणे, सहिष्णूता वाढविणे, त्याचबरोबर लोकांमध्ये जागरुकता वाढविण्यासाठी प्रत्येकाने परिश्रम घेणे इ. बाबींवर प्रकाश टाकलेला आहे.

**राष्ट्रवादाविषयी विचार**

डॉ. बाबासाहेबांनी राष्ट्र आणि राष्ट्रवाद हयाविषयी महत्वपूर्ण विचार मांडले आहेत. त्यांनी लिहिलेले विविध ग्रंथ संपदा हा फार अनमोल

ठेवा आहे. राष्ट्रवाद ही एक व्यक्तिनिष्ठ भावना असून तिचा संबंध मानवी मनाशी असल्याचे मत बाबासाहेबांचे होते. आर्थिक विषमता, तसेच सामाजिक उच्चनिच्चता आणि तत्सम विभाजनकारी भेदभावावर मात करुन समाजाचे ऐक्य करण्याचे सुप्त सामर्थ्य राष्ट्रवादाच्या ठिकाणी असते. अशी भूमिका आंबेडकरांनी मांडलेली दिसते. राष्ट्र आणि राष्ट्रवाद यांचा संबंध देशभक्तीच्या आणि एकात्मतेच्या भावनेशी जुळलेला असतो. आर्थिक व वर्गदास्य दरिद्रयातून मुक्त होण्यासाठी समानसंधी मिळायला हवी. अशी भूमिका घेतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर दिसतात.

**समाज परिवर्तनातून समानता**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना समाज परिवर्तन अपेक्षित होते. त्यांचे समाज चिंतन प्रागतिक आणि परीपूर्ण होते. समाजाच्या सर्वांगीण विकासाकरिता आंबेडकरांनी स्त्री शिक्षणावर भर दिलेला होता. स्त्रीयांना शिक्षण मिळाल्यास कुटूंबाचा खरा विकास होईल. आणि म्हणून हिंदू कोड बीलाच्या माध्यमातुन त्यांनी हिंदू स्त्रीयांचे कल्याण साधण्याचा प्रयन्त केलेला दिसतो. स्त्री–पुरुष समानता असावी असे आंबेडकरांना वाटत होते. स्त्री–पुरुष समाता प्रस्थापित होण्यासाठी स्त्री शिक्षणाचा मार्ग त्यांनी सांगितला आहे. स्त्रीयांना समाजात वा कुटूंबात उत्तम वागणूक व समान दर्जा मिळाला पाहिजे यावर भर दिला होता. कारण त्यांना महिलांचे प्रश्न महत्वाचे वाटत होते. समानतेच्या तत्वावर समाज निर्मिती म्हणजे केवळ पुरुषात समानता नव्हे तर स्त्री पुरुष समान होय. स्त्रीयांची प्रतिष्ठा, त्यांचा मान सन्मान त्यांना महत्वाचा वाटत होता. डॉ. आंबेडकरांच्या मते पूर्णत: समानता आणता येणार नाही. तशी अपेक्षा करणे उचित नसले तरी किमान सर्वांना समान संधी ही व्यक्तिविकासासाठी देण्यात यावी. एवढेतर निश्चितपणे करता येईल. अशी ठाम भूमिका त्यांची होती. जाती व्यवस्था केवळ आंतरजातीय विवाहाने व सहभोजनाने समाप्त होणार नाही. जाती व्यवस्था खोलवर रुजलेली आहे व त्यात बदल घडवूण आणण्यासाठी राष्ट्रीय पातळीवरुन सर्व स्तरांवर प्रयत्न करावे लागतील. कारण बंधू भावाची कल्पना असलेला समाज हाच लोकशाहीची हमी देऊ शकतो. लोकशाही जीवन जगण्याची एक आदर्श पध्दती असल्याची भावना डॉ. आंबेडकरांची होती.

**निष्कर्ष**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना स्वातंत्र्य, समता, बंधूभावावर आधारित समाज रचना हवी होती. कारण आदर्श समजा हा स्थितीशील नव्हे तर गतिशील असातो. समाजातील कोणत्याही घटकात झालेल्या बदलास अनुसरुन स्वत:त बदल करण्याची क्षमता त्यात निर्माण व्हावी कारण लोकशाही ही वृत्ती सर्वांनी कसे वागावे हे शिकवित असते.

**संदर्भ**

१. पाटील वा.भा. – आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव २००९, पृ.क्र. २०७,२०८,२१२,२१३, २१४,२१६,२४२,२४३,२४५

२. रायपुरे विनोद सौंदाणकर, गुंजाळ विष्णू, सोन कांबळे निकम (संपा.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्र उभारणीत योगदान, २०१७ पृ. २४१ ते २४५.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गौरव ग्रंथ, पृ.३९,४०,१२५,१२६

# भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने

**– प्रा. डॉ. सौ. दिपीका अनिल चौधरी**
राज्यशास्त्र
मु. पो. कुसुंबा. ता. जि. धुळे

भारताने स्वातंत्र्यानंतर लोकशाही शासन पध्दती स्विकारली. ७० वर्षाच्या अनुभवानंतर लोकशाहीपुढे काही आव्हाने उभी ठाकलेली दिसतात. त्यांचा थोडक्यात पुढील प्रमाणे आढावा घेता येईल.

लोकशाही हा स्वयंशासनाचा पुकार आहे. मतदार सजग, सुजाण असला पाहिजे. योग्य पात्र उमेदवार निवडण्याची कुवत त्याच्यात असली पाहिजे. शासनावर, प्रतिनीधींवर त्याला अंकुश ठेवता आला पाहिजे. मात्र भारतातील मतदार हे निरुत्साही, उदासीन असल्याचे जाणवते. कोणताही पक्ष सत्तेवर आला तरी आपल्या परिस्थित काहीही बदल होणार नाही या भावनेने मतदानाची टक्केवारी घसरते. जात, धर्म, प्रदेश, पैसा, दहशत इ. घटक प्रभावी ठरुन मतदान होते. त्यामुळे योग्य प्रतिनीधी निवडले जात नाहीत. प्रतिनीधींवर जनतेचे कोणतेही नियंत्रण राहात नाही. त्यामुळे कायदेमंडळामध्ये सखोल चर्चा, विचार विनीमय या ऐवजी आरडा ओरडा, गोंधळ, आरोप प्रत्यारोप यांना महत्व येते. त्यांचा विकास प्रक्रियेवर विपरीत परीणाम होतो.

विषमता आणि दारीद्र्य हे भारतीय लोकशाहीपुढे असलेले मोठे आव्हान आहे. भारताने राजकीय लोकशाही स्थापन केलेली आहे. पण सामाजिक आणि आर्थिक लोकशाही स्थापन झाल्याशिवाय ती टिकणार नाही. जाती व्यवस्था, उच्चनीचता अजूनही टिकून आहे. २५% ते ३०% लोक दारीद्र्य रेषेखाली जीवन जगतात. अज्ञानी निरक्षद, दारीद्री, उपेक्षित, वंचित मागासवर्गीय लोकांपर्यत विकासाचे फायदे पोहोचविले नाहीत तर लोकशाहीला गंभीर स्वरुपाचा धोका निर्माण होऊ शकतो.

भारतात अनेक धर्म, पंथ, जाती, भाषा, लिपी, संस्कृती, प्रदेश आहेत. त्यांच्यात भेद आहेत. तसेच श्रीमंत, गरीब, श्रेष्ठ, कनिष्ठ, शहरी – ग्रामीण, शिक्षित – अशिक्षित इ. भेद आहेत. लोकांना या घटकाचा अभिमानआहे. मात्र याचा अतिरेक संघर्षाचे कारण ठरु शकतो. धार्मिक, जातीय, भाषिक दंगली घडलयाची उदाहरणे आढळतात. या सर्व विविधतेमध्ये एकात्मता निर्माण करुन लोशाही भक्कम केली पाहीजे.

निवडणूका हे लोकशाहीचे अविभाज्य अंग आहे. नागरीकांना आपले प्रतिनीधी निवडता यावेत. यासाठी ठराविक काळानंतर निवडणूका होतात. निवडणॅकीत राजकीय पक्ष सहभागी होतात. मतदार संघासाठी पक्षाचे उमेदवार निश्‍चित करतात. उमेदवार ठरवितांना त्याचे चारित्र्य, वक्तृत्व मतदार संघातील कार्य, पक्षनिष्ठा, सचोटी, प्रतिमा, बुध्दीमत्ता इ. घटकांचा विचार न करता फक्त त्याची निवडणूक येण्याची क्षमता घटकाचा विचार करतात. त्यामुळे उमेदवाराची संपत्ती, मनगटशाही निवडणूक येण्यासाठी सर्व वैद्य – अवैद्य मार्ग वापरण्याचे धाडस यांना महत्व येते. आपली भुमिका मतदारांना वैचारीक दृष्टीकोनातून पटवून देण्याऐवजी विरोधकांवर वैयक्तीक टीका, आरोप केले जातात. खोटया– नाटया गोष्टी सांगिल्या जातात. चारीत्र्यहनन केले जाते. प्रचाराची पातळी खालावते. लोकांना भुलविणारे, बनविणारे, संधीसाधू, थापा मारणारे, स्वप्न दाखविणारे निवडणूक येतात. गुणी, बुध्दीमान, अभ्यासू माणसे निवडणूकीपासून दूर राहतात. त्यांचा अनुभवाचा बुध्दीचा देशाला फायदा होत नाही. निवडणूकामध्ये प्रचंड खर्च होतो. तसे उमेदवार खज्या बहुमताने निवडून येत नाहीत. या सर्व गोष्टींमध्ये सुधारणा झाली पाहीजे.

भारतीय समाज विभूती पुजा करणारा आहे. पंडित नेहरु, इंदिरा गांधी, अटल बिहारी वाजपेयी, नरेंद्र मोदी, एम. जी. रामचंद्रन, एन. टी. रामाराव, जयललिता इ. पुजा करणारा त्यांच्यासाठी जीव देण्यास तयार होणारा त्यांना तत्वांपेक्षा, देशापेक्षा मोठे मानणारा देवत्वाच्या पातळीवर नेवून बसविणारा अनुयायी वर्ग आहे. अशा नेत्यांवरील टिका अनुयायी सहन करत नाहीत. त्यामुळे हुकूमशाहीला पोषक वातावरण निर्माण होते. थोर नेत्याबद्दल कृतज्ञता आदर बाळगावा, पण त्यांच्या पायाशी आपले स्वातंत्र्य गहाण टाकू नये. नेता चुकत असेल तर टिका करण्याचे त्याला योग्य मार्गावर आणण्याचे कर्तव्य नागरीकांनी पार पाडणे लोकशाहीत अपेक्षीत आहे.

लोकशाहीच्या मार्गात भ्रष्टाचार हा मोठाच अडथळा आहे. स्वातंत्र्यामुळे व सुविधांमुळे चारीत्र्य व नितीमत्ता यांचा दर्जा उंचावण्याची अपेक्षा होती. परंतू प्रत्यक्ष व्यवहारात खोटी माहीती, खोटी अश्वासने देवून लोकांची दिशाभूल केली जाते. नैतीक मुल्यांना महत्व दिले जात नाही. अनेक कायदयांमुळे भ्रष्टाचाराला उत्तेजन मिळते. पक्षीय राजकरणामुळे भ्रष्टाचार वाढतो. निवडणूकीमध्ये मतदार विकत घेतले जातात. मतांचा व्यापार केला जातो. निवडणूकीतील खर्च भरुन काढण्यासाठी निवडणून आलेले प्रतिनीधी अयोग्य मार्गाचा वापर करण्यास कचरत करत नाहीत. नैतिक मुल्ये अबाधित राखणे लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक आहे. परंतू सत्तास्पर्धा, सत्तेचे राजकारण, भ्रष्टाचार यांमुळे त्याकडे दुर्लक्ष होते.

भारत हा पूर्वपार क्षहिष्णू प्रवृत्तीचा देश आहे. अनेक आक्रमणे, अनेक विचार, अनेक आघात पचवून हा देश ताठ उभा आहे. धर्मनिरपेक्षतेचा स्विकार भारताने केलेला आहे. मात्र अलीकडील काळात धर्माच्या आधारे संघटन करण्याचे प्रकार वाढीस लागलेले आहेत. सामाजिक जीवनात धर्माला महत्व दिले जात आहे. धर्माच्या आधारे मतदाराचे धृवीकरण करण्याचा प्रयत्न होत आहे. अभ्यासक्रम तयार केले जात आहे. माणसापेक्षा जनावरांना अधिक महत्व दिले जात आहे. एकूणच धर्मांधता भारतीय लोशाहीसाठी धोकेदायक ठरु शकते.

**निष्कर्ष**

भारतातील लोकशाहीपुढे वरीलप्रमाणे अनेक आव्हाने असली तरी त्यांना तोंड देत लोक शाहीची वाटचाल सुरु आहे. लोकशाहीपेक्षा चांगला किंवा लोकशाही इतका चांगला दुसरा कोणताही शासन प्रकार सध्या अस्तित्वात नसल्याने लोकशाहीला पर्याय नाही. म्हणून प्रत्येक भारतीयाने स्वातंत्र्य समता, बंधूता, न्याय यावर विश्वास ठेवून, अहिष्णूता बाळगून जगा आणि जगू दया हे तत्व स्विकारुन लोकशाहीच्या यशासाठी सदैव प्रयत्नशील राहिले पाहीजे.

**संदर्भ**

१) भारतीय लोकशाही प्रक्रिया, देशमुख अलका, साईनाथ प्रकाशन ,नागपूर,
२) राजकीय विचारांचा इतिहास, ना. य. डोळे, कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे,
३) राजकीय विचार प्रणाली, प्रा. पी. डी. देवरे, प्रा. डॉ. एस. एम. विसपुते, प्रा. डॉ. डी. एस. निकुंभ, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.
४) राजकीय सिध्दांत आणि विश्लेशन, भा. ल. भोळे, पिंपळापुरे ॲण्ड क. पब्लिशर्स, नागपुर.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दलित चळवळ

– प्रा. डॉ. अनिल दिगंबर पवार
एन. एन. सी. कॉलेज
कुसुंबा

भारतीय समाजातील एक मोठा घटक शतकानुशतके अमानुष्य अन्यायाचे भक्ष्य बनलेला होता. तो म्हणजे उच्चवर्णीयांनी अस्पृष्य मानलेला दलित वर्ग पाश्चात्य शिक्षणच्या प्रसाराबरोबर भारतात प्रबोधनाचे युग सुरु होताच दलित वर्गावर होत असलेल्या अन्यायाची खंत काही समाज सुधारकांना तीव्रतेने वाहू लागली. भारतीय समाजातील हया दुर्लक्षित गटाचा विकास घडवून आपल्या खेरीज एकूण भारतीय समाजाची प्रगती पुरापास्त ठरेल याची जाणीव होवून दलितावरील अन्यायाला कारणीभूत असलेल्या जाती प्रथेविरुध्द काही विचारवंतांनी १९२० पूर्वीच टिकास्त्र उगारले होते. थिऑसॉफिकल सोसायटी, आर्यसमाज, सत्यशोधक समाज, इ. संघटनांनी जाती प्रथेचे निर्मुलन करण्यासाठी अविरत प्रयत्न केले. तसेच महाराष्ट्रात महात्मा ज्योतीबा फुले व त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी दलित वर्गात शिक्षण प्रसाराचे व्रत घेतले. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी १९०६ साली महाराष्ट्रात डिप्रेस्ड क्लास मिशनची स्थापना करुन दलितांचे कार्य सुरु केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबई प्रांतातील दलित चळवळीचे नेतृत्व करण्यास साधारणत: १९२० पासून प्रारंभ केला. हया काळात त्यांचा भर प्रामुख्याने सामाजिक विकासासाठी दलितांना जागृत आणि संघटित करण्यावर व शिक्षण प्रसारावर होता. अस्पृश्य मानले गेलेल्या समाजाची अवहेलना गेल्या शेकडो वर्षापासून चाललेली होती. आणि अस्पृश्य समाज अगतिक होऊन ती सहन करीत होती. बाबासाहेबांनी या सामाजिक अन्यायाविरुध्द अंदोलन उभारायचे ठरविले. या अंदालनाचा पहिला टप्पा म्हणून त्यांनी जानेवारी १९२० मध्ये मुकनायक हे मासिक काढले. अस्पृश्यांवरील अन्यायास वाचा फोडण्यासाठी काढलेल्या या वृत्तपत्रास पाहिले. सहाय्य राजर्षी शाहु महाराजांनी दिलेले होते.

दलितांवरील अन्याय दूर करण्यासाठी १९२४ साली बहिष्कृत हितकारीणी सभेचे त्यांनी पुनरुज्जिवन केले. दलितांना कायदेशिर मदत केली. भायखळा येथे वाचनालय उघडले दलित विद्यार्थ्यांसाठी क्रिडा मंडळे सुरु केली. विद्यार्थी वर्गात जागृती आणण्यासाठी बहिष्कृत विद्यार्थी संभेलनाचे आयोजन केले. दलितांवरील सामाजिक अन्याय दूर करण्यासाठी सवर्गातही विचारमंथन व्हावे या हेतूने १९२८साली त्यांनी समाज समता संघाची स्थापना केली. या संघातर्फे तरुण मंडळींनी सहभोजनाचा कार्यक्रम आयोजित केला. असत. संदेश पत्रकाराचे संपादक अ.ब. कोल्हटकर कर्णिक ही मंडळी त्यात सहभागी झाली. याच मंडळामार्फत १९२८ मध्ये साली पाचशे महार मुलांचा उपनयन समारंभ आयोजित करण्यात आला.

परंतु फक्त लेखणी चालवून शतकानुशतके गुलामगिरीत खितपत पडलेल्या समाजाला जाग येणे अवघड आहे. हे ओळखून बाबासाहेबांनी जन अंदोलनाचा मार्ग स्विकारला आपल्या अस्पृश्य बांधवांची संघटना करुन संवर्ग हिंदूंची सामाजिक मक्तेदारी मांडण्यासाठी त्यांनी चळवळी उभारल्या सन. १९२७ साली अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवठयावर पाणी भरण्याचा हक्क मिळाला पाहिजे. यासाठी अंदोलन सुरु केले. कुलाबा जिल्हयातील मांडलेला महाड येथील चवदार तळाचा सत्यागृह हा याच वेळी झाला. यावेळी बाबासाहेबांनी केलेले भाषण त्यांची अस्पृश्यबद्दलची तळमळ व अन्यायाविरोधी चीड व्यक्त करणारे आहे. बाबासाहेब म्हणतात मित्रहो आपण माणसासारखी माणसे आहोत तरी आपणास जनावरांचे जिणे कंठावे लागत आहे. ही मोठी नामुष्कीची गोष्ट आहे. तुम्ही हाडामासाचे हिंदू आहात तरी तुम्हास पाणवठयावर पाणी मिळत नाही. देवळात जावून देवाचे दर्शन घेता येत नाही. किंवा सार्वजनिक ठिकाणी दिमाखाने बसता येत नाही. हा अन्याय सहन करता कामा नये. तुम्ही स्वत:च्या आपल्या पायावर उभे राहून आपल्या हक्कासाठी झगडले पाहिजे. त्यासाठी तुमची पिढी खलास झाली तरी बेहत्तर या सत्याग्रहाच्या वेळी सवर्ण हिंदूंनी अस्पृश्यांवर हल्ला केला. पुढे नाशिक येथील काळाराम मंदीरातील अस्पृश्य प्रवेशाबद्दल बाबासाहेबांनी असाच एक सत्याग्रह मार्च १९३० साली केला. याही वेळी सत्याग्रहांवर हल्ला झाला. पुढे १९३५ साली हे काळाराम मंदिर अस्पृश्यांसाठी खुले झाले. व सन. १९३७ साली बाबासाहेबांनी चवदार तळयाची केस हायकोर्टात जिंकली.

हिंदूधर्मांमध्ये विषमता व अन्याय ज्या धर्म ग्रंथांनी जोपासला त्यापैकी मनुस्मृतीवर आधारीत होती. तेव्हा अशा मनुस्मृतीचे दहन करण्याचा धाडशी कार्यक्रम बाबासाहेबांनी महाडच्या सत्याग्रह परीषदेमध्ये पार पाडला. अस्पृश्यांच्या अन्याय अत्याचाराविरुध्द लढा चालू असतांना बाबासाहेबांनी इंग्रज सरकारच्या पाठिंब्याची अनेकवेळा अपेक्षा केली आहे. पण याचा अर्थ इंग्रजांच्या शोषणाची त्यांना जाणीव अथवा चीड नव्हती असे नाही. एके ठिकाणी ते म्हणतात आंग्लाई व ब्राम्हणाई या हिंदी जनतेच्या अंगाला लागलेल्या दोन जळवा आहेत. त्या एकसारख्या हिंदी लोकांच्या स्वत:चे शोषण करीत आहेत. आंग्लाई सतीने लोकांना देहाने गुलाम बनवले. तर ब्राम्हणाईने जनतेच्या आत्म्याला गुलाम करुन ठेवले. आंग्लाईने हिंदूस्थानातील संपत्तीचे शोषण केले तर ब्राम्हणाईने स्वाभिमानासारख्या आत्मिक संपत्तीचे हरण केले.

समाजकारणाप्रमाणेच राजकारणातही बाबासाहेब अस्पृश्यांचे नेतृत्व करत होते. मुंबईच्या कायदेमंडळाचे सभासद म्हणून सरकारने त्यांची सन. १९२६ ते १९३६ या काळात नियुक्ती केली होती. राजकीय हक्काच्या संदर्भात त्यांनी आपल्या बांधवांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली होती. व तीन गोलमेज परीषदेत आपल्या समाजाचे

नेतृत्व करुन ती त्यांनी प्रभाविरीत्या मांडली होती. काँग्रेसवर सवर्णाचा प्रभाव असून आपल्या देशाला मिळालेल्या स्वतंत्र्याच्या हक्काचा सवर्णच उपभोग घेतील व दलितांवर असाच अन्याय चालू राहील. म्हणून बाबासाहेबांना स्वतंत्र मतदारसंघ हवा होता. सन. १९३२ च्या जातीय निवाडयाने बाबासाहेबांची ही मागणी मान्य झाली. पण महात्मा गांधींनी त्याविरुध्द आमरण उपोषण आरंभिले तेव्हा बाबासाहेबांनी मोठया अंतकरणाने मिळालेली सवलत हिंदू समाजाच्या व्यापक हिताच्या दृष्टिने सोडून दिली.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ते नेहरु मंत्रीमंडळात कायदामंत्री झाले. घटना समितीच्या मसुदा समितीचे ते प्रमुख होते. हिंदू कोड बिलाची निर्मीती ही त्यांनीच केली. शेकडो वर्षे माणूसकीच्या हक्कापासून वंचीत झालेल्या समाजातील एका नेत्याने या देशाला घटना व कायदा देवून भारताचा आधूनिक मनू ही पदवी सार्थ केली.

हिंदू धर्माच्या चौकटीत राहून आपल्या अस्पृश्य बांधवांचा कधीच उद्दार होणार नाही. अशी खात्री वाटल्यावरुन त्यांनी याच भुमीत पुर्वी वैभवशाली असलेल्या बौध्द धर्माचा आपल्या अनुयायांसह स्विकार सन. १९५६ साली केला. व हिंदू समाजकारणात नवा प्रवाह सुरु केला. त्यांनी जर ख्रिस्ती अगर मुस्लिम धर्म स्विकारला असता तर देशातील समाजकारणच नव्हे तर राजकारणास जातीय वळण लागले असते. बौध्द धर्माचेच पुर्नरुज्जिवन करण्यात बाबासाहेबांचा दुरदर्शीपणा व राष्ट्रहिताची कळकळच व्यक्त होते. बाबासाहेब विद्देचे भोगते होते. अखंड वाचन हा त्यांचा छंद होता त्यांच्या स्वत:च्या ग्रथालयातील ग्रंथाची संख्या २५ हजार होती. त्यांनी स्वत:कडे अनेक ग्रंथ लिहीले. ६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर बौध्दवासी झाले.

शेकडो वर्षे अन्याय, विषमता, पिळवणूक याच्या गर्तेत पडलेल्या अस्पृश्य वर्गाला वर काढण्यासाठी महात्मा फुलेंनी प्रथम संघर्ष पुकारला. या संघर्षाची ज्योत राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या हाती घेऊन मार्गक्रमण केली. आणि पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हया ज्योतीचा वारसा घेवून सर्व हिंदूस्थानावर अस्पृश्यांच्या उध्दाराची चळवळ उभारली आणि आपल्या लक्षावधी बांधवांना मुक्तीचा मार्ग दाखविला.

**संदर्भ**


१) आधुनिक भारताचा इतिहास - डॉ. अनिल कठारे प्र. ३४६

२) आधुनिक हिंदूस्तानचा इतिहास - डॉ. लयसिंग पवार, सौ. वसुंधा पवार, पृ. २८०,२८१,२८३,२८४.

३) आधुनिक भारताचा इतिहास - डॉ. सुमन वैदय , डॉ. शांता कोठेकर, पृ. ३३४,३३५.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रधर्माचे प्रणेते

– प्रा. रमेश आसाराम वाघ
अभय महिला महाविद्यालय
देवपूर, धुळे

आपली वसुंधरा ही अनेक रत्नांची जन्मदात्री आहे. पण एखाद्या महामानवाचे अवतरण म्हणजे इतिहासाची विशिष्ट अशी एक घटना असते. आपले उदात्त व्यक्तीमत्व, उत्कृष्ट व विद्रोही विचारसरणी, प्रभावपूर्ण कार्य यामुळे असा महामानव फक्त समकालीनच नाही, तर येणाऱ्या अनेक युवांसाठी आपल्या चरित्रगत वैशिष्टयांची छाप ठेवून जातो. त्यांचे व्यक्तीमत्व व त्यांची विचारसंपदा मानवजातीला मार्गदर्शकच ठरत असते. प्रभविष्णु व्यक्तीमत्वाचे स्वामी असलेल्या महामानवांना जन्म देण्यात ही भारतभूमी नेहमीच सुपीक राहिली आहे. अशा थोर ऐतिहासिक पुरूषांविषयी म्हणता येते की, इतिहासाच्या रंगमंचावर अशा थोर व्यक्ती जेव्हा जन्म घेतात तेव्हा दुसरी तत्वे पुरूषार्थविहीन वाटू लागतात. इतिहासाचा क्रम थांबतो. नायकाप्रमाणे भासणाऱ्या त्या थोर पुरूषांच्या प्रभावामुळे त्यांच्या मोहात पडून मुळ नाटकाचेच विस्मरण होते. भूतकाळाच्या रंगभूमिवर अशा अनेक व्यक्ती ह्या भारतभूमीत झालेल्या आहेत. ज्यात श्रीकृष्ण, थोर जातनीतिज्ञ चाणक्य, महात्मा बसवेश्वर , लो.टिळक, विवेकानंद, डॉ.हेडगेवार यांचा समावेश करता येतो. अशा थोरांच्या परंपरेतील एका थोर राष्ट्रपुरूषाचा विचार येथे करायचा आहे ते थोर राष्ट्रपुरूष म्हणजे स्वतंत्र भारताच्या घटनेचे मुख्य शिल्पकार,दलितांचे नव्हे तर सर्व भारतीयांचे नेते, लोकशाहीचे त्राते व मानवी स्वातंत्र्याचे कैवारी भारतरत्न डॉ.भिमराव रामजी आंबेडकर उपाख्य बाबासाहेब आंबेडकर होत. समाजाच्या अगदी तळाच्या थरात जन्मलेले डॉ.आंबेडकर अत्यंत कर्तृत्वसंपन्न, प्रज्ञावंत नेता म्हणून हिंदुस्थानातच नव्हे तर जगभर गाजले. त्यांची विचारसरणी विद्रोही होती तरी राष्ट्रधर्माला पोषक होती. त्यामुळे भारतीय लोकांना त्यांचे चरित्र व चिंतन स्फूर्तिदायक व प्रेरणादायक झाले आहे. त्यांनी आपल्या गाढ विद्वत्तेने, प्रचंड उद्योगशिलतेने आणि आपल्या बुध्दिप्रमाण्यवादी चिंतनाने खरी राष्ट्रीय वृत्ती ढळू न देता, सर्व मोहांना दूर सारून भारत भूमित लोकशाही तत्वांची प्रतिष्ठापना केली. राष्ट्रधर्माला झळ बसू न देता लोकसत्तानुवर्ती तत्वे मांडली व आचरली. त्यांच्या या गुणांची कदर करावी, त्यांच्या निस्पृह बाण्याला उपयुक्त असे राष्ट्रकार्य त्यांच्याकडून करून घ्यावे म्हणून प्रथम पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी डॉ.आंबेडकरांना स्वतंत्र भारताची घटना तयार करण्याचे काम दिले. आजवरच्या सवर्णीयांकडून झालेल्या अन्यायांचे परिमार्जन करण्याची संधी दिली. तुम्ही सिध्दांत ठरवा, नियम करा. नविन काळच्या मनूचेच कार्य एका थोर अस्पृश्य कायदेपंडीताला करायला सांगून सर्वथैव उचित असे कार्य नेहरूंनी केले. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जाऊ लागले. अशा थोर पुरूषाच्या राष्ट्रधर्मविषयक कार्याचे येथे अवलोकन करायचे आहे.

**राष्ट्र ही प्रथम निष्ठा**

डॉ.आंबेडकरांनी राष्ट्रधर्माला सोडून कोणतेही कार्य नाही. आपले राष्ट्र ही त्यांची प्रथम निष्ठा होती. त्यानंतरची अस्पृश्योध्दाराची होती. शिक्षणाच्या निमित्ताने ते त्या देशात गेले ती राष्ट्रे राष्ट्रीयत्वाच्या भावनेने भारावलेली होती. त्यामुळे येथील संस्काराने ते राष्ट्राभिमानी झाले. त्यांच्यावर आपल्या भारतीय संस्कृतीतील उज्ज्वल अंशाचा खोल ठसा उमटला होता. पुढे कटू अनुभव येऊनही त्यांच्या राष्ट्राभिमानात य:किंचितही न्यूनता आली नाही.

देश स्वतंत्र झाल्यावर आपल्या केवळ अस्पृश्य समाजाला केंद्रबिंदू ठरवून त्यांचाच फक्त विचार करता येणार नाही हे ते समजून होते. आपले स्वतंत्र राष्ट्र एकसंध, संपन्न व बलशाली कसे बनेल याचाच विचार त्यांनी केला. आपल्या राष्ट्राच्या घटनेने संविधानाने, सर्वांना न्यायाची हमी दिलेली आहे. ती प्रत्यक्षात उतरविण्याचा प्रयत्नाला ते लागले. देशाचे स्थैर्य व प्रगती यांना धक्के बसेल असे कृत्य न करण्याचा त्यांनी निश्चिय केला होता. उलट राष्ट्रउभारणीच्या किंवा नवसमाजनिर्मितीच्या कार्याला ते लागले. स्वातंत्र्यपुर्वकाळात देखील ते गांधी, नेहरू यांचे बरोबर नव्हते तरी हिंदूस्थानच्या स्वराज्याच्या मागणीला त्यांचा अंत:स्फूर्त पाठिंबा होता, इतरांप्रमाणेच दलितांनाही स्वातंत्र्याची गरज आहे असे सांगत. कारण स्वकीय शासन येईल तेव्हा आपल्या लोकांनाही सत्तेचा वाटा मिळेल असा आशावाद ते व्यक्त करीत. हा देश आपला आहे व या देशाच्या स्वातंत्र्यचळवळीचा इतिहास हा आपला इतिहास आहे असे सर्वांनीच मानले पाहिजे अशी त्यांची धारणा होती. त्यामुळे दलितोध्दाराची उत्कट ओढ असूनही राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या ध्येयवादानी भारलेल्या वेगवेगळया थरातील, वर्गातील, जातीतील ज्या हजारो लोकांनी त्यात भाग घेतला त्यात अनेक नि:स्वार्थी, सर्वस्वाची आहुती देणारे होते ह्याची पूर्ण जाणीव डॉ.आंबेडकरांना होती. स्वातंत्र्यानंतर अस्पृश्योध्दाराच्या कार्याला गती येईल असे त्यांना वाटत होते आणि ते खरेही ठरले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ते नेहरू सरकार व राष्ट्रीय कॉंग्रेसला सहकार्य देत होते. ते राष्ट्र उभारणीच्या कार्याला सहाय्यभूत ठरले होते. त्यातूनच घटना समितीने त्यांची केलेली नेमणूक व त्यांनी केलेले यशस्वी काम सर्वमान्य झाले आहे. अतिशय परिश्रमाने, चिकाटीने व विचार करून घटनेचा मसुदा तयार केल्यावर त्यांनी स्पष्ट शब्दात सांगितले होते की, ही माझी राष्ट्रसेवा आहे व माझा योग्य उपयोग करून राष्ट्राची सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल मी समितीचे आभार मानतो. सर्वांनीच त्यांच्या राष्ट्रीय कार्याची प्रशंसा केली.

पुढेही डॉ.आंबेडकरांना राष्ट्राच्या भवितव्याचीच चिंता होती म्हणून विचार करून घटना लिहिली. त्यावेळी त्यांनी असे म्हटले की आपले राष्ट्र आजपर्यंत गुलामीत राहिल्याने दुदैवी ठरले. ह्या राष्ट्राला आपले

स्वातंत्र्य गमावण्याची वेळ अनेकवेळा आली. पण त्याला कारण येथील जनतेच्या स्वत:च्याच देशद्रोहीपणाचे, विश्वाघातकी वृत्तीचे ते फळ होते. महंमदबीन कासीम, महंमद घोरी यांच्या हिंदुस्थानावरील स्वाऱ्यांच्या वेळी आक्रमकांकडून लाच खाऊन येथील लोकांनीच राष्ट्रद्रोह केला, घोरीला जयचंद राठोडाने मदत केली. शिवाजी महाराजे हिंदूंच्या स्वातंत्र्यासाठी युध्द करीत होते तेव्हा मराठे सरदार व राजपूत लोक मांगलांच्या बाजूने लढत होते. जेव्हा शिखांविरूध्द ब्रिटीश लढत होते तेव्हा शिखांचेच सेनापती मूग गिळून बसले होते. १८५७ मध्ये हिंदुस्थानाच्या मोठ्या विभागाने ब्रिटीशांविरूध्द स्वातंत्र्य युध्द पुकारले तेव्हा शीख ते युध्द शांतपणे प्रेशक वृत्तीने पाहात होते. पुढे ढॉ.आंबेडकरांना शंका येते की इतिहासाची पुनरावृत्ती तर होणार नाही ना? हिंदू समाजाचे जातिभेद, पंथभेद ह्या जुन्या शत्रूंमध्ये एकमेकांच्याविरूध्द असलेल्यांना नवीन पक्षाची जरूरी वाटते. ह्यामुळे माझी चिंता दुणावली आहे असे ते म्हणतात. त्याच भाषणामध्ये ह्या थोर राष्ट्रधर्माच्या प्रणेत्याने भारतीय जनतेला इशारा दिला की जर आपल्या पक्षाचे मत राष्ट्रहितापेक्षा श्रेष्ठ मानले तर भारतीयांचे स्वातंत्र्य पुन्हा धोक्यात येईल व कदाचित ते कायमचे नष्ट होईल. तेव्हा आपल्या रक्ताचा शेवटचा थेंब शरीरात असेपर्यंत आपण आपल्या स्वातंत्र्यासाठी लढण्याचा निर्धार केला पाहिजे. डॉ.आंबेडकरांना हिंदूसमाज व हिंदुस्थान ह्या आपल्या राष्ट्राविषयी सतत चिंता वाटत होती हे यावरून स्पष्ट होते.

डॉ.आंबेडकरांना भाषावार प्रांतरचना मान्य नव्हती. ते म्हणतात, आज राष्ट्राला जर कोणत्या गोष्टीची गरज असले तर ती जनतेच्या मनात एक राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याची या दूरदृष्टीसंपन्न देशभक्त नेत्याने पुढे म्हटले होते, आपण प्रथम भारतीय असून नंतर हिंदू किंवा मुस्लिम, सिंधी किंवा कानडी आहोत. प्रांत भेदाची भावना निर्माण करण्यापेक्षा आपण प्रथमत: भारतीय व नंतरही भारतीयच आहोत. आपण संकुचित प्रांताभिमान व पक्षाभिमान कटाक्षाने दूर ठेवले पाहिजेत. आंबेडकरांनी राष्ट्र हेच सर्वस्व मानून, राष्ट्रहितदक्ष राहूनच देशाभिमानाने ओथंबलेली पण बुध्दिवादाने बहरेलेली विचारसरणी राष्ट्रभक्तांपुढे ठेवली.

नेहरू कमिटीची योजना व हिंदुस्थानाचे भवितव्य या बहिष्कृत भारत मधील दीर्घ आशा अग्रलेखात डॉ.आंबेडकरांनी हिंदूंच्या हिताला धोका असल्याचे तर सांगितलेच शिवाय हिंदुस्थानवर अरिष्ट आहे म्हणून विरोध केला होता. त्यात डॉक्टर म्हणतात, त्यात आपल्या देशाचे अकल्याण आहे, त्यात आमचेही अकल्याण आहे अशी आमची भावना आहे. त्याचे कारणही ते सांगतात, नेहरू कमिटीने जी योजना सादर केलेली आहे ती योजना मुळची मुसलमान लोकांची आहे. नेहरू कमिटीची नव्हे. त्यात हिंदूंची गळचेपी होणार असल्याचे त्यांनी ओळखले होते. ज्या योजनेत राष्ट्रातील बहुसंख्याक हिंदूंना धोका पोहोचतो ती योजना काय कामाची ? हिंदूंच्या हिताविषयी बेपरवाई दाखविल्याबद्दल त्यांनी संताप व्यक्त केला आहे. शेवटी डॉ.आंबेडकर हिंदूंना धोका तसेच हिंदुस्थानवर अरिष्ट आहे हे जणून मुस्लिमधार्जिण्या नेहरू कमिटीला विरोध करतांना दिसतात.

जेथे राष्ट्रधर्माचा प्रश्न उपस्थित होईल तेथे डॉ.आंबेडकर सवर्ण हिंदूंशी काही वाद असले तरी मातृभूमीच्या रक्षणासाठी देहत्याग करण्यासाठी तयार असल्याचे त्यांनी प्रकट केले होते. राष्ट्रकार्य करण्याविषयीची आच देश आणि जनता यांच्या अभिमानातून आणि प्रतिष्ठेतून त्यांना प्राप्त झाली होती. त्यांच्या मते राष्ट्रीयत्व म्हणजे जातीय भावनेचा अभाव पण जातीय भावना तर सर्वत्र आढळते. ती राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण करते. त्यामुळे ते म्हणतात, सामाजिक बंधुता प्रत्यक्षात आणणे आणि समाजात सुसंवाद निर्माण करणे म्हणजे राष्ट्रवाद देशाभिमान आणि राष्ट्रीयत्व यांच्याविषयीच्या आंबेडकरांच्या दृष्टिकोनात आर्थिक, राजकीय, सामाजिक आणि सास्कृतीक एकता आणि स्वातंत्र्य तसेच नैतिक मुल्ये यांचा अंतर्भाव होता. भारतावर अत्यंतिक प्रेम असूनही वस्तुस्थिती ते नाकारत नसत. त्यामुळे आपल्या देशात जातीमुळे फुटीर प्रवृत्ती वाढली. त्यामुळे राष्ट्रवाद सिध्द होत नाही. असे ते म्हणत. त्याचबरोबर हिंदू समाजात व विशेषत: गरीब दलितांमध्ये दैववाद बोकाळल्याने समाज निष्क्रिय झाला. डॉ.आंबेडकरांना त्या समजुतींना जबरदस्त धक्का देण्याचेही काम करावे लागले.

**राष्ट्रधर्माचे प्रमुख अंग – राजकारण**

डॉ.आंबेडकर दलितोध्दारक म्हणून पावले असते तरी त्यांना राजकारणांची उत्तम जाण होती. देशातील वातावरण बदलते आहे हे लक्षात येताच त्यांनी राजकीय प्रश्नांकडे आपला मोहरा वळवला. त्यांनी जाणले होते की आपला दलितवर्ग राजकीयदृष्ट्या उपेक्षित आहे, त्यांच्यात राजकीय जागृती घडवून आणण्याची शिकस्त त्यांनी केली. राजकीय घडामोडी ते अवलोकत होते. ते स्वत: सायमन कमिशन, गोलमेज परिषद यामध्ये भाग घेत व आपल्या न्याय्य वाटा मिळाला पाहिजे असे आग्रहाने प्रतिपादत असत.

राजकारणाविषयीचे त्यांचे चिंतन समजून घेण्यासारखे आहे. मार्गदर्शक आहे. ते म्हणत, राजकारण करावयाचे असेल तर राजकारणाचा चांगला अभ्यास केला पाहिजे. नेता बनायचे तर त्यांची कर्तव्यकर्मे, जबाबदाऱ्या यांची जाणीव हवी. टाळ्या मिळविणारी भाषणे करून, गळ्यात हार घालून घेणे म्हणजे नेतागिरी नाही. डॉ.आंबेडकर आपल्या समाजाच्या उन्नतीसाठी रात्रंदिवस झटणारा, अंग मेहनत करणारा, राजकीय, धार्मिक व आर्थिक प्रश्नांचा बारकाईने अभ्यास करणारा, धैर्यवान राजनीतिज्ञ देशचे भले करतो असे समजत. स्वत: आंबेडकरांनी राजकीय जीवनाला प्रारंभ केल्यावर अखिल भारतीय शेड्यूल कास्ट फेडरेशन स्थापून पददलितांच्या राजकीय आकांक्षांचा निनाद दुमदुमविला.

डॉ.आंबेडकरांच्या काळीही निवडणूक म्हणजे राजकारण अशी स्थिती आली होती. ते म्हणतात, निवडणुकांशिवाय राजकारणाला दुसरा काही अर्थच नाही. निवडणूका संपल्या की जो तो आपला स्वस्थ बसतो. खरे तर समाजाच्या आयुष्यात राजकारण हे एक अल्प कारण आहे. राजकारण म्हणजे सर्वस्व नव्हे. समाजाची उन्नती होते ती केवळ राजकारणाने होत नही. समाजातील ज्या कोणास राजकारण करावयाचे असेल त्याने राजनितीचा अभ्यास केला पाहिजे. कर्तव्यकर्मे, त्यांची जबाबदारी समजून घ्यायला हवी. राजकारणात स्वप्नाळूपणा चालत नाही. पण पंडित नेहरू स्वप्नाळू व भोळे होते हे त्यांनी जाणले होते. त्यामुळे राष्ट्रहितासाठी ते त्यांच्यावर टीका करीत.

डॉ.आंबेडकरांचे स्पष्ट मत होते की, धर्माप्रमाणेच राजकारणात निष्ठा हवी नाही तर तो लफंग्यांचा बाजार ठरतो. विरोधी पक्ष अवश्य हवा, चांगला हवा, त्यामुळे भिन्न दृष्टिकोन लोकांपुढे येतो. राजकारणात

चरित्र्याची माणेस हवीत, पण त्यांचा अभाव आहे असे ते म्हणतात. आपल्या देशाच्या राजकारणात जातीपातीच्या भेदामुळे अल्पसंख्य जमातींना निवडून येणे कठिण आहे हे कळूनही ते राजकारण सोडायला तयार झाले नाहीत. कारण त्यांना झगडायचे होते. समाजाच्या कल्याणाची बाजू घेण्यासाठी झगडायचे होते. दिल्लीच्या हायकमांडचे वर्चस्व राजकारणात असल्याने प्रजातंत्र अपयशी ठरल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. लोकशाहीवर घाला घालणारे, चरित्र्य नसलेले, अफरातफरीत सापडलेले लोक निवडून आले तर समाजाच्या कल्याणाचे काय ? डॉ.आंबेडकरांनी लोकसभोतील आपल्या एका भाषणात म्हटले होते, राजकारणात भक्तीला विभूतीपूजेचे रूप येते, त्यातून सर्वाधिकारशाही निर्माण होते. म्हणून सर्वांनी जागृत राहायला हवे. सगळ्या राष्ट्राने बसून राजकारण समजून घेतले पाहिजे असे स्पष्टपणे बजावणाऱ्या डॉ.आंबेडकरांना दु:खाने सांगावे लागले की देशाच्या जातीगत राजनीतीमध्ये आम्हाला स्थान नाही. राजकीय जीवन व्यतीत करता येत नाही. त्यांनी अनेक जबाबदाऱ्या पार पाडत असता राष्ट्रधर्माला झळ पोहोचणार नाही याची काळजी घेतली. ते म्हणतात, राष्ट्राची हानी होऊ नये यासाठी प्रथम मी प्रयत्न करीत असतो.

राजकारणात काँग्रेसपक्ष आघाडीवर असून मागासलेल्या जातींच्या उन्नतीसाठी त्यांना प्रेम, तळमळ बिल्कुल नाही, हे डॉ.आंबेडकरांना चार वर्षे त्यांच्या सरकारात राहून कळले होते. जे काँग्रेसचे सरकार फिरवू शकत होते, ते केवळ शब्दांचे बुडबुडे उडवत होते, उलट काँग्रेस राजवटीने अस्पृश्यांची प्रचंड अवहेलना केली. त्यांनी अस्पृश्यांना राजकीय सवलतींचा उपयोग करू दिला नाही, फायदा घेऊ दिला नाही. त्यामुळे त्यांनी स्वतंत्र मार्ग स्विकारला. त्यांनी काँग्रेसच्या राजकारणाला शह देण्यासाठी शेड्यूल कास्ट फेडरेशन ची स्थापना केली. काँग्रेसचे राजकारण गटाराचे राजकारण झाल्याचा एका नेत्याच्या विचाराचा उल्लेख करून डॉ.आंबेडकरांनी म्हटले की, लोकशाहीत कोणत्याही पक्षाच्या हाती अनियंत्रित सत्ता असू नये, त्यांची अशी काँग्रेस होते त्यासाठी चांगला विरोधी पक्ष हवा. म्हणून एका बलवान विरोधी पक्षाच्या उभारणीची त्यांनी तयारी करून लढा लढविला. त्यावेळी एकांगी राजकारण यशस्वी होऊ शकत नाही. म्हणून आपल्या फेडरेशनबरोबर अन्य पक्षांची संधी व्हावी असे त्यांना वाटले त्यांनी त्यासाठी मित्रपक्ष म्हणून समाजवादी पक्ष, सहकारी पक्ष म्हणून जवळ केला. ऐक्याने भावी राजकारण आपल्या वर्गाची गुलामगिरी नाहीशी करील. त्यांनी बहुसंख्य हिंदूंना न्याय्य व उदार बुध्दीने वागून हिंदूस्थानच्या राजकीय प्रगतीची वाढ खुंटू देऊ नका. आपल्याला मिळालेले हक्क अल्पसंख्यांकांच्या फायद्याच्या दृष्टीने उपयोगात आणा असे आवाहनही केले. राजकारणाकडे दुर्लक्ष होता कामा नये. राजकारणाशिवाय हक्क मिळणार नाहीत हे जसे सांगतात तसेच आंबेउकर आपल्या लोकांना राजकारणाचा गाडा ओढतांना चाक अंगावर येणार नाही ह्याची खबरदारीही घ्यायला सांगतात. पण राजकीय हक्कासाठी झगडण्याची गरजही प्रतिपादतात. देशाच्या राज्यकारभारात योग्य वाटा दलितांना मिळालाच पाहिजे असा आग्रह धरतात. राजकीय हक्काच्या बाबतीत, राजकीय सत्तेबाबत तडजोड करायला, दुय्यम स्थान स्विकारायला ते मुळीच तयार झाले नाहीत. गरीब कामगांरोच हित वाऱ्यावर सोडणाऱ्या कम्युनिस्ट पक्षातुनही आपल्या लोकांना सावध राहायला ते सांगतात. कम्युनिष्टांची स्फुर्ती रशियातून असल्याने त्यांना स्वत:चे धोरणच नाही. त्यांच्या पासून अलीप्त रहा असेच डॉ.आंबेडकर अनुयायांना सांगतात. होणाच्या प्रचाराला, अमिषाला बळी न पडता खरोखरीच हीत कशात आहे हे निट जाणून स्वराज्याचे फायदे मिळायला तयार राहण्याचे ते अनुयायांना आवाहन करतात. राजकारणातील थोतांड, ढोंग ओळखून सर्वजन पोलादी शिस्तीत फेडरेशनच्या झेंड्या खाली येतील. तर उन्नती नक्की होईल असे सांगतात. आंबेडकरांना राजकारणातील सत्वपरीक्षा द्यावी लागली. अस्पृश्यांना स्वतंत्र मंतदारसंघ मिळू नये म्हणून महात्मा गांधींनी प्राणांतीक उपोषण केले. मुसलमान, ख्रिश्चनांना स्वतंत्र मतदारसंघ द्यायला त्यांचा विरोध नव्हता. डॉ.आंबेडकरांना राजकारणाची चांगली जाण असूनही गांधींच्या अस्पृश्य समाजावरील या हट्टापुढे माघार घ्यावी लागली. एक अनुभवी राजकारणी पट्टु लोकांच्या नजरेतून उतरू लागले व त्यांच्यावर दबाव येवू लागले. शेवटी गांधींचे प्राण वाचवावेत म्हणून त्यांनी पुणे करारावर सही केली. त्याच वेळी त्यांनी स्पष्टपणे काँग्रेसी नेत्यांना सांगितले मी माझ्या अस्पृश्य वर्गाच्या न्याय्य आणि सनदशील हक्कांचा घात होऊ देणार नाही. गांधीजींना अस्पृश्य वर्गाचा प्रश्न महत्वाचा वाटत नव्हता. त्यांनी जो निर्वाणीचा उपाय येथे योजला तो अस्पृश्यता निवारणासाठी किंवा स्वातंत्र्याच्या मागणीसाठी वापरला असता तर ते योग्य ठरले असते.

**समारोप**

भारतीय पददलित जनतेच्या मुक भावनांची साकार मुर्ती असलेल्या भारतरत्न डॉ.आंबेडकरांच्या अष्टपैलू जिवनाकडे दृष्टीक्षेप टाकल्यावर आपल्या लक्षात आले की, आयुष्यभर त्यांनी राष्ट्रधर्म जागविण्याचाच प्रयत्न केला आहे. समतेचा ध्वज उंच उभारून शतकानु शकते धार्मीक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अशा सर्व क्षेत्रात पिळवटून निघालेल्या आपल्या अस्पृश्य समाजाचा आत्मा आविरत परिश्रमाणे त्यांनी जागृत केला. व समाजबांधवांच्या मनात स्वत्व, स्वाभिमान व स्वावलंबनाची ज्योत पेटवून तिला अविश्रांत श्रम घेवून मशालीचे रूप दिले व त्यांचे जिवन तेजोमय बनविले. स्वातंत्र्यानंतर घटनासमितीवर अध्यक्ष या नात्याने स्वातंत्र्य, समता आणि बंधूभाव यावर अधारलेली न्याय्य हक्काची राष्ट्रीय सनद भारतीयांना मिळवून दिली. विधीमंत्र पदावरून हिंदूकोड बील स्विकारून भारतीय स्त्रीला सन्माननिय हक्क मिळवून दिले. नव्या पिढीचे जिवन पवित्र आणि तेजस्वी बनविण्यासाठी शिक्षणाचे महत्त्व प्रतिपादून दलित, दिन, दलितांना शिक्षणाचे दरवाजे खुले करून त्यांनी राष्ट्रधर्माचे स्वरूप उन्नत बनविले.

**संदर्भ**

१. राष्ट्रधर्माचे प्रणेते - प्रा.डॉ.प्रभाकर पां.पाठक
२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर - साळवे मधुकर
३. राजकीय विचार - भोळे, भा.ल.
४. डॉ.आंबेडकर विचारमंथन - डॉ.वा.ना.कुबेर
५. डॉ.बाबासाहेब आंबेडकर - धनंजय किर
६. गांधी आणि आंबेडकर - गंगाधर बाळकृष्ण सरदार

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे घटनावादाचे तत्त्वज्ञान

– प्रा. डॉ. महेंद्र पाटील
राज्यशास्त्र विभागप्रमुख
एस.पी.डी.एम. महाविद्यालय, शिरपूर

विसाव्या शतकातील भारतातील समाज जीवनावर ठसा उमटविणाऱ्या मोजक्या विचारवंतामध्ये डॉ. आंबेडकराची गणना केली जाते. संघर्षमय परिस्थितीतून वाटचाल करत त्यांनी सामाजिक क्रांतीची मशाल तेवत ठेवली. भारतीय समाजव्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी प्रस्थापित व्यवस्था आणि गांधीसारख्या महापुरूषावर देखील टीका करण्यास मागेपुढे पाहिले नाही. भारतीय समाजव्यवस्थेत आढळणाऱ्या समस्यांचा शास्त्रशुद्धपणे अभ्यास करून त्यांनी आपल्या व्यासंगी वृत्तीचा परिचय करून दिला. भारतीय घटना निर्मितीत दिलेल्या अतुलनीय योगदानामुळे देशाने त्यांचा संविधानाचे शिल्पकार या नात्याने गौरविले.अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत वाटचाल करत डॉ. आंबेडकरांनी देशातील अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजाला सन्मान आणि प्रतिष्ठेचे जीवन मिळवून दिले. त्यांनी आपले संपूर्ण जीवन हिंदू धर्मांतील अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी आणि त्यांना अधिकार मिळवून देण्यासाठी खर्च केले. न्यायाधिष्ठीत समाजरचना स्थापन करण्याचे ध्येय ठेवून सातत्याने संघर्ष करत राहिले. समतेच्या अभावी पददलित वर्गाला जी मानहानी सहन करावी लागली तिचा प्रत्यक्ष अनुभव त्यांनी अनेक प्रसंगात घेतलेले होते. मनावर ओरखडे उमटविणारे दुर्देवी अनुभव पुढच्या पिढीच्या वाटयाला येऊ नये म्हणून प्रस्थापित व्यवस्थेशी भांडत राहिले. दलिताच्या अधिकाराशी कोणाशी भांडण्याची त्यांची तयारी होती. त्यांच्या नेतृत्वामुळे दलित चळवळीला आवाज मिळाला. दलिताच्या मागण्याचा विचार करणे निर्णय केंद्राला भाग पडले. भारतीय घटनेचे शिल्पकार, समाजसुधारक, राजकीय नेता, शिक्षणतज्ञ, अर्थतज्ञ आणि विचारवंत इत्यादी विविध भूमिका पार पाडून त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला. समाज परिवर्तनाला दिशा देणारे आणि सामाजिक क्रांतिप्रवाहातील एक कृतिशील विचारवंत या नात्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे योगदान ऐतिहासिक स्वरूपाचे आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे घटनावाद व घटनेबद्दलचे विचार**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार या नात्याने डॉ. आंबेडकर यांचे घटनेबद्दलचे जाणून घेणे गरजेचे आहे. कॅबिनेट मिशन योजनेनुसार घटना समितीची स्थापना करण्यात आली. या समितीला डॉ. आंबेडकरांनी आपल्या 'शेडयूल्ड कास्ट फेडरेशन' पक्षाच्या वतीने निवेदन सादर करण्यात आले होते. हे निवदेन 'States and Minorities' नावाने पुस्तकरूपी प्रसिद्ध झाले. या निवेदनात त्यांनी आपली घटनावादाबद्दलची भूमिका मांडली. मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने घटनेच्या मसुदावर वेळावेळी घेतलेल्या आक्षेपाना उत्तर त्यांनी मांडलेल्या मतातून संविधानाबद्दलची दृष्टी प्रकट होते.

**आर्थिक लोकशाहीला महत्त्व –** भारतीय घटनेच्या स्वरूपाविषयी आंबेडकर लिहितात की, भारतासारख्या, घटना निर्मितीची उशिरा संधी मिळालेल्या देशाने इतर देशाच्या घटनेची नक्कल न करता घटनात्मक विधिनियमाद्वारे देशाची अर्थव्यवस्था आणि राज्यव्यवस्था निश्चित केली पाहिजे. याचा अर्थ भारताच्या राज्यघटनेतून राजकीय लोकशाही सोबत आर्थिक लोकशाहीचे ध्येय साकार करण्याचे स्वप्न आंबेडकर पाहत होते. अर्थव्यवस्था निर्माण करण्याचे काम विधिमंडळाच्या इच्छेवर न सोडता घटनात्मक विधिनियमाद्वारे निश्चित करण्याची सूचना करतात. भारतीय संविधानातून समर्थ भारताची निर्मिती व्हावी हा त्यांचा मनोदय होता. संविधान निव्वळ कागदी कायदे सूचविणारे साधन बनू नये या तळमळीतून नेहरू यांनी मांडलेल्या उद्देशपत्रिकेतील ठरावावर बोलताना डॉ. आंबेडकर म्हणाले की, भारतीय संविधानाद्वारे सामाजिक, आर्थिक न्याय प्रस्थापित करण्याचे तत्व खऱ्या अर्थांने आणण्याची इच्छा असेल तर त्यासाठी भरीव स्वरूपाची योजना सादर होणे आवश्यक आहे. समाजवादी अर्थव्यवस्थेचा स्वीकार केल्याशिवाय सामाजिक, राजकीय आणि आर्थिक न्यायाची शाश्वती मला वाटत नाही. घटनात्मक विधिनियमाद्वारे संसदीय लोकशाहीसोबत समाजवाद स्थापनाचे स्वप्न डॉ. आंबेडकर पाहत होते. परंतु त्यांची मागणी मूलभूत हक्काच्या पलीकडे जाणारी आहे असे सांगून नाकारण्यात आली. त्यांची मागणी फेटाळण्यात आलेली असली तरी घटनेतील मार्गदर्शक तत्त्वाच्या माध्यमातून आर्थिक लोकशाही स्थापन करण्याचे स्वप्न त्यांनी सोडले नाही. मार्गदर्शक तत्त्वांवरील चर्चेचा समारोप करताना डॉ. आंबेडकर यांनी सांगतिले की, राज्यघटनेने लोकशाही एक राजकीय व्यवस्था म्हणून स्वीकारली असली तरी आपले ध्येय आर्थिक लोकशाहीचे आहे. राजकीय लोकशाहीत आर्थिकदृष्टया प्रबळ गट सत्ता हस्तगत करून आपले हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक कायदे तयार करू शकतात. मतदानाचा अधिकार देऊन लोकशाही यशस्वी करता येत नाही. आर्थिक ताकदीच्या जोरावर मतदाराला विकत घेता येते हा भारतीय लोकशाही व्यवस्थेत अनेकदा अनुभव आलेला आहे. जनतेला आर्थिकदृष्टया सबल बनविल्याशिवाय राजकीय लोकशाही स्थिर होणार नाही याच जाणीवेतून त्यांनी घटनेद्वारा आर्थिक लोकशाही निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आढळतो.

**मूलभूत हक्कांचे संरक्षण –** दुर्बल घटकांच्या हक्क जपण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी राज्य समाजावादासोबत मूलभूत अधिकाराचा घटनेत समावेश करण्याची मागणी केली. हक्कांचा घटनेतील समावेशामुळे प्रत्येकाचे स्वातंत्र्य इतरांच्या आक्रमणापासून अबाधित राहील. निव्वळ अधिकाराच्या घटनेतील समावेशनातून प्रश्न सुटणार नाहीत. अमेरिकेच्या घटनेने निग्रोना गोऱ्याच्या बरोबरीने अधिकार देवूनही त्यांच्यावरील अन्याय कमी झालेले नाहीत. हक्कांचा उपभोग घेण्यायोग्य परिस्थिती निर्माण करण्याची जबाबदारी शासनाने घेणे गरजेचे आहे. हक्कांच्या

माध्यमातून समाजातील प्रबळ वर्गांच्या हातातील लोकांचे जीवन नियंत्रित करण्याची शक्ती काढून घेतली पाहिजे तर त्यांना अर्थ प्राप्त होईल. मूलभूत हक्क आणि राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वांचा घटनेतील समावेशाने सामाजिक क्रांतीची उद्दिष्टे सफल होतील असे आंबेडकरांना वाटत होते. त्यामुळे घटनेच्या तिसऱ्या प्रकरणाला 'भारतीय राज्यघटनेचा आत्मा' असे म्हणतात. घटनेत कोणकोणत्या मूलभूत हक्कांचा समावेश करता येईल याची यादी त्यांनी सादर केली होती. या यादीत अल्पसंख्याक आणि अनुसूचित जातीसाठी असलेल्या हक्कांचा देखील समावेश होता. या यादीतील हक्कांच्या योग्य अंमलबजावणीसाठी दहा वर्षात राबवली जाणारी एक योजना सूचविली होती. मूलभूत हक्कांच्या योग्य अंमलबजावणीसाठी राज्य समाजवाद लागू करण्याचा सल्ला दिला होता. मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे देशाची पुनर्रचना आणि सामाजिक क्रांतीचे साधन बनले पाहिजे असे आंबेडकरांना वाटत होते.

**अल्पसंख्याकाचे अधिकार संरक्षण –** संविधान निर्मिती करताना अल्पसंख्याकांच्या अधिकाराचे संरक्षण करणे अत्यंत महत्त्वपूर्ण तत्त्व असते. अल्पसंख्याकांच्या मनात विश्वास निर्मिती केल्याशिवाय लोकशाहीचा पाया सदृढ होऊ शकत नाही. प्रत्येक देशातील समाजरचनेत बहुसंख्याकाचे प्राबल्य असणे नैसर्गिक बाब असते. परंतु बहुसंख्याकांच्या प्राबल्यामुळे अल्पसंख्याकांच्या अधिकाराचे हनन होता कामा नये. आंबेडकर सांगतात की, बहुसंख्याकांचे राज्य हा लोकशाहीचा संकेत असला तरी ते नैतिक मूल्य नाही तर एक व्यावहारिक तडजोड आहे. बहुसंख्याकांच्या राज्यात अल्पसंख्याकांच्या अधिकाराचे संरक्षण आणि संरक्षणाची हमी हे लोकशाही वास्तविक नैतिक मूल्य आहे. बहुसंख्याकांच्या हुकूमशाहीपासून अल्पसंख्याकांचे संरक्षण करण्यासाठी घटनेत व्यापक तरतूदी करण्याचा आग्रह डॉ. आंबेडकरांनी धरला. ब्रिटिश काळात अल्पसंख्याकांना योग्य प्रतिनिधित्व मिळवून देण्यासाठी स्वतंत्र मतदारसंघ निर्माण केले होते. पाकिस्तानच्या निर्मितीनंतर स्वतंत्र मतदारसंघाना होत असलेला विरोध लक्षात घेऊन बाबासाहेबांनी राखीव मतदारसंघाचे समर्थन केले. घटनेच्या २९ व ३० व्या कलमानुसार अल्पसंख्याकांच्या भाषा, संस्कृती आणि लिपीच्या जतन करण्यासाठी आवश्यक अधिकार बहाल करण्यात आले. अल्पसंख्याकांना शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा अधिकार बहाल करण्यात आला. या संस्थेच्या कारभारात हस्तक्षेप करण्याची सरकारला मनाई करण्यात आली. या संस्थांना अनुदान देताना कोणताही भेदभाव केला जाणार नाही हे वचन देण्यात आले.

**सामाजिक व आर्थिक न्याय –** डॉ. बाबासाहेब सामाजिक न्यायाचे कट्टर समर्थक होते. सामाजिक न्याय संकल्पना समाजातील सर्व माणसाना समान मानते. मानवामानवामध्ये धर्म,जात, वंश, पंथ, रंग आणि लिंगाच्या आधारावर कोणताही भेदभाव केला जाऊ नये. सर्वांना समान संधी आणि दर्जा दयावा. सर्व सार्वजनिक सुविधा सर्वांसाठी खुल्या असाव्यात. सामाजिक न्याय संकल्पनेचा आशय अत्यंत व्यापक आहे. या संकल्पनेचे प्रतिबिंब घटनेच्या १४ ते १८ कलमांमध्ये दिसून येते. सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांना समाजाच्या इतर गटाच्या बरोबरीने येण्यासाठी आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. अस्पृश्यता पाळणे हा कायदयाने गुन्हा मानण्यात आलेला आहे. सामाजिक भेदभावाला उत्तेजन देणाऱ्या पदव्याचे समाप्तीकरण करण्यात आले आहे. सामाजिक मागासलेपण दूर करण्यासाठी डॉ. आंबेडकरांच्या प्रयत्नानी उपरोक्त तरतूदी केलेल्या आहेत. सामाजिक न्यायाप्रमाणे आंबेडकरांनी आर्थिक न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. आर्थिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी डॉ. आंबेडकर मत व्यक्त करतात की, अर्थव्यवस्थेला घटनात्मक विधिनियमांनी असे रूप प्रदान करावे की, देशातील सधन वर्गांच्या हातात देशाच्या अर्थव्यवस्थेची सूत्रे जाऊ नये. घटनेच्या ३१ व्या कलमानुसार संपत्ती अधिकार बहाल केल्यामुळे डॉ. आंबेडकरांना अपेक्षित अर्थव्यवस्था घटनात्मक नियमानुसार स्थापन करता आली नाही तरी देखील त्यांनी हार न मानता मार्गदर्शक तत्त्वात अनेक तरतूदी करून आर्थिक न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

**संघराज्य व्यवस्था –** संघराज्य पद्धतीविषयी तरतूदी करताना आंबेडकर कोणत्याही विशिष्ट तत्त्वप्रणाली आणि सिद्धांता चिकटून राहिले नाही. त्यांनी भारतीय परिस्थितीचा विचार करून संघराज्याबद्दल तरतूदी केलेल्या आहेत. त्यांच्या मते भारतीय संघराज्य एकमेवाद्वितीय आहे. भारतात पूर्वीपासून प्रांत संघराज्याचे सदस्य होते. प्रांतांनी कोणत्याही प्रकारचा करार करून संघराज्य निर्माण केले नव्हते. संघराज्य करारातून निर्माण झालेले नसल्यामुळे त्यांना फुटून बाहेर निघण्याचा अधिकार नाही. भारताच्या तत्कालीन परिस्थितीचा अभ्यास करून आंबेडकरांनी केंद्रप्रधान संघराज्य पद्धतीचे समर्थन केले. राष्ट्रीय एकात्मता आणि फुटिर वृत्तीला आळा घालण्यासाठी केंद्राकडे जास्त अधिकार दिले. राष्ट्रीय एकात्मता आणि घटकांच्या हक्कामध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. संकटकाळात संघराज्याचे एकात्म राज्यात रूपांतर करण्यासाठी आणीबाणीची तरतूदी केली. भारतीय संघराज्य पद्धतीत केंद्र सरकार सामर्थ्यवान असले तरी राज्ये कमकुवत नाही. ती आपली धोरणे कार्यक्षमतेने राबवू शकतात. परिस्थितीची गरज म्हणून आंबेडकरांनी केंद्र सरकारला व्यापक अधिकार बहाल केलेले असले तरी राज्याकडे दुर्लक्ष केले नाही हे विशेष मानावे लागेल. म्हणून भारतीय संघराज्य पद्धती हा आगळा वेगळा प्रयोग मानला जातो.

**प्रौढ मताधिकार –** भारतात प्रतिनिधिक लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी आंबेडकर प्रौढ मताधिकाराचे समर्थन करतात. मतदानासाठी असलेली संपत्ती आणि साक्षरतेची अट नाकारतात. 'लोकांनी स्वत:च्या लोकशाही अधिकाराचा वापर करणे हाच त्यांच्या शिक्षणाचा मार्ग आहे.' संपत्ती नसलेल्या आणि निरक्षर व्यक्तींना स्वत: निर्णय घेण्याएवढी बुद्धिमत्ता निश्चित असते. मतदानाचा अधिकार वापरताना निरक्षर व्यक्ती सुरूवातीला चुकतील पण चुकांमधून येणाऱ्या अनुभवातून शिकत जातील. निरक्षर व संपत्ती नसलेल्या लोकांना मतदानाच्या अधिकारापासून दूर करणे म्हणजे मूठभरांची लोकशाही प्रस्थापित करण्यासारखे आहे. लोकशाहीला खरा अर्थ प्राप्त करून देण्यासाठी प्रौढ मताधिकाराचे तत्त्व स्वीकारणे आंबेडकर आवश्यक मानतात.

**स्वतंत्र व निपक्ष न्यायमंडळ –** न्यायव्यवस्थेला घटनात्मक स्थान उपलब्ध करून देताना न्यायालये कुठल्याही दोषारोषांच्या पलीकडे, हुकूमशाहीपासून आणि राजकीय प्रभावापासून मुक्त असली पाहिजे तरच न्यायव्यवस्था प्रकाशमान राहील असे आंबेडकरांना वाटत होते. न्याय

व्यवस्थेच्या तरतूदीचे लेखन करतांना सामाजिक क्रांतीचा विचार केला गेला. मसुदा समितीचे सदस्य अय्यर म्हणतात, न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य अबाधित राखले पाहिजे याबद्दल अजिबात दुमत नाही. व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि योग्य न्यायदानासाठी हे आवश्यक आहे. पण हे स्वातंत्र्याचे तत्त्व इतक्या उंचीवर नेवू नये की त्याचे ध्रुवपदात रूपांत होईल. न्यायव्यवस्था स्वत:ला विधिमंडळ आणि प्रशासकीय व्यवस्थेपेक्षा वरच्या स्थानावरची समजू लागेल. आंबडेकरांनी अय्यरांच्या अपेक्षाला खज्या उतरविणाज्या न्यायव्यवस्थेची रचना घटनेत केली. भारतीय न्यायव्यवस्थेत इंग्लंडची संसदीय लोकशाही आणि अमेरिकेच्या संघराज्य पद्धतीचे संमिश्रण आहे. सत्ता समतोल साधनासाठी न्यायालयाना न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार बहाल केलेला आहे. या अधिकाराचा वापर करून न्यायालय घटनेच्या पावित्र्याचे जतन करू शकतात. घटनात्मक बाह्य कायदा अवैध घोषित करू शकतात. आंबेडकरांनी न्यायव्यवस्थेसंदर्भा घटनेत केलेल्या तरतूदीबद्दल सांगतात की, घटनात्मक, नागरी आणि फौजदारी कायदयासंबंधीच्या सर्व प्रश्नांवर उपाय देणाज्या एकमेवाद्वितीय कार्यकक्षा असलेल्या न्यायव्यवस्थेचे घटनासमितीत सगळयात मोठे प्रणेते आंबेडकर होते. त्यांना न्यायव्यवस्था आणि कायदयांमधला एकसारखेपणा राष्ट्रीय एकात्मता राखण्यासाठ आवश्यक वाटत होता. भारतीय न्यायव्यवस्थाविषयक तरतूदी करताना आंबेडकरांनी राष्ट्रीय एकात्मता, न्यायमंडळाचे स्वातंत्र्य इत्यादींना स्थान दिलेले आहे.

**संसदिय लोकशाही –** भारतीय समाजात जातीयता, व्यक्तिपूजा इ. सारखे दोष असल्याने राजकीय लोकशाही बरोबर सामाजिक व आर्थिक लोकशाही निर्माण करण्यासाठी संसदीय लोकशाहीचे समर्थन त्यांनी केले. राजकीय लोकशाहीसोबत सामाजिक व आर्थिक लोकशाही स्थापनेचा आग्रह धरला. संसदीय लोकशाही पद्धतीत देशाच्या परिस्थितीनुरूप बदल करून राष्ट्रपतीला नाममात्र सत्ता देऊन वास्तव सत्ता पंतप्रधान व मंत्रीमंडळाकडे देतात. राज्यपालाना मुख्यमंत्राच्या सल्लानुसार राज्यकारभार करण्याची तरतूद घटनेत करण्यात आली.

**दलिताच्या हिताला प्राधान्य –** भारताच्या राजकीय क्षितिजावर आंबेडकराचा उदय झाल्यापासून तर अंतापर्यंत त्यांनी वंचित वा दलिताच्या हिताला नेहमीच प्राधान्य दिले. आपले आयुष्य वंचिताच्या प्रश्न सोडविण्यासाठी समर्पित केले. घटना समितीत देखील वंचितावरील अन्याय कमी व्हावा, त्यांना योग्य अधिकार मिळावेत म्हणून प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नामुळे अस्पृश्यानिवारण, आरक्षण, वंचिताच्या हितासाठी वेगवेगळया कायदयाची निर्मिती होऊ शकली. मुंबई विधिमंडळातील भाषणात म्हणाले होते की, जेव्हा जेव्हा सर्व देशाचे हित आणि माझे हित यांमध्ये विरोध निर्माण होईल, तेव्हा मी देशहिताला प्राधान्य देईल. देशाचे हित आणि दलित हित यात विरोध होईल तेव्हा मी दलित हिताला प्राधान्य देईल. त्यांचा हा आग्रह जातीय स्वार्थातून निर्माण झालेला नव्हता तर दलित हिताबद्दल उदासीन असलेल्या व्यवस्थेला दिलेला हा इशारा होता. समाजाच्या शेवटच्या स्तराच्या कल्याणाचा विचार केला जात नाही तोपर्यंत देशहित नावाची कोणतीही गोष्ट अस्तित्वात येऊ शकत नाही. त्यांनी दलित हिताला देशहिताशी जोडले. दलित कल्याणासाठी आवश्यक तरतूदी घटनेत केल्या.

**सारांश**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनावादाच्या माध्यमातून एक निश्चित प्रशासकीय यंत्रणा विकसित करून राजकीय गोंधळ व अराजकता टाळण्याचा प्रयत्न केलेला आहे. घटनावादामुळे राज्यकर्त्या वर्गाच्या मनमानीला आळा बसू शकेल. देशाच्या राजकीय जीवनाच्या मूल्याची निश्चिती होऊ शकते. आंबेडकर म्हणतात की, आता आपण स्वतंत्र झाल्यामुळे , काही चुकीचे घडत असल्यास त्याचा दोष ब्रिटिशांवर टाकण्याचे निमित्त आपण गमावले आहे. यापुढे काही चुकीचे घडल्यास तो दोष दुसज्या तिसज्या कोणाचा नसून आपलाच आहे.

**संदर्भ**


१. सिंह, मनोज कुमार आणि चौधरी, शैलस कुमार (२००७). भारतीय राजनीतिक चिन्तक डॉ. भीमराव अम्बेडकर. नई दिल्ली: डिस्कवरी पब्लिशिंग हाऊस
२. मुखर्जी, आशुतोष (२०१२). अम्बेडकर की राजनीतिक सोच एंव विचार. नई दिल्ली: रावत प्रकाशन
३. कुमार, एम आणि शर्मा दीप्ति (२०११). डॉ. भीमराव अम्बेडकर. नई दिल्ली: अर्जुन पब्लिशिंग हाऊस
४. पांडे, प्रीति (२००६). डॉ. अम्बेडकर और पं. दीनदयाल. जयपूर: ए बी डी पब्लिशर्स
५. Gupta, M. G. (1990). History of Political Thought. Allahabad: Chaitanya Publishing House.
६. Johari, J. C. (1987). Comtemporary Political Theory. New Delhi: Sterling Publishers
७. Upadhyaya, A.K.(1999). Political Philosophy. Jaippur: Rawat Publication
८. Varma, V.P.(1977). Political Philosophy. Agra: Laxmi Narayan Agarwal Publisher.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतातील आरक्षणाचे धोरण

**- प्रा. डॉ. संदिप बी. नेरकर**
राज्यशास्त्र विभाग
प्रताप कॉलेज, अमळनेर

आरक्षण वा राखीव जागा हा आज समाजात सर्वाधिक चर्चेचा, चिंतनाचा आणि काहींच्या चिंतेचा विषय बनलेला आहे. या धोरणाचे समर्थक व विरोधक असे स्पष्ट दोन गट समाजात निर्माण झाले आहेत. उघड विरोध करणाऱ्यांचा तसेच छुपा विरोध करणाऱ्यांचा देखिल गट आहे. त्यामुळे गेल्या अनेक वर्षापासुन आरक्षणाचा प्रश्न सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या संवेदनशील बनलेला आहे. पण हजारो वर्ष ज्यांनी सामाजक, आर्थिक, सांस्कृतिक उपेक्षा सहन करवी लागली. त्यांना जीवनाच्या महामार्गावर येण्याची संधी देण्याचे आरक्षण हे एक माध्यम आहे. हि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भुमीका होती. सत्तेच्या हस्तक्षेपाशिवाय आरक्षणाचे धोरण अमलात येणार नाही हे सुध्दा उघड आहे. त्यामुळे आरक्षणाच्या धोरणात केवळ समाजकारण नाही तर सत्ताकारण ही आहे आणि ते अपरिहार्य असते. कारण समता आणण्याचे म्हणजे विषमता निर्मुलनाचे समाजकारण हे ही राजकारणच आहे.

''राखीव जागा' चा अर्थ राज्यघटना आणि देशातील सामाजिक संस्था यांच्यामध्ये परस्पर नाते जोडणे. त्यामुळे सत्ताधारी वर्गाच्या हातात जी निरंकूश सत्ता जाते, तिला आळा बसतो. त्यासाठी अस्पृश्यांचे स्वतंत्र राजकीय अस्तित्व असणे महत्त्वाचे होजे. त्याला एकदा का मान्यता मिळाली की, कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ आणि नागरी सेवांतील जागांची हिंदू आणि अस्पृश्य यांच्यामध्ये वाटणी होणार. पर्यायाने हिंदूचा हिस्सा कमी होणार. त्यामुळेच राखीव जागांच्या तत्त्वाला त्या काळी विरोध सुरु होता.''१

या बाबतीत बाबासाहेब स्पष्ट होते. व्यक्तीच्या, नेत्याच्या, समाजाच्या सदिच्छेवर विश्वास ठेवून येथील वर्ण-जातिव्यवस्थेचा, अस्पृश्यतेचा प्रश्न सुटेल, याच्यावर त्यांचा विश्वास नव्हता. हजारो वर्ष या दिशेने प्रयत्न करण्यात आले. परंतू त्यातून फारसे काही हाताशी लागले नाही. याचा अर्थ या सदिच्छांचा अव्हेर करावा. त्यांच्या विषयी अविश्वास दाखविणे असे नाही. इतिहासातून जेव्हा काही अनुभव वारंवार येतात तेव्हा त्यातून मार्ग काढण्यासाठी नवी दिशा, नवी भूमिका आवश्यक असते. या संदर्भात बाबासाहेब म्हणतात, ''The possibility of a better future cannot be used as an argument to prevent the untouchables from securing the means of protecting them selves against the tyranny of present.''२

**आरक्षणाची पूर्वपीठिका आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

इ. स. पूर्व २००० च्या दरम्यान ऋगवेद हा ग्रंथ लिहिला गेला. जो चारवेदांपैकी सर्वात प्राचीन वेद म्हणून ओळखला जातो. ज्यात चातुर्वण्य व्यवस्था मांडलेली आहे. खरे तर या व्यवस्थेने समाजात स्तरीकरण निर्माण केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या वर्णव्यवस्थेच्या संदर्भात म्हणतात, वर्णव्यवस्थाच मुळी श्रेणी बध्दतेच्या तत्त्वावर आधारीत असल्याने हिंदू समाजातील सर्वच वर्ग हे श्रेणीबध्द विषमतेच्या नात्याने संलग्न झालेले आहेत. हिंदू समाजातील मानवी संबंध श्रेणीबध्द विषमतेवर आधारीत आहेत. डॉ. आंबेडकरांच्या मते बऱ्याच जणांना सर्वसाधारण विषमता आणि श्रेणीबध्द विषमता यांतील गुणात्मक फरक फारसा ध्यानी येत नाही. सर्वसाधारण विषमतेवर आधारीत जी समान व्यवस्था असते तिथे कनिष्ठ स्तरावरील सामाजिक वर्ग हे संघटीत होऊन वरिष्ठ वर्गाचे वर्चस्व झुगारून देण्यास व त्याद्वारा प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान देण्यास उत्सूक असतात. पण श्रेणीबध्द विषमतेवर आधारीत समाजव्यवस्थेत शोषित असे कनिष्ठ वर्ग एकत्र येऊन प्रस्थापित वर्चस्वशाली वर्गांना आव्हान देतील हि शक्यता फारच कमी असते. कारण अशा समाजात उच्च व कनिष्ठ वर्गाचे सरळ सरळ ध्रुवीकरण झालेले नसते. त्याच्यात उच्चतम, उच्चतर उच्च, कनिष्ठ, कनिष्ठतर, कनिष्ठतम, अशा श्रेणी तयार झालेले असतात. परिणामत: उच्च वर्गियांना उच्चतर व उच्चतम वर्गियांचे वर्चस्व संपुष्टात यावे असे वाटते खरे पण त्यासाठी त्यांना कनिष्ठ व कनिष्ठतर वर्गियांशी हातमिळवणी करवी असे वाटत नाही. म्हणून अशा श्रेणीबध्द रचनेत कनिष्ठतम वर्गाला काही जास्तीचे अधिकार दिले पाहिजे असे डॉ. बाबासाहेबांना वाटते.

१९ व्या शतकाच्या मध्यावर म. फुलेंनी शुद्र अतिशुद्राच्या कल्याणाचा मार्ग सांगितला. त्यांनी इथल्या ब्राम्हणवादी व्यवस्थेला सुरुंग लावण्याचे कार्य हाती घेतले. ब्राम्हणवाद्यांची बलस्थाने ओळखली व बहुजनांच्या अधोगतीची कारणे शोधली. त्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले. व मुला-मुलींसाठी शाळा काढल्या शेटजी भटजींचे कारस्थाने लोकांना उघड करून सांगितले व पुढे १८८२ रोजी हंटर कमीशन समोर साक्ष देतांना म. फुलेंनी ब्राम्हणेतर जातीतील उमेदवारांना प्रशासकीय नोकरीत स्थान देण्याची पहिली मागणी केली. तसेच ग्रामीण व दलित विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी विशेष प्रलोभने द्यावीत अशी मागणी केली. अशाप्रकारे म. फुलेंनी भारतात सर्वप्रथम शुडातिशुडांसाठी (दलित मागांसांसाठी) आरक्षणाची संकल्पना मांडली.

**आरक्षणाच्या धोरणाची सुरुवात**

आरक्षणाच्या धोरणाची अंमलबजावणी कोल्हापूर संस्थानचे लोकराजे शाहू महाराजांनी मराठा, अस्पृश्य व मागास वर्गाची हालाखीची परिस्थिती जाणली. कारण १९०१ च्या जनगणनेत असे आढळून आले की संस्थानामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय श्रेणीच्या नोकऱ्यांमध्ये एकही मराठा किंवा अन्य जातीचा माणूस नाही. केवळ ब्राम्हणांचीच भरती आहे. राजाच्या प्रशासकीय खात्यातील ७१ नोकरांपैकी ६० ब्राम्हण व ११ इतर होते. तर खाजगी खात्यात ५३ पैकी ४६ ब्राम्हण व ७ इतर होते. या ब्राम्हणेतर लोकांमध्ये पारशी, प्रभू, इंग्रज व मुस्लिम यांचा

समावेश होतो. त्यामुळे कोणाचीही मागणी नसतांना राजर्षी शाहू महाराजांनी वयाच्या २८ व्या वर्षी आपल्या संस्थानातील ५०% नोकऱ्या मराठ्यांसह मागासवर्गासाठी राखीव ठेवण्याची घोषणा २६ जुलै १९०२ रोजी केली. त्यावेळीही तथाकथित उच्चभ्रु लोकांनी त्यांना विरोधच केला. शाहू महाराजांच्या राखीव जागांच्या धोरणाला विरोध गणपतराव अभ्यंकर या ब्राह्मण वकीलाने केला. ते राजांना म्हणाले राखीव जागांमुळे गुणवान लोकांवर अन्याय होतो आणि राज्य कारभारावर वाईट परिणाम होतो, असे ते म्हणाले. शाहु महाराजांनी त्यांना सांगितले, जे लोक सामाजिक व आर्थिक पातळीवर मागे राहिले असतील त्यांना विशेष संधी उपलब्ध करुन द्याव्या लागतील. त्यासाठी राजांनी त्यांना बलिष्ठ व अशक्त घोड्यांचा प्रयोग दाखवला. शाहू महाराजांच्या निर्णयावर बाळ गंगाधर टिळकांनी देखिल विरोधाचा सूर उमटवला. त्यांनी 'केसरी' या वर्तमानपत्रात लिहिले, 'रिकाम्या झालेल्या निम्म्या जागांवर ज्या मागासलेल्या जातीतील लोकांची नेमणूक करावयाची त्याची योग्यता पहावयाची की नाही? समान योग्यतेचा ब्राह्मण व मराठा असल्यास मराठा निवडा. मागासलेल्या व पुढारलेल्या जातीमध्ये अशा प्रकारची आवडनिवड करुन देशाचे हित किंवा संस्थानाचे कल्याण होईल असा जो महाराजांचा समज आहे. तो मुत्सद्दीपणाचा नाही किंबहूना हे बुध्दिभ्रष्टपणाचे लक्षण आहे, असे आम्ही समजतो.''

न्या. रानडेंची देखिल या राखीव जागांच्या धोरणांसदर्भात शंका उपस्थित केली होती. राजर्षी शाहू महाराजांच्या आरक्षण धोरणांचा परिणाम अन्य प्रांतावरही पडला. १९१८ मध्ये म्हैसूर प्रांतात सर्व बिगर ब्राह्मण जातींचा मागासवर्गात समावेश करुन, त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली. १९२७ साली मद्रास प्रांतात नोकऱ्यांवर घेतांना प्रथमच जातींचा निकष लावण्यात आला.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका**

शाहू महाराजांच्या निधनानंतर अस्पृश्यांना नोकरी कोण देणार? हा मोठा प्रश्न होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९२० मध्ये सक्रिय राजकारणात आल्यानंतर त्यांनी अस्पृश्यांना शिक्षण मिळावे, त्यांना सरकारी नोकऱ्या मिळाव्यात. त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारावी यासाठी प्रयत्न सुरु केले. त्यांनी इंग्रज सरकारला अस्पृश्यांच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी एक समिति नेमून शिफारशींची अंमलबजावणी करावी, असा आग्रह धरला. तेव्हा इंग्रज सरकारने इ. एन.एस. स्टार्ट या ट्रायबल कमिशनाच्या अध्यक्षतेखाली समिति नेमली. या समितीच स्टार्ट कमिशन असे नामकरण झाले. १९२८ साली हि समिति नेमण्यात आली. या समितीमध्ये डॉ. बी. आर. आंबेडकर, डॉ. व्ही. बी. सोलंकी, श्री. ठाकुर बाप्पा, डॉ. देशपांडे होते. या समितीने सखोल चौकशी व अभ्यास केला. व १९३४ मध्ये आपला अहवाल इंग्रज सरकारला सादर केला. त्यात खालील शिफारशी होत्या.

१. अस्पृश्य मुलांना शाळेत प्रवेश देवून त्यांना शिष्यवृत्ती देण्यात यावी.
२. यासाठी स्वतंत्र खाते निर्माण करण्यात यावे.
३. त्यांना सरकारी नोकरीमध्ये आरक्षण देण्यात यावे.

''डॉ. बाबासाहेब आंबेडकर व रा. ब. आर. श्रीनिवास यांनी अस्पृश्यांच्या राजकीय मागण्यांचा खलिता पहिल्या इंडियन राऊंड टेबल कॉन्फरन्सला (१९३०) सादर केला होता. त्यातील मजकूर असा होता. भारत देश स्वयंशासित होईल, तेव्हा त्याच्या राज्याधिकाराची सर्व सत्ता बहुसंख्यांक जातींच्या हातात राहील व अशा वेळी अल्पसंख्याक अस्पृश्य जातींना जीवन सुखकर रीतीने व निर्भयपणे जगता येणार नाही. म्हणून भावी स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत अस्पृश्यांचे हितसंरक्षण करण्याच्या हेतूने आठ गोष्टींचा समावेश करणे जरुर आहे. ही अस्पृश्यांची राजकीय मागणी वर्तूळ परीषदेने मान्य करुन ती स्वीकारण्याबद्दल ब्रिटिश सरकारला शिफारस करावी. यासाठी पुढील मागण्या केल्या होत्या. १. समान नागरीकत्व २. समान मूलभूत हक्क ३. समान हक्कांचा स्वतंत्रपणे वापर करण्याचा अधिकारी ४. कायदेमंडळात भरपूर प्रतिनिधित्व ५. सरकारी नोकऱ्यांत भरपूर प्रतिनिधित्व ६. सरकारचे पूर्वग्रहदूषित कृत्य व हलगर्जीपणा यावर आळा घालण्याकरीता घटनेत १९६७, ९३ च्या धरतीवर तरतूद करावी''३

आम्ही राज्य घटनेत समानतेचे तरतुद केलेली आहे आणि एवढेच नव्हे तर प्रत्येक व्यक्तीच्या समानतेची वागणूक मिळाली पाहिजे. हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत हक्क आहे ते म्हणजे समता हे समानतेची असते. याचा अर्थ समानता म्हणजे सारख्या व्यक्तींना सारखी वागणूक देणे हा होय. म्हणून समाजात जर सामाजिक घटकांच्या, आर्थिक घटकाच्या आधारावर वा मानव निर्मित विषमता असेल तर ती दूर करण्यासाठी घटनेने प्रयत्न केले पाहिजेत. व त्यासाठी आरक्षण सारख्या धोरणांचा अवलंब अपरिहार्य आहे. जो समाज या विषमतेमध्ये गामास आहे, वंचित आहे त्याला काही जास्तीच्या सोयी सवलती देवून पुढारलेल्या समाजापर्यंत आणणे हे घटनेचे वा प्रत्येक नागरिकांचे काम आहे.

''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांची लोकसंख्या मुंबई प्रांतातील एकुण लोकसंख्येच्या आठ टक्के असल्याने त्याच्यासाठी नऊ जागांची मागणी करुन त्या स्वतंत्र मतदार संघाव्दारे भराव्यात असे सुचविले'. या प्रमाणे आरक्षणाची मागणी केलेली दिसते.''४

१९३५ च्या कायद्यात दलितांसाठी राखीव जागा ठेवण्यात आल्या. १९४३ मध्ये डॉ. आंबेडकरांनी कायदा मंत्री म्हणून सादर केलेल्या मसुदाच्या आधारावर ब्रिटीश सरकारने अनुसुचीत जातींकरीता सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण ठेवले होते.

**संविधानातील तरतूदी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटना समीतीतील आपल्या इतर सहकारी सदस्यांच्या सोबत अथक परिश्रमाणे भारतीय संविधन निर्माण केले व खरीखुरी समता प्रस्थापित करण्यासाठी समाजातील मागसवर्गांना सामजिक व शैक्षणिक दृष्ट्या संरक्षण देण्यासाठी भारतीय संविधानात तरतुदी करण्यात आल्या. राखीव जागांच्या धोरणासाठी संविधानात दोन युक्तिवाद करण्यात आलेले दिसतात. एक युक्तिवाद कलम – १६ (४) मध्ये येतो. तो असा की राज्यकारभार चालविणाऱ्या यंत्रणेत सर्व समाज घटकांना विशेषत: मागास घटकांना या कारभार यंत्रणेत स्थान मिळायला हवे. जर एखाद्या वर्गाला त्या यंत्रणेत पुरेसे प्रतिनिधीत्व नसेल तर त्या वर्गासाठी राखीव जागांची तरतुद केली जाईल.

दुसरा युक्तिवाद कलम १५ (४) मध्ये केला आहे. तो असा, समानतेच्या प्रस्थापनेसाठी मागासवर्गांना विशेष संधी द्यायला हवी

आणि तशी संधी देणे हे समानतेच्या औपचारिक हक्कांशी विसंगत नसेल सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गासाठी ही तरतूद आहे. अर्थात सामा. व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेले वर्ग हा शब्द प्रयोग आणि त्या वर्गांसाठी सरकारवर खास जबाबदारी सोपविणे या दोन्ही गोष्टी मूळ संविधानात कलम ३४० मध्ये होत्याच.

याशिवाय भारतीय संविधानात पुढील काही तरतूदी आहेत.

१. **कलम १७ नुसार –** अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी ती मानणाऱ्यास अपराधी मानले जाईल व कायद्यानुसार शिक्षा केली जाईल.

२. **कलम २९ नुसार –** राज्यनिधी प्राप्त होणाऱ्या शिक्षण संस्थांमध्ये कोणत्याही नागरिकाला केवळ धर्म, जाति, भाषा, अथवा यांपैकी एक वा अनेक आधारावर वंचित करता येणार नाही.

३. **कलम ४६ नुसार –** राज्य समाजाच्या दुर्बल घटकांचे विशेषकरुन अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे शिक्षण व आर्थिक संबंधी हितांचे जोपासना करेल. सामाजिक अन्यायापासून संरक्षण करेल.

४. **कलम ३५५ नुसार –** संघ वा घटक राज्य सरकारच्या कार्यांमध्ये संबधित सेवा वा पदांसाठी नियुक्ती करतांना मागासलेल्या जातींचे हित सांभाळले जाईल.

५. **कलम ३३८ नुसार –** मागासलेल्या जातींच्या रक्षणासाठी घटक राज्यात सल्लागार परिषद वा पृथक विभागाची स्थापनेची तदतूद केलेली आहे. त्याचबरोबर राष्ट्रपती विशेष अधिकारी नियुक्त करतील.

वरील तरतुदींमुळे राखीव जागांचे धोरण स्विकारण्यात आले व ही विशेष संधी खालील तीन प्रकारे दिली जाते.

१. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या लोकांना लोकसभेत व राज्यांच्या विधान सभांमध्ये आणि पंचायती व स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा.

२. मागासलेल्यांसाठी म्हणजे अनूसचित जाती आणि जमाती बरोबरच इतर मागासवर्गीयांसाठी शासकीय नोकऱ्यांमध्ये राखीव पदे.

३. मागासलेल्यांसाठी शैक्षणिक सुविधा – मागासलेल्यांमध्ये अनु. जाती व अनु. जमाती व इतर मागासवर्गीयांचा समावेश होतो. अर्थात मागासलेले कोण? हे राष्ट्रपती ठरवतात त्यासाठी कलम – ३४० अंतर्गत आयोग स्थापन करतात.

''भारतीय राज्यघटनेने अस्पृश्यतेचे उच्चाटन केले आहे. प्रौढ मतदान आणि अस्पृश्यांसह सर्व मागास जातींना (अनु. जमाती) व मानवी समाजाच्यापरिघाबाहेर ठेवलेले आदिम जमातींना – आदिवासींना (अनु. जाती) ३३० ते ३४२ कलमान्वये घटनात्मक संरक्षण केले आहे. त्याचप्रमाणे कलम ३४० अन्वये भारतातील सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गाची स्थिती सुधारण्यासाठी संरक्षण दिले आहे. याच कलमानुसार मंडल आयोगाची स्थापना झाली होती.''५

अल्पसंख्याकांना घटना मसुद्यात संरक्षण ठेवल्याबद्दल त्या काळी टीका करण्यात येत होती. या टिकेला उत्तर देतांना बाबासाहेब म्हणतात अल्पसंख्याकांना संरक्षणे देण्यात घटना–समितीने शहाणपण दाखविले आहे. बहुसंख्य व अल्पसंख्य या दोघांनीही आजवर चूकींचे मार्ग धरले आहेत. अल्पसंख्यांकांनी चिरकाल अल्पसंख्य राहणे ही त्यांची चूक आहे. या योजनेत अल्पसंख्याकांचे अस्तित्व प्रथमत: मान्य केले पाहिजे. त्याचप्रमाणे बहुसंख्य व अल्पसंख्य यांचे हळूहळू अभिसरण करणारी अशी ती योजना पाहिजे. हे दोन्ही हेतू साध्य करणारी योजना घटनामसुद्यात असल्यामुळे तिचे स्वागत केले पाहिजे.६

**समारोप**

आरक्षण वा राखीव जगाच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. भारतीय संविधानात तरतूदी करून मागासलेल्या जाती समूहांना मुख्य प्रवाहात येण्याची संविधानात्मक संधी प्रदान करून दिली. म. फुलेंनी सिध्दान्तांचे बिजारोपन केले शाहु महाराजांनी आपल्या संस्थानात आरक्षणाच्या धोरणाची अंमलबजावणी केली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आरक्षणाची सिध्दांत रुपाने मुद्देसुद मांडणी केली. आरक्षणाची तरतुद ही सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक बाब आहे व या धोरणास सर्वमान्यता मिळणे देखील आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेले व अनुसुचीत जाती व अनुसुचीत जमातीसाठी भारतीय संविधानात खास तदतुदी केल्या. कारण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर केवळ राजकीय लोकशाही प्रस्थापित करून चालणार नाही कारण सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी आर्थिक व सामाजिक लोकशाही रुजविणे आवश्यक आहे. त्याद्वारे निकोप लोकशाही रुजू शकेल. खराखुरा सामाजिक न्याय प्रस्थापित होऊन न्यायाधिष्टीत व समताधिष्टीत समाज व्यवस्था प्रस्थापित होऊ शकेल.

**संदर्भ**

१) Dr. Ambedkar : Writing and Speeches Vol. 09 P. 188.
२) Dr. Ambedkar : Writing and Speeches Vol. 09 P. 188.
३) समाज प्रबोधन पत्रिका, ऑक्टो–डिसेंबर २०१६, जाधव राजरतन, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वातंत्र्यपूर्व काळातील राजकारण, ०९७३–२८४५ पृ. ५३.
४) कसबे रावसाहेब, डॉ. आंबेडकर आणि राज्यघटना, सुगावा प्रकाशन, पूणे, २००१, पान नं. ६२.
५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, पंदेरे शांताराम, डॉ. आंबेडकर आणि राखीव जागांचा प्रश्न, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, मुंबई, पान नं. ३१९.
६) आंबेडकरांचे समाजचिंतन : संपा. डॉ. भा. फडके, पान– १६९.
७) कसबे रावसाहेब, आंबेडकरवाद, तत्व आणि व्यवहार, सुगावा प्रकाशन पुणे, १९८९.
८) कसबे रावसाहेब, डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना, सुगावा प्रकाशन पुणे, २००१.
९) गायकवाड किशोर, घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गंधर्ववेद प्रकाशन, २०१०.
१०) पुरोहित पंकज पाल, आरक्षण सामाजिक राजनैतिक एवं महिला परिदृष्य, रीतु पब्लिकेशन, जयपुर, २०१४.
११) मिश्रा महेंद्रकुमा, भारतीय संविधान में आरक्षण एवं राजनिती, राज पब्लिशिंग हाऊस, जयपुर, २००९.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर : संविधान आणि सामाजिक न्याय

**– निलेश एस. खिल्लारे**
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**प्रस्तावना**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलितांचे पुढारी आहेत असे चित्र भारतातील प्रतिगामी विचारवंतांनी रेखाटले आहे. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजेच डॉ. बी. आर. आंबेडकर नावाच्या ह्या व्यक्तिमत्त्वाने १२६ वर्षापूर्वी आपल्या जातीव्यवस्थेतील अस्पृश्य समजल्या जाणाज्या दलित कुटुंबात जन्म घेतला. बाल्यावस्थेपासूनच स्वतःच्या प्रत्यक्ष अनुभवातून, तीक्ष्ण समाज निरीक्षणातून आणि दीर्घ चिंतनातून बाबासाहेबांनी या समाजकंटकी जातीव्यवस्थेचे उच्चाटन करण्याचा संकल्प केला. यासाठी त्यांनी गहन अभ्यास करुन तर्कशुद्ध दृष्टी आणि चिकित्सा यांचे हत्यार वापरले आणि आपल्या दुरगामी विचारांनी केवळ दलित समाजाचा नव्हे तर संपूर्ण भारताच्या उन्नतीचा, विकासाचा आणि समतेचा आलेख रेखाटला. आपल्या संशोधित कार्यप्रणालीतून त्यांनी स्वतंत्र भारताचे भविष्य लक्षात ठेवून जे कार्य केले ते पाहता बाबासाहेब हे केवळ एक व्यक्ति म्हणून नसून एक ‘ज्वलंत विचार’ आहे. वैचारिक लोकांसाठी एक विद्यापीठ व ज्ञानपीठ आहेत. बाबासाहेबांचा प्रत्येक विचार हा मौलिक प्रशासन साकार करणारा आहे. म्हणून बाबासाहेब म्हणजेच एक ‘उत्तम प्रशासन’ असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार हळूहळू का होईना आता प्रगल्भ विचारवंतांनी मान्य करण्यास सुरूवात केली आहे, ही समाधानाची बाब आहे. डॉ. आंबेडकरांनी मानवी जिवनाशी संबंधित असलेल्या विषयांवर शिवाय आर्थिक, सामाजिक, न्याय, धर्मव्यस्था, संरक्षण, नैसर्गिक संकटे इ. बाबतीत प्रभावी मार्गदर्शन केले. डॉ. आंबेडकरांचे मार्गदर्शन आजही भारतीय प्रशासन व्यवस्थेत पदोपदी यशोपदायी ठरले आहे. बाबासाहेबांचे विचार या देशाच्या तळागळातील माणसांच्या विकासासोबतच देशाच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त आहेत हे निर्विवाद आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते. त्यांना प्रत्येक क्षेत्राचे परिपूर्ण ज्ञान व माहिती होती. सामाजिक, राजकिय, शैक्षणिक, धार्मिक, आर्थिक, कायदे. इ. वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये आंबेडकरांनी श्रमिकांच्या विस्थापितांच्या, शोषितांच्या अंधकारमय जीवनाला प्रज्ञेचा संदेश दिला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान आणि सामाजिक न्यायासंबंधी देखील महत्त्वाचे योगदान राहिलेले आहे.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये**

१. सामाजिक न्याया संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका अभ्यासणे.
२. सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक इ. सर्व प्रकारच्या न्यायासाठी भारतीय संविधान कसे कारणीभूत ठरते? याचा अभ्यास करणे.
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा एक कायदेतज्ञ म्हणून अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोध निबंध हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक न्यायाच्या सबंधीत आहे. या विषयाचे अध्ययन तटस्थपणे करतांना ऐतिहासिक, विश्लेषणात्मक व तुलनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. याचप्रमाणे प्रस्तुत अभ्यास वस्तुनिष्ठपणे करण्याचे एक प्रयोजन आहे. काही मुलभूत संदर्भग्रंथाचा, तळ टिपांचा उपयोग प्रस्तुत अभ्यासात करण्यात आला आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सर्वात महत्त्वाचे कार्य सांगायचे झाले तर भारतीय संविधान निर्मितीचे होय. सन १९४६ मध्ये नवीन प्रांतिक सरकारांच्या कामकाजास सुरूवात झाली आणि सरकारला महत्त्वाचे काम करावयाचे होते व ते म्हणजे भारताची राज्यघटना तयार करण्याचे भारतीय संविधान निर्मितीची प्रक्रिया सन १९०९ च्या मोर्ले–मिंटो सुधारणा कायद्यापासून सुरू झाली. ती संविधान सभेने संविधान स्विकारेपर्यंत म्हणजेच २६ नोव्हेंबर १९४९ चालली. यातील महत्त्वाचा कायदा १९१९ चा मॉट्येग्यू चेम्सफर्ड सुधारणा कायदा आहे. या कायद्याने भारतीयांना मर्यादित राजकीय, आर्थिक आणि सामाजिक स्वातंत्र्य दिले होते. हा कायदा १९१९ ला बनविण्या अगोदर १९१८ च्या साऊथ ब्युरो कमिशन समोर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निवेदन देवून साक्ष दिली होती. त्यात ज्या मागण्या प्रामुख्याने केल्या होत्या त्या १९१९ च्या मॉट्येग्यू चेम्सफर्ड सुधारणा कायद्यामध्ये समाविष्ट करण्यात आल्या होत्या.

१९१९ च्या सायमन कमीशनने केलेल्या शिफारशीनुसार, इंग्रज संसदेने गोलमेज परीषद आयोजित केली होती. या परिषदेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आमंत्रित करण्यात आले होते. परंतु या गोलमेज परिषदेवर काँग्रेसने बहिष्कार घातला. तरीसुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर गोलमेज परिषदेला उपस्थित राहीले व इंग्रज सरकारला भारताला कोणत्या प्रकारच्या कायद्याची गरज आहे ते त्यांनी पटवून दिले. तसेच भारतातील प्रांतीक व केंद्रीय कायदेमंडळाची रचना कशी असावी हे त्यांनी सांगितले. यावरून असे लक्षात येते की, डॉ. आंबेडकरांचे या कायद्यात अतिशय महत्त्वाचे योगदान होते.

१७ डिसेंबर १९४६ ला डॉ. आंबेडकरांना संविधानाच्या प्रारूपावर मत मांडण्यासाठी बोलविण्यात आले. व त्यांनी अतिशय चांगल्याप्रकारे मत मांडले आणि संपूर्ण सभागृहाने एकाग्रचित्त होवून डॉ. आंबेडकरांचे विचार ऐकले. शेवटी डॉ. आंबेडकरांनी भारताची राज्यघटना २ वर्षे ११

महिने १८ दिवसात लिहून पूर्ण केली. त्यांनी राज्यघटनेबद्दल असे उद्गार काढले की, ''मला वाटते, राज्यघटना कितीही चांगली असली तरी, ती आंमलात आणणारी लोकचं जर वाईट असतील तर तीची फलनिष्पती निश्चितच वाईट होईल.'' फलनिष्पती ही पूर्णपणे, राज्यघटनेच्या स्वरूपावर अवलंबून नसते. राज्यघटना केवळ देशाला विधिमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ अशा प्रकारची साधने उपलब्ध करून देवू शकते. या साधनांचे कार्य लोक आणि त्यांच्या इच्छा प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी उभारलेले राजकीय संघटना व त्यांचे राजकारण यावरच अवलंबून असते. भारतातील लोक आणि त्यांचे पक्ष कसे वागतील हे कोण सांगू शकेल?

**भारतीय राज्यघटना आणि सामाजिक न्याय**

सामाजिक नियम समाजात संविधानाद्वारे राज्य सरकार, विविध संघटना, संस्थापक लागू करत असतात. समाजाचे हित हेच लोकांचे हित आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातील मुलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वांच्या माध्यमातून नागरीकांना सामाजिक न्याय दिला आहे. समाजातील सामाजिक व आर्थिक समानता कायद्याने दूर करण्याचा प्रयत्न केला असून, संघर्ष विरहीत समाज निर्माण करण्याचा मार्ग दाखवला आहे.

संविधानातील सरनामामध्ये सामाजिक न्याय, आर्थिक न्याय आणि राजकीय न्यायाची तरतुद करण्यात आली आहे. सामाजिक न्याय हा माणसा-माणसातील संबंधावर अवलंबून असल्यामुळे मानवी मनात परीवर्तन घडवून आणले जात आहे. त्यामध्ये नेतृत्त्वाची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. माणसा-माणसातील असमानता दूर करण्याचे व समाजात सहयोग, सहाकार्य वाढविण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून केले आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक न्यायाची संकल्पना**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक न्यायाची संकल्पना ही भारतीय राज्यघटनेमध्ये आलेली दिसते. त्यांनी समाजातील प्रत्येक थरातील व्यक्तिला सामाजिक न्याय देण्याचा प्रयत्न भारतीय संविधानाच्या माध्यमातून केलेला दिसतो. भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेमध्ये आम्ही भारताचे नागरीक सन्मानाने स्वीकारतो की, भारत हे सार्वभौम, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही गणराज्य आहे. आणि याद्वारे समाजातील सर्व नागरीकांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाची हमी देतो. त्यामध्ये संधी आणि प्रतिष्ठेची समानता, धर्म आणि पूजाविधीचे स्वातंत्र्य आणि बंधुत्व यांचा समावेश होतो.

न्यायाचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात. त्यामध्ये १) कायद्याद्वारे मिळणारा न्याय आणि २) सामाजिक कायद्याद्वारे मिळणारा न्याय म्हणजेच राष्ट्रीयत्व आणि सद्सद्विवेकबुद्धी यावर आधारीत कायद्याची काटेकोर अंमलबजावणी होय. समाजातील प्रत्येकाच्या गरजा समान नसतात. जसे की, अपंगांच्या गरजा वेगळ्या असतात. त्यामुळे त्यांना वेगळ्या प्रकारचे कायदे बनवावे लागतात. म्हणून न्यायाचे दोन प्रकार असलेले दिसतात. तसेच न्यायाचा विचार करीत असतांना सामाजिक न्याय हा आर्थिक न्यायाच्या अगोदर येतो आणि आर्थिक न्याय राजकीय न्यायाच्या अगोदर येत असतो. यावरुन असे लक्षात येते की, राजकीय स्वातंत्र्यापूर्वी सामाजिक सुधारणा देखील महत्त्वाची असते. अस्पृश्यता, सामाजिक विषमता, जाती व्यवस्था, वर्ग व्यवस्था, हुंडा पद्धती, सती प्रथा इ. स्वरूपातील गोष्टी नाहीशा करणे ही सामाजिक न्यायाची मुळ संकल्पना आहे.

भारतीय संविधानातील प्रस्तावनेमध्ये सामाजिक न्यायाचे ध्येय गाठण्यासाठी विविध प्रकारची प्रावधाने करण्यात आली आहेत. जसे की कलम १७ अस्पृश्यता निवारण, कलम १८ पदव्यांच्या संबंधातील, तसेच कलम १५,१६,३३ हे राज्याला शैक्षणिक संस्थामध्ये आणि शासन सेवेत अनुसूचीत जाती/जमाती आणि इतर मागासवर्गांना आरक्षण देण्यासंदर्भातील आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे, ''शिक्षण किंवा ज्ञान हीच शक्ती आहे.'' सरकारच्या सेवेमध्ये आरक्षणाची तरतूद असल्यामुळे वंचित वर्गाला आर्थिक स्वरूपाचे बळ मिळाले आहे. आरक्षणामुळे त्यांच्या मुलांना चांगले शिक्षण आणि माणूस म्हणून सन्मानाने जगण्याची समाजामध्ये एक संधी मिळाली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधान लिहिण्यास सुरूवात केली तेव्हा त्यांनी समाजातील सर्व स्तरातील लोकांचा विचार केला व सर्व लोकांना न्याय मिळावा अशा पद्धतीने त्यांनी संविधान लिहिले आहे. त्यांना समाजाची अशी पुनर्रचना करायची होती की, ज्यात महिला आणि पुरूषांना एकसारखेच मुलभूत अधिकार मिळाले पाहिजे जे की, त्यांच्या श्रेष्ठतेवर अवलंबून राहणार नाहीत.

**समारोप**

थोडक्यात न्याय म्हणजेच समाजातील सर्व जाती-जमातीमधील दुर्बल घटकांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विकास करणे होय. आज भारतीय संविधानाचे जनक या गुणविशेषासह डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची संपूर्ण जगात एक आगळी-वेगळी ओळख निर्माण झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा द्रष्टेपणा लक्षात घेवूनच दक्षिण आफ्रिकेचे नेते नेल्सन मंडेला यांनी आणि नेपाळने आपल्या देशाची राज्यघटना बनवतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा सखोल अभ्यास केला होता. आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सामाजिक न्याय आणि लोकशाही विचारधारेचे प्रतिक बनले असून डॉ. रामचंद्र गुहा यांच्यासारख्या थोर इतिहासकाराने तसेच नोबेल पुरस्कार विजेते अमर्त्य सेन यांनी आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा गौरव केला आहे.

**संदर्भ**


१. भारताचे संविधान : भारत सरकार विधी व न्याय मंत्रालय, २०११.
२. जाधव, नरेंद्र (२०१५) : डॉ. आंबेडकर राजनीती, धर्म और संविधान, विचार प्रकाशन दिल्ली.
३. कीर, धनंजय (२०१६) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
४. कुबेर, वा. ना. (१९९८) : डॉ. आंबेडकर : विचारमंथन, सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे.
५. बहुजन संस्कृती प्रकाशनचे, तथागत मासिक, एप्रिल २०१७.
६. लोक प्रशासन पत्रिका, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार विशेषांक, जुलै-डिसेंबर २०१६.
७. कसबे, रावसाहेब (२०१४), डॉ. बाबासाहेब आणि भारतीय राज्यघटना, सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मानवतावाद

– प्रा. डॉ. आर. जी. खैरनार
राज्यशास्त्र विभाग
कला व विज्ञान महाविद्यालय, सोनगीर

**प्रस्तावना**

प्रत्येक विचारवंत किंवा व्यक्तिची विचाराधारा ही त्याच्या वरील असलेल्या कौटूंबिक, सामाजिक, शैक्षणिक इत्यदी संस्कारातून तयार होत असते. त्याच्या विचारांचा एका विशिष्ट दृष्टीकोणाचे का आहेत, हे शोधण्यासाठी त्याची पूरपिठिका शोधवा लागते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रत्येक मानवाच्या हक्कासाठी विचार मांडणारे विचारवंत नाहीत तर ते प्रत्यक्षात मानवाच्या हक्कांना मनवाला कसे मिळून देता येतील. यासाठी सतत प्रयत्नशील असलेले मानवनिष्ठ व्यक्तिमत्त्व होत. त्यांनी एका विशिष्ट समाज किंवा वर्गाला मानवी दृष्टीने बघितले नाही. तर त्यांनी प्रत्येकाला मग तो माझा आहे किंवा नाही हे न बघता तो मानव आहे, म्हणून त्याचा हक्कांसाठी प्रयत्न केले आढळते. त्या अर्थाने डॉ. आंबेडकर मानवतावादी आहेत का? या शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तूत शोध निबंधात करण्याचा प्रयत्न केलेला आहे. डॉ. आंबेडकरांचे स्वातंत्र्यपूर्व काळातील किंव स्वातंत्र्योत्तर काळातील कार्यांवरून ते मानवतावादी असल्याचे दिसतात. ते एक अर्थशास्त्रीय, समाजशास्त्री, घटनाकार, वकील, प्रबोधनकार असले तर त्यांनी अधिकाधिक कार्य मानवाच्या कल्याणासाठी केले असल्याने ते मानवतावादी आहेत, असे लक्षात येते. त्या अनुषंगाने प्रस्तूत शोध निबंधाची मांडणी करण्यात आली आहे.

**उद्देश**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकारांच्या मानवतावादी विचारांचे अध्ययन करणे.
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकारांच्या कार्यांमधून मानवतावादाचा शोध घेणे.

स्वातंत्र्यपूर्व भारतात एकीकडे राजकीय क्षेत्रात ब्रिटिशांचे शासन तर दुसरी कडे सामाजिक क्षेत्रात परंपरा, रूढींचे शासन होते. परिणामी भारतीय समाज चातुर्वण व्यवस्था, जातीभेद, कनिष्ठ–वरिष्ठ, छुताछात, अस्पृश्यता इत्यादीमुळे दुभंगलेला होता. समाजातील बहुसंख्य वर्ग अज्ञान, अन्याय आणि दास्यत्वाच्या जीवना खितपत पडलेला होता. अशा वेळी स्वातंत्र्य चळवळीला ही बाधा होऊ नये व समाजातील बहुसंख्य वर्गाला ही मानव म्हणून जगता यावा यासाठी फक्त विचार मांडणारे नव्हे तर त्यासाठी प्रत्यक्ष प्रयत्न व कृती करण्याचे कार्य डॉ. आंबेडकर यांनी मानवाला मानव म्हणून जगता यावा यासाठी सतत प्रयत्न केलेले दिसून येतात. त्यांनी केलेल्या कार्यातून व दिलेल्या विचारांतून त्यांच्यातील मानवतावाद दिसून येतो. त्याचे विश्लेषण पुढील प्रमाणे करता येईल.

**स्वातंत्र्यपूर्व काळात केलेले सत्याग्रह व कार्य**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर उच्च शिक्षण घेत असतांनाच एक मानव म्हणून त्याला परदेशात मिळालेला सन्मान व भारतात मिळालेली वागणूक यावरून त्यांच्या कार्याची व विचारांची दिशा निश्चित होत गेलेली दिसते. म्हणूनच त्यांनी उच्च शिक्षण घेत असतांनाच बहुजन समाजाच्या हक्कांच्या लढाईची सुरूवात केली. भारतात स्थायिक झाल्यानंतर त्यांनी अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली. यामागील कारण म्हणजे त्यांना अशा मानवी समाजाला पुढे आणावयाचे होते, ज्या समाजातील व्यक्तीला वर्षोनुवर्षे मानव म्हणून स्वीकारले गेले नव्हते. हे करत असतांना त्यांनी रक्तरंजीत संघर्षाची सुरूवात केली नाही, तर कायद्यान्वये व समोपच्चारने आपल्याच बंधवांशी तात्त्विक लढा देऊन हक्क व सन्मान मिळून द्यावयाचे होते. आणि त्यासाठीच ते सतत प्रयत्नशील असल्याचे दिसून येतात.

भारतातील बहुजन समाजातील प्रत्येक मानवाला त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठीच त्यांनी १९२७ मध्ये महाडच्या चवदार तळ्यासाठी, १९३० मध्ये नाशिकच्या काळाराम मंदिरातील प्रवेशासाठी सत्याग्रह केले. मनुस्मृती हे ग्रंथ मानवी हक्कांचा उल्लंघन करणारा आहे, व मानवतावादाच्या विरोधी असलेला ग्रंथ असल्याने त्यांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी त्याचे दहन केले. हे सर्व प्रस्थापितांना विरोध करण्यासाठी त्यांनी केले नाही तर त्यांनी बहुजन समाजातील व्यक्तींना ते मानव आहेत, याची जाणीव करून देण्यासाठी अनेक उपक्रम राबविले. त्यासाठी बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना करून शिक्षण प्रसाराचे व शिक्षण देण्याचे कार्य सुरू केले. मूकनायक, बहिष्कृत भारत या साप्ताहिकेतून दलित, पददलितांच्या, स्त्रियांच्या, शेतक–यांच्या व समाजातील मागासलेल्यांच्या दुःखांना वाचा फोडली.

**मूलभूत हक्क**

डॉ. आंबेडकरांना मानवी प्रतिष्ठा व मानवी कल्याण यावर अपार श्रध्दा होती. प्रत्येक व्यक्तीचा विकास व समाजात प्रत्येक मानव समान आहे. त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असलेली हक्क त्याला मिळालेच पाहिजे, या विचारांवर ते ठामच नव्हते, तर त्यासाठी ते सतत प्रयत्नशील असल्याचे दिसून येतात. याचाच एक भाग म्हणून त्यांनी अनेक घटनांचा अभ्यास करून भारतीय नागरिकांसाठीच नव्हे तर व्यक्तींसाठी ही मूलभूत हक्कांची तरतूद भारतीय राज्यघटनेत केली. मूलभूत हक्कांची तरतूद करीत असतांना मानवतावादी दृष्टीकोण समोर ठेवूनच ही मूलभूत हक्क विशिष्ट जात, धर्म, भाषा लिंग, प्रदेश इत्यादी मानवी भेद न ठेवता एक मानव म्हणून त्याच्या सर्वांगीण विकाससाठी पूरेसे हक्के भारतीय राज्यघटनेत समाविष्ट केल्याचे दिसून येतात. ही हक्क शासन किंवा संस्थेने संकुचित करू नये यासाठी न्यायालयीन संरक्षणाची विशेष तरतूद राज्यघटनेत केल्याची दिसून येते. भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क हे डॉ. आंबेडकरांची मानवतावादी विचार किती प्रग्लभ आहेत, हे दर्शवितात.

**धर्म**

डॉ. आंबेडकर धर्माचा आधार मानवाला मानतात. त्यांच्या मते मानव धर्मासाठी नाही, तर धर्म मानवासाठी आहे. धर्माचा केंद्रबिंदू मानवता आहे. त्यामुळे धर्म हा मानवाच्या विकासासाठी असावा, त्यात मानवी कल्याणाची मूल्य असावी, नव्हे तर मानव मानवात भेद निर्माण करणारी तत्त्व असावी. त्यांच्या मते समात, बंधुभाव, स्वातंत्र्य, उदारता, सहअस्तित्व, करूणा, सहकार्य ही सद्‌गुण ख-या धर्माची प्रस्थापना करतात, आणि तोच ख-या धर्म आहे. त्यासाठी त्यांनी हिंदू धर्म सुधारणेचे भरपूर प्रयत्न केले. त्यांच्या मते धर्म हा कधी ही वाईट असू शकत नाही. मात्र धर्माचे रक्षणकर्ते स्वतःच्या स्वार्थासाठी धर्माचा उपयोग करून समाजात भेदभाव निर्माण करतात. म्हणूनच त्यांनी तथाकथित धर्माच्या रक्षणकर्त्याविरूध्द चळवळ उभारली, व धर्म सुधारणेचा प्रयत्न केला, व शेवटी मानवी कल्याणासाठी, व्यक्तीची प्रतिष्ठा, गरिमा पुनः प्राप्त करून देण्यासाठीच त्यांनी बौध्द धर्माचा स्विकार केला.

**लोकशाही**

मानवी कल्याण व सर्वांगीण विकास फक्त लोकशाहीतच होऊ शकतो, असा प्रबळ विचार डॉ. आंबेडकरांचा होता. भारतीय परिस्थिती लोकशाही किती यशस्वी होईल, याबाबत डॉ. आंबेडकरांच्या मनात शंका होती, कारण लोकशाहीसाठीच हवी असलेली परिस्थिती भारतात नव्हती, जातीय राजकारण, विभिन्न सांस्कृतिक, भाषिक, प्रदेशिक, जातीय गट, समाजात असेलीली निरक्षरता, अज्ञानता, जातीभेद वएकाच जातीत परत जीतय स्तर अशा विभिन्न सामाजिक समस्यां असलेल्या भारतात लोकशाही कितपत टिकेल हा प्रश्न होताच. मात्र तरीही हुकुमशाही पेक्षा झुंडशाही असलेली संसदीय लोकशही पर्यायाने त्यांनी भारतासाठी निवडली. कारण भारतातील प्रयत्न मानवाला स्वातंत्र्य, समता मिळवून द्यावयाची होती. लोकशाहीचा आधार व्यक्ति विकास असल्याने, मानवी हक्क अधिकाधिक व तळगाळातील लोकांपर्यंत पोहचविण्याचे लोकशाही हेच मार्ग असल्याने त्यांनी भारतात संसदीय लोकशाहीचा पुरस्कार केला. या लोकशाहीच्या माध्यमातून प्रत्येक भारतीयाला आर्थिक, सामाजिक, राजकीय न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न आंबेडकरांनी केलेला दिसून येतो.

**समारोप**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सुरूवाती पासूनच मानवी हक्कांचे व मानवी विकासाचे पक्षध्दर असल्याचे दिसून येतात. त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात समाजातील शोषित वर्ग, पिडित मानवजातीच्या उध्दारासाठी प्रयत्नशील असल्याचे दिसून येतात. त्यांनी मानव जातीसाठी कार्य करतांना विशिष्ट जातीला महत्त्व दिलेले दिसून येत नाही, तर त्यांनी दलित, पददलित, आदिवासी, स्त्री, भटके विमुक्त, शोषित शेतकरी, भूमिहीन अशा सर्व वर्गातील मानवासाठी कार्य केलेले दिसून येते. त्यांचे लोकशाही, धार्मिक, आर्थिक, समाजिक, राजकीय तसेच राष्ट्रीय विचारांचा केंद्रबिंदू मानव आणि मानवी कल्याण हेच असल्याचे दिसून येते.

**संदर्भ**


१) भोळे भास्कर लक्ष्मण, आधुनिक भारतीय राजकीय विचार, पिंपळापूर अण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, दुसरी आवृत्ती २००३

२) पाटील वा. भा., प्राचीन व आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन, जळगांव, २००९

३) कुबेर वा. न., डॉ. आंबेडकर: विचारमंथन, केसरी प्रकाशन, पुणे, १९७२

४) देवरे पी.डी., विसपुते एस. एम., आधुनिक भारतीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन, जळगांव, २००४

५) आगलावे प्रदिप, समाजशास्त्रज्ञ डॉ. बाबसाहेब आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, २००९

# महाड सत्याग्रह

**– प्रा. डॉ. डी. बी. जाधव**
दादासाहेब रावल महाविद्यालय, दोंडाईचा, जि. धुळे
**– प्रा. डॉ. डी. यु. देवरे**
दादासाहेब रावल महाविद्यालय, दोंडाईचा, जि. धुळे

आधुनिक काळातील एक थोर विचारवंत झुंजार नेते प्रभावी समाजसेवक आणि प्रकांड पंडीत म्हणुन डॉ. बाबासाहेब अंबेडकर म्हणुन ओळखले जाते. त्यांचा जन्म एका दलीत कुंटुबात झाला ते शुद्र कुटुंबात जन्माला आल्यामुळे त्यांना अस्पृश्यतेच्या यातना व आपमान सहन करावे लागले.त्यामुळे त्यांचा मनावर खोल परिणाम झाला. अपृश्यतेचा यातना व अपमान व यातुन येणारे निराश्य यामुळे शुद्रांना समान मानवी प्रतीष्ठा मिळाली पहिजे. या साठी त्यांनी आयुष्यभर लढा दिला.त्यासाठी त्यांनी हिंदु धर्म ग्रथांचा सखोल अभ्यास केला. हिंदु धर्मातील श्रेष्ठ कनिष्ठ उच्च निच्च जाती व्यवस्था, वर्ण व्यवस्था याचा अभ्यास करुन हिंदु धर्म अपृश्यानां कससा हिन लेखतो. हे त्यांनी स्पष्ठ केले. आणि अपृष्टते विरुध्द व हिंदु धर्मा विरुध्द लढा देण्यास सुरवात केली. अपृश्य वर्गाला वर्ण व्यवस्थेतुन मुक्त करुन त्यांना मनुष्य म्हणुन जगता आले पाहिजे. यासाठी त्यांनी संघर्ष करण्यास सुरवात केली. याची सुरवात त्यांनी महाड येथील तळयावर हरीजनांना पाणी भरु दिले पाहिजे. यासाठी सत्याग्रह केला. हा ससत्याग्रह पाण्यासाठी नव्होता. तर खज्या अर्थाने सामाजिक समतेसाठी होता. याच वेळी त्यांनी घ्मनस्मृती ङ्या ग्रंथाचे दहन करुन हिंदु धर्माला हदरा दिला. कारण म्हणजे मनस्मृतीने जाती व्यवस्थेचा पुरस्कार करुन अपृष्टांना हिन लेखले होते.

मुंबई असेम्ली श्री.एस.के.बोले यांनी ऑगस्ट १९२३ मध्ये एक महत्वाचा ठराव पास केला होता. या ठरावाव्दारे अपृश्यांना राज्यातील विहीरी तलाव हौद नदी इ.सर्व सार्वजनीक पाणओटयांवर तसेच शाळा ,दवाखाने,न्यायालये,इ. सार्वजनीक ठिकाणावर बंदी केली जाणार नाही.असे ठरवीले होते. व मुंबई सरकारने सर्व खात्यांना या ठरावाची अंबलबजावनी करण्याचे आदेश दिले होते. परंतू या सरकारी अदेशाची अंबलबजावणी प्रत्येकक्षात होण नव्होती. प्रत्येकक्ष व्यावहारात अपृष्टांना सार्वजनिक ठिकाणी मज्जाव केला जात होता. पाणी पिण्याचा हक्क हा मानवी आहे. तसेच त्याला कायदयाचा आधार आहे. याची प्रत्यक्ष प्रचिती पहावी म्हणुन महाडचा सार्वजनीक चौदार तळयावर आपला हक्क बजावण्याचे डॉ.बाबासाहेब अंबेडकरांनी ठरवीले .

महाडचा परिसर हा बाबा साहेबांनी लहाणपणापासुन पाहिला होता. या भागात महाराष्ट्रातील लष्करातुन निवृत्त झालेल्या लोकांचे वास्तव्य होते. व वडीलांसोबत सामाजिके कार्यात भाग घेतलेले कार्यकर्ते ही होते. हे सर्व लोक वेळ प्रसंगी जिवाचे बलीदान करण्यासही तयार होते. याची त्यांना खात्री होती. तसेच महाडच्या तलावा संबधी महाड नगरपरिषदेने हा तलाव सर्वाननिक आहे व यातील पाणी सर्व लोकांना हस्पृष्टा सगत मुक्त आहे असा ठराव पास केला होता. तेव्हा आपण जो लढा देत आहोत तो कायदयाचे उल्लघन करणारा नसुन त्या कायदयाचे अंबलबजावणी करणारा आहे. असा पावीत्रा डॉ.अंबेडकरांनी घेतला होता. खाजगी पाण ओटयावर अपृष्टांना अधिकार नाकारता आला असता परंतू नगरपरिषदेच्या हद्दीतील सार्वजनिक तलावावर नगरपरिषदेने ठराव संमत केल्यानंतर हा अधिकार मानुस म्हणुन आम्ही बजावीत आहोत तशी भुमिका डॉ. अंबेडकरांची होती. १९ मार्च १९२७ रोजी महाड परिषदेला सुरवात झाली त्यासाठी गुजरात व महाराष्ट्राचा खेडयापाड यातुन सुमारे पाच हजार लोक जमले होते. त्यावेळी पाणही मिळणार नाही म्हणुनच चाळीस रुपयाचे पाणी स्पृष्य लोकांनकडुन विकत घेण्यात आले. सायकांळी परिषदेला सुरवात झाली तेव्हा आपल्या भाषणातुन डॉ.बाबासाहेबांनी आचार विचार उच्चार या त्री सुत्रीचे अवलंब करा. मृत मांहसाहार करु नका, उष्टे अन्न ग्रहन करु नका, उच्च निच्च नत्वाची कल्पना सोडुन पाढरपेशेपणा स्विकारा. तसेच शेती व्यवसाय करा. असे स्वाभिमान जगवणारे भाषण दिले त्याचा मोठा परिणाम झाला.

दुसऱ्यादिवशी अधिवेषणाला सुरवात झाली तेव्हा महाड मुन्सीपालटी चा ठरावाव्दारे भहिकृत समाजाला चवदार तळयावर पाणी भरण्यास बंदी नाही. असा जो ठराव केला आहे. त्याची अंबलबजावणी करावी. अश्याप्रकारचा ठराव करण्यात आला.म्हणुन डॉ.बाबासाहेबांचा पाठोपाठ पाच हजार लोक गावातुन मिरवणुकीने चवदार तळयावर पोहचले तेथे सर्व प्रथम बाबासाहेबांनी आणि त्यांचा पाठोपाठ सर्व जणसमुदायने ओझळीने तलावातील पाणी पिऊन आपला हक्क बजावला व सर्व लोक सभास्थानी परत आले. त्यामुळे एक वेगळा उत्साह व आनंद सर्वाच्या चेहऱ्यावर पसरला होता. त्यांनतंर हे सर्व लोक चार पाच झणांचा गटाने महाड गावात फिरु लागले. तिकडे सणातणी लोकांनी अपृश्याचा बदला घेण्यासाठी गुप्त तयारी केली होती. आपला धर्म संकटात आहे. असा प्रचार करण्यात आला होता. सणातनीचा या गुप्त कटाचे अपृश्यांना कोणतीच कल्पना नव्होती. अचानक या सणातणी गुंडांनी जेवणाचा मंडपावचर चाल केली व बेसावध असलेल्या या लोकांवर सनातणी गुंडांनी अचाणक हल्ला करुन त्यांना लाठयाकाठयांनी इतके झोडपले की ते जेवणाचा पाणावरच बेशुध्द पडले. त्यानंतर त्यांनी गावात फिरणाज्या अपृश्यांनाही मार झोड केली. तेव्हा या मारहाणीचा मोबदला म्हणुन अपृश्यप्रतिनीधीनी एकत्र येऊन प्रतिहल्ला करण्याची तयारी करु लागले. तेव्हा बेशुध्द झालेले प्रणातीक वेदनेने तळमळणाज्या आपल्या बांधवांना पाहुन डॉ.बाबासाहेबांचे रक्त उसळले. परंतू त्यांनी मोठया विवेकाने आपला राग आवरला आपल्या अनुयांना ते गंभीरपणे म्हणाले की यावेळी हात आवरुन मने शांत ठेऊन अपणास प्रतिहल्ला करायचा नाही. मार सहण करावयाचा व सणातत्यांना अहिंसेच्या शक्तीचें दर्शन घडवायचे अशी आज्ञा केली तेव्हा दहा हजार अपृश्य समाज या संकटास तोंड देण्यास सज्ज झाला. जर त्यांनी प्रतिपक्षावर हल्ला केला

असतातर त्यांना सडोकीपडो करुन सोडणे अशक्य नव्होते. परंतू त्यात अत्यंत शांत पणे आपल्या नेत्यांची आज्ञा मानुनु त्यांनी आपल्या सणह शिलतेची परिक्षा दिली. प्रतिपक्षावर हल्ला करुन जे साध्य झाले नसते. ते बाबासाहेंबानी मुत्सदेगिरीने व शांताता भंग होऊ न देता घडुन आणले. हा सर्व प्रकार संप्लानंतर पोलीस आलेत. तेव्हा स्वत: बाबासाहेबांनी सर्व जखमीनां दवाखान्याने नेले. व उपच्चार केले. त्यानंतर सर्व गावगुंडावर पोलीसांनी खटले दाखल केले. पोलीस स्टेशन मध्ये चौकशी झाली. नंतर गावातील सणातणी व ब्राम्हणांनी विष्णु मंदिरात सभा घेतली. व चौदा तळयाचे शुध्दीकरण करण्याचे ठरवीण्यात आले त्यानुसार १०८ घागरीपाणी चवदार तळयातुन कडण्यात आले घराघरातुन शेण गोमुत्र गोळा करुन त्यात दुध व दही त्या घगरीमध्ये कालवुन ते चवदार तळयात टाकण्यात आले. अशा रितीने चवदार तळयाचे शुध्दीकरण झाल्याचे सांगण्यात आले. म्हणजे माणसाच्या स्पशापेक्षा गाय व बैल यांची विष्टा ,व मुत्र हे जास्त शुध्द समजण्यात येते अशा रितीने चार-पाच दिवसानी पुन्हा तेथील लोकांनी पाणी भरण्यास सुरवात केली.

पोलीसांनी एकुण नऊ गुंडावर खटले भरले होते. त्यापैकी पाच गुंडानां ०६ जुन १९२७ रोजी सक्त मजुरीची शिक्षा ठेकवण्यात आली. अशा रितीने ही परिषद म्हणजे केवळ सभा नव्होती तर अपृश्यता निवारण्याची क्रांती होती. या परिषदेने भारताचा सामाजिक व साजकिय जिवनात एक नविन परवाणा सुरवात झाली कराण पहिल्यांदा दलीत समाज हा आपल्या अन्यायाचा विरोधात प्रत्यक्ष रस्त्यावर उतरला. तेथुन प्रेरणा घेऊन लोक परतलेत. परतूं अन्याया विरुध्द लढयांची शपत घेऊन तेथुन मृत मास खाणे बंद केले, गावातील मेलेली गुरे,ढोर, ओढणे भिक मागणे बंद केले. त्यामुळे मानसिक गुलाम गिरीतुन मुक्त झाले परंतू गावागावातील अपृश्य हिंदुंचा अत्याचारांना व बहिष्कारानां तोंड दयावे लागले. संपुर्ण भारतात अनेक समाज सुधारकांन डॉ. बाबासाहेब अंबेडकरांना आपला पाठिंबा जाहीर केला तसेच महाड येथील बापुराव जोशी व टिपणीस कुटुंबे यांनी या लढयास मोठा पाठिंबा दिला होता.परंतू महाडचा चवदारतळयातले सणातणी लोक व ब्राम्हणांनी शुध्दीकरण केल्याची बातमी एकुन बाबासाहेबांना अती दुख झाले तेव्हा हा अपृश्यतेचा कलंक पुरण्यासाठी कठोर उपाय योजावे लागतील असे त्यांना वाटु लागलें. याच वेळी महाराष्ट्रातील ब्रम्हणेत्तर समाजाचे नेते जेधे आणि जावडकर हे डॉ. अंबेडकरांना भेटले जर आपल्या चळवळीतुन ब्राम्हणांना वगळलेतर आम्ही सर्व ब्राम्हणेत्तर आपल्या लढयात सामील होतो. असे सागिंतले. तेव्हा बाबासाहेब त्यांना म्हणले की, माझी चळवळ ब्राम्हण विरुध्द नाही. तर ब्राम्हण्य विरुध्द आहे. कारण सर्वच ब्राम्हण दलीत विरुध्द आहेत असे नाही. तसेच ब्राम्हणेत्तरातही काही उच्च निच्च मानणारे आहे. तेव्हा त्यांचीही सुचना त्यांनी नाकारली २६ जुन १९२७ च्या बहिकृत भारत या अंकात ज्यांना आपला अपृश्तेचा कलंक पुरावयाचा असेल त्यांनी सत्याग्रह चळवळीत भाग घेण्यासाठी भहिकृत भारत कचेरीवर आपले नाव नोंदावेत असे जाहिर केले. कारण धर्म हा माणसांसाठी आहे. की मानुस धर्मासाठी? आम्ही हिंदु धर्माचे अविभाज्य घटक आहोत की नाही याची शा निशा करणे गरजेचे आहे.

**संदर्भ**


१. डॉ.पाटील बा भा भारतीय राजकिय विचारवंत ,श्री. मंगेश प्रकाशन नागपुर ,१९९८
२. मनू वसंत, डॉ. बाबासाहेब अंबेडकर नॅशनल बुक स्ट्रस्ट इंडिया नवी दिल्ली,१९९१
३. मनू वसंत, समतेचे घोषकार अंबेडकर नॅशनल बुक स्टट्र इंडिया,नवी दिल्ली, २०००

# भारतीय राज्यघटनेचे तत्त्वज्ञान आणि डॉ. आंबेडकर

– प्रा. डॉ. संतोष शिवकुमार खत्री
विद्यावर्धिनी सभेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
धुळे

**प्रस्तावना**

डॉ. भीमराव आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना हे परस्पर पूरक असे दोन शब्द, भारतीय राज्यघटना म्हटले की डॉ. आंबेडकरांचे नाव पुढे येतोच आणि डॉ. आंबेडकरांचे नाव घेतले तर ते भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार अशी एक प्रतिमा डोळ्यांसमोर उभी राहते. तसे म्हटले तर भारतीय राज्यघटना निर्माण करण्यासाठी एक घटना समिती होती. त्यात पंडित नेहरू, डॉ. राजेंद्रप्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल, राजगोपालाचारी, गोविंदवल्लभ पंत, खान अब्दुल गफारखान, मौलाना आझाद इत्यादी एक से एक बडक़र २९६ सदस्य होते. परंतू घटना समितीतून तयार करण्यात आलेल्या उपसमित्यां पैकी सर्वात महत्त्वाच्या समितीचे म्हणजे मसूदा समितीचे अध्यक्षपदी डॉ. भीमराव आंबेडकरांचीच निवड करण्यात आली, हे विशेष उल्लेखनीय असल्याचे जाणवते. एक असे व्यक्तिमत्त्व ज्यांच्या पाठीशी सवर्ण विरोधी, प्रस्थापितांच्या विरोधी चळवळ उभारणीचे लेबल लागलेले होते. त्यामुळे अशा व्यक्तीमत्त्वाचे विचार तपासून घेणे यासाठी ही महत्त्वाचे ठरते, की राज्यघटना निर्मिती मागे त्यांची विचारधारा, तत्त्वज्ञान काय आहे, व त्यांनी राज्यघटनेचा मसूदा तयार करतांना प्रत्येक भारतीय नागरिकाचा विचार केला का ? इत्यादींचा शोध घेण्यासाठी आंबेडकरांची मनोभूमिका समजून घेणे महत्त्वाचे आहे. त्यावेळेस ज्यावेळी देशाचे पंतप्रधान खरोखरच तळागळातील व्यक्ती झालेला आहे. भारतीय राज्यघटनेचा मूळ पाया रचण्याचे कार्य डॉ. आंबेडकरांनी केले, त्यामुळे भारतीय राज्यघटनेच्या मूळतः तत्त्वज्ञानावर आंबेडकरांच्या विचारांचा व तत्त्वज्ञानाचा प्रभाव असणे स्वाभाविक आहे.

**उद्देश**

१) भारतीय राज्यघटनेचे तत्त्वज्ञानाचे अध्ययन करणे.
२) डॉ. आंबेडकरांचे राज्यघटने निर्मिती मागील मनोभूमिका तपासणे.

भारतीय राज्यघटना समितीच्या पाचव्या बैठकीच्या शेवटच्या दिवशी २९ ऑगस्ट १९४७ रोजी मसुदा समितीची स्थापना झाली यात समितीच्या अध्यक्षपदी डॉ. भीमराव आंबेडकर यांची नियुक्ती करून त्यात कृष्णस्वामी अय्यर, एन. गोपालस्वामी अय्यंगार, के. एम मुंशी, डी. पी. खेतान, सय्यद मोहम्मद सदुल्ला आणि बी. एल. मित्तर यांची निवड करण्यात आली. या समितीने विविध देशांच्या राज्यघटनेचा अभ्यास करून भारतीय राज्यघटनेचा पाया रचण्यास सुरूवात केली. या समितीची राज्यघटना तयार करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका यासाठी होती, की त्यांनी दिलेली राज्यघटनेवरच भारताचा व भारतीय स्वातंत्र्याचा भविष्य निश्चित होणार होता. त्यात ही अध्यक्ष म्हणून डॉ. आंबेडकरांचे योगदान सर्वोतोपरी महत्त्वपूर्ण होता कारण अध्यक्षाच्या अनुमतीशिवाय एक सदृढ.व परिपूर्ण, सर्वव्यापक राज्यघटना निर्माण होणे शक्य नाही. यात अध्यक्षाची कसोटी, निष्पक्षपणा, दूरदर्शीता, बुध्दीकौशल्य इत्यादींचा प्रतिबिंब दिलेल्या राज्यघटनेवरून दिसून येणार होता. त्या अर्थाने घटना समितीतील मसूदा समिती अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे लक्षात येते.

प्रत्येक राज्यघटना विशिष्ट आधारभूत सिध्दांतांच्या आधारेचे निर्माण केली जाते. त्याच प्रमाणे राज्यघटना ही राज्यघटना निर्मिती करणा-यांच्या विचारांची प्रतिरूप असते. शाश्वत सन्मान प्राप्ती त्याचा उद्देश असतो, भारतीय राज्यघटना ही या आधारभूत सिध्दांताला अपवाद नाही. भारतीय संविधानाची आधारभूत तत्त्वच भारतीय लोकशाहीचे व पर्यायने डॉ. आंबेडकरांच्या मनोभूमिकेचे चित्रण करतांना दिसून येतात. त्या अनुषंगाने खालील मुद्याच्या आधारे भारतीय राज्यघटनेच्या तत्त्वज्ञानेचे व पर्यायाने आंबेडकरांच्या मनोभमिकेचे अध्ययन करता येईल.

**लोकप्रिय सार्वभौमत्त्व**

डॉ. आंबेडकरांना एक अशी राज्यघटना द्यावयाची होती, ज्यातून लोकशाही बरोबर जनतेने निर्माण केलेली सार्वभौम आणि लोकप्रिय शासन व्यवस्था असेल. ती कोणा एका व्यक्ती विशेष किंवा समुहाने निर्माण केलेली नसून जनतेने स्वतः लोकशाही पध्दतीने तयार केली आहे. असा संदेश ही जगाला द्यावयाचा होता. त्यामुले राज्यघटनेच्या सुरूवातीलाच प्रस्तावने जनतेच्या सत्तेला अधिक प्राधान्य दिल्याचे दिसते. म्हणून त्यांनी विचारपूर्वक राज्यघटनेची सुरूवात केली. त्यात त्यांनी म्हटले की, आम्ही भारतीय लोक दृढसंकल्प करून भारताचे सार्वभौम, धर्मनिरपेक्ष, प्रजासत्ताक, गणराज्य निर्माण करण्याची घोषणा करीत आहोत.

**मूलभूत अधिकार**

डॉ. आंबेडकरांना समताधिष्ठित व मजबूत लोकशाही भारतात प्रस्थापित करावयाची होती. त्या अनुषंगानेच त्यांनी अमेरिका, रशिया व फ्रान्सच्या राज्यघटनेचा अभ्यास करून मूलभूत हक्कांचा समावेश भारतीय राज्यघटनेत केला. लोकशाहीचा आत्मा म्हणजे मूलभूत अधिकार असा त्यांचा विश्वास होता. म्हणूनच त्यांना मूलभूत अधिकारांना घटनात्मक दर्जाच दिला नाही तर त्यात एक महत्त्वपूर्ण अधिकार म्हणजे न्यायालयीन संरक्षणाचा अधिकार भारतीय नागरिकांना प्रदान केला. डॉ. आंबेडकरांच्या मते, भारतात लोकशाहीची परंपरा नाही, भारतातील अधिकतर लोक एकतर गरीब आहेत किंवा निरक्षर आणि त्यांना राजकारणाचा गंध ही नाही, अशा परिस्थितीत राजकर्ते आपल्या स्वार्थासाठी राज्यघटनेचा व मूलभूत हक्कांचा संकोच करू शकतात. परिणामी मूलभूत अधिकारांना घटनात्मक दर्जा दिला गेला, यामुळे

ख–या अर्थाने नागरी लोकशाहीची प्रस्थापना भारतात झाली. आज ही मूलभूत हक्क हे भारतीय राज्यघटनेचा पाया व कणा असल्याचे दिसून येते. त्यामुळेच भारतात लोकशाही टिकून आहे.

**मार्गदर्शक तत्त्वे**

भारतीय राज्यघटनेला पर्यायाने डॉ. आंबेडकरांना भारतात फक्त राजकीय लोकशाही प्रस्थापित करावयाची नव्हती, तर त्यांना आर्थिक व सामाजिक लोकशाही ही प्रस्थापित करावयाची होती. त्या अनुषंगाने फक्त नागरिकांच्या हक्कांचाच विचार राज्यघटनेत होणे महत्त्वाचे नव्हते. तर भविष्यात राज्यकर्त्यांना आर्थिक, समाजिक, प्रशासनिक मार्गदर्शन व्हावे व त्यांनी कल्याणकारी योजना राबवावीत. यासाठी त्यांना मार्गदर्शन करणे क्रमप्राप्त होते. त्यासाठी आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेत ४ विभाग राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे दिला, यात ३६ ते ५१ कलम दिली. ज्याचा प्रमुख उद्देश आहे भारतात आर्थिक व सामाजिक लोकशाही प्रस्थापित करणे. या संदर्भात डॉ. आंबेडकर म्हणतात ही मार्गदर्शक तत्त्वे भारतीय राज्यघटनेचे विशेष वैशिष्ट आहे. विशेष म्हणजे अशा प्रकारचे मार्गदर्शक तत्त्व अमेरिकेच्या राज्यघटनेत ही दिसून येत नाहीत.

**समाजवाद**

ज्या वेळी राज्यघटना तयार करण्याचे कार्य सूरू होते व आर्थिक क्षेत्रात राज्याचा वाढता हस्तक्षेप ही २०वा शतकाची ओळख होती. त्याच प्रमाणे भांडवलवाद आणि साम्यवादी विचारसरणीचा संघर्ष होण्यास प्रारंभ झाला होती. अशा परिस्थिती डॉ. आंबेडकरांची विचारधारा स्पष्ट होती कि प्रत्येक भारतीय नागरिकाला सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय मिळावा, त्यासाठी त्यांनी राज्यघटनेत अशी अनेक तरतूदी केल्या ज्यातून भविष्यात जनकल्याणाची व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्या काही ही अडचण येणार नव्हती. प्रस्तावनेत ही न्याय या शब्दाचा अर्थ ही त्याअनुषंगांनेच स्पष्ट केला जातो. मार्गदर्शक तत्त्वांमध्ये समाजवादाची उद्दिष्टे प्राप्त करण्याची अनेक तरतूदी करण्यात आल्याचे दिसतात. प्रारंभी राज्यघटनेत समाजवाद हा शब्द टाकण्यात आल्याचे दिसून येत नाही. मात्र ४२ व्या घटनादुरूस्तीने समाजवाद हा शब्द घटनेच्या प्रस्तावनेत टाकण्यात आला.

**स्वतंत्र व सक्षम न्यायमंडळ**

भारतीय जनतेला प्रत्येक क्षेत्रात न्याय मिळवून द्यावयाचा असेल तर स्वतंत्र व सक्षम न्यायव्यवस्था देणे गरजेचे आहे, अशी भूमिका डॉ. आंबेडकरांची होती. भारतीय राज्यघटनेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट म्हणजे स्वतंत्र न्यायमंडळ होय. स्वतंत्र न्यायमंडळ मूलभूत हक्कांप्रमाणेच भारतीय राज्यघटनेचा आत्मा होय. न्यायिक कार्य हे सर्वात सूक्ष्म आणि कठिण कार्य होय. अशा परिस्थिती जेथे जातीय व्यवस्था अत्यंत कठोर आहेत, समाज चार्तुवर्ण व्यवस्थेमध्ये विभाजित आहे. आशा वेळी भारतीय राज्यघटनाकारांना निष्पक्ष आणि स्वतंत्र न्याय व्यवस्था देणे आवश्यक होते कि ज्यातून राज्य–समाजावर, समाजातील वरिष्ठ जाती, कनिष्ठ जातींवर अन्याय करणार नाहीत, तसेच मूलभूत हक्कांविषयी व्यक्ती व नागरिकांना न्यायालयात गेल्यास योग्य ते न्याय मिळू शकेल, राज्यकर्त्यांनी जर राज्यघटनेच्या मूळाशी खेळण्याचा प्रयत्न केला तर त्यांना रोखता येईल. आणि अशी स्वतंत्र, निष्पक्ष आणि सक्षम न्यायमंडळ देण्याचे कार्य डॉ. आंबेडकरांनी केले.

**संघीयप्रधान व्यवस्था**

भारतीय शासन व्यवस्था केंद्रबलिष्ठ संघीयप्रधान व्यवस्था आहे. सामान्य परिस्थिती भारतात संघराज्याची सर्व लक्षणे दिसून येतात. मात्र विशिष्ट परिस्थिती किंवा आणिबाणीच्या काळात हीच संघीय व्यवस्था एकात्म शासन व्यवस्थेत परिवर्तीत होते. तसेच भारतीय राज्यघटनेत संघराज्य या शब्दाचा उल्लेख करण्याचे ही टाळण्यात आल्याचे दिसून येते. त्या ऐवजी भारत हे राज्यांचा संघ असेल असे म्हटले गेले आहे. भारतीय इतिहासा पाहता याचे समर्थन डॉ. आंबेडकर करतात, त्यांच्या मते, राष्ट्रीय ऐक्य साधण्यासाठी व भारतीय भावना एका धाग्यात पेरण्यासाठी, देशाला असाधारण परिस्थिती एकसंघ ठेवण्यासाठी आणीबाणीच्या काळात एकात्मक शासन व्यवस्था निर्माण करणे गरजेचे होते. त्यामुळे पूर्ण संघराज्य व्यवस्थेची निर्मिती न करता अंशतः लवचिक व अंशतः परिदृढ.संघीय प्रधान व्यवस्था निर्माण करण्यात आली. यात अधिक अधिकार केंद्राकडे देण्यात आले. हे सर्व राष्ट्रीय एकात्मतेसाठी आवश्यक होते.

**कायद्याचे अधिराज्य**

भारतात व्यक्तिविशेष, पक्षविशेष किंवा समुहविशेष, संस्था विशेषचे अधिराज्य निर्माण न करता राज्यघटनेला सर्वोच्च स्थानी ठेवण्यात आले आहे. भारतात राज्यघटनेचे अर्थातच कायद्याचे अधिराज्य निर्माण करण्यात आले असून राज्यघटनेत कायद्याच्या शासनासंबंधी सर्व बाबींच्या स्पष्ट उल्लेख करण्यात आले आहे. भारतात कायद्याचे राज्य आहे अशी पुष्टी करणा–या अनेक तरतूदी राज्यघटनेत आहेत, त्यातील प्रमुख म्हणजे मूलभूत अधिकार होय. तसेच न्यायालयीन पुर्नविलोकनाची तरतूद ही कायद्याचे अधिराज्य स्पष्ट करते. जर शासन किंवा संसद घटनेच्या चौकटीच्या बाहेर जाऊन कायदा करणार असेल तर ते रद्द करण्याचा अधिकार न्यायायलया दिलेले दिसून येते. अर्थातच राज्यघटनेच्या बाहेर जाऊन कोणाला ही कार्य करता येते नाही. याचाच अर्थ राज्यघटनेने भारतात कायद्याचे अधिराज्य निर्माण केलेले दिसते. त्यामुळे भारतीय राज्यघटना विस्तृतपणे लिहिलेली दिसून येते. यामागील डॉ. आंबेडकर आपली भूमिका स्पष्ट करतांना म्हणतात, भविष्यात शासनसंस्थेच्या अंगामध्ये, शासन व जनतेत वाद किंवा पेचप्रसंग निर्माण होऊ नये, राज्यघटनेविषयीची संदिग्धता कमी व्हावी, यासाठी राज्यघटना विस्तृत व व्यापक स्वरूपात तयार करण्यात आली आहे.

**सारांश**

डॉ. भीमराव आंबेडकरांच्या लोकशाहीचा आधार व्यक्ति विकास असल्याचे लक्षात येते. या आधारेच एक घटनात्मक लोकशाही निर्माण करण्याचा ध्येयनिष्ठ प्रयत्न त्यांनी भारतीय राज्यघटना लिहितांना केलेला आढळतो. त्यांनी एक व्यक्ती – एक मत व एक व्यक्ति– एक मूल्य हे लोकशाहीचा मूलाधार मानला त्यामुळेच त्यांनी प्रौढ मताधिकाराची तरतूद राज्यघटनेत केली. यातून त्यांची स्पष्ट भूमिका होती कि राज्याने कोणत्याही व्यक्ति विशेष किंवा समूह विशेषाला कोणावर राज्य करण्याचा हक्क दिला नाही. डॉ. आंबेडकरांना भारतीय परिस्थितीची पूर्ण जाण होती, भारतातील सामाजिक, आर्थिक विषमता, जातीय राजकारण, निरक्षता, व्यक्तिपूजा अशा अनेक समस्यांची कल्पना असल्याने भारतात

त्यांनी संसदयी लोकशाहीलाच उपयुक्त मानले व या लोकशाहीला घटनात्मक दर्जा प्राप्त करून दिला. संसदीय लोकशाहीच्या माध्यमातून व्यक्ति विकास पर्यायाने सामाजिक विकास साधण्याचे प्रयत्न राज्यघटनेच्या माध्यमातून आंबेडकरांनी केल्याचे दिसून येते. एकंदरीत भारतीय राज्यघटना भारतीय नागरिकांना सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय देण्यासाठी निर्माण करण्यात आलेली दिसते.

### संदर्भ


१) Johari J. C., Indian Political System, Anmol Pub. New Delhi, Third Revised Edition, 2000

२) त्रिवेदी आर. एन. आणि राय एम. पी., भारतीय संविधान, विश्वभारती पब्लिकेशन, नवी दिल्ली, पुर्नप्रकाशन, २००९

३) दुर्गा दास बसु, भारत का संविधान एक परिचय, प्रेंटिस हाल आफ इंडिया पी. लि. नई दिल्ली, सातवी आवृत्ती, १९९८

४) भोळे भास्कर लक्ष्मण, आधुनिक भारतीय राजकीय विचार, पिंपळापूर अण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, दुसरी आवृत्ती २००३

५) पाटील वा. भा., प्राचीन व आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन, जळगांव, २००९

६) राठी शुभांगी, भारतीय संविधान, अर्थव पब्लिकेशन, जळगांव, २०१३

# भारतीय संविधानातील मूलभूत हक्क आणि कर्तव्य

**– प्रा. काटकर तात्यासाहेब शिवाजी**
क.बा.पा.विद्यालय व ज्यू. कॉलेज, सदाशिवनगर
ता. माळशिरस, जि. सोलापूर

**प्रस्तावना**

मूलभूत हक्क ही आधुनिक काळाची देणगी आहे. प्रत्येक नागरिकांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी काही मूलभूत अटींची आवश्यकता असते. व्यक्तीला आपला विकास साधण्यासाठी मूलभूत हक्कांची आवश्यकता असते. लोकशाही शासन व्यवस्थेत व्यक्तीस्वातंत्र्य आणि व्यक्तीच्या सुरक्षिततेला अधिक महत्व देते. स्वातंत्र्यामुळे व्यक्तीच्या विकासास संधी मिळते. आज जगातील सर्वच देशांकडून मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी आग्रह धरला जातो.

भारतीय संविधान हे जगातील आदर्श संविधान म्हणून ओळखले जाते. संविधानाची निर्मिती भारताच्या स्वातंत्र्याची अभूतपूर्व घटना असून मानवतेच्या विकासाचा सामाजिक आशय निर्माण करणे हा प्रधान हेतू आहे. लोकशाहीचा आधार असणाऱ्या स्वातंत्र, समता, बंधुभाव आणि न्याय या तत्वांचा उल्लेख भारतीय संविधानात केलेला आहे. त्यांना स्पष्ट करून व्यक्तीला किमान सभ्य आणि सुरक्षित जीवन जगण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण व्हावे असा प्रयत्न मूलभूत हक्कांच्या प्रकरणात केलेला आहे. भारतीय संविधानाच्या प्रकरण तीनमध्ये कलम १२ ते ३५ मध्ये मूलभूत हक्कांची तरतूद केलेली आहे.

कलम १२ मध्ये राज्य या शब्दात भारताचे सरकार व संसद आणि राज्याचे शासन व कायदेमंडळ याचा समावेश आहे

कलम १३ खाली संविधानात केलेल्या कोणत्याही सुधारणेला याअनुच्छेदातील कोणतीही गोष्ट लागू असणार नाही. मूलभूत हक्कांशी विसंगत असलेले कायदे त्यात आहेत.

कलम १४ ते १८ मध्ये समतेचा किंवा समानतेचा अधिकार देण्यात आला आहे. समता हा लोकशाहीचा आधार आहे. भारतीय समाजरचना विषमतेवर आधारलेली होती. याचा आविष्कार आपल्या जातीव्यवस्थेतून होतो. भारताच्या प्रदेशात राज्य कोणत्याही व्यक्तीला कायद्याच्या बाबतीत समानता किंवा कायद्याचे समान संरक्षण नाकारू शकत नाही. कायद्यासमोर सर्वांना समानतेने वागविले जाईल तसेच कोणालाही कायद्याच्या समान संरक्षणापासून वंचित केले जाणार नाही

कलम १५ नुसार राज्य केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशा प्रकारे भेदभाव करणार नाही. तसेच यामध्ये दूकाने, सार्वजनिक ठिकाणे, उपहारगृहे, भोजनालये, करमणूकीची ठिकाणे विश्रांतीची ठिकाणे इत्यादींचा उपयोग करण्याच्या बाबतीत कोणाही व्यक्तीला प्रवेश नाकारला जाणार नाही अशी तरतूद आहे.

कलम १६ मध्ये राज्यातील सार्वजनिक सेवायोजनेत कोणत्याही जागेवर नेमले अगर घेतले जाण्यास सर्व नागरीकांना समान संधी मिळेल.

कलम १७ नुसार अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे. आणि कोणत्याही स्वरूपाची अस्पृश्यता पाळण्याला मनाई करण्यात आली आहे. जर पाळली तर शिक्षेला पात्र गुन्हा समजला जाईल. कलम १७ च्या आधारे संसदेने १९५५ साली अस्पृश्यता निवारणाचा कायदा केला आहे. यामध्ये सहा महिने कैद व पाचशे रूपये दंडाची तरतुद आहे.

कलम १८ नुसार राज्य लष्करी अगर शिक्षणविषयक पदव्यांव्यतिरीक्त कोणतीही पदवी प्रदान करून शकणार नाही. तसेच भारताच्या कोणत्याही नागरिकाला परराष्ट्राकडून कोणतीही पदवी स्विकारता येणार नाही. हे सर्व असले तरी भारत सरकारने परमवीरचक्र, महावीरचक्र, अशोकचक्र, शौर्यचक्र अशा अनेक लष्करी पदव्या आणि भारतरत्न, पद्मविभूषण, पद्मश्री यासारख्या बहुमनासूचक पदव्या देण्याची प्रथा १९५४ पासून सरू केली आहे.

कलम १९ ते २२ या मध्ये नागरिकांच्या स्वातंत्र्याच्या हक्कांची तरतूद केली आहे. यामध्ये –

१. **भाषण व मतप्रदर्शन स्वातंत्र्य –** भाषणाचे व मतप्रदर्शनाचे स्वातंत्र्य दिले असून नागरिकांना भाषण व मतप्रदर्शनाचे स्वातंत्र्य दिले आहे. देशाचे सार्वभौमत्व, एकात्मता, देशाचे संरक्षण, परराष्ट्राशी असणारे मैत्रीचे संबंध, सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था यांना बाधा येऊ नये म्हणून १९५१ मध्ये कलम १९ व्या दुरूस्ती करून काही मर्यादा घालण्यात आल्या आहेत.

२. **शांततेने व शास्त्राशिवाय एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य –** शांततापूर्वक शस्त्राशिवाय सभा भरविण्याचे स्वातंत्र्य लोकशाहीत सनदशीर व शांततापूर्वक मार्गाने चर्चा, विचारविनिमय करण्यासाठी सभा भरविण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. सार्वजनिक सुव्यवस्था, सार्वभौमत्व आणि राष्ट्रीय ऐक्य यांना धोका पोहचणार नाही या दृष्टीने सभा स्वातंत्र्यावर काही मर्यादा घालण्याचा अधिकार सरकारला आहे. व त्या मर्यादा योग्य की अयोग्य हे ठरविण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला दिलेले आहे.

३. **सस्था व संघ स्थापन करण्याचे स्वातंत्र्य –** भारतीय संविधानाने नागरिकांना संस्था व संघ स्थापन करण्याचा अधिकार दिलेला आहे. चोरी, काळाबाजार यासाठी जर कोणी संस्था, संघटना स्थापन करील तर राज्य सरकार त्यावर बंधन घालू शकते.

४. **भारताच्या प्रदेशात सर्वत्र मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र्य –** १९ व्या कलमानुसार भारतीय नागरिकांना भारताच्या प्रदेशात मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र्य दिलेले

आहे. परंतु हा अधिकार अमर्यादित स्वरूपात दिलेला आहे.

५. **भारताच्या प्रदेशात कोठेही राहण्याचे किंवा वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य –** भारतीय नागरिकांना संपूर्ण भारतात कोणत्याही प्रदेशात त्याच्या इच्छेनुसार वास्तव्य करण्याचे किंवा स्थायिक होण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे. या अधिकारामुळे राष्ट्रिय एकात्मता टिकून राहण्यास मदत होते.

६. **कोणताही व्यवसाय, रोजगार आणि व्यापार किंवा धंदा करण्याचे स्वातंत्र्य –** भारतीय नागरीकांना कोणताही धंदा किंवा व्यवसाय, व्यापार करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. परंतु यावरही सरकारचे नियंत्रण राहिल आणि जर सरकारने काही मर्यादा घातल्या तर तो व्यवसाय किंवा व्यापार, रोजगार योग्य कि अयोग्य ठरविण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला दिलेला आहे.

कलम १९ मध्ये वरील प्रमाणे नागरिकांना स्वातंत्र्याचे सहा अधिकार दिलेले आहेत त्यांच्या संरक्षणासाठी कलम २०, २१ आणि २२ मध्ये तरतुदी करण्यात आल्या आहेत. * त्यामध्ये गुन्हा म्हणून ठरविले गेले तरच तिला शिक्षा होईल आणि जी शिक्षा दिली असेल त्यापेक्षा अधिक असणार नाही. * कोणत्याही व्यक्तीवर एकाच गुन्ह्याबद्दल एकापेक्षा जास्तवेळा खटला होणार नाही किंवा शिक्षा होणार नाही * कोणत्याही व्यक्तीला स्वत:च्या विरूद्ध साक्षीदार होण्यास सक्ती केली जाणार नाही आणि

कलम २१ मध्ये असे स्पष्ट करण्यात आले आहे की कायद्याने ठरवून दिलेल्या कार्यपद्धतीखेरीज कोणत्याही व्यक्तीचे जीवित किंवा वैयक्तीक स्वातंत्र्य हिरावून घेतले जाणार नाही. परंतु संसदेने मंजूर केलेल्या कायद्यानुसार जीवित व वैयक्तिक हक्कांवर मर्यादा घालता येतात.

कलम २२ मध्ये असे स्पष्ट करण्यात आले आहे की जर एखाद्या व्यक्तीला अटक केली असेल तर शक्य तितक्या लवकर अटकेची कारणे त्याला कळायला हवी. तसेच त्याला त्याच्या पसंतीच्या वकिलाचा सल्ला घेण्याचा किंवा बचाव करण्याचा हक्क नाकारता येणार नाही. * अटक केलेल्या व्यक्तीला २४ तासांच्या आत मॅजिस्ट्रेटसमोर उभे करण्यात येईल. त्यांच्या हुकुमाशिवाय तिला अधिक काळ अटकेत ठेवता येनार नाही. * प्रतिबंध अटकेसंबंधी केलेला कोणताही कायदा कोणाही व्यक्तीला तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ अटकेत ठेवण्यास अधिकार नाही.

कलम २३ मध्ये शोषणाविरूद्धचा अधिकार देण्यात आला आहे. माणसाची विक्री व त्यासारख्या अन्य स्वरूपातील वेठ यांना मनाई आहे. वेठबिगार, देवदाशी, मागासलेल्या जाती जमातीच्या लोकांचे आर्थिक व सामाजिक शोषण, वेश्याव्यवसायास कायद्याने बंदी घातलेली आहे.

कलम २४ नुसार चौदा वर्षाखालील कोणत्याही मुलाला कोणत्याही कारखायन्यात किंवा खाणीत काम करण्यास ठेवले जाणार नाही किंवा कोणत्याही धोक्याच्या कामावर त्यांची योजना केली जाणार नाही. सरकारने १९५२ साली खाणविषयक कायदा अमलात आणून १२ वर्षाखालील मुलांच्या कामास बंदी घातलेली आहे.

कलम २५ नुसार धार्मिक स्वातंत्र्याचा हक्का प्राप्त होतो

कलम २६ नुसार सार्वजनिक सुव्यवस्था नितीमत्ता व आरोग्य यांना बाधक न होईल अशा रीतीने प्रत्येक धार्मिक संप्रदायास अधिकार दिले आहेत.

कलम २७ मध्ये ज्या कराचे उत्पन्न एखाद्या धर्माच्या अगर धर्मपंथाच्या संवर्धनासाठी आणि प्रसारासाठी खर्चिले जाण्याची विशिष्ट योजना असेल तर असा कर देण्याची कोणत्याही व्यक्तीवर सक्ती केली जाणार नाही.

कलम २८ नुसार पुर्णपणे सरकारी खर्चावर चालणाज्या शिक्षण संस्थेत कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही.

कलम २९ मध्ये भारताच्या प्रदेशात किंवा त्याच्या कोणत्याही विभागात राहणाज्या कोणत्याही नागरिक वर्गाला जर स्वत:ची विशिष्ट भाषा, लिपी व संस्कृती असेल तर त्याला ती जतन करण्याचा अधिकार राहील. तसेच कोणत्याही शिक्षणसंस्थेत नागरिकाला केवळ धर्म, वंश, जात, भाषा या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकरता येणार नाही.

कलम ३० नुसार धर्मावर किंवा भाषेवर आधारीत अशा सर्व अल्पसंख्याक वर्गाना स्वत:च्या पसंतीप्रमाणे शिक्षणसंस्था स्थापण्याचा आणि चालविण्याचा अधिकार आहे.

**मूलभूत कर्तव्य**

संविधानाच्या सुरवातीला मूलभूत कर्तव्यांचा समावेश केलेला नव्हता. नागरिकाला फक्त हक्क दिले. वास्तविक नागरिकांचे हक्क आणि मूलभूत कर्तव्ये या एकाच नाण्याच्या बाजू आहेत. मूलभूत हक्कासाठी नागरिकांकडून जसा अग्रह धरला जातो त्याचप्रमाणे मूलभूत कर्तव्यांची जबाबदारीसुद्धा पार पाडणे आवश्यक आहे. डॉ. आंबेडकर यांनी अप्रत्यक्षपणे कर्तव्यांची जाणीव करून देताना असे म्हणतात की, स्वातंत्र्याने आपणांवर अनेक मोठ्या जबाबदाज्या टाकल्या आहेत...... यावरून स्पष्ट होते की भारतीय जनतेला आपल्या हक्कांची जाणीव झालेली आहे परंतु कर्तव्यांचा विसर पडत आहे.

भारतीय संविधानाच्या प्रकरण ४ मध्ये १९७६ च्या ४२ व्या संविधान दुरूस्तीने दहा मूलभूत कर्तव्यांचा समावेश केला आहे. ते पुढीलप्रमाणे......

१. संविधानाचे पालन करणे, संविधानातील आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे, मान करणे.

२. आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्याला ज्यामुळे स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शाची जोपासना करून त्यांचे पालन करणे.

३. भारताची सार्वभौमता, एकता आणि एकात्मता यांचा सन्मान करून त्यांचे संरक्षण करणे.

४. आवाहन केले जाईल तेंव्हा राष्ट्रांचे संरक्षण करणे आणि राष्ट्रीय सेवा बजाविणे.

५. धार्मिक, भाषीक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेद न मानता सर्व भारतीय जनतेते एक्याची बंधुभावाची भावना वाढीला लावणे, तसेच स्रियांच्या प्रतिष्ठेला बाधा आणणाज्या प्रथा सोडून देणे

६. आपल्या संमिश्र संस्कृतीचा वारसा मौल्यवान मानून तो जतन करणे.
७. जंगले, सरोवरे, नद्या व वन्य जीवनसृष्टी या नैसर्गीक संपत्तीचे रक्षण करून त्यात सुधारणा करणे व सजीव प्राण्यांबाबत दयाबुद्धी बाळगणे
८. शास्त्रीय दृष्टीकोन, मानवतावाद, शोधकबुद्धी आणि सुधारणावाद याचा विकास करणे
९. हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे
१०. राष्ट्र यशाच्या व प्रगतीच्या शिखराकडे सतत वाटचाल करील असा प्रकारे सर्व व्यक्तीगत व सामुदायिक कार्यक्षेत्रात पराकष्टेचे यश मिळविण्यासाठी प्रयत्न करणे.

**संदर्भ**


1. Hisotry of the parliament of India - Kashyap Subhas
2. The Indian constitution corner stone of a Nation - Granville Austin
3. The farming of Indias constitution - Shivarao B
4. Constitution History of India - Majajan U.D.
5. Loksabha secretariat, New delhi - Assembly Report
६. योजना मासिक
८. भारतीय अर्थव्यवस्था, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था

# शेतकऱ्याचे कैवारी डॉ. आंबेडकर

– अमरजितसिंग प्रेमसिंग गिरासे
स्वोद्धारक विद्यार्थी संस्थेचे दादासाहेब रावल कला व विज्ञान महाविद्यालय
दोंडाईचा, जि. धुळे

भारत हा कृषि प्रधान देश आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा शेतकरी आहे. परंतु शेतकरीच दुर्लक्षित राहिला आहे. हे आजच्या स्थितीवरून दिसून येते. परंत शेतकऱ्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले योगदान शेतकऱ्याच्या कल्याणासाठी केलेल्या योगदानाची माहिती दुर्लक्षितच राहिली.

स्वत्य भारतात ग्राम जीवनाचा स्तर उंचवण्यासाठी शासन जे जे प्रयत्न करील, त्याच्या पाया सामजिक न्याय हाच असला पाहिजे, अशी भूमिका डॉ. बाबासाहेब आबेंडकरांची घेतली आहे. त्यामुळे त्यांनी गावात प्रत्यक्ष जमिन करणाऱ्या शेतकऱ्यासाठी अनेक हितलिहाय अशी कामे केली.

डॉ. आंबेडकरांचे कृषिविषयक विचार देशाला आणि शेतकऱ्याला आर्थिकदृष्टया सक्षम करणारे आहे. शेतकऱ्यांचा या ग्रंथातून समस्थांवरचे उपाय त्यांनी स्मॉल हेडिंग्स इन इंडिया न्ड देअर रेमडिज व्यक्त केले आहेत.

औदयोगिककरण आणि शेती यांचे अतूट नाते असले पाहिजे शेती पूरक उदयोग शेतकऱ्यांचा, शेतमजूरांच्या आर्थिक उन्नतीसाठी आवश्यक आहे. विकास कार्यक्रमातून मिळणाऱ्या लाभांची न्याय तत्वावर समान वाटणी व्हावी. आजवर जे वंचित म्हणून जगत आले. त्यांना अग्रहक्क देण्याची गरज वारवांर व्यक्त केलेली आहे.

डॉ. आंबेडकरांचा भर स्वावल्यबवावर होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ब्रिटिश सरकारला परखडपणे बजावले की, भारतावंरील कर्जाचा बोजा काही अशी तरी शिरावर घ्यावा आपल्या विश्लेषणात बाबासाहेब म्हणतात. १९५८ च्या कायदयापासून लाभ होईल तो इंग्लडला आणि कर्जाची डोगर भारताचा डोक्यावर डॉ आंबेडकरांचे हे विश्लेषण त्यांचा प्रखर राष्ट्रीय वाक्याचे प्रतिक होते.

शेती ही प्रामुख्याने पाण्यावर अवलंबून असते हे डॉ. आंबेडकरांना चांगल्यापैकी ठाऊक होते. भारताचे आधुनिक तिर्थक्षेत्र समजले जाणारे भाक्रा नानगंल धरण हे बाबासाहेबांच्या कर्तृत्वाचे प्रतिक मानले जाते. त्यांचप्रमाणे शेतकऱ्यांचा हितासाठी दामोदर नदी प्रकल्पाला मान्यता दिली खीती उर्फ गुलामगिरीतून शेतकऱ्याची मुक्तता केली अशी अनेक हिताची कामे आपण पाहूयात.

**भाक्रा नानगल धरण**

पंजाब राज्ये आज जे शेतीमध्ये प्रगतशील राज्ये आहे पंजाब राज्याच्या सुबत्तेत या धरणाचे महत्व कोणी नाकारू शकत नाही. या धरणाचा प्रशासकिय निर्णय ऑक्टोबर १९४३ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घेतला म्हणून स्थानिक शेतकऱ्यांचा पाण्याची समस्या दुर झाली शेतकऱ्यांच्या प्रगतीला सुरवात झाली भाक्रा नानगल धरणामुळे शेतकरी हा प्रगतशील झाला. आणि या राष्ट्राला सर्वात मोठे धरण बाबासाहेब देऊ केले.

**दामोदर नदी प्रकल्प**

१९४४ मध्ये बंगाल सरकारने स्थापन केलेल्या दामोदर नदी पुर चौकशी समितिसमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारत सरकारचे मजूर प्रतिनिधी म्हणून केलेले भाषण शेतकऱ्यांना हितावह ठरले. ते म्हणतात दामोदर नदी पुरामुळे हजारो लोकाचे प्राण जात आहे. च्या लाखो रुपयांचे नुकसान होत आहे. दामोदर नदीला पुर येऊ नये, साठवलेल्या पाण्याचा उपयोग शेती, विदयुत निर्मीतीसाठी करता यावा म्हणून दामोदा नदी प्रकल्पाला मान्यता मिळविण्यासाठी शिफारस केली. डॉ. आंबेडकर म्हणाले की जलमार्ग आणि रेल्वेमार्ग हा राज्यानुसार विभागला जाऊ शकत नाही. हयाचा उलट आपण आपल्या घटनेला जलमार्ग व रेल्वेमार्ग हयात फरक करण्याचा हक्क दिला आहे ज्यामुळे रेल्वेमार्ग केंद्रिय समजले जातात. जलमार्ग राज्याचे समजले जातात. आणि हया चुकिचे खुप सारे वाईट परिणाम दिसुन येतात. जलमार्ग व रेल्वेमार्ग यात कुठली ही तफावत असू नये. कृषिप्रधान देशात पाणी व विदयूत हयाचा पुरवठा समतोल असेल, तर ग्रामीण भारत संपन्न होईल, शिफारस करतांना कोणत्याही राज्यावर अन्याय होणार नाही यांची दक्षता डॉ. आंबेडकरांनी घेतलेली दिसून येते.

१९४२ साली अस्तित्वात असलेले केंद्र सरकार, भारत सरकार अधिनियम १९३५ अन्वये अस्तित्वात आले होते. या कायदयानुसार जल व विदयूत हे विषय राज्य व प्रांतच्या कक्षेत होते. पंरतू जलविकासाच्या धोरणाला अभिनव वळण डॉ. आंबेडकरांनी दिले. जलसंसाधन विकास मंत्रालयाशी संबंधी असलेल्या केंद्रिय जलआयोगाने १९९३ साली मार्च महिन्यात डॉ. आंबेडकरांचा जलविकासातील सहभाग या नावाने गौरवग्रथ प्रकाशित केला. सर्वाना समाज हक्काचा सल्ला देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक होते.

**वतनदारी आणि शेतकरी**

सन १८७४ च्या वतनी ऑक्टोबरमध्ये वतनी माल मिळकत असल्यास ती व वंशपरंपरेचा हुद्दा व त्यांसंबधीचे हक्क व आधिकार मिळवून वतन होते, अशी वतन हया शब्दांची व्याख्या करण्यात आली आहे. वतन या शब्दामध्ये दोन गोब्टींचा समावेश होते

१) वंश परंपरेचा हुद्दा

२) वतनी मालमिळकत जमिन

पुर्वीच्या काळी प्रत्येक गावास वंशपरंपरच्या हुद्देदारांची संख्या त्यांपैकी १२ जणांना बलुतेदार व बाकी जणांना अलुतेदार संबोधले जात असे पेशवाईत या संख्येत वाढ झाली होती इंग्रज सरकारचा अमल सुरू झाला, तेव्हा बेसुमार झालेल्या वतनपध्दीत काटछाट करण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे अलुत्या बलुत्यामध्ये ३ वर्ग करण्यात आले.

१) सरकार आवश्यक वतनी गावकामगार

२) रयत आवश्यक वतनी गावकामगार

३) सरकार रयत यास अनावश्यक वतनी गावकामगार.

यापैकी दुसरा व तिसरा वतनदार वर्ग सरकारला आवश्यक नाही अशांना कामाच्या मोबदल्यापासून मुक्त करण्यात आले. जेणेकरून त्यांची स्थिती आणि गावातील रयतेची स्थिती सारखीच झाली त्यामुळे त्यांना वतन क्ट लागू करण्यात आलेला नाही. वतनदारांची कामे निश्चित नाहीत. कोणताही नोकर झाला तरी त्यांने करावयास कामे ही निश्चित झाली पाहिजे. विशेषत: महार वतनासंबधी ध्यानात ठेवण्यासारखी गोष्ट ही कि, महारांची कामे मुळीच निश्चित झालेली नव्हती. इतकेच नव्हे तर ती मुद्दाम होऊन सरकारने अनिश्चित ठेवली होती. सन १८७४ चा वतन क्ट जेव्हा पास करण्यात आला तेव्हा त्यांचा १८, ६९ व ८३ या कलमांवर वादविवाद चालू असतांना काही लोकांनी महारांची कामे ठराविक करण्यांच्या दृष्टिने या कलमांत फेरफार करण्यात यावी, अशी सूचना त्यावेळी कायदे काऊन्सिल मधे केली होती.

परंतू सरकारने आपल्याला महारासारखे काही सांगकामे व हरकामे नोकर पाहिजेत. म्हणून ती सुचना मान्य केली नव्हती स्वत:ची उन्नती करण्याच्या बाबतीत महार समाजाकडून चाललेल्या प्रयत्नामध्ये महारकी वतन ही मोठी आडकाठी होती वतनदार महारांना भाकरीचे हक्क यांच्या रूपाने त्यांचा कामाचा मोबदला देण्याची जी वहिवाट आहे तिच महार समाजाच्या असहाय्य व निकृष्ट स्थितिचे मुळ कारण होते. काही समाजात, केलेला कामाचा मोबदला म्हणून त्यांना थोडीशी जमिन किंवा पैसे रुपये देण्यात येत असत हे दिलेले वेतन इतके अल्प होते कि त्यांना त्यांची उपजिविका भागवता येत नव्हती त्यात सुधारणा करून वतनदारीवर होणारा अन्याय दुर करण्यावर बाबासाहेबांचा भर होता. १९३७ साली बाबासाहेबांनी मांडलेल्या विधेयकात कोणावरही वतन सोडून देण्याचा बाबतीत सक्तीची तरतूद केलेली नसली, तरी वतन नष्ट करावे असे बाबासाहेबांचे मत होते आणि ते त्यांनी वतनदारापासून लपवूनही ठेवलेले नव्हते वतनात सुधारणा करण्यापेक्षा ते नष्ट केलेलेच बरे असे त्यांचे स्पष्ट मत होते वतनामुळे वतनदार स्वाभिमान्य शुन्य झालेले आहेत. असे बाबासाहेबांना वाटत असे सर्वाना स्वाभिमानाने जीवन जगा असे सांगणारे व त्याकरीता त्यांना प्रवृत्त करणारे एकमेव द्रष्टे डॉ. आंबेडकर होते.

**खोती उर्फ गुलामगिरीतून मुक्तता**

खोती पद्धतीत शेतकऱ्यांची संपत्तिक स्थिती वाईट होती. परंतू इतर बाबतीत ही त्यांची अवहेलना झाल्याचे दिसून येते. विशेषत: स्वाभिमान धाडस, हे मनुष्यांचा आवश्यक असणारे गुण खोतीमुळे पिळुन निघाले होते. खोतीच्या जाचाची कल्पना माहिती गावाखेरीज इतरांना होणे शक्य नाही. खोत म्हणजे गावतला लहानसा एक सुलतान असतो. जेव्हा गावाची खोती वेगवेगळया घरांमध्ये हस्से वाटणीने विभागली असते. तेव्हा अनेक सुलतांना जुल्लुम गावातील शेतकरांना सोसावा लागतो. शेतकऱ्यांना सरकार देणे देऊन सुदधा खोती हक्क वेगळा दयावा लागत असे. रयतवारी पध्दतीमध्ये फक्त सरकारला दयावयचे असे. खोतीमध्ये अशा रितीने शेतकऱ्यांवर बोजा वाढत असे, परंतू त्याखेरीज वेगवेगळ्या प्रकारांनी कुळांकडून खोत पैसे उकळीत असत. कुळात पैसे भरले म्हणजे रितसर पावती दयावयची नाही. असा खोतांचा बाणा असल्यामुळे कुळांची शेडी नेहमी खोसांच्या हातात असत.

खोतांचा दुसरा कामाचा प्रकार म्हणजे वेठीच्या कामाची पध्दती होय. कायदयाने वेठीला मनाई केली असला खोत सामर्थवान असल्यामुळे कायदयाने मनाई असून नसून सारखीच होती. शेतकऱ्यांवर खोत हा सामाजिक जुलूम करत असे.

खोती पध्दत समुळ नष्ट केली पाहिजे. सध्या खोतीसंबधीचा कायदा तो अत्यंत अपुरा आहे. जो कायदा आहे त्यांची अमंलबजावणी नीट होत नाही आहे. शेतकऱ्यांचे हित, कल्याण, शेतकऱ्यांना प्रगतशील, विकसनशील बनवायचे असेल तर खोती पध्दत समुळ नष्ट केली पाहिजे यासाठी डॉ. आंबेडकर यांनी कायदे काऊन्सिलमध्ये खोतीसंबधी एक झणझणीत बिल आणण्याचे ठरविले. ते चिपळुणच्या शेतकरी परिषदेत जाहीर केले.

१७ संप्टेंबर १९३७ रोजी बाबासाहेबांनी खोती पध्दत समुळ नष्ट करण्यासंबधीचे विधेयक मांडले खोत हा गावाचा मालक आहे. त्यास गाव गहाण टाकता येते. विकता येते. कुळांची धारेकरी कुळे बनविता येतात. सरकारला खोताने कबुली दिली म्हणजे सरकारला ते नाकारता येणार नाही, भात जमिनीतून होणा-या उत्पन्नाचा अर्धा भाग आणि वरकस जमिनितील एक तृतीयींश भाग खोताने कुळांकडून वसुल करावा, अशी पध्दत होती डॉ. बाबासाहेबांनी खोती पध्दत नष्ट करण्यासंबधीचे विधेयक आणुन जमिनदांराकडून होणारी शेतकरी कुळांची फसवणुक कमी करण्यांचा प्रयत्न केला. खोतीपासून शेतकरी कुळांचे संरक्षण व्हावे, अश्या स्वरूपाचे कायदे केले. राष्ट्रीय स्तरांवर सर्वासाठी काम करून बाबासाहेबांनी केवढी कणव होती हे यावरुन दिसुन येते.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शेतकऱ्यांना न्याय मिळवुन देण्यात फार मोठे योगदान होते अश्या या महामानवास माझ्यासारख्या शेतकरी पुत्रांकडुन त्रिवार अभिवादन.

**संदर्भ**

१) डॉ. त्रिलोक हजारे, शेतकऱ्यांना न्याय, महामानव प्रकाशक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, १४ एप्रिल २०१७.

# डॉ. बाबासाहेब आणि भारतीय अर्थव्यवस्था

– डॉ. दिलीप रामभाऊ जगताप
सहयोगी प्राध्यापक, विभाग प्रमुख व्यवसायिक अर्थशास्त्र व बँकिंग, ग.तु. पाटील महाविद्यालय, नंदुरबार
– डॉ. बापु बाबुराव मंगळे
सहयोगी प्राध्यापक, विभाग प्रमुख वनस्पतीशास्त्र, ग.तु. पाटील महाविद्यालय, नंदुरबार

**१) सारांश**

डॉ.गंगाधर पानतावणे यांच्या मते डॉ.बाबासाहेब जागतिक पातळीवरचे मान्यताप्राप्त अर्थतज्ञ आहेत परंतु भारतात त्यांना अर्थतज्ञ म्हणून स्थान मिळाले नाही.बाबासाहेबांनी भारतीय अर्थव्यवस्थेकडे मानवी दृष्टीने पाहीले. त्यांनी संपूर्ण मानवी समस्यांचा अभ्यास केला आणि अशा उपाय योजना सुचविल्या की त्या प्रसंगानुरुप समर्पक ठरतील. त्यांच्या आर्थिक धोरणांमध्ये मानवतावादी भावनांचा समावेश होता म्हणून त्यांच्या आर्थिक विचारांमध्ये वर्तमान समस्यांना तोंड देण्याचे सामर्थ्य आहे. भारतीय अर्थव्यवस्थेसंबंधीत त्यांच्या आर्थिक विचारांमध्ये व्यापार बँकिंग चलन, मजुरी, कामगार कल्याण, शेतीजमीन सुधारणा, मध्यवर्ती बँक, औद्योगिकरण, राजस्व, मद्यापासुन उत्पन्न इ. घटकांचा समावेश होता.त्यांच्या आर्थिक विचारांमध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचे एकही क्षेत्र सुटलेले नाही.बाबासाहेब ना भांडवलशाहीचे समर्थक होते ना समाजवादाचे त्यांनी मध्यमार्ग निवडलेला होता. त्यांच्यामते प्रत्येक व्यक्तीने आर्थिक प्रश्नांवर स्वत: उत्तर किंवा उपाय शोधण्याचा प्रयत्न करावा. इतरांच्या किंवा देवाच्या भरवशावर अवलंबुन राहू नये.तरच मानवाचे भले होईल. त्यांचे कल्याण होईल. आजही डॉ.बाबासाहेबांनी सूचविलेल्या मार्गावर आपण चाललो तर भारतीय अर्थव्यवस्थेच्या मोठा लाभच होईल.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांबद्दल बहुतेक लोकांना एवढेच माहित आहे की ते भारताच्या संविधानाचे प्रमुख निर्माते.वाकपटू खासदार आणि तळागाळातील पददलीत वर्गाच्या लोकांचे उध्दारक होते.अनेक लोकांना हे ही माहित होते की, बाबासाहेब कायद्यांमध्ये तज्ञ होते.ते चिंतक होते.त्यांना अनेक पदव्या प्राप्त झालेल्या होत्या.परंतु अनेक सामान्य लोकांना माहित नव्हते की, डॉ.बाबासाहेब एक अर्थशास्त्रज्ञ होते त्यांचे अनेक आर्थिक विचार प्रसिध्द आहेत.मुळत: बाबासाहेबांनी आपले शैक्षणिक जीवन अर्थशास्त्राच्या विद्यार्थी स्वरुपात सुरु केले होते.त्यांनी सन १९१५ मध्ये एंशेट इंडियन कॉमर्स या विषयावर प्रबंध सादर करुन कोलंबिया विद्यापीठ अमेरिका येथून एम.ए.पदवी मिळविली होती.जुन १९१६ मध्ये डॉ.बाबासाहेबांनी कोलंबिया विद्यापीठातूनच नॅशनल डिव्हीडंड ऑफ इंडिया – ए हिस्टॉरीक अॅड एनालायटीकल स्टडी या विषयात पीएच.डी.पदवी प्राप्त केली.आूक्टोंबर १९१६ मध्ये त्यांनी अर्थशास्त्रात गहन अभ्यास करण्यासाठी लंडन स्कुल ऑफ ईकॉनॉमिक्स व पॉलिटिकल सामान्य मध्ये प्रवेश घेतला.१९२१ मध्ये त्यांनी या विद्यापीठातुन एम.एस्सी.पदवी प्राप्त केली.त्यांच्या शोध प्रबंधाचा विषय प्राविन्सियल डिसेन्ट्रलायझेशन ऑफ इम्पिरियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया होता.अर्थशास्त्राचे त्यांचे अध्ययन येथेच थांबले नाही तर त्यांनी लंडन विद्यापीठात दि प्राब्लेम ऑफ रुपी हा शोध प्रबंध सादर केला.त्यासाठी त्यांना अत्यंत उच्च पदवी डी.एस्सी.प्राप्त झाली.यावरुन स्पष्ट होते की डॉ.बाबासाहेब आंबेडकर अर्थशास्त्र विषयात किती तज्ञ होते.त्यांनी कलानुरुप आर्थिक घटकांचे समिक्षण करुन उपाय सुचविले.

डॉ.आंबेडकरांनी आपले आर्थिक विचार पुस्तकात ग्रंथात तर मांडलेच परंतु त्याबरोबरच त्यांनी आपले आर्थिक विचार वेळोवेळी लोकांसमोर, संसदेत विदेशात ठिकठिकाणी आपल्या भाषणात व लेखांमध्ये मांडले. त्यांनी देशासमोरील अनेक आर्थिक समस्या खरोखर समजून घेतल्या व प्रसंगानुसार त्यावर योग्य उपाययोजना सुचविल्या.त्यांचा भारतीय अर्थव्यवस्थेला खुपच फायदा झाला. आजही त्यांनी सुचविलेल्या आर्थिक मार्गावर जर आपण चाललो तर त्यांचा भारतीय अर्थव्यवस्थेला मोठा लाभच होईल.

**अभ्यासाचे उद्देश**

१. बाबासाहेबांच्या आर्थिक विचारांचे अध्ययन करणे.
२. डॉ.आंबेडकर आणि भारतीय अर्थव्यवस्था यांच्यातील संबंधाचे अध्ययन करणे.
३. बाबासाहेबांच्या आर्थिक विचारांचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील प्रभाव अभ्यासणे.
४. भारतीय अर्थव्यवस्थेसंबंधित बाबासाहेबांच्या आर्थिक विचारांची प्रासंगिकता अभ्यासणे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत संशोधन लेखासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर केलेला आहे व माहिती संकलनासाठी दुय्यम सामग्रीचा वापर केलेला आहे त्यात संदर्भ ग्रंथ बाबासाहेबांनी विविध भाषणे, व्याख्याने तसेच संकेत स्थळावरील संशोधन लेख व जर्नल्सचा समावेश आहे. तसेच वर्तमान पत्रांमधील लेखाचा ही अभ्यासासाठी वापर केलेला आहे.

**विश्लेषण निष्कर्ष**

**१. डॉ.आंबेडकर व मुक्त अर्थव्यवस्था –** बाबासाहेबांचे विचार समाजवादी होते ते साम्यवादी नव्हते किंबहुना ते साम्यवादाचे कहर विरोधक होते. याचा अर्थ ते भांडवलशाही अथवा मुक्त अर्थव्यवस्थेचे समर्थक होते असा होत नाही.बाबासाहेब मुक्त अर्थव्यवस्थेचे खंदे विरोधक होते.कारण त्यांच्या मते मुक्त अर्थव्यवस्था ही पिचलेल्यांचे अर्थकारण अधिकच बिघडणारी आणि शोषण करणारी आहे असे त्यांचे स्पष्ट मत होते.उदारमत भांडवलशाही म्हणजेच मुक्त अर्थव्यवस्था त्यांना मान्य नव्हती.केन्सच्या व मार्शलसच्या आर्थिक विचारांना त्यांनी कडाकडून विरोध केला होत.बाबासाहेबांनी उदारमतवादी समाजवादाचे तत्त्व घटनेत अंतर्भुत केले होते.स्त्री–पुरुष समानता त्यांना मान्य

होती.त्यांच्यामते अर्थव्यवस्था ही संपत्ती आणि उत्पादन साधनांचे केंद्रिकरण या पातळीवर जाऊ नये.सर्व समाज घटकांचे आर्थिक आणि सांस्कृतिक सशक्तीकरण करणे हाच अर्थशास्त्राचा मुलभुत गाभा आहे.मुक्त अर्थव्यवस्था स्विकारु नये असे त्यांचे स्पष्ट मत होते.

**२. डॉ.आंबेडकर आणि मध्यवर्ती बँक –** रिजर्व बँक ऑफ इंडिया ही संपूर्णपणे डॉ.बाबासाहेबांच्या आर्थिक विचारांवर आणि त्यांनी आखून दिलेल्या रुपरेषा आणि संकल्पनेवर सुरळीतपणे अव्याहतपणे सुरु आहे.मुद्रा, चलनव्यवस्था, बॅंकिंग कशी असावी.मुद्रा कोणाच्या अधिपत्याखाली राहील. वित्तिय धोरण कसे राबवावे. चलनाचा मानदंड काय असावा, सोने हे चलनाचे मापदंड यातून चलनव्यवस्थेचे फायदे व तोटे काय राहतील, महागाई चलन समस्येवर त्यांनी उपाययोजना सुस्पष्ट आणि सोप्या शब्दात मांडल्या.

त्यांची मार्गदर्शक तत्त्वे आणि कार्यप्रणाली स्विकारल्याने इतर देशांमध्ये अर्थव्यवस्था ढासळत असतांना भारतीय रिजर्व बॅंक आणि भारतीय अर्थव्यवस्था बिनबोभाट कार्यरत असून डौलाने उभी आहे.

**३. जाती आधारित अर्थव्यवस्थेला डॉ.आंबेडकरांच्या विरोध –** बाबासाहेबांसारख्या एकही विचारवंत असा नव्हता की, ज्याने जाती आधारित अर्थव्यवस्था व तीचे भयावह परिणाम ओळखले असतील, बाबासाहेब हे एकमेव विचारवंत होते.की ज्यांनी जाती आधारित आर्थिक समस्या, सामाजिक बेड्या, आणि राजकीय शोषण ओळखून समजून त्यावर कडाडून टिका केल्या.जातीवर आधारित अर्थव्यवस्थेने समाजाला फक्त गरीबी, अशिक्षितपणा, बेकारी, अज्ञान या समस्यांच दिल्या.कोट्यावधी शुद्र व अस्पृश्यांना उपासमारी, भुकबळी आजार, वेठबिगारी, भीक मागणे, गुन्हे चोरी इ.सारख्या वाईट गोष्टी दिल्या.आजही अशी आर्थिक सामाजिक परिस्थिती सर्वत्र टिकून असलेली दिसून येते.या व्यवस्थेत आर्थिक स्वातंत्र्य व आर्थिक सुरक्षिततेचा अभाव दिसून येतो.या व्यवस्थेत अनेक व्यवसायांना निकृष्ट मानले जाते व असे व्यवसाय करणा-या हीन समजले जाते.

बाबासाहेबांचा या अर्थव्यवस्थेला विरोध होता डॉ.आंबेडकरांच्या मते आर्थिक समता निर्माण केल्याशिवाय सामाजिक समता अर्थपूर्ण ठरु शकत नाही.

**४. डॉ.आंबेडकरांचा कर प्रणालीबाबत विचार –** डॉ. आंबेडकरांनी देशातील करप्रणाली अशी असावी की, त्यामुळे विविध गटातील व्यक्तीच्या उत्पन्नातील विषमता कमी होईल असे स्पष्ट शब्दात मत व्यक्त केले होते. त्यांच्यामते प्रगतीशील दराने कर आकारणी ही विविध स्तरातील लोकांना एक समान पातळीवर आणण्यात मदत करते. सामान्य माणसाच्या राहणीमानाचा दर्जा खालावेल अशी करप्रणाली नसावी असा डॉ.आंबेडकरांचा खास आग्रह होता. त्यासाठी त्यांनी पुढील करप्रणाली असावी असे सुचविले.

१. श्रीमतांवर त्यांच्या वाढत्या उत्पन्नानुसार अधिक कर आकारावा व गरीबांवर कमी कर आकारावा.
२. नागरीकांना त्यांच्या कर भरण्याच्या प्राप्तीकर मर्यादेनुसार सवलती देण्यात याव्यात.
३. व्यक्तीगत कर हा त्या व्यक्तीच्या एकूण उत्पन्नावर न आकारता त्याच्या कर भरण्याच्या क्षमतेवर आकारावा.

आजही डॉ.बाबासाहेबांनी सुचवलेली प्रोगेसिव्ह टॅक्सेशन मॉडेल. १० टक्के अधिभार ही प्रणाली भारतीय अर्थव्यवस्थेत स्विकारली आहे.

**५. डॉ.आंबेडकर, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शेती**

ग्रामीण अर्थव्यवस्था दोन भागात विभागली गेली होती.अथवा खेड्यांचे दोन भाग पडलेले होते.एक म्हणजे उच्च वर्णिय हिंदु/सवर्ण व दुसरे म्हणजे अस्पृश्य गांधींजीचे हरिजन, जुने लोक शेती क्षेत्रात आधुनिक सुधारणा स्विकारत नव्हते.ग्रामीण अर्थव्यवस्था अथवा कधी अर्थव्यवस्थेत जमीनधारणा अथवा जमीनीची मालकी फार थोड्या लोकांच्या हातात एकवटलेली होती.त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था अत्यंत मागासलेली होती. त्यामुळेच डॉ.आंबेडकरांचे लक्ष आर्थिक सुधारणांवर होते. परंतु त्यांचे संपूर्ण लक्ष जमीन सुधारणेवर जास्त होतो.त्यांनी लहानशेती, तुकडीकरण व अपखंडन या शेतीसमस्येवर आपले लक्ष केंद्रीत केले होते.त्यांच्यामते अशी शेती किफायतशीर ठरत नव्हती.म्हणून त्यांनी सखोल शेती व सामुहिक शेती अथवा सहकारी तत्त्वावर शेती करावी अशी आग्रही भूमिका मांडली होती.

खोती व्यवस्थेच्या निर्मूलनात बाबासाहेबांनी भूमिका महत्त्वाची होती. खोती व्यवस्थेमुळे वेठबिगारी निर्माण होते शोषणामुळे गरीबी वाढते म्हणून खोती पध्दती रद्द करण्यासाठी डॉ.आंबेडकरांनी चळवळ उभारली व तीला पाठींबा दिला. त्यांच्या या कार्यामुळे कृषी व्यवस्थापन, उत्पादन, विपणन यामधील मध्यस्थ दूर होऊन त्यांच्या फायदा शेतकज्यांना झाला.

शेती क्षेत्रावर अवलंबुन असणारे अतिरिक्त, श्रमिक औद्योगिक क्षेत्राकडे वळवण्याच्या धोरणाबद्दल डॉ.आंबेडकर आग्रही होते. त्यांनी आपले मत स्पष्ट केले की शेतीतील अतिरिक्त श्रमिक बीगरशेती उद्योगांकडे वळविण्यास शेतजमीनीवर अवलंबुन असलेले अधिमुल्यही कमी होईल, उद्योगात काम मिळाल्यामुळे अशी जनता रोजी रोटी कमवतील त्यामुळे रोजगार वृध्दी होऊन भांडवल वृध्दीला मदत होईल म्हणून डॉ.आंबेडकरांच्या मते शेतीतील समस्यांवर सशक्त औद्योगिकरण हाच उत्तम पर्याय राहील. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न वाढून अर्थव्यवस्थेचा विकास होईल.

**६. डॉ.आंबेडकर आणि औद्योगिकरण**

भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास होण्यासाठी औद्योगिकरण आवश्यक असल्याचे डॉ.आंबेडकरांना प्रतिपादन केल्याचे आढळते. त्यांच्यामते भारतीय जनता दारीद्र्याच्या दुष्टचक्रात अडकलेली आहे.त्यांना या चक्रातून बाहेर काढण्यासाठी औद्योगिकरण हे सुनिश्चित साधन आहे.वर्ष १९४३ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थे औद्योगिकरणाची आवश्यकता का आहे?हे स्पष्ट केले होते.त्यांच्यामते भारतात कृषी क्षेत्र अयशस्वी ठरलेले आहे.त्यांनी भारतात औद्योगिकरणाला प्रोत्साहन दिले पाहीजे. परंतु त्यात मोठमोठे उद्योग सरकारने राष्ट्रीयकृत करुन अथवा स्वत: स्थापन केले पाहीजे असे स्पष्ट मत व्यक्त केले होते.

**७. डॉ.आंबेडकर व लोकसंख्या नियंत्रण**

डॉ.आंबेडरांना भारतीय अर्थव्यवस्थेचे भविष्य माहीत असावे. त्यांनी सहा दशकांपूर्वीच वाढत्या लोकसंख्येबद्दल सरकारला, समाजाला चिंता व्यक्त केली होती.त्यांनी १० नोव्हेंबर १९३८ मध्ये वाढत्या लोकसंख्येच्या अर्थव्यवस्थेवरील भयावह परिणामाबद्दल सावधान केले

होते.त्यांनी भारताच्या आर्थिक प्रगतीसाठी लोकसंख्या वाढीवर नियंत्रण मिळवावे असा स्पष्ट आग्रह धरला होता.

आपल्या मुळ भाषणांमध्ये डॉ.आंबेडकरांनी लोकसंख्येच्या वृध्दीमुळे देशाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागेल असे तेव्हाच सुचविले होते. त्यात देशात कमालीची गरीबी आहे.ज्यामुळे मृत्युदर अधिक आहे.त्या तुलनेत जन्मदर अधिक आहे.लहान मुलांना शाळेत घालता येत नाही.मुलींचे लग्न अगदी लहान वयातच केले जाणे.त्यामुळे लोकसंख्या वृध्दीचा दर अधिक असतो.वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत साधन सामग्री उपलब्ध करणे ही मोठी समस्या निर्माण होते. मोठ्या आकाराचे कुटूंब स्वत:वरच नाही तर समाजावर भार बनतात. जास्त लोकसंख्या वाढीमुळे देशात वनांची कमतरता तसेच पशूपक्ष्यांना खाद्यांची कमतरता या बार्बीचा सामना करावा लागेल. लोकसंख्या वाढली तर शेतजमीन प्रत्येकाचे पालन-पोषण करु शकणार नाही त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या विकास कठीन होईल असे भाकीत स्पष्ट विचार डॉ.आंबेडकरांनी परखडपणे मांडले होते. त्याचा परिणाम आज दिसून येत नाही.

**८. डॉ.आंबेडकर आणि राज्य विमा**

डॉ.आंबेडकरांनी आपल्या आर्थिक धोरणांमध्ये विमा योजनांना प्रमुख स्थान दिलेले होते. आंबेडकर हे पहिले विचारवंत होते की त्यांनी भारतात विमा योजनेचे राष्ट्रीयकरण करण्यात यावे असे सुचविले होते.यामुळे फक्त लोकांनाच आर्थिक सुरक्षितता प्राप्त झाली नाही.तर राज्याच्या अर्थव्यवस्थांना त्यामुळे बळ मिळाले आंबेडकरांची इच्छा होती की विमा व्यवसायावर राज्याची मक्तेदारी असावी.त्यांनी आग्रह धरला होता की राज्याने प्रत्येक प्रौढ व्यक्तीला विमा पॉलीसी घेणे अनिवार्य करावे. डॉ.आंबेडकरांनी विमा पॉलीसीच्या मानवी जीवनातील अभिन्न अंग मानले. त्यांची इच्छा होती की विम्याला व्यापक आणि प्रगतीशील उद्योग बनवावे जेणेकरुन सामान्य माणसांना त्याचा फायदा होईल.

**९. डॉ.आंबेडकर पायाभूत सुविधांची निर्मिती**

अपूज्या पायाभूत सुविधा हीच भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासातील समस्या असून नव्या पायाभूत सुविधांची निर्मिती करण्याची गरज डॉ.आंबेडकरांनी बोलुन दाखविली. ते फक्त बोलूनच थांबले नाही तर दीर्घकाळ टिकतील अशा मूलभुत सुविधा निर्माण करण्यासाठी त्यांनी मेहनत घेतली.१९४२ ते ४६ या कालावधीत ते व्हाईसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलच्या श्रमिक, सिंचन आणि विद्युत ऊर्जा विभागाचे सदरच होते. भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रगतीच्या दृष्टिने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या जनस्त्रोत आणि विद्युत विकास या दोन क्षेत्रांची त्यांनी पायाभरणी केली. आंबेडकरांनी स्थापन केलेल्या सेंट्रल वॉटर कमिशन आणि सेंट्रल इलेक्ट्रीसिटी ॲथेरिटी या दोन तज्ञ संस्था देशाच्या सिंचन आणि ऊर्जा विकासासाठी भरीव कामगिरी करीत आहेत.

त्यांनी स्वतंत्र राज्य विद्युत मंडळाचे ही समर्थन केले होते.केंद्र सरकारने विद्युत निर्मिती आणि पुरवठा या क्षेत्रांत थेट सहभागी होण्याचा पर्याय ठेवावा या मताचेही डॉक्टर समर्थक होते.भारताच्या विकासासाठी स्वस्त आणि अमर्यादित विद्युत पुरवठा व्हावा अशी त्यांची अपेक्षा होती.

**१०. डॉ.आंबेडकर व नदी जोड प्रकल्प**

देशाच्या विकासासाठी व सामान्य माणसाच्या उन्नतीसाठी डॉ.आंबेडकर नदी जोड प्रकल्पांबाबत आग्रही होते. १९४५-४६ मध्ये सिंचन विभागाचे सदस्य असतांनाच त्यांनी कृष्ण गोदावरी आणि तापीच पाणी वाहुन समुद्रात जाऊन वाहु नये, या नद्या जोडल्या जाव्यात असा आग्रह त्यांनी धरला होता.

भारतातील शेती आणि शेतकरी जोपर्यंत बळकट होणार नाही तोपर्यंत देशाच्या अर्थव्यवस्थेचा विकास साध्य होणार नाही त्यासाठी दामोदर खोरे प्रकल्प, भाक्रा नांगल प्रकल्प आणि कोसी धरण यासारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प उभे राहावे यासाठी डॉ.आंबेडकरांनी प्रयत्न केले. यासोबतच नद्या जोड प्रकल्प भारताने हाती घ्यावा त्यामुळे विजेचा प्रश्न सुटेल. शेतीसाठी लागणाज्या सिंचनाच्या प्रश्न सोडविता येईल व सोबतच देशांतर्गत जलवाहतुकीला चालना देऊन शेती, कारखानदारी व शहर जोडता येईल असे उद्देश डॉ.आंबेडकरांनी मांडले होते.

**११. डॉ.आंबेडकरांचे दारुबंदी संबंधीत विचार**

भारतीय समाजात असलेले मद्यपान बंद करुन ही सामाजिक समस्या पूर्णपणे नष्ट करावी अशी.महात्मा गांधींजीची तीव्र इच्छा होती. परंतु डॉ.आंबेडकर दारुबंदीकडे धार्मिक दृष्टिकोनातुन न बघता महसुलाच्या दृष्टिकोनातुन बघत होते. डॉ.आंबेडकर तत्कालीन अर्थशास्त्रज्ञ होते. आणि त्यांची धारणा होती की स्त्री पुरुषांमधील नैतिकता, जागरुकता आणि सहकार्य अर्थव्यवस्थेला चांगल्या प्रकारे सांलन करण्यास राबाण ठरु शकते. ते मद्यपानाच्या विरुध्द नव्हते.तर ते मद्यपानाला योग्य आणि कायदेशीर रुप देण्याच्या बाजुने होते.त्यांनी सामाजिक समतेच्या दृष्टिने मद्यपानाचे समर्थन केलेले दिसते.त्यांच्यामते दारुबंदी समजदारीने लागू केली पाहीजे.पण तसे करतांना केवळ महसुली उत्पन्नाकडे लक्ष दिले पाहीजे.त्यांच्यामते मद्यपानही फळ चिंताजनक समस्या नाही.

दारुबंदीमुळे सरकारच्या तोटा होईल. पण दारुबंदी केली तरी लोकांनी मद्यपान बंद केले का?भारत सरकारने अनेक विदेशी कंपन्यांना मद्यांची आयात व उत्पादन करण्याची मुक्त सुट दिलेली आहे. ती डॉ.आंबेडकरांच्या मते शोकांतिका आहे.

**१२. डॉ.आंबेडकर व महिला सशक्तीकरण**

डॉ.आंबेडकरांच्या मते आर्थिक विकासामध्ये महिलांचा सहभाग तोपर्यंत शक्य नाही जोपर्यंत त्यांच्या सामाजिक स्थितीत व समानतेत सुधारणा होत नाही. म्हणून आंबेडकरांनी महिलांना समान अधिकार व व्यवसायाचे स्वातंत्र्य दिले जावे.अशी आग्रही भूमिका मांडली होती. डॉ.आंबेडकरांनी त्यांच्या आयुष्याची महत्त्वाची वर्षे स्त्रीयांना समानतेचा हक्क देण्यासाठी स्त्रीयांना दुय्यम दर्जा न देण्यासाठी, स्त्रीयांच्या वाईट व्यवसायापासून (वेश्याव्यवसाय) दूर करण्यासाठी खर्च केला होता. त्यासाठी त्यांनी अनेक कायदे कलम करण्यासाठी सरकारला बाध्य केले.आर्थिक विकासात महिलांचा सहभाग मोठा असतो.त्यामुळे त्यांना आर्थिक स्वातंत्र्य बहाल करावे या मनाचे ते होते.

**१३. डॉ.आंबेडकर आणि आर्थिक विकास**

डॉ.आंबेडकरांची आर्थिक तत्त्वज्ञान विकासाच्या सोनेरी वाटेवर प्रकाश टाकते त्यांच्या तत्त्वज्ञानात आर्थिक विकासाच्या बाबतीत राज्याची भूमिका महत्त्वाची मानली आहे. त्यांच्या विचारसरणीत

सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रामध्ये व्यवस्थीत समतोल साधलेला आहे.क्षेत्र महत्त्वाचे नाही परंतु विकास साध्य करतांना समाजातील तळागाळातील व्यक्तीपर्यंत त्यांची फळे पोहोचली पाहीजेत.तरच आर्थिक विकास सार्थक होईल.

**१४. डॉ.आंबेडकर व शासकीय समाजवाद**

डॉ.आंबेडकरांनी आर्थिक विपन्नावस्था आणि गरीबी स्वत: अनुभवली होती. गरीब जनतेची दयनीय व्यवस्था जवळून अनुभवल्यामुळे ते समाजवादाकडे आकर्षित झाले होते.गरीबीचे निर्मुलन, उत्पादनात वाढ आणि देशाच्या सर्वांगिण प्रगतीसाठी राष्ट्रीयीकरण धोरणांचे कहर समर्थन केले होते.त्यांनी फक्त उद्योग क्षेत्रातच नव्हे तर शेतीक्षेत्रातही राज्य समाजवाद आणावा असे प्रतीपादन केले होते.त्यांच्यामते जोपर्यंत राज्य कृषी व उद्योग क्षेत्रात, समाजातील गरीब लोकांच्या हितासाठी साधनसामग्री उपलब्ध करुन देऊ शकत नसेल तोपर्यंत देशाची आर्थिक समृध्दी होणे कठीण आहे.

डॉ.आंबेडकरांच्या म्हणण्यानुसार आर्थिक लोकशाही प्रस्थापीत करण्यासाठी आर्थिक धोरण आणि कार्यक्रम हे राज्य घटनेचे अविभाज्य भाग असले पाहीजेत. शेतीचे, मोठ्या उद्योगाचे राष्ट्रीयीकरण, प्रत्येक नागरिकासाठी सक्तीची विमा योजना आणि आर्थि प्रगतीला हातभार लावण्यासाठी खाजगी उद्योजकांना वाव देण्याच्या आवश्यकतेच्या अंतर्भाव असायला हवा.असे कार्यक्रम शाश्वत असायला हवे.विरोधी पक्ष सत्तेवर आला तरी त्याला हे कार्यक्रम रद्द करता येणार नाही. अशी तरतूद हवी या योजनेला डॉ.आंबेडकरांनी घटनात्मक शासकीय समाजवाद असे नाव दिले होते.

**१५. डॉ.आंबेडकर आणि श्रमिक वर्गाची सुरक्षितता**

डॉ.आंबेडकरांनी दयनीय स्थिती ज्ञात होती. डॉ.आंबेडकर१९४२ ते ४६ या कालावधीत भारतीय गव्हर्नर जनरल कार्यकारणीत श्रम मंत्री होते तेव्हा ते पहिले व्यक्ती होते की ज्यांनी ब्रिटीश शासन व देशातील लोकांचे लक्ष श्रमिकांच्या समस्यांकडे वेधले होते. कामगारांसंबंधी डॉ.आंबेडकरांनी तीन उद्देश भारत सरकारसमोर मांडले होते ते म्हणजे १) कामगार कायद्यांच्या निर्मितीमध्ये एकरुपता ठेवणे, २) औद्योगिक विवाद निर्मुलनासाठी निवारण प्रक्रियेची निश्चिती करणे, ३) मालक व कामगार वर्गामध्ये कामगार सुरक्षिततेसंबंधी करार व चर्चा करणे डॉ.आंबेडकरांना भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कामगांरासाठी फक्त साधारण सोयी सुविधाच फक्त नको होत्या तर त्याबरोबरच कामगारांसाठी प्रभावी व व्यापक सामाजिक सुरक्षितता प्रणालीचा ही विकास त्यांना हवा होता.

कामगार वर्गाच्या कल्याणासाठी तसेच ते संघटीत होण्यासाठी कामगारांच्या संपाचेही त्यांनी समर्थन केले होते.त्यांच्यामते कामगार कल्याण सामाजिक न्याय व आर्थिक विकास यांच्यान घनिष्ठ संबंध आहे.

**१६. डॉ.आंबेडकर व शासकीय हस्तक्षेप**

डॉ.आंबेडकरांना अर्थव्यवस्थेमध्ये शासनाच्या हस्तक्षेप आवश्यक वाटत होता. परंतु राष्ट्रीयीकरणाचे धोरण सर्वत्र लागु करणे त्यांना आवश्यक वाटत नव्हते.परंतु लोह, खाणकाम अभियांत्रिकी वाहतूक व दळणवळण मूलभूत उत्पादन उद्योग इ.मोठ्या व अवजड पायाभूत सेवा सुविधांमध्ये सरकारने गुंतवणुक करावी.ह्या क्षेत्राला भांडवलदारांपासून दूर ठेवावे कारण एका बाजूला भांडवलदार वर्ग अती नफा मिळवितो तर दुसऱ्या बाजूला श्रमिकांचे शोषण ही करतो.परंतु ते मार्क्सप्रमाणे भांडवलदारांच्या कहर विरोधीही नव्हते त्यांनी खाजगी क्षेत्राच्या गुंतवणूकीला ही वाव द्यावा असे सुचविले होते.

त्यांच्यामते भारतीय अर्थव्यवस्थेचा प्रगतीचा दर वाढविण्यासाठी सरकारने केवळ सहायकाली भूमिका बजावून न थांबता, विकासभिमुख घ्यायला, हवी डॉ.आंबेडकर सर्वसमावेशक विकासाच्या उद्दीष्टांबाबत आग्रही होते.

**निष्कर्ष**

डॉ.आंबेडकरांनी भारतीयय अर्थव्यवस्थेसंबंधी केलेला आर्थिक कार्यावरुन तसेच त्यांच्या आर्थिक तत्त्वज्ञानावरुन पुढील ठळक निष्कर्ष निघतात.

१. भारताच्या सार्थक विकासासाठी देशातील व्यक्तींना व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य असावे असे डॉ.आंबेडकरांनी आग्रही प्रतिनपादन केलेले दिसून येते. जातीनुसार व वडिलांपार्जीत चालत आलेल्या व्यवसायांकडे पूर्वग्रह दुषित भावनेने पाहणे सोडून दिले पाहिजे. व्यक्तिला जो व्यवसाय आवडेल त्या व्यवसायात ती व्यक्ती आपली क्षमता व सामर्थ्य प्रदर्शीत करेल तो त्याने करावा असे स्वातंत्र्य त्याला दिले जाणे काही व्यवसायांबद्दल असलेला भेदभाव पूर्ण विचार कायद्याने पूर्णपणे नष्ट केला पाहीजे.

२. डॉ.आंबेडकरांनी सहादशकांपूर्वीच लोकसंख्या वृध्दीबद्दल व तिच्या परिणामाबद्दलजागृत केले होते. त्यांनी भारताच्या आर्थिक विकासासाठी वाढता जन्मदर नियंत्रित ठेवणे अनिवार्य आहे असे स्पष्ट केले होते. परंतु राजकारण्यांनी त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष केले. तयाचा परिणाम आजची भारतीय अर्थव्यवस्था भोगत आहे.

३. डॉ.आंबेडकरांनी नद्याजोड प्रकल्पाबाबत आग्रही भूमिका घेतली होती. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास मोठ्या प्रमाणावर झाला असता. सिंचन, ऊर्जा, विजनिर्मिती, शेती, जलवाहतुक यांचा विकास झाला असता. वाढत्या, खर्चामुळे व राजकारणामुळे या राष्ट्रदिनाच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाकडे जाणीवपूर्वक दूर्लक्ष केले गेले. आज देश पाण्यासाठी सिंचनासाठी, वीजेसाठी झगडतो आहे. त्याला भारनियमनाचे दुष्काळाचे चटके बसत आहेत. डॉ.आंबेडकरांच्या विचारांना नाकारल्यामुळे इतक्या भयंकर समस्यांना भावी पिढीला तोंड द्यावे लागत आहे.

४. डॉ.आंबेडकरांच्या मते लोकांनी आर्थिक विकासाच्या मागे असले पाहीजे परंतु असे करतांना त्यांनी स्वातंत्र्य आणि समता ह्या सामाजिक आदर्शांना विसरु नये. तरच तो आर्थिक विकास यशस्वी होईल तसेच लोकशाही, समाजवाद व शासन इ. घटकांना मानवी जीवन सुखमय बनविण्याचे साधन मात्र समाजले पाहीजे.

५. डॉ.आंबेडकरांनी सुचविल्याप्रमाणे औद्योगिकरण व कृषी

क्षेत्रातील सुधारणा यांच्यामध्ये समन्वय निर्माण झाला पाहीजे. तरच भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास फायदेशीर ठरेल. भारतीय, अर्थव्यवस्थेतील शाश्वत दारीद्र्य आणि बेकारी या समस्यांवर एकमेव उपाय म्हणजे औद्योगिककरणाला प्रोत्साहन देणे होय. त्याचप्रमाणे एकूण श्रमिकांपैकी ६० टक्के शेतमजुरांच्या कल्याणासाठी शेती क्षेत्राला उद्योगाचा दर्जा दिला पाहीजे. आज आपण बघतो की डॉ.आंबेडकरांच्या कृषी विषयक सुधारणांचा विचारांचा स्विकार न केल्यामुळे ४० टक्के शेतकरी शेतीपासून दूर जात आहेत. तर हजारो शेतकरी आत्महत्या करीत आहेत. शेती किफायतशीर राहीली नाही.

६. डॉ.आंबेडकरांच्या मते अर्थव्यवस्थेच्या प्रगतीसाठी शासकीय समाजवाद म्हणजेच शासनाच्या हस्तक्षेप आवश्यक आहे. ज्या देशात मागासलेली शेती, अस्पृश्यता, जातीवाद, बेकारीनिरक्षता, अज्ञान, अंधश्रध्दा, देववाद, दारीद्र्य अशा ठाण मांडून बसलेल्या समस्या असतील तेथे शाश्वत विकासात शासनाची रचनात्मक सर्वसमावेशक भूमिका असली पाहीजे.

आज आपण बघतो की डॉ.आंबेडकरांच्या आर्थिक विचारांना नाकारल्याने मुक्त अर्थव्यवस्थेचा स्विकार केल्याने गरीब सिमांतिक लोक त्यांची स्थिती दयनीय आहे आर्थिक विषमता वाढत आहे.

७. डॉ.आंबेडकरांनी १९५२ च्या पहिल्या अर्थसंकल्पात प्रगतीशील कराचे प्रतिमान समाविष्ट करावे यासाठी आग्रह धरला होता. तेव्हा तो नाकारण्यात आला होता. परंतु २०१६ च्या अर्थसंकल्पात श्रीमतांवर १५ टक्के अधिकार लावला जातो. आंबेडकरांच्या सुचवलेल्या कर प्रणालीतील तत्त्व आज स्विकारले जातात. पण त्यांचे नाव न होता हा दळभद्री पणा आहे.

**संदर्भ**


1. Shweta Wankhede, impact of Dr.Ambedkar's Houghts on Indian Economy, Dr.Babasaheb Ambedkar International Association for Education, Japan by Internet.
2. Gaikwad Rajesh Kachru, Dr.Babasaheb Ambedkar and Indian Economy, Current Global reviewer. Vol.-1, Issue-VII, Nov-2015 to April-2016 Pp.157-159.
3. Jayashri Purushottam Sarode, Impact of Dr.B.R.Ambedkar's thoughts on Indian Economy, Research Analysis and Evoluation, Vol-IV, Issue-42, March-2013, Pp. 80-83.
4. M.R.Ingle, Relevance of Dr.Ambedkar's Economic Philosophy in the current Scenario, Research Analysis and Evaluation, Vol-I, Issue-12, Sept.-2010
5. Khanderavaji S. Kale relevance of thoughts of Dr.Babasaheb Ambedkar for Making super power India. Global Economic Research, Vol-I, Issue-11, Oct-2011 to Mar-2012, Pp.105-108.
6. Rajkumar A.K. Baswaraj T.Kumnoor Dr.Ambedkar's Economics Philosophy to the Indian Econimy Golden Research thoughts, Vol-I, Issue-12, June-2012, Pp. 14-15.

७. राजेंद्र धाये, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार,Review of Research, Vol-4, Issue-9, June-2015, Pp 1-60.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती, शेतकरी, पाणी, वीज याबाबतचे विचार

**– प्रा. जी. एन. पाटील**
इतिहास विभाग, गंगामाई कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, नगाव, ता. जि. धुळे (महाराष्ट्र)

**प्रास्ताविक**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतातील ग्रामीण समाजव्यवस्थेची जाण होती. तितकेच भारतातील शेतीबद्दलही जाण होती. देशातील शेतीचे चित्र बदलले पाहिजे याबाबत ते आग्रही होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शेती, शेतकरी, पाणी, वीजपुरवठा, शेतकऱ्यांच्या समस्या सोडवून उपाययोजना करण्यासाठी सूक्ष्म विचार केल्याचे दिसून येते. प्रस्तुत शोधनिबंधात संशोधकाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतातील शेती, शेतकरी, पाणी, वीज समस्या, दुष्काळ समस्या याबाबत बाबासाहेबांनी जे विचार व उपाययोजना सूचविलेल्या आहेत, त्याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**उद्देश –** प्रस्तुत शोधनिबंधासाठी संशोधकाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती, शेतकरी, पाणी, वीजपुरवठा याबाबतच्या विचारांचा अभ्यास करणे हा उद्देश ठेवला आहे.

**गृहीतक –** प्रस्तुत शोधनिबंधासाठी संशोधकाने गृहितक म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती, शेतकरी यांच्या समस्यांवर उपाययोजना सुचविलेल्या आहेत. असे गृहितक ठरवलेले आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी माहिती विश्लेषण पद्धतीचा वापर केलेला आहे. दुय्यम तथ्य साधन सामग्रीचा आधार घेतलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले शेती, शेतकरी, पाणी, वीजपुरवठा याबाबतचे विचार त्यांचे विचार, कार्य तसेच शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत सूचविलेल्या उपाययोजना यांचे महत्त्व जाणून घेण्यासाठी संदर्भग्रंथ म्हणून साहित्य, पुस्तके, लेख, वर्तमानपत्रातील लेख, विविध संकेतस्थळे यांचा आधार घेतलेला आहे.

**माहितीचे विश्लेषण**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतातील ग्रामीण समाजव्यवस्थेची जाण होती. भारतातील शेतीचे चित्र बदलले पाहिजे, याबाबत ते आग्रही होते. देशात शेती, शेतकरी आणि शेतीशी संबंधित समुहाचा विचार छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केला. अवघे २७ वर्षाचे वय असतांना डॉ. आंबेडकरांनी देशातील शेती आणि शेतकरी यांचे संशोधन करुन 'लहान शेतकऱ्यांच्या समस्या आणि उपाय' हा शोधनिबंध लिहिला. शेतीसाठी जमीन व पाणी हे मुख्य घटक आहेत. पाण्याशिवाय शेतीचा विकास अशक्य आहे. शेतकऱ्याला शाश्वत पाणी मिळणे गरजेचे आहे.

पाण्याशिवाय उत्पादकता वाढणे आणि शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावणे शक्य नाही, हे त्यांनी ब्रिटिश सरकारच्या निदर्शनास आणून दिले होते. शेतीला उद्योग मानून त्यासाठी पायाभूत सुविधा पुरवून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास झाला पाहिजे. शेतकरी समृद्ध झाला तरच शेतीशी निगडीत सर्व घटकांना या आर्थिक सक्षमतेचा फायदा होईल, असे डॉ. बाबासाहेबांचे मत होते.

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चिंतन करणाऱ्या, विचार मांडणाऱ्या आणि त्यांच्यासाठी चळवळी उभ्या करुन या देशातील शेती, शेतकऱ्यांचे प्रश्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना संपवायचे होते. त्यासाठी त्यांनी २५ हजार शेतकऱ्यांचा देशातील पहिला मोर्चा काढला. एवढेच नव्हेतर, त्यांच्या नेतृत्वामध्ये ७ वर्षे दीर्घकाळ शेतकऱ्यांचा संप झाला. देशातील सर्व लोकांना ते जातीभेद विसरुन एकत्र आल्यास देश तुमच्या हाती येईल, असे ते सांगत. कोकणातील खोती पद्धतीच्या विरोधात त्यांनी लढा दिला. देशाचे पहिले पाटबंधारे मंत्री झाल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेती आणि शेतकरी यांच्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण असे निर्णय घेतले. तसेच देशाचे पहिले ऊर्जामंत्री झाल्यानंतरही त्यांनी पहिला ऊजा आयोग स्थापन करुन वीज आणि पाण्याचे नियोजन केले. उद्योगांना वीज देताना कृषी उद्योगाला प्राधान्य दिले. डॉ. बाबासाहेबांमुळे देशातील स्त्रियांना मानाचा व समतेचा अधिकार मिळाला. कामगारांना न्याय्य मिळवून देऊन त्यांना सशक्त बनविले. शेती व शेतकऱ्यांच्या अनेक प्रश्न व समस्यांबाबत त्यांनी परखड विचार मांडलेले आहेत. शासनाकडून पुरेसे आर्थिक पाठबळ न मिळाल्याने शेतकरी सावकारांचा आधार घेत असत. सावकरांच्या या पाशतून आजपर्यंत शेतकऱ्यांची सुटका होऊ शकलेली नाही. या व्यवस्थेला हद्दपार करण्यासाठी शासनाने शेतकऱ्यांना बियाणे, खते, पाणी आणि पीक जोपासना खर्च दिला पाहिजे. शासनाला मोठ्याप्रमाणावर महसूल देणाऱ्या शेतीचे आर्थिक उत्तरदायित्व शासनाने उचलावे. 'उत्तरदायित्व' या शब्दातून शेतकऱ्याचे पोशिंदा म्हणून असलेले ऋण शासनाने फेडावे असे त्यांना अपेक्षित होते. शेती व्यवसायाचा संबंध त्यांनी समाजव्यवस्थेशी जोडला होता. ग्रामीण भागातील जातीवर आधारित समाज व्यवस्थेचे कारण त्यांनी ग्रामीण आर्थिक व्यवस्थेचे कारण त्यांनी ग्रामीण आर्थिक व्यवस्थेमध्ये शोधले होते. त्यामुळेच जातीवर आधारित समाजव्यवस्थ बदलावयाची असेल तर त्यासाठी शेतीमध्ये परिवर्तन घडवावे लागेल. शेतीला उद्योग मानून शेतीला पायाभूत सर्वसुविधा पुरवून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास झाला पाहिजे. शेतकरी आर्थिकदृष्ट्या समृद्ध झाला, तर शेतमजूर आणि शेतीशी निगडीत सर्वच घटकांना या आर्थिक क्षमतेचा फायदा होईल. आर्थिक स्त्रोत तळागाळापर्यंत झिरपले म्हणजे ग्रामीण माणसाच्या मानसिकतेमध्ये सकारात्मक बदल घडून येतील आणि हे बदल सामाजिक परिवर्तनासाठी पोषक ठरतील. आर्थिक विषमता जितकी कमी होईल, तितकी जातीय भेदभावाची दरी कमी होईल, असे बाबासाहेबांना वाटत होते. शेतीसाठी जमीन व पाणी हे मुख्य घटक आहेत. पाण्याशिवाय शेतीचा विकास

अशक्य आहे. शेतकऱ्याला शेतीसाठी शाश्वत पाणी मिळणे गरजेचे आहे. पाण्याशिवाय उत्पादकता वाढणे आणि शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावणे शक्य नाही, हे त्यांनी ब्रिटिश सरकारच्या नजरेस आणून दिले. शेतीला शाश्वत पाणी पुरविण्यासाठी नदीच्या पाण्याचे नियोजन झाले पाहिजे. देशात पडणारे दुष्काळ हे मानवनिर्मित आहेत. दुष्काळ हटवायचा तर दुष्काळात पाण्याचे नियोजन करावे. जिरायती शेती, बागायती करण्याचे प्रयत्न वाढवावेत. शेती व शेतमजूर समद्ध झाला तरच देश समृद्ध होईल, असे मौलिक विचार डॉ. आंबेडकरांनी मांडले होते. पाण्यासंदर्भात केवळ विचार व्यक्त न करता त्यांनी ब्रिटिश सरकारच्या नदीच्या खोऱ्यातील पाण्याच्या नियोजनाची योजना सादर केली. ही योजना 'दामोदर खोरे परियोजना' म्हणून ओळखली जाते.

**निष्कर्ष**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती, शेतकरी, पाणी व वीज नियोजन याबाबतचे विचारांचा अभ्यास केल्यावर संशोधक खालील निष्कर्षापर्यंत पोहचला आहे.

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून हे सिद्ध केले आहे की, शेतीसाठी अधिनियम व कायदा असावा ही संकल्पना शेतकऱ्यांसाठी किती मोलाची आहे, हे अधोरेखित होते.

२. आपल्या शासनाने १९९६ मध्ये कृष्णा, गोदावरी, तापी, नर्मदा अशी खोतांची विभागणी केली. यावरुन डॉ. बाबासाहेब यांच्या दूरदर्शीपणाची लांबी व खोली लक्षात येते.

३. पीक पद्धती, पाणी उपलब्धता, बांध बंदिस्टी, उत्पादकता वाढ, साठवण व्यवस्था, शेतमालाची विक्री शेतमालाला भाव यासंदर्भात नियम करावेत असे हे सुचवितात.

४. सामुहिक शेती प्रणालीवर आधारित शेती महामंडळे आमलात आणावी असे ते सुचवितात.

५. शेतीविषयक सूचनांची अंमलबजावणी केली तर शेती व ग्रामीण भागाचे परिवर्तन घडून येईल असे वाटत होते.

६. सध्या राज्यामध्ये होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या, शेती समोरचे असलेले प्रश्न यांचा विचार केला तर आजही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेले वरील विचार प्रेरणादायी ठरणारे आहेत.

**संदर्भ**

१. Prahaar.in
२. दै. लोकसत्ता मधील लेख दि. १४/०४/२०१७.
३. साप्ताहिक जनता
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८, भाग ३, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने, प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, ऑक्टोबर २००२.
५. डॉ. जाधव नरेंद्र, बोल महामानवाचे, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, खंड ०३.
६. खरात शंकरराव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा, प्रकाशक श्याम दयार्णव कोपर्डेकर, जुलै २००१.

# डॉ. आंबेडकर यांचे लोकशाही संदर्भातील आकलन

**– डॉ. विजय तुंटे**
सहयोगी प्राध्यापक, पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग, प्रताप महाविद्यालय, अमळनेर, जि.जळगाव
**– प्रा. एच. डी. जाधव**
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, प्रताप महाविद्यालय, अमळनेर, जि.जळगाव

**प्रास्ताविक**

डॉ. भिमराव रामजी आंबेडकर हे नांव केवळ भारतात परिचित नाही, तर जागतिक स्तरावर सुपरिचित आहे. डॉ.आंबेडकर हे कायदेपंडित, घटनेचे शिल्पकार, पक्ष व संघटनेचे नेते, दलित समुदायांचे नेते, लेखक, विचारवंत अशी बहुविध स्वरुपाची ओळख आढळते. बाबासाहेब आंबेडकरांचे अध्ययन व लेखनांचा व्यासंग हा दीर्घ स्वरुपाचा होता. ते विद्याप्रचुर होते; त्यांना सात भाषा अवगत होत्या. त्यांनी वयाच्या २४ व्या वर्षी पीएच.डी. पदवी प्राप्त केली. त्यांची विद्वता व प्रश्नांचे आकलन विशेष स्वरुपाचे होते.ते संघर्षशील व प्रयत्नशील स्वरुपाचे सुद्धा व्यक्तिमत्व होते. याची प्रचिती त्यांना जीवनाच्या विविध संघर्षमय टप्प्यावर झालेली आढळते.बाबासाहेबांनी आयुष्यभर मानवी हक्क, स्वातंत्र, समता, न्याय, बंधुत्व, जातीभेद विरोध या विविध मूल्यांसंबंधी जनआंदोलने केली. या सर्व संघर्षात बाबासाहेबांची निष्ठा लोकशाहीवर नितांत स्वरुपाची होती.लोकशाही या शब्दाच्या आशयामध्ये राज्यकारभार व लोकहित महत्वपूर्ण आढळते. अब्राहम लिंकन यांनी वर्णन केलेली लोकशाही जितकी महत्वाची आहे, तशी समाजव्यवस्थेत लोकशाही रुजणेही तितकेच महत्वाचे होते. हे बाबासाहेबांनी ओळखले आणि लोकशाही संबंधी विचारमंथन व चिंतन केले. खरी लोकशाही समाजव्यवस्थेत आणण्याचा प्रयत्न केला.लोकशाहीच्या यशस्वीतेचे मार्ग वा दिशा सांगीतले. आजची लोकशाही बाबासाहेबांच्या विचारमंथनाप्रमाणे प्रत्यक्ष जीवनात गतिशील व्हावी, हाच या लेखाचा हेतू व मुख्य प्रयोजन आहे.

**लोकशाहीचा अर्थ व प्रयोजन**

Democracy ही एक ग्रीक शब्दरचना आहे. यानुसार Demos म्हणजे लोक (People), Kratein, (सत्ता – Ruling Power) असा अर्थ अभिप्रेत होतो. एकंदरीत लोकशाही ही Good Society सारखी आदर्श असावी, आदर्श समाज हा स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यावर आधारीत असते. Democractic Government या विचाराचा आशय हा मूलभूत स्वरु पाचा असून Government of the people, by the people and for the people असा आहे; परंतु लोकशाही या पेक्षाही महत्वाची म्हणजे जीवन जगण्याचा मार्ग Way of Life आहे. लोकशाहीचे एक महत्वाचे वैशिष्टे म्हणजे सामाजिक गतिविधी (Social Transformation) आणि मानवी प्रगती (Human Progress) आहे. या अर्थानेच लोकशाही ही शासनाचा प्रकार आणि पद्धतसुध्दा आहे. लोकशाही संबंधी आपण Public Debate, Logical Agrument आणि Critical Enquiry करु शकतो. Rational Thinking या संबंधी महत्वाची भूमिका बजावते. भगवान बुद्धाची शिकवणूक ही या दृष्टिकोनातुन महत्वाची आहे.सामाजिक जीवन जगण्याच्या प्रक्रियेत ज्ञान हा लोकशाहीचा एक भाग ठरतो. लोकशाही हा समाजाचाच एक महत्वपूर्ण भाग आहे. (It was essentially a form of society) डॉ. आंबेडकर लोकशाहीची व्याख्या करतांना म्हणतात की, लोकशाही हा शासनाचा असा प्रकार व पध्दती आहे, ज्या माध्यमातून लोकांच्या आर्थिक – सामाजिक जीवनात हिंसेशिवाय क्रांतिकारक परिवर्तन घडवून आणता येते.

डॉ.आंबेडकरांनी जे काही मूलभूत विचार सांगितले त्यात तत्कालीन परिस्थितीसुध्दा कारणीभूत आहे. उदा. इस्ट इंडिया कंपनी, विधवा विवाह संबंधीचा कायदा (१८५६), जातीय अपात्रता नष्ट करण्याचा झालेला कायदा (१८५०), राणीचा जाहीरनामा (१८५८), इंडियन कौन्सिल अॅक्ट (१८६१, १८९२, १९०९), राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष (२८ डिसेंबर, १८८५), मुस्लिम लीगची स्थापना (१९०६), लखनौ करार (१९१६), सामाजिक परिषद (१८८७) नवे वर्ग, बुध्द आणि हिज धम्म, गुलामगीरीचा ज्वलंत प्रश्न हे विविध विचार बाबासाहेबांच्या विचार प्रक्रियेस एक प्रकारे गती देत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुना डिस्ट्रिक्ट लॉ लायब्ररीच्या हॉल मध्ये २२ डिसेंबर १९५२ या वर्षी खरी लोकशाही म्हणजे काय? या ज्वलंत मुद्यावर आपले अभ्यासपूर्ण भाषण वा विचार प्रस्तुत केले. त्यांच्यामते, कर्तुमकर्तुमन्यथा कर्तूम अशा स्वरुपाच्या राजेशाहीला लोकमताचा लगाम घालणे, हे पूर्वी लोकशाहीचे ध्येय होते. आता लोकशाहीचे ध्येय लोकांचे जास्तीत जास्त हित करणे हे आहे? जेरमी बेंथम व जॉन स्टुअर्ट मील या पाश्चात्य तत्ववेत्याने उपयुक्तवादी विचारप्रणाली (Utilitralism Ideology) सांगीतली. लोकांचे अधिकाधिक हित हे या विचाराचे मध्यबिंदू आहे. Greatest Happeness of the Greatest Number हा या विचारप्रणालीचा एक महत्वाचा आशय होता.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार या संदर्भात बेंथम व मीलच्या विचाराशी जुळणारे वा साम्य दर्शविणारे आढळते.

बाबासाहेब लोकशाहीच्या व्याख्येसंबंधी म्हणतात की, लोकांच्या राजकीय व सामाजिक जीवनात क्रांतीकारक बदल रक्ताचा एकही थेंब न गाळता घडवून आणणे म्हणजे लोकशाही होय. ज्याचा संदर्भ उपरोक्त चर्चेत आलेला आहे. या प्रकारची समाजव्यवस्था सामाजिक व अर्थिक समता प्रस्थापित करु शकेल. बाबासाहेब पुढे असेही म्हणतात की, अशा प्रकारची समता आणणारे लोक हे लोकशाहीचे खरेखुरे सेवक (Real Servant of Democracy) आहेत. बाबासाहेबांची उपरोक्त व्याख्या ही वॉल्टर बेजुएट या घटना पंडीताच्या व्याख्येपेक्षा थोडी निराळी वाटते.बेजुएटच्या मते, चर्चा करुन राज्यकारभार चालविणे म्हणजे लोकशाही. तर दुसरीकडे आंबेडकरांचे विचार असे की, लोकशाही

हे राज्यकारभाराचे एक रुप आहे; परंतु हे स्थिर नसते, ते नेहमी बदलत जाते, अशा निरनिराळया बदललेल्या स्वरुपात जो राज्यकारभार चालविला जातो, तो लोकशाही या नांवाखालीच. ग्रीक लोकांचा राज्यकारभार लोकशाही स्वरु पाचा होता. ग्रीक देशातील निम्मे लोक गुलाम होते व निम्मे स्वतंत्र होते.अशा देशाच्या राज्यकारभारात गुलामांना कोणत्याही प्रकारचा भाग घेता येत नव्हता. तरी ५०% लोकांनी चालविलेल्या अशा राज्यकारभाराला लोकशाही हे नांव होते. ग्रीक लोकशाहीपेक्षा भिन्न प्रकारची लोकशाही आपली आहे.१

लोकशाही ही अशी विचारप्रणाली आहे, की ज्यामुळे समाजव्यवस्थेत नैतिक मूल्यांची बूज राखण्याची जबाबदारी सूजान नागरिक करु शकतो. हे सर्व सार्वजनिक सारासार विचारशक्तीवर अवलंबून असते.लोकशाहीच्या प्राप्तीचे प्रयत्न अनेक राष्ट्रात घडवून आले. फ्रेंच राज्यक्रांती याचे उदाहरण होय, लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी सुरु केलेला फ्रेंच क्रांतीचा लढा यशस्वी झाला खरा; परंतु त्या यशाचे पर्यवसन जुलूमशाहीत झाले.२

Government of India Act 1919, भाग ११ यात खालील अनुच्छेद जोडले गेले.यात ॲक्ट नं.३ मध्ये भेदभावापासून संरक्षण संबंधीची तरतूद आहे. यानुसार लोकशाही स्वरु पातून चालणारे राज्यव्यवहार आणखीन गतीशील होईल. आंबेडकरांच्या मते, लोकशाही हे एक सामाजिक संघटन आहेत. एकीकडे शोषीत-वंचित सामाजिक घटकांचा स्वमुक्तिचा आक्रोश तर दुसऱ्या बाजुला वसाहतवादविरोधी अर्थीक प्रभुत्वशाली घटकांच्या मदतीने मध्यमवर्गाने राष्ट्रमुक्तिची गतिमान केलेली चळवळ हे विसाव्या शतकात भारतातील सामाजिक, राजकीय प्रक्रियेचे ठळक वैशिष्ट्ये म्हणून सांगता येईल.

**लोकशाहीचे घटक**

भगवान गौतमबुध्दाचा धर्म हा समर्पित मूल्य सांगणारा आहे. डॉ.आंबेडकरांनी काही आदर्शवादी विचार प्रतिपादन केले. उदा. Liberty, Equavality, Fraternity याच अर्थाने धर्म हा सामाजिक मूल्यांचा वैश्विक नियम आहे. म्हणून लोकशाही अंतर्गत स्वातंत्र्य, समता व बंधुत्व ह महत्वपूर्ण घटक आजच्या समकालीन जीवनात फारच उपयुक्त आहेत. डॉ.आंबेडकरांनी Educate, Organise, Agitate हे तीन तत्वमूल्य अत्यंत महत्वपूर्ण मानली आहेत.खालील काही मुद्यांमधून लोकशाहीच्या घटकासंबंधीची चर्चा विस्तृतपणे करता येईल.

पहिले,

- मनाची एकाग्रता, आदराची भावना आणि समता हे मूल्य महत्वपूर्ण आहेत.
- सामाजिक संघटन हे ताठर सामाजिक अडथळयापासून मूक्त असावी.
- लोकशाही ही शांततापूर्वक बदलाशी संबंधित आहे.
- परिणामकारक संसदीय लोकशाहीच्या कार्यप्रणालीसाठी राजकीय पक्ष अत्यावश्यक आहेत.
- संसदीय लोकशाही हे उदारमतवादी विचारावर आधारीत आहे.

दुसरे, अस्पृश्यांच्या मानवी प्रतिष्ठेच्या प्रस्थापनेच्या अनुपस्थितीत अशाप्रकारचे मिळणारे राजकीय स्वातंत्र्य हे सामाजिक अर्थिक स्तरावर वांझोटेच राहणार याबद्दल डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मनात शंका नव्हती.३ लोकशाही प्रक्रियेतील एक महत्वाचा घटक म्हणजे न्यायालयीन घटक वा यंत्रणा आहे.ब्रिटीश राज्यकर्त्यांनी संपूर्ण भारतीय उपखंडाला राजकीयदृष्ट्या एकसंघ करु न या प्राचीन देशात नूतन संस्था, संकल्पना आणि वैज्ञानिक मूल्यांचा परिचय करु न दिला. ब्रिटीशांनी कायदा व सुव्यवस्थेचे अधिराज्य निर्माण केले.रेग्युलेटिंग ॲक्ट (१७७३) नुसार न्यायदानासाठी सर्वोच्य न्यायालयाची स्थापना केली. यामुळे जातीबद्ध समाजरचनेवर एक प्रकारे आघात झालेला दिसतो.४ उदारमतवादी, पुनरु ज्जीवनवादी आणि आमूलाग्र परिवर्तनवादी विचारसरणीने सामाजिक उन्नती शक्य आहे; म्हणून हा विचार रु जविण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणावर १९ व्या शतकातील सामाजिक सुधारणावादी चळवळीने केला. यात प्रामुख्याने, थिऑसाफिकल सोसायटी (पुनरु ज्जीवावादी चळवळ), प्रार्थना चळवळ (बुध्दिप्रामाण्यवादी विचार); आर्य समाज (वैदिक परंपरेचा प्रभाव) इत्यादी संदर्भ अभ्यासात पुढे येतात.

तिसरे, समता, स्वातंत्र्य, बंधुत्व हया तीन मूलभूत घटकांवर राष्ट्रीय व सामाजिक जीवन आधारीत आहे.त्याप्रमाणे प्रज्ञा, शील आणि करु णा ही तीन विचार मूलभूत घटकांचे आधारभूत दीपस्तंभ आहेत.५ बाबासाहेब लोकशाहीत श्रमसंघटना महत्वाची मानतात.श्रमजीवी मजुरांच्या जीवनमानाचे रक्षण करणे महत्वपूर्ण मानतात श्रमजीवी दृष्टिकोन मध्यवर्ती ठेवून बाबासाहेब स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन करतात.ही नोंद घेणारी घटना मानावी लागेल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, समाजाचे ऐक्य हे कोणत्याही गोष्टीपेक्षा अधिक महत्वाची गोष्ट आहे, राखीव जागा हया गौण आहेत. (खैरमोडे, खंड १२, पृ.६९)

चौथे, लोकशाही ही अशी शासनप्रणाली आहे, ज्यामध्ये चर्चा व विवेकाधिष्ठीत विचारमंथन विशेष महत्वाचे असते.एखादया व्यक्तीस निवडून दिले, तर त्याच्या कर्तव्य कार्यासाठी हस्तक्षेप अयोग्य ठरणार नाही. तत्कालीन काळात मोरारजी भाई यांची भूमिकाही हुकूमशाहीस सुसंगत स्वरुपाची होती. एकटयाच्या तंत्राप्रमाणे राज्यकारभार ठिकपणे चालत नाही. म्हणून आपल्या देशात प्रौढ मताधिकार जनतेला आहे.जॉन स्टुअर्ट मीलने आपल्या Representive Government या ग्रंथात प्रौढ मताधिकार या संकल्पनेवर भर दिले होते.या अधिकाराने जनता आपले प्रतिनिधी आपल्या लोकसभेत कायदे करतात. ही लोकसभा आपल्या देशाचा राज्यकारभार संसदीय पध्दतीने करते, म्हणून आपल्या देशात संपूर्ण लोकशाही आहे. ही गोष्ट अर्धसत्य आहे; कारण लोकशाही ही परस्परनिगडीत व पूरक अवयवांनी बध्द झालेली देहयष्टी आहे.

पाचवे, ५ मे १९४५ schedule caste federation रोजी परिषदेत कम्युनल डेडलॉक ॲड वे टू सॉल्व इट जातीय पेचप्रसंग आणि त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग या नांवाने प्रसिध्द झालेले जे भाषण आहे; त्यात डॉ. आंबेडकर लोकशाहीबद्दल विचार प्रतिपादन करतात.त्यांच्या विचारात एक मनुष्य-एक मूल्य हा महत्वाचा समाजपयोगी घटक ठरतो.

डॉ. आंबेडकरांनी भारतात लोकशाहीची खरी गरज वा आवश्यकता प्रतिपादन केले आहे. लोकशाही सामाजिक व अर्थिक उन्नती करणारे एक साधन आहे. केवळ लोकशाही शासन प्रकारात सार्वजनिक हितसंबंध जोपासले जातील, दलितांना राजकिय सत्तेत वाटू मिळेल, अशी भूमिका

डॉ. आंबेडकरांची होती. दलितांच्या हक्कांची जपवणूक करणे हेच डॉ. आंबेडकरांच्या विचारसरणीचे मुख्य सूत्र होते.६

सहावे, २१ फेब्रूवारी १९४८ रोजी घटना समितीच्या सदस्यांनी माननीय अध्यक्षांना घटनेचा मसुदा सादर केला. हा विस्तृत मसुदा जनमत अजमावण्याकरिता जवळजवळ आठ महिने प्रसृत केलेला होता.४ नोव्हें.१९४८ रोजी मसुदा सभागृहासमोर सादर करतांना डॉ. आंबेडकर म्हणाले की, मसुदा समितीने सार्वभौम लोकशाही लोकसत्ताक राज्य ही संकल्पना केली. हा एक महत्वाचा घटक म्हणून पाहता येईल. १५ नोव्हें. १९४८ रोजी केलेल्या भाषणात लोकशाही संबंधी डॉ. आंबेडकर म्हणतात की, भारताची समाजरचना; अर्थिक रचना कशी असावी? हे भारतीय लोकांनी त्यांच्या इच्छेनुसार व कलमानुसार ठरवावे.हा महत्वाचा संदर्भ घटक डॉ. आंबेडकरानी सांगीतले. कारण माणूस हा मूल्यवान आहे, हाच लोकशाहीचा पायाभूत विचार आहे.

सातवे, डॉ.आंबेडकरांनी लोकशाही संकल्पनेच्या अंतर्गत घटनावाद, घटनात्मक साधने यांना जे महत्व दिले, ते आजच्या परिप्रेक्ष्यात महत्वपूर्ण आहे. घटनात्मक राज्यांचे संघराज्य, एकात्म राज्य, संसदीय व अध्यक्षीय शासन या संबंधी डॉ.आंबेडकर आपले विचार वेळोवेळी स्पष्ट करतात; परंतु व्यावहारीक स्वरुपाचा भाग म्हणून राज्य व शासन संघटना या संबंधी फारशे विचारमंथन करीत नाहीत. त्यांना संस्थानिकाच्या सत्ता वर्चस्वास नाकारुन, मानवी हक्क, जबाबदार राज्यपध्दती या घटकास महत्व दिले. डॉ.आंबेडकर यांनी सन १९३५ च्या संघराज्य योजनेस विरोध दर्शविला कारण स्वातंत्र्योत्तर भारतीय संघराज्य लोकशाही मूल्यांना व राष्ट्रीय एकात्मतेस पोषक कसे होईल? ह्या संबंधी आंबेडकर विचारमंथन करीत होते.

आठवे, भारताच्या सामाजिक, धार्मिक क्षेत्रातील विषमता व गुलामगिरीची प्रवृत्ती यांचे उच्चाटन करणे गरजेचे आहे. केवळ आर्थिकदृष्ट्या वर्ग जाणीवेने सर्व भेदभाव नष्ट होतील असे नाही. या पार्श्वभूमीवर डॉ.आंबेडकराची वर्ग कल्पना मार्क्सपेक्षा निराळी आहे; त्यांच्या दृष्टीने वर्गाचा आधार हा केवळ आर्थिक नाही, तर ते आर्थिक, सामाजिक व बौध्दिक स्वरुपाचे देखिले असू शकते.

नववे, डॉ.आंबेडकरांनी सामाजिक-आर्थिक लोकशाहीचा पुरस्कार करुन समाजात व्यक्ति समूहाला आर्थिक सामर्थ्य व समात प्रस्थापित करण्याचा आग्रह धरतात. म्हणूनच त्यांनी संसदीय शासन पध्दतीतून राज्य-समाजवाद आणण्याचा हेतू प्रतिपादन करतात. तात्पर्य, समाजाचे समतापूर्ण सहजीवन ही विचारधारा ते मान्य करतात.

दहावे, डॉ.आंबेडकर राजकीय लोकशाहीसंबंधी आग्रही विचारमंथन करतात. त्यांच्यामते, अस्पृश्य समाजाच्या उन्नतीची गुरुकिल्ली ही राजकीयच आहे.राजकीय सत्ता प्राप्तीनेच दलितांची मुक्ती होईल. म्हणूनच त्यांनी समाजाच्या प्रश्नांचे राजकीयकरण करतांना चळवळ उग्र बनविली. तात्पर्य, व्यक्तिचा विचार हा समूहाचा वा वर्गाचा विचार झाले पाहिजे असा विचारप्रवाह आढळतो.

**लोकशाही यशस्वी करण्याचे मार्ग**

डॉ. आंबेडकरांनी भारतीय लोकशाही यशस्वी करण्यासाठी केलेल्या विचारमंथनाचे आकलन व वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे रेखाटली आहे. कम्युनिस्ट मतप्रणाली म्हणजे राक्षसाची खादाड वृत्ती वा विचार भारताला केव्हा ना केव्हा भोवणार. भारत हा लोकशाहीची आदर बाळगणारा राष्ट्र आहे. चीन, रशिया वगैरे कम्युनिस्ट राष्ट्रे लोकशाही नष्ट करण्यास झटत आहेत. म्हणून भारताने त्यांच्याशी सहजीवन कसे करावे, हे मोठे कोडे आहे. बाबासाहेबांना लोकशाहीत नितिभ्रष्ट राजकारण आणि आक्रमक धोरण अयोग्य वाटत होते. सामाजिक व अर्थिक लोकशाहीची प्रतिष्ठापना करण्याची गरज वा आवश्यकता डॉ.आंबेडकर प्रतिपादन करतात. भारताची एकचर्तुतांश लोकशाही ही सामाजिक हिंसेतून ग्रस्त आहे. खालील विधान या संदर्भात उद्‌बोधक स्वरु पाचे वाटते.

Democracy means peoples ability to do things by themselves. Dr.Ambedkar was for such democracy for which social and economic democracy in a must.7 असमानता, विरोधीपणा, कायदा आणि प्रशासनापुढे समानता, संविधानिक नैतिकता, बहुसंख्यांकता, समाजाची नैतिक आज्ञा, लोकआग्रह हे सर्व महत्वाचे घटक आहेत. बदल घडवून आणतात रक्ताचा थेंब न सांडता परिवर्तन लोकशाहीत अभिप्रेत आहे.

सामाजिक व अर्थिक लोकशाहीशिवाय राजकीय लोकशाही यशस्वी होवू शकत नाही याची कल्पना बाबासाहेबांना होती.समाजातील लोक, सामाजिक बंधणे किती दृढपणे अगर किती विस्कळीतपणे पाळतात, या परिस्थितीतही लोकशाहीची मुळे पहावी लागतात.तेव्हाच कुठे लोकशाहीची दिशा व गती आपणास समजू शकेल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर लोकशाही यशस्वी होण्यासाठी एकात्म समाजाची कल्पना प्रस्तुत करतात. एकात्म समाज म्हणजे एकात्म लोकांचा संघ होय अशाप्रकारची सामाजिक श्रेष्ठ ध्येय असणे समाजहिताच्या दृष्टिने उपयुक्त आहे.तसेच समाजव्यवस्थेत जे जातीय घटक निर्माण झाले, ते लोकशाहीच्या भवीतव्याकरिता महत्वाचे नाही. कारण जातीचा उद्योग व जातीची बाजार भरती कोणत्याही प्रगतीशील समाजाकरिता हितकारक नाही; तसेच ती एकात्म समाज निर्मितीस गती व बळ देणारी सुध्दा नाही. म्हणून जातीय गट-तट हे लोशाहीचे मूळ किती खोलपणे रुजवू शकतील हे एक प्रश्न आहे. याच विचाराचा एक भाग म्हणजे जातिभेद होय. जातिभेद हा लोकशाहीस नष्ट करणाज्या अग्निशाखा आहेत, त्या विझविल्या तरच लोकशाही चिरायू होईल.८

वर्गभेद संख्येने अल्प असते ते नष्ट करता येवू शकते; परंतु जातीय गटांची संख्या ही लक्षणीय स्वरु पाची असते म्हणून ती नष्ट करणे वा दूर करणे कठीण बाब आहे. हे मूलभूत कार्ये शिक्षणातून करता येवू शकते अशी आंबेडकरांची भूमिका होती ; परंतु बाबासाहेब पुढे असे ही म्हणतात की, इंग्लंड, अमेरिका या सारख्या राष्ट्रांनी आर्थिक सहाय्यता देवून आपल्या देशातून सुशिक्षित करुन परत पाठविले तर, ते लोक जातिभेदावर प्रहार करुन त्या जातिभेदाला गाडून टाकतील. हे चित्र जेव्हा भारतात दिसू लागले तेव्हा भारतीय लोकशाहीचे भविष्य उज्वल ठरेल. डॉ. आंबेडकरांच्या मते, देशाचे स्वातंत्र्य, शिक्षण आणि कल्याण यांचे अभिवचन मिळत असेल तर राष्ट्रवाद, स्वराज्य किंवा स्वातंत्र्य यांस विरोध नाही. यशस्वी लोकशाहीचा मार्ग स्वीकारत आताना स्थिर व संतुलित विचार रुजविण्यासाठी लोकशाहीस दिशा व गती कशी देता येईल, या संबंधी विचारमंथन महत्वपूर्ण आहे.

डॉ. आंबेडकर राजकीय लोकशाहीच्या संबंधी प्रतिक्रीया व्यक्त करतात, राजकारणात एक व्यक्ति, एक मूल्य हे तत्व सर्वसामान्य आहे; परंतु अर्थिक व सामाजिक जीवनात हे मूल्य नाकारले जाणार आहे. अशी विसंगत अवस्था आहे; आपण सामाजिक आर्थिक जीवनात किती काळ समता नाकारणार आहोत. असे जर प्रदीर्घ सुरु राहिले तर राजकीय लोकशाही जोखमीची ठरेल. विषमतेपुढे राजकीय लोकशाही फार काळ टिकू शकणार नाही. म्हणून सामाजिक-अर्थिक समतेच्या अनुपस्थितात राजकीय लोकशाही वांझोटी ठरते.उदारमतवादी लोकशाही महत्वाची असली तरी स्वातंत्र्याच्या गोंडस नावाखाली लोकशाही संस्थांचे उदात्तीकरण करते. कल्याणकारी राज्याच्या नावाखाली वंचिताच्या कल्याणाची तरतूद सुध्दा करते; परंतु पूर्णत: शोषीतांच्या सामाजिक, अर्थिक मुक्तिची त्यात हमी नसते.९

अस्पृश्यांच्या लढयाला सर्वसमावेशक राजकारणाची जोड दिल्याशिवाय अपेक्षित उदिष्ट साध्य करणे अशक्य आहे, याची जाणीव डॉ. आंबेडकरांना वसाहती काळातच झाली. म्हणूनच त्यांनी शोषीत जनसमूहांना संघटित करण्यासाठी स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केले.या विचारसरणीमागील भूमिका म्हणजे, अस्पृश्य वर्गाच्या संपूर्ण दासविमोचनाचे अभिवचन या लोकशाहीच्या संस्थात्मक आणि मूल्यात्मक आकृतिबंधात नव्हते. खरेतर समाजहित, लोककल्याण, वंचिताचा विकास हे डॉ.आंबेडकरांना अभिप्रत होते. ते काहीअंशी व्यक्तीच्या निसर्गदत्त हक्कांना गति देणारा उपयुक्तवाद, व्यक्ती केंद्रबिंदू असलेल्या उदारमतवादास महत्व दिले. त्याकाळात भांडवलशाही समाजव्यवस्थेला प्रतिक्रीया म्हणून १९ व्या शतकात नवे विचारप्रवाहांचा उदय झाला. उदा :- कल्याणकारी राज्य, अराजकवाद, समाजवाद, साम्यवाद इत्यादी. व्यक्तिहित हा विचार समाजात वारंवारपणे पुढे येत राहीला. आजच्या या समकालीन समाजव्यवस्थेत लोककल्याणकारी भूमिकेमुळे व्यक्तिहीत हे महत्त्वाचा विचार उपयुक्त आहे. याचप्रमाणे व्यक्तीहीत हा उदारमतवादाचा महत्वाचा पैलू होता. डॉ.आंबेडकरांनी उदारतावादातील विवेकनिष्ठता, तर्कनिष्ठता स्वीकारली; परंतु सर्वाना समान स्वातंत्र्याची हमी या विचारसरणीत असली तरी अर्थिक स्तरावरील सुरक्षिततेचे अभिवचन श्रमजीवी वर्गानाही उदारमतवादी लोकशाही देत नाही, ही जाणीव देखील डॉ.आंबेडकरांना होती. वर्ग विरहित समाजरचना निर्माण करण्याचे अभिवचन उदारमतवाद देत नसून मर्क्सवाद देतो.हे मान्य असले तरी, मार्क्सवादाचा प्रभाव न नाकारता डॉ.आंबेडकरांनी मार्क्सवादातील हिंसा नाकारुन बौध्दधर्माकडे ते झुकले.बौध्द धर्म हा लोकशाहीवादी धर्म असून, त्यातून शांततापूर्ण मार्गाने समाजपरिवर्तन होणे शक्य आहे, असे डॉ.आंबेडकर स्पष्टपणे प्रतिपादन करतात.

कोणत्याही स्वरुपाच्या शासन प्रकारात जनइच्छा (Public Will) विशेष महत्वाची राहिली पाहिजे, तर उन्नती शक्य आहे. लोकशाहीत शांततापूर्ण मार्गातून अर्थिक-सामाजिक परिवर्तन होवू शकते हे मान्य असले तरी, संसदीय लोकशाहीवर डॉ.आंबेडकरांचा पूर्ण विश्वास नव्हता. डॉ.आंबेडकर या संदर्भात म्हणतात की, स्वातंत्र्याचा हक्क, संपत्तीचा हक्क किंवा सुखप्राप्तीचे अभिवचन बहूजनांना देण्यात संसदीय लोकशाही अयशस्वी ठरल्याची जाणीव झाल्यामुळे तिच्या प्रति असमाधान व्यक्त केले जाते.करार स्वातंत्र्यानुसार, करार करणारे पक्ष त्यांच्या सौदाशक्तीत असमान असूनही, त्या करारात उभयंतावर होणारा परिणाम संसदीय लोकशाही तपासत नाही.तात्पर्य, उदारमतवादी लोकशाही अर्थिक स्तरावर विषमतेची योग्य दखल घेत नाही.लोकशाही व्यवस्थेत कोणत्याही बहुसंख्य जगातील दुसज्या जमातीवर राज्य करता येवू नये, एकमेकांच्या सहाय्यतेशिवाय बहूमत प्रस्थापीत करता येवू नये.हा विचार जितका महत्वाचा आहे; तितकाच स्थिर सरकार पेक्षा, जबाबदार सरकार (Responsible Government) देखिल तितकेच महत्वाचे आहे.

डॉ. आंबेडकरांनी लोकशाही व्यवस्थे संबंधी जी काही महत्वपूर्ण चर्चा केली.यात अर्थिक सामाजिक एकता व समानता महत्वाचा भाग आहे.यास अनुसरु न राज्यसमाजवाद हा विचार अध्ययनात पुढे येतो.लोकशाहीची कल्पना ही प्रामुख्याने समाजवादी अर्थव्यवस्थेशी एकरुप झालेली कल्पना होती. याच अर्थाने विचार केल्यास डॉ. आंबेडकरांना राज्य समाजवादाचे ध्येय साधण्यासाठी राजकीय लोकशाही निरुपयोगी वाटत होती. त्यासाठी डॉ.आंबेडकर लोकशाहीचा ठसा आणि समाजवादी अर्थव्यवस्था यांचा मेळ घालू पाहत होते. डॉ. आंबेडकरांच्या राज्यसमाजवादी विचारसरणीत खालील घटक महत्वपूर्ण आहेत.

१) विम्याचे राष्ट्रीयकरण
२) शेतीचे राष्ट्रीयकरण
३) महत्वपूर्ण उद्योगधंदे राज्याच्या मालकीचे असतील
४) नुकसान भरपाई, कर्जरोखे ठरविण्याचा अधिकार राज्यांना असेल
५) शेती सामुदायीक शेती म्हणून कसली जाईल
६) कोणीही जमीनदार, कुळ, भूमिहिन असणार नाही१० इत्यादी.

डॉ.आंबेडकरांनी राजकीय लोकशाही कशी कार्ये करते, यासंबंधी महत्वपूर्ण विचारमंथन केलेले आढळते, याचप्रमाणे ते राजकीय लोकशाहीची चतु:सूत्री पुढीलप्रमाणे प्रतिपादन करतात.

१) व्यक्ती हे ध्येय आहे.
२) व्यक्तीचे काही अधिकार अदेय आहेत, व त्या अधिकाराची हमी राज्यघटनेने दिली पाहीजे.
३) कोणत्याही व्यक्तीला सुखसोयीची प्राप्ती करु न देताना त्या व्यक्तीला राज्यघटनेने दिलेले अधिकार सोडून देण्याची पाळी येवू नये.
४) राज्याने कोणत्याही खाजगी व्यक्तीला इतरांवर राज्य करण्याचे अधिकार, देवू नयेत.

भारतीय लोकशाही यशस्वी होण्यासाठी पहिली अट डॉ. आंबेडकर सांगतात. ती म्हणजे, विषमतेचे निर्मूलन. समाजजीवनात आढळणारी विषमता दूर झाली पाहीजे.समाजातील जो आहेरे व नाहीरे गट आहे.या वर्गातील जो तणाव आहे, तो वृध्दिगंत होवून लोकशाही कमकुवत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.म्हणूनच निकोप लोकशाहीत अशी विसंगती दूर होवून सर्वांनी मताधिकार (नियमानुसार) मिळणे गरजेचे आहे.अलिकडे २५ जानेवारी हा दिवस मतदार दिन म्हणून राष्ट्रीय पातळीवर साजरा केला जातो.हे बाबासाहेबांच्या विचारांची फलश्रृती आहे.यामुळेच राज्यकारभारात समान संधी प्राप्त होईल.

लोकशाही यशस्वी करणारी विचारप्रणाली म्हणजे घटनात्मक नैतिकता आहे. आदर्श नित्तीमत्ता जोपासणे या दृष्टीने उपयुक्त आहे. अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन म्हणाले की, लोकहो, मला पुन: अध्यक्ष म्हणून सत्तेवर राहण्याचा आग्रह करु नका. या विधानात त्यांची घटनात्मक नैतिकता स्पष्ट होते.ही नैतिकता लोकशाहीस बळकटी आणणारी आहे. याचप्रमाणे लोकशाहीत जनतेची विवेकबुध्दी सतत जागृत राहणे महत्वाचे आहे.आजच्या समकालीन भारतीय लोकशाहीत आण्णा हजारे, अरविंद केजरीवाल, मेघा पाटकर, किरण बेदी या सारख्या सामाजिक उन्नतीचे कार्य करणाऱ्या लोकनेत्यांकडे ही विवेकबुध्दी आढळते. यातून राष्ट्रीय जबाबदारी संपन्न केली जाते.जॉन स्टूअर्ट मील म्हणतो त्याप्रमाणे लोकशाहीचे संवर्धन उत्सुक असलेल्या लोकांनी केले पाहिजे.ही विचारप्रणाली आजच्या परिप्रेक्ष्यातसुध्दा उपयुक्त आहे.

**लोकशाही : काही महत्त्वपूर्ण गुणवैशिष्ट्ये**

लोकशाही ही अशी संकल्पना आहे; ज्यामुळे सर्व प्रकारच्या यंत्रणेस नियंत्रित (Control Mechanisms) केले जाते. भारतीय संविधान आणि लोकशाहीच्या अंतरसंबंधाबाबत अभिमानाने असे म्हणता येईल की, Our Constitution is Named a Democracy, because it is in the hands not the few, but many. याचप्रमाणे लोकशाही या विचार संकल्पनेत Rule of the People हा संदर्भ विशेष स्वरुपाचा आढळतो.पं.नेहरु यांनी लोकशाहीस आर्थिक अधिष्ठान प्राप्त करुन दिले.मिश्र अर्थव्यवस्थेतून सामाजिक विचाराची प्रतिष्ठापणा साधण्याचा प्रयत्न आढळतो. दुसरीकडे डॉ.आंबेडकरांनी लोकशाहीत विसंगती, भेदभाव नाकारुन समतावादी लोकशाही रुजविण्याचा प्रयत्न केला. नेहरुंनी लोकशाहीची रचना ही विकासवादी असावी, असा सकारात्मक विचार प्रस्तुत केला. याचप्रमाणे त्यांनी व्यक्तिगत स्वातंत्र्यास कशा पध्दतीने प्रस्थापित करता येईल; सामाजिक नियंत्रण आणि लोकांच्या आर्थिक जीवनाचे नियोजन या विचारास केंद्रित करण्याचा नेहरुंनी प्रयत्न केला.११

पं.नेहरु लोकशाही संकल्पना प्रतिपादन करतांना म्हणतात की, आर्थिक, सामाजिक समाजाची रचना लोकशाहीत महत्त्वाची आहे. या पार्श्वभूमीवर विचार केल्यास लोकशाहीत जी सामाजिक व आर्थिक समता महत्वपूर्ण आहे; ते आंबेडकरांनी सुध्दा उपयुक्त मानली. साउथ ब्युरो समितीस साक्ष (Evidance) देतांना असे आढळते की, लोकप्रिय शासन म्हणजे निराळा मार्ग अनुसरणे, स्वमताचे प्रतिनिधित्व महत्वपूर्ण नाही; तर त्याचे सार्वजनिकीकरण महत्वाचे आहे. भारतात जे सामाजिक विभाग (Social Divisions) अस्तित्वात आहेत; त्यांच्या सार्वजनिक हितांच्या प्रतिनिधीत्व सुरक्षितता हे देखील लोकशाहीत महत्त्वपूर्ण वाटते. साधारणपणे स्पृश्य हिंदू, अस्पृश्य हिंदू, ख्रिश्चन, मुस्लिम इ.वर्ग या दृष्टीने महत्वाचे आहेत. म्हणून सामाजिक-आर्थिक लोकशाही स्थापित होणे गरजेचे वाटते, असा अन्वयार्थ उपरोक्त चर्चेत आढळून येतो.१२

तात्पर्य, लोकशाहीत सेवेची संधी, सामाजिक उन्नती, आर्थिक स्वालंबन, मानवी हक्क, भेदभाव मुक्त समाज हे मूल्य विशेष महत्त्वाची आहेत. एकंदरीत पाहता डॉ.आंबेडकरांनी भारतीय संविधान आणि संघराज्य संबंधी विस्तृत विचार मंथन केले. त्यांनी संघराज्यास रचनेच्या दृष्टीने संघराज्यात्मक परंतु सत्ता आशयाच्या दृष्टीने एकात्म वा एककेंद्रि स्वरुप प्राप्त करुन दिले. म्हणूनच डॉ.आंबेडकर प्रबळ केंद्र सत्तेचे समर्थक वा पुरस्कर्ते असले तरी त्यांनी राष्ट्रीयता व लोकशाही मूल्यांना जास्तीचे महत्व दिले.१३

डॉ.आंबेडकरांनी लोकशाही विचारधारेत जी संविधानात्मक वा मूल्य यासंबंधी चर्चा केली ती विधायक व चिकित्सक स्वरुपाची आढळते. कारण भारतास संसदीय शासन प्रणाली की अध्यक्षीय या विचार प्रवाहात डॉ.आंबेडकरांनी जे विचारमंथन केले ते विवेकवादी, तत्कालीन सामाजिक प्रश्नांचे वास्तव रेखाटणारे होते. प्रारंभी अध्यक्षीय शासनप्रणालीवर भर दिले त्यामागील कारण मीमांसा पुढीलप्रमाणे आहे.

पहिले, १९१९ व १९३५ च्या भारत शासन कायद्यान्वये मंत्रिमंडळात्मक शासनपध्दतीचा जो स्वीकार केला होता ; परंतु स्वतंत्र भारताने अध्यक्षीय शासनप्रणालीचा स्वीकार करावा असे मत प्रस्तुत केले.

दुसरे, त्रिमंत्री योजनेनुसार स्थापन झालेल्या घटना समितीस सादर केलेल्या एका निवेदनास डॉ.आंबेडकर अध्यक्षीय शासनप्रणाली अनुकूल व उपयुक्त आहे ; असे मत व्यक्त करतात.

तिसरे, अल्पसंख जाती-जमातींना शोषीत व शासित वर्ग म्हणून दुय्यम दर्जा राहणार. अल्पसंख्य जमातींचे भवितव्य बहूसंख्याकजात आपल्या हितसंबंधानुसार ठरविणार, अशी चिकित्सा आढळते.

चौथे, हिंदूची बहूसंख्या व सत्ता या दोन पात्यात भारतातील अल्पसंख्य अस्पृश्य समाज सापडल्याने स्वातंत्र्य व स्वराज्य यांचा चैतन्यस्पर्श व अनुभूती या पासून हा समाज वंचितच राहिल, तात्पर्य, सत्ता प्राप्तीसाठी गट, पक्ष, निर्माण होवून स्थिर सरकारच्या अभावी अराजकता निर्माण होईल म्हणून अध्यक्षीय शासन प्रणाली महत्वाची ठरेल. परंतु उपरोक्त चर्चा ही स्वातंत्र्य भारताने काय करावे? या संबंधीची आहे. प्रत्यक्षात जेव्हा शासनाची जडण-घडण होवू लागली.तेव्हा अनुभूतीद्वारे विचारमंथनाचा प्रवाह बदलू लागला. डॉ.आंबेडकरांनी संसदीय शासनप्रणालीचा जो स्वीकार केला त्या मागील कारण मीमांसा पुढील प्रकारची आहे.

पहिले, व्यक्ती व समाज या दोन घटकांच्या दृष्टीने ही पध्दत उपयुक्त असणार आहे.

दुसरे, संसदीय शासन पध्दतीमुळे व्यक्तिच्या विविध स्वरुपाच्या विधायक वृत्ती वा जाणिवा यांना चालना मिळेल.

तिसरे, व्यक्ति जीवनाचा संपूर्ण विकास व समाजाचे सर्व प्रकारच्या क्षेत्रातील परिवर्तन हे या पध्दतीमुळे शक्य आहे.

चौथे, धर्म-जाति निरपेक्ष राष्ट्रवाद, एकात्म भारतीय समाज, राष्ट्रीयता वृध्दिंगत होण्याकरिता संसदीय शासन पध्दती महत्वपूर्ण असणार आहे.

एकंदरीत डॉ.आंबेडकरांनी आपल्या लोकशाही विचारमंथनात अनेक महत्वपूर्ण मुद्यांवर भर दिले. विशेषत: बंधुभावाची संकल्पना, एक व्यक्ति-एक मूल्य, विशेष संधीचे तत्व, स्वातंत्र्य, मूल्यविचार, समता-मूल्य संकल्पना आणि समग्र परिवर्तनवादी विचार या विविध माध्यमातून व्यक्त होते. आजच्या या समकालीन समाजजीवनात उपरोक्त

विचारांचे महत्व वा उपयोगिता खज्या अर्थाने महत्वपूर्ण आढळते. वरील स्वरुपाची चर्चा ही भारतीय लोकशाहीस नियमितपणे गती देणारी असून संकटातून लोकशाहीस मार्ग शोधणारी आहे.या प्रस्तुत लेखात डॉ.आंबेडकरानी केलेले लोकशाही संबंधीच्या आकलनाचे सद्यकालीन महत्व रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भ**

१) चांगदेव भगवानराव खैरमोडे, डॉ. भिमराव रामजी आंबेडकर, खंड – ११, सुगावा प्रकाशन, पुणे.पृष्ठ क्रं. ३१
२) चांगदेव भगवानराव खैरमोडे, डॉ. भिमराव रामजी आंबेडकर, खंड – ११, सुगावा प्रकाशन, पुणे.पृष्ठ क्रं. ६९
३) श्रीराम निकम, गाँधी – आंबेडकर अस्पृश्यमुक्ती संघर्ष, लोकवाड्:मय गृह प्रकाशन, मुंबई. नोव्हें. – २००८.
४) कित्ता, पृष्ठ क्रं. ६
५) एस.एम.खंदारे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार, कैलास प्रकाशन, औरंगाबाद, २००९. पृष्ठ – २४
६) भालचंद्र फडके, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पुणे.पृष्ठ – १४६ – १४७.
७) www.pucl.org/report/National/ambedkar.htm.
८) चांगदेव भगवानराव खैरमोडे, डॉ.भिमराव रामजी आंबेडकर, खंड – १२, सुगावा प्रकाशन, पुणे. पृष्ठ क्रं. ३३
९) उपरोक्त, श्रीराम निकम, पृष्ठ क्रं.१६९ – ७०
१०) रावसाहेब कसबे, आंबेडकरवाद: तत्व आणि व्यवहार, सुगावा प्रकाशन पुणे, ऑक्टो. २००४, पृष्ठ – ४१.
११) Donald Eugene Smith, Nehru and Democracy, Orient Longmans, Bombay, 1958, P. 49-50.
१२) Dr.Babasaheb Ambedkar, Writings and Speches, Vol.1, Education Deptt., Govt. of Maharashtra, 1979, P.249-250
१३) म.द.देशपांडे, डॉ.आंबेडकर यांचे राजकीय विचार, लोकवाड्:मय गृह प्रकाशन, मुंबई, १९९८, पृ.३०.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महिला सक्षमीकरण

**– डॉ. सुरेंद्र अंबर मोरे**
सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग प्रमुख
झेड.बी.पाटील महाविद्यालय, धुळे, जि. धुळे

**प्रस्तावना**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी 'द राईज अ‍ॅन्ड हिंदू वूमन' या आपल्या ग्रंथात भारतीय समाजातील स्त्रियांची झालेली अवनतीचा मुद्देसुद विचार केलेला आहे. भारतीय धर्म व्यवस्थेने जाती व्यवस्थेबरोबरच स्त्रियांनाही दुय्यम स्थान दिले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक न्याय आणि समता यासाठी चातुर्वर्ण व्यवस्थेच्या विरोधात जे विविध लढे उभारले त्या सर्व लढयात स्त्रियांचा सक्रिय सहभाग राहिल यावर त्यांचा कटाक्ष होता. पुरूषांबरोबर स्त्रियांनीही शिक्षण घ्यावे आणि स्व-उन्नती बरोबर सामाजिक संघर्षात स्त्रियांनीही यावे अशी त्यांची अपेक्षा होती. पुरूषसत्ता आणि जात व्यावस्था मिळून निर्माण होणाऱ्या शोषणाचा मुद्दा त्यांनी हिंदु कोड बिलाच्या माध्यमातुन देशाच्या राजकारणाच्या आग्रभागी आणला. जाती व्यावस्थेतील कर्मकांड, हिंदू समाजातील अनेक वाईट प्रवृत्तीवर निर्बंध लादावे अशी भारताच्या राज्यघटनेत तरतुद केली. देवदासी, मुरळी, वेठबिगार आणि लहान मुले, स्त्रीविक्री यावर कायदयाने बंदी घालण्यात आली. लग्नानंतर अत्याचार झाल्यास पत्नीस घटस्फोट घेऊन विभक्त राहण्याची मुभा कायदयाने मिळाली. अशा प्रकारे बाबासाहेबांनी घटनेद्वारे स्त्रियांना संपुर्ण स्वातंत्र्य दिले. स्त्री ही आर्थिक व राजकीयदृष्ट्या स्वतंत्र झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजातील स्त्रियांमध्ये जागृतीची भावना निर्माण केली. दलित स्त्रिया उच्चवर्णीय स्त्रियांपेक्षा कमी नाहीत हे त्यांनी पटवून दिले. दलितांनी आपली गलिच्छ राहणी सुधारली पाहिजे, तांबे, कथिलाचे दागिने सोडले पाहिजे, पतीला व्यसनमुक्त केले पाहिजे, त्यासाठी त्यांनी आपल्या चवदार तळे, काळाराम व इतर मंदिर सत्याग्रहात स्त्रियांनी पुरुषांच्या बरोबरीने सहभाग घेतला. हिंदू समाजातील सगळया प्रकारच्या विषमतांपैकी एक म्हणजे स्त्री-पुरुष विषमता. त्यामुळे स्त्रियांवरील विषमता नष्ट करण्यासाठी १९२७ साली महाड येथे महिलांची सभा घेतली होती व त्यांना उद्‌बोधित केले. स्त्री-पुरुष यांनी मिळून समाजाच्या, संसाराच्या अडचणी सोडविल्या पाहिजेत. स्त्री -पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी जुन्या कायदयाची संहिता आधी बदलली पाहिजे व स्त्री केंद्री बनवली पाहिजे हा त्या मार्गातील हेतू होता. स्त्रियांना समाजात समान दर्जा आणि चांगली वागणुक मिळावी असे त्यांचे मत होते. सर्वांगीण विकासासाठी स्त्री-शिक्षणावर त्यांनी भर दिला. स्त्रियांना शिक्षण प्राप्त झाल्यास कुटूंबाचा विकास होईल. जीवनमान सुधारण्यासाठी आणि कुटूंबाला नैतिक वळण लावण्यासाठी स्त्रियांना शिक्षण देणे आवश्यक आहे असे ते म्हणत. महाडच्या सत्याग्रहात तसेच काळाराम मंदीर प्रवेशाच्या वेळी सीताबाई गायकवाड, शांताबाई दाणी या महिलांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रभावित होउन सक्रिय सहभाग नोंदविला.

**अभ्यासाचे उद्देश**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिला सक्षमीकरणाबाबतच्या विचारांचे अध्ययन करणे.
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विविध कायदयांच्या माध्यमातुन महिला सक्षमीकरणाबाबतच्या प्रयत्नांचा आढावा घेणे.

**गृहितकृत्य**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिला सक्षमीकरणासाठी मोलाचे योगदान दिलेले दिसून येतो.
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिला सक्षमीकरणा साठी विविध कायदे निर्मिती साठी प्रयत्न केलेले असल्याचे दिसते.

**संशोधन पध्दती**

उपलब्ध माहितीच्या आधारे विषयाची मांडणी करण्यासाठी वर्णनात्मक व विश्लेषण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिला सक्षमीकरणाबाबतच्या विचारांचे अध्ययन करणे व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विविध कायदयांच्या माध्यमातुन महिला सक्षमीकरणाबाबतच्या प्रयत्नांचा आढावा घेण साठी प्रस्तुत लघुशोध निंबंधासाठी द्वितीयक तथ्ये सामुग्रीचा आधार घेण्यात आला आहे. प्रामुख्याने विविध संदर्भ ग्रंथांचा आधार घेवून निष्कर्षा पर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिला सक्षमीकरणा बाबत विश्लेषण**

लोकशाहीत पुरूषांच्या बरोबरीने महिलांना स्थान असले पाहिजे यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. २८ जुलै १९२८ रोजी आंबेडकरांनी तत्कालीन मुंबई विधानपरिषदेत भाषण करतांना कारखान्यातील महिला कामगारांना बाळंतपणाची भर पगारी रजा मिळाली पाहिजे असे अगदी रोखठोकपणे स्पष्ट केले. बाबासाहेबांनी घटना लिहितांना ज्या महत्वाच्या आदर्श तत्वांना घटनेत स्थान दिले आहे. त्यापैकी समता व स्वातंत्र ही महत्वाची तत्वे आहेत. या तत्वांचा लाभ लिंगभेदरहित मिळावा असेही घटनेत नमुद केलेले आहे. त्यामुळे पुरुषांच्या बरोबर स्त्रियांही घटनादत्त अधिकार उपभोगू शकतात. तसेच आंबेडकराच्या सामाजिक विचारानुसार समताधिष्ठित समाज असण्यासाठी त्यांनी जात, धर्म, लिंग इत्यादी आधारावर भेदभाव नसण्यासाठी घटनेत तरतुदी केल्या डॉ. आंबेडकरांच्या विचारामुळेच आज कायदयासमोर सर्व नागरिक समान मानले जातात. भारतीय संविधानातही समतेचे तत्व अंतर्भूत करण्यात आले आहे. कायदयाने अस्पृश्यता पालनास बंदी घातली गेली आहे. अस्पृश्यता पाळणे हा

कायदयाने गुन्हा मानला जातो. बाबासाहेबांनी महिला सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीयदृष्टया स्वतंत्र व स्वावलंबी व्हावी म्हणुन आपल्या राज्यघटनेत तरतूदी केल्या.

*सारणी क्रमांक १ : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेत स्त्रियांच्या हक्काबाबत केलेल्या तरतुदी*

| अ.क्र. | राज्यघटनेतील भाग | स्त्रियांच्या हक्काबाबत केलेल्या तरतुदींचा तपशील |
|---|---|---|
| १ | सरनामा | We the people of India या सरनाम्याच्या सुरूवाती मध्ये आम्ही भारतीय जनता म्हणजे फक्त पुरूषच नव्हे तर महिलांचाही उल्लेख केलेला आहे. |
| २ | कलम १४ | लिंगा आधारे भेदभाव न करता कायदयापुढे समानता आणि कायदयाचे समान संरक्षण देण्यात आले आहे. |
| ३ | कलम १५ | राज्य आपल्या नागरिका मध्ये कोणत्याही आधारावर भेदभाव करणार नाही. |
| ४ | कलम १६ | सर्व नागरिकांना संधीची समता दिलेली आहे. |
| ५ | कलम २३ | शोषणाविरूध्दच्या हक्काद्वारे महिलांना संरक्षण देण्यात आले. |
| ६ | कलम ३९ | मार्गदर्शक तत्त्वामध्ये स्त्रि व पुरूषांना समान कामासाठी समान वेतन देण्यात येईल. |
| ७ | कलम २४३(ड-३), (२४३ ट-३) | पंचायतराज संस्थामध्ये महिलांनाही आरक्षणाची तरतुद |

उपरोक्त सारणी नुसार भारतीय राज्यघटनेच्या सरनामा, कलम १४, १५, १६, कलम ३९ आणि कलम २४३(ड-३), २४३ (ट-३) मध्ये लिंगा आधारे भेदभाव न करता कायदयापुढे समानता आणि कायदयाचे समान संरक्षण देण्यात आले आहे, राज्य आपल्या नागरिका मध्ये कोणत्याही आधारावर भेदभाव करणार नाही, सर्व नागरिकांना संधीची समता दिलेली आहे, मार्गदर्शक तत्त्वामध्ये स्त्रि व पुरूषांना समान कामासाठी समान वेतन देण्यात येईल, पंचायतराज संस्थामध्ये महिलांनाही आरक्षणाची तरतुद करून महिला सक्षमीकरणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान स्पष्ट होते.

स्त्री-पुरुष समता प्रस्थापित होण्यासाठी स्त्री शिक्षण हा एक मार्ग आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. स्त्री जर शिकली तर कुटूंब शिकते. घरामध्ये स्त्री जर अडाणी असेल तर कुटूंब उन्नती करु शकत नाही कारण लहान मुले ही जास्तीत जास्त वेळ स्त्रीयांच्या सहवासात असतात आणि त्यामुळे मुलांच्या जीवनामध्ये आईचा प्रभाव हा जास्त जाणवतो त्यासाठी स्त्री शिक्षण आवश्यक आहे. स्त्रीयांनी गुणवत्तेवर, चारित्र्यावर भर दयावा. मुलामुलींवर चांगले संस्कार करावेत असा बाबासाहेबांचा स्त्रीयांना उपदेश होता. सार्वजनिक कार्यक्रमासाठी अस्पृश्य महिला कधी येत नसत परंतु बाबासाहेब जेव्हा समाज जागृतीच्या निमीत्ताने गावागावात सभा घेत भाषणे देत तेंव्हा-तेंव्हा ते स्त्रीयांनाही सहभागी करत असे आवर्जून सांगत आणि स्त्रीयांनाही बराच वेळ ते आपल्या भाषणांत देत. कुटूंब नियोजन, लोकसंख्या वाढ, नियत्रंण या विषयांवर अन्य कोणताही नेत्यांनी बाबासाहेबां एवढी स्पष्ट भूमिका कोणी घेतली नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी यासह अशा अनेक विषयावर कायदे मंजुर करण्यासाठी केलेले प्रयत्न अंत्यत महत्वाचे आहेत. त्याचा तपशील पुढील सारणी द्वारे स्पष्ट होतो.

*सारणी क्रमांक - २ : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नांनी झालेले महिला सबलीकरणाचे कायदे*

| अ.क्र. | सबलीकरणाचे कायदे /नियम | महिला सबलीकरण कायदयांचा तपशील |
|---|---|---|
| १ | हिंद कोड बिल | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या बिलास परंपरागत विचाराच्या लोकांनी विरोध केल्याने ते मुजर जरी झालेले नसले तरी त्यामुळे हिंद कोड बिलातील विषयांना वाचा मिळाली. |
| २ | मातृत्व लाभ कायदा (Maternity Benefit Act) | कामगार महिलांना बाळंतपणात पालनपोषणासाठी त्यांच्या वेतनाचा भार सरकारणे उचलावा, स्त्री-पुरुषांना समान कामासाठर समान वेतन (Equal pay for equal work irrespective of the sex) |
| ३ | कलम ३२६ नुसार महिलानाही मतदानाचा हक्क | राज्यघटनेत या साठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्ना मुळे कलम ३२६ नुसार महिलानाही मतदानाचा हक्क मिळाला. |

स्त्रोत :- https://economictimes.indiatimes.com/Naxal-affected-districts

उपरोक्त सारणी नुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे कायदे मंजुर करण्यासाठी केलेल्या योगदानाचा आढावा येतो.

**मातृत्व लाभ विधेयक**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महान मानवतावादी होते. राजकीय मूल्यापेक्षाही आंबेडकर अधिक महत्व सामाजिक आणि नैतिक मूल्यांना देतात. १९२८ मध्ये मुंबई विधानपरिषदेचे सदस्य असतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कारखान्यात काम करणाज्या महिलांना वेतनासह मातृत्व लाभ मिळण्यासंदर्भात प्रयत्न केले होते. तसेच कामगार महिलांना बाळंतपणात पालनपोषणासाठी त्यांच्या वेतनाचा भार सरकारणे उचलावा असे मत मांडले. पुढे १९३८ मध्ये मुंबई विधीमंडळाचे सदस्य म्हणुन कार्यरत असतांना गर्भधारना ठेवणे किंवा न ठेवणे वा बाबतचा पुर्ण अधिकार महिलांना असावा तसेच तश्या प्रकारच्या गर्भनिरोधक उपाययोजना बाबत देखील आपले विचार त्यांनी मांडले. पुढे १९४२ ते १९४६ दरम्यान व्हाईसरॉयच्या कार्यकारी परिषदेचे श्रमसदस्य असतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिला कामगाराबाबत अनेक कायदे केले. यामध्ये आकस्मिक व अर्जित रजा बाबतच्या तरतुदी, महिलांना कामावर असतांना दुर्घटना झाल्यास मोबदला देण्यासंदर्भात नियम करण्यात आले. या तरतुदी ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस महिला फेडरेशन च्या २० जुलै १९४२ च्या आयोजित परिषदेत पारित करण्यात आलेल्या बाबींवर आधारित होत्या. या समाजावर दूरगामी परिणाम साधणारे अनेक कायदे आंबेडकरांच्या राजकीय विचारांनी निर्माण केले व पददलितांच्या अंगी नवा स्वाभिमान, नवा आत्मविश्वास, स्वालंबन अशा गुंणाचे त्यांनी संगोपन केले. त्यांनी लोकशाहीसाठी फार मोठे चिंतन केले व वस्तुनिष्ठ अशा विचारांची मांडणी त्या संदर्भात केलेली दिसून येते.

**हिंदु कोड बिल**

स्वतंत्र्य भारताचे पहिले कायदामंत्री म्हणुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ९ एप्रिल १९४८ ला हिंदु कोड बिलाचा मसुदा सादर केला. हे हिंदु कोड बिल भारतीय महिलांच्या मानवीय हक्कांसाठी आणि अधिकारासाठी तयार करण्यात आले होते. मात्र २६ सप्टेंबर १९५१ ला हिंदु कोड बिल पंतपंधान जवाहरलाल सरकारने मागे घेतले.

त्याच बरोबर सर्व महिलांच्या हक्कांचा व अधिकारांचा गळा घोटला. या घटने बाबत बाबासाहेब म्हणतात, It was killed and buried unwept and unsung. म्हणजे स्वताचे मुल मृत्यु झाल्यानंतर जेवढे दुख होते त्यापेक्षा जास्त दुख आज होत आहे. यावरून भारतीय समाजाचे किती नुकसान झाले याची प्रचिती येते. हिंदू कोड बील हे विधेयक संसदेत मांडतांना ते म्हणतात की, एवढे महत्वाचे विधेयक अगदी शेवटी चर्चेसाठी सदनासमोर यावे याविषयी दु:ख व्यक्त केले. हिंदू कोड बीलातील या सर्व गोष्टी अभ्यासल्या म्हणजे बाबासाहेबांनी स्त्री ही सामाजिकदृष्टया स्वावलंबी व्हावी हाच प्रयत्न केला होता हे दिसून येते. हिंदू कोडबीलाची निर्मीतीच मुळी स्त्रीमुक्तीच्या ध्यासातून केली होती आणि समाजात गौण स्थान असणाज्या स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीने स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न त्यामध्ये होता. हिंदू कोडबीलात स्त्रियांच्या उध्दारासाठी ज्या तरतुदी करण्यांत आल्या होत्या त्यातील काही महत्वाच्या तरतुदी अशा आहेत.

१) वडिलांच्या मालमत्तेत त्यांना वाटा मिळायची तरतूद
२) स्त्रियांसाठी वारसा हक्काची तरतूद
३) पती सोबत राहणे अशक्य झाल्यास कायदेशीर घटस्फोट घेता यावा याची तरतूद
४) धार्मिक विवाहाचे नोंदणी विवाहात रुपांतर करण्याची तरतूद
५) पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही पुर्नविवाह करण्याची हक्क तरतूद

**निष्कर्ष**

१) भारतीय धर्म व्यवस्थेने जाती व्यवस्थेबरोबरच स्त्रियांनाही दुय्यम स्थान दिले होते.
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजातील स्त्रियांमध्ये जागृतीची भावना निर्माण केली. दलित स्त्रिया उच्चवर्णीय स्त्रियांपेक्षा कमी नाहीत हे त्यांनी पटवून दिले.
३) हजारो वर्षे गुलामाचे जीवन जगणाज्या स्त्रीयांना समाजाच्या अनिष्ट बंधनातून मुक्त करुन समानता, मानसन्मान व प्रतिष्ठा मिळवून दिली.
४) डॉ. आंबेडकरांच्या विचारामुळेच आज कायदयासमोर सर्व नागरिक समान मानले जातात. भारतीय संविधानातही समतेचे तत्व अंतर्भूत करण्यात आले आहे.
५) स्त्रीयांवर लादलेले पारंपारीक पारतंत्र झुंगारुन जागृतीचे कार्य केले.
६) स्त्रीयांच्या उद्धाराचे महान कार्य करून सामाजाला नवे वळण दिले व सामाजाला दिशा मिळाली.

**समारोप**

आंबेडकर लोकशाहीचे कटटर पुरस्कर्ते होते. त्यांनी लोकशाहीसाठी फार मोठे चिंतन केले व वस्तुनिष्ठ अशा विचारांची मांडणी त्या संदर्भात केलेली दिसून येते. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे समाजसेवक, राजनीतीज्ञ, कायदेपंडित आणि विचारवंत होते. या देशाच्या कोटयावधी जनतेला अंत:करणांना हेलावून सोडण्याचे सामर्थ्य आंबेडकरांच्या वाणी व लेखणीला प्राप्त झाले ते त्यामागे असलेल्या मानवतावादामुळेच. अशाप्रकारे बाबासाहेबांनी आपल्या चळवळीच्या सर्व क्षेत्रात स्त्री ही सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीयदृष्टया स्वतंत्र व स्वावलंबी व्हावी म्हणुन प्रयत्न केले. त्यामुळे आज स्त्री स्वत:च्या पायावर उभी राहू पाहत आहे. स्वातंत्र्या नंतर भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात नागरिकांच्या मुलभूत हक्कांचे स्पष्टीकरण कलम १२ ते ३५ दरम्यान नमूद करण्यात आलेले आहेत. कलम १२ ते ३५ दरम्यान हक्क देऊनही सध्या महिलांच्या मुलभूत हक्कांचे रक्षण होत नाही ही खेदाची बाब आहे. कायद्यापुढे समानता, धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणांवरुन भेदभाव करण्यास मनाई, समान संधी, शिक्षणाचा हक्क, वेठबिगारीपासून मुक्ती, घटनात्मक उपाय वापरुन हक्कांची मागणी करण्याचा अधिकार अशा विविध मूलभूत हक्कांचा समावेश भारतीय राज्यघटनेत आहे. मात्र प्रत्यक्षात महिलांच्या हक्कांचा प्रश्न सध्या सातत्याने गंभीर होत चालला आहे. यासाठी आंबेडकरानी दिलेला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मुलमंत्र पाळणे आवश्यक आहे.

**संदर्भ**


१. रा. ना. चव्हाण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दलित चळवळ, चव्हाण प्रकाशन, पुणे, २०१२.
२. धनंजय किर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन,मुबंई,१९६८.
३. य. दि. फडके, आंबेडकरी चळवळ, श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९९९.
४. डॉ. अविनाश दिगंबर फुलझेले, आंबेडकरी चळवळीतील दादासाहेब गायकवाड यांचे योगदान, लोकवाङमय गृह, पुणे, २०११.
५. मधुकर जाधव, आंबेडकरी चळवळ आणि समकालीन विचार, गोदा प्रकाशन, अमरावती, २०११.
६. महाराष्ट्रातील समाज सुधारक, प्रा. डॉ.सतिष ठोंबर, कैलास पब्लीकेशन, औरंगाबाद
७. सुधीर बोधनकर व अलोणी, सामाजिक संशोधन पध्दती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार

**– प्रा. डॉ. आनंदा बाबुराव सोनवणे**
मराठी विभाग, के. एन. बी. कला महाविद्यालय
नवलनगर, ता. जि. धुळे

**प्रास्ताविक**

भारतीय संविधानाचे निर्माते, प्रकांड कायदे पंडित, थोर समाज सुधारक, राजकारणी, प्रखर बुध्दीवादी विचारवंत म्हणून डॉ. आंबेडकरांची जगात आणि देशात ओळख आहे. अफाट बुध्दीमत्ता, विलक्षण युक्तीवाद चातुर्थ आणि अविश्रांत परिश्रम हे डॉ. आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष होते. डॉ. आंबेडकरांनी आपल्या कार्याची सुरुवात ही सामाजिक कार्यापासून केली होती. बालपणापासून डॉ. आंबेडकरांना अस्पृश्यतेचे चटके सहन करावे लागले होते. उच्च शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी बडोदा येथे सयाजीराव गायकवाड यांच्या संस्थानात नोकरी केली. तिथेही अस्पृश्यतेने पाठलाग केला. मुंबईच्या सिडनेहॅम कॉलेजमध्ये काही काळ अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून नोकरी केली. तेथेही अस्पृश्यता त्यांनी अनुभवली. सामाजिक जीवनात बालपणापासून अस्पृश्य म्हणून डॉ. आंबेडकरांना मिळालेली तुच्छतेची वागणूक आणि उच्च विद्याविभुषित झाल्यावरही मिळालेली वाईट वागणूक यात काडीमात्र बदल झाला नाही. याची जाणीव झाल्यामुळे सरकारी गुलामगिरीमध्ये न अडकता आपल्या शिक्षणाचा, ज्ञानाचा उपयोग हा त्यांनी अस्पृश्य, दलित, पिडीत, स्त्री, आदिवासी आणि बहुजन समाजाच्या कल्याणासाठी वेचला.

प्रस्तुत शोध निबंधातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षण विषयक विचार यावर प्रकाश टाकला आहे. शिक्षण हे माणसाच्या सर्वांगीण व्यक्तीमत्वाचे विकासाचे साधन आहे. माणसाचा सर्वांगिण विकास हा शिक्षणामुळेच होतो. शिक्षण हे राष्ट्राच्या विकासाचा पाया आहे, हे जाणून संविधान कारांनी १४ वर्षापर्यंतच्या मुलामुलींना सक्तीचे आणि मोफत शिक्षणाची तरतूद भारतीय संविधानातून केली आहे. म्हणजेच शिक्षणाचे महत्त्व ओळखून एक प्रकारे शिक्षणाला

डॉ. आंबेडकरांनी प्रोत्साहन दिले आहे. ते समाजाला उद्देश्यून म्हणतात, शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा असा मौलिक सल्ला त्यांनी दिला आहे. पुढे म्हणतात, शिक्षण हे वाघीणीचे दुध आहे. ते प्रशान केल्याने मनुष्य गुरगुरल्याशिवाय राहत नाही. तसेच शिक्षण हे केवळ पोट भरण्याची कला नसून ती सुसंस्कृतपणे जीवन जगण्याची कला आहे.

डॉ. आंबेडकरांनी विचार केला की, मिळालेले स्वातंत्र्य टिकवुन ठेवण्यासाठी समाजाला शिक्षणाची आवश्यकता आहे. नाही तर मिळालेले स्वातंत्र्य धन दांडग्यासाठी असते. गरिबाला त्याचा काहीही फायदा होणार नाही. म्हणून

डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्यासाठी, देशाच्या प्रगतीसाठी ८०% समाजाला शिक्षणाच्या व्दारे राष्ट्रीय प्रवाहात आणण्याचे कार्य केले आहे. त्यांनी विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह, शैक्षणिक संस्था, महाविद्यालय निर्माण केले. गोरगरीब जनता उच्च शिक्षणासाठी जिल्हाच्या ठिकाणी जाऊ शकत नाही. त्यांना तेथे राहणे परवडत नाही म्हणून प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी वसतीगृह निर्माण केले. शिक्षण मोफत मिळावे म्हणून प्रयत्न केले. पीपल्स एज्युकेशन संस्थेची स्थापना केली.

डॉ. आंबेडकरांना स्त्रियांच्या शिक्षणाविषयी फार कळवळा होती. त्यांनी स्त्री शिक्षणासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. स्त्रियांनी शिक्षण घेतल्यानंतर स्त्रिची समाजात प्रतिमा उंचावते. एक स्त्रीने शिक्षण घेतले तर संपूर्ण कुटूंब पुढे जाते. याविषयी डॉ. आंबेडकर म्हणतात, स्त्री शिक्षणाच्या प्रगतीवरुन मी त्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करतो एखादा समाज, प्रगत, उन्नत आहे हे जर ओळखायचे असेल तर त्या समाजातील स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाणच महत्त्वाचे आहे. म्हणजेच स्त्री शिक्षणाला त्यांनी फारच महत्त्व दिले आहे. स्त्रियांच्या प्रगतीच्या आड त्यांची लवकर होणारी लग्ने येतात. हे आंबेडकरांनी बरोबर हेरले होते म्हणून मुलींची लग्ने लवकर करुन वैवाहिक जीवन त्यांच्यावर लवकर लादू नका असे आवर्जुन त्यांनी समाजाला सांगितले आहे. स्त्री ही एक व्यक्ती आहे. आणि व्यक्तिस्वातंत्र्य असायला हवे हा विचार व्यक्त करतांना परखडपणे डॉ. आंबेडकर म्हणतात, लग्नानंतर पत्नी पुरुषाची समान अधिकारी असलेली गृहीणी असली पाहिजे व ती नवज्याची गुलाम असता कामा नये! असे त्यांचे मत होते. शिक्षणाविषयी म्हणतात, उपास मारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस हतबल होऊन अल्पायुषी होतो तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुध्द राहिल्यास जीवंतपणी दुसज्याच्या गुलाम होतो म्हणून मानवी जीवनात त्यांनी शिक्षणाला फार महत्त्व दिले आहे.

प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत डॉ. आंबेडकरांनी मुलगामी व मूल्यवान विचार मांडले आहेत. ते म्हणतात प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार सर्वांगीण राष्ट्राच्या प्रगतीच्या इमारतीचा पाया आहे. केवळ लोकांच्या खुषीवर हा प्रश्न सोपविल्यास प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होण्यास कैक शतके लागतील म्हणून शिक्षणाच्या बाबतीत सक्तीचा कायदा करावा लागतो. आघाडिस आलेल्या जगातील सर्व देशांनी सक्तीचा कायदा करुन लोकांची निरक्षरता हद्दपार केली असे आपणास दिसून येते. जे वर्ग आधीच शिक्षणाचा लाभ घेतात, त्यांच्यावर शिक्षणाची अर्थातच सक्ती करावी लागत नाही. ज्यांना शिक्षणाचे महत्त्व कळत नाही. व जे त्या बाबतीत उदासिन असतात त्यांच्या करीताच सक्तीच्या कायद्याची आवश्यकता असते. म्हणजेच आंबेडकरांच्या दूरदृष्टीचा प्रत्यय आपणास येतो. शिक्षण हा राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे. म्हणून शिक्षणाच्या बाबतीत सक्तीचा कायदा करावा. त्यामुळे समाजाची निरक्षरता दूर होईल यातुनच राष्ट्राची प्रगती होईल अशी खात्री डॉ. आंबेडकरांची होती. प्राथमिक शिक्षण सक्तीचे का असावे? याची दोन

कारणे त्यांनी दिली आहेत. १) शिक्षणावरील ताबा २) सत्तीचे तत्व अंमलात आणण्याची जबाबदारी शिक्षण क्षेत्र खऱ्या अर्थाने स्वतंत्र व स्वायत्त असावे, या क्षेत्रावर व्यक्ती सत्ता असून नये. हा धोक्याचा इशारा त्यांनी दिला होता. शिक्षण क्षेत्रात सूत्रमयता असावी त्याच बरोबर स्वतंत्र प्रतिष्ठा असावी असे त्यांना वाटत होते. याबाबत डॉ. आंबेडकर म्हणतात, प्रांतिक स्वायत्तता मागा आणि राष्ट्रीय दृष्टीने शिक्षणाचे धोरण ठरवा. आमची त्याला हरकत नाही. परंतु शिक्षणामध्ये एक सूत्रीपणा असला पाहिजे. शाळांचा कारभार शिस्तीने चालला पाहिजे आणि शिक्षण चोख दिले पाहिजे. शिक्षणाविषयी डॉ. आंबेडकरांची भूमिका योग्य, वास्तवदर्शी अशा स्वरुपाची आहे. शिक्षण हे पवित्र आहे. याचे पावित्र्य राखले पाहिजे अशी त्यांची धारणा होती. शिक्षण हे व्यक्ति विकासाचे साधन व राष्ट्राच्या विकासाचा पाया आहे. म्हणून प्राथमिक शिक्षणाला त्यांनी प्राधान्य दिले आहे.

शाळा, शिक्षक आणि शिक्षण ह्या तीनही बाबी महत्त्वाच्या आहेत. याबाबत ते म्हणतात, शाळेमध्ये नुसत्या बाराखड्या शिकवायच्या असत्या तर ती गोष्ट निराळी. पण शाळेत मुलांची मने सुसंस्कृत करुन त्यांना समाज हितास योग्य असे वळण लावायचे असते. शाळा म्हणजे उत्तम नागरीक तयार करण्याचे कारखाने आहेत. अर्थात या कारखान्यात फोरमन जितका शहाणा असेल तितका उत्तम माल कारखान्यातून बाहेर पडणार आहे. शाळा म्हणजे काही हिंदू उपहार गृहे नव्हे की त्यात ब्राह्मण भटचारी ठेवला की भागले. ब्राह्मणांच्या हाताचे अन्न सर्वांना चालत असले तरी ब्राह्मणांच्या हातचे शिक्षण या काळात कोणासही चालणे शक्य नाही. असे प्रखर विचार त्यांनी मांडले आहेत. शिक्षण आणि समाज हित यांचा जवळचा संबंध आहे. त्यामुळे पारंपारिक शिक्षण त्यांना मान्य नव्हते कारण या शिक्षणाने स्वत:च्या दृष्टीने शिक्षण विषयक कल्पना व शिक्षण क्षेत्रे रुढ केली. जातीनिष्ठ केंद्रीकरणामुळे शिक्षणाचा प्रवाह दुबळा म्हणून ब्राह्मण वर्गाच्या हाताचे शिक्षण आधुनिक तत्त्वाशी विसंगत असल्यामुळे त्यांनी ते नाकारले आणि शिक्षणाच्या विकेंद्रीकरणावर त्यांनी जोर दिला आहे.

प्राथमिक शिक्षणाबरोबर महाविद्यालयातील आणि विद्यापीठीय शिक्षणाचा विचार डॉ. आंबेडकरांनी मांडला आहे. त्यांच्यामते महाविद्यालयीन किंवा विद्यापीठ स्तरीय शिक्षणाचा प्रभाव हा चिरकाल असा असतो. त्यामुळे विद्यापीठ हा कारकून बनण्याचा कारखाना ठरु नये अशी त्यांची अपेक्षा होती. भारतात प्राध्यापकांकडे पाहून त्यांनी खंत व्यक्त केली होती. ह्यासाठी परिश्रम करणाऱ्यांची प्रवृत्ती ही लोप पावलेली आहे. ध्येयवादी प्राध्यापक निपजत नाही याचे दु:ख त्यांनी व्यक्त केले आहे. त्यांच्या मते प्राध्यापक म्हणजे परिश्रम संशोधन आणि चिंतन यांची सांधेजोड ते मानतात. असा मौलिक विचार त्यांनी मांडला आहे. डॉ. आंबेडकरांनी सह शिक्षणाचा पुरस्कार केला होता आगरकरांप्रमाणे स्त्री-पुरुषांना एकच व एकत्र शिक्षण दिले पाहिजे. असे त्यांचे मत होते. स्त्रियासाठी स्वतंत्र शाळा, महाविद्यालये नसावीत यास त्यांची अनुमती नव्हती कारण ते स्त्री-पुरुष समानतेचे पुरस्कर्ते होते. त्यांना स्त्री-पुरुषांना एकत्र आणणे एकत्र शिक्षण देणे ही कल्पना रुजवायची होती. अशा पध्दतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण विषयक विचार मांडले आहेत.

**निष्कर्ष**

१) शिक्षण हे पोट भरण्याची कला नसून सुसंस्कृत बनविण्याची कला आहे.

२) डॉ. आंबेडकरांनी प्राथमिक, महाविद्यालयीन, विद्यापीठ स्तरीय शिक्षण व सहशिक्षणाचा पुरस्कार केला आहे.

३) डॉ. आंबेडकरांना स्त्री शिक्षण विषयी फार कळवळा वाटत होता. स्त्रियांनी शिक्षण घेतले तर समाजात त्यांची प्रतिमा उंचावते असे त्यांचे मत होते.

**संदर्भ**

१) विद्रोहाचे पाणी पेटले आहे- डॉ. गंगाधर पानतावणे, विजय प्रकाशन नागपूर.

२) धम्मयान मासिक - संपादक बाळासाहेब प्रकाश आंबेडकर, - बाबासाहेब आंबेडकरांचे देशासाठी योगदान, व्ही. एच. गायकवाड यांचा लेख.

३) पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर - डॉ. गंगाधर पानतावणे, - प्रतिभा प्रकाशन पुणे.

४) डॉ. आंबेडकर आणि दलित वैचारिक वाङ्मय, डॉ. नीळकंठ शेरे - सुविद्या प्रकाशन पुणे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि धर्मनिरपेक्षता

**– डॉ. दिलीप जानकीराम घोंगडे**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय
मोराणे, धुळे

**प्रस्तावना**

धर्मनिरपेक्षता हे भारताचे मुलभूत अंग आहे, ते कोणत्याही स्वरुपात बदलता येणार नाही, हे अनेक वेळा सर्वोच्च न्यायालयानेसुध्दा ठणकावून सांगितले आहे, असे असतांनाही काही राजकीय पक्ष आणि धर्मवादी संघटना भारत हे हिंदूराष्ट्र आहे! असे म्हणून या देशाला हिंदू राष्ट्र बनविण्यासाठी या ना त्या प्रकारे प्रयत्नशील आहेत. आपला भारत देश केवळ हिंदूंचा नाही, भारतामध्ये विविध धर्माचे, जातीचे लोक राहतात. आपल्या देशाच्या विकासप्रक्रियेत मुस्लिम, ख्रिश्चन व इतर अल्पसंख्याकांचाही सहभाग आहे. अर्थात, म्हणूनच डॉ. बाबासाहेबांनी धर्मनिरपेक्षता अधोरेखित केली आहे. राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यासाठी, तसेच राष्ट्रीय विकास करण्यासाठी सर्वांचेच योगदान आवश्यक असते. त्याकरिता धर्मनिरपेक्षतेची नितांत गरज आहे, व्यक्तिमत्व विकास करण्यासाठी धर्म निरपेक्षता उपयोगी ठरते. सहिष्णुतावृत्तीचा विकास करण्यासाठी आपण सर्व मानवजातीचे घटक आहोत या विचाराने परस्पर बंधुभाव जोपासला पाहिजे. विघटन कार्यशक्तीचा बिमोड करण्यासाठी आणि धार्मिक व सामाजिक समस्यांचे निमुर्लन करण्यासाठी धर्म निरपेक्षतेची गरज आहे.

**अभ्यासाचे उद्देश**

१) धर्म निरपेक्षतेची संकल्पनेचा अभ्यास करणे.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्म निरपेक्षते बाबतचे मत अभ्यासणे.

३) धर्म निरपेक्षता व आजची परिस्थिती याचा आढावा घेणे.

**अभ्यास पध्दती**

सदर अभ्यासामध्ये धर्मनिरपेक्षता म्हणजे काय याचा अभ्यास करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व धर्म निरपेक्षता याबाबत सदर संशोधन पेपर आधारित आहे. सदर संशोधन पेपर हा दुय्यम तथ्याद्वारे बनविण्यात आला आहे. यामध्ये विविध पुस्तकांचा समावेश केला आहे.

धर्म श्रेष्ठ की राजा श्रेष्ठ, धर्म श्रेष्ठ की राज्य श्रेष्ठ हा वाद विकोपाला जात असतांनाच एकोणिसाव्या शतकाच्या मध्यंतराला सेक्युलर म्हणजे धर्म निरपेक्षता या शब्दाचा जन्म झाला. हा खल अमेरिका व युरोपात शिगेला पोहोचला होता. त्याच कालखंडात ब्रिटीश लेखक - विचारवंत जॉर्ज जेकब होलीओक यांनी पहिल्यांदा धर्मनिरपेक्षता ही संकल्पना मांडली. राज्य किंवा सरकार आणि शिक्षण यांपासून धर्म वेगळा ठेवणे म्हणजे धर्म निरपेक्षता अशी साधीसोपी व्याख्या त्यांनी केली आहे. पुढे अनेक पाश्चात्य विचारवंतांनी हाच पाया माणून त्यांचे वेगवेगळ्या अंगाने विश्लेषण केले, मांडणी केली. त्यावर धर्म निरपेक्षता म्हणजे आधुनिकतेकडे वाटचाल, ही संकल्पना घेऊन पुढे जगभर चळवळी उभ्या राहिल्या. धर्म निरपेक्षतेला कोणता समाज अभिप्रेत आहे, त्याची मांडणी केली गेली, सारांशरुपाने असे म्हणता येईल की, धर्मनिरपेक्षता म्हणजे व्यक्तिचा सन्मान राखणे, लहान समाज घटकांचा आदर करणे, सर्व माणसे समान आहेत असे मानने आणि मानवी समाजात भेद निर्माण करणारे वर्ग आणि जाती नष्ट करणे.

या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असणारी धर्म निरपेक्षतेचा कोणता अर्थ अभिप्रेत होता, संविधानात त्याचे प्रतिबंध दिसते का ? हे पाहणे महत्वाचे ठरते. घटनेतील धर्म निरपेक्षतेचा शब्दशा अर्थाचा किस काढण्याचा बराच प्रयत्न झाला. त्यामागचा उद्देश उजेडात आणला गेला नाही.

भारताच्या स्वतंत्र राज्यघटनेच्या निर्मितीसाठी घटना समिती गठित करण्यात आली. ९ डिसेंबर १९४६ रोजी घटना समितीची पहिली बैठक झाली. त्यात पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी भावी घटनेचे ध्येय व उद्दिष्ट्ये कोणती असा ठराव मांडला. भारत एक स्वतंत्र, सार्वभौम राष्ट्र आहे, सर्वांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय दिला जाईल, अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकाराची हमी देणारा हा ठराव होता. घटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने डॉ. आंबेडकर यांनी २१ फेब्रुवारी १९४८ रोजी समितीला घटनेचा मसुदा सादर केला. त्यात त्यांनी ध्येय व उद्देशाच्या ठरावात एका शब्दाची भर घातली. तो शब्द होता बंधुभाव. त्यावर भाष्य करतांना बाबासाहेब म्हणाले होते की, आज कधी नव्हे इतकी भारतीय समाजात भ्रातृभाव रुजविण्याची गरज आहे. त्याला पार्श्वभूमी होती, भारत स्वातंत्र झाला, तरी धर्माच्या नावावर अखंड भारताची झालेली फाळणी, माणसेच माणसांची झालेली वैरी, कत्तली आणि रक्तपात भारतात अनेक धर्म, जाती आहेत, याची कल्पना बाबासाहेबांना होती. वैयक्तिक जीवनात धर्माचरणाचा कुठेही त्यांनी संकोच होऊ दिला नाही. मात्र शासन व्यवस्थेपासून धर्म अलग असला पाहिजे, याचीही तरतूद केली.

राष्ट्रपतींनी परमेश्वराला, अल्लाला स्मरून शपथ घ्यावी की घेऊ नये, असा खटला समितीत झाला. त्यावेळी राष्ट्रपतींनी नैतिकतेला स्मरुन शपथ घ्यावी, अशी सूचना त्यांनी मांडली. अनुच्छेद २८(१) नुसार शिक्षणापासून धर्म वेगळा केला. भारतीय राज्यघटना म्हणजे सामाजिक न्यायाचा दस्तऐवज बनविला, परंतु प्रत्यक्षात समाजरचना तशी नाही. याचे भान त्यांना होते.

भारतातील धर्मव्यवस्था ही शोषण व्यवस्था आहे, माणसा-माणसांमध्ये भेदभाव करणारी आहे, म्हणून घटनेत धर्म स्वातंत्र्याचा पुरस्कार केला असला, तरी धर्मासाठी माणूस की माणसासाठी धर्म असा प्रश्न त्यांनी भारतीय समाजव्यवस्था व समाजसुधारणांसमोर ठेवला. पुढे आंबेडकर धर्म व राज्याची फारकत या धर्म निरपेक्षतेच्या रुढ

अर्थाच्या आणखी पलीकडे जाताना दिसतात. लोकांकडून, लोकांसाठी लोकांचे राज्य म्हणजे लोकशाही, ही लोकशाहीची रुढ व्याख्या त्याज्य ठरवितात आणि लोकांच्या सामाजिक व आर्थिक जीवनात रक्तविहीन मार्गाने क्रांतिकारक बदल घडवून आणणारी शासन व्यवस्था म्हणजे लोकशाही अशी नवी व आधुनिक युगाशी सुसंगत अशी व्याख्या करतात. त्याचा पुढचा टप्पा धर्मांतर आहे. आंबेडकरांना धर्मांतर करुन धर्मयुध्द छेडायचे नव्हते, तर समता, स्वातंत्र्य बंधुभावाची, न्यायाची हमी देणाऱ्या भारतीय संविधानाशी सुसंगत अशी समाजाची पुनर्रचना करायची होती. त्यासाठीच राष्ट्रा-राष्ट्रातील संघर्ष हा प्रसंगोपात असतो, परंतु वर्गा-वर्गातील संघर्ष हा वारंवार होणारा आणि शाश्वत स्वरुपाचा असतो, हा संघर्षच जगातील सर्व दुखाचे मूळ आहे, अशी मानवी दुखाची कारणमीमांसा करणाऱ्या आणि मुक्तीचा मार्ग सांगणाऱ्या बुध्द तत्वज्ञानाला ते जवळ करतात. माणूस व माणसाचे माणसाशी या जगातील नाते, हा ज्या तत्वज्ञानाचा केंद्रबिंदू आहे, त्या धम्माचा ते स्वीकार करतात, यासाठीच की त्यांना धर्मनिरपेक्ष म्हणजे विवेकी समाजाची उभारणी करायची होती.

संविधानाच्या उद्देशिकेत काही बदल करण्यात आले, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे परिवर्तनवादी होते, त्यामुळेच संविधानात कालसापेक्ष बदल करण्याची मूभा त्यांनी संविधानाच्या ३६८ कलमान्वये दिली आहे. भारतीय संविधान मनुष्यनिर्मिती असल्यामुळे तिच्यात कालानुरुप दरुस्ती करण्याचा अधिकार भारतीय संसदेला दिला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान लिहिले तेव्हा त्यांच्यासमोर आदर्श राज्यपध्दत होती ती बुध्दकालीन गणराज्याची. जगभरच्या विशेषत: अमेरिका व इंग्लंड येथील घटना धर्मातील होत्या. बाबासाहेबांना धर्मसत्ता अमान्य होती, ग्रंथप्रमाण्य तर मुळीच मान्य नव्हते. त्यामुळे धर्म आणि राजकारण हे दोन विभिन्न घटक आहेत. एकमेकाला समांतर आहेत त्यामुळे धर्म निरपेक्षता हा शब्द मूळ संविधानाच्या उद्देशिकेत घालावा, असे बाबासाहेबांना वाटले नाही. हा शब्द अंतर्भूत करण्यात आला तो १९७६ च्या ४२ व्या घटना दुरुस्तीमुळे. या घटना दुरुस्तीच्या काळात तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी आणली होती. आणीबाणीचा कालखंड हा २५ जून १९७५ ते २१ मार्च १९७७ होता. आणीबाणीच्या विरोधात बोलणाऱ्यांना तुरुंगात डांबले जात होते.

राज्यघटनेच्या कलम ३६८ अन्वये संसदेने घटनादुरुस्ती करण्याचा प्रस्ताव लोकसभेत २ नोव्हेंबर १९७६, तर राज्यसभेत ११ नोव्हेंबर १९७६ रोजी ठेवण्यात आला. परंतु पाशवी सत्तेच्या आधारे ही घटना दुरुस्ती अंमलात आली आणि मग त्यात सार्वभौम, धर्मनिरपेक्ष या शब्दांचा अंतर्भाव करण्यात आला.

१५ नोव्हेंबर १९४९ ला संविधान सभेत प्रो. के.टी. शहा यांनी धर्म निरपेक्ष व समाजवादी हे दोन शब्द अंतर्भूत करण्यासाठी ठराव मांडला. प्रो.के.टी. शहा म्हणतात, आपण जे संविधान तयार करीत आहोत त्या संविधानाच्या चौकटीत धर्मनिरपेक्ष शब्दाला कुठेही स्थान देता येणार नाही हे सत्य आहे. परंतु कुठल्याही संविधानाचा आराखडा हा त्या ठिकाणी असलेल्या लोकांच्या मान्यतेनुसार तयार व्हावा. मागील काही वर्षातील धर्मांधतेचे, संप्रदायवादाचे आणि वर्गवादाचे जे काही वाईट अनुभव आले आहेत आणि जे भविष्यातही येण्याची संभवना आहे त्या आधारावर राज्याच्या धर्म निरपेक्षतेला आम्ही महत्व दिले पाहिजे. भारतीय संविधानाचे जे स्वरुप व वैशिष्ट्ये आम्ही आज तयार करीत आहोत त्यात धर्मनिरपेक्षता स्वीकारली गेली तर व्यक्ती, नागरिक व शासन यांच्या जगण्यात व व्यवहारात धर्म निरपेक्षतेला मान्यता प्रदान करता येईल. ज्यामुळे कुठल्याही सरकारला किंवा कुठल्याही व्यक्तिविशेषाला नागरिकांवर धार्मिक वा सांप्रदायिक प्रभाव टाकता येणार नाही. याचा परिणाम असा होईल की, देशातल्या नागरिकांनी जे संविधान तयार केले त्या नागरिकांमध्ये आपापसात अन्याय व असमानतेची भावना निर्माण होणार नाही.

प्रो. के.टी. शहा यांच्या प्रस्तावाला नाकारतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, सर, भारतीय संविधान हे कुण्या एका राजकीय पक्षाला किंवा धर्माला किंवा विशिष्ट समुदायाला लक्षात घेऊन तयार करण्यात आलेले नाही. भारतीय संविधान हे अशी व्यवस्था आहे जे शासनाच्या व राज्याच्यश विभिन्न अंगामध्ये चालणाऱ्या कार्याला नियंत्रित ठेवणारे आहे. संसदेत विशिष्ट व्यक्ती वा पक्षाला प्रस्थापीत करणारे हि व्यवस्था नाही. राज्याचे धोरण काय असेल व समाज त्याच्या सामाजिक व आर्थिक उद्दिष्ट्यासाठी कशाप्रकारे संघटीत होईल, हे त्या त्या वेळेच्या परिस्थितीवर निर्भर करेल. हे आताचे भारतीय संविधानात समाविष्ट करणे म्हणजे भारतीय लोकशाहीला आताच संपविणे असे होईल. जर राज्यातल्या सामाजिक संघटनांनी कुठली एक विशिष्ट प्रणाली स्विकारली पाहिजे हे आजच संविधानात अंतर्भुत करणे माझ्या दृष्टीने सामाजिक संघटनांचे स्वातंत्र्य हिरावून घेणे असे होईल. अशा स्थितीत नागरिकांना कसे जगायचे आहे हे संविधानाने बंदिस्त न करता त्यांना त्यांनी ठरविल्याप्रमाणे जगू द्यावे असे मला वाटते. संविधानात समाविष्ट मूलभूत अधिकार व राज्यनितीची मार्गदर्शक तत्वे लक्षात घेतली तर येणाऱ्या सरकारला आम्ही धोरण निश्चितीसाठी उत्तरदायी बनविले आहे. त्यामुळे यापेक्षा समाजवादाचे दुसरे रुप कुठले असेल असे मला वाटत नाही. त्यामुळे प्रो. के. टी. शहा यांनी मांडलेल्या ठरावाला माझा विरोध आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची राष्ट्रनिष्ठा व देशातील नागरिकांवर असलेला विश्वास उच्चकोटीचा होता हेच यातून दिसून येते. कायद्यांची बंधने लादून समाज नियंत्रित करण्यापेक्षा समाजाला मूलभूत स्वातंत्र्य बहाल करुन शासनाला नागरिकांसाठी कल्याणकारी धोरण आखण्यास बाध्य करणे, यावर त्यांचा विश्वास होता. धर्मासाठी माणूस नसून माणसासाठी धर्म आहे. त्यामुळे स्वतंत्र संविधानिक भारतात धर्मवाद, पंथवाद राहणार नाही असे त्यांना वाटत होते. सरकार अशा कुठल्याही धर्मवादाला व पंथवादाला प्रोत्साहन देणार नाही अशी त्यांची अपेक्षा होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाची घटना लिहितांना राष्ट्रीय एकात्मता आणि अखंडता टिकवून लोकशाहीचे संवर्धन करणे, याकरिता धर्मनिरपेक्षतेचे तत्व अंतर्भूत केले आहे. धर्मनिरपेक्ष समाज रचनेसाठी त्यांनी संविधानात ज्या तरतूदी नमूद केल्या आहेत त्या अशा,

१) **कलम १५(१)** – धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरुन कोणत्याही

नागरिकाला प्रतिकुल होईल अशा प्रकारे भेदभाव करणार नाही.

२) **कलम २५(१)** – सार्वजनिक व्यवस्था, नितिमत्व व आरोग्य यांच्यावर या भागातील अन्य उपबंधाच्या अधिनतेने सक्षम विवेक बुध्दीच्या स्वातंत्र्याला आणि धर्म मुक्तपणे प्रज्ञापित करावयाच्या आचारणाच्या व त्याच्या प्रसार करण्याच्या अधिकाराला सर्वशक्ती सारख्याच हक्कदार आहेत.

३) **कलम २८(१)** – राज्याच्या पैशातून चालविल्या जाणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही.

४) **कलम ३०(१)** – धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्यांक असलेल्या सर्व समाजांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा आणि त्या चालविण्याचा हक्क प्रदान करण्यात आलेला आहे.

डोनाल्ड युजेन स्मिथ धर्मनिरपेक्षतेची व्याख्या करतांना म्हणतात, धर्मनिरपेक्ष राज्य म्हणजे जे सर्वांना व्यक्तिगत आणि सामुदायिक धर्मस्वातंत्र्य बहाल करते, घटनात्मकरित्या कोणत्याही विशिष्ट धर्माला धर्मनिरपेक्ष राष्ट्र बांधलेले नसते. त्याचप्रमाणे ते कुठल्याही विशिष्ट धर्मास उत्तेजन देत नाही किंवा कोणत्याही धर्मास उत्तेजन देत नाही किंवा कोणत्याही धर्मात हस्तक्षेपही करीत नाही. या विधानावर भारताच्या राज्य कारभाराबाबत वाद होऊ शकतो. शासन हे कल्याणकारी असते. धर्म संस्था प्राचीन काळापासून आहे तशा पध्दतीने चालत आलेली आहे. धर्म सांगेल तसे शासन चालावे ही मध्ययुगीन संकल्पना आहे. समता, स्वातंत्र्य आणि विज्ञानावर या संकल्पना आधुनिक आहेत. त्यामुळे त्या धर्मात सापडणे शक्य नाही, हे डॉ. बाबासाहेबांना ठाऊक होते म्हणून ते म्हणतात, देशात समता आणि बंधुता निर्माण करण्यासाठी राज्याने निधर्मीकरण आचरणात आणणे म्हणजे धर्म निरपेक्षता होय.

एखादी व्यक्ती वा एखादे राष्ट्रे वयात येते त्यावेळी ती व्यक्ती वा ते राष्ट्र धर्म निरपेक्ष होते. बुध्दिप्रामाण्यवादी होते. धर्म निरपेक्षता हा प्रगल्भ मनांना प्रिय वाटणारा एक जीवनमार्ग आहे. हा जीवनमार्ग समाजाच्या उंचीचा निदर्शक आहे. धर्म आणि धर्म निरपेक्षता या दोन अत्यंत विरोधी छावण्या आहेत. या दोन्ही गोष्टी एकत्र नांदूच शकत नाहीत. धर्मनिरपेक्षतेचा स्वीकार म्हणजे धर्माचा विलय होय.

**सारांश**

भारतीयांनी धर्म निरपेक्षतेचा तत्वत: स्वीकार केला असला, संविधानाने आपल्यापुढे ते ध्येय ठेवले असले तरी आपण अजूनही धर्म निरपेक्ष जीवनात प्रवेश केला असे दिसत नाही. धर्मनिरपेक्षता आज राज्यकर्त्यांनी, राजकारण्यांनी, समाजकारण्यांनी, शिक्षकांनी, धर्मांधांनी आणि देशातल्या सर्वांनीच समजावून घेण्याची गरज आहे. आजचे आपल्या राष्ट्रांचे जीवघेणे प्रश्न, आपल्या समाजाला अध:पाताच्या खाईत लोटणारे प्रश्न आपण धर्म निरपेक्षतेचे तत्वज्ञान समजावून घेतले नाही म्हणून निर्माण झालेले आहेत. भारतीय संविधानातील धर्म निरपेक्षतेचा प्रत्येकाने आदर केलाच पाहिजे. ते प्रत्येकाचेच मूलभूत कर्तव्य आहे. पण हे होत नाही. आज देशात सर्वांत जास्त अन्यायग्रस्त कोणी असेल तर ते भारतीय संविधान होय. कारण राजकारण्यांपासून, सत्ताधाऱ्यांपासून तर सामान्य माणसापर्यंत सर्वांनीच धर्मनिरपेक्षता समजावून घेण्याचे टाळले आहे. भारतीय संविधानातील या सर्वश्रेष्ठ आदर्शांची पायमल्ली केली आहे. धर्म निरपेक्षता हा भारतीय संविधानाचा प्राण आहे. तो नाकारुन भारतीय संविधानाचा आदर कोणालाच करता यायचा नाही. भारतीय संविधानातील धर्म निरपेक्षतेचा अनादर करुन, त्याची पायमल्ली करुन कोणालाही देशात मानवतेसंबंधी आदर व्यक्त करता यायचा नाही. परिवर्तन, प्रबोधन, क्रांती या सर्वच गोष्टी धर्म रिनपेक्षता नाकारुन कोणालाच शक्य नाहीत. धर्मांध संकटेही टाळता येणे शक्य नाही. धर्म निरपेक्षतावादी संविधान ही या देशाला बाबासाहेबांनी दिलेली एक क्रांतिकारी देणगी आहे.

**संदर्भ**


१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ प्रकाशन, मुंबई– १२.

२) डॉ. यशवंत मनोहर (१९९१) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक शक्तिवेध, संघमित्रा प्रकाशन, नागपूर.

३) माधव गोडबोले, अनु सुजाता गोडबोले (२०१७) : भारताची धर्म निरपेक्षता : धोक्याच्या वळणावर, राजहंस प्रकाशन, पुणे.

४) डॉ. गिरीश जाखोटिया (२०१७) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि २१ वे शतक, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, ठाणे.

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र – साधने प्रकाशन समिती (२००२) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे भाग – ३, १९४६ ते १९५६, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

# मानवतेचा प्रवक्ता – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

– **डॉ. संभाजी संतोष पाटील**
श्री.शि.वि.प्र. संस्थेचे महाविद्यालय
शिंदखेडा, जि. धुळे (महाराष्ट्र)

**प्रस्तावना**

२० व्या शतकातील भारतातील सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. त्यांचे व्यक्तिमत्व अष्टपैलु होते. प्राध्यापक, बॅरिस्टर, समाजसुधारक, राजकीय नेते, धर्मचिंतक व धर्मसुधारक, विद्वान संसदपटु, मंत्री, अस्पृश्यांचे उध्दारकर्ते इ. नावाने डॉ. आंबेडकरांचे कार्य भारतीयांपुढे आहे. पंडित नेहरुंनी डॉ. आंबेडकरांना 'बंडाचे प्रतिक', 'दलितांचे कैवारी' असे म्हटले होते. रॅग्लर आर.पी. परांजपे (मुंबई प्रांताचे शिक्षणमंत्री) यांनी दलीतांच्या वर्गाचे हक्काचा कैवारी असे डॉ. आंबेडकरांबाबत म्हटले होते. न्या.एम.सी. छगला यांनी घटनात्मक कायदा व राज्यशास्त्र यावरील अधिकारी व्यक्ती असा उल्लेख डॉ. आंबेडकरांबाबत केला होता. डॉ. आंबेडकरांच्या मृत्युनंतर ७ डिसेंबर १९५६ रोजी 'टाईम्स ऑफ इंडिया' या वृत्तपत्राने डॉ. आंबेडकरांचा उल्लेख 'अष्टपैलु विद्वान' या शब्दात केला होता. डॉ. आंबेडकर विचाराचे अभ्यासक डॉ. वा.ना. कुबेर यांनी 'आंबेडकर विचारमंथन' या ग्रंथात डॉ. आंबेडकरांचा उल्लेख 'दुर्लक्षित मानवतेचा प्रवक्ता' या शब्दात केला आहे. स्वत: डॉ. आंबेडकरांनी म्हटले होते की, पददलित जनतेच्या उध्दारासाठी त्यांची सेवा करीत असतांना मरण पत्करणे ही माझी गंभीर प्रतिज्ञा आहे कारण त्या दलित जनतेतच मी जन्मास आलो, वाढलो आणि आजही त्याच जनतेत मी राहत आहे. मानवी प्रतिष्ठा, स्वातंत्र्य, सामाजिक समता, आर्थिक न्याय इ. साठी त्यांनी आपले आयुष्य खर्च केले.

भारतीय संविधानाचे शिल्पकार आधुनिक भारताच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक व्यवस्थेवर ठसा उमटविणारे एक कृतीप्रवण विचारवंत सामाजिक, आर्थिक लोकशाही भारतात यावी यासाठी सतत धडपड करणारे प्रभावी व्यक्तिमत्व म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. आधुनिक भारताची जडण-घडण या श्रेष्ठ महापुरुषाच्या कतृत्वाने झाली. त्यापैकी डॉ. बाबासाहेब एक होते. दिन-दलितांना त्यांचे न्यायपूर्ण हक्क मिळवून देण्यासाठी त्यांची अस्मिता जागृतीसाठी ते आयुष्यभर झटत राहिले. हे कार्य करतांना त्यांनी भारताचे ऐक्य टिकविण्याचे कार्य केले. तसेच ते प्रखर राष्ट्रवादी नेते होते. भारताच्या पहिल्या मंत्रीमंडळात ते मंत्री असतांना त्यांनी आपल्या कार्यकतृत्वाचा ठसा उमटविला. कुणीही आदराने ज्याच्यासमोर नतमस्तक व्हावे असा ज्ञानयोग आणि कर्मयोग यांचा अलौकीक संगम त्यांच्या ठायी होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे उदारमतवादी होते. त्यांना भारतीय जनतेचा भारत, एकसंघ भारत त्यांना अभिप्रेत होता. त्यांच्यामते भारतीय राजकीय व्यवस्थेचे आधुनिकीकरण करावयाचे असेल तर प्रथम सामाजिक परिवर्तन आवश्यक आहे. सामाजिक परिवर्तनाशिवाय राजकीय व्यवस्थेत केलेले परिवर्तन अस्पष्ट, अनिश्चित असेल. त्यांना सामाजिक न्याय सर्वात महत्वाचा वाटत होता. बहिष्कृत हितकारणी सभेच्या झेंड्याखाली त्यांनी सामाजिक परिवर्तनाची चळवळ सुरु केली. त्यांच्या मते यशस्वी लोकशाहीसाठी समाजात जाणवणारी विषमता असु नये. तसेच समाजातील सर्व घटकात सरमिसळ आवश्यक आहे. कारण त्याशिवाय एकता प्रस्थापित होणार नाही. भारतीय राजकीय व्यवस्था आर्थिक शोषणापासुन मुक्त असावी. जातरहित व वर्गरहित समाज हाच भारतीय राजकीय व्यवस्थेचा मुख्य आधार असावा. एकंदरीत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य देशासाठी उपयुक्त व मोलाचे आहे.

**डॉ. आंबेडकरांचे सामाजिक विचार**

भारतातील सामाजिक क्रांतीचे अग्रदूत म्हणून डॉ. आंबेडकर ओळखले जातात. १९२३ ला मुंबई हायकोर्टात त्यांनी वकिली सुरु केली. जोडीला सरकारी लॉ कॉलेजात ते अर्धवेळ प्राध्यापक म्हणून काम करत होते. हे करीत असतांना अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी चळवळी करण्याचे विचार त्यांच्या मनात येत होते. वकिली व प्राध्यापकी करुन वेळ मिळेल तेव्हा डॉ. बाबासाहेब मुंबईबाहेर जाऊन ठिकठिकाणी सभा-संम्मेलने यात भाग घेऊन, दलित उध्दाराबद्दलचे आपले विचार मांडत होते. अ.भा. बहिष्कृत समाज परिषदेत भाषण करतांना डॉ. आंबेडकरांनी 'अस्पृश्य' हा शब्द कोणत्याही माणसाला लावणे निंद्य आहे. तुम्ही अस्पृश्य नाहीत. तुम्हास अस्पृश्य मानणाऱ्या पुष्कळ लोकांपेक्षा जास्त बुध्दीवान, जास्त पराक्रमी, जास्त सुविचारी, जास्त स्वार्थत्यागी अशा हिंदु राष्ट्राचे तुम्ही घटक आहात. मी तुम्हाला अस्पृश्य समजत नाही. डॉ. आंबेडकरांनी म्हटले होते, अस्पृश्यता ज्या रुपाने आज हिंदूंमध्ये प्रचलीत आहे ती ईश्वर आणि मनुष्य या दोघांच्याही विरुध्द आहे.

**डॉ. आंबेडकर आणि महार वतन**

महारांना अधोगतीस नेणारी बाब म्हणजे महारकांचे महार वतन होय, असे डॉ. आंबेडकरांनी आग्रहाने मांडले. त्यासंदर्भात १९२८ मध्ये त्यांनी बहिष्कृत भारतामध्ये चार अग्रलेख लिहिले. त्यात महारांचा वतनापासून कसा अध:पात झाला आहे व तो टाळण्यासाठी वतनाच्या कायद्यात कोणत्या सुधारणा करणे शक्य आहे याचे सांगोपांग विवेचन केले आहे. वतनदारी नष्ट करण्याचे बिल मुंबई कायदेमंडळात १९ मार्च १९२८ रोजी मांडले. त्यापूर्वी त्यांनी वतनदारांच्या परिषदा घेऊन या प्रश्नाची सांगोपांग चर्चा केली होती. हे बिल पास झाले पण डॉ. आंबेडकरांना विधानसभेत प्रखर लढा द्यावा लागला. महार वतन ही एक प्रकारची गुलामगिरी होय, हा विचार त्यांनी महारांच्या मनावर बिंबवला. महारांची सुधारणा होण्यासाठी वतनपध्दती नष्ट होण्याच्या गरजेवर त्यांनी भर दिला.

नाग, द्रविड व दास हे तीनही एकच होते व ते अनार्य होते असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. नाग हे अतिप्राचीन लोक होते, ते अनार्य आहेत, त्यांचा सांस्कृतिक दर्जा फारच उच्च होता, आर्य राजघराण्याशी त्यांचे विवाह संबंध प्रस्थापित झाले होते, भारताच्या अनेक भागांवर त्यांची राज्ये होती. महाराष्ट्र तर नागभूमीच होती, अशी मते डॉ. आंबेडकरांनी नाग लोकांबद्दल व्यक्त केली होती.

तसेच डॉ. आंबेडकरांनी २३ नोव्हेंबर १९४८ रोजी केंद्रीय कायदेमंडळात शरीयत कायद्याच्या तरतुदींबाबत वस्तुनिष्ठ भुमिका मांडली होती. शरीयत कायद्याचा प्रभाव म्हणजे मुसलमान समाजाच्या गतिशुन्यतेचे लक्षण होय, असे त्यांना वाटे. डॉ. आंबेडकरांना विषमतारहित समाज अभिप्रेत होता म्हणूच धर्मावर आधारलेल्या परंपरांना त्यांचा विरोध होता. शरीयत कायद्यामध्ये मुस्लीम स्त्रियांच्या प्रगतीचे मार्ग रोखून धरले आहेत. मुस्लिमांतील तलाक पध्दती मुस्लीम स्त्रीवर अन्याय करणारी आहे. एकात्म भारतासाठी समान नागरी कायदा असावा, असे डॉ. आंबेडकरांनी सांगितले होते.

**डॉ. आंबेडकरांचे धार्मिक विचार**

बुध्द, संत कबीर व म. फुले हे आपले गुरु आहेत असे डॉ. आंबेडकरांनी म्हटले होते. या तिघांच्या कार्याचा व विचारांचा प्रभाव डॉ. आंबेडकर यांच्यावर पडला होता. 'Buddha and his Dhara, Ridels in Hindusim' या ग्रंथांवरुन त्यांनी आपली धर्मकल्पना मांडली आहे. धर्मकल्पना, धार्मिक तत्वे व आचारविचार, धर्मग्रंथ इ. चा अत्यंत सखोल अभ्यास डॉ. बाबासाहेबांनी केला होता. हिंदू धर्म व हिंदू ग्रंथ यांची अत्यंत कठोर चिकित्सा त्यांनी केली आहे. त्यांच्या धार्मिक विचारातील महत्वाचे तत्व म्हणजे धर्म ही त्यांच्या दृष्टीने केवळ अध्यात्मिक प्रेरणा नव्हती किंवा पारलौकिक सुखाच्या दृष्टीने ते धर्माचा विचार करीत नव्हते. ते म्हणतात, धर्म हा समाजाला आवश्यक नाही असे काही लोक समजतात. परंतु माझा तसा दृष्टीकोन नाही. धर्माचा पाया हा व्यक्तीजीवनाला आवश्यक आणि सामाजिक व्यवहाराला पोषक असा आहे. मला धर्म पाहिजे, पण धर्माच्या नावावर चाललेला ढोंगीपणा नको. धर्म माणसात आशावाद निर्माण करतो आणि त्याला कार्याला प्रवृत्त करतो. तरुण लोक धर्माविषयी बेफिकीर होत चालले आहेत हे पाहून मला दु:ख होते.

नियमाधिष्ठीत धर्माचे डॉ. बाबासाहेब विरोधक असले तरी धर्माची माणसाला आवश्यकता नाही, असा चुकीचा समज कुणी करु नये. धर्म हा समाजाचा आधारस्तंभ आहे असे त्यांनी आवर्जुन सांगितले. मनुष्याला व समाजाला खऱ्या धर्माची कशी गरज आहे हे त्यांनी अनेकदा सांगितले. १९५६ साली बौध्द धर्म स्विकारल्यानंतर डॉ. आंबेडकरांनी म्हटले होते, मनुष्याला शरीराबरोबर मनही आहे. मनाचा विकास झाला पाहिजे. मन सुसंस्कृत झाले पाहिजे. हे काम धर्मच करु शकतो... वरिष्ठ व संपत्तीवान लोकांना धर्माची आवश्यकता वाटणार नाही... धर्माची आवश्यकता गरिबांना आहे, पीडित लोकांना आहे. गरीब मनुष्य जगतो तो आशेवर. जीवनाचे मुळ आशेत आहे. ही आशाच नष्ट झाली तर जीवन कसे होईल? धर्म गरीबांना आशावादी बनवतो. पीडितांना, गरिबांना तो संदेश देतो.

डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या कोट्यावधी अनुयायांसह बौध्द धर्मात केलेला प्रवेश हा आधुनिक भारताने पाहिलेली सर्वात मोठी क्रांती होय. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी त्यांनी नागपूर येथे बौध्द धर्माची दिक्षा घेतली. डॉ. आंबेडकरांनी बौध्द धर्माचा स्वीकार करणाऱ्या २२ प्रतिज्ञा स्वत: तयार केल्या. या २२ प्रतिज्ञांपैकी खालील प्रतिज्ञा हिंदू धर्माला नकार देणाऱ्या होत्या. त्या पुढीलप्रमाणे –

१. मी ब्रम्हा, विष्णु, महेश यांना मानणार नाही. त्यांची उपासना करणार नाही.
२. राम, कृष्ण यांना देव मानणार नाही.
३. गौरी, गणपती इ. हिंदु धर्मातील कोणत्याही देवता मानणार नाही.
४. देवाने अवतार घेतले यावर माझा विश्वास नाही.
५. बुध्द हा विष्णुचा अवतार हा खोटा व खोडसाळ प्रचार होय असे मी मानतो.
६. मी श्राध्दपक्ष करणार नाही, पिंडदान करणार नाही.
७. मी कोणतेही क्रियाकर्म ब्राम्हणाच्या हातुन करुन घेणार नाही.

समाजवादी नेते डॉ. राममनोहर लोहिया यांनी १ जुलै १९५७ च्या एका पत्रात म्हटले होते, भारतीय राजकारणात म. गांधीव्यतिरीक्त डॉ. आंबेडकर यांचा एवढा मोठा माणुस व नेता अन्य कोणीही झाला नाही शांताराम रेगे 'भीमापर्व' या पुस्तकात म्हणतात, डॉ. आंबेडकरांनी आपल्या दलित बांधवांच्या हक्कांसाठी केलेली क्रांती अपुर्व ठरेल. कारण ती शांततापुर्ण होती. लक्षावधी पीडित जनतेला पुनरुज्जीवन देणारी, लोकशाही मार्गाने ध्येय साध्य करणारी ही क्रांती इतिहासात अपूर्व ठरेल. धर्मशास्त्र हा जो समाजाचा पाया होता तो नष्ट करुन नव्या मानवी मुल्यांच्या आधारावर व पायावर समाज उभा करण्याचे ध्येय त्यांनी आरंभापासुनच निश्चित केले होते.

**डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक विचार**

शिका, संघटित व्हा व लढा द्या हा संदेश डॉ. आंबेडकरांनी दलितांना दिला होता. ते स्वत: उच्चविद्याविभूषित होते. त्यांच्याकडे भारतातील व इंग्लंड, अमेरिकेतील विद्यापीठांच्या उच्च पदव्या होत्या. मुंबईतील सिडनेहॅम महाविद्यालयात ते काही दिवस प्राध्यापक होते. तसेच M.A., M.Sc., Law, Ph.D. ह्या पदव्या त्यांच्याकडे होत्या. प्राध्यापक असतांना त्यांना ग्रंथखरेदीचे वेड होते. सिडनेहॅम महाविद्यालयात ते प्राचार्य होते. १९२८ मध्ये त्यांनी All India Depressed Class Education Society स्थापन केली होती. व या सोसायटीच्या वतीने अस्पृश्य समाजातील मुलांसाठी दोन वस्तीगृहे स्थापन करण्यात आली होती. डॉ. आंबेडकरांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन मुंबई प्रांताच्या गव्हर्नरनी पाच वसतिगृहे चालविण्यासाठी मदत देण्याचे घोषित केले होते.

**मागासवर्गीयांना शिक्षणात विशेष सवलती हव्यात**

भारतीय संविधानाची मागणी करतांना त्यांनी त्यांच्या मनात असलेल्या सवलतींना कायदेशीर रुप दिले. मागासलेल्या वर्गांना/जातींना शिक्षणात विशेष सवलती दिल्यामुळे उच्चवर्गीय लोक डॉ. आंबेडकरांवर टीका करीत. ही टीका खोडुन काढतांना ते म्हणतात, निरोगी मनुष्य व अशक्त वा रोगी मनुष्य व अशक्त यांच्यात शर्यत लावणे शक्य नाही व

योग्यही नाही. मागासलेले वर्ग/जाती या सामाजिक न्यायाच्या तत्वापासुन शेकडो मैल दूर आहेत. धर्माच्या नावावर त्यांचे शोषण झाले. आर्थिकदृष्ट्या अत्यंत दरिद्री आहेत म्हणून त्यांना काही काळापर्यंत शिक्षणाच्या सवलती हव्यात. अस्पृश्यांना शैक्षणिक सवलती दिल्याशिवाय तो वर्ग प्रगतिपथाकडे जाणार नाही, असे डॉ. आंबेडकरांनी म्हटले होते.

मागासलेल्या जमातीतील शिक्षकांच्या एका मेळाव्यासमोर भाषण करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले ब्राम्हण वर्गातून आलेल्या शिक्षकांची सामाजिक मते बुरसटलेली व प्रतिगामी असतात. त्यांना खालच्या जातीतील लोकांच्या शैक्षणिक व वैचारिक उन्नतीत रस नसतो. मागासलेल्या समाजातील विद्यार्थ्यांच्या अडचणी ते समजावुन घेऊ शकत नाहीत. शिक्षक हे कोणत्याही देशाचे सारथी असतात. सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने विचार करता योग्य शिक्षक नेमणे महत्वाचे आहे. विद्यादान करतांना मुलांच्या मनावर सामाजिक जाणिवेचे विचार बिंबवण्यास विसरु नका.

**सहशिक्षणाचा पुरस्कार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सहशिक्षणचे पुरस्कर्ते होते. स्त्री-पुरुषांना एकच व एकत्र शिक्षण दिले गेले पाहिजे, स्त्रियांसाठी स्वतंत्र शाळा वा महाविद्यालय काढण्याची आवश्यकता नाही. असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. स्त्री-पुरुषांच्या सहशिक्षणास पुराणमतवाद्यांचा होणारा विरोध हा पोथिनिष्ठ मनोवृत्तीचा आहे, परिवर्तनविरोधी आहे, असे मत मांडून स्त्री-पुरुष सहशिक्षणामुळे स्त्रिया समाजात निर्भिडपणे वावरु शकतील असे त्यांनी म्हटले. स्त्रियांचा विनय व पुरुषांची नितिमत्ता शाबूत राखण्यासठी वयाच्या सात वर्षानंतर त्यांना वेगवेगळे शिक्षण देण्यात यावे हे पुराणमतवाद्यांचे मत त्यांना मुळीच मान्य नव्हते. स्त्री-पुरुष सहशिक्षणामागची आपली भूमिका मांडतांना त्यांनी १५ जुलै १९२७ च्या बहिष्कृत भारत मध्ये लिहिले, स्त्री-पुरुषांची नीतीमत्ता जर वाढवावयाची असेल तर त्यांचा सहवास जितका जास्त होईल तितका आवश्यक घडवून आणला पाहिजे. पृथक ठेवल्याने अनीतीचा अग्नी शांत न होता जास्त भडकणार आहे हे कोणी विसरु नये.

१ सप्टेंबर १९५१ रोजी औरंगाबाद येथील मिलिंद महाविद्यालयाच्या इमारतीची कोनशिला भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते बसविण्यात आली. तेव्हा डॉ. आंबेडकरांनी केलेल्या भाषणात म्हटले होते, हिंदू समाजाच्या अगदी खालच्या थरातल्या जमातीत माझा जन्म झाला असल्यामुळे शिक्षणाचे महत्व काय असते याची पूर्ण जाणिव मला आहे. त्यामुळे लहानपणापासुन शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे, असे माझे स्वप्न आहे. आज ते पूर्ण झालेले पाहण्यास मी हयात आहे याचा मला आनंद होत आहे. डॉ. आंबेडकरांनी वसतिगृहे, शाळा व महाविद्यालये स्थापन करुन पददलित व मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन दिली. 'स्वाभिमान, स्वावलंब आणि आत्मोध्दार' या सुत्रत्रयीचे आग्रही प्रतिपादन करताना त्यांनी शिक्षणाच्या अपरिहार्यतेचा प्रथम प्रचार केला. शिक्षणाशिवाय दलितांचा उध्दार होणार नाही हे त्यांनी दलितांचा शेकडो सभेत आग्रहाने सांगितले.

**वर्गव्यवस्था व जातीविषयक विचार**

डॉ. आंबेडकरांच्या मते वेदात सुध्दा फक्त तीनच वर्गांचा उल्लेख केलेला आहे. ते म्हणजे ब्राम्हण, क्षत्रीय, वैश्य. अस्पृश्यता व शुद्रांचा उल्लेख नाही तर ब्राम्हणांनीच शुद्र हा नविन वर्ग निर्माण केला आहे. या शुद्रांचे मुलभूत हक्क त्यांना नाकारण्यात आले. त्यांचा सामाजिक दर्जा अत्यंत खालच्या पातळीवर ठेवण्यात आला. अशाप्रकारे हेतुपुरस्करपणे समाजात शेकडो वर्षांपासुन वर्णव्यवस्थेची जोपासना केली. डॉ. आंबेडकरांच्या मते चतुर्वर्ण हा समाजाचा आधार बनला होता. अस्पृश्यता निर्माण करण्यात व त्यांची जोपासना करण्यात उच्चवर्णीयांचा फार मोठा हातभार आहे.

जातीव्यवस्थेचे निर्मुलन केले पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. जातीव्यवस्था ही दलितांच्या प्रगतीला अत्यंत मारक आहे. म्हणूनच आंबेडकरांनी स्वत:ला कामगार नेते म्हणून घेण्यापेक्षा दलित नेते म्हणून घेणे पसंत केले. जातीय व्यवस्थेनेच समाजाची विभागणी झाली. जातीजातीचा उतरण समाजात निर्माण झाला. श्रेष्ठ व कनिष्ठ जाती एकमेकांना पाण्यात पाहू लागल्या. व्यक्तीचा दर्जा जातीवरच ठरत असल्यामुळे सर्वांना समान संधी मिळत नाही. जाती व्यवस्थेमुळे रोटी-बेटी बंदी निर्माण झाली. ज्यांना जातीबाहेर टाकण्यात आले त्यांनी अनेक नविन जाती निर्माण केल्यामुळे जातींची संख्या वाढतच गेली.

जातीव्यवस्थेसंबंधी डॉ. आंबेडकरांनी खालील मते सांगितली.

१) जातीव्यवस्था हा हिंदु धर्मातला अत्यंत महत्वाचा दोष आहे. जातीव्यवस्थेमुळे कामगार वर्गाचे निरनिराळ्या जातीत विभाजन झाले.
२) जातीय व्यवस्था पुर्णपणे अनैसर्गिक आहे. ती गुणांवर आधारलेली नाही.
३) जातीव्यवस्थेमुळे समाजात श्रेष्ठ, कनिष्ठ असे वर्ण निर्माण झाले.
४) जाती व्यवस्थेतील पुर्वी केलेल्या पाप पुण्यांनुसार मानवास विशिष्ट जातीत जन्म प्राप्त होतो या विचाराला बुध्दीचा तत्वाचा आधार नाही.
५) जाती व्यवस्थेचे स्वरुप अकारणात्मक आहे. आंतरजातीय विवाह अमान्य आहे. तसेच रोटी-बेटी व्यवहार बंद आहे.
६) जातीमुळे समाजाची नैतिक अवनती झाली. तसेच जास्तीत जास्त उपजातीत संघर्षाचे वातावरण आहे.
७) जातीव्यवस्थेमुळे व्यक्तीची निष्ठा स्वत:च्या जाती पुरतीच राहीली. त्यामुळे सार्वजनिक नुकसान झाले.
८) जातीव्यवस्थेमुळे हिंदु समाजाचे विभाजन झाले.

अशा प्रकारच्या जाती व्यवस्थेने निर्माण झालेल्या विपरीत परिणामातूनच सुटका करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी खालील उपाय सांगितले.

ख्रिश्चन व ईस्लाम धर्माप्रमाणे हिंदुंचाही एकच ग्रंथ व एकच देव असला पाहिजे, इतर शास्त्रे, पुराणे नष्ट करावी.

ग्रंथाच्या आधाराने जे लोक उपदेश करतात त्यांना शिक्षा करावी. पुरोहित वर्ग नष्ट करावा. आवश्यकता असेल तर कोणत्याही व्यक्तीस पुरोहित होता यावे. मात्र त्यासाठी राज्याने ठरवून दिलेली परीक्षा उत्तीर्ण केली पाहिजे. तसेच सरकारकडून पुरोहिताचा परवाना मिळाला

पाहिजे. कायदा करुन धर्म अधिकाऱ्यांची संस्था मर्यादित करावी.

**मूल्यमापन**

डॉ. बाबासाहेब यांचे कार्य अलौकीक आहे, त्यांचे कार्य वाखाणण्याजोगे असे आहे. त्यांनी आपल्या आयुष्यात नैतीकमुल्यांना प्राधान्य देऊन कार्य केलेले आहे. आपआपसात प्रेम, बंधुत्व, सहकार्याची भावना निर्माण करण्याचे त्याचबरोबर शेकडो वर्ष सामाजिक, धार्मिक स्वरुपाच्या गुलामगिरीत खितपत पडलेल्या दलीतांमध्ये जनजागृती घडवून आणण्याबरोबर त्यांच्यात धार्मिक सामाजिक तसेच स्वातंत्र्य, सामाजिक प्रतिष्ठा, व राजकीय यांची जाणीव करुन देण्याचे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आहे. ते समाज क्रांतीकारक, घटनातज्ञ उत्तम प्रशासक, स्वातंत्र्याचे कैवारी, लोकशाहीचे पुरस्कर्ते, कुशल नेते, बुध्दीवंत, थोर शिक्षणतज्ञ होते. अशा या थोर महामानवाचा आधुनिक भारताच्या निर्मीतीत फार मोठा वाटा आहे. त्यांचे कार्य संपूर्ण समाज स्मरणात ठेवेल असे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची तळमळ हि दीन-दलितांचा विकास करण्याची होती. समाजात असलेली विसंगती दूर करुन सामाजिक सलोखा त्यांना निर्माण करावयाचा होता. मग तो विचार राष्ट्रवाद, लोकशाही, समाजवाद याबाबतीत असोत सर्वच क्षेत्रात मानवाच्या विकासाच्या दृष्टीने भारतास आधुनिक काळात विकासाच्या स्तंभावर पोहचविणारे होते. त्यांनी आयुष्यभर विषमता नष्ट करण्यासाठी संघर्ष केला. सामाजिक क्षेत्रात न्याय, समता आणि शोषणमुक्ती आणण्यासाठी त्यांच्या राजकीय लोकशाहीचे कार्य असल्याचे त्यांच्या विचारधनातून स्पष्ट होते. त्यांनी राजकीय मूल्यांपेक्षा सामाजिक व नैतीक मूल्यांना अधिक महत्व दिले. कारण त्याशिवाय समाजाचा सर्वांगिण विकास होणार नाही याची त्यांना जाणीव होती. राजसत्तेला आणि तिच्या समाजवादी धोरणाला नैतीक व सामजिक संदर्भ असणे त्यांना आवश्यक वाटते. कालबाह्य झालेल्या सामाजिक, आर्थिक, संरचना मोडून काढण्याचे कार्य घटनात्मक मार्ग त्यांनी दाखविले. देशातील जनतेचा विश्वास साधणे हे त्यांचे मुळ ध्येय होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना निशस्त्र क्रांतीचा नेता म्हटले जाते. पिपल्स एज्युकेशन संस्थेची स्थापना केली आणि शिक्षण हे महत्वाचे साधन सांगून पहिले पाऊल त्यांनी टाकले. आज मुंबई येथे सिध्दार्थ महाविद्यालय, औरंगाबाद व नागसेनवन येथे मिलींद महाविद्यालय शिक्षण देण्याचे कार्य करीत आहे. अस्पृश्यांच्या उध्दाराची चळवळ उभारुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लाखो बांधवांना मानवमुक्तीचा नवा कृतीशील मार्ग दाखविला.

**संदर्भ**


१. डॉ. भोळे भा.ल. - भारतीय राजकीय विचारवंत, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
२. डॉ. देवरे पी.डी. - भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.
३. डॉ. पाटील वा.भा. - भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.
४. कुलकर्णी बी.वाय. - भारतीय राजकीय विचारवंत, विद्याभारती प्रकाशन, लातुर.
५. डॉ. कळंबे दिनकर - भारतीय राजकीय विचारवंत, कैलास पब्लीकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद.
६. कुलकर्णी बी.वाय., नाईकवाडे अशोक - भारतीय राजकीय विचारवंत, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.
७. पाटील बी.बी. - भारतीय राजकीय विचारवंत, फडके प्रकाशन, कोल्हापुर.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्र उभारणीतील योगदान

**– प्रा. डॉ. रविंद्र दगडू वाघ**
सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख
एस.एस.व्ही.पी.एस. कला व वाणिज्य महाविद्यालय, देवपूर, धुळे

**प्रस्तावना**

आधुनिक भारताच्या जडणघडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. दलित व स्त्रीयांना त्यांचे न्यायहक्क मिळवून देण्यासाठी, त्यांची अस्मिता जागृत करण्यासाठी ते आयुष्यभर झटले. सामाजिक परिवर्तन आणि समाजसुधारणाचे कार्य करीत असतांना भारतीय राष्ट्रीय ऐक्य तसेच या देशातील लोकशाहीला धोका पोहचणार नाही याची त्यांनी सतत काळजी घेतलेली दिसून येते. अर्थशास्त्र, तत्वज्ञ राज्यशास्त्र, धर्मशास्त्र, कायदा इतिहास, समाजशास्त्र इ. विविध विषयात त्यांचा व्यासंग होता. त्यांचे जीवन म्हणजे अखंड व निष्ठापूर्वक चाललेले ज्ञान साधना होती. भारतीय समाजाच्या पुनरूत्थानात आणि सामाजिक पुनर्ररनेत वा सामाजिक परिवर्तनात तसेच सामाजिक राजकिय, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रात डॉ. आंबेडकरांचे फार मोठे योगदान लाभलेले आहे. किंबहुना राष्ट्राच्या जडणघडणीत, राष्ट्रबांधणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य व सहभाग मोलाचा आहे. मानवतावादाचे युग प्रवर्तक डॉ. आंबेडकरांचे कार्य, विचार राष्ट्र उभारणीत मोठे मोलाचे आहे.

**शोध निबंधाचा उद्देश**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक विचारांचा अभ्यास करणे.
२. राष्ट्र बांधणीची संकल्पना विचारात घेऊन डॉ. आंबेडकरांचे राष्ट्रउभारणीतील योगदान स्पष्ट करणे.
३. डॉ. आंबेडकरांचे स्त्री विषयक विचारांची मांडणी करणे.
४. डॉ. आंबेडकरांनी केलेल्या घटनात्मक तरतुदींचा आढावा घेणे.
५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही विषयक विचारांची माहिती करून घेणे.

आधुनिक काळामध्ये एका विशिष्ट भौगोलिक प्रदेशात राहणाऱ्या लोकामध्ये आपण एक आहोत अशी भावना असेल तर ते राष्ट्र होऊ शकते. म्हणून आपल्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक पंरपराचे भान ठेवून त्या परंपराचे सातत्य (जतन) राजकीय दृष्टीने म्हणजे राज्याच्या चौकटीत टिकवून ठेवणारा व विशिष्ट भौगोलिक प्रदेशनिष्ठा मनात बाळगणारा समाज म्हणजे राष्ट्र होय. आधुनिक काळात राष्ट्र होण्यासाठी तेथील समाजामध्ये केवळ ऐक्यभाव असला पाहिजे. हाच घटक राष्ट्र होण्यासाठी महत्त्वाचा मानला जातो. समाज घटकांमध्ये आपण एक आहोत आणि एक राहु अशी भावना असेल तर त्या भावणेमुळेच ते एक राष्ट्र बनते. थोडक्यात एखादया समाजामध्ये समानधर्म, समानभाषा, समान इतिहास, समानवंश आहे किंवा नाही यापेक्षा आम्ही सगळे एक आहोत आणि एक राष्ट्र म्हणुन जगण्याची आमच्यात हिंमत आहे ही भावना राष्ट्र होण्यासाठी आवश्यक आहे.

**राष्ट्र बांधणीची संकल्पना**

राष्ट्रबांधणी ही मानवी विकासातील एक प्रक्रिया आहे. प्राचीन काळापासून म्हणजेच प्राथमिक अवस्थेपासून वेगवेगळया अवस्थांमध्ये आपल्या गरजांची पूर्तता करण्यासाठी मानवाने राज्य आणि राष्ट्र या संस्था निर्माण केल्या. मानवी समाजाच्या विकासाच्या प्रक्रियेमध्ये सामाजिक विभेदन, आकारास आले. आपली भाषा, प्रदेश, धर्म, वंश, जात, संस्कृती इ. इतरांपेक्षा वेगळी आहेत अशी भावना काही समूहांमध्ये निर्माण झाली. जेव्हा विशिष्ठ मानवी समुहाची निष्ठा, धर्म, प्रदेश, भाषा, संस्कृती इ. वरील घटकांवर केंद्रित झालेली असते तेव्हा तो समाज स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्यासाठी अथवा टिकविण्यासाठी एकत्रित प्रयत्न करतो. तेव्हा राष्ट्र बांधणीची प्रक्रिया सुरू होते. राष्ट्र बांधणीपूर्वी त्या समाजात राष्ट्रीय भावना निर्माण झालेली असते. आपण एक आहोत अशी भावना व त्या एकत्वाशी बांधिलकी मानण्याच्या भावनेतून राष्ट्र अस्तित्वात येते. राष्ट्राचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करणे व ते टिकविण्यासाठी काही सामुहिक संघटित प्रयत्न करणे म्हणजे राष्ट्र बांधणीची प्रक्रिया सुरू होणे होय.

भारतात अनेक भाषा, वेगवेगळे प्रदेश, चारहजारापेक्षा जास्त जाती, उपजाती, विविध, धर्म, पंथ, वंश आणि संस्कतीची विविधता आहे त्यामुळे काही समुहांमध्ये वेगळेपणा किंवा अलिप्तता दिसून येते अशा परिस्थितीमध्ये मानव समूहामध्ये धर्म, जात, प्रांत वंश इ. घटकांमुळे निर्माण झालेल्या वेगळेपणाच्या जाणिवा या विशिष्ठ मर्यादे बाहेर जाऊ न देणे हे आवश्यकत ठरते. उलट धर्म, जात, भाषा यांच्या संकुचित भिंती ओलांडून त्यांच्या प्रती असलेल्या निष्ठा या दुय्यम मानुन भारत राष्ट्र या एकाच व्यापक घटकांशी त्यांची निष्ठा आणि बांधिलकी कायम स्वरूपी टिकविणे हेच प्रधान उद्दिष्ठ असले पाहिजे. अर्थातच त्यासाठी धर्म, जात, पंथ, भाषा किंवा तत्सम घटकांमूळे भिन्न-भिन्न समूहातील संघर्षात्मक आंतरक्रिया टाळून त्यांच्यात ऐक्यभावना वाढिस लावणारी प्रक्रिया म्हणजे राष्ट्र बांधणी होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी याच राष्ट्र उभारणीची पराकाष्ठा केलेली आहे. यासाठी डॉ. आंबेडकरांनी आपले संपूर्ण जीवन राष्ट्रप्रती समर्पित केले. राष्ट्रबांधणीच्या या प्रक्रियेत राष्ट्रातील लोक, त्याच्या मध्ये असलेली विविधता, समाजात असलेली सामाजिक विषमता दूर करणे आणि सामाजिक न्याय-स्वातंत्र्य, बंधुत्व, सामाजिक समता निर्माण करणे समाजाचा आकृतिबंध तयार करणे यावर विशेष भर दिलेला आहे. व समाजाच्या मागासलेपणा दूर करण्यासाठी विशेष प्रयत्न केलेले आहेत. भारता सारख्या बहुभाषिक, प्रादेशिक, धार्मिक, सांस्कृतिक विविधता असलेल्या समाजात राष्ट्रबांधणीचे अत्यंत अवघड काम आपल्या विचारातून प्रत्यक्ष कृतीतून

डॉ. आंबेडकरांनी केलेले आहे.

**१. राष्ट्र आणि राष्ट्रवाद**

डॉ. आंबेडकरांच्या मते आपण राष्ट्र आहोत. बंधुभावाच्या तत्वाचे महत्त्व आपण अदयापी ओळखले नाही. आपण सारे भाऊ-भाऊ एका कुटुंबातील आहोत, एक आहोत ही भावना सामाजिक जीवनात ऐक्य आणि संघटना निर्माण करते. भारतात अनेक जाती असून त्या राष्ट्रा विरोधी आहेत. त्याच्यामुळे सामाजिक जीवनाची फारकत होते पण अपणास खरे-खरे राष्ट्र व्हायचे असेल तर हे अडथळे आपण नाहिसे केले पाहिजे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात समता आणि बंधुभाव प्रस्तापित झाला पाहिजे. तर देशाचे कल्याण व स्वातंत्र्याचे आणि लोकशाहीच्या घटनेचे संरक्षण होणार आहे. राष्ट्रवाद ही एक व्यक्तिनिष्ठ भावना असून तिचा संबंध मानवी मनाशी आहे. राष्ट्राचे सामाजिक व राजकीय ऐक्य त्यांना अत्यंत मोलाचे वाटत होते. जातीयता हा राष्ट्रीय ऐक्याचा वाटचालीतील प्रमुख अडसर असून जातीयतेमुळे देश सामाजिक व राष्ट्रीय दृष्ट्या दुर्बल बनला आहे. असे त्यांना नमुद केले आहे. सार्वाजनिक वृत्तीला जातीयतेने ठार मारले असून सार्वजनिक सहदयता, नितिमत्ता, औदार्य या जाती भावनेने जखडून टाकली आहेत. ही जातीयता राष्ट्र वादाच्या विकासाआड येते असे विचार त्यांनी मांडले. त्याच्यामते राष्ट्रीयत्व म्हणजे जातीय भावनेचा अभाव जात वर्ण आणि संप्रदाय या शिवाय सामाजिक बंधूता प्रत्यक्षात आणते आणि समाजात सुसंवाद निर्माण करणे म्हणजेच राष्ट्रवाद होय. भारत हे एक बहुभाषिक राष्ट्र आहे त्यामुळे राष्ट्र ऐक्य व राष्ट्रवाद यांचा समान भाषा हा मुख्य आधार ठरू शकतो असे त्यांना वाटत होते. पूर्वग्रहदुषित, अमानुष, आक्रमक आणि असहिष्णु असा राष्ट्रवाद त्यांना नको होता. राष्ट्रवादात धर्म, जात, प्रदेश, वंश आणि प्रादेशिक देश भक्तिच्या सरहद्दीवर थांबू नये असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खरे राष्ट्रवादी होते हे त्यांच्या कार्यावरून व त्यांनी मांडलेल्या विचारावरून स्पष्ट होते. त्यांनी आपल्या सार्वजनिक जीवनाच्या सुरूवातीला सामाजिक प्रश्नास अग्रस्थान दिले होते. अस्पृश्यता नष्ट झाली पाहिजे, अस्पृश्यांचा प्रश्न सोडविला पाहिजे. त्यांची सर्वांगीण प्रगती घडवून आणाली पाहिजे ही त्यांची ठाम भूमिका होती म्हणून ते भारतीय नेत्यांना सवाल करीत की, च्आम्हाला ही स्वराज्य पाहिजे; पण स्वराज्यात आमचे अस्पृश्य, दलित वर्गाचे स्थान काय राहणार?छ असा त्यांचा उघड स्पष्ट सवाल होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इंग्रजी राजवटीविरूद्ध, इंग्रज राज्यकर्त्यांविरूद्ध अनेक प्रसंगी स्पष्ट भूमिका घेतल्या आहेत. त्यादृष्टीने त्यांचे महाड परिषदेतील (१९२७ मार्च) भाषण, नागपूर येथील दलित अधिवेशनातील भाषण (१९३०), लंडन गोलमेज परिषदेतील भाषणे (१९३०-३२) व इतर अनेक ठिकाणच्या सभां मधील भाषणां मधून त्यांनी इंग्रज राज्यकर्त्यांविरुद्ध आपले विचार मांडलेली आहेत. त्यावरून ते इंग्रजी धार्मिणे नव्हते हे स्पष्ट दिसेल.

**२. लोकशाही**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर खरे लोकशाही वादी होते. डॉ. आंबेडकरांनी लोकशाहीत संविधानात कायदा आणि घटनात्मक नितिमत्तेला विशेष प्राधान्य दिले आहे. भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणून त्यांनी लोकशाही तत्त्वप्रणालीवर आधारलेली घटना तयार केली. घटनेच्या समारोपाच्या भाषणात ते म्हणाले, च्घटना कितीही चांगली असली तरी त्याची अंमलबजावणी कोण करतो, कशी होते यावर तिचे यश अवलंबून आहेछ या दृष्टीने त्यांचे पुण्यात पुणे जिल्हा कोर्टात वकिलांच्यासाठी घ्संसदीय लोकशाहीङ वर मूलगामी स्वरूपाचे भाषण झाले. त्यात त्यांनी लोकशाहीच्या यशासाठी काय काय पाहिजे, हे सांगितले. भारतीय लोकशाहीच्या यशाच्या दृष्टीने त्यांचे विचार मोलाचे व सतत चिंतन करण्यासारखे आहेत.

डॉ. आंबेडकर सुरूवातीलाच लोकशाहीची आपली व्याख्या सांगतात. ''...लोकशाहीची व्याख्या, राज्यशास्त्रवेत्ते, लेखक, समाजशास्त्रज्ञ आणि इतर अनेक लोकांनी आपल्यापरीने केलेली आहे. यात चर्चेवर आधारलेली शासनपद्धती अशी लोकशाहीची व्याख्या वॉल्टर बेगहोटने केली आहे.''

अब्राहम लिंकनने लोकशाहीची व्याख्या ''लोकांचे सरकार, लोकांनी नियुक्त केलेले सरकार, लोकांकरिता (राबणारे) सरकार अशी केली आहे.''

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, ''लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतीकारक बदल, रक्तविहित मार्गांनी घडवून आणणारी शासनपद्धती म्हणजे लोकशाही होय.'' ज्या शासनपद्धतीमूळे सत्तारूढ मंडळींला सामाजिक व आर्थिक क्षेत्रात मूलभूत बदल करता येतात आणि तसे बदल करतांना जनता रक्तमय (हिंसात्मक) मार्गाचा अवलंब करीत नाही; तेथे लोकशाही नांदते. हीच खरी लोकशाहीची कसोटी आहे... लोकशाहीच्या यशासाठी, सिद्धीसाठी आवश्यक गोष्टींचा, अटींचा विचार खालील प्रमाणे करता येईल.

लोकशाही यशस्वी व्हायची असेल तर प्रथम समाज व्यवस्थेत विषमता नसली पाहिजे. पिडीत-दडपलेला वर्ग समाजात असता कामा नये. सर्व हक्क व सत्तेचे केंद्रीकरण ज्यांच्या ढायी झाले आहे, असा एक वर्ग एका बाजूला व सर्व प्रकारचे भार-ओझी वाहण्याचे काम करणारा वर्ग दुसऱ्या बाजूला अशी विभागणी असता कामा नये. अशी विषमता, अशी अन्यायकारक विभागणी व त्यावर आधारलेली समाजरचना यामध्ये हिंसात्मक क्रांतीची बीजे असतात आणि मग त्यांचे परिमार्जन करणे, नष्ट करणे, लोकशाहीला अशक्य होते. डॉ. आंबेडकरांच्या मते वर्गावर्गामधील जे महद अंतर आहे, वर्ग संघर्ष आहेत, ते लोकशाहीच्या यशसिद्धीच्या मार्गातील सर्वात मोठे अडसर आहेत.

लोकशाहीत पीडीत, दलित ज्यांचे हक्क हिरावून घेतलेले असतात असे हे भार ओझी वाहणारे लोक व सर्व हक्कांच्या समुच्चय स्वत:जवळ केंद्रीत केलेले आहेत असे मातब्बर वर्ग अशा दोन वर्गांतील अंतर वाढेल आणि हे अंतर लोकशाहीच्या नाशास कारणभूत होऊन, भलत्याच राज्यपद्धतीला जन्म देईल म्हणून डॉ. आंबेडकर म्हणतात की, ''लोकशाहीच्या अपयशाचे कारण सामाजिक, विषमता, वगावर्गातील उभी असलेली विषमतेची दरी हेच आहे.''

**३. हिंदू कोडबील**

स्वातंत्र्य, समता, बंधुता ही आपल्या राज्यघटनेचे आधारस्तंभ आहेत. डॉ. आंबेडकरांचे महिला विषयक समस्यांचे आकलन व विचार अभ्यासपूर्ण आहेत. त्यांच्या मते हिंदू कोड बीड एक महत्त्वपूर्ण घटना

होती. हिंदू समाजातील वर्गावर्गातील उच्च-नीच भेद व लिंगभेदावर आधारीत समाज रचना अस्तित्वात होती पुरूषसत्तात्मक समाजात भारतीय स्त्री विवाह, घटस्फोट, वारसा हक्क इ. संदर्भात रूढी-परंपरेनुसार जातीच्या कायदयांती बांधलेली होती. भारतीय समाजात स्त्रीयांना स्वातंत्र्य शिक्षण, समान न्याय-अधिकार प्राप्त व्हावे यासाठी डॉ. आंबेडकरांनी हिंदू कोड बिलासाठी संघर्ष केला. त्यासाठी त्यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला. स्त्री मूक्ती ही केवळ आर्थिक परिस्थिती सुधारून होणार नाही तर भारतातील सम्यक क्रांती ही आर्थिक परिवर्तना बरोबरच प्राधान्याने जाती व्यवस्था अंत व लिंगभेद नष्ट करणारी असेल असे सुतोवाच व प्रतिपादन केले.

हिंदू कोड बीलाचे निरनिराळे भाग करून व त्यात फेरफार करून नवीन चार कायदे मंजूर करण्यात आले यात डॉ. आंबेडकरांची भूमिका व योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. डॉ. आंबेडकरांनी स्त्रीयांना समाजात स्वातंत्र्य, समानता व प्रतिष्ठा प्राप्त व्हावी, स्त्रीयांच्या समाजातील दर्जाला संरक्षण अनुच्छेद १४,१५,१६ अन्वये स्त्री संदर्भात मुलभूत हक्क मिळवून देण्याची तरतुद केली. साहजिकच स्त्रीयांना समाजात समान वागणूक मिळावी, त्यांचे न्याय हक्क प्राप्त व्हावे अशी त्यांची विचारधारा होती. स्त्री शोषणाला त्यांनी कडाडून विरोध केला. डॉ. आंबेडकरांचे विचारसूत्र व कार्यसूत्र मुलतः मानवी हक्कावर व स्त्री-पुरूष समानते वर आधारीत होते. स्त्री मुक्ती व कल्याणासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.

**४. सामाजिक विचार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक कार्याचे संघटनात्मक पहिले पाऊल बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना होय. डॉ. आंबेडकराच्या सामाजिक चिंतनामध्ये वर्ग व्यवस्था आणि जाती व्यवस्था यांची कठोर चिकित्सा दिसून येते ही चिकित्सा करतांना त्यांना वर्ण व्यवस्था आणि जाती व्यवस्थेचे मुळ उगमस्थान शोधण्याचा प्रयत्न केला आहे. या संदर्भात त्यांनी 'शुद्र कोण होते?' हा ग्रंथ तसेच 'मुकनायक' आणि 'बहिष्कृत भारत' या वृत्तपत्रातील लेख अत्यंत मौलिक आहेत. 'मुकनायक' या वृत्तपत्राच्या पहिल्याच अंकात त्यांनी हिंदू समाजातील सामाजिक विषमतेचे स्वरूप स्पष्ट केले आहे. त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, ''हिंदूस्थान हा देश म्हणजे केवळ विषमतेचे माहेरघर आहे. हिंदु समाज हा एक मनोरा आहे. एक एक जात म्हणजे त्यांचा एक मजला आहे, पण लक्षात ठेवण्यासारखी बाब म्हणजे या मनोऱ्यास शिडी नाही एक मजल्यावरीन दूसऱ्या मजल्यावर जाण्यास त्यात मार्ग ठेवलेला नाही. ज्या मजल्यात त्यांनी जन्मावे, त्यांनी त्याच मजल्यात मरावे. सामाजिक सुधारणांना अग्रक्रम दिला पाहिजे त्याचबरोबर अस्पृश्यांनीही आपल्यातील अनिष्ठ चालीरीति, रूढी मोडून आपल्या प्रगतिसाठी अंतर्गत सामाजिक सुधारणा केल्या पाहिजेत अशी भूमिका त्यांनी मांडली माणूसकीचे हक्क मिळविण्यासाठी तसेच सामाजिक समतेसाठी त्यांनी लढा पुकारला होता.'' थोडक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक क्रांतिचे अग्रदूत म्हणून ओळखले जातात.

डॉ. आंबेडकरांच्या विचारांना मानवतावादी तत्त्वज्ञानाची किनार होती. रूढी परंपरेच्या कचाटयातून भारतीयांचे मन मुक्त करणे, सामाजिक संबंधाचे मानवी मुल्यांच्या आधारे पुर्नउभारणी करणे. बुद्धी प्रामाण्यवाद व प्रत्यक्षवादाचा आधार घेऊन विज्ञानवादी दृष्टीकोन निर्माण करण्याचे कार्य तसेच मानवी प्रतिष्ठेवर निष्ठा ठेवून मानव कल्याणाचा मार्ग शोधण्याचे महान कार्य डॉ. आंबेडकरांनी केले.

**सारांश**

वरील अभ्यासाअंती असे लक्षात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ भारतालाच नव्हेतर संपूर्ण विश्वाला मानवतावादाची शिकवण दिली आहे.

१. मानव हाच त्यांच्या चिंतनाचा उत्कर्षाचा केंद्रबिंदु आहे.
२. लोकशाहीला पुरक विचार त्यांनी मांडला असून राष्ट्रवाद, सामाजिक समता-बंधुत्व मानवी मुल्यांची कास व संवर्धन करण्याचे कार्य त्यांनी केले.
३. मानवी हक्क, संरक्षणास त्यांनी प्राधान्य दिले असून जाती निर्मुलनासाठी त्यांचे योगदान मोलाचे आहे.
४. सहिष्णूता, सामाजिक ऐक्य, सामाजिक न्याय समरसता निर्माण करण्यावर त्यांनी विशेष भर दिला आहे.
५. स्त्रीयां आणि अस्पृश्याना, समान संधी, सामाजिक न्याय हक्क प्रदान करून समतेचा पुरस्कार करून समाजवादी दृष्टीकोन त्यांनी मांडला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कृती कार्याचे, विचार, सिद्धांताचे मूल्यमापन केले असता, ते खरे राष्ट्रवादी होते असे म्हणावे लागेल. अस्पृश्य आणि स्त्रीयांचे प्रश्न राष्ट्रीय प्रश्न म्हणून मानले ते सोडविण्यासाठी पावले उचलली त्यामुळे त्यांचे हे खरेखुरे राष्ट्रकार्य - राष्ट्रवादी कार्यच आहे हे समजून घेतले पाहिजे. तत्वासाठी लढणारे ते विचारक होते. राष्ट्राप्रती त्यांची भूमिका- अभिमान, निष्ठा व अस्मिता आपण सारे एक आहोत एक राष्ट्र म्हणून जगण्याची हिंमत त्यांच्यात दिसून येते ही राष्ट्रीय भावना राष्ट्र ऐक्यासाठी महत्वाची आहे. त्यांचे मौलिक विचार निश्चितच राष्ट्र उभारणीत मोलाचे ठरतात. सर्व देशाचे हित आणि उन्नती व्हावी अशी त्यांची धारणा होती.

**संदर्भ**

१. डॉ. फडके भालचंद्र - डॉ. आंबेडकर यांचे सामाजिक विचार
२. डॉ. भा. स. भोळे - आधुनिक भारतातील राजकिय विचार, पिंपळापूरे अँड पब्लिशर्स, नागपूर
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा - संपादनः शंकरराव खरात बार्टी, पुणे
४. आपटे ज. शं, रोडे पुष्पा - भारतातील महिला विकासाची वाटचाल, डायमंड पब्लिकेशन, पुणे
५. परदेशी प्रतिमा - डॉ. आंबेडकर आणि स्त्री मूक्ती, क्रांती सिंह नाना पाटील अकादमी
६. खैरमोडे चा. भा. डॉ. भिमराव रामजी आंबेडकर चरित्र (खंड-१ ते ९) महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक तत्वज्ञान

- सौ. सुनिता समाधान पाटील
धरणगांव, जि. जळगांव

**प्रस्तावना**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारानी एक नवी दृष्टी मिळाली. आंबेडकर हे पहिले असे महापूरुष होते ज्यांनी शिक्षण हे वाघीणीचे दूध असल्याचे अज्ञान अंधकारात असलेल्या, पिढ्यान पिढ्या पिडीत असलेल्या समाजाला पटवून दिले. शिक्षणाशिवाय कुठेही कोणत्याही माणसाला गत्यंतर नाही त्यांच्या चळवळीचा मुख्य उद्देश सर्व समाज शिक्षीत करणे व सर्वांना त्यांच्या हक्काची, कर्तव्याची जाणिव करुन देवून प्रवाहात आणणे हा होता. घ्उठा जागे व्हा आणि ध्येय प्राप्ती शिवाय थांबु नकाङ या संदेशाचा पाठपुरवठा करणारे थोर तत्वज्ञ, बुद्धीवादी समाजसुधारक डॉ बाबासाहेब आंबेडकर. त्यांच्या विचारावर भगवान बुद्ध, अमेरिकन तत्वज्ञ जॉन डूई, संत कबीर, राजश्री शाहू आणि महात्मा फूले यांच्या विचारधारेचा फार मोठा प्रभाव होता ते महात्मा फूलेना आपले गुरु मानत असत.

आधूनिक भारतातील सामाजिक व शैक्षणिक क्रांतीचे उद्गाते, दलितांचा मुफ्तीदाता, युगप्रवर्तक डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये जातियतेचे चटके सहन करत उच्चविद्या संपादन केली. डाँ आंबेडकरांचे संपूर्ण जीवन शिक्षणमय, ज्ञानमय होते जगात वास्तुनिर्मितीबाबत अनेक महापुरुष, राजेरजवाडे अजरामर झाले आहेत. आपले ऐश्वर्य दाखवण्यासाठी कुतुबुद्दीन ऐबक ने घ्कुतुबमिनारङ मुमताजमहल वरील प्रेमाचे प्रदर्शन करण्याकरिता शहाजहानने घ्ताजमहलङ बांधून अजराम झाले. कुणी मंदीरे, कुणी मस्जीदी तर कूणी चर्चच्या इमारती बा्ंधल्याया जगाच्या पाठीवर आंबेडकर अशी एकमेव व्यक्ती आहे की ज्यांनी घ्पुस्तकांकरीता राजगृहङ बांधले. पूस्तकांची सुरक्षितता रहावी म्हणून अनेक इमारतींचे बांधकाम नव्याने करवून घेतले. वाचाल तर वाचाल या उक्तीप्रमाणे वाचनाचे महत्व त्यांनी ओळखले.

**उद्दिष्ट्ये**

१) शिक्षणामुळे देशाची प्रगती होऊ शकते.
२) व्यक्तीचा व समाजाचा सर्वांगिण विकास होण्यासाठी शिक्षण खूप महत्त्वाचे आहे.
३) शिक्षणामुळे समानता येवून देश प्रगतीपथावर असतो.
४) शिक्षणाची उद्योगाशी जुळवणी केल्यास व्यक्तीजिवन समृध्द होवू शकते.
५) व्यक्तीच्या सर्वांगीन विकासाठी शिक्षण हे एकमेव साधन आहे.

**गृहीतके**

१) आंबेडकरांनी समाजाला प्रत्यक्ष कृतीतून साक्षर करण्याचे कार्य केले.
२) पिढयांन पिढ्या अंधकारात, मागासलेपणात असणाऱ्या लोकांना जर प्रेरणेतून शिक्षण दिले तर समाज जागृत होऊ शकतो हा विश्वास त्यांना होता.
३) आंबेडकरांना वाटे की, देशातील लोक अज्ञानाच्या अंधकारात खूप खोलवर मुळे रुजलेली आहेत. एकदा का शिक्षणातून त्यांच्यात आत्मविश्वास आला की, आपोआप त्यांना त्यांच्या हक्काची, कर्तव्याची जाणिव होईल.
४) शिक्षणाचा लाभ उच्च पासून समाजाच्या सर्व तळागळापर्यंत पोहचवायला हवा.
५) शिक्षणातून जातीभेद कमी होणे शक्य होते.
६) समाजातील हिंसक व अमानवीय घटना शिक्षणातून कमी होण्यास मदत होऊ शकते.

**आंबेडकरांचे शिक्षणविषय विचार**

शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा हा प्रखर नारा देणारे बुध्दीप्रामाण्यावादी डॉ. बाबासाहेब होते. समाजातील प्रत्येक तळागळातील लोकांना शिक्षण घ्यावे व स्वत:ची प्रगती स्वत: करावी, कर्मकांडाच्या जोखाडाखाली न राहता शिक्षणाची कास धरावी, स्व-भानासाठी शिक्षण हे फार मोठे मोलाचे हत्यार आहे हे समजवून देण्याचे महत्त्वाचे कार्य आंबेडकरांनी केले. शिक्षण म्हणजे ज्ञान, परिवर्तन, अस्तीत्व, मागासलेपण दुर करण्याचे प्रभावी साधन इतकेच नव्हे तर सामाजिक विषमता नष्ठ करुन समृध्द समाजव्यवस्थेची मुहूर्तमेढ रोवण्याकरिता प्रथम क्रांतीची मशाल बनून नंतर ते शिक्षण सामाजिकतेला पथप्रदर्शक दिपस्तंभ ठरणे होय.

फक्त वही पेन म्हणजे शिक्षण नव्हे तर बुध्दीला सत्याकडे, भावनेला माणूसकीकडे, शरीराला श्रमाकडे नेण्याचा मार्ग म्हणजे शिक्षण. जसे जेवल्यावर होणारे समाधान हे तात्पूरते असते या उलट शिक्षणातून मिळणारी ज्ञानाची शिदोरी आयुष्यभर पुरते. पोटाची भुक भागवायचीच पण एक पाऊन पुढे टाकुन शिक्षण घेऊन माणसाने बुध्दीची भुक भागवावी असे त्यांचे मत होते. शिक्षणाशिवाय जगात कोणत्याच माणसाची प्रगती होणे शक्य नाही हे त्यांना माहित होते. ते म्हणतात, ''जसा माणूस उपासमारीने अशक्त होऊन अल्पायुषी होतो तसा तो शिक्षण अभावी जिवंतपणे दूसऱ्याचा गुलाम होतो.'' प्लेटोनेही त्याच्या लॉज नामक ग्रंथात असेच उद्गार काढले आहे की, ''मनुष्य हा निसर्गनिर्मित सर्वश्रेष्ठ आहे, पण त्याला शिक्षणाची फार मोठी गरज आहे. त्याला जर शिक्षण मिळाले नाही, तर तो सर्वात जास्त रानटी प्राणी बनेल.''

शिक्षणात आंबडेकरांनी शील, चारित्र्याला अधिक महत्त्व दिले आहे. त्याच्यांमते शिक्षणात मुल्य, संस्कारांना विशेष महत्त्व आहे. शिलाशिवाय विद्या फूकाची आहे कारण विद्या एक शस्त्र आहे. एखाद्याजवळ विद्येचे शस्त्र असेल पण तो शिलवाण नसेल तर विद्येच्या

शस्त्राने तो दुसऱ्याचा घात करेल याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे आज जे स्त्रीलिंगी गर्भाचे गर्भपात होतात ते देता येईल. गर्भपात करणाऱ्यांमध्ये सुशिक्षित शहरी लोकांचे प्रमाण अधिक आहे. म्हणुन विद्या ही एखाद्या तलवारी सारखी असते. ती कशी चालवायची हे सर्वस्व चालकावर निर्भर असते. तलवारीने एखादा माणुस दुसऱ्याचा खुन करेल किंवा त्याच तलवारीने एखाद्याचा प्राण वाचवेल. जर एक शिक्षित व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीचे शोषण करत असेल, तर त्याचा शिक्षणाचा काहीही उपयोग नाही. म्हणुन सर्वांनी चारित्र्ययुक्त शिक्षण घ्यावे. दिव्याने दिवा लागत गेला की एक मोठी दिपमाळ तयार होईल आणि या दिपमाळेतुन संपुर्ण देश उजळुन निघेल असा त्यांचा ठाम विश्वास होता.

जनसंघटनासाठी १९२४ मध्ये दलितांच्या उध्दारासाठी आंबेडकरांनी 'बहिष्कृत हितकरीणी सभे'ची स्थापना केली. ही संघटना स्थापनेवेळी गुलामांना त्यांच्या गुलामिची जाणीव करुन द्या. म्हणजे ते आपोआप बंड करतील असे उद्गार काढले. दलीत वर्गाला विविध माध्यमाने कामे देवून आर्थिक स्थिती सुधारणे, शिक्षण देणे, मानवी हक्क संरक्षण हे या सभेची उद्दिष्टये होती. या संघटनेचे ब्रिदवाक्यातूनच मोठी प्रेरणा मिळत असे. आपले विचार जनसामान्यापर्यंत पोहचवण्यासाठी त्यांनी मुकनायक, बहिष्कृत भारत, जनता ही वृत्तपत्रे चालवली अनेक समाजकेंद्रे, अभ्यासमंडळे उघडून शिक्षणाच्या प्रचार व प्रसाराचे कार्य केले. १९२८ मध्ये दलित शिक्षण संस्थेची स्थापना केली तसेच १९२८ मध्ये आलेल्या सायमन कमीशनसमोर भारतातील दरिद्री लोकांची करुण कहाणी वाचली तसेच वयात आलेल्या सर्व स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार देण्यात यावा ही मागणी केली.

दलित लोकांमध्ये आत्मजागृती झाल्याशिवाय अन्यायनिवारण होणार नाही अशी त्यांना पूर्ण कल्पना होती. म्हणून दलित समाजाला संघटीत करुन अन्यायाविरुद्ध लढा देण्यासाठी त्यांनी प्रवृत्त केले. १९२७ मध्ये महाडचा मुक्तीसंग्राम, १९३० मध्ये काळाराम कंदीर प्रवेश असे विधायक कार्य केले. शिक्षणातून माणसे निर्माण झाली पाहिजे. माणसाला माणसासारखे वागण्यासाठी दिले जाणारे शिक्षण त्यांना मान्य होते. शिक्षणातून विधायक कार्य घडणे त्यांना अपेक्षीत होते. शिक्षणाशिवाय समाजाची कल्पना करणे अशक्य आहे हे त्यांनी लोकांना पटवून दिले अनेक मुलांना शिकण्यासाठी आर्थिक सहाय्य केले, वसतीगृह वाचनालये सुरु केले.

सामाजिक आर्थिक समतेची जोड मिळाल्याशिवाय राजकीय स्वातंत्र्याला भक्कमपणा येणार नाही असे त्यांना वाटत म्हणून त्यांनी समाजात जागृती करणे, समाजाला संघटीत करणे, अस्पृश्यांच्या हक्कांना मान्यता मिळवण्यासाठी वातावरण निर्माण करणे, संघर्ष करणे, दलित, पददलित उपेक्षीतांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे इत्यादी कार्यक्रमांवर भर दिला. अनेक विषयांवर लिखाण केले. शिक्षण हेच खरे उन्नतीचे साधन आहे म्हणून आपल्या अनुयायांना निक्षून सांगितले. शिक्षणाचे त्यांना एवढे वेड होतं की आपल्या संग्रही पुस्तकांकरिता एक स्वतंत्र राजगृह उभे केले. त्यांच्याकडून शिक्षण या विषयावर स्वतंत्र ग्रंथाची निर्मिती न होणे ही शिक्षणाच्या प्रांतात फार मोठी उणीव राहीलेली आहे.

केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण नाही. शिक्षण ही केवळ वाचन करण्याची गोष्ट नसून समजून घेण्याची गोष्ट आहे. असे ते मानत. सर्व समाज साक्षर असू शकतो परंतू सुस्कृंत असेलच असे नाही. म्हणून आतून शिक्षित होण्याची गरज असे ते मानतात. शिक्षणाचा संबंध हा परिवर्तनाशी असतो. परिवर्तन हा जीवनाचा नियम आणि या परिवर्तनानुसार शिक्षण ही बदलते असावे. डॉ आंबेडकर प्रख्यात तत्वज्ञ होते. त्यांच्यात असलेल्या तत्वज्ञानाची पाळेमुळे त्यांच्या तत्वज्ञानात असल्याचे दिसते. शिक्षण आणि मानव यांचा संबंध त्यांच्या जन्मापासून असतो. ते म्हणतात, ज्याप्रमाणे माणूस जगावयाचा असल्यास त्याला अन्नाची गरज असते तसेच विद्याचीही आवश्यकता आहे. ज्ञानाशिवाय तो काय करु शकेल? त्यांच्यामते प्रत्येक माणसात काही सुप्त व उपजत गुण नसून ते स्वकतृत्वाने मिळवावे लागतात. त्यासाठी शिकत राहणे हाच एक रामबाण उपाय आहे.

युगप्रवर्तक डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आधी केले मग सांगितले या उक्तीप्रमाणे आपला आदर्श लोकांसमोर ठेवला. स्वत: एल.एल.बी, पी.एच.डी, डी.लिट अशा कितीतरी पदव्या घेतल्या व शिक्षण याच राजमार्गाने शेतकरी, दलित, उपेक्षीत यांचा विकास होऊ शकतो हे ओळखून त्यांना शिक्षणाचा राजमार्ग सांगितला. तसेच राज्यघटनेतून तशी अंमलबजावणी करण्यास भाग पाडले. सर्वांना शिक्षण मिळावे असा त्यांचा आग्रह होता अशाच उदात्त हेतूने प्रीत होऊन केंद्र सरकारने २००२ च्या ८२ व्या घटनादुरुस्तीने कलम २१(अ) मध्ये व कलम ४५ मध्ये शिक्षणाच्या मुलभूत अधिकारांचा समावेश केला आहे. त्यानुसार ६ ते १४ वयोगटातील मुला-मुलींना सक्तीचे व मोफत शिक्षण देणे हा भारत सरकारचा नियम तसेच मुलभूत कर्तव्यामध्येही टाकण्यात आले आहे.

वैचारीक क्षेत्रला बाबासाहेबांचे अमुल्य योगदान लाभले आहे. अर्थशास्त्र, धर्मशास्त्र, तत्वज्ञान, कायदा, समाजशास्त्र, इतिहास अशा विविध विषयांवर त्यांनी विपूल लेखण केले. राजकारणातही त्यांचे महत्व मोठ आहे. घ्भारतीय राज्यघटनेचे शिल्पकारङअशा शब्दात त्यांचा गौरव केला जातो आंबेडकरांनी भारताला लोकशाही प्रधान, स्वातंत्र्य, समता, बंधूता या तत्वावर आधारित राज्यघटना बहाल केली. ते एक तत्वज्ञ होते. बुद्ध ॲड हिज धम्म (१९५७) हा त्यांचा ग्रंथ त्यांच्या वैचारिक चिंतनाची साक्ष देतो. मानवी मुक्तीसाठी विवेक, स्वातंत्र्य, न्याय, समाजरचना आणि कल्याणकारी शासन याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली आणि या उद्दिष्टयप्राप्तीसाठी कठोर संघर्ष करण्याची निकड त्यांनी अधोरेखीत केली. डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक विचारआणि सामाजिक जागृतीचे विचार अन्यायाविरुध्द लढणा-या सर्वांनाच स्फूर्तिप्रद आणि मार्गदर्शक ठरतात.

**सारांश**

आबेंडकरांनी स्व:कृतीतून शिक्षणाचे महत्व पटवून दिल्याने अनेक वर्षापासून निद्रीस्त असलेला समाज जागी झाला. तळागाळातील प्रवाहापासून वंचीत राहीलेल्या लोकांना याबद्दलची जाणीव झाली. मुले-मुली शिक्षण घेवू लागले. शेतकरी, स्त्रीया, कामगार पददलीत अशा अनेक वर्गाला अज्ञानाच्या गर्त्यातून बाहेर काढण्याचे काम केले. प्रचंड लिखाण केले असे हे युगप्रवर्तक होते. विविध क्षेत्रातील त्यांच्या मौलीक कार्यामुळे भारतसरकारकडून भारतरत्न या सर्वोच्च नागरी

पुरस्काराने त्यांना गौरवण्यात आहे. त्यांचे कार्य इतिहासात अनेक दृष्टीने संस्मरणीय मानले जाते.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यातून दुर्बल समाजातील उपेक्षीत घटकाला त्यांचे हक्क कोणते? त्यांच्या विकासाच्या संधी कोणत्या? याची जाणीव झाली. या घटकाला त्यांनी प्रवाहात आणले. त्यासाठी शासन तसेच बिगर शासकीय पातळीवर प्रयत्न होतांना दिसत आहे. आंबेडकरांनी शिक्षणाबाबत जे धोरण, विचार मांडलेले आहेत ते सर्वांगीन, सर्वव्यापी विचार आहेत. त्यांना शोषणरहीत समाज अभिप्रेत होता. त्यांचे शिक्षण विषयक विचार चौफेर कृती घडवून आणणारे आहेत यात शंका नाही.

**निष्कर्ष**

१) शिक्षणात चारित्र्य संवर्धक मुल्याचा समावेश करण्यात आला आहे.

२) आजही शिक्षणातून दूर असणाऱ्या लहानांपासून मोठयांपर्यंत शिक्षण देण्यासाठी प्रवाहात आणण्यासाठी शासन तसेच विविध खाजगी संस्था प्रयत्नशील दिसतात.

३) शिक्षण हे दूधारी शस्त्र आहे. त्याचा वापर कसा करायचा याचे शिक्षण प्रत्यक्ष कृतीतून, सण-उत्सव, जयंत्या मधून दिले जाते.

४) माणसाने नेहमी माणसासारखे वागावे हा सिद्धांत.

५) भारतीय समाज आजही विषमताग्रस्त आहे. शिक्षणातून ही विषमता कमी होण्यास मदत होते.

६) शिक्षण प्रवाहाप्रमाणे बदलणारे आहे.

**संदर्भ**

१) डी वाय हाडेकर - डॉं आंबेडकरांचे शैक्षणिक विज्ञान, सुगावा प्रकाशन पुणे, आवृत्ती ऑगस्ट २००५ प्र.कृ. ३०,३१,३२,३८

२) संपादक सुहास कुलकर्णी, मिलिंद चंपानेरकर- यांनी घडवल सहस्रक, रोहन प्रकाशन आवृत्ती २००६ प्र.कृ २००

३) इयत्ता ११ वी- महाराष्ट्राचा इतिहास, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ-४११००४ प्र ७६

४) करियर अकॉडमी भारतीय विचारवंत व महाराष्ट्रातील समाजसुधारक- प्र कृ १७.

# दलित साहित्य : आंबेडकरी विचारांचे वाङ्मयीन रूप

– प्रा. डॉ. प्रकाश अर्जुन भामरे
मराठी विभाग प्रमुख
जी. टी. पाटील महाविद्यालय, नंदुरबार

विसाव्या शतकातील सांस्कृतिक संघर्षाचा 'महानायक' असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे वर्णन केले जाते. हजारो वर्षे स्वीकारल्या गेलेल्या विषमताधिष्ठित समाजव्यवस्थेविरूद्ध महायुद्ध म्हणजे डॉ.आंबेडकरांचे जीवन! बुद्धाचा धम्मविचार, कबीरांचा मानवतावाद आणि जोतिबा फुल्यांची बंडखोरी स्वीकारून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय इतिहासाचा एक विराट कालखंड आपल्या विचारांच्या आणि कर्तृत्वाच्या प्रकाशझोताने उजळून टाकला आहे. डॉ.आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली भारतातील दलित समाजाचे झालेले पुनरुत्थान हे भारताच्या आधुनिक इतिहासातील एक आधुनिक, सक्षम, धर्मनिरपेक्ष राष्ट्र म्हणून भारताच्या होत असलेल्या जडण-घडणीतील एक प्रभावी आणि परिवर्तनशील पर्व आहे. डॉ.आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित आणि प्रभावित होऊन मानवी अस्मितेसाठी आणि स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि सामाजिक न्याय या मूल्यांसाठी जी चळवळ दलित समाजाने उभारली आहे. ती अजून चालूच आहे. आणि समता, स्वातंत्र्य आणि सामाजिक न्यायावर अधिष्ठित समाजव्यवस्था भारतात प्रस्थापित होईपर्यंत ती चालूच राहील; यात शंका घेण्याचे कारण नाही. दलित साहित्य ह्या सामाजिक चळवळीचे अविभाज्य अंग बनले आहे. दलित साहित्य ह्या चळवळीचा एक वाङ्मयीन आविष्कार आहे. म्हणूनच दलित साहित्याला आंबेडकरी विचारांचे 'वाङ्मयीन रूप' मानले जाते.

भगवान गौतम बुद्ध म्हणाले होते, केवळ एखादी गोष्ट मी तुम्हाला सांगतो म्हणूनच ती सत्य असली पाहिजे असे तुम्ही मानू नका. ती गोष्ट तुमच्या विचारशक्तीला, तर्कशक्तीला पटत असेल; तरच तुम्ही ती स्वीकारा. नाहीतर तुम्ही ती खुशाल टाकून द्या. डॉ.आंबेडकरांचे हेच म्हणणे होते. ते म्हणत की, प्रत्येक मनुष्याला विचारस्वातंत्र्य आहे; आणि आपल्याला लाभलेल्या विचारस्वातंत्र्याचा उपयोग सत्याचा शोध घेण्यासाठी केला पाहिजे. सर्वच मानवतावादी विचारवंतांनी सत्याच्या शोधासाठी आपले आयुष्य खर्ची घातलेले आढळते. 'सत्य' हे एक मूल्य आहे. या मूल्याच्या पायावरच मानवी जीवन सुंदर करता येईल; असा सर्वच विचारवंतांचा दावा होता. मानवी जीवनातील असत्यांनी मानवाला कुरूप केलेले आहे. आंबेडकरी विचार या कौरूप्याचा निषेध करताना आढळतो.

डॉ.आंबेडकरांना व्यक्तिपूजेपेक्षा विचारांची पूजा महत्त्वाची वाटते. घटना परिषदेत भाषण करताना ते म्हणाले होते, भारतीय राजकारणात व्यक्तिपूजा किंवा भक्तीचा प्रभाव एवढा आहे की, इतर कोणत्याही देशातल्या राजकारणात अशी भक्ती व अशी व्यक्तिपूजा आढळत नाही. धर्मात भक्तिमार्ग हा मुक्तिमार्ग बनू शकतो; परंतु राजकारणात भक्तिमार्ग हा अध:पाताचा व पर्यायाने हुकूमशाहीचा मार्ग होतो. विभूतिपूजा ही भक्तांना नीतिभ्रष्ट करते, म्हणून ती देशाला मारक आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे की, कोणतेही तत्त्वज्ञान किंवा कोणताही विचार चिकित्सापूर्वक स्वीकारला पाहिजे. विभूतिपूजा विवेकवादाला नेहमीच घातक ठरलेली आहे; अशी इतिहासाची साक्ष आहे. विभूतिपूजा एकाधिकारशाहीला जन्म देते; तर विचारांची पूजा लोकशाही बळकट करीत असते. डॉ.आंबेडकर लोकशाहीचे महान उपासक होते हे तर सर्वश्रुत आहे.

दलित साहित्याच्या पाठीमागे जशी आंबेडकरांची प्रेरणा आहे; तशी बुद्धाचीही आहे. मात्र दलित साहित्यिकांसमोर बुद्ध हा अवतारी पुरुष म्हणून उभा नाही; तर तो बुद्ध सर्वंकष क्रांतीचा महामंत्र म्हणून उभा आहे. म्हणून दया पवार म्हणतात,

*तुला मी असे कधीच पाहात नाही*
*जेतवनात*
*डोळे मिटून बसलेला ध्यानस्थ पद्मासनातला*
*अथवा अजिंठा वेरूळच्या लेण्यांत*
*दगडी ओठ शिवलेला, शेवटची निद्रा घेत असलेला,*
*मी तुला पाहतो, चालताबोलता*
*दीन-दुबळ्यांच्या दु:खावर फुंकर घालणारा*
*जीवघेण्या काळोखात, हाती मशाल घेत*
*झोपडी-झोपडींकडे जाणारा संसर्गजन्य रोगासारखा*
*नरडीचा घोट घेणाऱ्या*
*दु:खाचे नवे अर्थ सांगणारा*

दलित कविता डॉ.आंबेडकर, भगवान बुद्ध आणि कार्ल मार्क्स यांच्यापासून प्रेरणा घेत असली तरी ती कधीच विभूतिपूजक बनत नाही. विभूतिपूजा ही विवेकवादाला मारक असते, हे दलित कवीला चांगलेच ठाऊक आहे. कारण विभूति येतात नि जातात. त्यांचा विचार समाजात रूजतो, वाढतो आणि त्यांना क्रांतिसन्मुख करीत राहतो. दलिता कविता ही क्रांतिसन्मुख आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानात स्वातंत्र्याला म्हणजेच व्यक्तिस्वातंत्र्याला अतिशय मोलाचे स्थान आहे. स्वातंत्र्य हे मानवाला उज्ज्वल करणारे मूल्य आहे. इतर सर्व मूल्यांची धडपड 'मानवता' उज्ज्वल करण्यासाठीच चाललेली असते. म्हणून स्वातंत्र्य हे 'मूल्यांचे मूल्य' मानले जाते. मग ते स्वातंत्र्य सामाजिक असो, आर्थिक असो, राजकीय असो किंवा मानसिक असो. स्वातंत्र्य माणसाला मुक्त करणारे सर्वश्रेष्ठ मूल्य आहे. वर्णव्यवस्था, ईश्वर, दैव या सर्वच गोष्टी इतरांवर लादणारे; आणि या सर्वच गोष्टींचा स्वीकार करून भक्ती करणारे; यापैकी कोणीच स्वतंत्र नसतात. स्वातंत्र्य येऊन इतकी वर्षे झाली तरी सामाजिक व आर्थिक विषमता वाढतेच आहे. गरीब अधिकच गरीब होत आहे. श्रीमंत अनीतीच्या मार्गाने अधिकच श्रीमंत होत आहे. ज्यांच्या हाती सर्व क्षेत्रांत नव्याने सत्ता एकवटत चालली आहे; ते

ग्रामीण व शहरी भागातील नेते दलितवर्ग म्हणजे आपली मालमत्ता समजत आहेत. आपल्या पाशवी वासनांच्या तृप्तीसाठी हा नेता दलितांच्या, वंचितांच्या स्त्रियांवर बलात्कार करतो, झोपड्या पेटवून देतो म्हणून या स्वातंत्र्याचा अर्थ काय? असा दलित कवीपुढे प्रश्न पडतो. नामदेव ढसाळ आपल्या कवितेत म्हणतात,

*पंधरा ऑगस्ट एक संशयास्पद महाकाय भगोष्ठ*
*स्वातंत्र्य कुठल्या गाढवीचं नाव आहे*
*रामराज्याच्या कितव्या घरात आपण ऱ्हातोत*
*उद्गम विकास उंची संस्कार संस्कृती*
*कंचा मूलभूत अर्थ स्वातंत्र्याचा*

ही कविता १९७१ च्या कालखंडातली असली तरी आजही समकालीन परिस्थितीवर भाष्य करणारी ठरते. स्वातंत्र्याच्या सत्तर वर्षांत राज्यघटनेच्या व शिक्षणाच्या साहाय्याने मनुप्रणीत जातीयनिष्ठ समाजाचे रूपांतर धर्मनिरपेक्ष, समताधिष्ठित नव्या समाजात होईल ही स्वप्ने उराशी बांधून जगणाऱ्याला गुजरात, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र येथील दलित अत्याचारांच्या घटनांनी तडाखा दिला आहे. आजही मनू डोके वर काढताना दिसतो. हे सुदृढ लोकशाहीचे लक्षण मुळीच नाही.

'जाती' हा हिंदू समाजव्यवस्थेचा अविभाज्य भाग आहे. भारतीय समाजात लहान-सहान गोष्टींपासून मौलिक गोष्टींपर्यंत आढळणाऱ्या वेगळेपणाचे मूळ जातिव्यवस्थेत आहे. 'चातुर्वर्ण्यव्यवस्था' त्यातून निर्माण झालेली जातिव्यवस्था व जातिव्यवस्थेतील श्रेणीरचनेमुळे व तिरस्कारामुळे अस्पृश्यतेसारखी आलेली विषारी फळे, यामुळे भारतीय सामाजिक वास्तव वर्षानुवर्षे सडत राहिलेले दिसते. वरिष्ठ जाती 'स्पृश्य' म्हणून मानल्या गेल्या व कनिष्ठ जाती 'अस्पृश्य' म्हणून ठरविल्या. त्यांच्यावर अस्पृश्यतेचा कायमचा शिक्का बसला. तो आजतागायत टिकून असलेला दिसतो. अस्पृश्य म्हणून त्यांना गावकुसाबाहेर फेकले. त्यांच्या वाट्याला हीन, गलिच्छ कामे आली. अस्पृश्यतेच्या या कठोर बेड्यांमुळे अस्पृश्यांचे जीवन पार करपून गेले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जाती, जातिव्यवस्था, अस्पृश्यता या विषयांवर विपुल प्रमाणात लेखन केलेले आहे. 'जातींचे निर्मूलन', 'अस्पृश्य मूळचे कोण?', 'शूद्र पूर्वी कोण होते?' इ. ग्रंथ याची साक्ष देतात.

डॉ. आंबेडकरांच्या म्हणण्याप्रमाणे, अस्पृश्यता हा सामाजिक मनोविज्ञानाचा विषय आहे. एका गटाने दुसऱ्या गटाबद्दल बाळगलेली ही एक प्रकारची सामाजिक किळस आहे या गोष्टींचे प्रत्यंतर आजही अनुसूचित जातींतील लोकांना येते. म्हणून अस्पृश्यता किंवा जातिद्वेष ही भारतीय समाजजीवनातील फार मोठी समस्या बनून राहिली आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जो तो आपले जातिसंबंध जगतो आहे म्हणून वामन निंबाळकर म्हणतात –

*ह्या मनूच्या देशात म्हणतात*
*'अस्पृश्यता' मी जन्मत:च सोबत आणली*

निंबाळकरांना शाळेत गेल्यावर 'जाती'च्या जाणिवेचा पहिला स्पर्श झाला ते लिहितात,

*शाळेची पायरी चढलो*
*तेव्हाही कळले आपली खालची जात*
*मी बसायचो बाहेर सारेच बसायचे आत*

या तऱ्हेचा मानसिक छळ वर्षानुवर्षे चालू आहे. हिंदू धर्मात व्यक्तीला काहीही स्थान नाही. हिंदू धर्माची रचना 'वर्ण' संकल्पनेवर आधारलेली आहे. एका माणसाने दुसऱ्या माणसाबरोबर कसे वागावे याची शिकवण हिंदू धर्म देत नाही; तर एका वर्णाने दुसऱ्या वर्णाशी कसे वागावे, याची बंधने हिंदू धर्मात आहेत. माणसांचे जीवन स्वतंत्र असते. त्याचा जन्म सेवेकरताच नसून आत्मविकासासाठी आहे. म्हणून प्रगत राष्ट्रांमध्ये एका माणसाला दुसज्या माणसाला आपला गुलाम करून ठेवता येत नाही. म्हणून ज्या धर्मात व्यक्तीला प्राधान्य नाही तो धर्म मला मान्य नाही, अशी डॉ.आंबेडकरांची भूमिका होती. हजारो वर्षे हिंदू धर्माने अस्पृश्य वर्गाला विकासाच्या संधींपासून लांब ठेवले; आणि गुलामांपेक्षाही हीन वागणूक दिली. म्हणूनच अस्पृश्यतेचा नाश करण्यासाठी आंबेडकरांनी संपूर्ण हयात संघर्ष केला. अस्पृश्यता म्हणजे गुलामगिरीचाच एक प्रकार आहे. म्हणून त्यांनी अस्पृश्य समाजातील आत्मसन्मान जागृत केला. वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था यांचा शोध त्यांनी विविध ग्रंथांतून घेतला. अस्पृश्यतेविरूद्ध चीड, संताप, आक्रोश हे दलित साहित्याचे स्थायीभाव आहेत.

दलित लेखक लिहित असतो तेव्हा तो आपल्या समाजाचे दु:ख मांडीत असतो. थोर नाटककार भि.शि.शिंदे 'काळोखाच्या गर्भात' या नाटकाच्या प्रस्तावनेत लिहितात, खेड्यात वा अन्यत्र दलितांची पिळवणूक व फसवणूक होत असते. त्यामुळे दलित लेखकांचे संवेदनक्षम मन प्रक्षुब्ध होणारच. या नाटकातला सूत्रधार म्हणतो, तुमच्या आंधळया न्यायसंस्थेने सिद्रामला न्याय दिला नाही; म्हणून त्याने आपल्या हातात कुऱ्हाड घेतली आणि आपल्या बापाच्या मारेकऱ्यांना स्वत:च शिक्षा केली. दलितांना स्वाभिमानाने जगायचं आहे. त्यांना जगू द्या. त्यांच्याशी असेच अन्यायाने वागणार असाल; तर प्रत्येक दलिताच्या घरात एक सिद्राम तयार होईल. तो हातात कुऱ्हाड घेईल. अरे अखंड जगताला प्रकाश देणाऱ्या या भारत देशात तुम्ही हा काळोख का जपता आहात? ह्या काळोखाच्या गर्भात हजारो सिद्राम दडपले गेलेले आहेत; ते बाहेर पडण्यासाठी धडपडत आहेत. त्यांना या काळोखातून बाहेर येऊ द्या. त्यांच्या हातात शस्त्र देऊ नका शास्त्र द्या. तरच या काळोखाच्या गर्भातून दिव्य प्रकाश बाहेर पडू शकेल.

दलित लेखकांचा विद्रोह म्हणजे नुसता आक्रोश नव्हे. त्याच्या मुळाशी विचारांची निष्ठा आहे. हा विद्रोह किंवा नकार मूल्यविषयक जाणिवा घेऊन प्रकट होताना आढळतो. 'घोटभर पाणी' ही प्रेमानंद गज्वी यांची एकांकिका एका ज्वलंत समस्येचे चित्रण करते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महाडच्या चवदार तळ्याचे आंदोलन पाण्यासाठी होते. मानवतेच्या समान हक्कांसाठी होते. हे सर्वश्रुत आहे. त्याचे प्रतिबिंब या एकांकिकेत पडलेले दिसते. या एकांकिकेतील पुरुष म्हणतो, महाराचं मूल उचलून घेतलं तर क्रान्ती होते. घोटभर पाण्यासाठी माणसं मरोत; पण तेच गाढवाला पाजलं तर क्रान्ती होते. क्रान्तीचे असले वांझ अर्थ आणि संदर्भ देशालाच रसातळाला घेऊन जातात. गज्वी लिहितात,

*भारत माझा देश आहे*
*सारे भारतीय माझे बांधव आहेत*
*बालभारतीच्या पानापानांत*
*आणि काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत*

*जातीयतेच्या रक्तपितीनं सडलेल्या*
*भारता*
*खरं सांगू?*
*तुझी संस्कृतीच किडलेली आहे*
*मुळापासून*

गज्वींना पाठयपुस्तकातील प्रतिज्ञा अर्थहीन वाटते. याचे कारण जातीयता, जातिभेद या संस्कृतीची आजही अविभाज्य अंगे बनून राहिली आहेत. 'जात' हे या देशातले प्रचंड वास्तव आहे. तुम्ही जरी जाती मानत नाही असे म्हटले; तरी लोक तुमची जात लक्षात ठेवतात.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मानवमुक्तीची जी विविध आंदोलने केली त्यांनी दलित साहित्याला वैचारिक बळ पुरविलेले दिसते. महाडच्या चवदार तळ्यावर इतरांप्रमाणे अस्पृश्यांना पाणी भरण्याचा हक्क आहे. तो बजावण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या अनुयायांसह तळ्यात उतरले. तेव्हा सवर्ण हिंदूंच्या परंपरा, हितसंबंध यांना प्रचंड हादरा बसला. त्यानंतर वर्णव्यवस्थेला मान्यता देणाऱ्या, अस्पृश्यांना गुलामगिरीत कायमचे बांधून ठेवणाऱ्या मनुस्मृतीबद्दल प्रतीकात्मक निषेध व्यक्त करण्यासाठी महाड येथे मनुस्मृतीचे दहन केले. त्यानंतर नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह सुरू केला. या एका मागोमाग घडणाऱ्या घटनांनी दलितांना आत्मबळ पुरविले. १९६० नंतरच्या काळात दलित साहित्याच्या रूपाने हे आत्मबळ वैचारिक स्फोटांचे रूप धारण करत राहिले. दलित कविता, दलित कथा, दलित कादंबरी, दलित नाटक व दलित आत्मकथने या सर्वच वाङ्मयप्रकारांतून आंबेडकरी विचार प्रकट होताना दिसतात.

दलित साहित्य आंबेडकरी विचारांचा परिपाक आहे; असे जेव्हा आपण विधान करतो तेव्हा त्याचा अर्थ आंबेडकरी विचार हेच दलित साहित्याचे 'प्राणतत्त्व' आहे असे आपण मान्य करतो. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, सामाजिक न्याय ही आंबेडकरी विचारसरणीतील जीवनमूल्ये दलित साहित्याने स्वीकारलेली आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची लोकशाहीवर दृढ श्रद्धा होती. म्हणून त्यांनी वर्णव्यवस्थेची पाळेमुळे खणून काढणे हे आपल्या चळवळीचे उद्दिष्ट ठेवलेले होते. भारतीय लोकशाही, सामाजिक व आर्थिक विषमता नष्ट केल्याशिवाय स्थिरावणार नाही; हे त्यांना माहीत होते. लोकशाहीची ताकद वाढावी म्हणून त्यांनी अनात्मवादी, अनीश्वरवादी, परिवर्तनवादी, बुद्धिप्रामाण्यवादी, माणसाला श्रेष्ठ मानणाऱ्या बुद्धाच्या धम्माचा स्वीकार केला. दलितांच्या अस्मितेला जाग आणणाऱ्या डॉ.आंबेडकरांच्या विचारांमागे गौतम बुद्ध, महात्मा फुले यांचा वैचारिक वारसा होता.

धर्मांतरानंतर दलित वर्गातून अन्याय-अत्याचारांविरूद्ध विद्रोह पेटला. सम्यक परिवर्तन या साहित्याला अभिप्रेत असल्यामुळे दलित साहित्य सर्वंकष क्रांतीचा पुरस्कार करू लागले. कोणत्याही संवेदनशील लेखकाच्या-कवीच्या मनात अन्याय-अत्याचारांविरूद्ध विद्रोहाची भावना निर्माण होईल; परंतु दलित लेखकाचा विद्रोह निराळा आहे. आपण माणूस आहोत आणि माणसाचे सारे हक्क आपल्याला मिळायला हवेत या जाणिवेतून हा विद्रोह जन्माला आलेला आहे. बाबुराव बागूल या संदर्भात म्हणतात, केवळ समाज सुधारण्याने अस्पृश्यता जात नाही; अस्पृश्यता घालवायची असेल तर; केवळ समाज बदलून जमणार नाही; तर राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व मानसिक परिवर्तन आवश्यक आहे. माणसासारख्या माणसाला जगण्याचे, सन्मानाने जगण्याचे हक्क नाकारणाऱ्यांविरूद्ध हा विद्रोह आहे. मानवतेविषयीच्या करुणेपोटी, जीवनावरील प्रेमापोटी हा विद्रोह जन्मलेला आहे. 'विद्रोह' हे दलित साहित्याचे व्यवच्छेदक लक्षण मानले गेलेले आहे.

या ठिकाणी दलित साहित्यातील विद्रोहाविषयी एक गोष्ट ध्यानात घ्यायला हवी. ती म्हणजे हा विद्रोह मूल्यांच्या प्रतिष्ठापनेसाठी आहे. एक मूल्यसमूह नाकारून नवा मूल्यसमूह अस्तित्वात यावा म्हणून हा विद्रोह दलित साहित्यातून व्यक्त होताना आढळतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या-ज्या गोष्टी नाकारल्या; त्याविरुद्ध हे साहित्यिक बंड आहे. व ज्या गोष्टींच्या प्रस्थापनेसाठी डॉ.आंबेडकर झटले; त्यांच्यासाठी दलित साहित्य वाङ्मयीन आंदोलन करीत आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे संपूर्ण जीवन संघर्षपूर्ण होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून जीवन जगत असताना त्यांच्या जीवनमार्गातील अडथळ्यांनी त्यांच्यामध्ये कमालीची जिद्द, ताकद निर्माण केली. डॉ. आंबेडकरांमधील चीड, संताप हा सात्त्विक तितकाच स्वाभाविक असल्यामुळे त्यांच्यामधील तो एका शक्तीचे रूप होता. त्यांच्या जीवनानेच अन्यायाविषयी भयंकर चीड निर्माण केली; प्रतिकाराची अफाट शक्ती निर्माण केली. आणि ते महान बंडखोर बनले. एका मूक समाजाचे नायक बनले. सारा बहिष्कृत भारत त्यांनी जागा केला. या संदर्भात कवी ज.वि.पवार 'नाकेबंदी' या काव्यसंग्रहात लिहितात,

*तू झालास परिस्थितीवर स्वार*
*आणि घडविला नवा इतिहास*
*तू झालास मूक समाजाचा नायक*
*आणि जागा केलास उभा बहिष्कृत भारत*

विफल, मातीमोल, माणुसकीहीन नि मूल्यहीन 'दलित' जीवन पाहून व अनुभवून डॉ.आंबेडकरांना जीवनाचा खोल अर्थ कळत गेला; हेतू कळत गेला. अन्यायाचा प्रतिकार आणि न्यायाची प्रस्थापना हा त्यांचा जीवनहेतूच बनला होता. समाजपरिवर्तनासाठी सामाजिक लोकशाहीची प्रतिष्ठापना हे त्यांचे राजकीय ध्येय होते. सामाजिक लोकशाहीतूनच व्यक्ती व समाज यांच्यात सर्वांगीण क्रांती घडून येईल; अशी त्यांची मनोधारणा होती. म्हणूनच त्यांनी दलित समाजाला 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा' असा लोकशाही क्रांतीचा मौलिक संदेश दिला. डॉ.आंबेडकरांचे जीवनध्येय त्यांच्या 'सामाजिक लोकशाही'च्या तत्त्वाशी निगडित झालेले होते. 'एक माणूस-एक मूल्य' जपणारी सामाजिक लोकशाही प्रस्थापित झाली नाही; तर राजकीय लोकशाही स्थिर होणार नाही ही त्यांची धारणा होती. कारण सामाजिक लोकशाही राजकीय लोकशाहीचा मूलभूत पाया असतो; आणि सामाजिक लोकशाही स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या मूल्यांवर अधिष्ठित असते. असे त्यांचे मत होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान हे गतिमान जीवनाचा विचार आहे. त्यांचे सामाजिक जीवनाने व परिस्थितीने घडविलेले तत्त्वज्ञान, समाज, धर्म, अर्थ, राजकारण अशा सर्वच क्षेत्रांना स्पर्शून जाते. सदा कऱ्हाडे या संदर्भात म्हणतात, समाज व राष्ट्रजीवनाच्या उत्कर्षासाठी

निर्माण झालेले गतिमान असे संपूर्ण आंबेडकरी तत्त्वज्ञान म्हणजेच ‘आंबेडकरवाद’ होय. आंबेडकरवाद हा एक जीवनाचा गतिमान विचार आहे. त्याचप्रमाणे आंबेडकरवाद ही समाजवादी समाजरचनेची मूलभूत प्रेरणा आहे. आंबेडकरवाद हा ऐहिक मानवी मूल्यांवर आधारलेला मानवतावादच आहे. तो भक्कम अशा बुद्धिवादावर उभा आहे. आणि बुद्धाचे विचार, तत्त्वज्ञान, त्याची मूळ बैठक असल्याने विज्ञान, विवेकनिष्ठ विद्रोह आणि विश्वात्मकता ही त्याची ध्येये आहेत. म्हणूनच बुद्धाप्रमाणे आंबेडकरवादानेही ईश्वर, आत्मा, स्वर्ग-नरकादी कल्पनांचा त्याग केलेला आहे. आंबेडकरवादाने ग्रंथप्रामाण्य, बुवाबाजी, विभूतिपूजा, अंधश्रद्धा आदी विरूपे पेरणाऱ्या धर्माला नाकारले आहे. व समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, सामाजिक न्याय, प्रज्ञा, शील, करुणा यावर अधिष्ठित नवसमाजाचे स्वप्न पाहिलेले आहे. हे स्वप्न साकार करण्यासाठी दलित साहित्य आपले योगदान सातत्याने प्रदान करीत आहे. म्हणूनच दलित साहित्य हे आंबेडकरी विचारांचे वाङ्मयीन रूप आहे असे म्हणावेसे वाटते; यात दुमत असण्याचे कारण नाही.

**संदर्भ**


१. दलित साहित्य : वेदना व विद्रोह - डॉ. भालचंद्र फडके
२. दलित साहित्य : उद्गम आणि विकास - डॉ.योगेंद्र मेश्राम
३. दलित साहित्य : एक अभ्यास - संपा.अर्जुन डांगळे
४. दलित साहित्य चिकित्सा - डॉ.सदा कऱ्हाडे
५. समाज आणि साहित्य-समीक्षा - डॉ.यशवंत मनोहर
६. आंबेडकरवादी मराठी साहित्य - डॉ.यशवंत मनोहर

# जल व्यवस्थापनात डॉ बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका (विशेष संदर्भ: नंदुरबार जिल्ह्यातील आधुनिक जलसिंचनाची शेततळी योजना)

**– प्रा. दिपक दामू गावित**
संशोधक, जी. टी. पाटील महाविद्यालय, नंदुरबार
**– प्रा. डॉ. दिलीप रामभाऊ जगताप**
व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख, जी. टी. पाटील महाविद्यालय, नंदुरबार

**सारांश**

हवा, पाणी व अन्न ह्या तीन गोष्टी माणवास जीवन जगण्यासाठी खूप आवश्यक आहेत. हवा शुध्द नसेल तर विषमज्वर, पटकी, अतिसार इ. निरनिराळे आजार होऊ शकतात व त्यामूळे जिवीतास धोका निर्माण होऊन मृत्यू होण्याचे प्रमाण वाढते. तसेच अशुध्द अन्नामुळे पोटाचे विकारा निर्माण होतात. पाणी आपल्या रोजच्या जीवनात लागत असणारी अमूल्य अशी संपत्ती आहे व ह्या संपत्तीचा उपयोग काटकसरीने व जपून केला पाहिजे. भारतासारख्या कृषीप्रधान देशात शेती ही जलसिंचनावरच अवलंबून आहे. इ. स. १९४२ ते १९४६ या दरम्यानच्या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्हॉइसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सदस्य होते, व्हाइसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलमध्ये त्यांच्याकडे श्रमविभागाचा प्रभार होता. आर. सी. सी. ने श्रमविभागाकडे सिंचन, विद्यूत शक्ती आणि जलविद्यूत या विषयीच्या कामाची जबाबदारी सोपविल्याने या विभागाच्या धोरण समितीचे अध्यक्षपद आपोआपच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे गेले आणि या कालावधीत त्यांनी सिंचन, जलविद्यूत, विद्यूतशक्ती, पाण्याची दूरदृष्टी आणि जलवाहतूकी संदर्भात केलेले कार्य, घेतलेले निर्णय आणि आखलेल्या व्युहरचनेचा आढावा या लेखात घेण्यात आलेला आहे.

**बीजशब्द –** जल, शेततळी, क्षेत्र, उत्पादन, अनुदान, व्यवस्थापन, योजना.

**प्रस्तावना**

संपूर्ण जीवनसृष्टीत अधिकतम असलेला पदार्थ म्हणजेच पाणी होय, श्वास घेण्यासाठी जशी हवेची गरज असते तशीच गरज जीवन जगण्यासाठी पाण्याची असते. जीवसृष्टीतील कोणत्याही घटकाचे अस्तीत्व हे पाण्याशिवाय अशक्यच आहे म्हणून पाण्याला 'जीवन' संबोधले जाते. निसर्गाकडून मिळालेली निर्मल, चमकिली, पारदर्शक व अद्‌भूत शक्ती लाभलेली दैवी भेट म्हणजेच पाणी होय. मानव अगदी पूर्वीपासून पाण्याकडे आदराने पाहत आलेला आहे. मानवाशी सबंधित असलेल्या प्रत्येक कार्यात पाण्याचा उपयोग हा केला जातो. उदा :- धार्मिक विधी, पूजाअर्चा, संकल्प, शेती इ.

पाण्याचे महत्व अनन्यसाधारण आहे. इतिहासाचे अवलोकन केले तर असे दिसून येते कि, भटक्या जमाती, खेडी, शहरे, इतकेच नव्हे तर सुखसमृध्दीत नांदलेल्या व नांदत असलेल्या संस्कृतीचे भवितव्य पाण्याच्या विपूलतेवर व दुर्मिळतेवर अवलंबून राहिलेले दिसून येते. मराठीतील 'आधी जल, मग स्थल' ही म्हण याचीच साक्ष देते. (३) सुरुवातीस महाराष्ट्रात सन २०१५-१६ मध्ये शासनाने १६१४० गावे दुष्काळा गावे म्हणून जाहीर केले. परंतु १२ मे २०१६ रोजी शासनाने २९६०० गावे दुष्काळी जाहीर केली त्यात विदर्भ व मराठवाड्याची दुष्काळाची स्थिती अधिकच होती. महाराष्ट्र राज्याला तसा दुष्काळ नवीन नाही, परंतु दुष्काळावर मात करण्यासाठी करण्यात येणाऱ्या कायमस्वरुपी उपाययोजना दिसून येत नाही. ज्या काही उपाययोजना आपण करतो, त्या पडणाऱ्या दुष्काळात उघड्यावर येतात आणि पुन्हा नवीन काहीतरी करण्यास आपण तयार होतो. हा नेहमीचाच अनुभव आपण १९७२-७३ च्या दुष्काळानंतर अनुभवत आहोत. चांगला पाऊस झाल्यानंतर आपल्याला पाणी टंचाई, दुष्काळ हे आपाण विसरुनच जातो. असे एकूण आपल्याकडील अवर्षण, दुष्काळ, पाण्याची टंचाई इ. बाबत दिसून येते. पाण्याच्या उपलब्धतेबाबत आपण ठोस असे धोरण व नियोजन करण्याबाबत सतत चर्चासत्रे, अभ्यासगट, संशोधनात्मक प्रयोग यांचाही आधार घेत आहोत, मात्र ही समस्या अजूनही सुटू शकत नाही हे आपण सर्वांचे दुर्दैव आहे, असेच म्हणावे लागेल. त्यातीलच वातावरणातील बदलामुळे पर्जन्यावर होणारा परिणाम ही सुध्दा समस्या सध्या आपण अनुभवत आहोत. पाण्याचा विचार करता, पृथ्वीवरिल जीवनासाठी 'पाणी' हा एक अत्यंत महत्वाचा असा मौल्यवान स्त्रोत आहे. व पाणी हे जीवन आहे. पाण्याच्या उपलब्धतेवर माणवाचा विकास अवलंबून आहे. निसर्गाकडून मिळालेल्या विनलामूल्य पाण्याचे संवर्धन, संकलन आणि उपयोग हे पूर्णत: मानवाच्या हातात आहे.

पाणी माणवाच्या विकासासाठी शेती, उद्योग इ. साठी महत्वपूर्ण भूमिका बजावते. परंतु अलीकडच्या काळात भारताबरोबरच जगात पाण्याच्या उपलब्धतेविषयी गांभीर्याने विचार करण्याची वेळ आलेली आहे. भारताच्या बाबतीत असे दिसून येते की, जगात वार्षिक सरासरी पर्जन्याबाबत भारताचा दुसरा क्रमांक आहे. परंतु, भारताची प्रचंड वाढत जाणारी लोकसंख्या यामुळे पाण्याची दरडोई उपलब्धता कमी होताना दिसून येते. पाण्याची उपलब्धता ही भारतासारख्या शेतीप्रधान देशाला महत्वाची बाब मानावी लागते व ती महत्वाची बाब आहेच. पृथ्वीवरिल पाण्याचा स्त्रोत त्या दृष्टिने महत्वाचा असून पाण्याची उपलब्धता पूढीलप्रमाणे दिसून येते. (२)

**पाणी उपलब्धतेचे स्त्रोत**

पृथ्वीवरिल पाणी हे समुद्र, तलाव, सरोवरे, भूपृष्ठ, भूगर्भ, बर्फ, बाष्प इ. स्वरुपात प्राप्त होते. पृथ्वीवरिल १.४१ अब्ज घन किलोमीटर एवढ्या मोठ्या साठ्यापैकी ९८% पाणी क्षारयुक्त आहे. तर २% पाण्यापैकी पाणी बर्फाच्या स्वरुपात उपलब्ध आहे. तर गोड्या पाण्याचे वितरण अतिशय विषम स्वरुपात दिसून येते. ते पुढील तक्यात पाण्याचे वितरण दर्शविलेले आहे. (२)

तक्ता क्र. १ : पृथ्वीवरिल पाण्याचे वितरण

| क्र. | स्त्रोत | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १ | समुद्र/सागरजल | ९७.२% |
| २ | बर्फाच्या स्वरुपात | ०२.०% |
| ३ | भूगर्भजल | ००.६२% |
| ४ | वापरातील तलाव | ००.०००९% |
| ५ | समुद्रातील बर्फ आणि खारे तलाव | ००.८००% |
| ६ | बाष्पाच्या स्वरुपात | ००.००१% |
| ७ | नदी | ००.०००१% |
| | एकूण | १००% |

भारतासारख्या कृषीप्रधान देशात शेती ही जलसिंचनावरच अवलंबून आहे. भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक फार मोठे अर्थशास्त्रज्ञ ही होते. त्यांचे विचार हे अतिशय मौल्यवान असे होते व आहेत. डॉ. आंबेडकरांनी लिहीलेली भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वोत्तम राज्यघटना मानली जाते. यावरुन त्यांची विद्वता व त्यांचे कार्य लक्षात येते. भारतीय दीनदुबळ्या, दलित, आदीवासी, महिला या सर्व बहूजनांसाठी त्यांनी फारा मोठे कार्य केलेले आहेत. तसेच त्यांनी मांडलेल्या शेतीविषयक विचारांचे अध्ययन ह्या लेखमध्ये घेण्यात आलेले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, धर्मशास्त्र, कायदा, तत्त्वज्ञान, मानववंशशास्त्र व अर्थशास्त्र इ. विषयात पारंगत होते. व त्यांचे अर्थशास्त्रवरिल लिखाण आणि त्या विषयाला दिलेले योगदान खूप मोलाचे आहेत. त्यांनी अर्थशास्त्रावरिल लिखाण आणि त्या विषयाला दिलेले योगदान खूप मोलाचे आहेत. त्यांनी अर्थशास्त्रातील एम. ए., पीएच. डी., एम. एस्सी., डी. एस्सी. या पदव्या इग्लंड, अमेरिका व जर्मनीतील नामांकित विद्यापीठातून मिळविल्या आहेत. इ. स. १९४२ ते १९४६ या दरम्यानच्या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्हॉइसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सदस्य होते, व्हाइसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलमध्ये त्यांच्याकडे श्रमविभागाचा प्रभार होता. आर. सी. सी. ने श्रमविभागाकडे सिंचन, विद्यूत शक्ती आणि जलविद्यूत या विषयीच्या कामाची जबाबदारी सोपविल्याने या विभागाच्या धोरण समितीचे अध्यक्षपद आपोआपच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे गेले आणि या कालावधीत त्यांनी सिंचन, जलविद्यूत, विद्यूतशक्ती , पाण्याची दूरदृष्टीचा विचार करुन या संदर्भात केलेले कार्य, घेतलेले निर्णय आणि आखलेल्या व्युहरचनेचा आढावा या लेखात घेण्यात आलेला आहे. (४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पाण्याविषयी असलेल्या दूरदृष्टीचा विचार करुन ह्या विषयात नंदुरबार जिल्ह्यातील आधुनिक जलसिंचन प्रणाली शेततळी योजनेचे अध्ययन प्रस्तुत विषयात करण्यात आलेला आहे.

**संशोधनाची उद्दीष्ट्ये**

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राला खूप महत्व आहे. भारत हा विकसनशील देश असून, महाराष्ट्र राज्य कृषी क्षेत्राच्या बाबतीत अग्रेसर आहे, भारताच्या सर्वांगीण विकासात महाराष्ट्राचे जसे महत्त्वपूर्ण योगदान आहे तसेच योगदान नंदुरबार जिल्ह्याचे देखिल आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जल व्यवस्थापन विषयक विचार**

कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा समजला जातो. या क्षेत्राच्या विकासासाठी जतसिंचनाचे प्रकल्प खूप महत्वाचे आहेत म्हणून दामोदर नदी प्रकल्पामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे योगदान खूप मोलाचे आहेते. दामोदर नदीचे प्रकल्प हाती घेतले तर जलसिंचन, वीजनिर्मिती, पूरनियंत्रण व जलवाहतूक असे अनेक फायदे प्रकल्पामूळे मिळतील असे भाषण डॉ. बाबासाहेबांनी १९४४ मध्ये बंगाल सरकारने स्थापन केलेल्या नदीपूर चौकशी समिती समोर मंजूर प्रतिनीधी म्हणून केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली खोरे प्राधिकरण स्थापन करण्याचे काम युध्द पातळीवर सुरु होते. त्यामुळे दामोदर नदी प्राधिकरण, सोन नदी खोरे प्राधिकरण, महानदी, चंबळ, कोसी आणि दख्खन नंद्यांचे प्राधिकरण स्थापन करण्याचे काम हाती घेतले होते. डॉ. बाबासाहेबांनी नदीजोड प्रकल्पांची संकल्पना पहिल्यांदा मांडली, मात्र हा प्रकल्प आपल्याला आजही महत्वाचा वाटत नाही. आज महाराष्ट्रा पाण्यासाठी व्याकूळ झालेला आहे व हजारो शेतकरी आत्महत्या करीत आहेत. जर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नदीजोड प्रकल्प विषयक विचार तेव्हापासून अंमलबजावणीस सुरुवात केली असती तर आज भारतातील सर्व नद्या जोडल्या गेल्या असत्या व याचा फायदा आज भारतातील कृषी क्षेत्राला होऊन बळीराजा सुखी झाला असता, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जलविषयक व्यवस्थापनाच्या विचाराला अनुसरुनच नंदुरबार जिल्ह्यातील शतेतळी योजनेलाही महत्व दिले पाहीजे. जर शेततळी योजना प्रभावीपणे राबविली गेली नाही तर भविष्यात दिवसेंदिवस शेतकऱ्याची परिस्थिती बिकट झाल्याशिवाय राहणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जलविषयक दूरदृष्टी ठेऊन ज कार्य हाती घेतले होते ते खरोखरच खूप-खूप मौल्यावान असे आहेत, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या काळातच जर त्यांच्या जल व्यवस्थापनाच्या विचारांना प्राधान्य देऊन अंमलबजावणी केली असती तर आज संपूर्ण भारत दुष्काळाच्या तावडीत सापडला नसता.

**व्याख्या**

- जल व्यवस्थापन म्हणजे अशी एक कार्यप्रणाली की ज्यामध्ये पाण्याचे नियोजन, त्याचा विकास वितरण आणि जलसंसाधनाचा सुयोग्य वापर अभिप्रेत असतो. त्यात अंतर्गत जलसंवर्धन, सांडपाणी किंवा दूषित पाण्याचे शुध्दीकरण, उपलब्ध पाण्याचे योग्य वितरण व पुरापासून संरक्षण इत्यादी बाबींचा त्यात समावेश होतो.
- शेततळे म्हणजे शेतजमिनीच्या वरिल बाजूस पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून आपत्कालिन स्थितीच्या वेळेस पिकास उपलब्ध होण्याच्या दृष्टिने खोदलेल्या तळ्यास किंवा खड्ड्यास शेततळी असे म्हणतात.

नंदुरबार जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या वित्तिय समस्या, कार्यात्मक समस्या, मनुष्यबळविषयक समस्या व जलसिंचनाच्या समस्या इत्यादींचे शोध घेण्यासाठी संशोधन विषयाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे दिसून येतील.

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषीविषयक विचारांचे अध्ययन करणे.

२) शेततळी योजनेमुळे शेतकऱ्यांच्या विकासात वाढ झाली का ते अभ्यासणे.

३) शेतकऱ्यांच्या राहणीमानाचा दर्जा अभ्यासणे.

४) पाण्याच्या समस्यांवर उपाय सुचविणे.

**संशोधनाची गृहितकृत्ये**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषीविषयक विचारांची आजही अंमलबजावणी होतांना दिसून येते.

२) शेततळीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनी जल व्यवस्थापनाच्या माध्यमाने पाण्याचा योग्य वापर केलेले दिसून येते.

३) अनेक शेतकऱ्यांनी शेततळी योजनेचा लाभ घेतलेला नाही.

४) शेततळी योजनेमुळे नंदुरबार जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झालेली दिसून येते.

तक्ता क्र. २ : नंदुरबार जिल्ह्यातील सिंचनाचे विविध स्त्रोत

| क्र. | सिंचनाचे साधन/स्त्रोत | वर्ष | |
|---|---|---|---|
| | | २००५-०६ | २०१४-१५ |
| १ | मोठे प्रकल्प | ०० | ०० |
| २ | मध्यम प्रकल्प | ०९ | ०९ |
| ३ | लघु प्रकल्प | १५६ | ७०७ |
| ४ | पाझर तलाव | उ.ना. | १५५ |
| ५ | कोल्हापूर बंधारा | उ.ना. | ५२० |
| ६ | भुयारी साठवण बंधारा | उ.ना. | ६७७ |
| ७ | उपसा जलसिंचन योजना | उ.ना. | ०० |
| ८ | कुपनलिका | १४६ | २८६ |
| ९ | सिंचन विहिरी | २०४०३ | २१५४४ |
| १० | शेततळी (आधुनिक सिंचन प्रणाली) | ०० | १७१२ |

*(संदर्भ:- जिल्हा सांख्यिकिय कार्यालय नंदुरबार)*

तक्ता क्र. २ चे अवलोकन केल्यास असे लक्षात येते की वर्ष २००५-०६ ला मध्यम प्रकल्पांची संख्या ०९ इतकी होती व वर्ष २०१४-१५ ला देखील ०९ इतकीच संख्या होती, तर लघु प्रकल्पांची संख्या २००५-०६ ला १५६ इतकी होती तर २०१४-१५ ला ७०७ इतकी होती म्हणजेच वर्ष २००५-०६ च्या तुलनेने २०१४-१५ ला लघु प्रकल्पांची संख्या ५५१ ने वाढली. तसेच नवीन उद्यास येणारी जी शेततळी नावाची संकल्पना आहे ती वर्ष २००५-०६ ला शुन्य होती तर वर्ष २०१४-१५ ला १७१२ इतकी झाली, म्हणजेच जलसिंचन स्त्रोतांच्या संख्येत सातत्याने वाढ होतांना दिसून येत आहे.

वरिल तक्त्याचे सुक्ष्म अध्ययन केल्यास असे लक्षात येते कि, भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जलविषयक विचारांना व जल व्यवस्थापनाला आजही प्राधान्य दिले जात आहे हेच वरिल तक्त्यावरुन लक्षात येते.

**संशोधन पध्दती**

वाणिज्य आणि व्यवस्थापन शाखेत संशोधन करतांना कल्पना शक्तीचा उपयोग केला जात नाही. तर त्यात पुर्णपणे वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब केला जातो. वैज्ञानिक पध्दतीचे उद्दिष्ट्ये हे कोणत्याही घटनेच्या बाबतीत सत्य शोधुन काढणे हे असते असे सत्य शोधुन काढण्यासाठी त्या घटनेशी संबंधित असलेल्या वास्तविक तथ्यांचे संकलन करणे आवश्यक असते. तथ्य संकलन करणे ही वैज्ञानिक पध्दतीची पहिली महत्त्वाची अट आहे. हया संकलित तथ्यांचे उचित व व्यवस्थीत वर्गीकरण केले जाते. त्यानंतर अध्ययन विषयाशी संबंधित अशा संकल्पना तयार केल्या जातात व संकल्पनांच्या उपयोगामुळे संपूर्ण प्रक्रिया ही मोजक्या शब्दात स्पष्ट केली जाते. सिध्दांत म्हणजे तथ्य आणि संकल्पना हयांच्या आधारे काढलेल्या निष्कर्षाचे संक्षिप्त रुप होय. म्हणुनच तथ्य, संकल्पना आणि सिध्दांत हे संशोधनाचे मुख्य आधार माणले जाते. (५)

प्रस्तुत संशोधनात तथ्य, माहिती व आकडेवारी गोळा करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पध्दतींचा वापर केला आहे. सामाजिक शास्त्रात विचार, भावना व अनुभव यांना सुध्दा तथ्य असे म्हणतात. तसेच सामाजिक संशोधनात प्रत्येक्ष गोळा केलेल्या माहितीला किंवा तथ्याला खुप महत्त्व असते व जी माहिती प्रत्येक्ष पध्दतीद्वारे गोळा केलेली असते त्या माहितीला प्राथमिक स्त्रोत किंवा प्राथमिक माहिती असे म्हणतात. अशी प्राथमिक माहिती ही प्रत्येक्ष भेटुन, मुलाखत घेऊन, अनूसूची भरुन व प्रत्येक्ष चर्चा करुन प्रश्नावली भरुन घेतली, तसेच नमुना निवड करतांना सहेतुक नमुना निवड पध्दतीचा अवलंब करण्यात आला. (५)

तक्ता क्र. ३. नंदुरबार जिल्ह्यातील शेततळी तालुकानिहाय शेततळी लाभार्थी संख्या व भरुन घेतलेली प्रश्नावली

| क्र. | तालुका | वैय्यक्तिक शेततळी लाभार्थी | सामुहिक शेततळी लाभार्थी | एकुण शेततळी लाभार्थी | सप्रमाणात भरुन घेतलेली प्रश्नावली |
|---|---|---|---|---|---|
| १. | नंदुरबार | ५४३ | १७ | ५६० | १० |
| २. | नवापुर | २४५ | १२ | २५७ | १० |
| ३. | शहादा | २४५ | ७ | २५२ | १० |
| ४. | तळोदा | १७७ | २ | १७९ | १० |
| ५. | अक्कलकुवा | १९५ | ० | १९५ | १० |
| ६. | अक्राणी | २६८ | १ | २६९ | १० |
| | एकूण | १६७३ | ३९ | १७१२ | ६० |

*(संदर्भ: जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालय नंदुरबार)*

नंदुरबार जिल्ह्यातून सप्रमाणात म्हणजेच प्रत्येक तालुक्यातून १० इतकी प्रश्नावली भरून घेण्यात आली, सहा तालुके मिळून ६० इतकी प्रश्नावली भरुन घेतली व माहितीचे विश्लेषण व निर्वचन करण्यात आले. तसेच जी तथ्ये किंवा माहिती संशोधकाची स्वत: ची नाहीत, अन्य व्यक्ती किंवा संस्था यांच्याद्वारे संकलित केली जाते त्या माहितीला तथ्याला दुय्यम तथ्य असे म्हणतात व अशी माहिती ही प्रकाशित व अप्रकाशित असु शकते अशी माहिती संकलित करण्यासाठी ज्या पध्दतीचा किंवा तंत्राचा उपयोग केला जातो त्यालाच दुय्यम स्त्रोत असे म्हणतात. संशोधकाने संशोधन विषयाशी संबंधित असणारी सर्व महत्त्वपूर्ण माहिती व सांख्यिकिय आकडेवारी ही दुय्यम स्त्रोतांद्वारे प्राप्त केली आहे. नंदुरबार येथील जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालय, जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय (सांख्यिकिय विभाग), पंचायत समिती, कृषी महाविद्यालय इ. कार्यालयातील विविध अहवाल, पत्रके, ग्रंथ, विविध नोंदी, मासिके, साप्ताहीक, नियतकालीके, तज्ञांचे संदर्भ ग्रंथ, शोध

पत्रिका, व विविध ग्रंथालयांचे महत्त्वपुर्ण योगदान आहे. तसेच काही वर्ष निरंक असण्याची अनेक कारणे आहेत त्यात शेततळी योजनेसाठी अर्ज प्राप्त न होणे, शासनाकडून निधी वितरित न होणे इ. कारणामूळे काही वर्ष निरंक आहेत तर काही वर्षात अत्यल्प अर्ज येण्याची कारणे असे की ज्या वर्षी पर्जन्य चांगल्या प्रमाणात झाले आहे त्या वर्षी कमी अर्ज आले आहेत. परंतू शेततळ्याचे महत्त्व लक्षात घेता शेततळी घेणाऱ्या लाभार्थ्यांच्या संख्येत वाढ होत असल्यामुळे महाराष्ट्र शासनाने मागेल त्याला शेततळी ह्या योजनेची सुरुवात केली आहे व त्याचा लाभ मोठ्या प्रमाणावर शेतकरी घेतांना दिसून येतात.

**निष्कर्ष**

ज्याप्रमाणे शेतकरी शेतामध्ये जलसिंचनासाठी विहीर व बोअरवेल करतो तसेच नंदुरबार जिल्ह्यातील शेतकरी शेततळी योजनेचा लाभ मोठ्या प्रमाणावर घेतांना दिसून येत आहेत व या योजनेकडे कल वाढ जात असून बऱ्याच शेतकऱ्यांनी शेततळीमुळे दुष्काळावर मात केली आहे. आणि शेततळी योजनेमुळे पावसाचे वाहून जाणारे जाणी साठविले जात असल्याने जलपुर्नभरणा कार्येक्रमदेखिल होत आहे. शेततळीमुळे पाण्याचा अतिरिक्त स्त्रोत निर्माण झाल्याने पिकांना अतिरिक्त पाणी दिल्यामुळे शेतकऱ्यांच्या एकूण उत्पादन व उत्पन्नात देखील वाढ झालेली दिसून येते. शेततळी लाभार्थी शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाल्यामुळे त्यांचा राहणीमानाचा दर्जा देखील उंचावलेला दिसून येतो.

**उपाययोजना**

नंदुरबार जिल्ह्यात वेगवेगळ्या प्रकारची जमीन असून त्यात विविध प्रकारची पिके घेतली जातात, अनेक शेतकरी हे कडधान्य व व्यापारी पिके घेतात परंतु पुरेसा पाण्याचा साठा व स्त्रोत नसल्यामुळे पाहिजे त्या प्रमाणात उत्पादन मिळत नाही तसेच पिकांना आजही पारंपारिक पध्दतीनेच पाणी देतात त्यामुळे मोठ्या प्रमाणावर पाणी वाया जाते. शेतकऱ्यानी जलसिंचनाच्या वेगवेगळ्या योजनेच्या माध्यमाने नियोजनबध्द् व आधुनिक पध्द्तीने (तुषार सिंचन, ठिबक सिंचन इ.) तंत्राचा उपयोग करुन पिकांना पाणी दिल्यास पाण्याची बचत होईल व एकूण उत्पादनात वाढ होईल तसेच सुधारित बि-बियाण्यांचा वापर करावा व कडधान्ये ऐवजी व्यापारी पिके, भाजीपाला व फळबागांची शेती करावी. शासनाने जलसिंचनासाठी व फळबागांसाठी अनेक योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचविल्यास शेतजमिनीच्या सिंचन क्षेत्र वाढ होईल व उत्पादनात देखिल वाढ होईल. आणि शेतकऱ्यांचे कर्जबाजारीचे प्रमाण नक्कीच कमी होईल.

**संदर्भ**


१) विनायक न. घारपूरे, पाणी पुरवठा : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृत्ती मंडळ, सचिवालय- मुंबई.

२) डॉ. एस. व्ही. ढमढेरे, भारतीय जलसंपदा : डायमंड पब्लिकेशन्स पुणे.

३) डॉ. विजय देशपांडे, पाणी जीवन : शासकिय मुद्रणालय नागपूर

४) थोरात सुखदेव, बाबासाहेब आंबेडकर नियोजन जल व विद्युत विकास भुमिका व योगदान, सुगावा प्रकाशन-पुणे.

५) प्रा. रा. ना. घाटोळे (१९९७) समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे आणि पध्दती, श्री. मंगेश प्रकाशन नागपूर, चतुर्थ

६) डॉ. गंगाधर वि. कांयदे-पाटील (२०००) व्यावसायिक व्यवस्थापन - चैतन्य पब्लिकेशन नाशिक.

# भारतीय संविधानाची उपयुक्तता (मुलभूत हक्काचा व वैशिष्ट्यांचा विश्लेषणात्मक अभ्यास)

– प्रा. विरेंद्र मुरलीधर घरडे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
गंगामाई एज्यु. ट्रस्टचे कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, नगांव, ता. जि. धुळे

**प्रस्तावना**

भारतीय संविधान हा भारतीय संघराज्याचा मुलभूत पाया आहे. संविधानामुळे भारतीय जनतेच्या व राष्ट्राच्या विकासाला मोठी चालना मिळाली आहे हे नाकारता येत नाही. प्रस्तूत निबंधात भारतीय संविधानाची व त्यातील कलमांचा विश्लेषणात्मक अभ्यास थोडक्यात केला आहे. मुलभूत अधिकार आणि हक्क यामुळे भारतीय जनतेच्या विकासात कशी भर पडली याचे विवेचन प्रस्तूत शोध निबंधात आहे.

**मुख्य शब्द –** डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मुलभूत हक्क व अधिकार, उद्देश पत्रिका, घटनानिर्मीती, अल्पसंख्यांक, आदिवासी दलित समाज, घटना निर्मीती.

**उद्देश –** प्रस्तूत शोध निबंधाचा उद्देश संविधानाचा सविस्तर अभ्यास करून भारतीय जनतेला संविधानाचे महत्त्व पटवून देणे हा आहे.

**महत्त्व –** संविधानात असलेल्या कलमांमुळे आज भारतीय जनतेच्या आणि विशेष करून दलित, आदिवासी, मागासवर्गीय समाजाचा विकास झाला तसेच भारताचा जगातील मोठी लोकशाही म्हणून आज जो विकास झाला आहे तो संविधानामुळेच झाला आहे हे नकारता येत नसल्यामुळे या संविधानाला महत्त्व प्राप्त होते.

**गृहितके**

१) भारतीय संविधनातील कलम ही जनतेच्या विकासाची महत्त्वपूर्ण साधने आहे.
२) भारतीय संविधानामुळे जनतेच्या व्यक्तीमत्व विकास, राष्ट्रीय एक्य व अखंडता आणि आधुनिकता विकास होतो हे नाकारता येत नाही.

**संशोधन पध्दती –** प्रस्तूत शोध निबंधासाठी सामाजिकशास्त्रे संशोधनातील विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब केला आहे.

**विश्लेषण**

भारतीय संविधान तयार करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना मसुदा समितीचे अध्यक्ष नेमुन इतर सदस्यांची नियुक्ती करण्यात आली. कारण डॉ.आंबेडकरांचा सामाजिक आर्थिक व राजकीय क्षेत्रातील अभ्यास पाहता ते या देशाला चांगले संविधान देतील असे देशातील राजकीय नेते, तज्ञ यांना वाटत होते व शेवटी डॉ.आंबेडकरांनी सर्वश्रेष्ठ प्रकारची राज्यघटना या देशाला दिली. डॉ.आंबेडकर ऑस्टीनच्या मताला दुजोरा देत म्हणतात. 'भारतीय संविधानात असणारे सामाजिक आणि आर्थिक तत्वज्ञान हे भारतीय अविकसीत राष्ट्रातील परिस्थिती आणि समस्यांच्या संदर्भांत आवश्यक व महत्त्वाचे आहे'१.

'संविधान हे राजकीय सामाजिक आणि अर्थिक शक्तीच्या संतापापासून निघणारे ङ्गतील असते.'२ कारण 'आम्ही भारतीय जनता भारताचे सार्वभौम प्रजासत्ताक गणराज्य निर्मिण करण्याचे २./११/ १९४९ रोजी ठरवून ती मान्य आणि स्विकृत करीत आहेत असे शब्दप्रयोग योजून घटनाकरांनी हे संविधान जणू काही भारतीय जनतेनेच तयार, मान्य आणि स्विकृत केले आहे.'३

घटनाकारांनी भारतीय राज्यघटनेचे स्वरूप 'सौर्वभाम, प्रजासत्ताक, धर्मनिरपेक्ष, समाजवादी गणराज्य निर्माण करण्याचे ठरविले आहे.'४

ठाकूरदास याच्या मते, "The preamble is the most preaious part of the constitution it is the Soule of constitutions it is a jevel set in the constitution, it is a superb prose poem now it is a perfection in itself."5

भारतीय संविधानाचा मुख्य घटक मुलभूत अधिकार आणि हक्क आहे. तसेच मार्गदर्शन तत्वाची भुमिका देखील अत्यंत महत्त्वाचे आहे.

'चांगल्या जीवनासाठी ते अत्यावश्यक आहे.'६ डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'मार्गदर्शक तत्वांना अतिशय महत्त्व आहे कारण ते दर्शवितात की, आमचा अंतीम उद्देश आर्थिक लोकशाही आहे.'७

**भारतीय संविधानाचा थोडक्यात आढावा**

भारतीय संविधान सभेचे कार्य २ वर्ष ११ महिने आणि १७ दिवसपर्यंत चांगले या कालावधीत संविधान सभेची ११ सत्रे व १५६ बैठकी संपन्न झाल्यात. संविधानावर हस्ताक्षर करण्यास दि. २५ जाने. १९५० रोजी संविधानाच्या तीन प्रती सभेच्या पटलावर ठेवण्यात आल्या. भारतीय राज्यघटना व्यापक विस्तृत आहे. मुळ राज्यघटनेत ३९५ कलम होती.

**संविधानाची मुलभूत वैशिष्ट्ये**

१) जनतेचे सार्वभौमत्व
२) लिखित व व्यापक राज्यघटना
३) सार्वभौम लोक तांत्रिक गणराज्य
४) परिदृढ व परिवर्तननियतेचा राज्यघटना
५) धर्मनिरपेक्ष राज्य
६) एकात्म संघराज्य
७) संसदीय शासपध्दती
८) मुलभूत अधिकार व मुलभूत कर्तव्य
९) स्वतंत्र न्यायपालिका
१०) एकेरी नागरीकत्व
११) आणीबाणीची तरतूद

**भारतीय घटनेतील मुलभूत हक्क**

| क्र. | घटनेतील कलम | हक्क |
|---|---|---|
| १) | कलम १२ व १३ | सर्वसाधारण |
| २) | कलम १४, १५, १६, १७, १८ | समतेचा हक्क |

| | | |
|---|---|---|
| ३) | कलम १९, २०, २१, २२ | स्वातंत्र्याचा हक्क |
| ४) | कलम २३, २४ | शोषणाविरूध्द दाद मागणारा हक्क |
| ५) | कलम २५, २६, २७, २८ | धर्म स्वातंत्र्याचा हक्क |
| ६) | कलम २९, ३० | सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क |
| ७) | कलम ३१, ३१(अ), ३१ब, ३१ | मालमत्तेचा हक्क |
| ८) | कलम ३२, ३३, ३४, ३५ | घटनात्मक संरक्षणाची हमी |

भारतीय लोकशाहीचा पाया स्वातंत्र्य न्याय, समता आणि सार्वभौम, बंधुता या आधारी आहे.

**सर्वसाधारण मते**

१) सर्वसाधारण समतेचा अधिकार मिळाल्यामुळे सर्व नागरीक समान आहे. उच्च-निच, गरीब-श्रीमंत, भांडवलदार-मजुर, स्पृश्य-अस्पृश्य, स्त्री-पुरूष असा भेद केला जात नाही. आपल्या व्यक्तीत्वाचा विकास करण्याची समानसंधी घटनेने दिली आहे.

२) घटनेने स्वांतत्र्याचा हक्क दिल्यामुळे प्रत्येक व्यक्तीला आपला सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक विकास करण्याची संधी भारतीय जनतेला प्राप्त झाली आहे.

३) भारतीय घटनेने शोषण अमान्य केले आहे. विविध विभाग, कार्यालये शासकीय, निमशासकीय, विभाग, खाजगी व सार्वजनिक क्षेत्र यात जर जनतेचे शोषण होत असेल तर आज शोषणाविरूध्द दाद मागण्याचा अधिकार याच घटनेने भारतीय जनतेला दिला आहे. त्यामुळेच आज भारतात अनेक सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक न्यायालयांची निर्मिती केली आहे.

४) घटनेने धर्म स्वातंत्र्य सर्वात समान दिले आहे. त्यामुळे आज शासनासमोर सर्व धर्म समान आहे. तसेच शासन सर्व धर्माला समान महत्त्व व स्थान देण्याची भुमिका बजावते.

५) सर्व जनतेला समान सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क आहे. म्हणून आज शिक्षणात सर्व जनतेला समान संधी व दलीत आदिवासी मागास समाजाला शैक्षणिक क्षेत्रातील अनेक भागात आरक्षण मिळाले आहे. तसेच आपली संस्कृती जपण्याचा व त्याचे संवर्धन करण्याचा अधिकार भारतीय जनतेला दिल्याने सांस्कृतिक

६) घटनेने आर्थिक स्वांतत्र्य भारतीय जनतेला दिलेले आहे. परंतू आर्थिक स्वांतत्र्याचा गैरङ्गायदा जनतेकडून होणार नाही या बाबत देखील विविध नियम, कायदे व उपाययोजना निर्माण करून घटनेने देशाला आर्थिक बाबतीत सक्षम व सुरक्षित करण्याचा प्रयत्न केला आहे.

७) आज भारतीय राज्यघटनेची कायदे, कलमे, सर्वश्रेष्ठ आहे. त्यामुळे घटनाबाह्य निर्णय, कायदे, कोणाही राजपक्ष किंवा सत्ताधारी पक्ष करू शकत नाही. यावर घटनेचे सर्वश्रेष्ठ सिध्द होते.

'घटनेने भारताला संघटराज्य निर्मिले आहे. अनेक राज्याचा एक संघ असल्याने देशाची राष्ट्रीय एकात्म, अखंडता सक्षम आहे. संघटराज्य म्हणजे राष्ट्रीय ऐक्य आणि सत्ता घटक राज्याचे अधिकार याचा योग्य पध्दतीने मेळ घालण्याच्या हेतुने त्यावर केलेली राज्ययंत्रणा होय.'८ त्यामुळे भारतीय संविधान सर्वश्रेष्ठ आहे.

**उपाय**

१) संविधानाचे महत्त्व देशातील सर्व सरकारी, निमसरकारी, खाजगी, विभागांना पटवून देण्यासाठी विविध कार्यशाळेचे आयोजन करणे.

२) उद्देशपत्रिकेचे वाचन अनिवार्य करणे.

३) घटनेतील मुलभूत हक्क व अधिकाराचे विकेंद्रीकरण सर्वसाधारण जनतेपर्यंत सक्षमपणे करणे व त्याला सक्षम न्यायालयीन संरक्षण देण्याची भूमिका शासनाने पार पाडली पाहिजे.

**निष्कर्ष**

भारतीय संविधान हे जीवन जगण्याचा मार्ग आहे. मुलभूत अधिकार हक्क हे केवळ नियमांचे किंवा कायद्याचा संच नाही तर भारतीय जनतेला स्वविकास करण्याची संधी प्राप्त करून देणारी मोठी यंत्रणा आहे. ज्यात सर्वांना स्वविकास करण्याची संधी प्राप्त होते. म्हणून संविधानाचे संरक्षण करणे प्रत्येक भारतीयांचे आद्य कर्तव्य आहे.

**संदर्भ**

१. देशमुख अलका - भारतीय शासन आणि राजकारण, ख-आवृत्ती, श्री साईनाथ प्रकाशना, नागपूर, जुलै २००३, पान नं.४८
२. क्षीरसागर के.सी.- भारतीय राज्यव्यवस्था, विद्याप्रकाशन, नागपूर,क'.३३४, पान नं.१७२
३. घांगरेकर चिं.ग. - भारतीय राज्यघटना (स्वरूप आणि राजकारण) श्री मंगेश प्रकाशन, नागपूर,, ५ वी आवृत्ती, १९९८, पान नं.२.
४. देवरे पी.डी., विसपुते एम.एस., निकुंभ डि.एस. - भारतीय लोकशाही गणराज्य, प्रशांत पब्लिकेशन, जळगांव, आवृत्ती ख, २००७, पान नं.५७
५. उपरोक्त - पान नं.५४
६. कुलकर्णी बी.वाय., नाईकवाडे अशोक - भारताचे शासन आणि राजकारण, श्री विद्या प्रकाशन, पुणे, ५ जुन २००३, पान नं.४४
७. उपरोक्त - पान नं.७
८. राठी शुभांगी- राज्यशास्त्राच्या मुलभुत संकल्पना, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, आवृत्ती ख, २०१३, पान नं.१०७.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय अर्थव्यवस्था

– प्रा. एन.एस. बोरसे
अर्थशास्त्र विभाग
मु. जे. महाविद्यालय, जळगांव

**प्रस्तावना**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भारतीय घटनेचेशिल्पकार, कायदेतज्ञ, समाजशास्त्रज्ञ, राज्यशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ म्हणुन सर्व जगाला परिचीत आहेत. मानव व अर्थव्यवस्थेचा विकास अर्थशास्त्राने होतो याची जाणीव त्यांना होती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ॲडमिनिस्ट्रेशन ॲन्ड फायनान्स ऑफ दी ट्रस्ट इंडिया कंपनी, इव्होल्युशन ऑफ प्रोव्हिन्शियल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया, दि प्रॉब्लेम ऑफ रुपी इटस ओरिजन ॲन्ड सोलुशन हे तीन ग्रंथ एम.ए., पीएचडी आणि डॉक्टर ऑफ सायन्स या तीन पदव्यासाठी लिहलेले ग्रंथ आहेत.या ग्रंथामध्ये डॉ.बाबासाहेबांचे भारतीय अर्थव्यवस्थेबाबत विचार या शोधनिबंधात अर्थव्यवस्थेचे चित्र स्पष्ट दिसून येते.भारतीय अर्थ्व्यवस्था कृषी प्रधान आहे भारतीय अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय उत्पन्न, दरोडीय उत्पन्न आर्थिक विकास औदयोगिकरण, आंतरराष्ट्रीय व्यापार इत्यादी क्षेत्राचा विकास होतो त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला अधिक महत्व आहे

**संशोधनाची उद्दीष्टे**

१. भारतात शेत जमीनी धारण क्षेत्राच्या आकारा विषयी अध्ययन करणे
२. भारतीय शेतीच्या उत्पादकता विषयी माहीती मिळवणे
३. भारतीय शेतमजुराविषयी माहीती मिळवणे
४. जलसिंचनाविषयी माहीती मिळवणे

**गृहितके**

१. भारतीय शेतीचा धारण क्षेत्राचा आकार लहान असल्याने शेतीची उत्पादकता कमी आहे
२. भारतात अल्पभुधारक आणि सिमांत भुधारकांची संख्या अधिक आहे
३. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला अधिक महत्व आहे

**संशेधन पध्दत**

दुय्यम साधन सामग्रीवर आधारीत आहे. त्यासाठी पुस्तके, ग्रंथ, लेख, योजना इत्यादी साधनांचा वापर

**शेतीचे धारण क्षेत्र**

भारतात शेती समस्या संदर्भात विचार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडले. १९१८ मध्ये The Journal Of Indian Econamiy Society च्या अंकात Small Holdings in India and the Remedies या लेखात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतात शेती हा मोठा उदयोग आहे. प्रथमिक व्यवसाय शेतीला अधिक महत्व कारण जवळजवळ ८०% लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे म्हणुन भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला अधिक महत्व आहे. भारतीय शेतीची उत्पादकता कमी असण्याचे कारण म्हणजे शेतीच्या उत्पादकतेवर परिणाम करणारा घटक शेतीच्या धारणक्षेत्राचा आकार लहान असल्याने शेतीची उत्पादकता कमी आहे. भारतात अल्पभुधारक व सिमांत शे्तकरी म्हणजे ज्यांच्या कडे जमीनीचे क्षेत्र २ एकर आहे, तर मध्यम भुधारक २ ते ४ एकर जमीन आणि मोठे शेतकरी ४ ते १० एकर जास्त जमीन असलेले शेतकरी अशी विभागणी केली जाते. भारतात अल्प भुधारक व सिमांत भुधारक शेतकऱ्यांचे प्रमाण ८०% लोकांन कडे जमीनीचे क्षेत्र २०% आहे तर २०%मोठया शेतकऱ्यांनकडे ८०% जमीनीचे क्षेत्र आहे.त्यामुळे लहान धारण शेतकऱ्यांचे प्रमाण भारतात अधिक आहे.भारतीय शेतीचे तुकडीकरण अधिक झाल्याने जमिनीचा आकार लहान असल्यामुळे शेतीची उत्पादकता वाढत नाही. तसेच शेती विविध ठिकाणी विखुरलेली त्यामुळे नविन तंत्राने शेती करता येत नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते जमीनीच्या उत्पादकता वाढीसाठी जमीनीचे एकत्री करण पुरेसे नसून जमीनीचा आकार वाढ करुन किपायतशिर शेती करणे त्यामुळे जमीनीची उत्पादकता वाढेल. भारतात वारसा हक्क कायदयामुळे जमीनीचे विभाजन व विखुरणी करण्याचे प्रमाण अधिक आहे. जर या कायदयाने जमीन धारणक्षेत्राचा आकार लहान होत असेल तर कायदयाने परवानगी देऊ नये त्या कायदयात सुधारणा करावी असे मत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडले आहे.जमीनीच्या उत्पादकता वाढीसाठी जमीनीमध्ये भांडवल व इतर उत्पादन घटकात वाढ केली पाहीजे.भारतात रशियाच्या धर्तीवर सामुदयाने शेती केली पाहीजे State and Minorities हया ग्रंथात डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांगतात की, शेती हा उदयोग राज्य सरकार चालविल तसेच लागवड नसलेली जमीन भुमिहीन लोकांना जात धर्म असा भेद न करता ती जमीन शेती कसण्यासाठी दयावी.ती शेती सरकारच्या नियमाप्रमाणे व सामुदायीक पध्दतीने कसली पाहीजे जमीनीवरील कर दिल्यानंतर राहीलेले शिल्लक उत्पन्न शेती करणाऱ्यांना वाटप केले पाहीजे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते सामुदायीक मते जमीनीच्या धारण क्षेत्राचा विकास वाढेल त्या जमीनीत नविन तंत्राचा वापर करुन शेतीची उत्पादकता वाढेल त्यामुळे ग्रामीण अर्थ व्यवस्थेचा विकास होईल

**शेतमजुर**

भारतात शेतमजुर ग्रामीण व कृषी क्षेत्राशी संबंधित आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते भारतातील शेतमजुरांचे शेती उदरनिर्वाहचे साधन ते शेत मजुर दुसऱ्याच्या शेतात काम करणे असा आहे.शेतमजुरांना कामाची वेळ,कामाचे नियोजन आणि मजुरी ठरविण्याचा अधिकार नव्हता शे्तमजुरांचे स्वरुप गुलामासारखे होते शेतमजुरांकडून काही कामे फुकट करुन घेतात.शेतमजुरांना कामाचा मोबदला योग्य मिळत नसल्याने शेतमजुरांची स्थिती दयनीय आहे.या शे्त मजुरांना दिला जाणारा मोबदला कमी व काम जास्त करावे लागते मोठे शेतकरी शेतमजुरांचे शेषण

करतात या शेतमजुरांनकडे शासनाने लक्ष दिले नाही तर त्यांची अवस्था बिकट होईल.

**जलसिंचन**

भारतीय अर्थव्यवस्थेत शेती विकासाचा कणा आहे.शेती विकासा साठी जलसिंचन सुविधा महत्वाची आहेत.जलसिंचन प्रकल्पात दामोदर नदी प्रकल्पा साठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान मोठे आहे.या नदीच्या पुरामुळे हजारो लोकांचे प्राण जातात.हा प्रकल्प सुरु केला तर जलसिंचन,विजर्निमिती, पुरनियंत्रण, जलवाहतुक अश्या प्रकारचे फायदे मिळतील या प्रकारचे भाषण १९४४ मध्ये बंगाल सरकारने स्थापन केलेल्या नदीपुर चौकशी कमिटी समोर मजुर प्रतिनिधी म्हणुन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिले . डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वानुसार खोरे प्रकल्प प्राधिकरण स्थापन करण्याचे काम सुरु झाले त्या मुळे दामोदर नदी प्राधिकरण,सोननदी खोरे प्राधिकरण, महानदी, दख्खन नदयांचे प्राधिकरणाचे काम हाती घेतले डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी नदी जोड प्रकल्प संकल्पना प्रथम मांडली डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या परिश्रमाने दामोदर प्रकल्प पुर्ण झाला त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर फक्त भारतीय घटनेचे शिल्पकार नव्हते तर जल नितीचेही शिल्पकार होते. शेतीला जलसिंचन सुविधा निर्माण झाल्या तर शेतीत १२ माही उत्पादन घेता येईल त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पनात वाढ होऊन भारतीय अर्थ व्यवस्थेचा विकास होईल.

या वरुन भारतीय अर्थव्यस्थेत लहान धारण क्षेत्र, शेतमजुर, जलसिंचन, या सबंधि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान म्हत्वाचे आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर भारतीय घटनेचे शिल्पकार होते त्या बरोबर जलसिंचनाचे शिल्पकार होते कारण शेतीला जलसिंचन सुविधा निर्माण केल्या पाहिजे असा विचार प्रथम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडला भारतीय शेतीची उत्पादकता कमी आहे कारण जमनिचे विभाजन, वारसाहक्क कायदा,जमीनीचा आकार लहान,भांडवलाचा अभाव,अपुऱ्या जलसिंचन सुविधा,जमीन कसण्याची पारंपारिक पध्दत,पावसाचे प्रमाण कमी,उत्पादन खर्च अधिक या सर्व कारणांमुळे जमीनीची उत्पादकता कमी आहे.त्या साठी सामुदायीक शेती केली पाहीजे असा मोलाचा विचार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शेती संदर्भात केला आहे.

**निष्कर्ष**

१. शेतीच्या धारण क्षेत्राचा आकार लहान असल्यामुळे शेतीची उत्पादकता कमी आहे.
२. शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण अधिक आहे.
३. भारतात अल्प भुधारक व सिमांत शेतकऱ्यांचे प्रमाण अधिक आहे.
४. शेतमजुरांनला कामाचा दिला जाणारा मोबदला कमी असल्याने त्यांची स्थिती बिकट आहे.
५. जलसिंचन सुविधा अपुऱ्या असल्याने शेतीची उत्पादकता कमी आहे.

**संदर्भ**


१. मराठी अर्थशास्त्र परिषद त्रैमासिक,अर्थसंवाद एप्रिल-जुन २०१६
२. योजना, ८ जुन २००१ आणि डिसेंबर २००२ पृष्ठ क्र.१६,१७
३. गंगाधर पानतावणे १९८८, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडक लेख, प्रतिमा प्रकाशन,पुणे
४. कसबे रावसाहेब,आंबेडकर आणि मार्क्स, १९८५ सुगावा प्रकाशन पुणे
५. डॉ.विजया खंडाळे इगोले डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारीता,स्वरुप प्रकाशन औरंगाबाद २ मार्च १९१७
६. मनोहर पाटील,फुले आंबेडकर चळवळीचे क्रांतीशास्त्र,सुगावा प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती जुन २०१०

# भारतीय अर्थव्यवस्थेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान

**- प्रा. डॉ. राजू कथ्थु शिंदे**
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय देवपूर, धुळे

**सारांश**

अस्पृश्यतेच्या समस्येबाबत मानसिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, कायदेशीर अशा सर्वंच पातळयांवर सर्वंकष लढा देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशात महु या गावी झाला. त्यांचे मुळ घराणे रत्नागिरी जिल्हयातील अंबावडे हे होय.

आयुष्यभर खडतर ज्ञानसाधना करुन विधीशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र यात प्रभुत्व संपादन केले. दलित व पिडीत शोषीत वर्गासाठी त्यांच्या उन्नतीसाठी त्यांनी आपले संपुर्ण आयुष्य समर्पित केले. डॉ. आंबेडकरांचे कार्य केवळ दलितांसाठी नव्हतेच तर ज्यांना माणुस म्हणुन जगण्याचे हक्क देणेच बहुसंख्य माणसांनी नाकारले. धर्म-वर्ण-जात-लिंग-व्यवसाय यांच्या आधाराने ज्यांचे शोषण केले ज्यांच्या वाटयाला केवळ अपमान आणि दारिद्रय आणले अशा सर्वच वंचितांना त्यांनी आत्मसन्मानाचा मार्ग दाखविला. अर्थशास्त्र आणि डॉ. आंबेडकर यांचा खुप निकटचा संबंध होता. तत्कालीन परिस्थीतीत ब्रिटीशांनी भारतात जुलमी राजवट लागू केली. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था डबघाईस आली. त्यातच १९१४ चे पहिले महायुध्द, १९२९ ची जागतिक महामंदी, १९३९ चे दुसरे महायुध्द यामुळे जगातील बहुतांश अर्थव्यवस्था कोलमडुन गेल्या याला भारत ही अपवाद नव्हता. भारताला पुर्नउभारणीसाठी ठोस पाऊले उचलण्याची गरज होती. तेंव्हा दादाभाई नौरोजी, डॉ. आंबेडकर, म. गांधी, रानडे, गोखले यांचे विचार व मौलीक मार्गदर्शन भारताच्या आधुनिक जडणघडणीत उपयोगी पडले.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे शोध निबंध लिहिलेत, त्याकाळी त्यांनी जी भाषणे केलीत, वर्तमान पत्रातुन जे लिखाण केले, स्वतंत्र मजुर पक्षाचा जो जाहिरनामा मांडला आणि अर्थशास्त्रावरील जी पुस्तके लिहिली त्यामध्ये त्यांचे आर्थिक विचार दिसून येतात. डॉ. बाबासाहेबांनी इतर विचारवंताप्रमाणे नविन आर्थिक सिध्दांत जरी मांडले नसले तरी आर्थिक प्रश्नांसंबंधी त्यांनी आपले विचार मांडलेले आहेत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतातील दलित चळवळ

**– प्रा. ज्ञानेश्वर काशिनाथ भामरे**
समाजशास्त्र विभाग, गंगामाई एज्युकेशन ट्रस्टचे कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, नगांव, ता. जि. धुळे ( महाराष्ट्र)

**प्रस्तावना**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सामाजिक क्रांती प्रवाहाचे कृतीशील विचारवंत व नेते होते. २० व्या शतकातील महान विचारवंत, प्रकांड कायदेपंडित, थोर समाजसेवक, दुरदर्शी राजकारणी म्हणुन ते ओळखले जातात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही केवळ व्यक्ती नसून तो एक विचार आहे. डॉ. आंबेडकरांना सामाजिक व्यवस्थेत दलितांना स्थान हवे होते. आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक गुलामगिरीतुन अस्पृश्यांना मुक्त करावयाचे होते. ही गुलामगिरी अस्पृश्यांना दरिद्र्यात लोटते. दु:खात ओढते. वर्णव्यवस्थेची ही गुलामगिरी आंबेडकरांना उखडुन फेकायची होती. आंबेडकर स्वातंत्र्य, समता, बंधुता या विचारसरणीला महत्व देतात. त्यासाठी ते आत्मा-परमात्म, कर्मकांड, वाईट रुढी, परंपरा याविरुध्द बंड पुकारतात. जो धर्म मानवाच्या विकासाला स्थान देत नाही तो धर्म ते नाकारतात. आंबेडकरांनी विविध मासिके, ग्रंथ लेखन, आंदोलने करुन अस्पृश्यांना जागृत केले. अज्ञान, गरीबी, अंधश्रध्दा यात दलित समाज गाडला गेलेला होता, स्थाळी हळुहळु बाहेर ओढण्याचे काम दलित चळवळींनी केले.

प्रस्तुत 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतातील दलित चळवळ' या शोधनिबंधात डॉ. आंबेडकर आणि भारतातील दलित चळवळीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न संशोधकाने केलेला आहे.

**अभ्यासाचे उद्दिष्ट –** डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतातील दलित चळवळ यांचे अध्ययन करणे.

**अभ्यासाचे गृहितकृत्य –** डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित चळवळीच्या सहाय्याने दलित वर्गाला त्यांच्या हक्कांची जाणीव झाली.

**संशोधन पध्दती –** प्रस्तुत शोधनिबंधामध्ये विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केला असून या विषयाशी निगडीत शोधनिबंधातील विवेचन दुय्यम स्त्रोतांवर अवलंबुन आहे. यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, पुस्तके, वर्तमानपत्रातील बातम्या व लेख यांचा आधार घेतला आहे.

**विश्लेषण**

कोणतीही चळवळ समाजात आगंतुक निर्माण होत नसते. ती समाजाच्या गरजेतुन निर्माण होते. कोणत्याही चळवळीला तिची आपली एक भुमिका असते. तिला ध्येयप्रत नेणारे कृतिप्रवणशील धोरण असते. एक उद्दिष्ट व त्यानुसार कार्य असते, आणि त्या चळवळीला तिला एक अंतिम लक्ष्य असते. ते नव्या आकांक्षांनीयुक्त ध्येय स्वप्नच असते.

भारतातील दलित समाजाच्या उध्दारासाठी म. फुलेंपासून आंबेडकरांपर्यंत ज्यांनी ही चळवळ घडवुन आणली ती इतिहासात महत्वपुर्ण आहे. स्वातंत्र्योत्तर काळात देशातील दलित वर्गाचे प्रतिनिधीत्व करणारा भारतीय रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्याची त्यांची योजना होती. या योजनेला मुर्त स्वरुप देण्यासाठी त्यांच्या अनुयायांनी या पक्षाची स्थापना केली. या पक्षाने शासनावर सातत्याने दबाव आणुन आपल्या मागण्या मान्य करुन घेतल्या. माणसाला माणसाप्रमाणे जीवन जगता यावे हे त्यांचे ध्येय आज पुर्ण झालेले पहावयास मिळते हेच या दलित चळवळीचे यश आहे.

संघर्ष हा आपल्या इतिहासाचा आत्मा असतो, तर इतिहासातुन संघर्ष वगळला तर इतिहास निष्प्रभ होईल. मनुष्याला आज इतिहासाच्या किंवा जीवनाच्या प्रत्येक पातळीवर संघर्ष करावाच लागतो. हा संघर्ष सामुहिक किंवा व्यक्तीगत प्रकारचा असु शकतो. 'सामुहिक हित विकास साध्य करण्याकरीता जी सामुहिक पध्दतीच्या संघर्षाची प्रक्रिया कार्यान्वीत असते त्याला चळवळ असे म्हणतात.'

व्यक्ती किंवा समाजाला सतत बदल हवा असतो. व्यक्तीगत जीवन अथवा सामाजिक जीवन पध्दत जेंव्हा परिस्थिती आणि व्यवस्था यांच्या परिघामध्ये अडकते, तेंव्हा विकास अथवा बदल हा खुटलेला असतो. व्यवस्था आणि परिस्थितीच्या मर्यादा सीमा किंवा परीघ उध्वस्त करण्याकरीता चळवळ ही अटळ असते, एखादी सामुहिक चळवळ केल्यावर सामुहिक विकास व हेतु साध्य करता येतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यासाठी केलेली सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी आपल्या अस्पृश्य अन्यायाचा प्रतिकार करण्यास आणि न्याय हक्कांसाठी संघर्ष करण्यास शिकविले. अस्पृश्य हे याच देशाचे नागरीक असुन या देशावर कोणाही इतकाच त्यांना अधिकार आहे, असे त्यांना ठणकावुन सांगितले.

दलित चळवळीच्या सहाय्याने दलित वर्गाला त्यांच्या हक्कांची जाणीव करुन दिली. ज्यांना जागृत व संघटित केले. शिक्षणातुन त्यांच्यावर सुसंस्कार घडवुन आणले. चळवळीत सक्रीय सहभाग घेण्यास प्रवृत्त केले. संघटना बांधुन सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय विकास घडवुन आणण्याचे कार्य केले. शिक्षण, आरक्षण, राखीव जागा, पुरस्कार यामुळे दलित वर्गात जागृती घडून आली आहे. त्यामुळे दलित वर्गाला विशेष अधिकारांची जाणीव झाली. आर्थिक स्थैर्य लाभले. आधुनिक मुल्यांनी व नवविचारांनी त्यांच्या मनात घर केले, व आपली अस्मिता पायदळी तुडविणाज्या परंपरांच्या विरोधात तो सर्व ताकदीनिशी विद्रोह पुकारण्यास सिध्द झाला. नवमुल्यांचा आग्रह व विषय परंपरेचा निषेध करण्यासाठीची चालना दलित चळवळीतुन या वर्गाला मिळाली. त्यांच्यात अस्मितेच्या शोधाची, परंपरेच्या नकाराची, विषमतेविरोधी विद्रोहाची व समता स्वातंत्र्यवादी मुल्यांच्या पुरस्कारांची चळवळीची फलश्रुती म्हणजेच आज अस्तित्वात असलेले दलित साहित्य, दलित नियतकालिके, दलित रंगभुमी, दलित पँथर, मास

मुव्हमेंट, दलित मुक्तीसेना, प्रादेशिक विद्यार्थी संघटना, सम्यक क्रांती, आमचा लढा, संकल्प डिएस फोर, बामसेफ यासारख्या संघटनांचा उदय होय. दलितोध्दारांसाठी आवश्यक म्हटली तरी आज दलित चळवळीला जे विघटीत स्वरुप आले आहे त्यात व्यक्तीगत हेवेदावे, सत्तेसाठी राजकारण, पोटजातीवाद यावर आधारीत गटबाजी, वैचारीक दिवाळखोरी, संघटनात्मक विस्कळीतपणा, कुशल नेतृत्व, कुशल संघटक, सुसुत्र कार्यक्रम व संघटना यांचा अभावही मोठ्या प्रमाणावर दिसुन येत आहे. त्यामुळे सुरुवातीला व नंतर आंबेडकरांना अपेक्षित असलेली चळवळ बनु शकली नाही. दलित चळवळ ही केवळ संख्येच्या प्रमाणात राजकीय सत्तेचा वाटा मिळविण्याची सत्ताकांक्षी चळवळ होता कामा नये. धार्मिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक वगैरे सर्व क्षेत्रात गवसणी घालणारी समकक्ष चळवळ व्हावी. स्वावलंबन, स्वाभिमान यांच्याबाबत तडजोड न करता दलितांनी राज्यकर्ती जमात व्हावे या आंबेडकरांच्या अपेक्षा आजपर्यंत पुर्ण होऊ शकल्या नाहीत, असेच म्हणावे लागेल.

आजच्या दलितांच्या चळवळीला 'जनतेच्या चळवळी' नको आहेत. निदान त्यासंबंधी ते उदासिन आहेत, ही वस्तुस्थिती आहे. दादासाहेब गायकवाडांनी भुमिहिनांचा सत्याग्रह केला, तर त्याला संसदीय की असंसदीय म्हणून विरोध, रुपवत्यांचे उपेक्षित व्यासपीठ राजकीय म्हणुन विरोध, दलित मजुरांच्या आणि कोतवालांच्या ट्रेड युनियन्स कम्युनिस्ट किंवा लाल निशाण पक्ष चालवतो म्हणुन विरोध, 'एक गाव एक पाणवठा' ही चळवळ डॉ. बाबा आढाव चालवतात म्हणुन उदासिनता आणि गवई बौध्दांना राखीव हक्क मिळविण्यासाठी उपोषण धरतात, म्हणुन त्यांची टिंगल, हा सारा प्रकार म्हणजे दलित चळवळ संपुष्टात येत असल्याची लक्षणे आहेत.

**स्वांतत्र्योत्तर काळ आणि दलित समाज**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या विचार आणि कार्याची प्रेरणा घेऊन स्वांतत्र्योत्तर काळातील दलित चळवळ उभी राहिली. धर्मांतरामुळे दलितांच्या मानसिकतेमध्ये क्रांतिकारक बदल घडून आला. दलितांना नवे आत्मभान मिळाले. बहुसंख्य दलितांनी हिंदू धर्माचा त्याग केला. हिंदु देवदेवता नाकारल्या. हिदु समाजात चालत आलेल्या प्रथा-परंपरा झिडकारल्या. त्रैवर्णिकांची सेवा चाकरी नाकारली. धर्मांतराचे लोण खेडोपाडी पोहचले. त्यामुळे गावात बहिष्कार टाकला. त्यांचा छळ केला. दलितांना गाव बंद केले. त्यांचे काम बंद केले. त्यांची नाकेबंदी केली. तरीही दलितांनी गुलामी स्विकारली नाही. गावातील दलित-सवर्णांच्या तेढीतुनच परिवर्तनाचे नवे वारे वाहु लागले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनामुळे एखाद्या कुटुंबातील कर्ता माणूस मरण पावल्यानंतर कुटुंबाची जशी दैना व्हावी तशी दलित समाजाची अवस्था झाली. दलित चळवळीची अवस्था पोरक्या मुलासारखी झाली. दलित समाजात एक प्रचंड पोकळी निर्माण झाली.

**दलित युवकांच्या चळवळी**

स्वांतत्र्योत्तर काळातील दलित युवकांनी अनेक संघटना स्थापन केल्या. अनेक चळवळीत भाग घेतला. ह्यामध्ये दलित युवकांच्या दोन चळवळी बहुचर्चित ठरल्या. पहिली 'दलित साहित्य चळवळ' आणि दुसरी 'दलित पँथर' ही चळवळ. ह्या दोन चळवळी स्वातंत्र्येत्तर काळातील दलित तरुणांच्या मानसिक आंदोलनाची प्रतिके आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनानंतर दलित चळवळ काही काळ थांबण्यासारखी झाली होती. दलित समाज भांबावला होता. परंतु दलित पँथर च्या उदयामुळे दलित चळवळ पुन्हा गतिमान झाली.

दलित पँथरची स्थापना ९ जुलै १९७२ रोजीची आहे. म्हणजे स्वांतत्र्य मिळुन पाव शतक लोटले असतांना आणि बाबासाहेबांच्या निधनानंतर 'दलित पँथर' ची स्थापना झाली आहे. या सबंध काळात एकीकडे दलितांवर अन्याय, अत्याचार होत होते तर दुसरीकडे ह्या जुलुमाला वाचा फोडणारी प्रभावी अशी संघटना दलितांकडे नव्हती. दलितांना भेडसावणारे प्रश्न सुटत नव्हते. बाबासाहेबांच्या विचारांचा वारसा सांगणारा रिपब्लिकन पक्ष सत्ता, स्वार्थ, तडजोडी आणि गटबाजीने पोखरला होता. 'अस्पृश्यतेच्या प्रश्नांवर संघर्ष करण्यासाठी स्वतंत्र संघटना' नव्हती. जाती अंताच्या प्रश्नावर प्रखरपणे लढणारी संघटना असणे ही काळाची गरज होती.

१९७७ च्या सार्वजनिक निवडणुकीत दलित पँथरने कोणाला पाठिंबा द्यायचा यावरुन नामदेव ढसाळ आणि राजा ढाले ह्यांच्यात मतभेद झाले, आणि ह्या वादातुनच राजा ढाले यांनी 'दलित पँथर' ही संघटना बरखास्त केली आणि नव्या 'मास मुव्हमेंट' नावाच्या संघटनेची स्थापना केली. ह्यामुळे दलित पँथरचे विभाजन झाले. दलित पँथर (नामदेव ढसाळ) आणि मास मुव्हमेंट (राजा ढाले) असे दोन गट पडले. दलित पँथर बरखास्त झाल्यामुळे अनेक कार्यकर्ते हवालदिल झाले.

दलित पँथरच्या बरखास्तीनंतर अरुण कांबळे, भाई संगारे, रामदास आठवले, उमाकांत रणधीर, एस. एम. प्रधान, प्रीतमकुमार शेगावकर, वामन निबांळकर, दयानंद मस्के, टी. एम. कांबळे आणि यशपाल सरवदे ह्यासारख्या पँथर नेत्यांनी पँथरच्या बरखास्तीला आक्षेप घेतला आणि ह्यापुढे दलित पँथरची संघटना आम्ही चालवू अशी भुमिका जाहीर केली. दलित पँथरचे जाळे देशभर पसरले होते. त्यामुळे 'दलित पँथर'चे पुनरूज्जीवन करुन 'भारतीय दलित पँथर' असे नव्या संघटनेचे नामकरण केले. ह्या संघटनेचे अध्यक्ष म्हणुन अरुण कांबळे ह्यांची निवड करण्यात आली.

'भारतीय दलित पँथर' ही संघटना दलित तरुणांमध्ये लोकप्रिय झाली. परिणामी 'मास मुव्हमेंट' संघटना काही मर्यादित क्षेत्रातच आपला प्रभाव टिकवू शकली. दलित पँथर (नामदेव ढसाळ) मास मुव्हमेंट (राजा ढाले), भारतीय दलित पँथर (रामदास आठवले) आणि दलित मुक्तीसेना (प्रा. जोगेंद्र कवाडे) अशा दलित तरुणांच्या संघटना काम करु लागल्या. पुढे त्यांचा प्रभाव कमी झाला.

**विसावे शतक आणि दलित**

विसाव्या शतकाची दोन अर्धशतकात विभागणी करणे श्रेयस्कर ठरेल. पहिले अर्धशतक हे पारतंत्र्यविरोधी जाणीवांची ओतप्रोत भरलेले होते तर दुसरे अर्धशतक हे स्वातंत्र्य आणि लोक चळवळींनी भारलेले दिसते. दलितांच्या परिप्रेक्ष्यात ह्या संपुर्ण शतकाच्या अन्वयार्थ लावतांना हे महान शतक होते असेच म्हणावे लागेल. कारण ह्या शतकाने दलितांना आंबेडकरी विचार आणि प्रेरणा दिलेली दिसते. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्या मुक्तीसाठी दिलेला लढा हा विसाव्या शतकाचा प्राण आहे. ह्या शतकातील आंबेडकरी चळवळ आणि विचार हे पुढील शतकांना

प्रकाश देणारे आहेत.

पहिल्या अर्ध शतकातील दलितांची चळवळ ही आम्ही हिंदु आहोत. आम्हाला इतर हिंदुप्रमाणे समान हक्क आणि अधिकार मिळाले पाहिले ह्या विचाराने प्रेरीत झाल्याचे दिसते. तर दुसऱ्या अर्ध शतकातील दतिांची चळवळ ही हिंदु धर्माचा त्याग करुन बौध्द धर्माची कास धरणारी दिसते. पहिल्या अर्ध शतकातील महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह आणि नाशिक इथल्या काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह हे अभुतपुर्व आहेत. तर दुसऱ्या अर्धशतकातील दलितांचे दीक्षाभुमीवर झालेले धर्मांतर असो किंवा मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर असो, ह्या महान घटना आहेत. संपुर्ण शतकावर बाबासाहेब आंबेडकरांचा प्रभाव दिसून येतो. विसाव्या शतकाचा वैचारीक वेध घेत असतांना बाबासाहेब आंबेडकर ह्यांचा विचार आणि त्यांच्या प्रेरणेतून निर्माण झालेला विचार समजून घेतल्याशिवाय ह्या शतकाची विचारशैली कळणार नाही. ह्या काळाची नाडी तपासतांना फुले–आंबेडकरी विचारांचे ठोके मोजायचे असतील तर ह्या काळात झालेल्या निरनिराळ्या दलित साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषणे हीच उपयुक्त ठरु शकतील. म्हणुनच अरुण साधु ह्यांनी म्हटलेले आहे की, ‘आंबेडकरांनतरच्या काळात अनेक कारणांनी दलितांच्या अस्मितेचा लढा क्षीण व दुर्बल होत होता. त्या काळात दलित साहित्यानेच बळ दिले. दलित चळवळ आणि दलित साहित्य ह्या एकमेकांना वैचारीक रसद पुरविणाऱ्या पुरक सांस्कृतिक संघटना आहेत.’

**निष्कर्ष**

विसाव्या आणि एकविसाव्या शतकाच्या संधीकाळात दलितांचा राजकीय पक्ष दुफळीने दुर्बल झाला आहे. दलित तरुणांच्या दलित पँथर, मास मुव्हमेंट, दलित मुक्तीसेना ह्यासारख्या लढाऊ संघटनांचा प्रभाव कमी झालेला दिसतो. ‘दलित साहित्याला दलित साहित्य म्हणावे, बौध्द साहित्य म्हणावे, प्रबुध्द साहित्य म्हणवे, पविर्तनवादी साहित्य म्हणावे की आंबेडकरवादी साहित्य म्हणावे’ ह्या गोंधळलेल्या मानसिकतेमध्ये दलित लेखक हरवला आहे. आपला स्वार्थ सुरक्षित राहावा म्हणुन दलितांच्या काही शक्ती पुनरुज्जीवनवादी शक्तीबरोबर हातमिळवणी करीत आहेत. म्हणूनच योगीराज वाघमारे म्हणतात, बाबासाहेबांनंतर खंबीर नेतृत्व का निर्माण होत नाही ह्याचा शोध घेतला पाहिजे. योगीराज वाघमारे ह्यांच्या प्रश्नाचे उत्तर एकविसावे शतकच देईल. सध्या दलित चळवळ एकविसाव्या शतकाकडे झेप घेण्याच्या तयारीत आहे. ही टेक–ऑफची अवस्था आहे इतकेच.

भारतातील दलित समाजाच्या उद्धारासाठी म. फुलेंपासुन आंबेडकरांपर्यंत ज्यांनी ही चळवळ घडवून आणली ती इतिहासात महत्त्वपुर्ण आहे. स्वांतत्र्योत्तर काळात देशातील दलित वर्गाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या चळवळी उदयास आल्याचे दिसते.या चळवळींनी शासनावर सातत्याने दबाव आणून आपल्या मागण्या मान्य करुन घेतल्या. माणसाला माणसाप्रमाणे जीवन जगता यावे हे त्यांचे ध्येय आज त्यामुळे पुर्ण झालेले पहावयास मिळते हेच या दलित चळवळीचे यश आहे असे अभ्यासकांस वाटते.

**संदर्भ**

१) डॉ. मेश्राम योगेंद्र – ‘दलित साहित्य उद्‌गम आणि विकास’
२) संपादक – डॉ. नंदपुरे ईश्वर – ‘साहित्य : ग्रामीण आणि दलित : (डॉ. मदन कुलकर्णी गौरव ग्रंथ)’
३) संपादन – प्रधान ग. प्र. जाधव रा. ग. निवडक साधना ग्रंथसंच : खंड –४ ‘चळवळी व आंदोलने’
४) डॉ. निकम छाया – ‘दलित कथा : निर्मिती आणि समीक्षा’
५) डॉ. मोकाशी मधुकर – ‘दलित रंगभुमी आणि नाट्य चळवळ’
६) प्रा. सौ. राठी शुभांगी – ‘महाराष्ट्राचा सामाजिक व राजकीय अभ्यास’
७) डॉ. कुलकर्णी व्ही. जी. प्रा. सोमवंशी कांत – ‘भारतीय राजकीय विचारवंत’
८) डॉ. फडके य. दि. – ‘आंबेडकरी चळवळ’
९) कसबे रावसाहेब – ‘दलित चळवळीची वाटचाल’
१०) श्री. शहा घनश्याम, प्रा. वेंगुरलेकर योगिनी – ‘सामाजिक चळवळी आणि सरकार’
११) डॉ. देवगांवर एस. जी. – ‘सामाजिक चळवळी परंपरागत आणि नवीन’
१२) डॉ. ठाकुर हरिनारायण – ‘भारत में पिछडा वर्ग आंदोलन और परिवर्तन का नया समाजशास्त्र’

# कृषी उद्धारक : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**– प्रा. परदेशी भगवान ईश्वरलाल**
इतिहास विभाग, श्रीमती एच. आर. पटेल कला महिला महाविद्यालय
शिरपूर, जि. धुळे

**प्रास्ताविक**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. आजही बहुतांश लोकांचा शेती हाच व्यवसाय आहे. या शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी त्यांच्या दैन्य व्यवस्थेशी वाचा फोडली तरी महात्मा फुले यांनी आपल्या 'शेतकऱ्यांचा आसूड' मधून १९ व्या शतकात अनेक समाजसुधारक होवून गेलेत. परंतू एकूण भारतीय परंपरेमध्ये शेतीचा, शेतकऱ्यांचा कष्टकऱ्यांच्या वेदनेचा कुणी एवढ्या गंभीरपणे विचार केला नव्हता. हा विचार म. फुले यांनी सर्वप्रथम मांडला. त्यानंतर शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी कष्टकऱ्यांच्या दु:खाविषयी महत्त्वाचा विचार २० व्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडला.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक तथा शैक्षणिक विचार जगप्रसिद्ध आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९१८ मध्ये 'भारतातील अल्पभुधारक' हा ग्रंथ लिहून शेतीच्या अर्थशास्त्रावर भर दिला. भारतातील शेतीच्या अनेक समस्यांशी शेती उत्पादन जुडलेले आहे. शेतीचे लहान लहान विखुरलेले तुकडे शेतीच्या कसा परिणाम करतात. याविषयीचे विश्लेषण या भारतातील अल्पभूधारक या निबंधातून करतात.

भारतीय अर्थव्यवस्थेसंबंधी भूमीहीन, अल्पभूधारक मजूर, खोतीपद्धती, महारवतन, जमीन महसूल, वहिवाटीचे प्रश्न, सामुदायिक शेती आदि वेगवेगळ्या विषयांवर विचार मांडलेत त्यांच्या या कृषी चिंतनातून त्यांची जगमान्य कृषीतज्ञ म्हणून ओळख होते.

**उद्देश –** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कृषीविषयक धोरणांचा अभ्यास करणे.

**गृहितके –** कृषी क्षेत्रातील धोरण व समस्या जाणून घेणे.

**संशोधन पद्धती –** प्रस्तुत शोध निबंधासाठी वर्णनात्मक पद्धतीचा वापर केलेला आहे. तसेच दुय्यम साधनांचा (संदर्भ ग्रंथ) वापर केलेला आहे.

**विषय विवेचन**

प्रज्ञासुर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे एक असामान्य प्रतिभावंत कायदा समाजशास्त्र, राज्यशास्त्र आणि मानववंशशास्त्र अशा अनेक शास्त्रज्ञांमध्ये तसेच समाजकारण, धर्मकारण, राजकारण आणि पत्रकारीता अशा विविध क्षेत्रांमध्ये डॉ. आंबेडकरांनी बहुमोल कामगीरी बजावलेली असली तरी ते पुर्णत: अर्थतज्ञ होते.

अमेरीकेच्या कोलंबिया विद्यापीठाने १९१५ साली एम.ए. आणि १९१७ पीएच. डी. या पदव्या त्यांना प्रदान केल्या. १९२१ साली 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स'मधून डॉ. आंबेडकरांनी 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही अत्युच्च पदवी मिळवली. डॉ. आंबेडकरांनी अर्थशास्त्रावर तीन ग्रंथ लिहिले. १) ॲडमिनीस्ट्रेशन ॲन्ड फायनान्स ऑफ दी इस्ट इंडिया कंपनी २) इव्होल्यूशन ऑफ द प्रोव्हीन्शियल फायनान्स ॲन्ड सोल्युशन ३) दि प्रॉब्लेम ऑफ रुपी इट्स ओरिजिन ॲन्ड सोल्युशन. हे तीन ग्रंथ एम.ए. पीएच. डी. आणि 'डॉक्टर ऑफ सायन्स' या तीन पदव्यांसाठी लिहिलेले प्रबंध होत.

आंबेडकरांचे अर्थशास्त्रीय लेखन प्रामुख्याने आर्थिक समस्यांशी निगडीत असून देखील त्यांचा दूरदर्शीपणा त्यांचे लेखन देशाच्या आर्थिक समस्यांवर अगदी आजही प्रकाश पाडू शकते.

प्रस्तुत शोधनिबंधात आंबेडकरांचे भारतातील शेतीविषयक विचार विशद करण्याचा प्रयत्न केला आहे.

**१) भारतातील लहान धारण क्षेत्रे आणि त्यावरील उपाय**

भारतातील लहान धारणक्षेत्रे आणि त्यावरील उपाय हा आंबेडकरांचा लेख म्हणजे भारताच्या शेती प्रश्नावरील अत्यंत मुलभूत अशा प्रकारचे भाष्य होय. त्यानंतरच्या काळात भारतात शेती क्षेत्रात अत्यंत महत्वपुर्ण व गुणात्मक असे बदल झाले आहेत.

जमीन सुधारणाविषयक कायदे हा पहिला महत्त्वाचा बदल होय. १९६७-६८ च्या दरम्यान शेतीक्षेत्रात झाले. 'हरीतक्रांती' हा दुसरा बदल.

आंबेडकरांच्या मते किफायतशीर धारणक्षेत्र म्हणजे जमीन भांडवल व श्रम हे सर्व उत्पादक घटक इष्टतम प्रमाणात उपलब्ध असणे होय. लहान धारण क्षेत्र ही शेतीची समस्या नसून भांडवल व तत्वज्ञ साधनसामुग्रीचा तुटवडा ही खरी समस्या आहे. धारणक्षेत्राचे आकारमान मोठे करणे हा भारतातील शेती समस्येवर उपाय नसून भांडवल व तत्सम साधन सामग्रीची उपलब्धता वाढविणे हा खरा उपाय आहे.

आंबेडकरांच्या मते, भारतातील शेती मधून अतिरिक्त उत्पादन न झाल्यामुळे भांडवलाचा तुटवडा निर्माण होणे, ही शेतीची खरी समस्या आहे. उदाहरणार्थ १८९५ मध्ये भारतात लागवडीखाली जमिनीमध्ये दरडोई प्रमाण एक एकर इटली १.७५ एकर, फ्रान्स २.३० एकर, आयर्लंड ३.३० एकर, रशिया ५६० एकर, अमेरीका ८.९० एकर असे होते.

भारतातील शेतीप्रश्न सोडविण्यासाठी स्थितीवर मात करण्यासाठी 'औद्योगिकीरण' सुचविले आहे. त्यामुळे शेती क्षेत्रातील अनावश्यक व बेकार श्रमउत्पादक अशा बिगर शेती क्षेत्रात सामावून घेतल्यामुळे अशा श्रमांना यापुढे दुसऱ्यांच्या श्रमावर उपजिवीका करण्याचे कारण करणार नाही. तसेच जमिनीपासून मिळणारा कायदास संपुष्टात येऊन जमिनीवरील भार कमी होईल.

**२) शेतकऱ्याचा प्रश्न**

केसरीचा ता २८ जुलैच्या अंकात 'शेतसारा किती घ्यावा?' या मथळ्याखाली जो अग्रलेख आला आहे तो वाचून सुचलेले विचार

आपल्याकडे प्रसीद्धीकरीता लिहून पाठवित आहे.

हिंदुस्थानच्या विपन्न दशेची मीमांसा करतांना जो वाद उत्पन्न होतो त्यात अनेक प्रकारची कारणे देण्यात येतात. त्यात शेतसाऱ्याची चालू पद्धत हे एक महत्त्वाचे कारण आहे.

पहिला मुद्दा असा आहे की, सरकार शेतसाऱ्याचे प्रमाण शेतीच्या उत्पन्नाच्या मानाने इतके जबरदस्त आहे की, शेतसारा भागविल्यानंतर शेतकऱ्याच्या पदरी आपल्या उपजीवकेसाठी काहीच करता येत नाही. त्यामुळे शेतकरी हा नेहमीच दुष्काळपीडीत असतो. यावरुन शेतसारा किती असा प्रश्न निष्पन्न होतो.

दुसरा मुद्दा असा आहे की, शेतसारा हा शेतकीच्या उत्पन्नाशी जरी प्रमाणबद्ध असला तरी त्याचा भरणा उत्पन्नावर अवलंबून नाही. म्हणजे शेतकऱ्याला जरी उत्पन्न झाले नाही तरी ठराविक शेतसारा हा त्यास द्यावा लागतोच. लँड रेव्हिन्यू कोडाच्या १०७ व्या कलमात शेतसारा ठरवितांना शेती जमीनीचे उत्पन्न लक्षात घ्यावे असे म्हटले आहे. माझ्या मते शेतकऱ्यांच्या पद्धतीचे अनिष्ट परिणाम जर आपणास टाळावयाचे असतील तर आपल्याला शेतीच्या उत्पन्नावर कर बसवणे हे लँड रेव्हिन्यू कोड कलम १०७ मध्ये गोवलेले तत्त्व झुगारुन दिले पाहिजे व त्याऐवजी शेतसारा व इन्कमटॅक्सच्या कायद्याखाली आणला पाहिजे.

**३) खोती ऊर्फ शेतकरी वर्गाची गुलामगिरी**

कोकणात रत्नागिरी व कुलाबा या जिल्ह्यांमध्ये खोती पद्धती प्रचलीत आहे. शब्दश: खोत म्हणजे मक्तेदार असा अर्थ आहे

खोत गावातला एक लहानसा सुलतान असतो. जेव्हा गावाची खोती वेगवेगळ्या लोकांमध्ये व त्यांच्या अनेक घराण्यांमध्ये हिस्से सरशीने विभागले असते तेव्हा अनेक सुलतानांचा जुलुम गावातल्या शेतकऱ्यांना सोसावा लागतो. खोतीमध्ये शेतकऱ्यांवर कराचा बोजा पडतो. शेतकऱ्यांची गुरे चरणीस गेली असता कोंडवाड्यात घालणे. गावातली चराईची जमीन खरोखर संबंध गावाच्या मालकीची असता तिच्यावर खोत आपला हक्क गाजवित असतो.

खोताच्या जुलुमाला दुसरा सर्वात वाईट प्रकार म्हणजे वेठीच्या कामाची पद्धती होय. खोताच्या 'खाजगी' म्हणून काही जमीनी असतात. या जमीनीमधील सर्व लागवडीची सर्व कामे खोत लोक वेठीने करुन घेतात शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण मिळू नये. यासाठी प्रयत्न करीत असतात.

गुजरातमधील 'काली परज' किंवा 'राणी परज' नावाची जात यांच्यावर जसा सामाजिक जुलुम होतो, तसा खोतीपद्धती खालील कुणबी जातीच्या लोकांवरही जुलुम होतो. खोती प्रदेशातील शेतकऱ्यांना माणूसकीचे हक्क पुन्हा मिळवून दिले पाहिजेत. यासाठी खोती पद्धती समूह नष्ट केली पाहिजे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायदे कौन्सिलमध्ये खोतीसंबंधीचे एक बिल आणण्याचे ठरविले तसे त्यांनी चिपळूणच्या शेतकरी परिषदेमध्ये जाहीर केले.

**४) सहकारी शेती**

भारतातील शेतीची समस्या सोडविण्याचा एक मार्ग म्हणून आंबेडकरांनी सहकारी शेतीचाही पुरस्कार केलेला दिसतो. ते म्हणतात, एका विशिष्ट आकारांची सहकारी शेते अस्तित्वात आणल्यास आपल्याला (श्री. ॲन्डरसन यांच्या) प्रस्तुत विधेयकात दोन तरतूदी सुचविल्या होत्या. पहिली म्हणजे स्थावर (प्रामुख्याने जमीन) मालमत्तेच्या विभाजनावर नियंत्रण यामुळे वारस हक्कानुसार एका ठरावीक आकारापलीकडे जमीनीचे तुकडे पडणार नाहीत. व दुसरी एकसंघ धारण क्षेत्राची विक्री.

अभिप्रेत असलेली उद्दिष्ट्ये साध्य करता येतील मुख्य म्हणजे आपल्याला छोट्या शेतकऱ्यांना त्यांच्या विनाशापासून वाचविता येईल. सहकारी शेतीमुळे शेतकऱ्यांच्या जमीनीवरील मालकी हक्क अबाधीत राहील. अर्थात लागून असलेल्या धारण क्षेत्राला जोडल्याशिवाय त्यात आपले धारणक्षेत्र कसण्याची मुभा असणार नाही. अशा तरतूदीमुळे सहकारी शेतीचे लागवडीखाली एकूण जमीन प्रमाणित आकारमानाइतकी किंवा त्याहूनही जास्त होईल. सहकारी शेत जसे मोठ्या आकाराचे असेल ते एकसंघ असेल.

**५) सामुदायीक शेती आणि शासकीय समाजवाद**

'राज्ये' आणि 'अल्पसंख्याक' या मसुद्यात विवेचन केल्याप्रमाणे शेती हा शासकीय उद्योग असावा असे आंबेडकरांचे मत होते. मुलभूत उद्योग आणि विमा याप्रमाणे सर्व जमीन शासनाने स्वत:च्या ताब्यात द्यावी अशी त्याची शिफारस होती. मग ती जमीन खाजगी व्यक्तीच्या मालकीची असो, कुठे महणून असो की त्यांच्याकडे ती गहाण असो मात्र ज्यांच्याकडून जमीन घेतली जाईल त्यांना योग्य ती नुकसान भरपाई दिली जावी. याबद्दल त्यांचा आग्रह होता. शासनाने ताब्यात घेतल्यानंतर तिचे ठराविक आकाराचे भाग करुन ते गावातील रहिवाश्यांना खालील अटींवर कसण्यासाठी द्यावेत.

१) सामुदायिक शेतीबाबत शासनाने तयार केलेले अधिनियम व मार्गदर्शक तत्त्वे यानुसार शेत कसण्यात यावे.

२) जात व तत्सम कोणत्याही गोष्टींच्या आधारे गावकऱ्यांमध्ये भेदभाव न करता सर्वांना सामुदायिक शेतीमध्ये सामावून घेतली जाईल.

३) शेती उत्पादनातून शासनाला योग्य तो हिस्सा देवून झाल्यावर ठरलेले उत्पादन जमीन कसणाऱ्या गावकऱ्यांनी आपआपसात वाटून घ्यावे.याबाबत शासनाला खालील अधिकार असतील.

१) शेती उत्पादनावर शेतसारा, जमीनदारांना द्यावयाची नुकसान भरपाई व शासनाने पुरविलेल्या भांडवलाचा वापर यासाठी कर बसविणे.

२) सामुदायिक शेतीच्या अटींचा भंग करणाऱ्या वा अन्य कोणत्याही प्रकारे सामुदायिक शेतीच्या तत्वांना बाधा आणण्याऱ्या सभासदांना योग्य ती शिक्षा फर्मविणे.

आंबेडकरांनी या योजनेला 'शासकीय समाजवाद' असे नाव दिले सदर योजना राज्यघटना अस्तित्वात आल्यापासून दहा वर्षाचा आत अंमलात आणण्यात यावी. अशी त्यांच शिफारस होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्यपुर्व काळात शेती आणि शेतकरी यांच्या विकासासाठी खूप प्रयत्न केले त्यांनी हिमालयात वितळणाज्या नद्यांचे पाणी दक्षिणेतील नद्यांमध्ये सोडण्यासाठी नदी जोड प्रकल्पाची भूमिका मांडली. भारतात रेल्वे बोर्ड आहे त्याप्रमाणे

नद्यांचे बोर्ड असावे. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. आज आपण २१ व्या शतकात वावरत असतांना देखील शेतीसंबंधी व शेतकऱ्यांच्या समस्या आजही पहावयास मिळतात. भारतीय कृषीक्षेाात निराशेचे वातावरण दिसत आहे. अशा पार्श्वभूमीवर आपल्याला आजही डॉ. बाबासाहेब व म. फुले यांच्या शेतीविषयक धोरणांची गरज आहे.

**सारांश**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. आजही बहुतांश लोकांचा शेती हाच व्यवसाय आहे. अमेरीकेच्या कोलंबिया विद्यापीठाने १९१५ साली एम.ए. आणि १९१७ पीएच. डी. या पदव्या त्यांना प्रदान केल्या. १९२१ साली 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' मधून डॉ. आंबेडकरांनी 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही अत्युच्च पदवी मिळवली. डॉ. आंबेडकरांनी अर्थशास्त्रावर तीन ग्रंथ लिहिले. भारतातील लहान धारण क्षेत्रे आणि त्यावरील उपाय, शेतकऱ्याचा प्रश्न, खोती ऊर्फ शेतकरी वर्गाची गुलामगिरी, सहकारी शेती, सामुदायीक शेती आणि शासकीय समाजवाद इत्यादी विचारातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेती संबंधी व शेतकऱ्यांच्या संबंधी विचार मांडलेले आहेत

**निष्कर्ष**

वरील अभ्यासावरुन असे दिसून येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेती व शेतीशी संबंधीत समस्या या संदर्भात विचार मांडलेले आहेत. आज आपण २१ व्या शतकात वावरत असतांना देखील शेतीसंबधी व शेतकऱ्यांच्या समस्या पहावयास मिळतात. त्यामुळे आजही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शेतीविषयक धोरणांची गरज आहे.

**संदर्भ**

१) डॉ. गंगाधर पानतावणे – डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांचे निवडक लेख, प्रतिमा प्रकाशन, पुणे प्र. आ. १५ जून २००९.
२) प्रा. केशव मेश्राम, वामन निंबाळकर, प्रा. वा. ह. कल्याणकार, अर्जुन डांगळे, डॉ. एस. एस. भोसले, हरी नरके,डॉ. बाबासाहेब आंबडेकर गौरवग्रंथ, महाराष्ट्र राज्य आणि साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, तृतीय आवृत्ती नोव्हेंबर २००६.
३) प्रा. गौतम थोरात, प्रा. मधुकर देसले, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, बहुजन साहित्य प्रसार केंद्र नागपूर, प्र. आ. १४ एप्रिल २०१५.
४) लोकराज्य (मासिक) वर्ष ६७ वे अंक १०, एप्रिल २०१६
५) सम्राट (वृत्तपत्र) अंक ९ दिनांक १४ एप्रिल २००७.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषीची भूमीका

**– प्रा. सतिश हरलाल पारधी**
कै. न्हानाभाऊ म.तु. पाटील कला महाविद्यालय
मारवड, ता. अमळनेर, जि. जळगांव

**प्रस्तावना**

कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. आजही देशातील बहुतांश लोकसंख्या ही कृषीवर अवलंबुन आहे. भारतीय कृषी मान्सुनवर अवलंबुन आहे. बहुतांश शेतकरी आजही कोरडवाहू शेती करतांना दिसून येतात. देशात कधी ओला तर कधी कोरड्या दुष्काळाला सामोरे जावे लागते. अशी परिस्थिती असतांना वाढत्या लोकसंख्येचा अन्नधान्याचा प्रश्न निर्माण होत आहे.

ओला व कोरडा दुष्काळ, कृषीची उत्पादकता कमी, धारण क्षेत्राचा आकार कमी, वाढत जाणाज्या तुकडीकरण, कृषी पुरक व्यवसाय व उद्योगांची कमतरता, वाढत्या आदानांच्या किमती, जल सिंचन विषयक साधनांची कमतरता, शेत मजुरांची कमतरता, मध्यस्थांची लांबलचक साखळी, सावकाराचे वर्चस्व, साठवणुक सुविधांचा अभाव या समस्यांबरोबरच कृषी उत्पादीक मालाला योग्य भाव मिळत नाही. या सर्व कारणांमुळे शेतकरी दयनीय अवस्थेत जीवन जगत असतांना एक वेळ आत्महत्येचा मार्ग देखील त्याने स्विकारला आहे. कृषी मध्ये अमुलाग्र स्वरुपाचा बदल अपेक्षीत असतांना आज देखील परंपरागत पध्दतीची शेती केली जात असून यातून शेतकरी, शेत मजूर आणि लघु कारागीरांची वाईट स्थिती आज दिसत आहे. भारताला स्वातंत्र मिळून ७० वर्षानंतर देखील आज भारतीय कृषीने बदल स्विाकरल्याचे दिसत नाही. या वरील प्रकारच्या कृषी विषयक समस्यांची सोडवणूक करण्यासाठी व देशाला आर्थिक विकासाची दिशा देण्यासाठी आज पुन्हा गरज निर्माण झाली आहे. ती म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अष्टपैलु व्यक्तीमत्व होते. अर्थशास्त्र विषय घेऊन त्यांनी शिक्षण पुर्ण केले. भारतीय अर्थव्यवस्थेची जाण त्यांना पुर्ण होती. शेती, शेतकरी, शेतमजुर आणि लघु व्यवसायिक या विषयी मार्गदर्शन त्यांच्या विचारातून व लेखनीतून जगासमोर आले. भारतीय शेतच्या संदर्भात १९१८ साली त्यांनी 'भारतातील लहान धारण क्षेत्र आणि त्यावरील उपाय' या लेखात शेती विषयी अनमोल असे लिखाण त्यांनी केले. त्यांनी मांडलेल्या विचाराचा आधार घेत देशाला प्रगती साध्य करावयाची आहे.

**कृषीचे लहान धारण क्षेत्र**

भारतासमोर वाढती लोकसंख्या आणि घटती कृषीची उत्पादकता हा चिंतेचा विषय आहे. वाढत जाणाऱ्या लोकसंख्येमुळे व धारण क्षेत्राच्या लहान क्षेत्रामुळे कृषीची उत्पादकता दिवसेंदिवस घटत जात आहे. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९१८ साली 'भारतातील लहान धारण क्षेत्र आणि त्यावरील उपाय' या लेखात त्यांनी स्पष्टपणे लिखाण केले. त्यांच्यामते जर शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करायची असेल तर शेतीचे होणारे तुकडीकरण थांबविले पाहिजे. धारण क्षेत्राचा आकार जर लहान असेल तर शेतकऱ्याला अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. वारसा हक्कानुसार शेत जमीन हस्तांतरीत न होता शेतीचा धारण क्षेत्राचा आकार कमी होणार नाही याविषयी डॉ. आंबेडकरांनी प्रमुख विचार मांडले.

कृषी विषयी त्यांनी आपल्या लेखात चार प्रश्नांवर अधिक भर दिला ज्यात शेतीत काय पिकवावे? शेतीसाठी लागणाज्या साधनांचे उत्पादन कसे करावे? शेतीच्या गटाचे क्षेत्र किती असावे? शेत जमीन धारणेचे प्रमाण कोणते असावे? या प्रमुख प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी शेतकज्यांना मार्गदर्शक ठरतील अशा प्रमुख उपाययोजना डॉ. आंबेडकरांनी सुचविल्या.

जगातील इतर देशांच्या तुलनेत भारतीय शेतीची उत्पादकता कमी आहे. या मागचे प्रमुख कारण शेतजमीनीचे होत जाणारे तुकडीकरण हे आहे असे स्पष्ट मत डॉ. आंबेडकरांनी मांडले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे ग्रंथ**

1. Administration an Finance of the East India company
2. Evaluation of provincial Finance in British India
3. The Problem of rupee its origin and solution

डॉ. आंबेडकरांनी अर्थशास्त्रातून प्रामुख्याने या वरील ग्रंथांचा उल्लेख करावा लागेल. एक महान अर्थतज्ञ म्हणून डॉ. आंबेडकरांचा उल्लेख जगात केला जातो.

**कृषी आणि कृषी आधारित उद्योग**

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे महत्त्वाचे योगदान असतांना डॉ. आंबेडकरांच्या मते फक्त कृषिक्षेत्राचाच विकास होणे अपेक्षीत नसून त्याचबरोबर कृषी आधारीत उद्योगांचा देखील विकास होणे अपेक्षीत आहे. यासाठी सरकारने कृषी उद्योगांच्या विकासावर भर देणे गरजेचे आहे.

सरकारने कृषी आधारित उद्योगांवर भर देण्यासाठी कर्ज पुरवठा करावा यातून रोजगार निर्मितीला चालना मिळेल व कृषी क्षेत्राचा विकास देखील होण्यास मदत होईल. असा दुरदृष्टी विश्वास डॉ. आंबेडकरांना अपेक्षीत होता. कृषीचे सरकारने राष्ट्रीयकरण करावे आणि कृषी विकासासाठी सरकारने वित्तीय बँक अंतर्गत शेतकज्याला देखील वेळोवेळी कर्जाची उपलब्धता करुन देणे गरजेचें आहे.

**शेत मजूरांविषयी विचार**

कृषी क्षेत्रातील शेतमजुर हा देखील महत्त्वाचा घटक आहे. शेतजूराला रोजगार, शिक्षण, आरोग्य, निवाऱ्याच्या सुविधा मिळणे गरजेचे आहे. त्यांची होणारी पिळवणूक थांबली पाहिजे. शेत मजूर हा

पुर्णत: शेतीवर अवलंबून आहे. हंगामा व्यतीरिक्त काळात त्याला देखील रोगाराच्या संधी उपलब्ध होणे गरजेचे आहे. व त्याच्या राहणीमानात सुधारणा होणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षीत होते.

**कृषीची सद्यस्थिती**

१९९१ च्या जागतिकीकरण, उदारीकरणाचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्था जगाच्या इतर अर्थव्यवस्थांशी जोडली गेली. देशात परकीय गुंतवणूकीचे आगमण झाले याचा प्रतिकुल परिणम परकीय गुंतवणूक दारांनी शेतकज्यांच्या शेतजमीनी ताब्यात घेतल्या. शिवाय देशी लघु उद्योगांच्या स्पर्धेत बहुराष्ट्रीय कंपन्या आल्यामुळे मोठ्या प्रमाणात लघु उद्योग बंद पडु लागले. जगातील सहावी मोठी अर्थव्यवस्था म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेकडे पाहिले जात असतांना कृषीत देखील अमुलाग्र बदल होणे अपेक्षीत आहे. आज देखील शेती करणे परवडणारे नसल्यामुळे शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढतच गेले. तुकडीकरण, परंपरागत तंत्रज्ञान, सावकाराचे अस्तित्व, कृषी मालाला भाव नाही, नैसर्गीक प्रतीकुलता या व इतर कारणांमुळे आज पुन्हा कृषी क्षेत्रात हरीतक्रांतीची गरज निर्माण झाली आहे. ही हरीतक्रांती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखविलेल्या मार्गांनी व विचारांनी होणे शक्य आहे.

**संदर्भ**


१. एम. आर. इंगळे, वर्तमान परिस्थिती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची आवश्यकता, प्रशांत पब्लीकेशन, जळगांव, २०१२ पृ. २४६, २६३, ३२२, ३५९, ४३४

२. धनंजय किर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००६

३. तुकाराम जाधव, महेश शिरापुरकर, भारतीय राजकीय व्यवस्थेचा आकृतीबंध खंड १ भारतीय राज्य घटना व घटनात्मक प्रक्रिया, द युनिक ॲकॅडमी, पुणे २०११

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार

– प्रा. डॉ. अरुण उखा पाटील
अर्थशास्त्र विभाग, वि. वि. मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय
अक्कलकुवा, जि. नंदुरबार

**प्रस्तावना**

जगातील कोणत्याही देशाचा विकास हा त्या-त्या देशातील राजकारणी आणि विविध क्षेत्रातील तत्त्वज्ञानी व्यक्तींच्या सहभागातून होत असतो. जगातील अशा सर्व तत्त्वज्ञांनी आपापल्या क्षेत्रात अजरामर अशी कामगिरी बजावलेली आहे. त्यातीलच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक जागतिक किर्तीचे तत्त्वज्ञ होऊन गेले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्राचे गाढे व्यासंगी होते. भारताच्या व जगाच्या अर्थव्यवस्थेची संशोधनात्मक, निर्भिडपणे व तर्कशुद्ध मांडणी करून देशाच्या विकासासाठी आणि सामाजिक कल्याणासाठी कोणते आर्थिक धोरण स्विकारले पाहिजे याचे अभ्यासपूर्ण विश्लेषण बाबासाहेबांनी केले. तत्कालीन समाज व्यवस्थेने बाबासाहेबांना अर्थतज्ञ म्हणून मान्यता दिलेली नसली तरी आधुनिक काळात मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक आर्थिक विचारवंत किंवा अर्थतज्ञ म्हणून उदयास आले, हे मात्र विसरता येणार नाही.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये**

१) बाबासाहेब आंबेडकर यांचे भारताच्या विकासाबाबत विचार अभ्यासणे.

२) बाबासाहेबांच्या विचारांचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम अभ्यासणे.

**औद्योगिक पायाभरणी**

१९२६ मध्ये बाँबे लेजिस्लेटीव्ह असेम्ब्लीचे सदस्य असतांना ग्रामीण भागातील गरिबांच्या समस्यांविषयी त्यांचे जे समग्र आकलन होते त्याचे प्रतिबिंब त्यांनी उभारलेल्या जनआंदोलनामध्ये प्रतिबिंबीत होते. शेतीमधील खोती पद्धतीविरूद्ध त्यांनी उभारलेल्या यशस्वी आंदोलनामुळे अनेक ग्रामीण कष्टकऱ्यांची आर्थिक शोषणातून मुक्तता झाली. महार वतन या नावाखाली सुरू असलेल्या गुलामगिरीविरूद्ध आवाज उठविल्यामुळे ग्रामीण भागातील मोठा गरीबांचा वर्ग शोषणमुक्त झाला. त्यांनी सावकारांच्या मनमानी विरूद्ध असेम्ब्लीमध्ये विधेयक आणले.

औद्योगिक कामगार क्षेत्रामध्ये त्यांनी १९३६ मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. या पक्षाने अस्पृश्य कामगारांच्या मानवाधिकारांना वाचा फोडली. बाबासाहेब व्हॉइसरॉय एक्झिकेटीव्ह कौन्सिलचे सदस्य असतांना १९४२ ते १९४६ या काळात त्यांनी कामगारविषयक धोरणात आमुलाग्र सुधारणा घडवून आणल्या. त्यात सेवायोजन कार्यालयाची स्थापना ही महत्त्वपूर्ण घटना ठरली आणि तेथूनच औद्योगिकरणाच्या पायभरणीला भारतीय अर्थव्यवस्थेत खऱ्या अर्थाने सुरूवात झाली. बाबासाहेबांनी पाटबंधारे, ऊर्जा आणि इतर सार्वजनिक बांधकामे ही खाती सांभाळली. देशाचे पाटबंधारे धोरण निश्चित करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. दामोदर व्हॅली प्रकल्प हे त्याचेच उदाहरण आहे.

**श्रमाचे विभाजन आणि अर्थशास्त्र**

जातीव्यवस्था आणि अस्पृश्यतेसारख्या सामाजिक आजारांचे आर्थिक पैलू उलगडून दाखविणे हे बाबासाहेबांचे आणखी एक विद्वत्तापूर्ण कार्य म्हणावे लागेल. श्रम विभागणीच्या तत्त्वानुसार महात्मा गांधींनीही जातीव्यवस्थेचे अस्तित्व स्वीकारले होते. परंतु बाबासाहेबांनी 'जातीचा उच्छेद' या ग्रंथात त्यावर प्रखर टिका केली होती. जातीव्यवस्थेमुळे केवळ श्रमाची विभागणी केली गेली नसून श्रमिकांचीच विभागणी केली गेली आहे. हे बाबासाहेबांनी निदर्शनास आणून दिले. त्यांचा जातीव्यवस्थेवरील हल्ला हे केवळ उच्चवर्णियांच्या वर्चस्ववादाला दिलेले आव्हान नव्हते तर आर्थिक विकास प्रक्रियेशी त्यांच्या मांडणीचा खूप जवळचा संबंध होता. जातीव्यवस्थेमुळे श्रमाची आणि भांडवलाची गतिशीलता कमी झाली असून त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि विकासावर प्रतिकूल परिणाम झालेला आहे, असे बाबासाहेबांचे प्रतिपादन होते.

**आर्थिक लोकशाहीचे पुरस्कर्ते**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बाबासाहेब भारताचे पहिले कायदामंत्री बनले. १९४८-४९ मध्ये घटना समितीचे अध्यक्ष म्हणून भारतीय राज्यघटनेला आकार देतांना त्यांच्या अंतर्गत असलेला अर्थतज्ञ आपल्या डोळ्यासमोर येतो. मानवी अधिकारांचे मुलतत्त्व म्हणून त्यांनी लोकशाही राज्यव्यवस्थेचा मोठ्या ताकदीने पुरस्कार करून पाठपुरावा केला. 'समता, स्वातंत्र्य आणि बंधूभाव' या तीन लोकशाहीच्या तत्त्वांचा केवळ राजकीय हक्क असा संकूचित अर्थ लावला जावू नये, असे बाबासाहेबांनी म्हटले. ते सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीचे खंदे पुरस्कर्ते होते. त्यांनी सामाजिक - आर्थिक लोकशाहीकडे दुर्लक्ष करून राजकीय लोकशाही टिकू शकणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

**चलनविषयक विचार**

स्वातंत्र्यपूर्व काळात चलनासंबंधी व्यापक स्वरूपात अभ्यास करणारे बाबासाहेब हे पहिले अर्थतज्ञ होते. त्यांच्या 'प्रॉब्लेम ऑफ द रूपी' या प्रबंधात चलनविषयक प्रश्नावरील त्यांचे विचार 'हिल्टन यंग कमिशन' पुढील साक्षीत किती महत्त्वाचे आहेत याची प्रचिती येते. बाबासाहेबांनी त्याकाळी भारतात चालू असलेल्या 'सुवर्णचलन पद्धतीला' विरोध केला होता. या पद्धतीऐवजी 'सुवर्णचलन विनीमय दर पद्धतीचा' वापर व्हावा असे त्यांचे मत होते. कारण जोपर्यंत आपण रूपयाची क्रयशक्ती स्थिर ठेवू शकत नाही. तोपर्यंत रूपया स्थिर राहू शकत नाही. चलनाच्या बाह्य मूल्याबाबत देखील बाबासाहेब म्हणतात की, चलनाचा विनीमयदर चलनाच्या खरेदी शक्ती क्षमता सिद्धांतानुसार ठरतो. चलनाची

खरेदी शक्ती कमी जास्त झाल्यास चलनदर बदलतो. त्यानुसार विनीमयदर ठरतो. भारताच्या चलनविषयक प्रश्नांचा विचार करण्यासाठी १९२५ मध्ये हिल्टन यंग यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमण्यात आले होते. बाबासाहेबांना त्या कमिशनपुढे साक्ष देण्यासाठी पाचारण करण्यात आले होते. त्यात त्यांनी देशाच्या विकासात चलनाचे किती महत्त्व आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यासाठी त्यांनी भारतीय चलनात सुधारणा सूचविल्या होत्या. उदा. रूपया नाणे पद्धत बंद करावी, सुवर्ण परिमाण निधी रद्द करावा. कारण व्यवहारात चलनाची स्थिरता राखण्यात त्याचा उपयोग नसतो असे त्यांचे मत होते. विनिमय परिमाण आणि सुवर्ण परिमाण विरहीत चलन पद्धती सुरू करावी असे त्यांचे मत होते. कायद्याने ठरवून दिलेल्या प्रमाणानुसार रूपयाचे सोन्यात किंवा सोन्याचे रूपयात परिवर्तन व्हावे असे बाबासाहेबांचे मत होते.

**सार्वजनिक आय-व्ययाबाबत विचार**

बाबासाहेबांनी आपल्या आर्थिक विचारांमध्ये वित्त आयोगाला महत्त्वाचे स्थान दिले आहे. कारण देशाच्या विकासात वित्त आयोगाच्या शिफारशी मार्गदर्शक स्वरूपाच्या असतात. त्यांनी करविषयक प्रश्नांबाबत विचार मांडतांना गरिबांवरच कराचा बोजा पडतो. म्हणून करपद्धतीला विरोध केला होता. कर हा पुरोगामी असावा. म्हणजे गरिबांवर कमी कर व श्रीमंतीवर जास्त कर आकारण्यात यावा अशी त्यांची विचारसरणी होती.

**दारिद्र्य निर्मुलनावरील विचार**

दारिद्र्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाला अडथळे देतात. याचा अर्थ दारिद्र्य हेच देशाच्या विकासाला घातक आहे. यासाठी तांत्रिक शिक्षण आणि शासनाच्या मालकीचे उद्योगधंदे चालू करावेत तसेच भूमीहीनांना जमिनी द्याव्यात. म्हणजे दारिद्र्य कमी होण्यास मदत होईल अशी त्यांची विचारधारा होती.

**आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबत विचार**

प्रसिद्ध अर्थतज्ञ डेव्हीड रिकार्डो यांच्या विचारांशी बाबासाहेब सहमत होते. तसेच ते राज्य समाजवादाचे पुरस्कर्ते होते. सामुदायीक शेतीचा वापर, आधारभूत उद्योगांचे राष्ट्रीयीकरण, विमा व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण इत्यादी मार्गांद्वारे आपल्याला राज्य समाजवाद आणून देशाचा आंतरराष्ट्रीय व्यापार हा तुलनात्मक खर्चाचे तत्त्व डोळ्यासमोर ठेवून केला तर देशाचा विकास होईल असे बाबासाहेबांचे मत होते.

**संदर्भ**


१) Dr. B.R. Ambedkar, State & minorities, Govt. of Maharashtra Publication - Dr. Babasaheb Ambedkar Writings & Speeches, Vol-I, 1989.

२) डॉ. वा.ना. कुबेर, डॉ. आंबेडकर : विचार मंथन, लोकवाङ्मय ग्रंथ लि. मुंबई १९८२.

३) धनंजय किट - डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र, मुंबई.

४) दै. पुढारी - दि. १३.४.२०१६, डॉ. नरेंद्र जाधव यांचा लेख

५) विविध वेबसाईटस्

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक अर्थशास्त्रज्ञ

– प्रा. विजय भुजंगराव मांटे
अर्थशास्त्र विभाग
प्रताप महाविद्यालय, अमळनेर

**प्रस्तावना**

भारताच्या किर्तीवंत सुपूत्रांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नाव अग्रस्थानी आहे. देशाच्या सामाजिक-राजकीय क्षितीजावर त्यांचा उदय १९२० च्या दशकात झाला. समाजाच्या अस्पृष्य म्हणून हिणविल्या गेलेल्या अगदी तळातील वर्गाच्या पुर्नरूत्थानासाठी सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि धार्मिक पातळीवर तेव्हापासूनच त्यांचा संघर्श सुरू होता. बाबासाहेब एक थोर विचारवंत होते. त्यांनी अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, विधिज्ञ, शिक्षणतज्ञ, पत्रकार,संसद सदस्य, आणि या सर्वाच्या पलिकडे जावून समाजसुधारक आणि मानवधिकाराचा रक्षक या नात्याने केलेले कार्य अतुलनीय आहे. देशभरातील अस्पृष्य समाजाला एकवटून, संघटित करून सामाजिक समतेच्या ध्येयाप्रत जाण्याच्या दृश्टीने राजकीय मार्ग कसा अवलंबयाचा याविशयी त्यांनी दिशादर्शन केले.

१८९१ मध्ये जन्मलेल्या बाबासाहेबांनी देशविदेशातून उच्च शिक्षण प्राप्त केले. कोलंबिया विद्यापीठाची अर्थशास्त्रातील पीएच.डी पदवी (१९१७), लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधून डॉक्टर ऑफ सायन्सची पदवी तसेच लंडन मधील ग्रेज इंची बार अॅट लॉ (१९२३) अशा उच्च पदव्या त्यांनी संपादित केल्या. दलित समाजातील विद्यार्थ्याने त्या काळात अशा प्रतिश्ठेच्या पदव्या मिळविणे ही अद्वितीय बाब होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मूळ अभ्यास विशय अर्थशास्त्र हाच होता. त्यांच्या कारकिर्दीचे ढोबळमानाने दोन भाग करता येतात. १९२१ पर्यंत एक अर्थतज्ञ म्हणून त्यांनी केलेल्या लिखाणाचा एक कालखंड असून, त्यानंतरच्या दुसऱ्या कालखंडात ते एक राजकीय नेते म्हणून उदयाला आले. आणि १९५६ मध्ये महानिर्वाणापर्यंत त्यांनी शोषित, पिढीत समाजासाठी उदंड कार्य केले. मानवी हक्कांची जनजागृती केली.

बाबासाहेबांनी अर्थशास्त्रात विपूल लिखाण केले असून या विषयावर त्यांनी तीन प्रमुख पुस्तके आहेत.

१) ॲडमिनीस्ट्रेशन ॲण्ड फायनान्स ऑफ दि इस्ट इंडिया कंपनी
२) दि इव्होल्यूशन ऑफ प्रोव्हिन्सीएल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया
३) दि प्राब्लेम ऑफ दि रूपी : इट्स ओरीजिन ॲण्ड इट्स सोल्यूशन

पहिली दोन पुस्तके सार्वजनीक वित्त व्यवस्थेवरील असून त्यातील पहिल्या पुस्तकात इस्ट इंडिया कंपनीच्या १७९२ ते १८५८ या काळातील वित्त व्यवहारावर भाश्य केले आहे. दुसरे पुस्तक ब्रिटीशांच्या आमदनीतील भारतात वित्तीय व्यवहारामधील केंद्र आणि राज्य संबंधावर भाष्य करते. हा कालखंड १८३३ ते १९२१ असा आहे. त्यांचे तिसरे पुस्तक चलनविशयक अर्थशास्त्रावरील एक उत्कृष्ट ग्रंथ मानला गेला आहे. या पुस्तकात १८०० पासून १८९३ पर्यंतच्या कालखंडात विनिमयाचे माध्यम म्हणून भारतीय चलनाची कशी उत्क्रांती झाली हे बाबासाहेबांनी सांगितले आहे. तसेच १९२० दशकाच्या पुर्वाधात सुयोग्य चलनाची निवड करण्यात आलेल्या अडथळयाची ही चर्चा त्यांनी केली आहे. भारतात परतल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अर्थशास्त्रावर एकही पुस्तक लिहिले नाही मात्र त्यांच्या कार्याचा आढावा घेतल्यास त्यांच्यातील अर्थतज्ञ वारंवार दिसून येतो.

**औद्योगिक पायाभरणी**

बॉम्बे लेजिस्लेटिव्ह व असेम्ब्लीचे सदस्य असतांना (१९२६) ग्रामीण भागातील गरीबांच्या समस्या विशयीचे त्यांचे समग्र आकलन त्यांनी उभारलेल्या जनआंदोलनामध्ये प्रतिबिंबित होते. शेतीमधील खोती पध्दतीविरूध्द त्यांनी केलेल्या यशस्वी आंदोलनामुळे अनेक ग्रामीण गरीबांची आर्थिक शोशणातून मुक्तता झाली. महार वतन या नावाखाली सुरू असलेल्या शुध्द गुलामगीरी विरूध्द त्यांनी आवाज उठविल्यानंतर ग्रामीण भागातील गरीबांचा मोठा वर्ग शोशणमुक्त झाला. सावकाराच्या मनमानीला चाप लावण्यासाठी त्यांनी असेम्ब्लीमध्ये विधेयक आणले. औद्योगिक कामगारांच्या क्षेत्रात डॉ. आंबेडकरांनी १९३६ मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. त्याकाळी कामगारांचा आवाज बुलंद करणाऱ्या इतर संघटना होत्याच परंतु त्यांना अस्पृष्य कामगारांच्या मानवाधिकाराशी काहिही देणेघेणे नव्हते. नव्या राजकीय पक्षाने ही उणिव भरून काढली त्याचप्रमाणे व्हाइसरॉय राइज एक्झीक्यूटिव्ह कौन्सीलचे कामगार सदस्य या नात्याने १९४२ ते १९४६ या काळात डॉ. आंबेडकर यांनी कामगार विशयक धोरणात आमुलाग्र सुधारणा घडून आणल्या त्यात सेवायोजन कार्यालयाची स्थापना ही महत्वपूर्ण घटना होती. आणि स्वतंत्र भारतातील औद्योगिक संबंधाची तीच पायाभरणी ठरली. बाबासाहेबांनी पाटबंधारे, उर्जा आणि इतर सार्वजनीक बांधकामे ही खातीही सांभाळली. देशाचे पाटबंधारे धोरण निश्चित करण्यात त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. दामोदर व्हॅली प्रकल्पाचा यात प्राधान्याने समावेश करावा लागेल.

**श्रमविभाजन आणि अर्थशास्त्र**

जाती व्यवस्था आणि अस्पृश्यतेसारख्या सामाजिक आजाराचे आर्थिक पैलू उलगडून दाखविणे हे डॉ. आंबेडकराचे आणखी एक विद्वत्तापूर्ण कार्य होय. श्रमविभागणीच्या तत्त्वांनुसार महात्मा गांधीनीही जाती व्यवस्थेचे अस्तित्व स्विकारले होते मात्र आंबेडकरांनी 'जातीचा उच्छेद' या आपल्या पुस्तकात त्यावर कडाडून टिका केली होती. जाती व्यवस्थेमुळे केवळ श्रमाची विभागणी केली गेली नसून, श्रमिकांचीच विभागणी केली गेली आहे, हे त्यांनी निदर्शनास आणून

दिले. डॉ. आंबेडकरांचा जातीव्यवस्थेवरील हल्ला हे केवळ उच्च वर्णियांच्या वर्चस्व वादाला दिलेले आव्हान नव्हते तर आर्थिक विकासाशी त्यांच्या मांडणीचा जवळचा संबंध होता. जातीव्यवस्थेमुळे श्रमाची आणि भांडवलाची गतीशिलता कमी झाली असून त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि विकासावर प्रतिकूल परिणाम झाला आहे असे त्यांचे प्रतिपादन होते. स्टेट्स ॲण्ड मायनॉरिटीज नावाने ब्रिटीश सरकारला १९४७ साली सादर केलेल्या टिपणामध्ये भारताच्या आर्थिक विकासाची योग्य धोरणे कोणती हे सांगितले होते. अत्युच्च उत्पादन क्षमतेचा विचार करून लोकांच्या आर्थिक जीवनाचे नियोजन करणे तसेच खाजगी उत्पादनांना कोणतीही आडकाठी न करता संपत्तीचे समान वाटप होईल अशा रीतीने आर्थिक नियोजन करणे हे सरकारचे दायित्व आहे असे त्यांनी नमूद केले होते.

**आर्थिक लोकशाहीचे खंदे पुरस्कर्ते**

स्वातंत्र्यानंतर डॉ. आंबेडकर भारताचे पहिले कायदा मंत्री बनले. १९४८-४९ मध्ये घटना समितीचे अध्यक्ष म्हणून भारतीय राज्यघटनेला आकार देतांनाही त्याच्यातील अर्थतज्ञ आपल्याला दिसून येतो. मानवी अधिकाराचे मूलतत्व म्हणून त्यांनी लोकशाही राज्यव्यवस्थेचा ताकतिने पुरस्कार आणि पाठपुरावा केला. समता, स्वातंत्र आणि बंधुभाव या तीन लोकशाही तत्वाचा केवळ राजकीय हक्क असा संकुचित अर्थ लावला जावू नये असे त्यांनी म्हटले आहे. सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीचे ते खंदे पुरस्कर्ते होते. आणि सामाजिक आर्थिक लोकशाही कडे दुर्लक्ष करून राजकीय लोकशाही टिकू शकणार नाही. असा इशाराही द्यायला ते विसरले नाही. डायरेक्टीव्ह प्रिन्सीपल्स ऑफ दि स्टेट्स पॉलिसी हा अनुच्छेद घटनेत समाविष्ट करून त्यांनी आर्थिक लोकशाहीचा हेतू विशद केला.

**चलनविषयक विचार**

भूमिहीन मजूर, लहान जमिनी, खोती पध्दती, महारवतन, सामुदायिक शेती, जमीन महसूल आणि जमिनदार शाहीचे उच्चाटन या विशयावर त्यांनी निरनिराळया वेळी विचार प्रकट केले होते. अस्पृश्य समाजात भूमिहीन मजूराचाच भरणा अधिक असल्याने त्यांनी त्या विशयावर मतप्रदर्शन केले होते. तसेच उदयोगाचे राष्ट्रीयीकरण, धान्य प्रश्न, समाजवाद, सामाजिक समता या विषयावरही त्यांनी प्रासंगिक लिखाण केले होते.

डॉ. आंबेडकरांनी लिहिलेला आणि पुढे पुस्तकाद्वारे प्रकाशित झालेला दि प्राब्लेम ऑफ दि रूपी हा प्रबंध आज ९७ वर्शानंतरही कालबाहय वाटत नाही. खरेतर बाबासाहेबांच्या राजकीय आणि सामाजिक विचारांना प्राधान्य देण्याच्या नांदात या पुस्तकाकडे सर्वाचे दुर्लक्ष झाले आहे. हे पुस्तक ज्या काळात प्रकाशित झाले तो काळ प्रोफेसर जॉन केन्स यांचा होता. या काळात चलन आणि संबंधीत विशयावर प्राध्यापक केन्स यांची जागतिक पातळीवर एक प्रकारे मक्तेदारी होती. परंतु बाबासाहेबांनी केन्स यांनी मांडलेल्या चलनविशयक विचारास आव्हान दिले. प्राध्यापक केन्स हे चलनाच्या मूल्यासाठी सुवर्ण विनिमय पध्दतीचाच अवलंब करावयास हवा या मताचे होते. सुवर्ण विनिमय पध्दतीत देशाच्या चलनाच्या मूल्यांची सांगड ही सोन्याच्या मूल्याशी घातली जाते. या पध्दतीचा अवलंब करणारे देश आपल्या कागदी चलनाचे रूपांतर निष्चित दराने सोन्यामध्ये करून ठेवतात. तसेच अशा देशात सोन्याची किंमत सरकार निर्धारित करते परंतु सुवर्णप्रमाण पध्दतीत मात्र प्रत्यक्ष चलनात काही प्रमाणात सोने वापरले जाते. पारतंन्त्यातील भारतात सुवर्ण विनिमय पध्दतीने रूपयाची हाताळणी केली जावी. असे ब्रिटीश सरकार आणि प्राध्यापक केन्स यांचे मत होते. परंतु हे मत बाबासाहेबांनी हिरीरीने खोडून काढले. त्यांचे म्हणणे होते की, सुवर्ण विनिमय प्रमाण पध्दतीत चलनस्थैर्य येवू शकत नाही. आपले मत सिध्द करण्यासाठी बाबासाहेबांनी इस १८०० ते १८९३ या काळातील चलनमुल्यांचा अभ्यास केला. त्यातून मिळालेल्या पुराव्याच्या आधारे त्यांनी भारतासारख्या अविकसित देशात सुवर्ण विनिमय पध्दती अयोग्य आहे असे दाखवून दिले. त्यांनी सखोल अभ्यासाद्वारे ब्रिटीश सरकारवर थेट आरोप करून सरकार जाणीवपूर्वक सुवर्ण विनिमय पध्दतीचा असलंब करून रूपयाची किंमत कृत्रीमरित्या चढी ठेवत असून त्यामागे ब्रिटन मधून भारतात निर्यात करणाऱ्यांना जास्तीत जास्त नफा कसा होईल. याचा विचार करत आहेत असे स्पष्ट केले. परिणामी चलनाचा तिढा सोडविण्यासाठी ब्रिटीश सरकारने रॉयल कमिशनची स्थापना केली. एकूणच चलनासंबंधी विचार मांडतांना बाबासाहेबांनी विनिमय दर निश्चिती पेक्षा भाववाढ नियंत्रणास महत्व दिले. बाबासाहेबांनी त्यावेळी या संदर्भात जे काही लिखाण केले, प्रश्न उपस्थित केले. त्यातूनच अर्थव्यवस्थेच्या अत्यंत केंद्रस्थानी आजही असलेली रिझर्व्ह बँक आफ इंडिया नावाची संस्था जन्माला आली.

यावरून बाबासाहेबामधील अर्थशास्त्री किती महत्वाचा आणि द्रष्टा होता हे लक्षात येते. त्याच्या 'द प्राब्लेम ऑफ दि रूपी' या ग्रंथाला लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधील प्राध्यापक एडविन केनन यांनी प्रस्तावना लिहिली.

**बाबासाहेबाचे स्वदेशी विषयक विचार**

२८ फेब्रुवारी १९२० या दिवसी मूकनायक या नियतकालीकात बाबासाहेबांनी स्वदेशी संदर्भात लेख लिहून परदेशी मालास अटकाव झाल्यास सर्वसामान्य जनतेस अधिक किंमतीमध्ये स्वदेशी माल विकत घ्यावा लागेल यामुळे देशाचे कल्याण होणार नसून मूठभर भांडवलदाराचे कल्याण होईल असे परखड मत मांडले कारा अनियंत्रित व्यापार पध्दतीत मिळत असलेला स्वस्त भावाचा माल नियंत्रित व्यापार पध्दतीत गोरगरिबांना अधिक दाम देवून विकत घ्यावा लागणार आहे. असे स्पष्ट केले.

**निष्कर्श**

अभिनेत्याप्रमाणे नेत्यालाही कोणत्या ना कोणत्या साच्यात बसविण्यासाठी समाज आतूर असतो. हे होण्याचे कारण सामूहिक पातळीवर त्या व्यक्तीचे बौध्दीक आकलन होत नाही. बाबासाहेबाच्या बाबतीत असेच झालेले दिसते. चवदार तळे ते घटनाकार या एवढयामोठया आकाराच्या साच्यात डॉ. बाबासाहेबांची प्राणप्रतिष्ठा करीत असतांना त्यांच्या व्यक्तीमत्वातील एका सर्वात मोठया आणि सर्वात महत्वाच्या पैलूकडे आपण सातत्याने दुर्लक्ष केले. हा दुर्लक्षित पैलू म्हणजे 'अर्थशास्त्री आंबेडकर!'

बाबासाहेब शिक्षणाने अर्थवेत्ते होते मुंबई विद्यापीठातून अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्राची मुलभूत पदवी प्राप्त केल्यानंतर जगातील कोलंबिया

आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या दोन विद्यापीठात अर्थशास्त्राशी संबंधीत विविध २९ अभ्यासक्रम त्यांनी पूर्ण केले. याठिकाणी त्यांनी लिहिलेला 'द प्राब्लेम ऑफ दि रूपी' हा प्रबंध आजही कालबाहय वाटत नाही. हे बाबासाहेबांच्या द्रश्ट्या बुध्दीमत्तेचे यश म्हणावे लागेल मात्र राजकीय आणि सामाजिक विचारांना प्राधान्य देण्याच्या नादात बाबासाहेबांच्या या पुस्तकाकडे समाजाचे दुर्लक्ष झाले आहे. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**संदर्भ**

१) डॉ. आंबेडकर का आर्थिक चिंतन (हिंदी)
२) गिरीश कुबेर यांचा लोकसत्ता मधील लेख (१२५ वी जयंती)
३) डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार
४) अर्थशास्त्री आंबेडकर
५) डॉ.आंबेडकर सर्वश्रेश्ठ अर्थतज्ञ
६) www.wikipidia.

# डॉ. बाबासाहेब भिमराव रामजी आंबेडकर : एक सामाजिक चळवळ

– प्रा. अरविंद भबुतराव पाटील
समाजशास्त्र विभाग प्रमुख
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सोनगीर, ता. जि. धुळे

**प्रस्तावना**

भारताच्या पावन भूमीवर अनेक महान महापुरुषांनी जन्म घेऊन देशासाठी व समाजासाठी अहोरात्र कार्य करुन सामाजिक बांधीलकी व राष्ट्रनिष्ठा जोपासली आहे. त्यांचा सेवेचा वारसा आजही देशवासियांसाठी आदर्श, मार्गदर्शक व दिशादर्शक ठरलेला आहे. अशा या थोर महापुरुषात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव अग्रगण्य आहे.

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म वडील रामजी व माता भीमाबाई यांच्या घरी १४ एप्रिल १८९१ रोजी झाला. बाबासाहेबांवर चांगले संस्कार व्हावेत म्हणुन वडील रामजी खुप दक्ष होते. त्यांना स्वत: वाचनाची आवड असल्यामुळे घरात ग्रंथसंग्रह हा होताच. मुलांना ही ते चांगली पुस्तके वाचावयास आणुन देत असत. म्हणुन बाबासाहेबांच्या अंतिम क्षणापावेतो वाचनाची व अभ्यासपूर्ण चिंतनाची सवय त्यांच्या ठायी आढळते. कबीर व तुकाराम बाबासाहेबांच्या अभ्यासाचे विषय भावी आयुष्यात झालेले दिसतात. डॉ. बाबासाहेब म्हणजे अनंत पैलूंचा सामाजिक योध्दा. त्यांना प्रत्येक क्षेत्राचे परिपूर्ण ज्ञान व माहिती होती. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक, पत्रकारिता, कायदे अशा विविध क्षेत्रात आपल्या अमोघ वक्तृत्वाने व कुशल नेतृत्वाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दीन, दलितांच्या, श्रमिकांच्या, विस्थापितांच्या, शोषितांच्या अंधकारमय जीवनाला प्रज्ञेचा संदेश दिला. गलितगात्र झालेल्या मनामनांतुन समाजक्रांतीचे स्फूलींग चेतवून डॉ. आंबेडकर यांनी मुर्दाड झालेल्या समाजाला आपल्या हक्काची जाणिव करुन दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सत्याच्या मार्गावर चालणारे खरे मार्गदर्शक होते. भ्रष्टाचार, अनीती, अत्याचार, अन्यायास त्यांनी प्रखर विरोध केला. जातीभेदाच्या ते विरोधात होते, जातीभेद म्हणजे समाजाला लागलेली किड ते मानत असत. यामुळे वामनदादा कर्डक आपल्या गीतात म्हणतात.

*जखडबंद पायातले साखळदंड*
*तटातट तुटले तू ठोकताच बंड*
*झाले गुलाम मोकळे, भीमा तुझ्यामुळे*

ही सामाजिक कीड नष्ट केल्याशिवाय समाज एकसंघ होणार नाही. असे ते समजात. डॉ. आंबेडकर म्हणजे तळागाळातील लोकांना बौध्दिक व सामाजिक गुलामगिरीतुन मुक्त करुन त्यांना मंत्र देणार एक पथदर्शक होते. शिकल्याशिवाय आपल्यावरील न्याय अन्याय, आपले हक्क ही आपल्याला कळत नाही. अशा प्रकारे त्यांनी सामाजिक क्रांतीचे रणशिंग समाजात फुंकले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर विषमते विरुध्द संघर्ष केला. वैचारिक पातळीवर संघर्ष करीत असतांना भारतातील समाजव्यवस्था, जात वर्ग कसे तयार झाले. हा अभ्यास स्वत: केला. त्यांना भारतात सामाजिक स्तरावर मतभेद जाणवायला लागले. त्यामुळे त्यांनी अनेक सामाजिक चळवळी उभारण्याचा प्रयत्न केला.

**अभ्यासाचे उद्दिष्टे –** डॉ. भिमराव रामजी आंबेडकरांचे सामाजिक चळवळींचा अभ्यास करणे.

**अभ्यासाचे गृहितकृत्य –** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक चळवळींमुळे समाजाला आपल्या हक्काची जाणिव झाली.

**संशोधन पध्दती –** सदर शोधनिबंधासाठी प्राथमिक व दुय्यम स्रोत माहिती मिळविण्यासाठी वापरलेले आहेत.

१) प्राथमिक स्रोत – इंटरनेट

२) दुय्यम स्रोत – ग्रंथ, मासिके, वृत्तपत्रे इ.

**१) बहिष्कृत हितकारणी सभा –** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा लंडनवरुन आपले शिक्षण पूर्ण करुन भारतात आल्यानंतर आपल्या सामाजिक कार्यावर लक्ष केंद्रीत करण्याचा प्रयत्न केला. या काळात प्राथमिक सामाजिक संघटना उभारण्याचे काम बाबासाहेबांनी केले. या सामाजिक संघटनाच्या माध्यमातुनच २० जुलै १९२४ रोजी बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना झाली. या हितकारणी सभेत अस्पृशांच्या मागण्या मांडण्यासाठी एक मध्यवर्ती मंडळ असावे या उद्देशाने चर्चा करण्यासाठी ९ मार्च १९२४ रोजी बैठक घेण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना केली. त्यावेळी ते सरकारी सिडनहॅम महाविद्यालयात अध्यापक म्हणुन नोकरी करीत होते. या हितकारणी सभेमार्फत पनवेल, जळगाव व अहमदाबाद या ठिकाणी वसतीगृहे स्थापन करण्यात आली. सरस्वती विकास या नावाचे एक मासिक ही चालविण्यात आले होते. जानेवारी १९२५ मध्ये हितकारणी सभेमार्फत सोलापूर येथे विद्यार्थ्यांसाठी पहिले वसतीगृह सुरु करण्यात आले.

**२) महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह –** अस्पृशांना सार्वजनिक पाणवठे, धर्मशाळा, विद्यालये, न्यायालये अशा सार्वजनिक ठिकाणी प्रवेश नव्हता. अशा सार्वजनिक ठिकाणी प्रवेश मिळविण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी संघर्ष केला. त्यातील महत्त्वपूर्ण संघर्ष अर्थात सत्याग्रह म्हणजे महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह, महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह १९२७ मध्ये केला गेला. तसेच दि. १९ व २० मार्च १९२७ रोजी कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद अधिवेशन पहिले या नावाखाली महाड येथे समता संग्राम सुरु करण्याचे ठरविले. १९ मार्च १९२७ रोजी महाड येथे कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद भरविण्यात आली. डॉ. बाबासाहेब या परिषदेचे अध्यक्ष होते. या दिवशी महाड नगरपालिकेने महाड येथील चवदार तळे हे महानगरपालिकेच्या ताब्यात असुन ते सर्वांसाठी खुले आहे. असा ठराव पास करण्यात आला. ठराव अमलात

आणण्यासाठी २० मार्च १९२७ रोजी सर्व कार्यकर्ते एकजुटीने चवदार तळ्यावर गेले. सर्व प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर चवदार तळ्याचे पाणी प्यायले. यानंतर सर्व साथीदारांनी चवदार तळ्याचे पाणी प्यायले.

**३) मनुस्मृती दहन –** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अस्पृश्य समाज हा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक या घटकांनी पुढे येण्यासाठी अनेक संघर्ष केले. त्यातील एक संघर्ष किंवा सत्याग्रह म्हणजेच मनुस्मृती चे दहन हे होय. २५ डिसेंबर १९२७ रोजी प्रचंड जनसमुदाय महाड येथे परिषदेच्या ठिकाणी जमला. व ९.०० वाजता मनुस्मृती दहन करण्याचा ठराव पास करण्यात आला. मनुस्मृतीच्या दहनाच्या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी परिषदेच्या समोर मोकळ्या जागेत एक खा खणण्यात आला. एका अस्पृश्य सन्यासाच्या हस्ते मनुस्मृतीला भडाग्नी देण्यात आला. अस्पृश्य व स्त्री वर्गावर अन्याय करणारी, प्रगती खुंटविणारी, आत्मबल व अस्तित्व नष्ट करणारी, माणुसकी पायदळी तुडविणारी मनुस्मृती या कायद्याचे दहन करुन अस्पृश्य वर्गाचा मुक्ततेचा मार्ग खुला झाला.

**४) नासिक काळाराम मंदीर प्रवेश सत्याग्रह चळवळ –** संपूर्ण मानवी हक्कासाठी अस्पृश्यांना सामाजिक न्याय मिळविण्यासाठी काळाराम मंदीर प्रवेश मिळवणे आवश्यक होते. त्या करीता काळारात मंदीर प्रवेश सत्याग्रह चळवळ करण्यात आली, २ मार्च १९३० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्यांची एक सभा घेवून ३ मार्च १९३० पासून नासिक सत्याग्रहास सुरवात झाली.

**निष्कर्ष**

भारतातील युवकांना मार्गदर्शक ठरतील, मानवी हक्क प्रदान करण्यासाठी डॉ. बाबासाहेबांचे सत्याग्रह एक प्रेरणास्रोत ठरतील म्हणून डॉ. बाबासाहेबांनी मानवी हक्क, सामाजिक, राजकीय, आर्थिक कल्याणाकरीता अनेक लढे, संघर्ष केले. त्यातील हे सत्याग्रह महत्वाचे मानले जातात.

**संदर्भ**

१) दलितेतरांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनंत पैलुंचा सामाजिक योध्दा – डॉ. प्रल्हाद लुलेकर
२) गौरव ग्रंथ – डॉ. बाबासाहेब आंबेडकर १२५ वी जयंती २०१५ संपादक – प्रा. मधुकर देसले, प्रा. गौतम थोरात
३) बहुजन उद्धारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर – प्रा. गौतम निकम
४) महाराष्ट्राचा सामाजिक व राजकीय अभ्यास – प्रा. सौ. राठी शुभांगी
५) सामाजिक चळवळी आणि सरकार – श्री. शहा घनश्याम, प्रा. वेंगुरलेकर योगिनी
६) सामाजिक चळवळी परंपरागत आणी नविन – डॉ. देवगांवर एस. जी.

# स्त्रीयांविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भुमिका

– डॉ. भामरे नानाजी दगा
इतिहास विभाग प्रमुख, विद्या विकास मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय
अक्कलकुवा, जि. नंदुरबार (महाराष्ट्र)

**प्रस्तावना**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतामध्ये होऊन गेलेले एक क्रांतिकारक समाज सुधारक म्हणून ओळखले जातात. विसाव्या शतकात डॉ. आंबेडकरांनी आपल्या असामान्य कार्यद्वारे भारतीय समाज जीवनावर आपला ठसा उमटविला आहे. डॉ. आंबेडकरांनी सर्वच क्षेत्रामध्ये भरीव कामगिरी केलेली दिसून येते. तसेच ते खऱ्या अर्थाने स्त्री मुक्ती चळवळीचे प्रणेते, स्त्रीयांचे कैवारी होते. स्त्रीयांबद्दल डॉ. बाबासाहेबांना अपार सहानूभूती होती. कुंटूबातील स्त्रीयांचे हाल कमी व्हावेत म्हणून त्यांनी स्त्रीयांना घटस्फोट, पोटगी, पुनर्विवाह, वडिलोपार्जित संपत्तीत वारसा हक्क, दत्तक घेणे वैगैरे हक्क देणाऱ्या हिंदू कोड बिलाचा आग्रह धरला. तर स्त्रीयांना ज्ञान साधनेचा हक्क नाकारुन अज्ञानाच्या अंध:कारात खितपत ठेवणाऱ्या हिंदू धर्माचा त्याग करुन प्रौढ, कुमारिका, विधवा इतर अनेक स्त्रीयांना ज्ञानसाधनेचा मार्ग उपलब्ध करुन देणारा बौध्द धर्म त्यांनी स्विकारला. लोकसंख्या नियत्रंणासाठी संतती नियमन, विवाह घटस्फोट या महत्वाच्या गोष्टींचा अंर्तभाव करुन एक क्रांतिकारक पाऊल उचलले. 'शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा' हा मुलमंत्र देणारा हा महामानव स्त्रीयांचा एक कैवारीच होता हे दिसते.

**हिंदू कोड बील आणि स्त्री**

भारतात स्त्रियांविषयी भरपूर समाज सुधारकांनी जनआंदोलने, चळवळी उभारल्या. महात्मा फुले पासून ते शाहू महाराज व महर्षी धोंडू कर्वेपर्यंत अनेकांनी महान कार्य केले होते त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देखील स्त्री चळवळीत हिंदू कोड बिलांच्या रुपाने त्यांचा सहभाग दिसून येतो. कर्मकांड, अंधश्रध्दा दूर करण्याच्या कामी स्त्रीच पुढाकार घेवू शकते. यावर त्यांची प्रचंड श्रध्दा होती.१ स्त्रियांना पुरुषाप्रमाने प्रत्येक क्षेत्रात समान स्थान, समान दर्जा, हक्क मिळावा यासाठी कायदयाची तरतुद करुन त्यांनी स्त्री दास्य विमोचन केले. बाबासाहेबांना केवळ दलितांचे उध्दारकर्ते म्हणणे म्हणजे स्वत:ची शुध्द फसवणूक होय. त्यांचे कार्ये हे केवळ दलित पददलित स्त्रियांपुरतेच मर्यादीत नाही तर देशातल्या तमाम हिंदू स्त्रियांच्या उध्दाराचे व्रत त्यानी घेतले होते. याचे सत्य उदारण म्हणजे हिंदू कोड बील हे दिसून येते.२

हिंदू कोड बील कायदयाचे संविधानात समाविष्ट करुन त्यात हिंदू स्त्रियांना समान हक्क देण्याच्या उद्देशाने तत्कालीन केंद्र सरकारने १९४१ मध्ये 'दि हिंदू कोड' समिती नेमली होती. परंतू पारंपारिक व सनातनी हिंदूच्या विरोधामुळे या समितीच्या शिफारसींना यश मिळू शकले नाही. पुढे १९४४ मध्ये या समितीचे सरकारने पुनरज्जीवन केले. त्यावेळी सदर कमिटीचे अध्यक्ष सर बेनेगल नरसिंहराव होते. म्हणून ही कमिटी राव कमिटी या नावाने ओळखली गेली होती. परंतू त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कायदा मंत्री असल्यामुळे हिंदू कोड बील नव्याने तयार करुन त्याला कायदेशीर भाषेत प्रस्तावित करण्याचे प्रमुख काम त्यांच्याकडे आले होते. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अत्यंत काळजीपुर्वक विचार करुन, मेहनत घेवून वास्तविक त्यांची त्यावेळी प्रकृती बिघडलेली होती. तरीही त्यांनी अतिशय मेहनत घेतली आणि हिंदू कोड बील तयार केले.३

हिंदू कोड बीलाचा मसुदा तयार झाल्यानंतर तो लोकसभेसमोर मांडण्याची परवानगी स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान श्री पंडित जवाहरलाल नेहरु व इतर पुढाऱ्यांनी दिली होती. परंतू पुराणमतवादी सनातनी हिंदूनी या बीलाविरुध्द जाहिर चळवळ सुरु केली. हिंदू कोड बीलाला विरोध करणारे प्रामुख्याने तीन वर्ण होते. एक सनातनी जे त्यांचा धर्म, आमचे नैतिक विचार व धार्मिक ग्रंथ वगैरे ईश्वरप्रणीत आहेत असे मानणारा होता. त्यात ढवळाढवळ करण्याचा कोणताही अधिकार नाही असे या वर्गाचे मत होते. दुसरा वर्ग राजकीय पुढाऱ्यांचा होता. त्यांना आपल्या मतदारांना खुश करण्यासाठी बीलाविरोधी भूमिका घ्यावी लागली होती. तिसरा वर्ण स्वर्ण हिंदूतील वर्णश्रेष्ठत्वाने पछाडलेल्या लोकांचा होता. ज्या हिंदू धर्मशास्त्राचे संहितीकरण आताप्रर्यंत वर्णश्रेष्ठ हिंदूना करता आले नाही ते अस्पृश्य पंडितांनी केले तर नामुष्की ओढवेल व देशाच्या भावी इतिहासात हे बील आंबेडकर स्मृर्ती म्हणून संबोधले जाईल अशी या वर्गाला भिती वाटत होती. याप्रमाणे बीलाला चोहोबाजूंनी विरोध होत होता. शेवटी सर्व विरोधाला व १९५२ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणूकांना घाबरुन नेहरु सरकारने हे बील मागे घेतले. यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर नाराज झाले. व याचा निषेध म्हणून त्यांनी आपल्या कायदा मंत्री पदाचा राजिनामा दिला.४

हिंदू कोड बीलामुळे स्त्रियांना प्रथमच अधिकार मिळाले ते पुढीलप्रमाणे आहेत.

१) घटस्फोट देण्याचा अधिकार २) पोटगी मागण्याचा अधिकार ३) एक पत्नी असतांना पतीला दुसरी पत्नी करण्याची मनाई असलेला अधिकार ४) दत्तक घेण्याचा अधिकार ५) वडिलोपार्जित संपत्तीत हिस्सा मागण्याचा अधिकार ६) स्त्रियांचा स्वता:च्या मिळकतीवरील अधिकार ७) मुलीला वारसा घेण्याचा अधिकार ८) आंतरजातीय विवाह करण्याचा अधिकार ९) स्वत:चा वारस निचित करण्याचा अधिकार४ इत्यादी. वरील अधिकार स्त्रियांना मिळून मनुस्मृतीने केलेले अन्याय या बिलाद्वारे नष्ट होणार होते. स्त्रियांचा दर्जा उंचावणार होता. त्या सक्षम होणार होत्या. परंतू हे बिल पास होऊ दिले नाही. हिंदू कोड बिलाला अपयश आले असले तरी त्यामुळे स्त्रियांच्या बाबत चर्चा, प्रसार व प्रचारामुळे जागृती निर्माण झाली होती. पुढे या सरकारला या जागृती व रेटयामुळे याच बिलाचे निरनिराळे भाग व त्यात थोडेफार

बदल करुन नवीन चार कायदयाच्या स्वरुपात तुकडया-तुकडयाने हे बिल पास करावे लागले. हे कायदे म्हणजे १९५५ चा हिंदु विवाह कायदा, १९५६ चा हिंदू वारसा कायदा, अज्ञानत्व व पालकत्व कायदा, दत्तक पोटगी कायदा हे होते. या कायदयांमुळे स्त्रियांच्या जीवनात, त्यांच्या दर्जात व सक्षमीकरणात अमुलाग्र बदल झालेले दिसून येतात. या सुधारनेवरुन असे दिसून येते की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना स्त्रियांबद्दल आदर होता असे दिसते.५

**भारतीय संविधानातील स्त्री हक्काची व्यवस्था**

भारतीय संविधान निर्मितीवेळी सामाजिक व्यवस्थेमध्ये सर्वात जास्त विषमताजनक स्थिती स्त्री-पुरुष असमानतेची होती. भारतासारख्या पुरुषप्रधान संस्कृती असलेल्या देशात स्त्रियांना अतिशय हिन दर्जाची वागणूक मिळत होती. समाजात स्त्रियांचे अनेक स्तरावर अनेक प्रकारे शोषण, उत्पीडन व अपमान केला जात होता. अशा विपरीत परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व घटना निर्मात्यांनी घटनात्मकदृष्टया समानतेचा दर्जा तर दिलाच परंतू सुरक्षा व सक्षमीकरणासाठी अनेक तरतुदी केल्याचे दिसून येत आहे.६

भारतीय संविधानाच्या उद्देशिकेच्या प्रांरभीचे आम्ही भारताचे लोक यात भारताचे सर्व स्त्री-पुरुष मिळून भारताचे भाग्य निर्माण करणाऱ्या या संविधानाचा अंगिकार करतात असे अभिप्रेत आहे. तसेच पुढे त्यांच्या सर्व नागरिकास म्हणजे सर्व स्त्री-पुरुषांना सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जा व संधीची समानता, निश्चिपणे प्राप्त करुन देण्याचा विचार सांगते. तसेच व्यक्तीची प्रतिष्ठा यामध्ये व्यक्तीशब्दाचा अर्थ समस्त स्त्री-पुरुषासाठी ध्वनीत होतो. अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय संविधान समतामुलक समाजाचा मुलमंत्र उद्‌गोषित करते व व भारतात समतामुलक समाजाच्या स्थापनेसाठी वचनबध्द असलेले दिसून येते.७

भारतीय संविधानाच्या वेगवेगळया कलमाद्वारे पुरुषाबरोबरच स्त्रियांच्या हक्काचीसुध्दा व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्यात सर्व स्त्री-पुरुषांना कायदयापुढे समानता, कायदयाचे समान संरक्षण, विविध कारणांवरुन भेदभाव करण्यात मनाई, सार्वजनिक सेवांमध्ये सर्वांना समान संधी इत्यादी तरतुदी केल्या गेल्या. संविधानाच्या नीतीनिर्देशक तत्वानुसार रांज्यांना लोककल्याणासाठी सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय प्रस्थापित करण्याचे निर्देश देण्यात आलेले दिसून येतात.८

**निष्कर्ष**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक समाजसुधारक नेते होते. तत्कालीन समाजात ते असे एकमेव नेते होते की ज्यांनी स्त्रियांवर होणारा अत्याचाराची दखल घेतली व त्याविरुध्द लढा दिला व संघर्ष करीत राहिले. स्त्रियांना पायातली वाहन समजले जाणाऱ्या या स्वातंत्र्यपुर्व व स्वांत्र्योत्तर काळात स्त्रियांना स्वता:चा हक्क मिळवून देण्यासाठी ते झगडले. स्त्रियांनी आपली सामाजिक हलाखीची परिस्थिती सुधारावी यासाठी परंपरागत विचारांचा व रुढीरीतींचा त्याग करुन पुढे यावे, शिकावे, स्वत:च्या पायावर उभे राहावे आणि मानव म्हणून अभिमानाने जीवन जगावे यासाठी त्यांची भाषणे, लेख, पुस्तके यातून प्रबोधन केले. शुन्यातून जग निर्मान करण्याची किमया साधणारा महामानव संबोधला जाणारा महापुरुष केवळ शिक्षण देवून थांबला नाही तर त्यांनी संविधान मसुदा समितीचा अध्यक्ष म्हणून स्त्रियांसांठी भरीव कामगीरी करुन ठेवली आहे. हिंदू कोड बिलामध्ये स्त्रियांना संपत्तीचे अधिकार, संपत्तीच्या अधिकाराचे वारसांचे क्रम, निर्वाह, विवाक, घटस्फोट, व दत्तक घेण्याच्या इत्यादी महत्वाचे अधिकार प्रदान करुन समस्त भारतीय महिलांचा एकप्रकारे उद्‌धारच केला आहे. प्रवाहाविरुध्द झेपावून केवळ वैचारीक माध्यमातून किंवा उपदेशातून नव्हे तर कायदे व संहितेतील दूरदर्शी तरतुदी करुन तसेच आपल्या कृतीतून देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय महिलांच्या प्रगतीसाठी मोलाचे योगदान दिले आहे.

**संदर्भ**


१) पवार दया (संपा.) - डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, प्रा. सौदामिनी राव यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कुटूंब नियोजन, लेख, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती, मंडळ, मुंबई, १९९९, पृ. क्रं. ११४.

२) मुन मिनाक्षी (संपा.) - फुले आंबेडकर स्त्री चळवळ, डॉ. ज्योती लांजेवार यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीविषयक विचार, लेख, समता प्रकाशन नागपूर,२००२, पृ.क्रं. ३६.

३) खैरमोडे चांगदेव भगवानराव - डॉ. भीमराव रामजी आंबेडकर खंड १०, सुगावा प्रकाशन, पुणे, १९८९. पृ. क्रं. ७१-७२.

४) उपरोक्त, पृ. क्रं. ७२.

५) मुन मिनाक्षी (संपा.) - फुले आंबेडकर स्त्री चळवळ, समता प्रकाशन नागपूर,२००२, पृ.क्रं. ९८-९९.

६) नाटाणी प्रकाश नारायण, महिला संरक्षण एवं न्याय, बुक एनक्लेव, जयपूर, २००७, पृ.क्रं.३४.

७) उपरोक्त, पृ. क्रं. ३५.

८) बसु दुर्गादास (अनु.) शर्मा ब्रजकिशोर - भारत का संविधान एक परिचय, बाधवा एण्ड कंम्पनी, नागपूर, २०००, पृ. क्रं. ४४९.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महिला सबलीकरण

– प्रा.डॉ. सुनील हरी पवार
अभय कनिष्ठ महाविद्यालय
धुळे

**प्रस्तावना**

प्राचीन काळापासून महिला समाजाचा एक अभिन्न भाग आहेत. तरी देखील महिलांना बरोबरीचा दर्जा दिला जात नाही. संसार रुपी रथाच्या दोन चाकांपैकी एक चाक महिलेचे असते. तरी देखील वर्षानुवर्षे चालत आलेल्या भारतीय पितृसत्ताक व्यवस्थेमुळे महिलांना दुय्यम स्थान दिले जाते.

*नरकृत शास्त्रोंके बंधन है.सब नारी ही को लेकर;*
*अपने लिये सभी सुविधाए पहले ही कर बैठे नर.!*

प्राचीन काळापासून महिलांना भारतात उच्च स्थान दिले जात असे. त्या केवळ मुले पैदा करणे व स्वयंपाक घरात अन्न बनविणे एवढ्यापुरत्याच सीमित नव्हत्या. तर पुरुषांच्या बरोबरीने सामाजिक राजकीय व धार्मिक क्षेत्रात देखील सहभागी होत होत्या.बदलत्या विचारधारेने त्यांना बंद खोलीत डांबून ठेवले होते व पुरुषी अहंकाराने त्यांना वेधून ठेवले गेले.त्यांना आपले अधिकार प्राप्त करण्यासाठी प्रचंड संघर्ष करावा लागला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांना कायदेशीर अधिकार मिळवून दिले. त्यांचे संपूर्ण विचार समता, बंधुता आणि न्याय या मानवतावादी मुल्यांवर आधारित आहे. व्यक्तीची श्रेष्ठता जाती, धर्म, लिंगच्या आधारावर निश्चित न करता त्यांच्या गुणांवर व कर्मावर निश्चित केली जावी असे त्यांचे म्हणणे होते.

**उद्देश**

१) महिला सबलीकरणाचा संदर्भात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचारांचे अध्ययन करणे.
२) मानवाधिकाराच्या माध्यमातून महिलांच्या विशेष अधिकारांचे अध्ययन करणे.
३) महिला अधिकाराचे डॉ. आंबेडकरांच्या दृष्टीतून समजावण्याचा प्रयत्न करणे.

**अध्ययन पद्धती**

या शोध निबंधासाठी संशोधकाने दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे. ज्यात जुने संदर्भ ग्रंथ, वर्तमान पेपर, शोधपत्रे इ.चा समावेश होतो.

**परिकल्पना**

भारतात स्वातंत्र्यपूर्व व स्वतंत्रयोत्तर काळात सरकार द्वारा अनेक कायदे बनविले गेले.मात्र स्त्री ज्या समाज व्यवस्थेचा किंवा परिवाराचा एक भाग म्हणून कार्य करते तेथे या कायद्यांना फारसे महत्व नसते.कारण तेथे पारिवारिक अडथळे निर्माण होत असतात.

**अर्थ निर्वचन**

भारतीय संविधानात विभिन्न दंड सहिता नियम कायदे बनवून महिलांना अधिक सबळ बनविण्याचे प्रयत्न झाले आहेत.त्यापैकी अनेक कायदे डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांनी बनविण्यात पुढाकार घेतलेला दिसून येतो.

**१) समानता** – डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या अनुच्छेद १४ मध्ये सर्व व्यक्तींना तो पुरुष असो व स्त्री कायद्यासमोर समानता प्रदान केलेली आहे. येथूनच महिलांचा समानीकरनाची व सबलतेची सुरवात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केली आहे.

**२) हिंदू कोड बील** – हिंदू कोड बिल महिलांचे सुरक्षा कवच मानले जाते. या बिलाद्वारे वर्षानुवर्षे गुलामगिरीच्या साखळ दंडाने बांधित असलेल्या महिला वर्गाला खऱ्या अर्थाने स्वातंत्र मिळवून देण्यात डॉ.बाबसाहेब आंबेडकरांची महत्वपूर्ण भूमिका होती.या बिलाद्वारे महिलांना वारसाचा अधिकार विवाह, दत्तक विधान अज्ञान पालनाचा अधिकार ई.चा समावेश करण्यात आलेला.होता. महिलांवर होणाऱ्या अन्याय व अत्याचाराला दूर करण्याचा मार्ग म्हणजे हिंदू कोड बिल परंतु या कोड बिलाला प्रचंड विरोध करण्यात आला. तरी देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महिलांविषयक विचारांना झीटकारता येणार नाही.कारण ते समतावादी व उदारमतवादी होते. १९५२ मध्ये सरकारने याच कोड बिलातून खालील नवीन नियम बनवले.

१) दि हिंदू मॅरेज ॲक्ट १९५५
२) दि हिंदू मॅरेज ॲक्शेसन ॲक्ट १९५६
३) दि हिंदू मायनॉरिटी अँड गार्डीयन शिप ॲक्ट १९५६
४) दि हिंदू मॅडोटेशन मेंटेनन्स ॲक्ट १९५६

**२) महिला शिक्षण** – शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे.आणि तो पिणारा गुरगुरणारच असे मानणारे डॉ.आंबेडकर म्हणत अविद्या हीच महिलांच्या समस्येचे प्रार्थमिक कारण आहे.म्हणूनच त्यांनी महिला शिक्षणाला प्रचंड म्हतव दिले.

**३) संवैधानिक प्रयत्न** – संविधांच्या उददेश पत्रिकेत त्यांनी मुद्दामहून आम्ही भारताचे लोक हा शब्द प्रयोग वापरून हे स्पष्ट केले होते की,अन्नुछेद १५ नुसार कायद्यासमोर धर्म,जाती,लिंग,वंश,या आधारावर कोणताही भेदभाव न करता सारे समान आहेत.अनुच्छेद ३९ मध्ये भारतातील महिलांना पुरुषांसारखेच आपले जीवन विवाह चे सारे अधिकार समान रुपात प्रदान केले आहेत.तसेच स्त्री पुरुष दोन्हींना समान कामासाठी समान वेतन देण्याचा निर्देश देण्यात आलेला आहे.अनुच्छेद ४१,४२,४३. अनुसार (महिलांना विशेष सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याता आली आहे.अनुच्छेद ४१ अन्वये महिलांना कामाचा अधिकार, शिक्षणाचा अधिकार, वृद्धावस्था बाबत सुरक्षेचा अधिकार देण्यात आला आहे. अनुच्छेद ३२५ अनुसार निर्वाचन नामावलीमध्ये महिला आणि पुरुष दोन्हीना समान रुपात समाविष्ट करण्याचा अधिकार प्राप्त करून देण्यात आला आहे. अनुच्छेद १९ अ नुसार महिलांना

समान अभिव्यक्तींचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे. अनुच्छेद २१ अन्वये महिला व पुरुषांना समान प्रणव दैदिक स्वातंत्र्याचा अधिकार देण्यात आला आहे

**निष्कर्ष**

१) महिला सबलीकरणासाठी आणि स्वावलंबनासाठी संवैधानिक यशस्वी प्रयत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकराणी केले.

२) महिला प्रगतीसाठी हिंदू कोड बिलात सुरक्षेसाठी प्रयत्न केले.

३) संपत्ती, पुनर्विवाह, विवाह विच्छेदन ई. कायद्याद्वारे प्रभावी बनवून स्त्री सबलीकरण करण्यात आले.

४) महिला अधिकारांसंदर्भात डॉ.आंबेडकरांनी केलेल्या प्रयत्नांना दुर्लक्षित करता येणार नाही.

५) रोजगाराच्या संदर्भात स्त्री–पुरुष समानता स्थापित करण्यात डॉ.आंबेडकराचे विचारामुळेच महिलांना आर्थिक विकासाचे द्वार खुले करण्यात आले.

**संदर्भ**

१) डॉ. विप्लव भारत में महिला मानवाधिकार – के.के. पब्लिकेशन नई दिल्ली २०१२

२) डॉ. स्मिता म्हेत्रे भारतीय स्त्री आणि मानवाधिकार, साईनाथ प्रकाशन नागपूर

३) श्रीमती मंजू शर्मा– नारी शोषक (एवम मानवाधिकार राज पब्लिशिंग हाउस जयपूर)

४) डॉ.भिमराव रामजी आंबेडकर, भारताचे संविधान डॉ.आंबेडकर साहित्य प्रचार मंडळ, नागपूर

५) रमा शर्मा, एम.के. शर्मा, महिला व मानवाधिकार.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रीय सुरक्षेतील योगदान

– प्रा. गुलाब सदाशिव पाटील
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
सोनगीर, ता. जि. धुळे

*''तुम्हाला प्रभावी व्हायचे असेल, तर तुम्ही हातात बंदुका घेतल्या पाहिजेत, तरच तुम्ही देशाचे बाह्य शत्रुंपासुन संरक्षण करू शकाल. जे सहकार्य करायला तयार आहेत त्यांच्याशी सहकार्य केले पाहिजे. तसे नको असेल तर रशिया व चीन यांच्याशी मैत्री करायला हवी.''*

*– डॉ. बाबासाहेब आंबेडकर*

**प्रस्तावना**

राष्ट्रीय सुरक्षा ही एक व्यापक व गुंतागुंतीची संकल्पना आहे. देशाच्या संदर्भात विचार करतांना राष्ट्रीय सुरक्षा आणि राष्ट्रीय संरक्षण असे शब्दप्रयोग वापरले जातात. परंतू या दोन्ही गोष्टी वेगवेगळ्या आहेत. जेव्हा आपण राष्ट्रीय संरक्षणाबद्दल विचार करतो तेव्हा आपल्या देशावर बाहेरील देशातुन होणारे आक्रमण व त्याचा प्रतिकार करणे अशी सर्वसाधारण कल्पना असते. तर राष्ट्रीय सुरक्षेमध्ये देशाबाहेरून होणाऱ्या आक्रमणाबरोबरच देशांतर्गत शत्रुंपासुन राष्ट्राचे रक्षण करणे हे अभिप्रेत असते. बाहेरून होणारे आक्रमण ही काही रोज घडणारी घटना नाही. परंतू देशातील अंतर्गत परिस्थितीचा विचार करता देशांतर्गत शत्रुंपासुन राष्ट्रीय सुरक्षेला नेहमी आव्हान दिले जाते. राष्ट्रीय सुरक्षेच्या संकल्पनेमध्ये काळानुरूप बदल होत आहे. आधुनिक काळात राष्ट्रीय सुरक्षेमध्ये समता, स्वातंत्र्य, सामर्थ्य आणि शांतता यांचा समावेश झालेला आहे. राष्ट्रीय सुरक्षेत अनेक समस्या असतात. त्यांचे निराकरण करण्याची जबाबदारी सरकारची असते.

कोणत्याही देशाची सुरक्षा ही सामाजिक व आर्थिक पायांवर आधारीत असते. देशाची प्रादेशिक अखंडता व सार्वभौमत्व यांच्या रक्षणासाठी योग्य ती क्षमता निर्माण करणे गरजेचे असते. कोणत्याही देशाला राष्ट्रीय सुरक्षा अबाधित ठेवण्यासाठी प्रयत्नशील रहावे लागते. तसेच ज्या देशामध्ये विविधता अधिक असते त्या देशाच्या सुरक्षेचे प्रश्न अधिक जटील असतात. ते प्रश्न सोडविण्यातच त्या देशाची शक्ती खर्च होते. त्याचा परिणाम देशाच्या विकासावर होतो. भारताच्या संदर्भात विचार केला तर भारतात मोठ्या प्रमाणावर विविधता दिसून येते. भारतात भौगोलिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, भाषिक, वांशिक व जातीविषयक विविधता मोठ्या प्रमाणावर आहे, त्यामुळे भारताची राष्ट्रीय सुरक्षा अबाधित ठेवणे व त्यासाठी प्रयत्न करणे एक मोठे आव्हान सरकारपुढे असते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी याच गोष्टींचा अभ्यास करून भारतीय राज्यघटनेत वेगवेगळ्या तरतुदींचा समावेश केलेला दिसून येतो. या तरतुदींमागे भारताची राष्ट्रीय सुरक्षा जोपासणे हा हेतू दिसून येतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारत सरकारच्या संरक्षणविषयक सल्लागार समितीचे सदस्य होते. भारताच्या सुरक्षेबाबत डॉ.आंबेडकरांनी आपल्या भाषणांमधुन विचार प्रकट केलेले आहेत. भारतीय समाजात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतीक, धार्मिक आधारावर अनेक विखंड निर्माण झाले आहेत. वंश, जात, धर्म, पंथ, भाषा आणि प्रांत या आधारावर भेद निर्माण झालेले आहेत. राजकीय लोकशाही बरोबरच या देशात सामाजिक, आर्थिक लोकशाही येईल असे प्रयत्न करावे लागतील. त्यातुनच एकमय राष्ट्र निर्माण होईल. संघराज्य लोकशाही व्यवस्था राज्यघटनेद्वारा प्रस्थापित करतांना या देशाचे एकात्म स्वरूपाचे चित्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाहिले. धर्मभेद, जातीभेद संपुष्टात आणुन सामाजिक, आर्थिक लोकशाहीची अपेक्षा त्यांनी केली. केंद्र शासन त्यासाठी प्रबळ असावे अशा स्वरूपाच्या घटनात्मक तरतुदी केल्या. सार्वभौम राष्ट्र उभे राहण्यासाठी देशाचे सामर्थ्य संवर्धनाची तरतुद डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली. सामर्थ्यशाली विकसित देश अखंड देश अशी भारताची वास्तव स्थिती निर्माण व्हावी असे त्यांचे स्वप्न होते.

**विषयाचे महत्त्व**

देश लहान असो किंवा मोठा असो, शक्तीशाली असो किंवा कमकुवत असो, प्रत्येकाला आपल्या सुरक्षेसाठी प्रयत्नशील रहावे लागते. देशाला असुरक्षिततेची जाणिव झाली की सुरक्षेसाठीचे मार्ग शोधले जातात. त्यासाठी सामर्थ्य वाढविणे हा एक मार्ग आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी याच संदर्भात आपले विचार मांडतांना म्हटले आहे की, तुम्हाला प्रभावी व्हायचे असेल, तर तुम्ही हातात बंदुका घेतल्या पाहिजेत, तरच तुम्ही देशाचे बाह्य शत्रुंपासुन संरक्षण करू शकाल. जे सहकार्य करायला तयार आहेत त्यांच्याशी सहकार्य केले पाहिजे. तसे नको असेल तर रशिया व चीन यांच्याशी मैत्री करायला हवी. यावरून असे म्हणता येईल की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेबाबत गांभीर्याने विचार करीत होते. भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेबाबत अभ्यास करतांना असे दिसून येते की, भारतावर अनेक दशके, फ्रेंच, पोर्तुगीज, डच, मोगल, इंग्रज यांचे अधिपत्य होते. त्याचा देखील प्रभाव भारताच्या सुरक्षेवर झालेला दिसून येतो. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतासमोर अनेक समस्या होत्या. त्यातीलच एक समस्या म्हणजे सार्वभौम भारताची सुरक्षा अबाधित ठेवणे होय. भारतात अनेक जाती, वंश, धर्म, पंथ, भाषा आणि प्रांत अस्तित्वात होते. त्यांच्यात एकात्मता निर्माण करणे राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिने अत्यंत महत्त्वाचे होते. म्हणूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेत घटनात्मक तरतुदींचा समावेश करून राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. १९४७ साली भारताची फाळणी झाल्यापासुन ते आजतागायत जो अखंड भारत आपणास पाहावयास मिळत आहे तो डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेत केलेल्या तरतुदींमुळेच हे नाकारता येणार नाही.

**भारताची राष्ट्रीय सुरक्षा आणि परराष्ट्र धोरणासंबंधी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताला परराष्ट्र धोरण ठरविणे अत्यंत गरजेचे होते. कारण जगातील भारताचे स्थान परराष्ट्रीय धोरणावरच अवलंबुन राहणार होते. देशाचे स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्व, देशाचा मान आणि प्रतिष्ठा फार मोलाचे आहेत. त्यामुळे जगातील विविध देशांशी मैत्रीपुर्ण संबंध निर्माण करून आपले अस्तित्व निर्माण केले पाहिजे. असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. परराष्ट्र धोरण ठरवितांना सर्वात प्रथम आपल्या देशाचे हित पहावे आणि असे हित पाहतांना संतपणाचा आव आणु नये असे त्यांचे म्हणणे होते. इतर देशांप्रमाणे अशक्य ध्येयापेक्षा शक्य असलेली गोष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते. पाकिस्तानशी शत्रुत्व हे आमच्या पराष्ट्र धोरणाचे अंग असले तरी, पाकिस्तानला अमेरिकेकडून मदत मिळत आहे. ही मदत लष्करी स्वरूपाची असल्याने अधिक गंभीर बाब आहे. आशिया खंडात कम्युनिझमचा प्रभाव वाढविण्यासाठी रशिया व चीन प्रयत्नशील आहेत. श्रीलंकन सरकारसोबत नागरिकत्वासाठी आमचा वाद सुरू आहे. श्रीलंकन सरकार आमचे म्हणणे ऐकण्यास तयार नाही. भारत सरकारची या सर्वच बाबतीत गुळगुळीत भाषणे उपयोगी ठरणार नाहीत. त्यासाठी गरज आहे ती खंबीर भुमिकेची. असे डॉ. बाबासाहेबांचे मत होते. डॉ.आंबेडकरांचे हे विचार देशाच्या कल्याणाचे होते. जगातील इतर देशांशी मैत्रीपुर्ण संबंध प्रस्थापित करणे भारताच्या विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे असे डॉ.आंबेडकर आग्रहाने सांगत होते.

डॉ. आंबेडकर भारताच्या भवितव्याचा विचार जगातील इतर देशांच्या संदर्भातही करीत राहिले. सरकारच्या लष्करी निपुणतेसंबंधी आंबेडकरांनी जे विचार मांडले तेही एकात्म, अखंड आणि समर्थ भारत उभारणीचे चित्र डोळ्यासमोर ठेवूनच. भारताच्या संरक्षणाच्या दृष्टीने दक्षिण भारतात हैद्राबाद येथे देशाची उपराजधानी ठेवणे गरजेचे आहे. त्यामुळे लष्करी संरक्षण व्यवस्था अधिक मजबुत होईल. तसेच हैद्राबाद उपराजधानी केल्याने लष्करी संरक्षणासोबतच दक्षिण भारताचा सरकारी यंत्रणेतील सहभाग वाढेल. सध्याच्या सरकारी यंत्रणेत उत्तर भारतीयांचे वर्चस्व आहे. प्रत्येक बाबतीत सामान्य माणसास दिल्लीला जाणे अशक्य आहे. सर्व भारतीय एक आहेत असा केवळ नारा देऊन भागणार नाही. तसेच लोकांमध्ये एकात्मतेची भावनाही निर्माण होणार नाही. परंतू भारत सरकारने याकडे दुर्लक्ष केले.

आपल्या सर्व शक्तिनिशी देशाची सेवा करणारे डॉ.आंबेडकर देशाचे महान भक्त होते. म्हणुनच देशाबाहेर आपल्या देशाचा सन्मान राखला पाहिजे, अशी भावना ते प्रकट करतात. तसेच देशाच्या सरकारने व्यवहार्य पातळीवर परराष्ट्र धोरण आखले पाहिजे. त्यातच आमचे शहाणपण आहे असा सल्ला डॉ. आंबेडकर यांनी सरकारला दिलेला होता. देशातील सर्वच नागरिकांच्या मानवी अधिकारांचे रक्षण करणे, देशाचा सार्वभौमत्वाचा सन्मान करणे आणि राष्ट्रनिर्माणाचे स्वप्न डॉ.आंबेडकरांचे होते. म्हणूनच त्यांना राष्ट्रनिर्माणाचे एक महान नेते म्हणुन समजुन घेतले पाहिजे. डॉ.आंबेडकरांच्या मते राष्ट्राचे ध्येय केवळ सुरक्षा प्रदान करणे एवढेच नसुन देशात शांतता प्रस्थापित करणे आणि लोकांचे कल्याण करणे हे देखील आहे. राष्ट्र ही समाजाची सेवा करणारी संघटना व्हावी आणि समाजाची पुर्ण आर्थिक व सामाजिक प्रगती घडवून आणली पाहिजे तसेच आर्थिक व सामाजिक समतेच्या आधारावर लोकशाहीची निर्मिती करणे हे राष्ट्राचे कर्तव्य आहे. समानतेबरोबरच देशात स्वातंत्र्याचे वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. देशातील प्रत्येक नागरिकाचा सुरक्षितपणे जगण्याचा व आपल्या धर्माचे आचराण करण्याचा हक्क मान्य केला पाहिजे. तसेच देशातील जनतेचे अंतर्गत व बहिर्गत धोक्यांपासुन संरक्षण केले पाहिजे. असे डॉ.आंबेडकरांचे म्हणणे होते. अशी सर्व ध्येय साध्य करीत असतांना सरकारला केवळ दुर्बल राहून चालणार नाही. त्यासाठी सरकार आवश्यक तेवढे शक्तीसंपन्न देखील असावे. डॉ.आंबेडकरांनी राष्ट्राच्या प्रमुख तीन ध्येयांचा उल्लेख केलेला आहे. त्यात –

१) प्रत्येक नागरीकाचा जीवीताचा, स्वातंत्र्याचा व सुखाचा शोध घेण्याचा हक्क जतन केला गेला पाहिजे. तसेच विचार स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य व धर्म स्वातंत्र्य हे हक्क सुध्दा जतन केले पाहिजेत.

२) कनिष्ठ व पद दलित वर्गास चांगल्या सुविधा उपलब्ध करून देवून सामाजिक, राजकीय, आर्थिक विषमता दुर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

३) प्रत्येक नागरीकाची गरजेपासुन व भितीपासुन मुक्तता केली पाहिजे.

इ. या गोष्टी शक्य झाल्या तर भारताची अंतर्गत सुरक्षा व्यवस्था अधिक मजबुत होण्यास मदत मिळणार होती. म्हणुन डॉ.आंबेडकर यासाठी आग्रही होते.

भारतात विविध प्रकारचे वंश, धर्म, जाती, पंथ होते. त्यांच्या विविध श्रध्दा, चालिरिती, परंपरा तसेच भाषा वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळ्या होत्या. त्यांच्यात फरक होता. समाजात गरीब–श्रीमंत, शिक्षीत–अशिक्षीत यांचे प्रमाण व्यस्त होते. त्यामुळे त्यातुन एकात्मता निर्माण करण्याची गरज होती. या सर्वांना जोडणारा समान धागा निर्माण करणे आवश्यक होते. त्यामुळेच भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेत लोकशाही, संघराज्यपध्दती, प्रजासत्ताक, समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता इ. राष्ट्रीय सुरक्षेची मुल्ये स्पष्टपणे नमुद करण्यात आली आहेत.

**समारोप**

- डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी राष्ट्रीय सुरक्षेच्या संदर्भात स्पष्ट केले आहे की, तुम्हाला प्रभावी व्हायचे असेल तर तुम्ही हातात बंदुका घेतल्या पाहिजे. याचाच अर्थ तुम्ही शस्त्रसज्ज झाले पाहिजे. शक्तीसपन्न झाले पाहिजे. तरच तुम्ही देशाचे रक्षण करू शकता, अन्यथा नाही.
- डॉ.आंबेडकरांनी जगात भारताचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी परराष्ट्र धोरण ठरवितांना वास्तवतेचे भान ठेवणे आवश्यक आहे. तसेच परराष्ट्र धोरण ठरवितांना आपल्या देशाचे हित जपणे आवश्यक आहे. असे स्पष्ट केले आहे.
- डॉ.आंबेडकरांनी स्पष्ट केले आहे की, जगात आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी व देशाचा विकास करण्यासाठी जगातील इतर देशांशी मैत्रीपुर्ण संबंध प्रस्थापित करणे

आवश्यक आहे.

- भारताच्या संरक्षणाच्या दृष्टीने दक्षिण भारतात हैद्राबाद येथे देशाची उपराजधानी असावी. ज्यामुळे भारताची लष्करी संरक्षण व्यवस्था अधिक मजबुत होण्यास मदत होईल. असे डॉ.आंबेडकरांना वाटत होते.
- देशाबाहेर आपल्या देशाचा सन्मान राखला पाहिजे. अशी भावना ते प्रकट करतात. परंतू आपल्या राजकीय व्यवस्थेत अशा प्रकारची भावना दिसुन येत नाही. राजकीय नेते स्वत:च्या पक्षाचे हित साधतांना राष्ट्रीय हिताकडे दुर्लक्ष करतांना दिसुन येतात.
- डॉ.आंबेडकरांचे असे मत होते की, जोपर्यंत देशातील जातीभेद, धार्मिक भेद, भाषिक भेद, प्रांतभेद संपुष्टात येणार नाहीत, तोपर्यंत देशातील जनतेमध्ये एकात्मतेची भावना निर्माण करणे अशक्य आहे.
- देशातील नागरीकांच्या मानवी अधिकारांचे रक्षण, देशाच्या सार्वभौमत्वाचा सन्मान आणि राष्ट्रनिर्माणाचे स्वप्न डॉ.आंबेडकरांचे होते. म्हणुनच त्यांना राष्ट्रनिर्माणाचे एक महान नेते म्हणुन संबंधले जाते.

**संदर्भ**


१) डॉ.प्रल्हाद लुलेकर, अनंत पैलुंचा सामाजिक यौध्दा, सायन पब्लिकेशन, पुणे, २०१२.

२) डॉ.व्ही.वाय.जाधव, भारताची अंतर्गत सुरक्षा, अथर्व पब्लिकेशन, जळगांव, २०१४.

३) डॉ.वा.भा.पाटील, आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन, जळगांव, २००९.

४) डॉ.एम.आर.इंगळे, वर्तमान परिस्थितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची आवश्यकता, प्रशांत पब्लिकेशन, जळगांव, २०१२.

५) डॉ.भालचंद्र फळके, डॉ.आंबेडकर आणि दलित साहित्य, सिध्दार्थ बुक सेंटर, कोल्हापुर, १९८९.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार

– प्रा. डॉ. रविंद्र पुंडलिक पाटील
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
गंगामाई एज्युकेशन ट्रस्टचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नगांव, ता. जि. धुळे

**प्रस्तावना**

आधुनिक काळातील एक महान अर्थतज्ञ म्हणुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार करावा लागतो, असे असले तरी भारतात त्यांची ओळख दलीतांचे कैवारी, घटनेचे शिल्पकार, समाजसुधारक, कामगार नेते, राजकीय विचारवंत म्हणून आहे. परंतू एक महान अर्थतज्ञ म्हणून त्यांच्या कार्याकडे दुर्लक्ष केले गेले आहे. प्रो. ऐ. के. सेन यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अर्थशास्त्राचे पिता म्हणुन उल्लेख केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे एक असामान्य प्रतिभावंत व्यक्तीमत्त्व त्यांनी कायदा, समाजकारण, मानववंशशास्त्र, धर्मकारण पत्रकारीता अशा विविध क्षेत्रात कार्य केले आहे. त्यांच्या ग्रंथसंपदेत सुमारे अकरा हजार पुस्तके फक्त अर्थशास्त्र विषयाची होती यावरुन अर्थशास्त्रावरचे त्यांच्या अध्ययनाची कल्पना येते. त्यांनी अनेक विषयांवर केलेल्या ग्रंथ निर्मितीवर अर्थशास्त्राचा पगडा प्रकर्षाने जाणवतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्रतज्ञ म्हणुन ओळखले जातात. त्याचा मुख्य विषय अर्थशास्त्र हा होता. त्यांनी अर्थशास्त्रावर विपूस लिखाण केलेले आहे. आदर्श चलन पध्दती, कृषी, उद्योग खाजगी सावकार प्रतिबंधक विधेयक, जातीचे अर्थशास्त्र आर्थिक, पायाभरणी इत्यादी विषयांवर बाबासाहेबांनी आपले विचार मांडलेत मुंबई प्रातांच्या विधिमंडळामध्ये तसेच केंद्र सरकारच्या घटना समितीमध्ये त्यांनी जे युक्तीवाद केलेत त्यातुनच डॉ. बाबासाहेबांमधील अर्थतज्ञ दिसून येतो. त्यांनी प्रत्येक कार्यात अर्थतज्ञ म्हणून वेगळाच ठसा उमटवलेला आहे.

प्रस्तुत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे, आर्थिक विचार या शोधनिबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न अभ्यासकाने केला आहे.

**अभ्यासाचे उद्दिष्ट्ये**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांची चर्चा करणे.
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करुन विश्लेषण करणे.

**अभ्यासाचे गृहितके**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महान अर्थतज्ञ होते.
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार राष्ट्रविकासात महत्त्वाचे ठरतात.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोध निबंधात विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केला असून या विषयाशी निगडीत शोध निबंधातील विवेचन दुय्यम स्त्रोतांवर अवलंबून आहे. यासाठी विविध संदर्भग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रातील बातम्या व लेख, संकेतस्थळ यांचा आधार घेतला आहे.

**विश्लेषण**

भारतातील पहिले सर्वश्रेष्ठ अर्थशास्त्रज्ञ म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना संबोधले जाते. देशाच्या सामाजिक राजकीय क्षितीजावर त्यांचा उदय सन १९२० च्या दशकात झाला समाजातील अगदी अस्पृश्य म्हणून हिणवीलेल्या आगदी तळगाळातील वर्गाच्या पुनरत्थानासाठी सामाजिक, राजकीय आर्थिक आणि धार्मिक पातळीवर तेव्हापासूनच त्यांचा संघर्ष सुरु होता. अपृश्य समाजात जन्मलेल्या बाबासाहेबांनी देश विदेशातील तीन खंडातून आपले उच्च शिक्षण प्राप्त केले. १९१७ मध्ये कोलंबीया विद्यापीठातून अर्थशास्त्रातील पी.एच्.डी., तसेच लंडन स्कुल ऑफ इकॉमामिक्स मधुन डॉक्टर ऑफ सायन्सची पदवी व लंडनमधील ग्रेन इन्सी बार अॅट लॉ सन १९२३ अशा अतिउच्च पदव्या संपादित केल्या.

डॉ. बाबासाहेब यांचा मुळ अभ्यास विषय अर्थशास्त्र हाच होता. डॉ. बाबासाहेबानी अर्थशास्त्रात विपूल लिखाण केले असून त्यांची अडमिनिस्ट्रेशन अँड कायनान्स ऑफ दि ईस्ट इंडिया कंपनी, दि इव्होल्युशन ऑफ प्रोव्हिन्शियल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया, दि प्रॉब्लेम ऑफ द रुपी : इटस ओरिजिन अँड इट्स सोल्युशन ही तीन प्रमुख प्रसिध्द पुस्तके आहेत. पहिले दोन पुस्तके सार्वजनिक वित्त व्यवस्थेवरील असुन त्यातील पहिल्या पुस्तकात ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यवहारावरील असुन त्यात पुस्तकात ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यवहारावरील भाष्य आहे. तर दुसऱ्या पुस्तकात ब्रिटीशांच्या आमदानीतील भारतात वित्तीय व्यवरांमधील केंद्र आणि राज्य संबधावर भाष्य केलेले आहे. तर तीसऱ्या पुस्तकात विनिमयाचे माध्यम म्हणुन भारतीय चलनाची कशी उत्क्रांती झाली हे बाबासाहेबांनी सांगीतले आहे.

मुंबई लेजिस्टेटीव्ह असेम्ब्लीचे सदस्य असतांना १९२६ मध्ये ग्रामीण भागातील गरीबांच्या समस्याविषयी त्यांचे संमग्र आकलन त्यांनी उभारलेल्या जनअंदोलनामध्ये प्रतिबींबीत होते.

शेतीमधील खोंती पध्दती विरुध्द त्यांनी केलेल्या यशस्वी अंदोलनामुळे अनेक ग्रामीण गरीबांची आर्थिक शोषणातून मुक्तता झाली. १७ सप्टेंबर १९३७ रोजी आंबेडकरानी मुंबई कायदे मंडळात खोती पध्दत रद्द करण्याविषयक विधेयक मांडले खोतीपध्दत ही मुंबई इलाख्यातील किरकोळ स्वरुपाची भूसाधारणा पध्दत असून खोती ही रत्नागिरी, ठाणे, कुलाबा जिल्ह्यांच्या काही भागात प्रचलीत होती. खोती पध्दतीमुळे भुधारकाकडून शेतसारा गोळा करुन त्याचा काही हिस्सा शासनाच्या तिजोरीत भरण्याची जबाबदारी खोत या व्यक्तीकडे होती. एकदा शेतसाऱ्यापैकी ठरावीक रक्कम शासकिय तिजोरीत भरणा करुन झाला की, भुधारकाशी वाटेल तसे वर्तन करायला स्वातंत्र्य असे अशा वाईट खोती पध्दतीचा अंत बाबासाहेबांनी केला असे करीत

असतांना खोताला देखील वाजवी स्वरुपाची नुकसान भरपाई देण्यात यावी अशी अशी तरतुद आंबेडकरांनी खोती विधेयकात केली.

सावकारांच्या मनमानीला चाप लावण्यासाठी त्यांनी विधेयक आणले. औद्योगिक कामगारांच्या क्षेत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इ.स. १९३६ मध्ये स्वतंत्र्य मजूर पक्षाची स्थापना केली त्याकाळी कामगाराचा आवाज बुलंद, करणाच्या अन्य संघटना होत्याच मात्र त्यांना अस्पृश्य कामगारांच्या मानविधकारांशी काहीही देणे-घेणे नव्हते. नव्या राजकीय पक्षाने ही उणिव भरुन काढली. त्याच प्रमाणे व्हॉइसरॉय कॉन्सिलचे कामगार सदस्य या नात्याने १९४२ ने १९४६ या काळात डॉ. बाबासाहेबांनी कामगारविषयक धोरणात अमुलाग्र सुधारणा घडवून आणल्या त्यात 'सेवायोजन कार्यालयाची' स्थापना ही महत्त्वपूर्ण घटना होती. स्वतंत्र्य भारतातील औद्योगिक संबधाची तीच पायाभरणी ठरली, बाबासाहेबांनी पाटबंधारे ऊर्जा, आणि इतर सार्वजनिक बांधकामे याखात्यात अमुलाग्र सुधारणा घडुन आल्यात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या विचारांमुळे पुढे मध्यवर्ती बँकेचे स्थापना करण्यात आली जी आज भारतीय रिझर्व बँक म्हणुन कार्यरत आहे. त्याचबरोबर दामोदर बहुउद्देशिय प्रकल्प, हिराकूड योजना, व सोन नदी योजना निर्माण करण्यात डॉ. बाबासाहेबांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे, तसेच भारतात पाण्यापासून विजनिर्मिती योजना सुरु करण्यात देखील बाबासाहेबांचे योगदान अतुलनीय आहे.

विनिमय दारासंबधी विचार हे बाबासाहेबांनी ग्रंथात मांडलेले आहेत. १८०० ते १८९३ या कालखंडात भारतीय रुपयाची चलनाचे परिणाम म्हणून कशी जडणघडण होत गेली याचे विवेचन केलेले आहे. चलन विषयक वाद विवादात त्यांना डॉ. जॉन केन्स या जगदविख्यात अर्थतज्ञाशी संघर्ष करावा लागला, जगातील सर्वच देशांनी सुवर्णमान चलन पध्दतीचा स्विकार केला होता त्यामुळे भारताने देखील तसे करणे सुयोग्य ठरले असते परंतु भारतात मात्र सुवर्ण मानका ऐवजी सुवर्ण विनिमय परिणाम प्रचलित झाले. सुवर्णमानकामध्ये प्रत्यक्ष सोन्याच्या नाण्यांचा देवाण घेवाणीसाठी उपयोग होता याउलट सुवर्ण विनियम परिमाध्ये कागदी चलनाच्या व्यवहारामध्ये उपयोग होतो ते कागदी चलनाच्या ठरावीक दराने सोन्यामध्ये बदलून देण्याची हमी सरकारकडून दिली असते. प्रो. केन्स यांनी सुवर्ण विनिमय परिणामाचा पुरस्कार केला होता त्यांच्या मते हे परिमाण लवचिक आहे. देशामध्ये चलन निर्मिती किती न्हावी ते देशाच्या सोन्याच्या साठ्यावर अवलंबुन नसल्याने चलन निर्मितीवर बंधने राहत नाही. डॉ. आंबेडकरांनी याला कडाडून विरोध केला त्यांच्या मते सुवर्ण विनिमय परिणामामध्ये अर्थव्यवस्थे किती चलन निर्मिती व्हावी हे सरकारच्या मर्जीवर अवलंबून असते. त्यामुळे राज्यकर्ते बेजबाबदार असतील तर निरंकूश चलन निर्मिती होण्याची भिती असते. त्यातून चलन पुरवठा वाढून भाववाढ होते व सामान्य माणूस भरडला जातो सामाजिक आरोग्य धोक्यात येवू शकते. विनिमय साधन म्हणून रुपयाचे स्थान ढळमळीन होवू शकते असे डॉ. बाबासाहेबांना वाटत होते. परंतू त्याकाळात केन्सच्या भूमिकेचा भारताने स्विकार केला त्यामुळे भारताचे अपरिमीत नुकसान झाले. परंतू डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका मात्र आता इतके वर्ष लोटल्यावरही किती योग्य होती हे अर्थतज्ञांच्या लक्षात येत आहे.

अशा प्रकारे विविध आर्थिक विचार बाबासाहेबांनी मांडले असुन भारतीय अर्थव्यवस्थेत त्यांच्या काही विचारांना मुर्त स्वरुप देण्यात आल्याने देशाचा आर्थिक विकास होण्यास मदत झाली आहे.

**डॉ. बाबासाहेबांचे शेती विषयक विचार**

आर्थिक विषमता व समान समाज व्यवस्था निर्माण व्हावी म्हणून बाबासाहेबांनी शेती विषयक पुढील विचार मांडले आहेत.

१) शेतीचे राष्ट्रीयकरण करावे.
२) प्रत्येक कुटुंबास जमिनीचे योग्य वाटप करावे.
३) शेतजमिन वाटप करतांना जात वंश इ. आधार घेवू नये.
४) सामुदायीक शेतीचे व्यवस्थापन करण्यात यावे.

आर्थिक विचाराबाबत डॉ. बाबासाहेबांचे तत्वज्ञान खऱ्या अर्थाने क्रांतीकारक तत्वज्ञान होते. परदेशातील विद्यापिठातील अध्ययन, चिंतन, विचारांची प्रयल्भता यामुळे त्यांच्या आर्थिक विचारसारणीत निर्भयपणा दिसून येतो.

**निष्कर्ष**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सुप्रसिध्द अर्थतज्ञ होते.
२) डॉ. बाबासाहेबानी अर्थशास्त्रात विपूल लिखाण केले
३) ब्रिटीश इंडिया कंपनीच्या भारतातील नितीवर बाबासाहेबांनी प्रकर्षाने अध्ययन केले.
४) शेती मधील खोत पध्दत डॉ. बाबासाहेबांमुळे बंद झाली.
५) बाबासाहेबांनी कामगार विषयक धोरणात अमुलग्र बदल घडवून आणलेत.
६) डॉ. बाबासाहेबच्या नितिमुळे अनेक बहुउद्देशिय प्रकल्प भारतात स्थापन झाले.
७) रोजगार विनिमय विभागाची स्थापना डॉ. बाबासाहेबाच्या पुढाकारनेच झाली.
८) विनिमय दराविषयी बाबासाहेबांचे धोरण आज देशाला हितावह वाटत आहे.

**संदर्भ**

१) प्रा. सौ. राठी शुभांगी, महाराष्ट्राचा सामाजिक व राजकिय अभ्यास
२) आंबेडकर भिमराव रामजी (अनुवादक) प्रा. प्रमोदकुमार नंदेश्वर - रुपयाची समस्या उगम आणि उपाय
३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ - दया पवार (संपादक) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अर्थशास्त्रीय लेख

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित चळवळ व स्त्रीया

**– प्रा. अमृत निंबा वळवी**
इतिहास विभाग प्रमुख
गंगामाई एज्युकेशन ट्रस्ट्चे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नगांव, ता. जि. धुळे

**प्रस्तावना**

दलित म्हणून आणि स्त्री म्हणुन होणाऱ्या दुहेरी शोषणाचा काच दलित स्त्रीयांना होता. स्त्रीयांनी डॉ. बाबासाहेबांच्या एकूण चळवळीतील सर्व महत्वाच्या टप्प्यांवर भरभरून प्रतिसाद दिला. पुरुषांइतकीच स्त्रीयांची संख्या प्रत्येक लढ्यांमध्ये असे. परंतू त्यांची नावे कुठे इतिहासात फारशी नोंदली गेली नाहीत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्याय आणि समता यासाठी व्यवस्थेच्या विरोधात जे विविध लढे दिले, त्या सर्व लढ्यांमध्ये स्त्रीयांचा सक्रिय सहभाग राहील यावर त्यांचा कटाक्ष असे.

'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' हा संदेश त्यांनी केवळ दलित पुरुषांना दिला नव्हता, तर पुरुषांबरोबर स्त्रीयांनीही शिक्षण घ्यावे आणि स्वउन्नतीबरोबर सामाजिक संघर्षात यावे अशी त्यांची अपेक्षा होती. आणि त्यादृष्टिने ते जिथे जातील तिथे स्त्रीयांना संबोधित करत.

प्रस्तुत 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित चळवळ व स्त्रीया' या शोध निबंधात डॉ. बाबासाहेबांच्या एकुण चळवळीतील सर्व महत्त्वाच्या टप्प्यांवर स्त्रीयांच्या प्रतिसादाचे अध्ययन करण्याचा प्रयत्न अभ्यासकाने केला आहे.

**अभ्यासाचे उद्दिष्ट –** डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित चळवळीतील स्त्रीयांचे सहभागाचे अध्ययन करणे.

**अभ्यासाचे गृहितकृत्य –** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दलित चळवळीत स्त्रीयांचा भरभरून प्रतिसाद आहे.

**संशोधन पध्दती –** प्रस्तुत शोधनिबंधामध्ये विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केला असुन या विषयाशी निगडीत शोधनिबंधातील विवेचन दुय्यम स्त्रोतांवर अवलंबून आहे. यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रातील लेख, संकेतस्थळ यांचा आधार घेतला आहे.

**विश्लेषण**

हिंदु कोडबिलाच्या संबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपली भूमिका स्पष्ट करतांना म्हणतात की, समाजातील वर्गावर्गातील असमानता, स्त्री-पुरुष यांच्यातील असमानता तशीच अस्पर्शित राहु देऊन, आर्थिक समस्यांतील निगडीत कायदे संमत करीत जाणे म्हणजे आपल्या संविधानाची चेष्टा करणे होय.

हिंदु धर्मात अस्पृश्य मानल्या गेलेल्या समाजाकरिता व स्त्रियांची विविध प्रकारच्या शोषणातून सुटका व्हावी यासाठी हिंदु कोडबिल, जात पंचायतमध्ये स्त्रियांना स्थान नव्हते. देवदासी, मुरल्या, जोगतीणी यांच्याबाबत असलेल्या प्रथा उखडून टाकण्याची चळवळ सन १९२७ च्या महाड चवदार तळ्याच्या सत्याग्रहात स्त्रियांचा सहभाग होता. सन १९३० च्या नाशिकच्या काळाराम मंदिर सत्याग्रहात पहिली अटक होणारी तुकडी विशेष म्हणजे स्त्रियांचीच होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सर्व चळवळी समाजातील महिलांच्या नेतृत्वाचा पाया भक्कम करण्यासाठीच होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक मोठे द्रष्ट्ये पुरुष होते. स्त्री स्वांतत्र्याचे कैवारी असणाऱ्या या प्रकांड पंडिताला कळून चुकले की, कोणत्याही समाजाची उन्नती करायची असेल तर त्या समाजात शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होणे आवश्यक आहे. अर्थात हा प्रसार केवळ पुरुषात होऊन चालणार नाही. तर तो स्त्रियांतही होणे आवश्यक आहे. कोणत्याही समाजातील स्त्रियांचा दर्जा हा त्या समाजाच्या सुधारणेचा मापदंड असतो म्हणूनच डॉ. बाबासाहेबांनी स्त्री-स्वातंत्र्याचा पुरस्कार करतांना अनेक सभा-संमेलनातून, परिषदांतून विशेषत: महिला परिषदांतून तसेच आपल्या लिखाणातून , हिंदु कोडबिलाच्या माध्यमातून, राज्यघटनेतून स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार करुन स्त्रि शिक्षणावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष भर दिला.

समाजात स्त्री-पुरुषांना समान स्थान असले पाहिजे असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टिकोन होता. त्यासाठी त्यांनी नेहमीच आपल्या भाषणातून हे समाजाला पटवून देण्याचा प्रयत्न केला. महिलांची समाजातील स्थिती अत्यंत दयनीय होती. स्त्रीयांना सर्वच अधिकारांपासून वंचित ठेवलेले होते. स्त्रीयांना स्वत:च्या विकासासाठी जर काही हक्क प्रदान केले, कायदे केले तर निश्चितच स्त्रीयांच्या स्थितीत बदल होईल. स्त्रीयांच्या अनेक समस्या आहेत. त्या कमी करण्यासाठी स्त्रीयांना शिक्षण देण्याची गरज आहे. शिक्षणामुळे स्त्रीया सबल होतील. असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टिकोन होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार आणि कार्याची प्रेरणा घेवून स्वांतत्र्योत्तर काळातील दलित चळवळ उभी राहिली. धर्मांतरामुळे दलितांच्या मानसिकतेत क्रांतीकारक बदल घडून आला. दलितांना नवे आत्मभान मिळाले. हिंदू धर्माचा बहुसंख्य दलितांनी त्याग केला. हिंदु देवदेवता नाकारल्या. हिंदु समाजातील अनेक प्रथा-परंपरा झिडकारल्या त्रैवर्णिकांची सेवा- चाकरी नाकारली. खेडोपाडी धर्मातरांचे लोण पोहचले. त्यामुळे गावात बहिष्कार टाकला. त्यांचा छळ केला दलितांना गाव बंद केले. त्यांची नाकेबंदी केली. तरीही दलितांनी गुलामी स्वीकारली नाही. गावातील दलित सवर्णांच्या तेढीतुनच परिवर्तनाचे नवे वारे वाहू लागले.

आज धर्मांतरानंतरची चौथी पिढी शिकून सावरून मोठ्या पदावर काम करीत आहे त्यात स्त्रीयांची संख्या लक्षणीय आहे अजून जात पूर्णपणे गेलेली नाही ही खंत आहेच. पण कला साहित्य, उद्योग, शिक्षण राजकरण समाजकरण अशा सर्वच क्षेत्रात दलित स्त्रीया आपला ठसा उमटवतायत. हे निरोगी समाजघडणीसाठी एक चांगले चिन्ह आहे. अजून जात पूर्णपणे गेलेली नाहीय ही खंत आहेत. पण थंडावलेल्या दलित चळवळीला पुन्हा चालना मिळाली तर स्त्री नेतृत्व त्यातून

नक्कीच पुढे येईल असे अभ्यासकास वाटते.

**निष्कर्ष**

दलित म्हणून आणि स्त्री म्हणून होणाऱ्या दुहेरी शोषणाचा काच दलित स्त्रीयांना होता. स्त्रीयांनी डॉ. बाबासाहेबांच्या एकूण चळवळीतील सर्व महत्त्वाच्या टप्प्यांवर भरभरून प्रतिसाद दिला. हिंदू धर्मात अस्पृश्य मानल्या गेलेल्या समाजाकरिता व स्त्रीयांची विविध प्रकारच्या शोषणातून सुटका व्हावी यासाठी हिंदु कोडबील, जातपंचायतमध्ये स्त्रीयांना स्थान नव्हते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सर्व चळवळीत समाजातील स्त्रीयांच्या नेतृत्वाचा पाया भक्कम करण्यासाठीच होता असे अभ्यासकास दिसून येते.

**संदर्भ**

१) प्रा. जाधव सुशिला मुल – 'भगवान बुध्द, डॉ. बाबासाहेब आबेडकर, आणि भारतीय स्त्री'
२) खरात शंकरराव – 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर'
३) डॉ. मेश्राम योगेंद्र – 'दलित साहित्य उद्‌गम आणि विकास'
४) संपादन – प्रधान ग. प्र., जाधव रा. ग. 'निवडक, साधना ग्रंथसंच : खंड-४ चळवळी व आंदोलने.'
५) प्रा. सौ. राठी शुभांगी – 'महाराष्ट्राचा सामाजिक व राजकीय अभ्यास'
६) कसबे रावसाहेब – 'दलित चळवळीची वाटचाल'
७) डॉ. देवगांवर एस.जी. – 'सामाजिक चळवळी परांपरागत आणि नवीन'

# भारतीय अर्थव्यवस्थेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान

**– प्रा. डॉ. राजू कथ्थु शिंदे**
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, देवपूर, धुळे

**प्रस्तावना**

अस्पृश्यतेच्या समस्येबाबत मानसिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, कायदेशीर अशा सर्वच पातळयांवर सर्वंकष लढा देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशात महू या गावी झाला. त्यांचे मुळ घराणे रत्नागिरी जिल्हयातील अंबावडे हे होय.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीयव्यवस्थे बद्दल सखोल अध्ययन केले व त्याची शास्त्रशुध्द मांडणीही केली. त्यामुळे ते दिलत व शोषितांचे कैवारी व मशिहा बनले. जाती भेदाचा त्यांना अत्यंत त्रास सहन करावा लागला. हिंदु धर्माच्या एकीकरणास जातीभेद केवळ एकच अडचण असल्याचे त्यांनी सांगितले. आयुष्यभर खडतर ज्ञानसाधना करुन विधीशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र यात प्रभुत्व संपादन केले. दलित व पिडीत शोषीत वर्गासाठी त्यांच्या उन्नतीसाठी त्यांनी आपले संपुर्ण आयुष्य समर्पित केले. डॉ. आंबेडकरांचे कार्य केवळ दलितांसाठी नव्हतेच तर ज्यांना माणुस म्हणुन जगण्याचे हक्क देणेच बहुसंख्य माणसांनी नाकारले. धर्म-वर्ण-जात-लिंग-व्यवसाय यांच्या आधाराने ज्यांचे शोषण केले ज्यांच्या वाटयाला केवळ अपमान आणि दारिद्रय आणले अशा सर्वच वंचितांना त्यांनी आत्मसन्मानाचा मार्ग दाखविला. अर्थशास्त्र आणि डॉ. आंबेडकर यांचा खुप निकटचा संबंध होता. तत्कालीन परिस्थीतीत ब्रिटीशांनी भारतात जुलमी राजवट लागू केली. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था डबघाईस आली. त्यातच १९१४ चे पहिले महायुध्द, १९२९ ची जागतिक महामंदी, १९३९ चे दुसरे महायुध्द यामुळे जगातील बहुतांश अर्थव्यवस्था कोलमडुन गेल्या याला भारत ही अपवाद नव्हता. भारताला पुर्नउभारणीसाठी ठोस पाऊले उचलण्याची गरज होती. तेंव्हा दादाभाई नौरोजी, डॉ. आंबेडकर, म. गांधी, रानडे, गोखले यांचे विचार व मौलीक मार्गदर्शन भारताच्या आधुनिक जडनघडणीत उपयोगी पडले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे शोध निबंध लिहिलेत, त्याकाळी त्यांनी जी भाषणे केलीत, वर्तमान पत्रातुन जे लिखाण केले, स्वतंत्र मजुर पक्षाचा जो जाहिरनामा मांडला आणि अर्थशास्त्रावरील जी पुस्तके लिहिली त्यामध्ये त्यांचे आर्थिक विचार दिसून येतात. डॉ. बाबासाहेबांनी इतर विचारवंताप्रमाणे नविन आर्थिक सिध्दांत जरी मांडले नसले तरी आर्थिक प्रश्नांसंबंधी त्यांनी आपले विचार मांडलेले आहेत त्यापैकी महत्वपुर्ण विचार पुढीलप्रमाणे -

**शेतीसंबंधीचे विचार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९१८ मध्ये लेख लिहिला. या लेखामध्ये त्यांनी असे सांगितले की, शेती हा भारताचा एक सर्वात मोठा राष्ट्रीय उद्योग आहे. सर्व प्राथमिक व्यवसायामध्ये शेतीचे महत्व अधिक आहे. भारतीय शेतीच्या उत्पादकतेवर परिणाम करणाज्या घटकात १) भारतीय शेतीचा आकार २) शेतजमीनीवरील उत्पादन घटकाचे प्रमाण ३) जमिनीची खाजगी मालकी इत्यादी घटक सांगितले. तसेच त्यांनी सामुदायिक शेतीचा पुरस्कारही केला.

**उद्योगासंबंधी विचार**

डॉ. आंबेडकरांनी देशाच्या आर्थिक विकासामध्ये कृषि क्षेत्राला जेवढे महत्व दिले तेवढेच उद्योग देखील दिले आहेत. अतिरीक्त आणि कार्यविहीन पडलेल्या लोकसंख्येचा मोठा भाग शेतीलवर ताण निर्माण करतो. म्हणुन भारताच्या शेतीविषयक प्रश्नाचे उत्तर या देशाच्या औद्योगिककरणातच आहे असे आंबेडकरांचे मत होते.

अविवेकी यांत्रिकीकरणाला गांधीजीचा विरोध होता. पण लोकशाही मध्ये प्रत्येकाने सुखी जीवन जगण्यासाठी अधिकाधिक यंत्राचा वापर करावा असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. जास्तीत-जास्त यंत्रे व आधुनिक संस्कृती हे लोकशाही समाजाचे घोषवाक्य असले पाहिजे. उद्योगांचा विकास झाल्याशिवाय भारतीयांचा विकास होऊच शकणार नाही असे प्रतिपादन त्यांनी केले.

**रुपयाचा प्रश्न**

भारतीय चलन पध्दतीच्या उत्क्रांतीचा अभ्यास करणारे डॉ. आंबेडकर हे पहिले भारतीय अर्थतज्ञ होते. त्याकाळात जी सुवर्णचलन परिमाण पध्दती चालु होती या पध्दतीला विरोध केला आणि मर्यादित चलन निर्मितीच्या अधिकारावर अपरिवर्तीनीय रुपया पध्दतीचा पुरस्कार केला. सुवर्णचलन परिणामाऐवजी सुवर्णचलन विनीमय दर पध्दतीचा वापर केला पाहिजे. कारण रुपयाची क्रयशक्ती जोपर्यंत स्थिर ठेवू शकत नाही तो पर्यंत रुपया स्थिर राहु शकत नाही. म्हणुन आंबेडकरांनी अपरिवर्तनीय कागदी चलन पध्दतीचा पुरस्कार मर्यादीत चलन निर्मितीसह सुचविला आहे.

**अर्थशास्त्राचे स्वरुप**

डॉ. आंबेडकरांनी अर्थशास्त्रामध्ये फक्त संपत्ती व आर्थिक संबंधाचा अभ्यास न करता समाजाच्या कल्याणाचा देखील अभ्यास केला पाहिजे असे सांगितले. देशातील संपत्तीचे विभाजन समाजामध्ये सारख्याच प्रमाणात झाले पाहिजे असा विचार मांडला. जाती व्यवस्थेचा भारताच्या आर्थिक व्यवस्थेवर अर्थव्यवहारावर कसा विपरीत परिणाम झाला हे त्यांनी स्पष्ट केले. भारतीयांनी पाश्चिमात्यांच्या कल्पना जशाच्या तश्या स्विकारु नयेत असे त्यांचे मत होते. देशातील भांडवल, चलन पुरवठा, उपभोग व श्रमविभागणी यावर जाती व्यवस्थेचा विपरीत परिणाम झाला आहे. यातुन दारिद्रय, असमानता यामध्ये वाढ होत गेली. याचा अनिष्ट परिणाम भारताच्या आर्थिक विकासावर झाला म्हणुन देशातील लोकांचे

कल्याण कसे साधता येईल या दृष्टीने अर्थशास्त्रात विचार व्हायला पाहिजे असे आंबेडकरांचे मत होते.

**राजस्वविषयक विचार**

डॉ. आंबेडकरांनी १९२५ मध्ये जो प्रादेशिकवित्त हा ग्रंथ प्रकाशीत केला. या ग्रंथामध्ये राजस्वविषय विचार मांडले आहेत. या ग्रंथात १८३३ ते १९२१ या कालावधीत भारतीय वित्त व्यवस्थेचा विकास कसा होत गेला याची माहिती डॉ. आंबेडकरांनी दिली. प्रा. शेलींगमन यांनी असे म्हटले की, भारतातील प्रोदशिक वित्तासंबंधीचे जे विश्लेषण करण्यात आले त्यामध्ये डॉ. आंबेडकरांचे योगदान उल्लेखनीय आहे.

१८३३ ते १९२१ या काळामध्ये राजस्वाचे संपुर्ण केंद्रियकरण झाले होते. अर्थसंकल्प तयार करण्याचा अधिकार केवळ घटक राज्यांना होता तर त्यासाठी पैसा उभा करण्याची जबाबदारी केंद्र सरकारची होती. त्यामुळे घटक राज्याची वित्तविषयक मागणी योग्य की अयोग्य हे ठरविण्याचा अधिकार केंद्रसरकारला नव्हता. म्हणुन कधी–कधी अयोग्य मागणी मंजुर करावी लागत असे. परिणामी केंद्र सरकारची अर्थसंकल्पीय तुट वाढत होती. १८७१ पासुन राज्यासाठी व केंद्रासाठी वेगवेगळे अर्थसंकल्प तयार करण्याची पध्दती प्रथमच सुरु करण्यात आली. डॉ. आंबेडकरांचे विचार आजच्या वित्त आयोगामध्ये दिसुन येत आहे.

**आंतरराष्ट्रीय व्यापार विषयक विचार**

डॉ. आंबेडकरांनी आंतरराष्ट्रीय व्यापारासंदर्भात सांगितले की, जो माल देशात उत्पादीत होत नाही व ज्याची किंमत कमी असते अशीच वस्तु परदेशातुन आयात करावी या बरोबरच स्वदेशी मालासही प्राधान्य देण्यात यावे पण ब्रिटीशांचा अनियंत्रीत व्यापार नियंत्रीत पध्दतीने व्हावा असे विचार त्यांनी मांडले.

**दारुबंदी विषयक विचार**

डॉ. आंबेडकरांचे मत दारु बंदी करण्यात आली तर देशातील व्यक्ती बेकायदेशीर दारु उत्पादन करतील व सरकारला मिळावयाचा महसुल बुडेल आणि सरकारचे उत्पन्न कमी होईल. पण याचा अर्थ असा नव्हे की, बाबासाहेबांना दारुचे दुष्परिणाम माहित नव्हते तर उलट त्यांची भुमिका अशी होती की, लोकांच्या दैनंदिन जीवनातुन दारु नष्ट झाली पाहिजे. दारुच्या उत्पादनावर व वितरणावर सरकारने बंदी घालावी त्यासाठी त्यांनी परवाना पध्दती व शिधावाटप पध्दती सुरु करावी असे सुचविले. दारुच्या व्यवहारातुन जो महसुल सरकारला मिळेल त्याचा वापर शेतकज्यांना कर्ज देण्यासाठी व शिक्षणासाठी करावा.

**करविषयक विचार**

डॉ. आंबेडकरांच्या मते कराची आकारणी करीत असतांना व्यक्तीचे उत्पन्न किती आहे यापेक्षा त्या व्यक्तीची करभरण्याची क्षमता किती आहे हे लक्षात घेतले पाहिजे आणि विशिष्ट मर्यादेपर्यंतच्या उत्पन्नावर तर कराची आकारणीच करु नये. कर स्थुल उत्पन्नावर नसावेत कर मालमत्तेवर आकारावा. कराची आकारणी प्रगतीशिल दराने करावी. शेतीवरील महसुल लवचिक स्वरुपाचा असावा असे त्यांनी प्रतिपादन केले.

**शेतीसंबंधी विचार**

औद्योगिक कामगारांना ज्या सवलती मिळतात, जे फायदे मिळतात त्या शेतमजुरांना देखील मिळाल्या पाहिजेत. जसे औद्योगिक कामगारांना भविष्यनिर्वाह निधी, आरोग्य विमा, अपघात विमा, नुकसान भरपाई इत्यादी स्वरुपाच्या सोयी मिळतात. या सोयी मिळतात. या सोयी शेतमजुरांना देखील मिळाल्या पाहिजे. हे विचार स्वातंत्र्यपुर्व काळात मांडलेले असले तरी सध्याच्या परिस्थितीत गांभीर्याने विचार करावयास लावणारे आहेत.

**शैक्षणिक व साहित्यविषयक**

सर्वसामान्य व दलित मानवाच्या उन्नतीसाठी शिक्षण खुपच महत्वपुर्ण भुमिका निभावते. शिक्षण हा मानवाचा तिसरा डोळा आहे. शिक्षणामुळे मानव स्वत:चे संरक्षण करु शकेल. या विद्येनेच दुष्टांचा संहार करता येतो, तसेच ते शिक्षण व्यक्तील आत्मस्वातंत्र्यासाठी वापरता येऊ शकते. म्हणुन डॉ. आंबेडकरांनी शिक्षणास शस्त्र म्हटले आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या मानव तत्वास अनुसरुन जीवन व्यतीत करणारा समाज या शिक्षणातुन त्यांना अभिप्रेत होता. डॉ. आंबेडकरानी शिक्षणाचे महत्व पुढील घटकाद्वारे प्रतिपादीत केले.

१) व्यक्तीला स्व ची जाणीव करुन देण्यासाठी शिक्षण
२) विषमता नष्ट करण्यास व सामाजिक लोकशाहीसाठी
३) संघटीत व संघर्षासाठी शिक्षण
४) शिस्त, विकास, समानतेसाठी शिक्षण
५) चारित्र्य, समाजपरिवर्तन, क्रांतीचे साधन यासाठी शिक्षण
६) शिक्षण एक अन्न व शक्ती, स्त्री शिक्षणासाठी प्राधान्य.

वरील सर्व घटकांचा अभ्यास केला असता. सद्यस्थितीत या घटकांमध्ये अमुलाग्र बदल झालेले दिसून येतात. डॉ. आंबेडकरांनी पुढील ग्रंथामधुन शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय आदर्शवाद जगासमोर मांडला.

**निष्कर्ष**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारप्रणालीने केवळ बहुजन वर्गासच फायदा झाला हे सर्वस्वी चुकीचे आहे. तर मानवास मानव म्हणुन जगण्याचा अधिकार, व्यक्ती स्वातंत्र्य त्यांनी घालुन दिलेल्या आदर्शवादातुन मिळाला. १९३६ साली स्थापन केलेल्या स्वतंत्र मजुर पक्ष ने कामगाराचे अर्थशास्त्र परिपक्व बनविले. शेतीक्षेत्राचे दुय्यम स्थान, त्यामुळे अर्थव्यवस्थेची पिछेहाट, रुपयाचे परिवर्तन त्यामुळे विनीमयातील समस्या, भांडवली अर्थव्यवस्थेमुळे कामगारांचे शोषण अशा प्रकारच्या समस्यांवर त्यांनी उपाय सुचविले. तसेच राज्य समाजवादाची स्थापना, आंतरराष्ट्रीय व्यापाराला दिलेले महत्व त्यातुन भारताने स्विकारलेले १९९१ चे आर्थिक धोरण हा सर्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा परिपाक आहे. जो की सर्व जग मंदिच्या खाईत लोटले असतांनाही भारतीय अर्थव्यवस्था त्यापासुन थोडी दुरच आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आर्थिक आदर्शवाद असाच समोर ठेवून पाऊले उचलली तर भारत महासत्ता होण्यास उशीर लागणार नाही.

**संदर्भ**

१) अक्षरगाथा (त्रैमासिक), डॉ. एम.एम. जाधव
२) शैक्षणिक विचार , डॉ. के.यु. घारमोडे
३) आर्थिक विचारांचा इतिहास, डॉ. बी.डी. इंगळे
४) भारतीय समाज, ए.व्ही. कोंडेकर
५) एम.पी.एस.सी. राज्यसेवा पुर्व परिक्षा, डॉ. आनंद पाटील
६) डॉ. आंबेडकर, धनंजय कीर

# महिला सशक्तीकरण में डॉ. आंबेडकर की भुमिका

**- डॉ. कांबळे आशा दत्तात्रय**
एस.एस.व्ही.पी.एस. महाविद्यालय
शिंदखेडा, जि. धुलिया

डॉ. भीमराव आंबेडकर आधुनिक युग के मसिहा के रूप में जन्में। जिन्होने समाज की स्थापित व्यवस्था, न वैचारीक आधिनता स्विकार की न उनसे समझौता किया।वे पंरपरागत समाज की अन्याय एवं शोषणकारी शक्तियों के विरूध्द जीवन पर्यत संघर्ष करते रहे । संविधान के माध्यम से २६ जनवरी १९५० को संविधान समिती के अध्यक्ष के रूप में उन्होंने भारत मे अन्याय तथा शोषण रहित एक बेहतर युग एवं बेहतर समाज की आधारशिला रखी। तथा साथ ही हिन्दु कोड बिल का निर्माण कर पंरपरागत हिन्दु समाज में क्रांतीकारी परिवर्तन का मार्ग प्रशस्त किया।

डॉ.बाबासाहब ने हिन्दु संस्कृति में आमुलाग्र क्रांतिकारी परिवर्तन हिन्दु कोड बिल के माध्यम से करना चाहा । उन्होंने हिन्दुओं को एक ही कानुन में शासित होने की बात कही । डॉ.बाबासाहब पुरूष तथा स्त्रियों को समाज समझते थे, आज के बदलते परिस्थिती मे स्त्रीसबलीकरण या स्त्री स्वतंत्रता की चर्चा करना अनिवार्य हो गया है।विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षा, उदयोग आदि क्षेत्रों में स्त्रीयों का सहभाग बढता हुआ दिखाई देता है ।इसके पिछे यदि किसकी तपश्चर्या है तो वह है भारतीय संविधान के निर्माता डॉ. बाबासाहब आंबेडकर की। आज सामाजिक क्षेत्र में जो स्त्रियों को स्वंतत्र तथा समान संधी प्राप्त हुयी है तो उसके पिछे डॉ.आंबेडकर का योगदान है यह स्त्री जाति को भुलना नहीं चाहिए। एक जगह पर डॉ. आंबेडकर कहते है, स्त्री जातिको समान न्याय, समान संधी प्राप्त करा देनेवाला हिन्दु कोड बिल यह मेरा सबसे बडा योगदान होगा। और आंबेडकर ने संविधान के आधार पर नारी को पुरू षों के बराबर समान अधिकार बहाल करके देश की राजव्यवस्था चलाने का तथा नियुक्ति का अधिकार बहाल किया।

डॉ. आंबेडकर का व्यक्तित्व यह अनोखा तथा समाज को दिशा देनेवालाहै। एक दलित जाति में जन्म लेने के बाद उन्हें उपेक्षा मिली उससे जूझकर उन्होंने अपनी उन्नती का मार्ग खोजा ।अपने उपर होनेवाला अत्याचार यह निसर्ग निर्मित नहीं मानव निर्मित है इस बात का उन्हें एहसास हो गया। और उन्होंने उसकी खोज की यहॉ का दलित समाज खुद का अस्तित्व खो चुका है लेकिन उससे भी ज्यादा यहॉ की स्त्री गूलाम बनाई गयी है।इसका कारण क्या हो सकता है? इस प्रश्न का उत्तर वह खोजते है। इसके १५० वर्ष पहले म.फुले ने कहा था - इस विश्व के सभी धर्मग्रंथ यह पुरूषों ने लिखे हुये है, और उसमें उन्होने पुरूष जाति के हित संबंधी बातें लिखी हुयी है। उसमें पुरूष को अपने उपभोग्य वस्तु के समान स्त्री भी पुरूष के हर आवश्यकता को पूरी करने वाली, वंशवृध्दी करनेवाली घर के सारे काम करनेवाली के रूप में मान्यता दी गई थी। मनुस्मृति ग्रंथ जो हिन्दु धर्म समाज की आचार संहिता मानी जाती थी। उसने समाज के सबसे बडे स्त्री समुह को उपेक्षित ठहराया उसे गुलाम बनाया और उसके प्रगति के सारे द्वार बंद किये । नारी यह पुरूष की दासी है वह जन्म से मृत्यु तक वह दास्यत्व के बंधनो में ही बंधकर रह सकती है। इसलिए वह बचपन में पिता के आधार पर, जवानी में पति के आधारपर, और बुढापे में बच्चों के आधारपर जी सकती है। वह कभी भी स्वंतत्र नहीं रह सकती.

मनु अपनी मनुस्मृति में लिखते है कि,

१. अगर एखाद स्त्री केवल बेटीयों को जन्म देती है तो उसके पति को ११ साल तक बेटे के जन्म की राह देखनी है उसके बाद वह दुसरा विवाह कर सकता है। इसमें मनु ने दो विधान स्पष्ट किये है एक यह कि पुरूष को दुसरा विवाह करने का अधिकार है, दुसरा इस विवाह के लिए स्त्री की इच्छा हो या न हो।
२. पत्नी की मृत्यु के बाद पति दुसरा ब्याह कर सकता है लेकिन पति के मरने के बाद पत्नी मे आजीवन ब्रम्हचर्य का पालन करना है।
३. विवाह के बाद पत्नी अपने पति से छुटकारा नही पा सकती।
४. बालविवाह की भी मान्यता मनु दी थी।
५. पति के मृत्यु के उपरान्त उस स्त्री को वैधव्य को स्विकार करना पडता था ।

ऐसे कई सारे अन्याय अनादी काल से स्त्री पर होते आ रहे थे। इसप्रकार का तिरस्कृत और गुलामी से भरा हुआ जीवन स्त्रीयों के नसीब था।यदि पुरूष के जीवन को स्त्री के जीवन से निकाल दिया जाए तो उस पुरूष का अस्तित्व मिट सकता है। इस बात की खबर इस पुरूष समाज को नहीं थी। जिसके अंग प्रत्यंग से पुरूष का जन्म होता है उसके साथ इस तरह की बेइमानी? स्त्री के पास जो आपत्य निर्मिती का सामर्थ्य है, उससे वह अपने से बलशाली न हो जाए इसलिए धर्म के नाम के निचे दबाकर उसे हेतू पुरस्सर बंधनो मे रखने का काम मनुस्मृति में किया गया।

भगवान बुध्द, महात्मा फुले ने स्त्रियों के उध्दार का संकल्प किया और आगे जाकर हमारे भारत के संविधान निर्माता डा. बाबासाहब ने हिन्दु कोड बिल के रूप में क्रांतीकारी कार्यक्रम अपने हाथ में लिया। स्त्रीयों को सभी दृष्टी से स्वंयपुर्ण और सबल बनाने के लिए डॉ. बाबासाहब ने पहल की। जिसे संविधानिक तौर पर स्त्री पुरूष समानता धर्म के भीतर प्रदान होनेवाली थी ।

स्त्री गुलाम समझकर उसका मानविय अधिकार नष्ट करनेवाला तथा समाज की विषम समाजरचना करनेवाला प्रतिनिधिक ग्रंथ मनुस्मृति है। मनु यह विषमता का समर्थक, अन्यायी समाजरचना करनेवाला

पुरस्कर्ता, समता, न्याय, स्वंतत्रता का विरोधक, मानवी समाज को गुलाम बनानेवाला, पंरपरावाद का प्रखर प्रवक्ता इस रूप में उसकी पहचान थी. इसलिए डॉ.आबेंडकर ने सभी क्षेत्र में समता प्रस्थापित होने के उद्देश से मनुस्मृति का दहन किया और स्त्री पुरूष का भेद मिटाने वाली समानता पर आधारित संविधान की निर्मिती की।२० वी सदी की यह सबसे बडी क्रांती मानी जाती है । डॉ. बाबासाहब ने मनु के स्त्री विषयक विचारों को स्पष्ट करने का प्रयास किया. प्रत्येक स्त्री का अपना स्वंतत्र अस्तित्व है यह क्रांतीकारी विचार डॉ. आंबेडकर ने हिन्दु कोड बिल के माध्यम से समाज के सामने रखा।

न स्त्री स्वंतत्र मर्हती अर्थात स्त्री कभी भी स्वंतत्र नही हो सकती।मनु के इस विचार को डॉ. आंबेडकर ने संविधान के कलम १४,१५,१६,३९ और कलम ५१ के अनुसार स्त्री पुरूष समानता का अधिकार नारी को बहाल किया हुआ दिखाई देता है। मनु इस बात को मान्य करते है कि नारी यह पुरूष के विकास में बाधा है।

भारतीय संविधान के इतने अधिकारों के पश्चात भी मनु के स्त्री विषयक विचारों का पुरूष प्रधान समाजव्यवस्था पर आज भी भारी भरकम प्रभाव दिखाई देता है। आज के संसद मे स्त्री अधिकारों के प्रति कानुन को पास न करना किस मानसिकता का प्रतिक है यह बात समझमें आ सकती है।डॉ. आंबेडकरने स्त्री पुरूष समानता का अखंड पुरस्कार किया। धर्म के नामपर धर्मग्रंथो में जो पंरपराओं ने नारी को गुलाम समझा था उसे हमेशा के लिए नष्ट करने का काम डॉ. बाबासाहब ने किया।इसके साथ साथ स्त्री की सर्जनशिलता को आपत्य निर्मिती तक मर्यादित न रखते हुये जीवन के प्रत्येक क्षेत्र में वह अपना कर्तृत्व सिध्द कर सकती है यह बात समाज को बतलाई। डॉ. आंबेडकर कहते है कि नारी की प्रगतिपर समाज की प्रगति का अनुमान लगाया जा सकता है। स्त्री अधिकारो के बारे में डॉ.आंबेडकर ने –

*नारी को तलाक अधिकार मिला।*

*पोटगी का अधिकार मिला।*

*पहला विवाह यह कानुनन माना गया तो दुसरा विवाह अवैध ठहराकर स्त्री को स्थैर्य प्राप्त कर दिया।*

*स्त्री को दत्तक लेने का और दत्तक देने का अधिकार मिला।*

*खुद की मालमत्ता पर स्त्री को अधिकार मिला।*

*पिता की जायजाद में बेटे के बराबर का हिस्सा मिला।*

*बेटी को वारिस का अधिकार मिला।*

*अंतरजातिय विवाह को मान्यता मिली।*

*स्त्री को खुद का वारिस सिध्द करने का अधिकार मिला।*

स्त्री भी पुरूष की तरह एक पुर्ण व्यक्ति है इस रूप में उसे सारे अधिकार मिलने चाहिए यह क्रांतीकारी विचार डॉ. आंबेडकर ने समाज को दिए।

डॉ .आंबेडकर ने महाड सत्याग्रह के समय उपस्थित महिलाओं को संबोधित करते हुए कहॉ कि महिलाओं ने अपने बच्चों की पढाई की ओर ध्यान देना है, ज्ञान तथा विद्या प्राप्त करना यह पुरूषों का ही अधिकार है यह बात गलत है, स्त्रीयों ने साफ सुथरा रहना है, नकली आभुषणों को दुर करना है, अपनी लडकियों को अपना पति चुनने का अधिकार देना है, मरे हुए जानवरों का मास सेवन नहीं करना है, शराबी पति तथा बेटे को खाने को नही देना है, इस तरह की बातें डॉ. आंबेडकर ने महिलाओं को समझायी।

डॉ. आंबेडकर स्त्रियों के स्वास्थ्य के संदर्भ में अपने विचार रखते है – इन्होंने १९३८ में स्वंतत्र मजूर पक्ष की ओर से संतति नियमन का अशासकिय विधेयक मंजुर किया । कुटुंब नियोजन यह स्त्रियों के लिए कितना आवश्यक है यह इस विधेयक के माध्यम से समझाने का प्रयास किया। बच्चों के जन्म के समय स्त्रीयों को तकलिफ होती है या कुछ स्त्रीयों की जान भी जाती है।एखाद स्त्री की इच्छा मॉ बनने की नहीं है तो उसपर जबरदस्ती नहीं की जा सकती। बच्चें को जन्म देना या न देना यह उसकी इच्छा पर निर्भर होना चाहिए।इस तरह उसके स्वास्थ्य की दृष्टि से जो बातें सुरक्षित है उसके बारे में विचारपुर्वक निर्णय डॉ. आंबेडकर ने सुझाए।

डॉ आंबेडकर ने स्त्रियों को कौटुंबिक तथा व्यक्तिगत जीवन में सभी दृष्टि से स्वतंत्र किया। समाज की धरातल पर उसके प्रश्नों की चर्चा करते हुए उसे बडी गंभीरता से छुडाने का प्रयास किया। स्त्री होने के कारण काम की जगहपर उसका होनेवाला शोषण ,उसे मिलनेवाले दुय्यम स्थान को डॉ. आंबेडकर ने सार्वजनिक क्षेत्र में स्त्रियों को न्याय दिलाया।उसके साथ ही स्त्री पुरूष दोनों को समान वेतन इस तत्व का प्रथमत: स्विकार किया। प्रसुति समय में स्त्रियों को विशिष्ट समय तक आराम देने का कानुन भी डॉ. आबेडकर की ही देन मानी जाती है। इस तरह स्त्रियों को विश्रांती का अधिकार देनेवाले डॉ. आंबेडकर स्त्री मुक्ति के संदर्भ में हर सभा में अत्यंत प्रभावी तथा मर्मस्पर्शी विचार रखते है। स्त्री के उज्वल भविष्य के लिए उसके अधिकारों के लिए, चितिंत डॉ. आंबेडकर यह कहते है कि, नारी जाति का सम्मान होना आवश्यक है। उसे प्रतिष्ठा मिलना आवश्यक है।

१८,१९,२० जुलाई १९४२ के नागपुर आखिल भारतीय दलित महिला परिषद के अधिवेशन में डॉ. आंबेडकर ने २० से २५ हजार महिलाओं को संबोधन करते हुए कहॉ था कि किसी भी समाज की प्रगति यह स्त्रियों की प्रगतिपर निर्भर करती हैं। अपने इसी क्रांतीकारी विचारों से वे समाज के भीतर का भेद जलाना चाहते थे। इसलिए बहिनाबाई की पक्तिंया – अरे माणसा माणसा कधी होशील माणूस इस पक्तिंयों का जवाब आज २१ वी सदी में भी नही मिल पाया है। नारी को परिवर्तन के मार्ग पर ले जानेवाली सावित्रीबाई फुले के साथ विकसनशिल नारी का स्वप्न डॉ. आंबेडकर ने देखा और उनका स्वप्न पुर्ण करने की जिम्मेदारी आज हमपर आ पडी है। वह जिम्मेदारी हमे स्विकार करनी है।

डॉ. आंबेडकर यह शिक्षा के पुरस्कर्ता थे। स्त्री–पुरूष को एकत्रीत रूप से शिक्षा मिलनी चाहिए। भारतीय संविधान तथा हिन्दु कोड बिल के द्वारा उन्होंने भारतीय नारी के स्वतंत्रता की अस्मिता की मंगल कामना की ।नारी के अंधकारमयी जीवन में डा. आंबेडकर के रूप में दैदिप्यमान सुर्य आ गया।संविधान के कलम ३९ के समान वेतन देने की तरतुद की गई।

आज हमारे देश में पुरूषों की संख्या के बराबर में स्त्रियों की संख्या पायी जाती है। इसलिए महिलाओं को कानुनन सदस्यत्व के रू प में प्रतिनिधित्व प्राप्त हो इसलिए डॉ.आंबेडकर ने जो विचार रखे वह

दुरदृष्टि के माने जाते है । जब महिला प्रतिनिधी के रू प में सत्ता में नही आयेगी तब तक सही मायने में स्त्री के अस्तित्व का विचार नहीं होगा यह सत्य डॉ.आंबेडकर ने जान लिया था। इसलिए डॉ. आंबेडकर कहते है कि महिलाओं को राजनीतिक दृष्टि से अधिकार मिलने आवश्यक है।बाबासाहब वे सारे अधिकार नारी को बहाल किये जो मनु ने नकारे थे।

समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता, संधी की समानता, व्यक्ति प्रतिष्ठा, राष्ट्रीय एकता और एकात्मता को वृंध्दिगत करनेवाला भारत का संविधान यह विश्व का सबसे महत्वपुर्ण माननेवाला राष्ट्रगंथ है।इसलिए हमारे देश के संविधान पर पुरा विश्व गर्व करता है।जिसमें भारतीय नारी को सशक्त करने में डॉ. आंबेडकर का बहोत बडा योगदान है।

**संदर्भ**


१. मनुस्मृतिच्या समर्थकांची संस्कृति – आ.ह. साळुंखे
२. विश्वभूषण डॉ. बाबासाहब आंबेडकर मानस आणि तत्वविचार – धनंजय कीर
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर – धनंजय कीर
४. प्रबुध्द भारत – साप्ताहिक
५. बहुजन मिडीया – साप्ताहिक